# नीट्झशेचा ख्रिस्तांतक

आणि

# ख्रिस्तांतक नीट्झशे

भाग पहिला

शंकर रामचंद्र राजवाडे

नीट्झशेचा ख्रिस्तांतक
आणि
ख्रिस्तांतक नीट्झशे
भाग पहिला
शंकर रामचंद्र राजवाडे
कृत

म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्रं. ५१९२

REFBK-0004342

REFBK-0004342

# नीट्झशेचा ख्रिस्तांतक

आणि

# ख्रिस्तांतक नीट्झशे


## शंकर रामचंद्र राजवाडे

कृत


भाग पहिला


ग्रंथसंग्रहालय

दा. क्र. ८३८२



पुणें.

प्रथमावृत्तीच्या दोन हजार प्रतींपैकीं
ह्या प्रतीचा अंक
138

---

मुद्रक : शंकर बळवंत सहस्रबुद्धे, बालोद्यान छापखाना
६८९ सदाशिव पेठ, पुणें.
प्रकाशक : शंकर रामचंद्र राजवाडे, अग्निहोत्रमंदिर
२८६ सदाशिव पेठ, पुणें.

नीट्झशेच्या वृत्तीचा
महाराष्ट्रांतील एक च बाणेदार विवेचक
**विश्वनाथ काशीनाथ राजवाडे**
यांचे स्मरणार्थ

# नीट्झशेचा खिस्तांतक
## आणि
# खिस्तांतक नीट्झशे

# उपोद्घात

" ख्रिस्तांतक " हा ग्रंथ अर्वाचीन काळच्या युरोपांतील एका ब्राह्मणवृत्तीच्या महामुनींनें मूळ जर्मन भाषेंत लिहिला आहे. त्याचें हें मराठी रूपांतर मराठी वाचकांच्या करितां तयार केलें आहे. यांत मूळ ग्रंथकाराच्या मनांतील संपूर्ण आशय त्याच्या च विशिष्ट लेखनपद्धतीप्रमाणें मराठी शब्दांत उतरला आहे. हा ग्रंथ प्रत्येक आर्यपुत्रानें आणि विशेषत: वैदिक धर्माच्या आणि संस्कृतीच्या अभिजात अनुयायानें मननपूर्वक वाचला पाहिजे. कारण त्यांत त्याला आपल्या स्वत:च्या ठिकाणीं जन्मानें प्राप्त झालेल्या परंतु भोंवताळच्या प्रतिकूल परिस्थितींत मावळत चाललेल्या उपजत उच्च मनोवृत्तींचें मूळ तात्त्विक बीज सुलभरीतीनें आढळून येणार आहे. असा हा ग्रंथ आर्यांच्या आधुनिक अधोगतीच्या मार्गांत एक मोठा बंधारा पडून त्याला सांवरून धरणारा आणि विचार करावयास लावणारा आहे हें कोणा हि श्रद्धापूर्वक वाचण्यास

प्रवृत्त होणाऱ्या विचारवंताच्या प्रत्ययास आल्यावांचून राहणार नाहीं. सदर भागांत मूळ " खिस्तांतक " संपूर्ण उतरला असून त्यावर तीन खंडांत जें विस्तृत विवरण देण्याचें योजिलें आहे त्यापैकीं पहिला खंड आला आहे. बाकीचे दोन खंड यथावकाश पुढील भागांत येतील.

पुणें विजयादशमी<br>
शके १८९३ प्रजापतिनाम<br>
संवत्सरे.

शंकर रामचंद्र राजवाडे

१५९३.
५८
१५३१



**फ्रीड्रिक् नीट्झ्शे**

“संपूर्ण वेड्या युरोपांत एक च शहाणा पुरुष”

| जन्म | विदेहावस्था | निधन |
|---|---|---|
| १८४४ आक्टोबर १५ | १८८९ जानेवारी | १९०० आगष्ट २५ |

# नीट्झशेचा ख्रिस्तांतक

खिस्ती धर्मावर नीट्झशेची टीका

# प्रस्तावना

हा ग्रंथ फार थोड्या लोकांकरितां आहे. त्यांपैकीं अद्याप एक हि उत्पन्न झाला असेल किंवा नाहीं याची शंका आहे; एखादा कोणी असला च तर तो माझ्या 'एवमब्रवीज्झरथुष्ट्रः' या ग्रंथाचें परिशीलन केलेला असावयाचा. ज्या विद्यमान् लेखकांच्या कृतीचा आज च सर्वत्र बोलबाला चालला आहे अशांच्या वर्गांत मी आपलें नांव समाविष्ट करून घेण्याची चूक कशी करावी?— उद्यांचा काळ हा च माझ्या प्रभावाचा काळ आहे. कांहीं ग्रंथकार आपल्या मृत्यूच्या पश्चात् जन्मास येतात.

माझ्या पुस्तकाचें रहस्य समजण्यास ज्या विशिष्ट परिस्थितीची आवश्यकता आहे तिची मला पूर्ण कल्पना आहे; इतकी कीं, त्या च परिस्थितींत तें कोणा हि मनुष्यास हटकून समजेल. ती परिस्थिति म्हणजे तो वाचक माझी उदात्तता आणि उत्कटता हीं दोन्ही सारखीं च सहन करण्याइतका बुद्धीचा सरळ आणि मनाचा खंबीर पाहिजे. त्याला उत्तुंग शैलशिखरावर राहण्याचा अभ्यास पाहिजे. राजकीय बाब-

तींतील क्षुद्र बकबक आणि राष्ट्रीय अभिमानाच्या वृथा दर्पोक्ति यांत आपल्याला अति कमीपणा येतो अशी त्यास भावना पाहिजे. तो कर्मफलासंबंधीं इतका निष्काम बनलेला पाहिजे कीं, सत्याच्या शोधनांत तें खरोखर इष्टफलदायक होईल किंवा अनिष्टकारक ठरेल याबद्दल त्यानें केव्हां च पृच्छा करतां कामा नये........स्वतःच्या जिज्ञासाबलानें प्रश्न विचारण्याचें धैर्य प्रस्तुतकाळीं कोणास हि होत नाहीं अशा प्रश्नांविषयीं—अर्थात् मना केलेल्या प्रश्नांविषयीं—त्याच्या मनांत इतकें कुतूहल उत्पन्न झालें पाहिजे कीं, त्याला आपल्या जीवनाचें परम अंतिम बुद्धीच्या चक्रव्यूहांत दिसलें पाहिजे. सप्तविजनांतील एकांताचा अनुभव. अभिनव चैतन्योत्पादक गानमार्गाकडे वळणारे नवीन कान. अति पुराणवस्तूकडे वेधणारे नवीन डोळे. आज पर्यंत मूकभावांत असलेल्या सत्यांविषयीं नवीन अन्तःकरणप्रवृति. आणि बल व उत्साह यांच्या पुष्टयर्थ अति मोठ्या प्रमाणावर धनसंचय करण्याची मनीषा........तो मानधन पाहिजे; तो आत्मनिष्ठ पाहिजे; तो स्वतःविषयीं पूर्णपणें स्वातंत्र्यभाव धारण करणारा पाहिजे........तथास्तु! केवळ असे पुरुष माझे वाचक आहेत, माझे योग्य वाचक, माझे भावी काळांतील अधिकारनियत वाचक: बाकीच्यांची मला काय पर्वा आहे? ‘तान्प्रतिनैष यत्नः।’ ते केवळ मानवरूपधारक होत इतकें च. —माझा वाचक अशा मानवब्रुवांपेक्षां बलानें, उच्च आत्म-भावनेनें आणि तिरस्कारवृत्तीनें श्रेष्ठ च असावयाचा.

**फ्रीड्रिक् निट्झ्शे**

8342

## १

चला, आपण एकमेकांकडे दृष्टि सरळ करून पाहूं या. आम्हीं उत्तरप्रदेशांतील रहिवासी आहों, — आम्हीं सामान्य जनसमूहाच्या बाहेर किती दूर राहतों हें पूर्णपणें जाणतों. "उत्तर-प्रदेशांतील लोकांकडे जाण्यास तुम्हांला खुष्कीनें वाट मिळणार नाहीं किंवा जलमार्गानें हि नाहीं": प्राचीन ग्रीक कवि पिंडार याला आमच्याबद्दल इतकी माहिती खास होती. उत्तरेच्या पलीकडे, हिम आणि मृत्यू — **आमचें जीवन, आमचा ब्रह्मानंद**....या आनंदाचा शोध आम्हीं च लावला; आम्हीं च त्याचा मार्ग जाणतों, हा मार्ग आम्हीं हजारों वर्षांच्या चक्र-व्यूहांतून प्राप्त करून घेतला. आमच्यावांचून दुसऱ्या कोणाला तो सांपडला असता? आधुनिक मनुष्यास तर खास नसता.— हा आधुनिक मनुष्य मोठमोठे सुस्कारे टाकून म्हणतो —" मी कोठें आहे देव जाणें; म्यां काय करावें कोणास ठाऊक; ज्यांना

आपण कोठें आहों व काय करावें हें कांहीं च समजत नाहीं अशा किंकर्तव्यतामूढ व आत्मसाक्षात्कारशून्य नाकर्त्यांतील मी सर्वस्व आहे." आम्हांला तर ह्या प्रकारच्या आधुनिकत्वानें अगदीं जर्जर करून सोडलें होतें; — ह्या आधुनिकत्वाचें स्वरूप म्हणजे आलस्यपूर्ण शांति, भीतिपूर्वक समेट, आणि हें कर तें करूं नको अशा प्रकारच्या शुष्क नीतिवादाचें गलिच्छ अवडंबर होय. आपणांस सर्व कांहीं "**समजतें**" या भावनेनें सर्वांभूतीं क्षमा बाळगणारें मनाचें सहिष्णुत्व आणि हृदयाचें विस्तृतत्व हें तर आमच्या अन्तःकरणास झंझावाताप्रमाणें झोंबतें. असल्या आधुनिक नीतीच्या वातावरणांत श्वसन करण्यापेक्षां आणि त्या च सारख्या इतर दुसऱ्या पितृदिशेकडून वहात येणाऱ्या मलयवायूंनीं स्पृष्ट होण्यापेक्षां आम्हीं हिमांत राहणें पसंत करतों!.... आम्हीं आतांपर्यंत पुष्कळ धैर्य दाखविलें; आम्हीं स्वतःच्या व इतरांच्या श्रमाकडे पाहिलें नाहीं: तथापि आमच्या धैर्याला दिशा कोणती द्यावी हें आम्हांस कळेना. आम्हीं दिवसेंदिवस निर्विण्ण होत चाललों; लोक आम्हांस दैववादी म्हणूं लागले. **आमचें** दैव—विपुल शक्ति पैदा करणें, तिला सदैव दाबांत ठेवणें, आणि तिचा भावी कार्याकरितां योग्य संग्रह करणें, — हें आमचें दैव होय. वज्राचे प्रहार आणि महनीय पराक्रम ("हस्ते वज्रं तन्वी सहो महो भरति शीर्षणि क्रतुम्") ही च केवळ आमची तृष्णा होती; दुर्बलांच्या सुखवृत्तीपासून, '**कर्मसंन्यासा**' **च्या** भावनेपासून आम्हीं चार पावलें दूर च राहिलों....... आमच्या वातावरणांत घनगर्जना

उत्पन्न झाली, ज्या विशिष्ट प्रकृतिभावानें संपन्न आम्हीं आहों त्या आमचा आत्मा खिन्न होऊं लागला – **कारण आम्हांस कोणती दिशा दिसेना.** आमच्या ब्रह्मनिर्वाणाची पद्धतिः सत् , असत्, सरळ रेषा, अंतिम पद.

२

सत् म्हणजे काय? जें सर्व बलाची भावना वाढवितें (म्हणजे बलसाधन ), बलेच्छा, मनुष्यांतील साक्षात् बल. असत् म्हणजे काय? जें सर्व दुर्बलते पासून उगम पावतें. आनंद कोणता? –बल **वृद्धिंगत** होत आहे ही भावना,–प्रतिकार करणाऱ्या शत्रूवर मिळविलेला विजय.

वृथा संतुष्टपणा नाहीं, तर बलसंवर्धन आहे; उगीच शांतिरस्तु नाहीं, तर युद्धतत्परता आहे; खोटा सद्गुण नाहीं, तर खरें ' वीरत्व ' आहे (नीतीच्या रंगाचा डाग न लागलेलें असें नवविद्यावताराच्या काळांतील शुद्ध अविकृत वीरत्व =Virtú) सर्व दुर्बल आणि पंगू यांचा नाश झाला पाहिजे : हें च आमच्या भूतदयेचें आद्यतत्व होय. इतकें च काय, पण त्यांचा नाश होण्यास साहाय्य करणें हें आमचें कर्तव्य आहे.

कोणत्या हि दुर्गुणापेक्षां अधिक घातक काय आहे?— सर्व पंगू आणि दुर्बल लोकांविषयीं सक्रिय सहानुभूति = खैस्त्य.

३

सदर ग्रंथांत मी जो प्रश्न उपस्थित केला आहे तो जीव-

सृष्टींतील श्रेणींत मनुष्याच्या जागीं दुसरा कोणता प्राणी तें पद प्राप्त करून घेईल हा नाहीं ( — मनुष्य हें अंतिमरूप आहे —); तर मनुष्याच्या कोणत्या विशिष्ट रूपगुणाचा नमुना **जतन** केला पाहिजे, कोणता **चिंतला** पाहिजे, कीं जो जिवंत राहण्यास सर्वथा सुपात्र होईल, जो भावी काळचें सत्फल निर्माण करण्यास पूर्ण लायक ठरेल आणि त्यायोगें त्याचें मूल्य सर्वांपेक्षां अधिक गणलें जाईल.

हा अति श्रेष्ठ प्रतीचा नमुना आजपर्यंत अनेक प्रसंगीं जगाच्या निदर्शनास आला आहे: परंतु सहज यदृच्छेनें, केवळ अपवादात्मक रीतीनें; **इच्छाबलानें प्राप्त करून घेतलेला** नव्हे. हा बहुधा आपल्या श्रेष्ठत्वाच्या योगें भीतिप्रद व्हावयाचा; जणुं तो मूर्तिमंत भीषणरूप दिसावयाचा; — आणि केवळ ह्या त्याच्या **भयोत्पादक** गुणामुळें च हल्लींच्या काळीं ज्या विशिष्ट हीन स्वरूपाच्या मानवाची जोपासना चाललेली सर्वत्र दिसून येते तो नमुना मूळ उत्थापित करण्याची इच्छा अस्तित्वांत आली, नव्हे तो प्रयत्नांतीं **साध्य** करून घेतला: गृहवासासक्त प्राणी, संघप्रिय प्राणी, विषण्ण मानव प्राणी,— ख्रिस्तानुयायी.

४

मानवजात ही प्रगतीच्या उच्च मार्गावर अधिकाधिक बलवान् आणि श्रेष्ठ दर्जाची बनत चालली आहे अशी जी आज सर्वसामान्य समजूत आहे ती चुकीची आहे. "प्रगति" ही

शुद्ध आधुनिक कल्पना आहे — आणि म्हणून ती मिथ्या कल्पना आहे. आधुनिक युरोपीय मानव हा मध्ययुगीन 'रिनेसन्स' काळांतील युरोपीय मानवापेक्षां योग्यतेनें निखालस कमी दर्जाचा आहे. उत्क्रान्तीचा ओघ म्हटला कीं त्यांत हटकून उन्नति, वृद्धि आणि बलसिद्धि घडून यावी असा कांहीं नियम नाहीं.

उलटपक्षीं या भूतलावरील निरनिराळ्या प्रदेशांत ज्या निरनिराळ्या संस्कृति आहेत त्यांतून परिणामरूपानें नित्य अशा कांहीं एकेकट्या स्वतंत्र व्यक्ति प्रकट होतात कीं त्यांत च वास्तविकरीत्या मानवजातीचा **सर्वोत्कृष्ट नमुना** पहावयास सांपडतो: अशा व्यक्ति इतर सर्वसामान्य मानववर्गांत 'पुरुषोत्तम' या संज्ञेस पात्र होतात. असे महाप्रतापी दैवी घटनेचे अवतारी पुरुष आजपर्यंत जगतांत पुष्कळ होऊन गेले आहेत आणि पुढें हि कदाचित् सर्वकाळ होत राहतील. किंबहुना असे एकेकटे नरावतार च काय, पण संपूर्ण वंशाचे वंश, वर्णचे वर्ण व राष्ट्रचीं राष्ट्रें हीं सुद्धां कांहीं विशिष्ट परिस्थितींत या **दैवी घटनेनें** अवताररूपाला जातील यांत कांहीं संशय नाहीं.

५

ख्रिस्तीधर्मावर आभरणें चढवून आपण त्याला उगीच डौल आणतां कामा नये: त्या धर्मानें सदरहू उच्च नमुन्याच्या मानवरूपाविरुद्ध घनघोर युद्ध पुकारलें आहे; त्यानें या नमुन्याच्या मूलभूत भावनांवर बहिष्कार घातला आहे, आणि या भावनां-

तून खुद्द सैतानरूपी पाप्म्याचा अर्क काढला आहे :—बलवान् पुरुष जणुं चांडाळाची प्रतिमा, राक्षस च होय. ख्रिस्तीधर्म हा नेहमी जें कांहीं दुर्बल, नीच आणि पंगु असतें त्याच्या वतीनें बोलतो. बलसंपन्न जीविताच्या सर्व आत्मसंरक्षक भावनांचा **द्वेष करणें** यांत च त्यानें आपलें ध्येय योजिलें आहे: बुद्धीच्या क्षेत्रांतील अति उच्च ठरलेल्या सर्व महनीय वस्तु पापयुक्त, असन्मार्गदर्शक, आणि पूर्णपणें मोहमय आहेत असें शिकवून या धर्मानें मोठमोठ्या बुद्धिवान् मनुष्यांचा हि बुद्धिभ्रंश केला आहे. याचें अति शोचनीय उदाहरण म्हणजे फ्रेंच पंडित पास्कल होय. याला आपली मति केवळ आद्य मानवयुग्माच्या पापाचरणामुळें च विकृत झाली असें वाटे; पण वास्तविकरीत्या ती त्याच्या ख्रिस्तीधर्मावरील श्रद्धेमुळें विकृत झाली होती.

## ६

माझ्या डोळ्यांपुढें एक दुःखद आणि भीतिप्रद दृश्य उभें राहिलें आहे. ज्याच्या योगानें मानवजातीचें **पापप्रवणत्व** झांकलें गेलें होतें तो पडदा मी फाडून टाकला. ह्या शब्दापासून मानवजातीविरुद्ध कांहीं तरी नैतिक दोषारोप ध्वनित होतो असा संशय येण्याचें निदान माझ्या भाषेंत तरी कारण नाहीं. मी पुनः पुनः बजावून सांगतों कीं, माझ्या अर्थानें ह्या शब्दांत नीतीचा किंचित् हि आंबुस वास नाहीं: किंबहुना ज्या प्रदेशांत आतांपर्यंत लोकांनीं “ सद्गुण ” आणि “ देवगुण ” यांची

मोठ्या निश्चयानें आकांक्षा धरली त्या च प्रदेशांत मला हें पापप्रवणत्व स्पष्ट रीतीनें दिसून आलें. यावरून तुम्हीं ताडलें च असेल कीं, माझ्या अर्थानें पापप्रवणत्व म्हणजे **निर्बलत्व** होय. माझा हा ठाम सिद्धान्त आहे कीं, ज्या वस्तूंवर मानवजातीनें आपल्या अत्युच्च आशा आणि इच्छा यांची मदार ठेविली आहे त्या सर्व वस्तु **निर्बलतेच्या** द्योतक आहेत.

जेव्हां एखादा प्राणि, जाति, किंवा व्यक्ति आपल्या मूल भावना गमावते आणि विघातक वस्तु निवडून **पसंत** करिते तेव्हां तिला मी खरी 'पतित' समजतों. 'उच्च भावना' आणि 'उच्च मानवी ध्येयें' यांचा जर इतिहास लिहिला – आणि कदाचित् हें अगदीं शक्य आहे कीं, बहुधा तो मला च लिहावा लागेल—तर मनुष्य हा असा पापप्रवण कां या प्रश्नाचा त्यांत उत्तम उलगडा होईल. माझ्या मताप्रमाणें जीवित म्हणजे दुसरें कांहीं नाहीं तर वृद्धि, स्थिरता, शक्तिसंग्रह आणि बल यांची शुद्ध अविकृत भावना होय : जेथें बलेच्छा कोती पडते तेथें ऱ्हास सुरू होतो. माझा वाद हा च कीं, ज्या वस्तु हल्लीं मानव समाजांत अत्युच्च म्हणून लेखण्यांत येतात त्यांत ह्या इच्छेचा पूर्ण **अभाव** दिसतो – मोठमोठ्या पवित्र नांवांच्या आच्छादनाखालीं अवनति आणि प्रणाश यांचीं मूल्यें आज मनुष्याच्या मनावर साम्राज्यसत्ता गाजवीत आहेत.

## ७

ख्रिस्तीधर्म हा दयेचा धर्म म्हणतात.—दया ही जीविताच्या

भावनेचें तेज वाढविणारे जे कांहीं शक्तिवर्धक मनोविकार आहेत त्यांना प्रतिरोधक आहे: तिची क्रिया विमनस्कता आणणें. जेव्हां मनुष्य दया करूं लागतो तेव्हां तो बलहीन होत जातो. शारीरिक कष्टाच्या दु:खानें जगतांत अगोदर च जो शक्तीचा क्षय होत चालला आहे तो दयेच्या योगानें सहस्रगुणित होतो. दयेच्या योगानें शारीरिक कष्टाचें दु:ख हें एखाद्या संसर्गजन्य रोगाप्रमाणें पसरतें; क्वचित् प्रसंगीं तिच्या योगें जीविताचा आणि जीवनशक्तीचा पूर्ण नाश होतो; व हा नाश त्याच्या कारणाच्या आकारमानानें सर्वथा अनुचित प्रकारें प्रमाणाबाहेर जातो ( — याचें उदाहरण नॅझारेथच्या येशूख्रिस्ताचा मृत्यु होय). हा पहिला मुद्दा झाला; पण या हि पेक्षां दुसरा एक अधिक महत्त्वाचा मुद्दा आहे. कल्पना करा कीं, दयेपासून सामान्यत: जे प्रत्याघात उत्पन्न होतात त्यांच्या मूल्यानें जर त्या दयेचें मापन केलें तर ती जास्त च तीव्रतेनें जीवनाला भयकारक दिसूं लागते. सारांश, दया ही गुणविकासाच्या उत्क्रान्तिमार्गांत म्हणजे युक्त क्रियेच्या निवडींत अडथळा आणते. जें मरणाच्या दारीं बसलें आहे त्याचें दया रक्षण करते; जें पितृधनापासून च्युत झालें आहे व आयुष्यांत टाकाऊ ठरलें आहे त्याच्या वतीनें दयेची सगळी तरफदारी असते; जें कांहीं सर्व प्रकारचें अपरिपक्व भरताड जन्मास येतें त्याची काळजी दया वाहते आणि त्यायोगें खुद्द जीवितास च एक प्रकारची उत्साहहीन आणि संशयास्पद कळा प्राप्त होते. दया हा सद्गुण आहे असें म्हणणें हें लोकांचें धाष्टर्य च आहे ( — प्रत्येक

उदात्त संस्कृतींत तिला दुर्बलतेच्या सदरांत काढण्यांत येतें —— ); इतकें च नाहीं तर यापुढें जाऊन लोकांनीं तिला 'एकमेवाद्वितियं' सद्गुणाच्या पदाला पोंचविलें, तिला सर्व सद्गुणांची आद्यजननी बनविलें,—— तथापि हें केव्हां हि विसरतां येणार नाहीं कीं. ज्या शून्यवादी तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें वास्तविक रीत्या ही गोष्ट घडून आली आहे त्या तत्त्वज्ञानाच्या ढालेवर **जीविताचा निषेध** हें बिरुद ढळढळीत अक्षरांनीं कोरलें आहे. या बाबतींत शोपेनहौएरचें मत अगदीं यथार्थ आहेः दयेच्या योगें जीविताचा निषेध होतो आणि तें **निषेधास अधिक लायक** बनतें, – दया ही शून्यवादाची साक्षात् क्रियामूर्ति आहे. मी पुनश्च सांगतों कीं, ही उत्साहभंग करणारी आणि संसर्गदोष वाढविणारी दयेची भावना इतर सर्व श्रेष्ठजीविताचें संरक्षण आणि संवर्धन करणाऱ्या भावनांना मारक आहे : जें जें कांहीं दुःखपीडित आहे त्या सर्वांचें संगोपन करून आणि या रीतीनें दुःख अनंतपटीनें वाढवून दया ही अपकृष्टतेच्या वृद्धीला मुख्य कारणीभूत झाली आहे,— ती मनुष्याला जोरानें 'कांहीं नाहीं' कडे म्हणजे शून्याकडे वळविते ! पण चमत्कार हा कीं, तो त्याला "शून्य" लेखीत नाहीं, तर "ज्ञानातीत", "ईश", किंवा "सद्वस्तु" समजतो; अथवा त्याजागीं निर्वाण, मोक्ष, किंवा आनंद हे शब्द योजतो. धार्मिक–नीतीच्या विचित्र कक्षेंतील हें सोज्वळ शब्दसौष्ठव जितकें बाहेरून निरुपद्रवी दिसतें तितकें आंतून नाहीं. कारण सूक्ष्मविचारान्तीं असें दिसून येईल कीं,

उदात्त शब्दसमूहाच्या आभरणानें स्वतःस अलंकृत करून घेणारी ही मनःप्रवृत्ति खरोखर जीविताशीं शत्रुभाव धारण करणारी आहे. शोपेनहौएर हा जीविताकडे शत्रुभावाच्या दृष्टीनें पाहणारा होताः आणि म्हणून च त्यानें दयेला सद्गुणाच्या उच्च पदावर चढविलें.....आपणास ठाऊक च आहे कीं, आरिस्टॉटलच्या मतें दया ही रोगप्रद आणि अपायकारक अवस्था असल्यामुळें तिचें मधून मधून एखाद्या रेचकाच्या मदतीनें शरीरांतून निःसारण करणें अगत्याचें आहे : शोकपर्यवसायी नाटक हें अशा प्रकारचें रेचक आहे असें तो मानी. जीविताच्या उपजतवृत्तीचें नीट संरक्षण होण्याकरितां, ज्या दयेनें शोपेनहौएरच्या मनाला ग्रासून टाकलें त्या रोगप्रद आणि अपायकारक दयेचा जेथें तुंबारा सांचला असेल तेथें त्याला भोंक पाडून फोडून टाकण्याचें कांहीं तरी साधन शोधून काढणें अत्यावश्यक आहे (आणि दुर्दैवानें असें म्हणावें लागतें कीं, सेंटपीटर्सबर्गपासून पॅरिसपर्यंत व टॉल्स्टॉय्पासून वॅग्नरपर्यंत आपलें जें सर्व वाङ्मयात्मक आणि कलात्मक दैन्य आहे त्याची हि ती च वाट लावली पाहिजे )........ आमच्या आधुनिक रोगट जीवितांत खिस्ती दयेपेक्षां दुसरें कांहीं अधिक आरोग्यविघातक नाहीं. येथें नाडीपरीक्षक होणें, येथें अंतःकरण कठोर करणें, येथें शस्त्र सफाईनें चालविणें,—हें सर्व आमचें काम आहे, हा सर्व आमच्या बांधवांवर प्रेम दाखविण्याचा आमचा मार्ग आहे; हा च

आम्हांस तत्त्वज्ञ बनवितो, आम्हांस उत्तर प्रदेशांत निवास करण्यास लावतो!— —

८

आम्हीं आमचे प्रतिस्पर्धी कोण मानतों हें सांगणें जरूर आहे: — देवशास्त्रज्ञ, आणि ज्यांच्या नसांत देवशास्त्रज्ञांचें रक्त खेळत आहे असे सर्व – आमचें सर्व तत्वज्ञान........ या घातुक शास्त्राशीं ज्या मनुष्याचा निकट संबंध आला आहे किंवा अधिक सयुक्तिक म्हणजे ज्याला त्याचा आत्मसाक्षात्कार झाला आहे त्याला ही बाब केवळ उपेक्षणीय नाहीं असें वाटावयास लागणें यांत च त्याचा तिच्यायोगें नाश झालेला आहे ही गोष्ट सिद्ध होते ( आमचे मित्र निसर्गवादी आणि शरीरशास्त्री यांची स्वतंत्र–बाण्याची वृत्ति ही, माझ्या मतें, केवळ **परिहास-जल्पना** आहे,–त्यांना ह्या प्रश्नासंबंधीं कांहीं तळमळ उत्पन्न झालेली नाहीं, त्यांना ह्या प्रश्नापासून कांहीं कष्ट सोसावे लागले नाहींत–). हें विषसिंचन लोकांना वाटतें त्यापेक्षां फार लांबवर पसरलें आहे : हल्लीं जेथें कांहीं लोकांना आपण अद्वैतवादी आहों असें वाटते,– जेथें ते आपल्या श्रेष्ठ परंपरेच्या जोरावर बाह्य जगताच्या पलीकडे वर चढण्याचा हक्क प्रतिपादतात आणि त्या जगताच्या अस्तित्वाबद्दल संशय दर्शवितात तेथें त्यांच्या ठिकाणीं गूढ असलेली देवशास्त्रज्ञाची "अहंकाराची" भावना मी उकरून बाहेर काढली आहे........धर्मवादी उपाध्यायाप्रमाणें च हा वेदान्ती आचार्य हि प्रत्येक मोठी शब्दध्वनिप्रचुर

कल्पना आपल्या हातांत ठेवतो; आणि केवळ आपल्या हातांत ठेवतो इतकें च नाहीं, तर तो त्या सर्वांना "बुद्धि", "इंद्रियें", "ऐहिक मानसन्मान", "युक्त जीवन", "भौतिक शास्त्र" यांच्या विरुद्ध सकृप तिरस्कारानें पाहिजे तसा नाचवितो. तो हे असले विषय आपल्या विचारांत घेण्यास **हलके** समजतो, कारण तो त्यांत विनाशक आणि मोहमय माया पाहतो; शेवटीं तो या सर्वांच्या मुखपृष्ठावर "शुद्ध आत्मा" निरपेक्ष रीतीनें विहार करीत आहे असें मानतो :—जणुं काय अनहंकार, अपरिग्रह, अकिंचन, किंवा एका शब्दांत सांगावयाचें म्हणजे संन्यासपावित्र्य हें जीविताला निर्घृणता आणि दुराचार यांच्यापेक्षां अगणित पटीनें हानिकारक झालेलें नाहीं ........शुद्ध आत्मा हें शुद्ध थोतांड आहे....जावत्कालपर्यंत हे जीविताचे **धंदेवाईक** निषेधक आणि निंदक धर्मगुरु आणि धर्माचार्य जीविताला विषादिग्ध करीत असतां हि मनुष्यजातींत सर्वश्रेष्ठ ह्मणून गणले जातात तावत्कालपर्यंत सत्य म्हणजे काय या प्रश्नाचें उत्तर देतां येणार नाहीं. ज्याअर्थी अभाव आणि निषेध ( किंवा निर्वाण आणि अद्वैत ) यांचा बुद्धिपुरःसर पक्ष घेणारा हा "सत्याचा" प्रतिनिधि समजला जातो त्या अर्थी सत्य हें अगोदर च विपर्यस्त होऊन गेलें आहे असें जाणावें.

९

या देवशास्त्रवाद्यांच्या भावनेविरुद्ध मला मोहीम करावयाची आहे. मला या भावनेच्या छटा सर्वत्र पसरलेल्या दिसत

आहेत. ज्या कोणाच्या नसेंत अशा देवशास्त्रज्ञाचें रक्त खेळतें त्याची प्रथमपासून च सर्व इंद्रियविषयक वस्तुमात्राबद्दल मिथ्या आणि मायामय कल्पना झालेली असते. या स्थितींतून जी एक शोकमय मनोवृत्ति निर्माण होते तिला 'श्रद्धा' असें म्हणतात: अर्थात् दुर्धर असत्यतेच्या दर्शनानें पीडा होऊं नये म्हणून आपले डोळे कायमचे मिटून घेणें याचें नांव श्रद्धा. हा जो वस्तुजाताकडे दोषयुक्त नजरेनें पाहण्याचा प्रकार आहे त्याचें परिवर्तन लोक नीतींत करतात, आणि त्याला च सद्गुण व पवित्रपणा ठरावितात. ते आपल्या विकृत दृष्टीला सदसद्विवेकबुद्धीची जोड देतात,—आणि एकदां त्यांची ही विशिष्ट दृष्टि 'ईश्वर', 'मोक्ष', 'अमरत्व', अशा नामाभिधानांनीं पुनित झाली कीं पुढें ते **दुसरी** कोणती हि विवेकदृष्टि महत्वाची मानीत नाहींत. मी या धर्माचार्यांच्या भावनेचा सर्वत्र खोल छडा लाविला आहे: ही भावना सगळ्या भुवनाला व्यापणारी असून जगाच्या व्यवहारांतील असत्याचें अति गुप्त रूप दर्शविणारी आहे. हे धर्माचार्य जें जें सत्य म्हणून मानतात तें तें निश्चितपूर्वक असत्य म्हणून समजावें: किंबहुना हें एक बहुतांशानें सत्याचें निर्णायक लक्षण च आहे. त्याची ही आत्मसंरक्षणाची अत्युत्कट भावना खऱ्या वस्तुस्थितीला कोणत्या हि मार्गानें मान मिळवूं देण्यास प्रतिबंध करिते; फार काय, पण तिला आपलें तोंड हि उघडूं देत नाहीं. जेथें जेथें ह्या धर्माचार्यांचें वर्चस्व होतें, तेथें तेथें **नीतीचीं मूल्यें** उलटीच्या सुलटीं होऊन जातात; आणि "सत्य" व "मिथ्या" या कल्पनांचा

निश्चयेंकरून विपर्यास होतो: ह्मणजे जीवितास जें अत्यंत हानिकारक तें येथें "सत्य" ठरतें; आणि उलट जें त्याची वृद्धि करणारें असतें, त्याला उन्नतीला नेतें, त्याचें आस्तिक्य मानतें, त्याचें समर्थन करतें, आणि त्याला विजयिष्णु बनवितें तें सर्व "मिथ्या" गणलें जातें........आतां यदाकदाचित् हे धर्माचार्य जर कोणा एखाद्या राजाच्या किंवा लोकांच्या 'सदसद्विवेकबुद्धीचा' म्हणजे अंधश्रद्धेचा फायदा घेऊन सत्ता बळकावण्याकरितां आपले कर प्रसृत करतील, तर त्यापासून प्रत्येक वेळीं काय परिणाम घडून येईल याबद्दल आपणांस संशय बाळगण्यास नको:– संहाराची इच्छा, सत्तेची **सर्वनाशकारक** इच्छा............

## १०

मी धर्मशास्त्र्यांच्या रक्तदोषानें तत्वज्ञान बुडालें आहे असें जेव्हां प्रतिपादन करितों, तेव्हां तें माझें ह्मणणें जर्मन लोकांना तरी तत्काळ कळून येतें. जर्मन तत्त्वज्ञानाचा प्रापितामह हा एक प्रॉटेस्टंट धर्माचार्य च आहे. खुद्द प्रॉटेस्टंट धर्म हें च त्या तत्त्वज्ञानाचें **आदिम पाप** आहे. प्रॉटेस्टंट धर्माची व्याख्या: खिस्ती धर्माचा अंशात: पक्षघात—आणि तसा च विचार-शक्तीचा........"ट्युबिंजन येथील धर्मपाठशाळा" हे शब्द उच्चारले कीं लागली च जर्मन तत्वज्ञान हें मुळांत काय आहे याचा बोध होतो; तो हा कीं, धर्मशास्त्राचें **रूपांतर**........ जर्मनीमध्यें स्वाबियन प्रांतांतील लोक हे अट्टल खोटें बोलणारे

आहेत, ते सरळ भावानें खोटें बोलतात..........जेथें तीन चतुर्थांश संख्या भिक्षुकांच्या आणि शिक्षकांच्या मुलांची आहे अशा जर्मनींतील विद्यार्थीवर्गांत कांटचा उदय झाल्याबरोबर ज्या आनंदोत्साहानें त्याचें स्वागत करण्यांत आलें तो आनंदोत्साह कोठून आला? कांटनें युक्त सुधारणेचा पाया घातला असा जो जर्मन लोकांना विश्वास वाटला, आणि ज्याचा प्रतिध्वनि अद्यापि हि कोठें कोठें ऐकूं येतो, त्या विश्वासाचें मूळ कशांत आहे? जर्मन शिष्यवर्गांत जी धर्मशास्त्र्याची उपजत भावना होती तिला कळून चुकलें कीं, पुन: आपल्याला अनुकूल स्थिति प्राप्त झाली आहे.........पूर्वींच्या ध्येयाकडे नेणारा एक पृष्ठभागाचा जिना कांटनें शोधून काढला; "सद्वस्तु" ही कल्पना आणि "नीति हें जगताचें **सार** आहे" ही कल्पना ( आतांपर्यंत आस्तित्वांत आलेल्या कल्पनांमध्यें अत्यंत भ्रामक अशा दोन कुकल्पना ), ह्या जरी प्रत्यक्षादि प्रमाणांनीं सिद्ध करितां आल्या नाहींत तरी निदान **असिद्ध** तरी करितां येणार नाहींत अशा प्रकारचा त्यानें सूक्ष्म आणि कावेबाज नास्तिकपणाचा तर्कटवाद उपस्थित केला........बुद्धि, आणि बुद्धीचा **जातिसिद्ध अधिकार** हे येथपर्यंत पोहोंचूं च शकत नाहींत असें त्यानें ठरविलें........त्यानें सत्य जगताला "मायामय" म्हणजे मिथ्या कल्पिलें; आणि जी अगदीं ढळढळीत असत्य वस्तु–अद्वैती आत्मवस्तु–तिला सत्य म्हणून जाहीर केलें. कांटचा जय हा केवळ धर्मशास्त्र्याचा विजय होय. लूथर आणि लायब्निझ् यांच्याप्रमाणें कांट हा हि जर्मनींतील सरळ

वृत्तींच्या अगोदर च खिळखिळ्या झालेल्या चाकाला आणखी एक गतिनिरोधक दाब झाला.

११

**नीतिशास्त्रज्ञ** या दृष्टीनें कांटच्या विरुद्ध आणखी एक शब्द सांगितला पाहिजे. सद्गुण हा **आपण** नवीन शोधून काढला पाहिजे, तो आपल्याला आवश्यक असा आपला व्यक्तिशः रक्षणकर्ता पाहिजे; याशिवाय दुसऱ्या कोणत्या हि पक्षीं तें एक संकट च आहे. जी कोणती वस्तु आपल्या जीविताला अनुकूल अवस्था निर्माण करीत नाहीं ती केवळ त्याला अपायकारक असते: "सद्गुण" ह्या कल्पनेविषयीं आपण पूज्यभाव बाळगतों म्हणून च केवळ एखादी सद्गुणनामक वस्तु आपणांजवळ असावी असें जें कांटला वाटतें तें आम्हांस अनिष्ट दिसतें. "सद्गुण", "सदाचार", "साक्षात् साधुत्व" – कोणत्या हि विशिष्ट एका पुरुषाशीं संलग्न नसलेली व सार्वत्रिक सत्य म्हणून मोडली जाणारी साधुवृत्ति—ह्या सर्व गोष्टी मनाचे इंद्रजालवत् खेळ असून अशा अवनतींत च जीविताचें अखेरचें निर्जीवितत्व व कोनिंग्जबर्गच्या तत्त्वज्ञानाचें चीन देशाप्रमाणें स्थिरीभवन व्यक्त होत आहे. जीवशरीराचें रक्षण आणि वर्धन हे जे दोन अत्यंत मूलभत नियम आहेत, त्यांना तर कांटच्या अगदीं उलट परिस्थितीची आवश्यकता असते:— म्हणजे प्रत्येक व्यक्तिमात्रानें **आपला** स्वतःचा सद्गुण स्वतः शोधून काढला पाहिजे, त्या स्वतःची "जातिसिद्ध

आज्ञा ". जेव्हां एखादें राष्ट्र सर्वसामान्य कर्तव्याच्या कल्पनेशीं आपल्या स्वतःच्या विशिष्ट वैयक्तिक कर्तव्याच्या कल्पनेचा घोटाळा करितें तेव्हां तें विनाश पावतें. प्रत्येक व्यक्तिभावरहित कर्तव्याची भावना व प्रत्येक मनःपूत कल्पनेच्या राक्षसाप्रीत्यर्थ होणारा यज्ञ यापेक्षां दुसरें विशालत्वानें आणि पूर्णत्वानें अधिक हानिकारक नाहीं.—कांटची नीतिची स्वयंसिद्ध आज्ञा ही **जीवनविघातक** आहे हें कोणास च कसें कळलें नाहीं ?.... धर्मशास्त्र्याच्या उपजत बुद्धीनें मात्र एकटीनें तिला आपल्या पंखाखालीं घेतलें !— जी क्रिया जीविताच्या भावनेनें प्रेरित होते ती आपल्या आनुषंगिक सुखाच्या योगानें च युक्त ठरते: परंतु ख्रिस्ती कर्मठाची धर्मवृत्ति बाळगणाऱ्या ह्या नास्तिकानें सुखाला आक्षेपार्ह मानलें........स्वतःच्या अन्तःप्रेरणेवांचून, गाढ वैयक्तिक अनुरक्तीवांचून व आनंदानुभूतीवांचून कर्तव्याच्या केवळ सांप्रदायिक हटवृत्तीनें आचार, विचार आणि उच्चार करणें यापेक्षां मनुष्याचा त्वरित नाश करणारें अधिक काय असणार ? ऱ्हास आणि बालिशता उत्पन्न करणारीं हीं **अमोघ** औषधें आहेत...........कांट बालिशता पावला.—आणि तो गटेचा समकालीन होता ! हा विनाशाचें जाळें विणणारा कोळी **अद्वितीय** जर्मन तत्त्ववेत्ता म्हणून गणला गेला,— व अद्यापि हि तो तसा च गणला जात आहे !........ जर्मन लोकांविषयीं माझें मत काय आहे हें न सांगणें च बरें....... फ्रान्सच्या राज्यक्रांतींत राजसत्तेचें अचेतनांतून **सचेतन** रूपांत झालेलें संक्रमण कांटनें पाहिलें नाहीं काय ? ह्या संक्रमणांत

अशी एक तरी गोष्ट कागदावर नमुद होती का, कीं तिची उपपत्ति मनुष्याच्या नैतिक शक्तीच्या आधाराशिवाय लावतां येईल? कांटला आपणास असा प्रश्न विचारतां आला नाहीं काय? कारण जर अशी एखादी गोष्ट सांपडेल तर तिच्यावरून "मानवजातीची सद्भावाकडे प्रवृत्ति" एकदां च आणि कायमची **सिद्ध** करतां येईल. याला कांटचें उत्तर: "ही क्रांति आहे." प्रत्येक ठिकाणीं आणि सर्व च ठिकाणीं दोषयुक्त भावना, निसर्गाशीं शत्रुत्वाची उपजत भावना, जर्मन अपकर्षाचें तत्त्वज्ञानांत रूपांतर—**म्हणजे कांट होय.**

## १२

तत्त्वज्ञानाच्या इतिहासांत मान्यवर असा जो कांहीं थोड्या नास्तिकवाद्यांचा वर्ग आहे, त्याशिवाय इतर कोणास बौद्धिक सरळपणाच्या अगदीं पहिल्या ओनाम्याचा हि गंध नसतो. देवपिसें भरलेलीं हीं उत्साहाचीं अचाट धेंडें स्त्रीसदृश वर्तन करतात,—त्यांच्या मतें "श्रद्धेच्या सुंदर भावना" हीं जणुं न्यायघटित प्रमाणें होत; उसासे टाकतांना "वर खालीं हालणारें वक्षस्थळ" हे ईश्वराचे भाते च आहेत, आणि स्वतःचा मनोमय प्रत्यय हें सत्याचें **निर्णायक लक्षण** आहे. शेवटीं कांटनें आपल्या "ट्यूटॉनिक" भोळेपणास अनुसरून स्वतःच्या बौद्धिक विचारशक्तीच्या अभावाला "नीतीची व्यावहारिक बुद्धि" या कल्पनेचा शास्त्रीय झगा चढवून वस्त्राच्छादित करण्याचा प्रयत्न केला. त्यानें जाणूनबुजून अशा

प्रकारची एक नवीन विचारपद्धति निर्माण केली कीं तिच्या आश्रयानें कोणाला हि एखाद्या प्रसंगीं युक्त विचाराला फांटा देतां येईल,—असा प्रसंग म्हणजे जेव्हां "नीति" अथवा "तूं असें करावें" या आशयाचें गंभीर विधिवाक्य मनुष्याच्या श्रवणांत येतें तो होय. सर्व राष्ट्रांमध्यें तत्त्ववेत्ता ही चीज धर्मशास्त्र्याच्या च वर्गांतील अधिक विकासित झालेला केवळ एक नमुना आहे हें आपण लक्षांत घेतलें असतां ही पिढीजाद चालत आलेली भिक्षुकी वृत्ति, ही **स्वतःची आत्मवंचना** याबद्दल फारसें आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. जेव्हां एखादा मनुष्य आपलें जीवितकार्य मानवजातीची सुधारणा करणें, तिचें तारण करणें, तिला मोक्षपदाला नेणें इत्यादि प्रकारें पवित्र आहे असें मानूं लागतो, जेव्हां तो आपल्या हृदयांत साक्षात् देवाचें वास्तव्य आहे असें समजतो, आणि जेव्हां तो परलोकांतील आज्ञास्वरूपी विधिवाक्यें जाहीर करण्याचा हक्क केवळ आपल्या एकट्याच्या च मुखदुंदुभीला आहे असें प्रतिपादन करतो, तेव्हां या कृत्याच्या योगें तो केवळ सामान्यबुद्धीच्या मदतीनें सिद्ध होणाऱ्या सर्व सत्यासत्यनिर्णयाच्या कक्षेच्या बाहेर जातो इतकें च नाहीं, तर तो आपल्या या रुचिवैशिष्ट्यामुळें पुण्यपाद ठरतो व मनुष्याच्या उच्च कोटींतील श्रेष्ठ नमुना गणला जातो! अशा या धर्माचार्यास भौतिकशास्त्राची काय पर्वा आहे? तो या शास्त्राच्या पलीकडे फार उंच स्थानावर आरूढ झालेला आहे!—आणि थेट आतांपर्यंत त्यानें आपली च एकट्याची **सत्ता गाज-**

**विली आहे!**—“सत्य आणि मिथ्या” या कल्पना सर्वस्वी त्यानें च मुक्रर केल्या आहेत.

## १३

आम्हीं **स्वतः**, आम्हीं स्वतंत्र आत्मे, “सर्व नैतिक द्वंद्वांच्या पार” पोंचलेले आहों; आम्हीं सर्व प्राचीन “सत्यासत्य” विषयक कल्पनांच्या विरुद्ध साक्षात् युद्ध पुकारलें आहे व त्यांवर विजय हि मिळविला आहे; या गोष्टीचें महत्व कमी समजूं नका. जे सर्वांत अतिश्रेष्ठ प्रतीचे मुद्दे असतात ते सर्वांचे शेवटीं च उदय पावतात: परंतु सर्वांत अति श्रेष्ठ प्रतीचे मुद्दे म्हटले म्हणजे विवेचकपद्धति होत. आमच्या आधुनिक शास्त्रीय विचारपद्धतीच्या सारण्या आणि मूलतत्त्वें यांना अनेक वर्षेंपर्यंत शत्रूच्या तीव्र तिरस्कारदृष्टीशीं निकरानें झगडा करावा लागला: त्यांच्याशीं संगति करणें म्हणजे सज्जनांच्या समाजांतून बहिष्कृत होणें अशी स्थिति होती —अशा मनुष्यास “देवद्वेष्टा” मानीत; तो सत्याचा उपहास करतो आणि कदाचित् त्याला “भूतबाधा” झाली असावी असें हि समजत. शास्त्रीय विचारसरणीचा मनुष्य हा जसा कांहीं चांडाल होय. आमच्या विरुद्ध सर्व मनुष्यजातीची च द्वेषबुद्धि आहे; आतांपर्यंत सत्य काय असावें, सत्यासिद्धीकरितां कोणते उपाय योजावे, याबद्दलच्या त्यांच्या कल्पना आणि “तूं असें कर” या स्वरूपाचें प्रत्येक विधिवाक्य या सर्वांचा रोख आमच्या विरुद्ध होता.......आमचे हेतु, आमच्या क्रिया, व आमची

निर्विकार, सावध आणि साशंक वृत्ति—किंबहुना आमचें सर्व कांहीं त्यांना अति तुच्छ आणि तिरस्काराच्या हि खालचें वाटे. सरते शेवटीं, ज्या गोष्टीनें आजपर्यंत इतका काळ मानवजातीला अंधस्थितींत ठेवलें ती गोष्ट त्यांच्या सौंदर्याभिरुचीची दर्शक असूं शकणार नाहीं काय असा प्रश्न विचारला असतां तो अन्याय्य होणार नाहीं: कदाचित् सत्यापासून एखादें **चित्रासारखें मनोहर** दृश्य परिणाम पावावें अशी त्यांची आकांक्षा असल्यास आणि म्हणून शास्त्रज्ञांपासून आपल्या इंद्रियांना जोरानें चालना मिळावी अशी त्यांनीं अपेक्षा केल्यास नवल नाहीं. या त्यांच्या अभिरुचीच्या विरुद्ध इतके दिवस आमची **मर्यादा** आड येत होती..........आणि काय आश्चर्य! या स्वर्गीय कुक्कुटांनीं हें सर्व किती बरोबर ताडलें होतें!—

## १४

आम्हीं आपली विचाराची दिशा बदलली आहे. आम्हीं सर्वप्रकारें मर्यादशील झालों आहोंत. आम्हीं इतःपर मनुष्याची उत्पत्ति "आत्म्या" पासून किंवा "ईश्वरा" पासून सिद्ध करीत नाहीं; आम्हीं त्याला मागें पशूंमध्यें ढकललें आहे. आम्हीं त्याला अति बलवान् प्राणी समजतों, कारण तो अति युक्तिवान् आहे: याचें एक फल म्हणजे त्याची बुद्धिमत्ता होय. उलट पक्षीं, दुसरा एक जो मिथ्या अभिमान या ठिकाणीं प्रस्फुट होतो त्याबद्दल हि आम्हीं दक्षता बाळगतों: मनुष्य हा संपूर्ण जीवोत्क्रांतीचा आद्य हेतु आहे! तो सृष्टीचा मुकुट

आहे असें मुळीं च नाहीं; तद्व्यतिरिक्त इतर प्रत्येक प्राणी आपआपल्या परीनें तितक्या च पूर्णतेच्या स्थितीला पोंचलेला आहे........आणि असें विधान करण्यांत सुद्धां आम्हीं थोडासा अतिरेक च करितों; कारण तुलनेनें विचार करितां मनुष्य हा सर्व प्राणिमात्रांत अत्यंत पंगु व रोगग्रस्त आहे, आणि त्यानें आपल्या नैसर्गिक भावनांपासून फार दूर अतिक्रमण केलें आहे. हें सर्व कसें हि असो, इतकें मात्र खास कीं, तो सगळ्यांत अति **चित्ताकर्षक** आहे! संपूर्ण प्राणिमात्रासंबंधीं दकार्तें यानें च प्रथम मोठ्या आश्चर्य करण्यासारख्या धाष्टर्यानें पशु हा एक **यंत्र** आहे असा सिद्धांत पुढें मांडला, आणि हल्लीं आपलें सर्व शरीरेंद्रियशास्त्र या च सिद्धांताला पुष्टि देण्याची खटपट करीत आहे. तथापि त्यापलीकडे जाऊन तर्कशास्त्राच्या दृष्टीनें आपण आतां दकार्तेंप्रमाणें मनुष्याला त्यांतून निराळा बाहेर काढीत नाहीं: मनुष्याची यांत्रिक दृष्टया जेवढी उपपत्ति लागते त्यापेक्षां आजमितीस त्याचे संबंधीं अधिक ज्ञान पुढें गेलेलें नाहीं. पूर्वीं मनुष्याला स्वर्लोकांतून "स्वतंत्र इच्छा" ही एक देणगी मिळाली होती; पण हल्लीं आम्हीं त्या इच्छेचें अस्तित्व च हिरावून घेतलें आहे. कारण आधुनिक मानसशास्त्राला या प्रकारची इच्छाशक्ति ज्ञात नाहीं. पूर्वीं ज्याला "इच्छा" म्हणत त्याचा अर्थ येवढा च कीं, कांहीं अनुकूल व कांहीं प्रतिकूल अशा चेतनांनीं उत्पन्न केलेला व्यक्तीच्या मनाचा निश्चित प्रत्याघात:— हल्लीं ही इच्छा कोणता च परिणाम घडवून आणीत नाहीं किंवा कशांत च चैतन्य उत्पन्न

करूं शकत नाहीं. पूर्वी लोकांना वाटे कीं मनुष्याचें संवेदनात्मक मन, त्याचा "आत्मा" हीं त्याच्या दैवी उत्पत्तीचीं, त्याच्या देवत्वाचीं प्रमाणें होत. मनुष्याला पूर्णत्वास नेण्याच्या कल्पनेनें त्यानें आपलीं इंद्रियें कूर्माप्रमाणें सर्वशः आंत वळवून घ्यावीं, सर्व भौतिक वस्तुमात्राशीं संबंध तोडून टाकावा आणि या मर्त्य देहाचें कवच फेंकून द्यावें, यांविषयीं उपदेश करून त्याचें मन भारून टाकण्यांत आलें होतें. कारण असें केलें तर च मनुष्यांतील अति महत्वाची वस्तु जो "शुद्ध आत्मा" तो कायम रहावयाचा. ह्या सर्व गोष्टींसंबंधीं आम्हीं आपली विचारसरणी सुधारली आहे. ह्या नवीन विचारसरणीप्रमाणें आम्हांस आतां सापेक्षतेच्या दृष्टीनें हें अन्त:संवेदन किंवा "आत्मतत्त्व" जीवदेहाचे ठिकाणीं अपूर्णतेचें लक्षण दिसत आहे, तें केवळ प्रयोगावस्थेचें द्योतक आहे, शुद्ध अंधारांत चांचपडणें आहे, चुकीच्या ज्ञानानें मानलेली वस्तु आहे, ज्ञानतंतूंच्या शक्तीचा अवास्तव खर्च करणारी व्याधि आहे. जावत्कालपर्यंत एखादी क्रिया मनाच्या संवेदनेनें घडत असते, तावत्कालपर्यंत ती केव्हां हि पूर्णतेच्या स्थितीला जात नाहीं, हा आमचा सिद्धांत आहे. "शुद्ध आत्मा" म्हणजे "शुद्ध मूर्खपणा": ज्ञानतंतूंची रचना, इंद्रीयांचा व्यापार आणि "मर्त्यदेहाचें कवच" हीं जर आपण आपल्या विचारांतून वगळलीं तर सर्व च तत्त्वज्ञान अयथार्थ होईल. कारण आत्मा हेंच कांहीं सर्वस्व नाहीं!....

१५

ख्रिस्तीधर्मांत नीति आणि धर्म या उभयतांचा बाह्य वस्तु-

स्थितीशीं यत्किंचित् संबंध येत नाहीं. या धर्मांत काल्पनिक **कारणतत्त्वें** (देव, आत्मा, अहं, चैतन्य, स्वतंत्र वा अस्वतंत्र इच्छा), व काल्पनिक **कार्यतत्त्वें** (पाप, मोक्ष, दया, पापाबद्दल दंड वा क्षमा) यांशिवाय दुसरें कांहीं दिसत नाहीं. येथें सर्वत्र काय भरलें आहे, तर काल्पनिक भूतें (देव, देवदूत, पिशाचें, आत्मे) आणि त्यांचा परस्परव्यवहार, काल्पनिक सृष्टचैतिहास (मानवकेंद्रीभूत : " नैसर्गिक कारणें " या शास्त्रीय कल्पनेचा पूर्ण अभाव); काल्पनिक मानसशास्त्र (यांत अहंची कल्पना अत्यंत विकृत केली असून सर्वसामान्य सुख दुःखांच्या भावना निरनिराळ्या भिन्नार्थींनीं गोंविल्या आहेत; उदाहरणार्थ, येथें सहानुभूतिजन्य ज्ञानतंतूंची संपूर्ण विकारावस्था केवळ एका वेडगळ धार्मिक नीतीच्या विशिष्ट सांकेतिक भाषेच्या द्वारें वर्णिली आहे—पश्चात्ताप, सदसद्विवेकबुद्धीची टोंचणी, सैतानानें पाडलेली भुरळ, देवाचा साक्षात्कार); काल्पनिक अंतिमशास्त्र (देवाचें राज्य, शेवटचें न्यायासन, जीवाचें नित्यत्व)—ही शुद्ध कल्पनामय सृष्टि स्वप्नसृष्टीशीं तुलना करून पाहतां तिच्याहून अति कमी प्रतीची दिसणार आहे: स्वप्नांत वस्तुस्थितीचें च प्रतिबिंब असतें, परंतु ही ख्रिस्ती कल्पनेची सृष्टि त्या वस्तुस्थितीला खोटी ठरविते, तुच्छ लेखते, आणि सर्वशः झिडकारून टाकते. पूर्वीं 'निसर्ग' ही कल्पना 'ईश्वर' या कल्पनेच्या विरुद्ध गणण्यांत येत असे, आणि म्हणून 'नैसर्गिक' या शब्दाला 'तिरस्करणीय' असा अर्थ प्राप्त झाला; —ख्रिस्तीधर्मांतील कल्पनामय सृष्टीचें मूळ निसर्गाच्या म्हणजे सत्य-

सृष्टीच्या द्वेषांत आढळून येतें! सत्य सृष्टीशीं सामना देण्यांत जो आपला नितांत पराभव झाला त्याचा च जणुं काय हा परिमाणरूप स्फोट होय............**तथापि यांत च सर्व गोष्टींचा निकाल लागतो.** असत्य सांगून सत्य सृष्टीच्या बाहेर निसटण्याचें ज्याला प्रयोजन वाटतें असा एक च तऱ्हेचा मनुष्य असतो तो कोण? तर जो सत्य सृष्टीपासून दुःख पावतो तो. परंतु सत्य सृष्टीपासून दुःख पावण्यास बहुधा तो निसर्गाच्या चुकीनें उत्पन्न झालेला असावयाचा. ह्या कल्पनामय नीतिचें आणि धर्माचें खरें **कारण** म्हणजे सुखापेक्षां दुःखाच्या भावनेचा अतिरेक हें होय: परंतु अशा प्रकारचा दुःखातिरेक हें च पुढील अवनतीचें सूत्र तयार करण्यास उत्तम साधन होतें.

१६

ख्रिस्तीधर्मांतील देवकल्पनेची चिकित्सा केली असतां हें च वरील अनुमान निश्चित रीतीनें सिद्ध होतें. जें राष्ट्र स्वतःवर विश्वास ठेवतें त्याचा स्वतःचा निराळा देव असतो. जीं साधनें आपणां स्वतःस वर्चस्वाला चढवितात—अर्थात् आपले सर्व सद्गुण – तीं त्या देवाचे ठायीं कल्पून तें राष्ट्र त्याची पूजा करितें. स्वतःसंबंधीं स्वतःस वाटणारा आनंद, स्वतःच्या बलाची भावना, यांचा त्या देवावर आरोप करून केवळ त्याच्या प्रसादानें आपणांस या गोष्टी प्राप्त झाल्या म्हणून तें त्याचे उपकार मानतें. जो सर्व संपत्तिमान् असतो तो च त्या संपत्तींतील कांहीं भाग इतरांना देण्याची इच्छा बाळगतो:

जें राष्ट्र मानी असतें त्याला असा च देव लागतो कीं तत्प्रीत्यर्थ तें **यज्ञाच्या द्वारें** हविर्द्रव्य अर्पण करूं शकतें....ह्या तत्त्वांवर नियमबद्ध असलेला धर्म हें साक्षात् कृतज्ञतेचें रूप होय. मनुष्य हा स्वतःच्या जीविताबद्दल साहजिक च कृतज्ञ असतो, आणि त्याकरितां त्याला देवाची जरूर भासते.—असा देव निग्रह आणि अनुग्रह अशा दोहों ठिकाणीं दक्ष पाहिजे, तो मित्रवत् आणि तसा च शत्रुवत् आचरण करणारा पाहिजे. त्याच्या घोर व अघोर उभय गुणांबद्दल त्याला सारखा च मान मिळाला पाहिजे. देवाला राक्षसी पद्धतीनें खच्ची करून केवळ सद्वस्तूंचा अधिष्ठाता बनविणें हें अशा राष्ट्राच्या आकांक्षेच्या बाहेरचें काम आहे. सत्त्वगुणी देवाप्रमाणें तमोगुणी देव हि तितका च अनिर्वाह्य आहे: कारण अशा स्वरूपाच्या समाजांतील लोकांचें जीवित सदयता आणि सहिष्णुता यांवर खास अवलंबून नसतें........ज्या देवाला क्रोध, सूड, असूया, तिरस्कार, कौटिल्य आणि युद्ध हीं कांहीं च अवगत नसतात त्या देवाचा उपयोग काय?—ज्या देवानें केव्हां हि विजय आणि संहार यांचा आनंदोत्साह अनुभविला नाहीं तो देव काय कामाचा? अशा देवाचें हृद्गत कोणाला च समजणार नाहीं: मग त्याचा कोण कसा स्वीकार करील?—खरोखर जेव्हां एखादें राष्ट्र विनाशाच्या पंथाला लागतें, जेव्हां त्याची स्वातंत्र्याची आशा कायमची नष्ट होऊन तें भविष्यकालावर नजर ठेवून राहतें, जेव्हां नम्रभाव धारण करणें हा अति मोठा उपयुक्त सद्गुण आहे व अशा विनम्र

मनुष्याचे सद्गुण हे च त्याच्या आत्मसंरक्षणाचे साधनमार्ग आहेत असें त्यास वाटूं लागतें, तेव्हां त्या राष्ट्राच्या देवाचा हि स्वभाव बदलणें प्राप्त होतें. तो देव भीतीनें कांपणारा, स्वाभिमानशून्य व दासाप्रमाणें वर्तणारा बनतो; "आत्म्याची शांति", द्वेषाचा त्याग, अन्तःकरणाची लीनता, शत्रुमित्रांवर समान "प्रेम" ह्यांची तो कास धरतो. तो सदा सर्वदा नीतीचा बोध करूं लागतो, प्रत्येक खाजगी सद्गुणाच्या हृदयान्तर्भागीं सरपटत प्रवेश करतो, प्रत्येक व्यक्तिमात्राचा एकटा च देव बनतो, आणि नेटानें आपलें काम करावयाचें टाकून अखिल विश्वाचा तारक होतो....पूर्वी तो एका राष्ट्राचा, त्या राष्ट्रांतील बलाचा, व त्या राष्ट्राच्या अन्तःकरणांत गुप्त रीतीनें वसत असलेल्या ज्या कांहीं सत्तेच्या व स्वामित्वाच्या आकांक्षा त्या सर्वांचा प्रतिनिधि असे. आतां तो फक्त सद्गुणनिष्ठ देव आहे ....खरें पाहिलें असतां देवांना दुसरा विकल्प च नाहीं; एक तर ते बलेच्छा धारण करणारे असणार—या स्थितींत ते निश्चयेंकरून संपूर्ण राष्ट्राचे देव बनतात—किंवा दुसऱ्या पक्षीं, ते बल धारण करण्यास नालायक होणार— या स्थितींत ते तत्त्वतःच सद्गुणयुक्त होतात.

## १७

जेथें जेथें बलेच्छा, मग ती कोणत्या कां रूपांत असेना, खालीं जाऊं लागतें, तेथें तेथें शारीरिक अवनति आणि ऱ्हास वर डोकीं काढतात. पुरुषास शोभणाऱ्या गुणांचा आणि भाव-

नांचा त्याग केल्यामुळें हा अवनतीचा देव शारीरिक दृष्टचा अवश्यमेव दुर्बल आणि पंगु अशा लोकांचा देव होतो. हे पंगु लोक आपणांस शक्तिहीन म्हणवून घेत नाहींत; ते स्वतःला ' सद्गुणी ' म्हणवून घेतात हें खरें........सद्देव आणि असद्देव हें भ्रामक द्वैत इतिहासांत कोणत्या वेळीं व्यक्त झालें हें समजून घेण्याकरितां तुम्हांला विशेष सूचना देण्याचें कारण नाहीं. ज्या भावनेच्या जोरावर जित लोक स्वतःच्या देवाला " सद्गुणाची मूर्ति " बनवितात त्या च भावनेनें ते जेत्यांच्या देवाच्या चांगल्या गुणांचा लोप करतात; ते आपल्या प्रभूंच्या देवाला राक्षस बनवून त्यांच्यावर सूड उगवितात—**सुष्ट देव** आणि दुष्ट देवः—हीं दोन्ही अवनतीच्या स्थितीचीं अकालोद्भूत अपत्यें आहेत.—हा काय चमत्कार आहे, कीं आपण अद्याप खिस्ती धर्मशास्त्रज्ञांच्या भोळेपणाकडे आदरबुद्धीनें पाहून देव-कल्पनेची उत्क्रांति " इस्त्राएलच्या देवा " कडून खिस्ती देवाकडे म्हणजे राष्ट्रीय देवाकडून सर्व सद्गुणांच्या सारभूत देवाकडे आहे अशी त्यांच्या च सारखी बडबड करतों, आणि ती एक प्रगतीची **पुढील पायरी** आहे असें समजतों?—पण रेनान् सुद्धां हा चमत्कार करतो. जणुं काय रेनानला भोळसर-पणाचा हक्क च मिळाला आहे! उलट खरी वस्तुस्थिति तद्विरूद्ध आपल्या डोळ्याला ढळढळीत दिसते. जेव्हां **उच्च पदावर चढणाऱ्या** जीविताला अत्यावश्यक जे बल, सह, तेज आणि ओज हे गुण त्या देवकल्पनेंतून पार लुप्तप्राय झाले, आणि तो देव पायरीपायरीनें इतका खालीं उतरला कीं, शेवटीं तो एक

थकलेल्यांना टेंकण्यास काठी व बुडणाऱ्यांना धरण्यास गवताची काडी अशा प्रकारें सांकेतिक रूप पावला; जेव्हां तो प्राधान्यें-करून भिक्षेकऱ्यांचा देव, पाप्यांचा देव व व्याधिग्रस्तांचा देव बनला, आणि "पापमोचन करणारा", "दास्यमुक्त करणारा" अशा प्रकारचीं विशेषणें इतर सर्व दैवी विशेषणांच्या वर अधिक महत्वाचीं मानूं लागला; तेव्हां या असल्या रूपांतरानें, या देवाच्या अधःपातानें काय ध्वनित होतें?—हें च कीं "देवाचें राज्य" या पद्धतीनें निःसंशय अधिक विस्तार पावलें आहे. पूर्वीं त्याचें वर्चस्व फक्त एका राष्ट्रापुरतें, त्याच्या "आवडत्या" लोकांपुरतें होतें. त्यानंतर तो आपल्या भक्तजनांप्रमाणें च पृथ्वीवर सर्व देशांत संचार करूं लागला; त्यांत त्याला कोठें च विश्रांतिस्थान मिळालें नाहीं. परंतु आतां जेव्हां त्याला "महत्तमसंख्याक" अनुयायांचा पाठिंबा मिळाला व अर्धें अधिक जग त्याच्या मागें आलें, तेव्हां तो सर्व च ठिकाणीं घरासारखा आनंदानें नांदूं लागला,— तो एक बडा विश्वकुटुंबी बनला. परंतु हा 'महत्तमसंख्याकां' चा देव, देवांतील लोकसत्तावादी देव, मूर्तिपूजकांच्या देवासारखा स्वाभिमानसंपन्न झाला नाहीं: तो यहुदी च राहिला; आणि त्यायोगें तो पिछाडीच्या गल्लीचा-कुचांचा, अंधारांतील कोनाकोपऱ्यांचा, गलिच्छ खोपटांचा व जगांतील सर्व आरोग्यविघातक मोहोल्ल्यांचा देव बनला!.... त्याचें विश्वव्यापी साम्राज्य हें आतां जसें कांहीं एक शाश्वतचें नरकांतील साम्राज्य, रुग्णालयांतील साम्राज्य, भूमिगत साम्राज्य, शुद्ध यहुदी वसतिस्थानांतील साम्राज्य आहे........ आणि

स्वत: तो देव इतका फिकट, इतका दुबळा, इतका गलित.... आहे कीं, मनुष्यांत जे अगदीं फिकटांतील फिकट आहेत त्यांनीं सुद्धां त्याच्यावर साम्राज्य मिळविलें—हे लोक कोण तर आमचे दोस्त तत्त्वज्ञानवेत्ते, विचाराच्या क्षेत्रांतील कोळ्यासारख्या पांढऱ्या कातडीचे पंडित. त्यांनीं त्याच्या भोंवतीं आपलें जाळें इतकें दीर्घ काळ विणलें कीं, शेवटीं तो देव त्यांच्या चलन-वलनात्मक क्रियेनें मूर्च्छावश होऊन स्वत: च कोळी बनला आणि तत्त्ववेत्ता झाला. त्यानंतर त्यानें पुन: एकवार आपल्या अंतस्थ आत्मतंतूपासून जगताचा पट विणण्यास सुरवात केली — स्पायनो-झाच्या अवताररूपांत,—आणि पुढें तो जसजसा दिवसेंदिवस अधिकाधिक हाडकुळा आणि पंडुरोगी होत चालला तसतसा तो " विज्ञानरूप " बनला, " शुद्ध चैतन्य " झाला, " केवलात्मत्व " पावला, आणि " स्वयंसिद्ध वस्तु " ठरला.... देवाचा ऱ्हास आणि पतन: देव ' स्वयंसिद्ध वस्तु ' झाला.

## १८

रोगग्रस्तांचा देव, कोळ्याप्रमाणें जाळें विणणारा देव, आत्म-स्वरूपी देव, हें जें खिस्ती देवाचें कल्पनाचित्र आहे तें पृथ्वी-वर उद्भूत झालेल्या देवकल्पनांपैकीं अत्यंत विकृत कल्पनेचें फल आहे. कदाचित् ती देवरूपाच्या गुणविकासाच्या ओहो-टींतील सर्वांत खालची मर्यादा दर्शविणारी जलरेषा आहे. येथें जीविताचें अत्युच्च ध्येय आणि शाश्वत अस्तित्व साधून देण्या-ऐवजी जीविताचा निषेध करण्यांत देवाची अधोगति पूर्ण

झाली! येथें देवाच्या मदतीनें जीवित, निसर्ग आणि जीवनेच्छा यांच्याविरुद्ध युद्ध पुकारलें गेलें! इहलोकाची अवास्तव निंदा आणि परलोकाची अवास्तव स्तुति हीं येथें एका देवसूत्रांत ग्रथित झालीं! येथें देवाच्या ठिकाणीं नास्तिक्यभावाला देवभाव आला, आणि नास्तिस्वरूपाची निर्वाणेच्छा पवित्र म्हणून जाहीर झाली!

१९

उत्तर युरोपांतील प्रबल मानववंशांनीं या अशा ख्रिस्ती देवाचा निषेध केला नाहीं, ही गोष्ट त्यांच्या धार्मिक सामर्थ्यास खात्रीनें कीर्तिदायक नाहीं—येथें त्यांच्या अभिरुचीबद्दल बोलण्याचें कारण नाहीं. असल्या अपकृष्टतेंतून उद्भूत झालेल्या या रोगट आणि खुजट धर्माशीं उत्तम रीतीनें विरोध करण्यास त्यांनीं कंबर बांधणें इष्ट होतें. आणि म्हणून च आमचा शाप त्यांच्या माथीं आहे: कारण ते त्याशीं विरोध करण्यास धजले नाहींतः त्यांनीं रुग्णता, दुर्बलता आणि जीवननिषेध या गुणांशीं आपल्या सर्व उपजत भावना जखडून टाकिल्या,— आणि तेव्हांपासून त्यांनीं दुसरा कोणता हि देव **निर्मिला** नाहीं! दोन हजार वर्षें होऊन गेलीं आणि एक हि नवीन देव नाहीं! उलट हा एकसुरांत गाणाऱ्या देववादांतील क्षुद्र ख्रिस्ती देव मात्र मानवांतील 'आत्म्याला जन्म देणारा' असा जणुं काय हक्कानें—देवजनक शक्तीच्या पारिघावरील अंतिम बिंदूप्रमाणें—अद्यापि जीवधारण करून

आहे. अपकृष्टावस्था, नास्तिक्यभाव, मनोमय कल्पना आणि विरोधी वृत्ति यांतून बाहेर पडलेला हा संकरजन्य देवप्राणी असा आहे कीं, त्याच्याजवळ मनाच्या सर्व नासक्याकुजक्या प्रवृत्ति आणि बुद्धीच्या सर्व भीरुत्वाच्या व ग्लानीच्या भावना यांना मान्यता मिळते.— —

## २०

खिस्तीधर्माचा जोरानें निषेध करीत असतां या धर्मापेक्षां हि ज्याच्या अनुयायांची संख्या फार मोठी आहे आणि ज्याचा या धर्माशीं बरा च संबंध आहे असा दुसरा एक धर्म आहे, त्याविषयीं अन्याय होऊं नये अशी माझी इच्छा आहे; हा धर्म म्हणजे बौद्धधर्म होय. सर्वविनाशवादी धर्म या दृष्टीनें दोहोंमध्यें पूर्ण साम्य आहे, – हे दोन्ही धर्म नासलेल्या स्थितीचे निदर्शक आहेत,—तथापि त्यांपैकीं प्रत्येक दुसऱ्या-पासून अति विलक्षण रीतीनें भिन्न आहे. खिस्ती धर्मावर टीकेचा हल्ला चढविणारास या दोन्ही धर्मांची तुलना करण्याचें जें कांहीं सामर्थ्य आलें आहे त्याबद्दल त्याला भारतीय पंडितांविषयीं नितांत कृतज्ञता प्रकट केल्यावांचून राहवत नाहीं.—– बौद्ध धर्म हा खिस्ती धर्मापेक्षां शतपटीनें अधिक वस्तुभावदर्शक आहे, —– मोठमोठ्या बिकट प्रश्नांशीं वस्तु-स्थितीला धरून शांतपणें तोंड देण्याचें सामर्थ्य असणें हें त्याच्या वंशपरंपरागत प्रकृतिधर्माचें अंग आहे; चिरस्थायी अध्यात्मविद्येच्या अनेक शतकें केलेल्या परिश्रमाचें च तें एक

फल होय. ज्या काळीं हा धर्म उदयास आला, त्या काळीं अगोदर च "देव" ही कल्पना नष्ट झाली होती. जगताच्या इतिहासांत बौद्ध धर्म एकटा च खराखुरा वस्तुभावदर्शक धर्म दिसतो; मग जरी त्याचें विशिष्ट ज्ञानशास्त्र घेऊन त्यावरून त्याची परीक्षा केली तरी हरकत नाहीं (त्याचा ज्ञानवाद हा शुद्ध मायावाद आहे)—तो कधीं हि "पापाबरोबर झगडा" असा शब्दप्रयोग करीत नाहीं, तर वस्तुस्थितीच्या खऱ्या स्वरूपाचा पूर्ण विचार करून "**दुःखाबरोबर** झगडा" अशी भाषा वापरतो. नैतिक कल्पनांपासून उत्पन्न होणारें आत्मवंचन पायाखालीं लोटून तो किती तरी उंच वर चढला आहे—आणि या च बाबतींत तो ख्रिस्तीधर्मापासून मूलत: भिन्न दिसून येणार आहे;—माझ्या भाषेंत बोलावयाचें झाल्यास तो **सदसतांच्या पलीकडे** स्थित आहे. इंद्रियविज्ञानशास्त्रांतील ज्या दोन गोष्टींवर तो धर्म उभा राहून त्याकडे विशेष लक्ष्य पुरवीत आहे त्या अशा: पहिली गोष्ट म्हणजे मानसिक विकारांची निर्मर्याद क्षुब्धता,—जिचा स्फोट दु:खाच्या अति सूक्ष्म भावनेंत होतो; **आणि दुसरी**, अतिरिक्त परमार्थप्रवणता,—तर्कांच्या कोट्या आणि न्यायाच्या पद्धाति यांत अति दीर्घकाल रत झाल्याकारणानें त्यांच्या प्रभावाखालीं जेथें व्यक्तीची नैसर्गिक अहंकाराची भावना मागें पडून त्या जागीं "अनहंकारा" च्या भावनेला वर्चस्व मिळतें. (—या दोन्ही प्रकारच्या अवस्था माझ्या वाचकांपैकीं जे कोणी थोडे माझ्यासारखे बाह्य वस्तुस्थितीचे पुरस्कर्ते असतील त्यांना च केवळ स्वानुभवानें ज्ञात

आहे. अपकृष्टावस्था, नास्तिक्यभाव, मनोमय कल्पना आणि विरोधी वृत्ति यांतून बाहेर पडलेला हा संकरजन्य देवप्राणी असा आहे कीं, त्याच्याजवळ मनाच्या सर्व नासक्याकुजक्या प्रवृत्ति आणि बुद्धीच्या सर्व भीरुत्वाच्या व ग्लानीच्या भावना यांना मान्यता मिळते.— —

## २०

खिस्तीधर्माचा जोरानें निषेध करीत असतां या धर्मापेक्षां हि ज्याच्या अनुयायांची संख्या फार मोठी आहे आणि ज्याचा या धर्माशीं बरा च संबंध आहे असा दुसरा एक धर्म आहे, त्याविषयीं अन्याय होऊं नये अशी माझी इच्छा आहे; हा धर्म म्हणजे बौद्धधर्म होय. सर्वविनाशवादी धर्म या दृष्टीनें दोहोंमध्यें पूर्ण साम्य आहे, – हे दोन्ही धर्म नासलेल्या स्थितीचे निदर्शक आहेत,—तथापि त्यांपैकीं प्रत्येक दुसऱ्या-पासून अति विलक्षण रीतीनें भिन्न आहे. खिस्ती धर्मावर टीकेचा हल्ला चढविणारास या दोन्ही धर्मांची तुलना करण्याचें जें कांहीं सामर्थ्य आलें आहे त्याबद्दल त्याला भारतीय पंडितांविषयीं नितांत कृतज्ञता प्रकट केल्यावांचून राहवत नाहीं.— बौद्ध धर्म हा खिस्ती धर्मापेक्षां शतपटीनें अधिक वस्तुभावदर्शक आहे, — मोठमोठ्या बिकट प्रश्नांशीं वस्तु-स्थितीला धरून शांतपणें तोंड देण्याचें सामर्थ्य असणें हें त्याच्या वंशपरंपरागत प्रकृतिधर्माचें अंग आहे; चिरस्थायी अध्यात्मविद्येच्या अनेक शतकें केलेल्या परिश्रमाचें च तें एक

फल होय. ज्या काळीं हा धर्म उदयास आला, त्या काळीं अगोदर च "देव" ही कल्पना नष्ट झाली होती. जगताच्या इतिहासांत बौद्ध धर्म एकटा च खराखुरा वस्तुभावदर्शक धर्म दिसतो; मग जरी त्याचें विशिष्ट ज्ञानशास्त्र घेऊन त्यावरून त्याची परीक्षा केली तरी हरकत नाहीं (त्याचा ज्ञानवाद हा शुद्ध मायावाद आहे)—तो कधीं हि "पापाबरोबर झगडा" असा शब्दप्रयोग करीत नाहीं, तर वस्तुस्थितीच्या खऱ्या स्वरूपाचा पूर्ण विचार करून "**दुःखा**बरोबर झगडा" अशी भाषा वापरतो. नैतिक कल्पनांपासून उत्पन्न होणारें आत्मवंचन पायाखालीं लोटून तो किती तरी उंच वर चढला आहे—आणि या च बाबतींत तो ख्रिस्तीधर्मापासून मूलतः भिन्न दिसून येणार आहे;—माझ्या भाषेंत बोलावयाचें झाल्यास तो **सदसतांच्या पलीकडे** स्थित आहे. इंद्रियविज्ञानशास्त्रांतील ज्या दोन गोष्टीं-वर तो धर्म उभा राहून त्याकडे विशेष लक्ष्य पुरवीत आहे त्या अशा: पहिली गोष्ट म्हणजे मानसिक विकारांची निर्मर्याद क्षुब्धता,—जिचा स्फोट दुःखाच्या अति सूक्ष्म भावनेंत होतो; **आणि दुसरी**, अतिरिक्त परमार्थप्रवणता,—तर्काच्या कोट्या आणि न्यायाच्या पद्धति यांत अति दीर्घकाल रत झाल्या-कारणानें त्यांच्या प्रभावाखालीं जेथें व्यक्तीची नैसर्गिक अहं-काराची भावना मागें पडून त्या जागीं "अनहंकारा" च्या भावनेला वर्चस्व मिळतें. (—या दोन्ही प्रकारच्या अवस्था माझ्या वाचकांपैकीं जे कोणी थोडे माझ्यासारखे बाह्य वस्तु-स्थितीचे पुरस्कर्ते असतील त्यांना च केवळ स्वानुभवानें ज्ञात

होणार आहेत ). ह्या शारीरिक कारणांनीं जो एक प्रकारचा उद्विग्नपणा मनुष्याच्या हृदयांत उत्पन्न होतो त्याच्याशीं आरोग्यशास्त्राच्या मार्गानें टक्कर देण्याचा बुद्धानें प्रयत्न केला. हा उद्विग्नपणा घालविण्याकरितां त्यानें पुढील आचाराविधींचा उपदेश केला: मोकळ्या हवेंत राहणें, प्रवासाची हौस बाळगणें, अन्नाची निवड मोठ्या काळजीपूर्वक करणें, खाण्यापिण्यांत नेमस्तपणा राखणें, सर्व मादक पदार्थांपासून अलिप्त राहणें, आणि पित्ताचा प्रकोप करणाऱ्या व रक्ताची उष्णता वाढविणाऱ्या सर्व मनोविकारांसंबंधीं सावधगिरी ठेवणें. तसें च तो आपल्या स्वतःबद्दल काय किंवा इतर जनांबद्दल काय उगीच काळजी करीत बसणें अयुक्त मानतो. ज्या कल्पना मनुष्याच्या मनाला शांति मिळवून देतील किंवा त्याच्या चित्ताला उल्हासित करतील अशांचा च त्यानें पुरस्कार केला,—त्यानें असे उपाय शोधून काढले कीं, त्या योगें वरील कल्पनांच्या विरूद्ध प्रवृत्तींचा अगदीं बीमोड व्हावा. त्यानें साधुत्व संपादणें किंवा साधु होणें याचा अर्थ आरोग्याला संचलन देणें असा केला. **प्रार्थना** ही वस्तु तो जाणत नाहीं, आणि त्या च प्रमाणें **देहदंड** हा हि प्रकार त्याला अभिमत नाहीं. त्याचेजवळ ‘ नीतीची स्वयंसिद्ध आज्ञा ’ नाहीं किंवा एखाद्या कर्माचरणाचें कडक बंधन नाहीं. या दोन्ही गोष्टींचा त्याच्या मठांत पूर्ण अभाव आहे (—एखाद्याला मठ सोडून जाणें झाल्यास त्याला तसें करण्यास मुभा आहे). ह्या सर्व बाबी वर निर्दिष्ट केलेली जी मानसिक विकारांची निर्मर्याद क्षुब्धता तिला उत्ते-

जित करण्याकरितां सर्वतोपरि साधनीभूत व्हाव्या अशा स्वरूपाच्या आहेत. म्हणून च ज्यांचीं मतें आपल्याशीं जमत नाहींत त्यांच्याविरूद्ध युद्ध पुकारण्यास बुद्धानें आपल्या अनुयायांस केव्हां हि अनुज्ञा दिली नाहीं. त्याच्या मतवादांत सूड, द्वेष आणि कोप ह्या विकारांपेक्षां दुसऱ्या कशाचा हि अधिक तिरस्कार केलेला सांपडणार नाहीं (— "युद्धानें युद्ध थांबत नाहीं": सर्व बौद्ध धर्मांत हें एक च हृदयस्पर्शी पालुपद आहे ....). आणि असें करण्यांत त्याचा उद्देश यथार्थ होता; कारण शरीराला अत्यंत पथ्यकारक असे जे पदार्थ आहेत त्यांच्या दृष्टीनें हे च विशिष्ट मनोविकार आरोग्याला पूर्ण विघातक ठरतात. त्याला अगोदर च सर्वत्र पसरलेली मानासिक क्लांतता आढळून आली,—ती अशी कीं, जिचा स्फोट अतिशयेंकरून 'परार्थ' भावनेंत होतो (म्हणजे जिच्या योगें वैयक्तिक स्वार्थाचें बळ कमी होऊन मनाचा समतोलपणा ढळतो व 'अहंपणा' लयास जातो), आणि तिच्या प्रतिकारार्थ त्यानें व्यक्तिमात्राचे ठिकाणीं आध्यात्मिक आकांक्षेचा ओघ जोरानें वळविला. बुद्धाच्या मतवादांत अहंभाव धारण करणें हें कर्तव्याच्या सदरांत येतें: सर्वांत अत्यंत आवश्यक वस्तु म्हणजे "दुःखापासून मुक्त कसें व्हावें"; तीवर च बुद्धाच्या सर्व आध्यात्मिक श्रेयसाची व्याख्या आणि रचना झाली आहे (—या ठिकाणीं बुद्धाचें व सॉक्रेटिसाचें साम्य तत्काल वाचकांच्या दृष्टीसमोर येणार आहे; कारण त्या अथेन्समधल्या तत्त्ववेत्त्यानें हि या च प्रकारें शुद्ध स्वरूपाच्या 'शास्त्रीयत्वा'च्या विरुद्ध बंड पुका-

रून अति बिकट नैतिक प्रश्नांच्या क्षेत्रांत वैयक्तिक अहंभावापासून च एक नवीन नीतिवाद उपस्थित केला होता).

## २१

बौद्ध धर्माला अनुकूल अशी पूर्व परिस्थिति म्हणजे फार सौम्य ऋतुमान, लोकांच्या आचरणांत अत्यंत सात्विकपणा व उदारपणा, आणि युद्धप्रवणतेचा **अभाव.** अशा धर्माला मूळ प्रेरणा अभिजातवर्गांत आणि विद्यापारंगत लोकांत च मिळणें शक्य आहे. सर्व स्फूर्तिदायक गुणांत समाधानवृत्ति, मनाची शांति आणि वासनांचा त्याग हे गुण येथें प्रमुखत्वानें श्रेष्ठ मानले जातात; इतकें च नाहीं तर ते प्रत्यक्ष **आचरणांत** आणण्यांत येतात. बौद्ध धर्म असा नाहीं कीं, ज्यांत पूर्णत्व हें केवळ आकांक्षित ध्येय असतें; तर तें या धर्माचें स्वाभाविक रूप च आहे. खिस्ती धर्मांत जुलमानें पीडित अशा गुलामगिरींतील लोकांच्या च सर्व मनोभावना उचंबळून वर आल्या आहेत; म्हणून खिस्ती धर्मांत केवळ दासवृत्तींतील नीच जातीच्या च लोकांच्या तारणाकडे सर्व दृष्टि आहे. येथें पापकल्पनेविषयीं पाखंडवाद, आत्म्याचें अन्तःपरीक्षण आणि सदसद्विवेकबुद्धीची कडक तपासणी हीं करमणुकीचीं आणि वेळ घालवण्याचीं साधनें आहेत. येथें " देव " नामक **सर्वशक्तिमान वस्तूच्या** सान्निध्यांत प्रार्थनेच्या द्वारें आनंदातिशय सतत जागृत ठेवला जातो; आणि सर्वांत अत्युच्च ध्येय हें स्वतःला दुष्प्राप्य समजण्यांत येतें. मग यदाकदाचित् जर

त्याची प्राप्ति झाली च तर ती शुद्ध देणगीच्या रूपानें किंवा देवाच्या "कृपाप्रसादानें" होय. येथें सरळ व्यवहाराचा पूर्णपणें अभाव आहेः गुप्तपणा आणि अंधारकोठडी हीं या ख्रिस्ती धर्माचीं उपकरणें होत. येथें देहाला तुच्छ मानलें जातें व आरोग्याला विषयसुखाच्या सदरांत घालून अवमानण्यांत येतें. ख्रिस्ती धर्मपीठानें तर शुचितेचा साक्षात् निषेध केला आहे (—मूर लोकांना स्पेनमधून हांकून लाविल्यानंतर ख्रिस्ती लोकांनीं जी पहिली गोष्ट केली ती ही कीं, सार्वजनिक स्नानगृहें बंद करणें; एका कोर्डोवा शहरांत च अशीं स्नानगृहें २७० होतीं). स्वतःविषयीं काय किंवा इतरांविषयीं काय निर्दयता हें ख्रिस्ती मनःप्रवृत्तीचें एक निश्चित अंग आहेः ज्यांचीं मतें आपल्याशीं जुळत नाहींत त्या सर्वांचा द्वेष : नव्हे त्यांचा छळ करण्याची उत्कट इच्छा. खिन्नकारक भावना आणि क्षोभकारक कल्पना यांना येथें अग्रस्थान प्राप्त होतें; येथें सुंदर नामाभिधानांनीं सुशोभित अशा ज्या अत्यंत ईप्सित मनःस्थिति दिसतात, त्या खरोखर उन्मादाच्या च अवस्था असतात; येथें खाद्यपेयांची निवड अशा रीतीनें होते कीं बहुधा त्यांपासून रोगट भावनांचें वर्धन घडावें आणि मज्जातंतूंचें अपरंपार उद्दीपन व्हावें. पृथ्वीवरील राजपुरुषांचा कट्टा द्वेष हें हि एक ख्रिस्ती धर्माचें प्रमुख अंग आहे;— कारण ते "अभिजात" असतात,— आणि त्या च प्रमाणें त्यांच्या विषयीं अति गुप्त रीतीनें त्यांना न कळेल अशी येथें एक प्रकारची स्पर्धेची भावना आहे ( जे जित असतात ते आपला "देह"

जेत्याच्या चरणीं अर्पण करतात---त्यांना स्वतःला जें कांहीं पाहिजे असतें तो त्यांचा "आत्मा" होय ). ख्रिस्ती धर्माचें लक्षण म्हणजे बुद्धिमत्तेचा द्वेष, मानबुद्धीचा द्वेष, धीरोदात्ततेचा द्वेष, स्वातंत्र्यभावनेचा द्वेष, बौद्धिक स्वायत्ततेचा द्वेष, हें होय. इंद्रियांचा तिरस्कार, इंद्रियजन्य विषयसुखाचा तिरस्कार किंबहुना सर्वसामान्य आनंदवृत्तीचा तिरस्कार यांत च ख्रिस्ती धर्माचें संपूर्ण सार भरलें आहे.

## २२

जेव्हां ख्रिस्ती धर्म हा अगदीं हीनांतील हीन जातींनीं म्हणजे पुराण जगांतील अति निकृष्ट दर्जाच्या मानवसमूहांनीं भरलेल्या अशा आपल्या उगमस्थानाला सोडून बाहेर पडला, आणि रानटी राष्ट्रांमध्यें आपली सत्ता प्रस्थापित करण्याकरितां प्रवृत्त झाला, तेव्हां त्याची निराळ्या च स्वभावगुणांच्या लोकांशीं गांठ पडली; ते लोक निर्विण्णचित्त झालेले नव्हते, तर अन्तःकरणांत अति क्रूर आणि बाहेर शरीरावर शस्त्राचे आघात सोसण्यास बेफिकीर अशा वृत्तींचे होते - म्हणजे ते शरीरानें बलवान् पण बुद्धीनें आडमुठे होते. त्यांचे ठिकाणीं स्वतःसंबंधीं असंतोषवृत्ति व स्वतःपासून स्वतःला शरीरपिडा हीं बौद्ध धर्माप्रमाणें आत्यंतिक चित्तक्षुब्धता व दुःखप्रवणता यांची दर्शक नव्हतीं, तर उलट तेथें परांना पीडा देण्याची व शब्दानें आणि क्रियेनें शत्रुत्वाच्या वर्तनांत मनाचा ताण कमी करण्याची अत्युत्कट लालसा होती. ख्रिस्ती धर्माला रानटी जमातींवर प्रभुत्व मिळ-

विण्यास रानटी कल्पनांची आणि रानटी नीतिमूल्यांची च सर्वथैव आवश्यकता होती: याचीं कांहीं उदाहरणें येणेंप्रमाणें,— पहिल्या अपत्याचा यज्ञ; प्रभुभोजनाच्या प्रसंगीं रुधिरपान; बुद्धीचा आणि संस्कृतीचा तिरस्कार; सर्व प्रकारचा वासनायुक्त वा वासनारहित देहदंड; सांप्रदायिक कर्माचाराचें अति मोठें अवडंबर. बौद्ध धर्म हा **वार्धक्यावस्थेंतील** मनुष्यांचा धर्म होय; ज्या ठिकाणीं दया, क्षमा, शांति हे गुण अतिरेकाला गेले आहेत, जेथें आध्यात्मिक भावना परमपदाला पोंचल्या आहेत, व जेथें चित्ताच्या नाजुक वृत्ति सहज दु:खप्रवणता पावल्या आहेत, अशा मानवजातींतील लोकांना च सर्वतोपरि शोभणारा हा धर्म आहे ( —युरोपीय लोक अद्यापि ह्या धर्मास पात्र झालेले नाहींत ); तो त्यांना मनाची शांति आणि चित्ताचा उल्हास यांच्याकडे परत मागें खेंचतो, आणि बुद्धीला पथ्यकारक मार्गावर आणून शरीराला नि:संशय कंटकता प्राप्त करून देण्याचे उपाय योजतो. याच्या उलट ख्रिस्ती धर्म हा हिंस्र पशूंवर ताबा मिळवण्याकडे लक्ष ठेवतो; तत्प्रीत्यर्थ तो त्यांना **रुग्ण** करण्याचे मार्ग काढतो,— शक्तिहीन करणें हा च एक ख्रिस्ती धर्माचा हिंस्र पशूला माणसाळण्याचा म्हणजे रानटी मनुष्याला " सुसंस्कृत " करण्याचा औषधोपचार आहे. बौद्ध धर्म हा संस्कृतीच्या अंतिमकाळचा व थकलेल्या अवस्थेचा निदर्शक आहे; ख्रिस्ती धर्म जेव्हां जन्मास आला तेव्हां जवळपास कोठें संस्कृतीचें नांव हि नव्हतें, किंबहुना कांहीं बाबतींत तर संस्कृतीचा पाया त्यानें च घातला असें म्हणण्यास हरकत नाहीं.

## २३

मी पुनः असें निक्षून सांगतों कीं, बौद्ध धर्म हा खिस्ती धर्मापेक्षां शतपटीनें अधिक सौम्य, सत्याचारी, आणि वस्तुस्थितीशीं मिळून जाणारा धर्म आहे. त्याला पापाची व्याख्या करून तद्द्वारें दुःख व दुःखाविषयीं मनःप्रवणता ह्यांचें समर्थन करण्याची केव्हां च आवश्यकता भासत नाहीं,– तो आपल्या बुद्धीला जें पटतें तें सरळ रीतीनें सांगतो, " मी दुःखानुभव घेतों ". उलट पक्षीं, रानटी मनुष्याला दुःख करीत बसणें हें स्वरूपतः मोठेंसें मानास्पद वाटत नाहीं: आपल्याला दुःख होत आहे हें कबूल करण्याकरितां त्याला प्रथमारंभीं कांहीं तरी आधार लागत असतो ( त्याची नैसर्गिक मनःप्रवृत्ति त्याला आपलें दुःख नाकारण्याकडे किंवा तें मुकाट्यानें सहन करण्याकडे जोरानें वळविते ). त्याच्या बाबतींत "देविल्" हा शब्द देवाच्या च कृपेचें फल ठरलाः मनुष्याला असा एक अति बलवान् आणि भयंकर शत्रु झाला कीं, त्याच्या हस्तें पराजित होऊन दुःख पावण्यास त्याला आतां कांहीं लाज धरण्याचें कारण उरलें नाहीं.—

खिस्ती धर्माच्या मूळाशीं एक दोन सूक्ष्म तत्त्वें आहेत आणि तीं प्राच्य देशांत च उगम पावलीं आहेत. त्याला जें पहिलें तत्त्व अवगत झालें तें हें कीं, एखादी गोष्ट वस्तुतः सत्य आहे किंवा नाहीं याचें कांहीं महत्त्व नाहीं; परंतु खरें महत्त्व ती लोकांनीं सत्य म्हणून- श्रद्धेनें मानाली पाहिजे यांत आहे.

वास्तविक सत्य, आणि एखाद्या वस्तूच्या सत्यत्वाबद्दल केवळ श्रद्धा यांत जमीनअस्मानाचें अंतर आहे; हीं दोन्ही हितस्थानें पूर्णपणें अलग आहेत, तीं **विरुद्ध जगतें** आहेत, आणि त्यांकडे जाणारे रस्ते परस्परांपासून अगदीं भिन्न आहेत. या वस्तुस्थितीच्या अंतरंगांत एकदां दीक्षा मिळाली कीं तो मनुष्य प्राच्य देशांत संतपदाला प्राप्त होतो: हें तत्त्व ब्राह्मण पंडितांना फार उत्तम कळलें होतें, तसें च प्लेटोला कळलें होतें, आणि तसें च प्रत्येक गूढविद्येच्या पुरस्कर्त्यास चांगलें कळतें. उदाहरणार्थ, जर कोणा एखाद्या सद्भक्ताला आपण पापापासून मुक्त झालों अशी श्रद्धा बाळगण्यांत सुख वाटत असेल तर तो अगोदर खराखुरा पापी असला पाहिजे याची कांहीं आवश्यकता **नाहीं**; त्याला फक्त आपण पापी आहों असें **वाटलें** म्हणजे झालें. आतां श्रद्धा ही जर सर्वांपेक्षां अधिक आवश्यक मानली तर बुद्धि, बुद्धिगम्य ज्ञान आणि शास्त्रीय संशोधन यांना निंदास्पदतेला नेल्यावांचून गत्यंतर च नाहीं; येथें सत्याकडे जाणारा मार्ग **मना** करण्यांत येतो.—प्रत्यक्ष अनुभवांत आलेल्या कोणत्या हि आनंदभावनेपेक्षां प्रबल **आशा** ही जीविताला अधिक मोठी चेतना देणारी आहे असें येथें समजलें जातें. जे जे कोणी दुःखपीडित असतील त्या सर्वांना अशा एका आशेच्या आधारावर जिवंत राखिलें पाहिजे कीं, ती आशा सत्यसृष्टींतील कोणत्या हि प्रत्यक्ष प्रमाणानें खंडित होण्याची भीति नाहीं,—आणि जी केव्हां हि फलद्रूप होणें शक्य नाहीं: परलोकप्राप्तीची आशा. (दुःखग्रस्त लोकांना

उगीच जास्त काळ जीवित कंठण्यास मदत करण्याचें सामर्थ्य आशेला असते या कारणावरून प्राचीन ग्रीकांनीं तिला सर्व अनिष्टांत अनिष्ट, अत्यंत **घातुक** अनिष्ट मानलें होतें: ती पांडोराच्या पेटींत तशीच तळाशीं चिकटून बसून मागें राहिली). प्रेम शक्य होण्याकरितां देव व्यक्तिभावसंपन्न झाला पाहिजे. अति नीच मनोविकारांचे ध्वनि ऐकून घेण्याकरितां तो तरुण असला पाहिजे. स्त्रियांच्या उत्कट वासनेला तृप्त करण्याकरितां सुंदर मुनी व पुरुषांच्या उत्कट वासनेचें समाधान होण्याकरितां कुमारी मेरी यांना अग्रस्थानीं आणून बसविलें पाहिजे. ही सर्व रचना करण्याचा हेतु हा कीं, ज्या एका विशिष्ट भूमीवर ख्रिस्ती धर्माला आपलें स्वामित्व मिळविण्याची इच्छा होती, तेथें अगोदर च अफ्रोडाईट् आणि अडोनिस् किंवा रति आणि मदन या देवतांच्या संप्रदायांनीं धर्माचें **स्वरूप** निश्चित करून टाकलें होतें. **ब्रह्मचर्या**वर जोर दिल्यानें धार्मिक भावनेची तीव्रता आणि गंभीरता वृद्धिंगत होते—त्यायोगें कोणता हि धर्मपंथ अधिक भावनापूर्ण, उत्साहयुक्त आणि अध्यात्मवान् बनतो.—प्रेमाची अवस्था अशी आहे कीं, तींत मनुष्याला वस्तु जशा असतात त्यापेक्षां फार निराळ्या दिसूं लागतात. येथें मायेची शक्ति परमावधीला जाते, आणि कटु पदार्थाला मधुर करण्याचा व कुरूप वस्तूला सुरूप बनविण्याचा मोह अनावर होतो. जेव्हां मनुष्य प्रेमाच्या पाशांत सांपडतो तेव्हां तो इतर वेळेपेक्षां जास्त दुःख सहन करतो; तो कोणत्या हि गोष्टीपुढें मान

वांकविन्यास तयार होतो. मुख्य मुद्दा हा कीं, ज्या धर्मात प्रेम करणें शक्य आहे असा धर्म शोधून काढणें : ह्या मार्गानें आयुष्यांतील सर्व कष्टप्रद प्रसंगांचा पाडाव होतो, इतकें च नाहीं तर ते कायमचे दिसेनासे होतात.—ख्रिस्ती धर्मांतील तीन सद्गुण जे श्रद्धा, आशा, दया यांबद्दल हें इतकें च विवरण पुरें: मी त्यांना ख्रिस्ती धर्माचीं तीन **पूर्वोपायरूप साधनें** समजतों.—बौद्ध धर्म हा अनेक शतकांच्या पूर्व परंपरित ज्ञानानें परिपूर्ण असून शिवाय तो प्रत्यक्षवस्तुभाववादी असल्याकारणानें त्याला हा अशा तऱ्हेचा धूर्तपणा साधला नाहीं तर त्यांत कांहीं नवल नाहीं.

## २४

या ठिकाणीं मी फक्त ख्रिस्ती धर्माच्या मूळाशीं असलेला प्रश्न विचारांत घेतों. या प्रश्नाच्या उलगड्याचें पहिलें गमक असें आहे : ज्या भूमींतून ख्रिस्ती धर्माचा उगम झाला त्या भूमीच्या सापेक्षतेनें च त्याचा अर्थ कळणार आहे,—तें यहुदी मनोवृत्तीच्या विरुद्ध प्रतिक्रिया करणाऱ्या चळवळीचें रूप नाहीं, तर त्या मनोवृत्तीचें च न्यायसिद्ध परिणामरूप आहे; तिच्या भीतिप्रद तर्कशास्त्रांतील आणखी एक पुढची पायरी आहे. स्वतः ख्रिस्ताच्या च विधानाप्रमाणें "मोक्ष हा यहुदी लोकांपासून प्राप्त झाला आहे."—दुसरें गमक असें: पॅलेस्टाईनमधील ग्यालीलियनांच्या म्हणजे मूळ यहुदी धर्मांतून बाटलेल्या पहिल्या ख्रिस्तानुयायांच्या मानसिक वृत्तीचें विशिष्ट रूप अद्यापि

येथें ओळखतां येण्यासारखें आहे, परंतु तें केवळ पूर्ण अवनतीच्या दशेंतील होय (कीं जें स्वतः विकृत असून शिवाय त्यांत परकीय गुणधर्मांचें अत्यंत प्राबल्य झालेलें आहे); तथापि ज्या कार्याकरितां त्याचा उपयोग करून घेण्यांत आला होता तें कार्य मात्र त्याला या च अवस्थेंत उत्तम प्रकारें बजावतां आलें,—तें कार्य म्हणजे मानवजातीच्या तारक प्रभूचा नमुना बनविणें.

सर्व जगाच्या इतिहासांत यहुदी लोक हे मोठे अद्भुत लोक आहेत; कारण जेव्हां त्यांच्यापुढें '**सत्** का **असत्**' हा प्रश्न उपस्थित झाला तेव्हां त्यांनीं अगदीं गंभीर आणि पोक्त विचारानें सत् या वस्तूचा स्वीकार केला,—मग त्याकरितां **जी काय किंमत पडेल ती** देण्यास ते तयार झाले: ही किंमत म्हणजे संपूर्ण निसर्गाचा पाया च **मिथ्या** ठरविणें, सर्व अन्तर्बाह्य सृष्टींचें सत्यत्व आणि नैसर्गिकत्व नाकारणें. ज्या परिस्थितीमध्यें तावत्कालपर्यंत कोणत्या हि राष्ट्राला जिवंत राहतां आलें, किंवा तें जिवंत राहूं दिलें गेलें, त्या सर्व परिस्थितीच्या पलीकडे ते स्वतःभोंवतीं एक कोंडाळें करून राहिले; त्यांनीं स्वयंस्फूर्तीनें जी एक नवीन कल्पना निर्माण केली ती **नैसर्गिक** परिस्थितीच्या अगदीं उलट होती,—त्यांनीं प्रथमतः धर्म, नंतर सांप्रदायिक आचारमार्ग, नंतर नीति, इतिहास आणि मानसशास्त्र यांची एकामागून एक ओळीनें अशी कांहीं उलटापालट केली कीं, त्यांचें मूळचें स्वरूप पूर्णपणें बदलून गेलें आणि त्या कारणानें त्यांना त्यांच्या **नैसर्गिक अर्थांच्या**

**विरुद्ध प्रतिपादन करणें** भाग पडलें. हा असा च चमत्कार पुन: एकवार घडलेला आपल्या नजरेसमोर येतो, आणि जरी तो केवळ नक्कल रूपानें असला तरी अतिशयोक्ती-च्या बाबतींत मात्र गणना करतां येणार नाहीं इतक्या गुणां-शाला पोंचलेला आढळतो :–ख्रिस्ती चर्चवाल्यांची "देवाच्या लाडक्या लोकांशीं" तुलना करून पाहतां नवीन कल्पना उत्पन्न करण्याचे कामीं ते नि:संशय मागें पडतात. ह्या एका च कारणाकरितां यहुदी लोक हे जगाच्या इतिहासांत सर्वांत अधिक **सत्यविघातक** ठरतात : त्यांच्या अंतिम वर्चस्वामुळें मानवजातीच्या कल्पनांत इतका विपर्यास होऊन गेला आहे कीं, आज मितीस सुद्धां ख्रिस्ती लोक यहुदी लोकांचे कट्टे द्वेष्टे होऊं शकतात; पण त्यांना असें समजत नाहीं कीं, आपण स्वत: **यहुदी धर्मांतून च त्याच्या परिणामरूपानें** बाहेर पडलों आहों.

मी आपल्या "नतिची पूर्वपीठिका" नामक ग्रंथांत प्रथम च रागद्वेषातीत प्रकृष्टजातांची नीति आणि रागद्वेषयुक्त निकृष्टजातांची नीति या विरोधाचें मानसशास्त्रदृष्ट्या स्पष्टी-करण केलें आहे; यांपैकीं निकृष्टजातांच्या नीतीचा उगम दुसऱ्या नीतीचा निषेध करण्याच्या भावनेंत असतो: परंतु ही च याहुदीय–ख्रिस्ती लोकांची अन्तर्बाह्य नीति आहे. या भूलोकावरील जीवन, समृद्धि, बल, सौंदर्य, आणि आत्म-प्रतीति यांच्या उत्तरोत्तर चढत्या प्रमाणांतील गतीचें जें जें कांहीं द्योतक आहे, त्या सर्वांचा निषेध करतां यावा म्हणून

सदर्हू रागद्वेषाच्या भावनेला अलौकिक बुद्धिमत्तेचें रूप धारण करून एक निराळा च दुसरा लोक शोधून काढावा लागला, आणि अशा परलोकाच्या दृष्टीनें इहलोकांतील जीवितास उत्तेजन देणें हें सर्वांत मोठें एक च एक दुष्ट आणि निंद्य कृत्य समजण्यांत आलें. मानासिक शास्त्राच्या दृष्टीनें पाहतां यहुदी लोकांची जीवनशक्ति अत्यंत चिवट आहे. अशक्यतेच्या विपरीत परिस्थितींत सांपडलेल्या या लोकांनीं आपल्या तीव्र स्वसंरक्षणात्मक बुद्धीच्या जोरावर स्वेच्छेनें सर्व अवनतीस नेणाऱ्या भावनांचा पुरस्कार केला; परंतु त्यांनीं त्यांचा आपल्यावर पगडा बसूं दिला नाहीं, तर केवळ त्या भावनांत जगताशीं टक्कर देण्याच्या कामीं उपयोगी पडेल अशी एक शक्ति पाहतां च त्यांचा स्वीकार केला. यहुदी लोक हे जात्या सर्व अवनत लोकांच्या विरुद्ध धर्माचे आहेत: त्यांना अवनत लोकांचे प्रतिनिधि होणें परिस्थितीमुळें भाग पडलें, इतकें कीं, त्यांत त्यांचें मूळचें खरें रूप कोणतें याबद्दल संभ्रम उत्पन्न व्हावा; परंतु अशा विलक्षण कचाटींत सुद्धां त्यांनीं आपल्या अंगच्या नाट्यकलेंतील परमावधीच्या अभिनयकौशल्यानें सर्व अवनतिपूर्ण चळवळींच्या शिरोभागीं आपणांस कसें बसवून घ्यावें ( उदाहरणार्थ, संत **पाउल** आणि ख्रिस्ती धर्म ) आणि त्या चळवळींपासून **जीविताचें आस्तिक्य मानणाऱ्या** कोणत्या हि पक्षापेक्षां अधिक जोरदार पक्ष कसा निर्माण करावा याबद्दल उत्तम धोरण राखिलें. यहुदी धर्म आणि ख्रिस्ती धर्म यांत ज्या वर्गाचे ठिकाणीं

वर्चस्व मिळविण्याची आकांक्षा आहे—म्हणजे उपाध्यायाचा वर्ग—त्याच्या दृष्टीनें अवनति ही केवळ **साधनरूप** आहेः लोकांना रोगी बनविण्यांत या वर्गाचें अत्यंत हित आहे; आणि त्या च प्रमाणें जीविताचा केवळ नाश च नाहीं, तर तें निंदास्पदतेला कसें जाईल अशा रीतीनें ‘ चांगलें ’ आणि ‘ वाईट ’, ‘ सत्य ’ आणि ‘ मिथ्या ’ या कल्पनांचा विपर्यास करण्यांत हि त्यांचें हित आहे.

## २५

नीतीच्या नैसर्गिक अर्थांचा विपर्यास करून त्यांना **अ-नैसर्गिक** रूप देण्याच्या प्रत्येक प्रसंगाचा नमुनेदार इतिहास या दृष्टीनें इस्त्रायल लोकांचा इतिहास बहुमोल आहे. मूळारंभीं, आणि विशेषतः राजवंशाच्या सत्तेच्या काळांत इस्त्रायल लोकांची सर्व वस्तुमात्रांविषयीं वृत्ति अगदीं **युक्त** म्हणजे निसर्गाला धरून होती. त्यांचा याव्ह नामक देव म्हणजे स्वतःच्या शक्तीची संवेदनात्मक भावना, स्वतःच्या जीवितामध्यें आनंद, आणि स्वतःविषयीं आशापूर्ण वृत्ति यांची व्यक्त प्रतिमा होतीः विजय आणि मोक्ष यांची ते त्या देवापासून अपेक्षा करीत, आणि ज्या ज्या गोष्टी राष्ट्राच्या जीवनाला हितावह असतात—अशी सर्वांत मोठी हितावह गोष्ट म्हणजे पर्जन्य—त्या सर्व निसर्गदेवतेकडून आपणांस त्या देवाच्या द्वारें प्राप्त होतात असा त्यांचा विश्वास असे. याव्ह हा इस्रायलांचा देव आहे, आणि **म्हणून** तो न्यायाचा देव आहेः



४३४२

जें राष्ट्र सत्ताधारी असतें आणि ज्याची त्या सत्तेच्या ठिकाणीं सदसद्विवेकबुद्धि जागृत असते त्या राष्ट्राची विचारसरणी अशी च असावयाची. अशा लोकांच्या आत्मप्रत्ययाचीं दोन्हीं अंगें त्यांच्या गांभीर्ययुक्त धर्मांत व्यक्त होतातः एक, ज्या दैवाच्या अघटित घटनेनें आपण उच्च पदावर चढलों त्या-बद्दल कृतज्ञताबुद्धि बाळगणें; आणि दुसरें, यथाकाल ऋतूंचें आगमन आणि पर्जन्याची वृष्टि यांच्या उपकृतीबद्दल व गुरांची जोपासना आणि जमीनीची मशागत यांच्या फल-सिद्धीबद्दल देवाचे सदैव ऋणी असणें.—अशी ही वृत्ति ध्येय म्हणून पुष्कळ काळ टिकली; इतकी कीं, जरी तें राष्ट्र पुढें अन्तर्गत अराजकतेनें व बाहेरच्या असीरियन शत्रूंच्या वाव-टळीनें अत्यंत शोचनीय प्रकारें पार वाहून गेलें, तरी हें ध्येय मागें कायम राहिलें. राजा म्हटला कीं तो उत्तम योद्धा आणि कडक न्यायाधीश हें जें त्यांच्या मनःचक्षूंपुढील राजाचें परमोच्च रूप तें अशा हीनावस्थेंत हि त्यांनीं ढळूं दिलें नाहीं; आणि ज्यानें हें रूप सर्वांत अधिक आपल्या नजरेसमोर ठेवलें तो मोठा नमुनेदार भविष्यवादी (—म्हणजे त्या काळ-चा मर्मभेदक टीकाकार आणि औपरोधिक प्रवक्ता ) इसाया होय.—परंतु पुढें त्या सर्व आशा जागच्या जागीं च कायम राहिल्या. त्या जुन्या देवाला नवीन काळांत पूर्वींचा पराक्रम करण्याचें सामर्थ्य राहिलें नाहीं. अशा स्थितींत खरोखर त्याला बाजूला सारणें इष्ट होतें: पण तसें करण्याऐवजीं त्यांनीं काय केलें? तर त्या देवांतील मूळची गुणकल्पना बदलून

टाकली,—त्या कल्पनेंतील नैसर्गिक रूप पालटून गेलें: त्याला निरर्थक उराशीं बाळगण्यांत त्यांना ही इतकी किंमत द्यावी लागली. याव्ह देव, न्यायाचा अधिष्ठाता देव,—आतां तो इस्रायलांशीं सारूप्यभावानें राहिला नाहीं, आतां तो राष्ट्राच्या उच्च स्वाभिमानाचें दर्शक प्रतिक उरला नाहीं: तो कांहीं अटींवर केवळ एक सामान्य देव बनून राहिला....आतां त्यांतील देवत्वाची कल्पना चळवळ्या भिक्षुक वर्गाच्या हातांत एक शस्त्र होऊन बसली आहे; ह्या भिक्षुकवर्गानें असें ठरविलें आहे कीं, जगांतील सर्व प्रकारचें सुख हें देवाच्या भक्तीबद्दल पारितोषिक आहे आणि सर्व प्रकारचें दु:ख हें देवाच्या अवज्ञेबद्दल म्हणजे " पापा " बद्दल शासन आहे: अत्यंत लबाडीची अर्थ लावण्याची पद्धत; जिच्यापासून " विश्वाची नैतिक रचना " या सर्वप्रसिद्ध कल्पनेचा जन्म झाला, आणि जिच्या योगें " कार्य " आणि " कारण " हें तत्त्व उलटेचें पालटें होऊन गेलें. एकदां पारितोषिक आणि शासन या दुकलीच्या योगें जगतांतून नैसर्गिक कार्यकारणभावाचें उच्चाटन झालें कीं त्याच्या उलट दुसरा **निसर्गाच्या विरुद्ध** कार्यकारणभाव पुढें यावयाचा व त्यापासून सर्व प्रकारचीं अस्वाभाविक रूपें एकामागून एक उद्भव पावावयाचीं हें निश्चयानें समजावें. **सक्तीनें मागणी करणारा** देव!—मूळ जो देव सर्व कार्यांत साहाय्य करणारा, सर्व प्रसंगीं हिताचा सल्ला देणारा, आणि आरंभापासून च धैर्य व स्वावलंबन यांच्या प्रत्येक आनंददायक स्फूर्तीशीं आपलें नांव जोडणारा होता

तो जुना देव जाऊन त्या जागीं हा नवा देव स्थानापन्न झाला ....नीति ही आतां जीवन आणि वर्धन यांच्या परिस्थितीची दर्शक राहिली नाहीं, ती आतां जीविताची अत्यंत मूलभूत भावना उरली नाहीं; तर ती एक शुद्ध कल्पनाजन्य मनःपूत वस्तु बनली आहे, नव्हे ती जीविताला सर्वस्वी विरोधक झाली आहे,—या नीतीची व्याख्या करावयाची म्हणजे कल्पना-शक्तीचें मूलतः विकृत रूप, सर्व वस्तुमात्रांकडे "दुष्ट दृष्टि". यहुदी नीति काय आहे, खिस्ती नीति तरी काय आहे? दैव, पण ज्यांतील सात्त्विक गुणांश हिरावून घेतला आहे; दुःख, पण ज्याला "पापा" ची पुष्टि देऊन भ्रष्ट केलें आहे; येथें सामान्य सुस्थितीला मोहमय मानून भयप्रद ठर-विली आहे, आणि शारीरिक रुग्णावस्थेला सदसद्विवेकबुद्धि-रूपी कीटकाच्या द्वारें विषदिग्ध केली आहे........

## २६

देव ही कल्पना विकृत झाली; तशी च नीतीची हि कल्पना बिघडून गेली: तथापि यहुदी भिक्षुकवर्ग येथें च थांबला नाहीं. इस्रायलाच्या सर्व इतिहासाचा कांहीं च उपयोग करतां येईना म्हणून तो हि झुगारून देण्यांत आला ! ह्या भिक्षुकांनीं सत्यापलापाचा महान् चमत्कार घडवून आणला; बायबलाचा फार मोठा भाग असल्या च चमत्कारानें भरलेलें एक चोपडें आहे: परंपरेच्या आणि ऐतिहासिक वस्तुस्थितीच्या उलट जाऊन या धर्ममार्तंडांनीं अश्रुतपूर्व तिरस्कारबुद्धीनें स्वकी-

यांच्या पूर्ववृत्तांची केवळ धार्मिक दृष्टीनें संगति लाविली,— म्हणजे त्यांनीं याव्हाविरुद्ध जें जें पाप तें शासनार्ह आहे आणि याव्हभक्तीचा जो जो पूजनोपचार तो प्रसादास पात्र आहे या तत्त्वावर पूर्वींच्या इतिहासाचें स्वरूप मोक्षाच्या हास्यास्पद यांत्रिक मार्गावर पार बदलून टाकिलें. या प्रकारें केवळ धार्मिक दृष्टीनें इतिहासाचे अर्थ लावण्याचें काम जें आज हजारों वर्षें चाललें आहे त्यायोगें आमची इतिहासाच्या प्रांतांतील सत्यान्वेषणाची बुद्धि पूर्णपणें बोथट बनून गेली आहे; नाहीं तर या असल्या ऐतिहासिक सत्यापलापाच्या लज्जास्पद कृतीनें आमच्या अन्तःकरणांत अत्यंत तीव्र वेदना उत्पन्न झाल्यावांचून राहत्याना. उलट, चर्चनें केलेल्या या कृत्यास तत्त्ववेत्त्यांकडून दुजोरा मिळाला तें निराळें च: " विश्वाची नैतिक रचना " हा **अपसिद्धांत** अगदीं अर्वाचीनांतील अर्वाचीन तत्त्वज्ञानाच्या हि विकसनांत पूर्णपणें बिंबून गेलेला दृष्टीस पडतो. "विश्वाची नैतिक रचना" याचा वास्तविकरीत्या अर्थ काय आहे? तर एकदां च कायम ठरून गेलेली देवाची इच्छा; ज्या इच्छाबलावर मनुष्यानें काय करावें आणि काय न करावें याचा निर्णय होतो; व्यक्ति काय किंवा राष्ट्र काय, त्याचा नैतिक दर्जा त्यानें देवाची आज्ञा किती प्रमाणांत पाळली यांत च सिद्ध होतो; राष्ट्राचें किंवा व्यक्तीचें भवितव्य सर्वस्वी त्या देवाच्या इच्छेवर अवलंबून असतें; जितक्या अंशांत त्यानें देवाची सेवा किंवा अपराध केलेला असेल तितक्या अंशांत त्याला त्याबद्दल बक्षिसाच्या किंवा

शिक्षेच्या रूपानें फल मिळावयाचें. या क्षुद्र अपसिद्धांताच्या विरुद्ध **निसर्ग** असें प्रतिपादन करतो: जीवनांतील सर्व आरोग्यकारक तत्त्वांचा नाश करून आपला उत्कर्ष साधणारा हा बांडगुळासारखा परोपजीवी धर्मपुरोहित देवाच्या नांवाचा दुरुपयोग करीत आहे; ज्या परिस्थितींत हा धर्माचार्य आपण एकटा च सर्व वस्तूंचे अर्थ ठरवितो, तिला तो " देवाचें राज्य " या नांवानें संबोधितो; ज्या विशिष्ट साधनमार्गांनीं ही परिस्थिति निर्माण होते आणि स्थिरता पावते, त्यांना तो " देवाची इच्छा " हें नांव देतो; ज्या प्रमाणांत एखादी व्यक्ति, राष्ट्र, अथवा युग ह्या धर्मगुरूची सत्ता मान्य करतें किंवा झुगारून देतें त्या प्रमाणांत तो जगाविषयीं अत्यंत तिरस्कारबुद्धीनें आणि मानवाविषयीं पूर्ण बेपर्वाईनें त्याचें महत्त्व ठरवितो. त्याच्या कृत्याचें निरीक्षण बारकाईनें करा: इस्रायलांच्या इतिहासांत राजसत्तेच्या काळीं जें खरें सुवर्णयुग होतें, तें या यहुदी धर्माधिकाऱ्यांच्या हातांत अवनतीचें दर्शक कलियुग बनलें; आणि त्यानंतरचा त्यांचा देशत्याग व दीर्घकालीन दुर्दैवाचा फेरा हें त्यांच्या मतें त्या सुवर्णयुगाबद्दल अनंतावधीचें **पारिपत्य** ठरलें—त्या युगांत पुरोहितवर्ग निर्माण झाला नसल्याकारणानें वस्तुतः तदभावामुळें च तें सुवर्णयुग होतें. इस्रायलांच्या इतिहासांत जे जे पूर्ण स्वातंत्र्यांत जन्मलेले वीरपुरुष दिसतात, त्या सर्वांना या पुरोहितांनीं आपल्या मतलबाप्रमाणें एक तर नीच धर्मवेडे व भोंदू ठरविलें किंवा " देवविहीन नास्तिक " बनविलें: प्रत्येक महत्त्वाच्या ऐति-

हासिक प्रसंगांतील मनोवृत्तीचा उलगडा त्यांनीं " देवाचे आज्ञाधारक का अवज्ञाकारक " या एका मूर्खपणाच्या सूत्रावर केला.—या पुढील पायरीः " देवाची इच्छा ", म्हणजे पुरोहितवर्गाच्या आत्मसंरक्षणाचें हत्यार, सर्वत्र जाहीर होणें इष्ट वाटलें—अर्थात् त्याकरितां " देवाचा संदेश " अत्यावश्यक ठरला. सरळ भाषेंत बोलावयाचें म्हणजेः एक अति प्रचंड बनावट वाङ्मय निर्माण होणें जरूर झालें, आणि " पवित्र ग्रंथ " उदय पावले,—या ग्रंथांत प्रायश्चित्ताचे व " पापा " च्या दीर्घकालीन स्थितीबद्दल विलापाचे दिवस मुक्रर होऊन ते ग्रंथ धर्माचार्यांना शोभतील अशा मोठ्या थाटामाटांनीं जगजाहीर करण्यांत आले. " देवाची इच्छा " पुष्कळ काळ नेटानें टिकाव धरून आहेः सर्व कांहीं भानगड जे " पवित्र ग्रंथ " झुगारून देण्यांत आले त्यांत आहे.... मोझेस हा एकदां " देवाची इच्छा " प्रकट करून बसला च होता........मग काय झालें? तर या पुरोहितांनीं पांडित्याचें मोठें अवडंबर करून अति कडकपणानें एकदां च सर्वांकरितां धार्मिक आचाराचे विधिनियम घालून दिले—इतके कीं, अगदीं जास्तींत जास्त दक्षिणेपासून तों कमींत कमी दक्षिणेपर्यंत जी त्यांची संभावना करावयाची (—येथें ते अत्यंत रसभरित मांसाच्या पक्वान्नांना विसरले नाहींत हें सांगावयास नको च; कारण हा भिक्षुकवर्ग गोमांसाच्या कबाबांचा परम भक्त होता ) ती हि त्यांनीं त्यांत यथासांग समाविष्ट करून ठेवली. या नियमांत " देवाची इच्छा काय आहे " म्हणजे **पुरोहिताला**

**काय पाहिजे** याचें त्यांनीं स्पष्टीकरण केलें........अतःपर एकंदर व्यवहाराची रचना अशी झाली कीं, पुरोहित हा **सर्व च ठिकाणीं अपरिहार्य** होऊन बसला. आयुष्यांतील एकोन एक नैसर्गिक प्रसंग—जन्म, विवाह, रुग्णशय्या, मृत्यु, —यज्ञसमयाबद्दल तर बोलावयास च नको, आणि यज्ञ म्हणजे " मिष्टान्न ",—या वेळीं हें परोपजीवी पवित्र बांडगुळ कोठून हि उगवावयाचें च; आणि तें कशाकरितां, तर सर्व वस्तुमात्रांना निसर्गच्युत करण्याकरितां, पण त्याच्या भाषेंत सर्वांना पुनीत करण्याकरितां....या ठिकाणीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, प्रत्येक नैसर्गिक आचार, प्रत्येक नैसर्गिक संस्था ( राजसंस्था, न्यायसंस्था, विवाहसंस्था, रुग्णशुश्रूषा, निराश्रितांची काळजी ), जीविताच्या नैसर्गिक भावनेनें उद्भूत झालेली प्रत्येक कामना, किंवा थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे जिला स्वतःची कांहीं किंमत आहे अशी प्रत्येक वस्तु या पुरोहितवर्गाच्या परान्न-पुष्टत्वामुळें पूर्णपणें निरुपयोगी झाली, इतकें च नाहीं तर सर्वस्वी घातुक बनली आहे ( या च परपुष्टत्वाच्या स्थितीला ते " विश्वाची नैतिक रचना " म्हणतात ) : एखादा नैसर्गिक प्रसंग घडला कीं त्याला धर्माची संमति ही पाहिजे च,—प्रत्येक वस्तूचें **नैतिक मूल्य ठरविणारी सत्ता** आवश्यक आहे, परंतु असें मूल्य ठरवितांना ती निसर्गाचा निषेध करिते व या रीतीनें आपल्या एकटीच्या च हातांत तें मूल्य निर्माण करण्याचा अधिकार ठेवते....ही सत्ता म्हणजे पुरोहित मंडळ, —तें निसर्गाची पदोपदीं अप्रतिष्ठा आणि अवहेलना करतें :

कारण ही किंमत दिल्यावांचून त्याला आपलें स्वतःचें अस्तित्व च राखतां यावयाचें नाहीं.—देवाची अवज्ञा म्हणजे पुरोहिताची, ‘ धर्माचारा ’ ची अवज्ञा होय; तें आतां “ पाप ” हें नांव पावलें आहे; “ देवाची कृपा संपादन करण्या ” चे मार्ग आतां अशा स्वरूपाचे झाले आहेत कीं, त्यांत पुरोहिता पुढें मान वांकविल्यावांचून गत्यंतर नाहीं; तें एक धर्माचें मूलभूत तत्त्व बनून राहिलें आहे: धर्मपुरोहित हा च एकटा “ तारण ” करण्यास समर्थ आहे.... मानसशास्त्राच्या दृष्टीनें पाहतां ज्या समाजाची उभारणी धर्मगुरूच्या सत्तेच्या पायावर होते त्या समाजांत “ पापें ” हीं अवष्यमेव लागतात: तीं साक्षात् त्याच्या सत्तेचीं साधनें आहेत, धर्मगुरु पापावर **पोसतो**, लोकांनीं “ पाप ” आचरणें हें त्याच्या हिताचें च असतें.... अंतिम सिद्धांत: “ जो पश्चात्ताप पावतो त्याला देव क्षमा करतो ”—सरळ भाषेंत: जो **धर्मगुरूस शरण जातो त्याला देव क्षमा करतो.**

## २७

ख्रिस्ती धर्म हा अगदीं **असत्य** भूमींतून जन्मास आला; ती भूमि अशी कीं जींत संपूर्ण निसर्ग, प्रत्येक नैसर्गिक अर्थ, आणि प्रत्येक निसर्गजात वस्तुमात्र यांच्या विरुद्ध तेथील सत्ताधारी वर्गाच्या अति खोल भावना प्रखर शत्रुत्व धारण करून होत्या. सृष्टीच्या विरुद्ध पक्कें हाडवैर इतक्या तीव्र स्वरूपांत अन्यत्र कोठें हि दिसून येणार नाहीं. “ पवित्र लोक, ” — ज्यांनीं,

सृष्टींतील यच्चयावत् वस्तुमात्रासंबंधीं केवळ भिक्षुकी वृत्तीचीं धार्मिक नांवें आणि धार्मिक मूल्यें जतन करून ठेविलीं, आणि ज्यांनीं तर्कशास्त्राच्या बुद्धिभेदक अनुमानपद्धतीनें पृथ्वीवरील प्रत्येक सामर्थ्यदर्शक पदार्थाला "अपवित्र", "ऐहिक", "पापयुक्त" अशीं विशेषणें देऊन त्यांपासून आपली फारकत करून घेतली,—ह्या लोकांनीं आपल्या उपजत भावनेच्या प्रीत्यर्थ एक शेवटचें कल्पसूत्र निर्माण केलें, आणि त्या सूत्राची अंमलबजावणी करण्यांत त्यांनीं इतकी तार्किक सुसंगति राखली कीं, त्यांत ते आपल्या स्वत्त्वाला पूर्णपणें गमावून बसले; ख्रिस्तीधर्म, या स्वरूपांत त्यांनीं आपल्या वास्तविक स्थितीचा म्हणजे आपण "पवित्र लोक" आहोंत, आपण "देवाचे लाडके लोक" आहोंत या विशिष्ट **यहुदी** भावनेचा हि शेवटचा अंश दवडिला. हा प्रसंग फार च मनोरंजक आणि विचार करण्यासारखा आहे : नॅझरेथचा येशु या नांवानें जी एक अगदीं सूक्ष्म बंडखोरीची चळवळ ख्रिस्तीपद पावली ती **पुनः एकवार** यहुदी भावनेची च उचल आहे,—निराळ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे ती स्वतः उपाध्येगिरीची च भिक्षुकी भावना आहे, पण यापुढें तिला उपाध्याचें अस्तित्व मात्र नकोसें झालें; पूर्वींच्या जीवनदशेपेक्षां ही एक अधिक च विचित्र आणि काल्पनिक जीवनदशा उद्भव पावली; चर्चनामक धर्मसंस्थेनें जी जीविताची स्वप्नसृष्टि बनविली तिच्यापेक्षां हि अधिक मायामय ही सृष्टि बनली. ख्रिस्ती संप्रदायानें चर्चचा निषेध केला.

ज्या बंडाचा पुरस्कार येशूनें केला अशी समजूत आहे—मग

ती खरी असो वा **खोटी** असो–तें बंड कोणाच्या विरुद्ध उपस्थित करण्यांत आलें होतें, तर यहुदी चर्चच्या असें म्हटल्यावांचून गत्यंतर च नाहीं,–येथें "चर्च" हा शब्द हल्लीं ज्या अर्थानें उपयोजिला जातो त्या च अर्थानें (म्हणजे "प्रस्थापित धर्मसंस्था" या अर्थानें) योजिला आहे. तें बंड "सच्छील आणि न्यायी" यांच्या विरुद्ध होतें; "इस्रायलांचें धर्मप्रदेष्टे" यांच्या विरुद्ध, समाजांतील वर्णव्यवस्थेच्या विरुद्ध–तींतील भ्रष्टतेच्या विरुद्ध नाहीं तर जाति, विशिष्ट हक्क,सुव्यवस्था, आचारमार्ग, यांच्या विरुद्ध तें बंड होतें. "उच्चवर्णांतील लोकां" विषयीं अश्रद्धा, आणि धर्मपुरोहित व देवमीमांसक यांच्या रक्तानें जें जें कांहीं मिश्रित त्या सर्वांच्या विरुद्ध "नकार" त्यामध्यें भरलेला होता. परंतु या बंडानें ज्या वर्णव्यवस्थेचा मोड झाला–मग तो अल्पकाळ कां असेना–तिनें आपल्या बचावाकरितां असा एक बुरूज निर्माण केला कीं त्याच्या आश्रयानें यहुदी लोकांना भोंवतालच्या उसळलेल्या "पाण्याच्या" लाटांमध्यें टिकाव धरून राहण्याचें सामर्थ्य आलें; हा त्या लोकांचा नशिबावर हवाला देऊन जीव बचावण्याचा **शेवटचा** उपाय होता व तो त्यांनीं अतोनात कष्टानें जगापासून झगडून हिसकावून घेतला,–तो उपाय म्हणजे त्यांच्या राजकीय स्वायत्ततेचा **अंतीम पाद** होय: या बुरुजावर हल्ला चढविणें, ही वर्णव्यवस्था ढासळून टाकणें म्हणजे यहुदी लोकांच्या अति गंभीर राष्ट्रीय जीविताच्या दृढमूल भावनेवर घाला घालण्यासारखें होतें,–पृथ्वीतलावर आजपर्यंत दिसून आली नाहीं इतक्या चिकाटीची ही राष्ट्रीय जीवितेच्छा होती.

हा साधु अराजक, ज्यानें नीचांतील नीच लोकांना, व्रात्य आणि "पतित" लोकांना, यहुद्यांतील चांडाळांना प्रस्थापित समाजघटनेच्या विरुद्ध बंड करण्यास चिथावलें (आणि तें अशा भाषेंत कीं, जर शुभवर्तमानाचे चरित्रलेख विश्वसनीय मानले तर ती भाषा बोलणारास आजमितीस हि सैबेरियांत काळ्या पाण्यावर पाठविलें जाईल)—हा मनुष्य यहुदी समाजासारख्या अगदीं वेडगळपणाच्या सीमेला गेलेल्या राजकारणशून्य लोकांत हि जितका राजकीय गुन्हेगार घडणें शक्य होतें तितका राजकीय गुन्हेगार झाला. त्यायोगें त्याला क्रूसावर चढविणें भाग पडलें: याबद्दलचा पुरावा तेथें च क्रूसावर लिहिलेलें वाक्य होय. तो **स्वतःच्या** पापाकरितां मेला—आणि याविरुद्ध किती हि कोणीं प्रतिपादन केलें तरी असें एक हि प्रमाण दाखवितां येणार नाहीं कीं तो इतरांच्या पापाकरितां मेला.

## २८

आतां हा विरोध येशूला स्वतःला खरोखर माहीत होता का त्याला तो माहीत होता असें **मानण्याचें** ठरलें, हा प्रश्न अलाहिदा आहे. आणि या ठिकाणीं च फक्त मी त्या तारक प्रभूच्या मनोरचनेचा बिकट प्रश्न विचारांत घेत आहें.—मी येथें एकदां च उघड सांगून टाकतों कीं, शुभवर्तमानाचीं चोपडीं वाचण्यांत मला जितकी अडचण पडते तितकी दुसऱ्या कोणत्या हि पुस्तकाच्या वाचनांत पडत नाहीं. जर्मनींतील विद्वान लोकांच्या बौद्धिक कुतूहलाला मूळ ज्या अडचणी भासमान

झाल्या आणि ज्यांवर पुढें त्यांनीं विजय मिळविल्याचें चिन्ह म्हणून एक अति मोठा संस्मरणीय उत्सव साजरा केला, त्या अडचणींहून माझ्या अडचणी फार च निराळ्या स्वरूपाच्या आहेत. पुष्कळ वर्षें होऊन गेलीं, ज्या वेळीं मी, प्रत्येक तरुण विद्यार्थ्याप्रमाणें, सुसंस्कृत भाषाशास्त्रज्ञाच्या ज्ञानयुक्त विवेकबुद्धीस अनुसरून स्ट्रौस्स नामक अनुपमेय पंडिताच्या ग्रंथांचा मोठ्या हौसेनें अभ्यास केला. त्या वेळीं मी विसि वर्षांच्या वयाचा होतों; आतां मी असल्या क्षुल्लक गोष्टींत रममाण होण्यास फार च प्रगल्भ झालों आहे. आतां मी या "परंपरा" गत परस्परविरोधात्मक स्थळांबद्दल थोडी च गय करणार आहे?-अगोदर भक्तजनांनीं उपस्थित केलेल्या दंत-कथांना "परंपरा" ही संज्ञा च लावतां येईल किंवा नाहीं याची शंका आहे. साधूंच्या भाकड कथा—संतलीलामृत—हें पृथ्वीवरील अखिल वाङ्मयामध्यें अत्कंत भ्रामक वाङ्मय आहे: माझ्या मतें त्याला शास्त्रीय टीकेचे नियम लावणें हें **इतर दुसरी ऐतिहासिक लिखाणें उपलब्ध नसतां** मूळपासून च घातक होणार आहे—ती केवळ शुष्क घटपटादि खटपट होईल इतकें च.

## २९

माझ्या विवेचनाचा मुख्य मुद्दा मानसशास्त्रदृष्ट्या येशूचा नमुना पाहणें. हा नमुना शुभवृत्तांमध्यें सांपडण्यासारखा आहे, मग त्यांची रचना कशी हि झालेली असो व त्यांत तो किती हि विद्रूप केलेला किंवा आगंतुक आवरणांनीं वेष्टिलेला असो:

ज्याप्रमाणें ॲसिसीच्या फ्रॅन्सिसबद्दल ज्या दंतकथा आहेत त्या कशा हि बनलेल्या असल्या आणि त्यांत त्याचें रूप किती हि विकृत झालेलें असलें तरी तो नमुना तेथें च दृष्टीस पडतो. ख्रिस्तानें काय केलें, तो काय बोलला, त्याला वास्तविक मरण कसें प्राप्त झालें, याविषयीं ऐतिहासिक सत्य काय आहे हा प्रश्न येथें महत्त्वाचा नाहीं, तर त्याच्या यथार्थ स्वरूपाचें मानसिक चित्र काढून आज तें आपल्यापुढें ठेवतां येईल काय आणि त्याचा नमुना खरोखरी परंपरागत पद्धतीनें आपल्यापुढें आला आहे काय, हे प्रश्न मुख्य महत्त्वाचे आहेत. माझ्या माहितीप्रमाणें शुभवर्तमानांतून आजपर्यंत एका विशिष्ट “आत्म्या” चा मानसिक इतिहास रेखाटण्याचे जे कांहीं प्रयत्न झाले आहेत ते सर्व माझ्या मतें मनोविज्ञानशास्त्राच्या प्रांतांतील केवळ अश्लाघ्य बालिशतेचे दर्शक आहेत. रेनाँ,—मानसशास्त्रांतील बडा विदुषक—यानें येशूच्या स्वरूपांतील रहस्य उकलून दाखविण्यांत दोन मोठ्या अगडबंब आणि विक्षिप्त कल्पना पुढें आणल्या आहेत: एक कल्पना, विप्रत्वाची ( विप्र=प्रतिभाशाली ज्ञानी महात्मा ) आणि दुसरी कल्पना, वीरत्वाची ( वीर=विजयशाली अलौकिक योद्धा ). परंतु शुभवर्तमानासारख्या पवित्र ग्रंथांत बिलकुल न शोभण्यासारखी जर कोणती कल्पना असेल तर ती वीरत्वाची होय. येथें सर्व प्रकारच्या कलहबुद्धीच्या, युद्धांत सामिल होण्याच्या यच्चयावत् भावनांच्या विरुद्ध उपजत वृत्ति अगदीं ठाम बनून गेल्या आहेत: येथें प्रतिकार करण्याच्या सामर्थ्याचा अभाव हें नीतीचें

प्रधान अंग होऊन बसलें आहे ( " वाइटाचा प्रतिकार करूं नको ",–संपूर्ण शुभवर्तमानांत हें वाक्य अर्थपूर्ण असून एका दृष्टीनें ती त्यांची गुरुकिल्ली आहे ), व शांतीचा, सौजन्याचा आणि शत्रु होण्याची **शक्ति नसणें** या गुणाचा परमानंद हें त्या नीतींतील सार आहे. " आनंदाचें वर्तमान " याचा अर्थ काय आहे? सत्य जीवित, शाश्वत जीवित सांपडलें आहे–तें येणार आहे असें केवळ आश्वासन नाहीं, तर तें साक्षात् येथें आहे, तें **तुमच्या** च ठिकाणीं आहे; तें जीवित म्हणजे प्रेमपूर्ण जीवित –सर्व प्रकारच्या आवडानिवड आणि वर्ज्यावर्ज्य द्वंद्वांपासून अलिप्त, सर्व प्रकारच्या दूरतेच्या भावनेपासून अलिप्त असें जें शुद्ध प्रेम त्या प्रेमांतील जीवित होय. प्रत्येकजण देवाचें लेंकरूं आहे–येशू हा आपल्या स्वतःच्या एकट्याकारितां कोणत्या हि प्रकारें कांहीं एक मागत नाहीं,– देवाचें लेंकरूं या नात्यानें प्रत्येकजण दुसऱ्या प्रत्येकजणाच्या बरोबरीचा आहे....अशा येशूला क्षात्रवृत्तीचा **वीर** बनविणें हा काय चमत्कार! बरें, त्याला ज्ञानात्मा या अर्थानें जर ब्राह्मवृत्तीचा **विप्र** ठरविला, तर त्या शब्दांत हि कल्पनेचा केवढा विलक्षण घोटाळा होणार आहे! आत्मा या वस्तूबद्दल आमची सर्व कल्पना, ही आधुनिक सुधारलेल्या युगांतील कल्पना, ज्या जगांत येशू नांदत होता त्या जगांत सर्वथैव अयथार्थ झाली असती. शरीरशास्त्रज्ञाच्या शुद्ध परिभाषेप्रमाणें वरील शब्दाहून अगदीं भिन्न शब्दाचा येथें उपयोग करणें युक्त ठरलें असतें....आपणांला एक त्वगिंद्रियाची सहज-

क्षोभनक्षम रुग्णावस्था ज्ञात आहे; या अवस्थेंत तें इंद्रिय प्रत्येक वस्तूच्या स्पर्शापासून कंपित होऊन मागें सरतें आणि एखाद्या जड पदार्थास हात लावण्यास कचरतें. अशा प्रकारची शरीरेंद्रियाची अति कोमल प्रवृत्ति जर तार्किक अनुमानाच्या अंतिम कोटीला पोंचविली तर तिचें पर्यवसान सर्व सृष्ट पदार्थांच्या उपजत द्वेषांत होतें, इतकें च नाहीं तर तिला पुढें " अस्पर्शनीय " आणि " अनधिगम्य " अशा निराळ्या च सृष्टींत विहार करण्याचें सामर्थ्य येतें; त्याचा च पुढें परिणाम,—सर्व विधिनियमांसंबंधीं द्रोह, सर्व दिक्कालान्वित भावनांशीं विरोध, आणि जें जें कांहीं सुसंघटित आहे—जसें आचार, संस्था, चर्च—या सर्वांशीं दारुण द्वेष; ज्या ठिकाणीं वस्तुस्थितीचा कांहीं एक मागमूस नाहीं अशा सृष्टींत रममाण होणें,—शुद्ध 'अन्तर्निष्ठ' सृष्टि, 'सत्य' सृष्टि, 'शाश्वत' सृष्टि...." देवाचें राज्य तुमच्या हृदयांत आहे "....

## ३०

**वस्तुस्थितीविषयीं उपजत द्वेष,** हा दुःख आणि क्षोभ यांच्या आत्यंतिक संवेदनशीलतेचा परिणाम आहे; या स्थितींत शरीराला कोठें हि " स्पर्श " केलेला सहन होत नाहीं, कारण प्रत्येक संवेदन इंद्रियावर फार खोल आघात करतें.

**सर्व प्रकारचा विरोध, शत्रुत्व, आणि वासनांतील मर्यादा व दूरत्व यांविषयीं उपजत त्यागबुद्धि,** हा हि दुःख आणि क्षोभ यांच्या आत्यंतिक संवेदनशीलतेचा

च परिणाम आहे; या स्थितींत सर्व प्रतिकार, विशेषतः सर्व सक्तीचा प्रतिकार असह्य, कष्टदायक वाटतो—म्हणजे तो आत्मसंरक्षणाच्या स्वाभाविक भावनेनें निवारित होत्साता अपायकारक ठरतो; पुनः या स्थितींत जेव्हां कोणा हि व्यक्तीचा—मग ती दुष्ट वा घातकी कशी हि असो—प्रतिकार करण्याचा प्रसंग प्राप्त होण्याचा संभव उरत नाहीं तेव्हां ती च परम सुखाची किंवा महदानंदाची अवस्था सिद्ध होते,—प्रेम ही च जीविताच्या शक्यतेची अंतिम कोटी आहे.

ह्या दोन **इंद्रियविज्ञानशास्त्रान्वयें वस्तुस्थितिदर्शक अवस्था** आहेत. त्यांच्या वर आणि त्यांच्या पासून ख्रिस्ती-धर्मांतलि मोक्षाचा मतवाद वृद्धि पावला आहे. माझ्या मतें हें अवस्थाद्वय रोगानें परिपूरित भूमीवर सुखवादाच्या वृक्षाचा भव्य पसारा आहे. प्राचीन एपिक्यूरीय सुखवाद-जुन्या पेगन (अख्रिस्ती) मुक्तीचा मार्ग—या सुखवादांत जरी ग्रीक जिवटपणाचा व मज्जाशक्तीचा बराच मोठा भाग असला तरी तो वरील ख्रिस्ती सुखवादाशीं किती तंतोतंत मिळतो हें पाहण्यासारखें आहे. एपिक्यूरस हा **नमुनेदार** जीर्णजरठ होता: आणि तो तसा असलेला माझ्या च प्रथम लक्षांत आला.—दुःखाविषयीं अमर्याद भय, अगदीं अत्यल्प दुःखाविषयीं सुद्धां—या स्थितींचें पर्यवसान प्रेमाच्या **धर्मांत** झाल्यावांचून कदापि राहणार नाहीं हें निश्चित समजावें....

## ३१

या प्रश्नाचें उत्तर पर्यायानें मीं आधीं च देऊन टाकलें

आहे. त्या उत्तराचा पूर्वावश्यक भाग हा होता कीं, येशूचा जो नमुना आपणापर्यंत येऊन पोंचला आहे तो केवळ त्याच्या अत्यंत विकृत स्वरूपांत आहे ही गोष्ट सरळ रीतीनें कबूल करणें. ही स्वरूपविकृति तेवढ्या च पुरता विचार करून पाहतां पूर्णपणें संभाव्य आहे: अनेक कारणांमुळें अशा तऱ्हेचा नमुना शुद्ध, समग्र, आणि मिश्रणरहित स्थितींत राहूं च शकत नाहीं. ज्या परिस्थितींत ही विचित्र मूर्ति हालचाल करीत होती त्या परिस्थितीचा पगडा तिच्यावर बसला च असला पाहिजे, आणि शिवाय पहिल्या ख्रिस्तानुयायी मंडळाच्या इतिहासाचा आणि **भवितव्याचा** पगडा तर त्याहून हि अधिक बसला असण्याचा संभव आहे. या भवितव्याच्या योगें त्या मूळच्या नमुन्यांत मागाहून अशा कांहीं गतकालसापेक्ष अंगांची मोहक रीतीनें भर घालण्यांत आली कीं, त्या अंगांची उपपत्ति स्वधर्माचा प्रसार आणि परधर्मांशीं युद्ध या उद्देशांवांचून लागूं च शकत नाहीं. ज्या एका विचित्र आणि रोगट जगांत शुभवर्तमान आपणांस नेऊन प्रविष्ट करतें—तें जग कसें, तर जणुं एखाद्या रशियन कादंबरींतून उद्धृत केलेलें, आणि समाजांतील सर्व खळमळ, मज्जातंतूंचे रोग, आणि **बालिश** वेडसरपणा या सर्वांचा एकत्र संयोग होऊन बनलेलें,— अशा जगाचा त्या नमुन्यावर कांहीं म्हटलें तरी ग्राम्य आणि राकट संस्कार झाला च असला पाहिजे: विशेषत: त्या पहिल्या अनुयायांनीं आपल्या स्वत:च्या अप्रबुद्ध विचारांत आणखी कांहीं वेडगळ चिन्हें आणि मनोमय कल्पना

यांची भर घालून आपणांस त्याचा ज्या रीतीनें बोध होईल त्या रीतीनें केवळ तें रूप सजविलें असलें पाहिजे, — कारण त्यांच्या ओळखीच्या साच्यांत तो मूळचा नमुना ओतल्यावांचून त्यांना त्याचें अस्तित्व पटणें च शक्य नव्हतें. धर्मप्रवक्ता, अभिषिक्त राजा, भावी न्यायाधीश, नीतीचा उपदेष्टा, अघटित चमत्कार करणारा, बाप्टिस्ट जॉन वगैरे सर्व गोष्टी म्हणजे त्या मूळ नमुन्यासंबंधीं शुद्ध गैरसमज उत्पन्न करण्याच्या कामीं उपस्थित झालेल्या इतक्या अनेक बाबी आहेत......... शेवटीं सर्वांत मोठी जी सांप्रदायिक भक्तीची भावना तिच्या **विशिष्ट धर्माचें** हि महत्व कमी करून चालावयाचें नाहीं : ही भावना पुष्कळ वेळां आपल्या भज्य वस्तूपासून आपणांला परिचित नसणारे आणि दुःसह वाटणारे सर्व स्वभावगुण आणि प्रकृतिधर्म धुऊन टाकण्याचा प्रयत्न करते–पुष्कळ वेळां ते तिच्या नजरेस हि येत नाहींत. ह्या अति मनोरंजक अवनतीच्या नमुनेदार मूर्तीजवळ आसपास कोणी एखादा डोस्टोईएफ्स्की रहात नव्हता हें मोठें दुर्भाग्य आहे,–माझा मतलब हा कीं उदात्तपणा, बालिशवृत्ति आणि रुग्णावस्था ह्या तिहींच्या संमिश्रणांत सिद्ध होणाऱ्या मर्मभेदक सौंदर्याचा रसास्वाद घेऊन तें योग्य शब्दांत कसें रेखाटावें हें जाणणारा कोणी तरी कादंबरीकार अवश्य पाहिजे होता. हीनावस्थेचें एक उत्तम उदाहरण या दृष्टीनें हा नमुना खरोखरी मुळांत च विविधरूपांनीं युक्त आणि परस्परविरोधी गुणांनीं मंडित असा अद्वितीय असणें शक्य आहे; अर्थात् शक्यतेच्या इतर कोटींप्रमाणें

च या हि कोटीचा सर्वस्वी त्याग करून चालणार नाही. तथापि प्रचलित सर्व पुरावा सदर कोटीच्या विरुद्ध दिसून येणार आहे. वास्तविकरीत्या या च बाबतींत परंपरागत हकीकत निश्चयेंकरून सत्याला आणि वस्तुस्थितीला धरून उतरली असती. परंतु ती तशा तऱ्हेची नाहीं तर उलट आहे असें मानण्यास जागा आहे. तसें च डोंगर, तलाव, आणि खेडींपाडीं यांत फिरणारा उपदेशक हा जरी आपणांस वरवर बुद्धासारखा दिसला तरी ज्या क्षेत्रांत त्यानें आपलें धर्मकार्य केलें त्याचें भारतवर्षाशीं फार च थोडें साम्य आहे; आणि त्याच्या मूळ अस्सल स्वरूपांत, व देवशास्त्री आणि धर्मपुरोहित यांशीं हाडवैर करणारा, कज्जेदलाल, माथेफिरू — ज्याला रेनाँ च्या कुत्सितबुद्धीनें " व्याजोक्तीचा असामान्य प्रभु " अशी पदवी देऊन भूषित केलें आहे—अशा त्याच्या नकली स्वरूपांत जमीनअस्मानाचें अंतर आहे. मला तर निःसंशय वाटतें कीं येथें जो विषाचा ( आणि तेजाचा हि ) प्रत्यय येतो त्यांतील बराच मोठा अंश केवळ ख्रिस्तानुयायांच्या धर्मप्रसाराच्या चळवळींतील प्रक्षुब्ध स्थितीच्या परिणामरूपानें त्या नमुनेदार तारकप्रभूच्या रक्तांत टोंचून मिसळून टाकण्यांत आलेला आहे. कारण आपणांस पुष्कळ अनुभवांतीं हें कळून चुकलें आहे कीं जे जे कोणी मताभिमानी सांप्रदायिक असतात ते सर्व आपल्या भक्तीच्या आधारार्थ आपल्या गुरुदेवाच्या चरित्रांत पाहिजे ती उलटापालट करण्यास किंचित् हि दिक्कत बाळगीत नाहींत. जेव्हां ख्रिस्ताच्या पाहिल्या अनुयायी कंपूला

इतर धर्मांतील शास्त्रीपंडितांच्या विरुद्ध वाद करण्याचा प्रसंग आला, आणि जेव्हां त्याला आपल्या बाजूनें कोणी तरी एखादा महाचिकित्सक, विवादकुशल, वितंडवादी, भांडकुदळ, कुत्सिताग्रणी, अहंमन्य, आणि केस पिंजून कीस काढण्यांत हातखंडा असा धर्मशास्त्री मीमांसक असावा अशी आवश्यकता भासली, तेव्हां त्यानें आपल्या गरजेप्रमाणें आपला "देव" निर्माण केला, आणि त्याच्या तोंडांत " देवाचा द्वितीय अवतार ", " देवाचें अंतिम न्यायासन " इत्यादि शुभवर्तमानांत बिलकुल न शोभण्यासारख्या पण त्या परिस्थितींत अपरिहार्य असलेल्या एकेक विचित्र कल्पना घालून त्या काळच्या सर्व प्रचलित आकांक्षा आणि ध्येयें त्याच्या मुखानें वदविण्यांत त्यानें मागेंपुढें पाहिलें नाहीं.

## ३२

मी पुनश्च हें च सांगतों: कीं, तारक प्रभूच्या नमुन्यांत धर्मवेडेपणाचें अंग घुसडण्याच्या कामीं मी अगदीं विरुद्ध आहे: " कदरखोर " हा शब्द जो रेनाननें योजला आहे त्या योगें तर त्या नमुन्याचा पूर्ण विध्वंस होतो. " आनंदाचें वर्तमान " —याचा अर्थ इतका च कीं अतःतर कोणत्या हि विरोधाला जागा नाहीं, स्वर्गांतील राज्य अर्भकांकरितां आहे; या ठिकाणीं ज्या श्रद्धेची वाणी उंच दुमदुमते ती श्रद्धा कलह करून यशस्वी झालेली नाहीं,—तर ती समीपवर्ती आहे, ती मूळपासून च तशी आहे, ती आत्म्याची अर्भकभावाकडे पुनरागमनप्रवृत्ति

आहे. जीवशरीरामध्यें यौवनाच्या उद्गमाला विलंब लागणें आणि त्याची वाढ खुंटणें ही स्थिति त्या शरीराच्या अवनतावस्थेच्या परिणामरूपाची निदर्शक आहे आणि ती शरीशास्त्रज्ञाला तरी पूर्णपणें अवगत आहे. अशा स्वरूपाची श्रद्धा कोपाचें आविष्करण करीत नाहीं, कोणाचा दोष काढीत नाहीं, स्वतःचें संरक्षण हि करीत नाहीं: ती जगांत "समशेर" आणीत नाहीं,-तिला कल्पना हि नसते कीं आपल्यामुळें एके दिवशीं मानवामानवांत कलह पेटून राहणार आहे. ती चमत्कार दाखवून, किंवा बाक्षिसें आणि वचनें देऊन, अथवा " पवित्र ग्रंथ " निर्माण करून आपलें प्रदर्शन करीत नाहीं : प्रत्येक क्षणीं ती स्वतः आपला आपण च चमत्कार आहे, आपलें आपण प्रतिफल आहे, आपलें आपण प्रमाण आहे, आपलें आपण " देवाचें राज्य " आहे. ही श्रद्धा सूत्रनिबद्ध होऊं शकत नाहीं – ती जिवट असते, ती सूत्रांत बद्ध होण्याच्या विरुद्ध धडपड करते. परिस्थिति, भाषा, आणि पूर्व शिक्षण यांचा योग खात्रीनें एका विशिष्ट प्रकारच्या कल्पनांची परिणालिका निश्चित करतो : आद्य ख्रिस्ती संप्रदाय हा केवळ याहुदीय सेमेटिक कल्पनांत च व्यवहार करतांना दिसतो (-" शेवटच्या भोजनां " तील खाण्यापिण्याची कल्पना त्यांपैकीं च एक आहे,-या कल्पनेचा इतर सर्व यहुदी कल्पनांप्रमाणें च ख्रिस्ती " चर्च " नें पुढील काळांत अत्यंत खुनशीपणानें दुरुपयोग केला ). परंतु ह्या सर्व व्यवहारांत सांकेतिक चिन्हांची भाषा,

सेमेटिक पद्धतीनें अर्थ लावण्याचे प्रकार, दाखले देऊन कथा सजविण्याचे प्रसंग यांपेक्षां जास्त कांहीं नाहीं असें मानणें युक्त होणार नाहीं. कोणत्या हि शब्दाचा अक्षरशः अर्थ करावयाचा नाहीं ह्या एका च अटीवर सद्दहू सृष्टिविरोधकाला भाषण करतां येत असे. तो जर आर्यावर्तांत असता तर त्यानें सांख्यदर्शनांतील कल्पनांचा उपयोग केला असता, व चीन देशांत असता तर लाओत्सेच्या कल्पनांचा उपयोग केला असता—आणि त्याला दोहोंत कोणता हि भेद दिसून आला नसता. परिभाषेंत थोडा शिथिलपणा आणून येशूला "सर्वतंत्रस्वतंत्र आत्मा" म्हणतां येईल.—तो कोणत्या हि प्रस्थापित संस्थेबद्दल काडीची पर्वा करीत नाहीं: शब्द **मृत्युकारक** आहे, जी जी गोष्ट स्थिरता पावते ती ती **मृत्युकारक** आहे. तो एकटा च ज्या प्रकारचें जीवित जाणत होता तें "जीवित", तो **अनुभव**, ती कल्पना हीं सर्व त्याच्या मतानें प्रत्येक प्रकारचें आप्तवाक्य, विध्युक्त नियम, प्रस्थापित कायदा, नीतीचें अनुशासन, धर्माचा आदेश यांच्या विरुद्ध आहेत. तो फक्त अन्तर्निष्ठ वस्तूंसंबंधीं बोलतो : " जीवित ", किंवा " सत्य ", किंवा " प्रकाश " हे शब्द तो केवळ अन्तर्निष्ठ वस्तूंबद्दल योजतो-बाकीचें हें सर्व बाहेरचें वस्तुजात, ही सर्व निसर्गाची घटना, शब्दसृष्टि सुद्धां, यांना त्याच्या जवळ केवळ लक्षणात्मक किंवा दृष्टांतात्मक किंमत आहे इतकें च. —या मुद्यासंबंधीं बिलकुल चूक होऊं न देणें हें अति महत्वाचें आहे, मग खिस्ती धर्माच्या सांप्रदायिक पूर्वग्रहाचे ठिकाणीं वसत अस-

लेला तत्संबंधीं मोह किती जरी मोठा असला तरी हरकत नाहीं. यासारखी कोणती हि सारगर्भित चिन्हांकित पद्धत ही सर्व धर्मपंथ, सर्व सांप्रदायिक कल्पना, सर्व इतिहास, सर्व भौतिक शास्त्र, सर्व जगाचा अनुभव, सर्व ज्ञानविज्ञान, सर्व राजशासन, सर्व मानसशास्त्र, सर्व ग्रंथसंग्रह, आणि सर्व कलासमूह यांच्या कक्षेच्या पार असते — कारण ह्या तारकप्रभूचें " ज्ञान " म्हणजे एतत्सदृश सर्व वस्तूंच्या अस्तित्वाविषयीं पूर्ण अज्ञान होय. त्यानें 'संस्कृति' हा शब्द च ऐकला नाहीं, त्याला तिच्याशीं विरोध करण्याचें प्रयोजन नाहीं, — तो तिचा निषेध हि करीत नाहीं.......... हा च नियम राजसत्ता, सर्व जानपदीय आणि सामाजिक घटना, कामधंदा आणि युद्धप्रसंग या सर्वांना लागू आहे — त्याला जगताचा निषेध करण्याचें केव्हां हि कसलें च कारण पडलें नाहीं. त्याला " जगत् " नामक धर्म-पुरोहितांच्या सांप्रदायिक कल्पनेचा लवमात्र गंध नव्हता........ निषेध करणें हें तत्त्वतः च त्याला सर्वतोपरी अशक्य होतें.— तार्किक विवादाचा तेथें पूर्ण अभाव होता, आणि त्या च प्रमाणें एखादी श्रद्धा किंवा एखादें " सत्य " हें न्यायाच्या अनुमान-पद्धतीनें सिद्ध करतां येतें या हि कल्पनेपासून तो अलिप्त होता (— त्याचीं प्रमाणप्रमेयें म्हणजे " अन्तर्ज्ञान ", सुखाची आणि आत्मप्रत्ययाची अन्तर्भूत भावना, स्वतःचें बल अजमावण्याचे हे त्याचे मार्ग होत —). अशा प्रकारच्या मतवादाला दुसऱ्याचें खंडण करणें हें कधीं च शक्य नाहीं; कारण दुसरीं मतें आहेत किंवा असूं शकतात ही गोष्ट त्याला

प्रतीत च होत नाहीं; विरुद्ध मतांची कल्पना करणें सर्वस्वी त्याच्या शक्तीच्या बाहेर आहे..........जेव्हां जेव्हां त्याची अशा प्रकारच्या विरोधक मतांशीं गांठ पडते तेव्हां तेव्हां तो अति गंभीर सहानुभूतीच्या तटस्थ वृत्तीनें त्यांच्या " अंधपणा "-बद्दल अनुकंपा दर्शवितो,— कारण " प्रकाश " हा एक त्याला च दिसत असतो,— पण तो त्यांच्या विरुद्ध कसले च आक्षेप घेत नाहीं.

## ३३

" शुभवर्तमानां " तील संपूर्ण मनोविज्ञानांत गुन्हा आणि शिक्षा या कल्पनांचा मागमूस नाहीं, आणि त्या च प्रमाणें पारितोषिकाच्या कल्पनेचा हि नाहीं. " पाप ", देव आणि मानव यांतील कोणत्या हि प्रकारचा द्वैधीभाव हा येथें नाहींसा झालेला आहे,— **" आनंदाचें वर्तमान " म्हणून जें म्हणतात तें हें इतकें च होय.** शाश्वत आनंदप्राप्तीचें आश्वासन देण्यांत आलें नाहीं, किंवा तत्संबंधीं कांहीं विशिष्ट करार हि करण्यांत आले नाहींत, मात्र ती च फक्त एकमेव सत्यवस्तु आहे — बाकी यच्चयावत् वस्तुमात्र केवळ त्या-संबंधीं लाक्षणिक चिन्हें आहेत इतकें च..........

या असल्या स्थितीचे सर्व परिणाम एकवटून त्यापासून जी एक नवीन जीवनपद्धति तयार झाली ती च साक्षात् शुभ-वर्तमानानुयायी पंथाची पद्धति होय. ख्रिस्ती सांप्रदायिकांचें विशिष्टत्व त्यांच्या " श्रद्धे " च्या भावनेंत नाहीं: ख्रिस्ती

आचार,—तो कांहीं एका **निराळ्या** पद्धतीच्या आचरणानें आपलें वैशिष्ट्य दाखवितो. तो आपल्या शत्रूचा प्रतिकार शब्दानें वा मनानें हि करीत नाहीं. तो स्वदेशीय व परदेशीय, ज्यू व जंटाइल असे भेद करीत नाहीं ("शेजारी" शब्दाचा खरा अर्थ स्वधर्मांतील मनुष्य, यहुदी मनुष्य असा आहे). तो कोणावर रोष धरीत नाहीं, तो कोणाचा तिरस्कार करीत नाहीं. तो राजाच्या न्यायसभेची पायरी चढत नाहीं; किंवा तो त्याचे कायदेकानू हि मानीत नाहीं ("शपथविधि करूं नको"). तो कोणत्या हि कारणास्तव आपल्या विवाहित स्त्रीशीं घटस्फोट करीत नाहीं, मग जरी तिचा व्यभिचार सिद्ध झालेला असला तरी हरकत नाहीं.—या सर्वांच्या मुळाशीं एक च तत्त्व आहे, हें सर्व एका च भावनेचें फल आहे.—

तारक प्रभूचें संपूर्ण जीवन ह्या असल्या आचरणमार्गावांचून दुसरें कांहीं नाहीं,—त्याचा मृत्यु हि या वांचून निराळा नाहीं. त्याला कोणत्या हि सूत्रबद्ध धर्माचाराची जरूर भासली नाहीं, किंवा देवाशीं आपला संबंध ठेवण्यास एखाद्या विधिनियमाची गरज वाटली नाहीं—फार काय पण त्याला प्रार्थनेची हि किंमत उरली नाहीं. त्यानें सर्व पश्चात्ताप आणि प्रायश्चित यां संबंधीं यहुदी आचारविचार पार झुगारून दिले. तो एकटा च अशा प्रकारची जीवनपद्धति जाणत होता कीं त्यायोगें मनुष्याला वाटावें आपण "दैवी" आहेंत, "मुक्त" आहेंत, "शुभवार्ताहारी" आहेंत, आणि शाश्वत "देवपुत्र" आहेंत. "पश्चात्ताप" हा कांहीं देवाकडे जाणारा

मार्ग नाहीं, व " प्रार्थना आणि क्षमा " हा हि नाहीं: **केवळ शुभवार्ताप्रथित जीवनपद्धति** हा च एक देव-मार्ग आहे, हा च " देव " **आहे.**—शुभवर्तमानानें जें काय रद्द केलें तें " पाप ", " पापाबद्दल क्षमा ", " श्रद्धा ", " श्रद्धेच्या द्वारें मोक्ष " या कल्पनांतील यहुदीपणा हें होय, —यहुदी धर्मसंस्थेंतील संपूर्ण मतवादाचा " आनंदाच्या वर्तमानांत " निषेध घडून आला.

आपण " स्वर्गात " आहों, आपण " शाश्वत " आहों, अशी भावना आपल्या ठिकाणीं उत्पन्न होण्याकरितां आपण जविनाचा कोणता मार्ग आंखावा या बद्दल मनाची गंभिर प्रवृत्ति, विषेशत: जेव्हां इतर प्रत्येक बाबतींत आपणांस वाटत असतें कीं आपण " स्वर्गात " नाहीं: हें च एक खिस्ती " मोक्षाचें " मानसशास्त्रदृष्ट्या सत्य स्वरूप आहे.—नविन जविनमार्ग, नवीन धर्ममार्ग नव्हे.........

## ३४

ह्या अति मोठ्या संकेतसंज्ञावादी पुरुषाबद्दल मला जर कांहीं ज्ञान असेल तर तें हें च कीं त्यानें शुद्ध **अन्तर्निष्ठ** भावनांना बाह्यवस्तूंचें रूप दिलें, त्यांना च फक्त " सत्य " कोटींत समाविष्ट केलें,—बाकी सर्व जें जें कांहीं नैसार्गिक, प्रापंचिक, भौतिक, आणि ऐतिहासिक त्यांना त्यानें लैंगिक चिन्हांच्या सदरांत ढकलून दृष्टांतांतील उपमानस्थानीं बसविलें. " देवाचा मुलगा " ही कल्पना म्हणजे कोणी एखादा इति-

हासांतील साक्षात् व्यक्तिभावसंपन्न पुरुष एखाद्या विशिष्ट स्थळीं व काळीं होऊन गेलेला अशा प्रकारची बिलकुल नाहीं तर सर्वथैव—

" दिक्कालाद्यनवच्छिन्नानन्तचिन्मात्रमूर्तये ।
स्वानुभूत्येकसाराय नमः शांताय तेजसे ॥ "—

या भर्तृहरीच्या वैराग्यशतकाच्या मूळारंभींच्या नमनात्मक श्लोकांत निर्दिष्ट केल्याप्रमाणें—दिक्कालानें अनवच्छिन्न, स्वानुभूत्येकसार, आणि अनन्त अशी चिन्मात्रमूर्ति आहे. पुनः ह्या नमुनेदार लक्षणालिंगवाद्याचा " देव ", " देवाचें पुत्रवत्त्व " यां संबंधीं ही च उपपात्ति लागू पडते, आणि ती पूर्णत्वानें लागू पडते. देवाचें व्यक्तिरूप, देवाचें पुढें येणारें राज्य, इहलोकापलीकडील " स्वर्गांतील राज्य ", त्रिमूर्तींतील द्वितीय स्थानीं असणारा " देवाचा पुत्र " ह्या अप्रबुद्ध खिस्ती कल्पनांपेक्षां दुसरें कांहीं अधिक अखिस्ती जगतांत नाहीं. हें सर्व वर्तुलाकार छिद्रांत चौकोनी खुंटी बसविण्याप्रमाणें हास्यास्पद आहे—या शब्दप्रयोगाबद्दल मला वाचक क्षमा करतील—आणि पहा! हें छिद्र तरी काय चमत्कारिक!—शुभवर्तमानांचें छिद्रः लाक्षणिक चिन्हांबद्दल तिरस्काराच्या बाबतींत **जगाच्या इतिहासांत प्रसिद्ध** अशी तुसडेपणाची द्वेषवृत्ति या ग्रंथांत भरली आहे........तथापि " पिता " आणि " पुत्र " या शब्दांचा लाक्षणिक अर्थ काय हें अगदीं स्पष्ट आहे—परंतु तो सर्वांना च सारखा स्पष्ट नाहीं हें मला कबूल करणें भाग आहे: " पुत्र " या शब्दानें सर्व वस्तूंच्या सामान्य परिवर्तनाच्या भावनेंत

प्रवेश ( निःश्रेयससिद्धीचा आनंद ) हा अर्थ ध्वनित होतो; " पिता " या शब्दानें **ही प्रत्यक्ष भावना**, नित्यत्वाची आणि पूर्णत्वाची भावना, यांचा उल्लेख होतो. ख्रिस्ती चर्चनें ह्या लाक्षणिक शब्दांशीं काय काय खेळ केले आहेत ते तुम्हांस सांगण्यास मला शरम वाटते : ख्रिस्ती " सांप्रदाया " च्या अगदीं मूळारंभींच्या श्रीगणेशांत ह्या चर्चनें अँफिट्रिऑनची[१] कथा गोंविली नाहीं कां, आणि त्याबरोबर च मैथुन-पापविरहित अपौरुषेय गर्भाधानाचें मत हि प्रचलित केलें नाहीं कां ?........**परंतु असें करून त्यानें गर्भधारणा मात्र अपवित्र केली हें खास.— —**

१ ग्रीक पुराणांत अँफिट्रिऑन आणि अलकमेनी नामक दांपत्याची कथा आहे. अँफिट्रिऑन हा एकदां बाहेर युद्धांत गुंतला असतां झ्यूसनामक देवानें त्याच्या सारखें रूप धारण करून त्याच्या पत्नीशीं संभोग केला आणि त्यापासून हर्क्यूलिस नामक पुत्र जन्मला. हा हर्क्यूलिस पुढें महापराक्रमी वीर पुरुष होऊन गेला. वैदिक पुराणांत हि एतत्सदृश गौतमपत्नी अहिल्या आणि देवांचा राजा इंद्र यांच्या व्यभिचाराची कथा आहे. पण तज्जन्य एखादें अपत्य मात्र ऐकिवांत नाहीं. ख्रिस्ती चर्चनें येशूच्या जन्मचरित्रांत ही अँफिट्रिऑनची कथा गोंवून केवळ लाक्षणिक रीतीनें आपणास देवपुत्र म्हणवून घेणाऱ्या त्या तारकप्रभूला खराखुरा च देवाच्या पवित्र आत्म्यापासून जन्म पावलेला असा देवपुत्र बनविला, आणि या रीतीनें कुमारी मेरीची विवाहपूर्वकाळची गर्भधारणा निष्कलंक म्हणजे पुरुषमैथुनव्यतिरिक्त अतएव पवित्र ठरविली !

" स्वर्गांतील राज्य " ही एक मानसिक अवस्था आहे—ती एखादी " भूलोकाच्या पलीकडे " असलेली किंवा " मरणोत्तर " प्राप्त होणारी वस्तु नाहीं. शुभवर्तमानांत कोठें स्वाभाविक मृत्यूच्या कल्पनेचा गंध हि नाहीं. मृत्यु हा एखादा पूल नाहीं किंवा कोठें जाण्याचा मार्ग नाहीं : शुभवर्तमानांत त्याचा उल्लेख नाहीं, कारण तो अगदीं निराळ्या अशा ह्या ऐहिक मायामय जगताला अनुलक्षून आहे,—ज्या जगताचा उपयोग केवळ लाक्षणिक लिंगसादृश्यें पुरविणें हा आहे. " मृत्यूची घटका " ही खिस्ती कल्पना होऊं च शकत नाहीं— " घटका ", सामान्यत: कालभावना, आधिभौतिक जीवित आणि त्यांतील शुभाशुभ प्रसंग, यांपैकीं कांहीं एक " शुभवर्तमाना " च्या दूताला दिसत नाहीं........" देवाचें राज्य " ही कांहीं अशी पुढें येणारी अपेक्षित वस्तु नाहीं; त्याच्या ठिकाणीं कालचा दिवस आणि उद्यांच्या पलीकडचा दिवस ही भाषा च नाही—वस्तुत : देवाचें राज्य म्हणजे मानवाच्या अन्त:करणांतील स्वानुभूति; तें सर्वत्र आहे, तें कोठें हि नाहीं........

## ३५

हा " आनंदाच्या वर्तमानाचा दूत " ज्या प्रकारें आयुष्य क्रमीत होता आणि लोकांना उपदेश करीत होता त्या च प्रकारें मरण पावला—" मानवजातीचें तारण " करण्याकरितां नव्हे, तर मनुष्यानें आयुष्य कसें आक्रमावें हें दाखविण्या-

करितां. त्यानें मानवजातिकरितां जी कांहीं देणगी आपल्या मागें ठेवली ती एक प्रकारची विशिष्ट जीवनपद्धति होय: त्याचें न्यायाधिशापुढील वर्तन, त्याचें आपल्या मारेकऱ्यांशीं, आपणावर खोटे आळ आणून सर्व प्रकारच्या निंदा आणि तिरस्कार यांचा वर्षाव करणारांशीं वागण्याचें धोरण,–त्याची "क्रूसा" वरील संपूर्ण चर्या. तो कसला हि प्रतिकार करीत नाहीं; तो आपल्या हक्कांची क्षिति बाळगीत नाहीं; तो आपल्या वर्तनाचे परमावधीचे परिणाम टाळण्याकरितां उपाय योजीत नाहीं; फार काय, पण उलट तो ते आपणावर अधिकाधिक ओढवून घेण्याला च प्रोत्साहन देतो. आणि इतकें असून हि तो आपणास पीडा देणारांप्रीत्यर्थ देवाची करुणा भाकतो, त्यांच्याबरोबर दुःख सोसतो, त्यांच्यावर प्रेम करतो........स्वतःच्या बचावाकरितां पुरावा द्यावयाचा **नाहीं**, कोपाचें आविष्करण करावयाचें **नाहीं**, आणि आपणाकरितां दुसऱ्या कोणास जबाबदार धरावयाचें नाहीं....परंतु आततायी मनुष्याचा हि प्रतिकार करण्यापासून परावृत्त व्हावयाचें,–त्यावर **प्रेम** करावयाचें....

## ३६

— फक्त आम्हीं च जे **सर्वतंत्रस्वतंत्र** मुक्तात्मे आहोंत त्या आमच्या च जवळ गेल्या एकोणीस शतकें कोणाला जें कांहीं जाणतां आलें नाहीं तें जाणण्याची आवश्यक बुद्धिमत्ता आहे;–हा बुद्धीचा सरळपणा आम-

च्या ठिकाणीं आमचा देहस्वभाव किंवा स्वभावधर्म होऊन बसला आहे, कीं ज्यायोगें आम्हीं इतर कोणत्या हि अनृतापेक्षां " पवित्रानृता " वर अधिक निकरानें हल्ला चढवितों.... आमच्या मध्यें जी उपकारक आणि सावधान तटस्थवृत्ति आहे तीपासून पूर्वींच्या काळचा मनुष्य इतका दूर होता कीं सांगतां येत नाहीं; आणि शिवाय आमच्या मनाची जी कांहीं शिस्त आहे, कीं केवळ तिच्या च योगें असल्या प्रकारच्या अति विचित्र आणि सूक्ष्म वस्तूंचें स्पष्टीकरण होऊं शकतें, तिचा तर त्याला तिळमात्र गंध नव्हता. त्या सर्व काळीं लोकांनीं निर्लज्जपणाच्या अहंभावनेनें जर कशावर दृष्टि ठेविली असेल तर ह्या धार्मिक बाबतींत आपला स्वार्थ कसा साधून घ्यावा याकडे; चर्चची उभारणी शुभवर्तमानाच्या विरोधावर झाली आहे....

ज्या कोणाला इहलोकच्या जीवनयात्रेच्या बऱ्या आनंदपर्यवसायी नाटकाच्या मागें पडद्यांत उभा राहून सूत्रें धारण करणाऱ्या व्याजोक्तीच्या देवा बद्दल पुरावा पाहिजे असेल त्यानें खिस्तीधर्म म्हणून जें **जंगी प्रश्नचिन्ह** आहे त्याकडे पहावें म्हणजे त्यांत तो भरपूर सांपडेल. खरी गोष्ट अशी आहे कीं, शुभवर्तमानांतील मूलभूत प्रमेयें, त्यांचे अर्थ, आणि तत्प्रतिपादित हक्क यांच्या सर्वस्वी विरुद्ध वस्तूपुढें आज मनुष्यजात आपले गुडघे टेकीत आहे; पुनः खरी गोष्ट अशी आहे कीं, " शुभवर्तमानाच्या दूता " नें ज्या गोष्टी **कुचकामाच्या** आणि **टाकाऊ** ठरविल्या त्या च गोष्टी जशाच्या तशा " चर्च "

च्या घटनेंत पवित्र म्हणून स्थानापन्न झाल्या–यापेक्षां अधिक **जगप्रसिद्ध** विपरीत लक्षणेचें विलक्षण उदाहरण कोठें धुंडलें तरी सांपडणार नाहीं.— —

३७

—आमच्या युगाला आपल्या ऐतिहासिक वृत्तीचा अभिमान वाटतो: असें असतांना त्यानें, ख्रिस्तीधर्म हा मूळारंभीं **मंत्रतंत्र व जादुटोणे करीत फिरणाऱ्या आणि आपणास जगताचा तारक मानणाऱ्या एका जोग्याची अडाणी भाकडकथा** होती, आणि नंतर कालांतरानें पुढें त्यांत आधिदैविक आणि आध्यात्मिक भाग उपस्थित झाले अशा मूर्खपणाच्या कल्पनेवर कसा विश्वास ठेवला हें समजत नाहीं. उलट खरी स्थिति अशी आहे कीं, ख्रिस्तीधर्माचा इतिहास–क्रूसावरील मृत्युप्रसंगापासून पुढें–म्हणजे या धर्माच्या मूळच्या सांकेतिक लिंगचिन्हांच्या रूपांत उत्तरोत्तर अधिकाधिक ओबडधोबड विपर्यास आणि वेडगळ गैरसमज कसकसे होत गेले याचें सुंदर चित्र आहे. जसजसें या धर्माचें विस्तारक्षेत्र वाढत चाललें आणि जसजसा तो अधिकाधिक रानटी आणि अडाणी जनसमूहांवर पसरूं लागला,— हा जनसमूह असा कीं त्याच्या बुद्धीला या धर्माचीं मूलतत्त्वें आकलन होणें सर्वथैव दुरापास्त होतें,–तसतसें तितक्या च प्रमाणांत त्या धर्माला **अडाणी आणि रानटी** रूप धारण करणें अवश्य भासूं लागलें–त्यानें **रोमन साम्राज्यांतील**

गल्लचाकुच्च्यांच्या भुयारांत वास करणाऱ्या सर्व लहान मोठ्या पंथांचीं आणि संप्रदायांचीं मतें आणि आचार आपल्यांत सामील करून घेतले, इतकें च नाहीं, तर त्यानें रोगदूषित विचारशक्तीच्या हरएक प्रकारच्या मूर्खपणाला आपल्या ठिकाणीं थारा दिला. खिस्तीधर्माचें स्वतःस विघातक असें हें च प्रमुख अंग आहे. त्या धर्माला ज्या ज्या लोकांचीं मनें आकर्षित करून घेण्याचा प्रसंग आला, ते ते लोक जितके दूषित, नीच आणि अडाणी होते तितकें आपलें स्वरूप दूषित, नीच आणि अडाणी बनविणें त्यास भाग पडलें. **व्याधिग्रस्त रानटीपणा** हा शेवटीं संघटित होऊन " चर्च " या नांवाखालीं सत्तेकरितां धडपडूं लागला—हें चर्च कसें? तर सर्व प्रकारचे ऋतसत्याचे मार्ग, आत्म्याचा सर्व उदात्तपणा, मनाचें सर्व संयमन, माणुसकीच्या सर्व निर्मळ आणि प्रेमळ भावना, यांशीं दारुण वैर.–नीतीचीं **खिस्ती** आणि **उदात्त** मूल्यें: फक्त आम्हीं च आत्मे, जे **शुद्धबुद्धमुक्तस्वभाव बनून राहिलों आहोंत**, त्यांनीं च हा पृथ्वीच्या पाठीवर न भूतो न भविष्यति स्वरूपाचा दोन मूल्यांतील भेद पुनरपि प्रस्थापित केला आहे!—

## ३८

—या ठिकाणीं मला उसासा टाकल्यावांचून राहवत नाहीं. कांहीं दिवस असे येतात कीं त्या दिवशीं माझ्या मनावर घनातिमिर विषण्णतेपेक्षां हि अधिक काळ्याकुट्ट औदासिन्याचा

पगडा बसतो-ही भावना म्हणजे **मानवप्राण्याबद्दल तुच्छता.** आणि येथें मी कशाचा द्वेष करतों, मी **कोणाला** तुच्छ लेखतों या बद्दल तुम्हांला संशयांत ठेवूं नये म्हणून एकदां च स्पष्टपणें सांगून टाकतों कीं मी ज्याला तुच्छ लेखतों तो आधुनिक मनुष्य होय, ज्याच्याशीं समकालीन असण्यानें मला माझा नाश होईल असें वाटतें. हा आधुनिक मनुष्य, याच्या विषारी श्वासानें मी अगदीं गुदमरून जातों....गतकालाकडे इतर सर्व ज्ञानवीरांप्रमाणें, मी अति गंभीर सहिष्णुता बाळगतों,—म्हणजे मी एक प्रकारचें **उदार** आत्मसंयमन करतों: उदासीन सावधवृत्तीनें मी संपूर्ण सहस्रकेंचीं सहस्रकें ह्या वेड्यांनीं घर केलेल्या जगांत संचार केला, आणि "ख्रैस्त्य" म्हटलें काय, किंवा "ख्रिस्ती धर्म" म्हटला काय, किंवा "ख्रिस्ती चर्च" म्हटलें काय, मनुष्यजातीच्या मानसिक व्यथेबद्दल मी तिला जबाबदार न धरण्याची खबरदारी बाळगली. परंतु मी ह्या आधुनिक युगांत, **आमच्या** युगांत, शिरलों मात्र पुरें कीं, तत्क्षणीं माझ्या मनाचा समतोलपणा ढळतो आणि माझा कोप अनावर होतो. आमचें युग **ज्ञानी** आहे....पूर्वीं जें केवळ दूषित समजलें जात होतें तें आतां निखालस अश्लील आहे. **आणि येथें च माझ्या द्वेषाला आरंभ होतो.** मी माझ्या सभोंवार अवलोकन करतों: पूर्वीं ज्याला "सत्य" समजत त्यापैकीं एक शब्द हि आतां जिवंत राहिला नाहीं; आतां आपल्या कानाला धर्मोपदेशकानें "सत्य" हा शब्द उच्चारलेला खपत नाहीं. सत्या-

विषयीं यत्किंचित् अपेक्षा करणाऱ्या प्रत्येकास हल्लींच्या काळीं हें माहीत असलें च पाहिजे कीं, देवशास्त्रज्ञ काय, धर्मपुरोहित काय, किंवा पोप नामक पीठाधिष्ठित आचार्यगुरु काय हे केवळ अधर्माचरण करतात इतकें च नाहीं तर ते जो जो शब्द उच्चारतात तो तो निवळ खोटा असतो,—आणि असें अनृत भाषण करण्याबद्दल त्यांना हल्लीं " भोळसरपणा " ची किंवा " अज्ञाना " ची सबब सांगतां येत नाहीं. इतर सर्व लोकांप्रमाणें आजमितीस धर्मपुरोहिताला हि चांगलें कळून चुकलें आहे कीं यापुढें " देव ", " पापी भक्त ", आणि " तारक प्रभु " हें सर्व थोतांड आहे; आणि "इच्छास्वातंत्र्य" हें ढळढळीत **असत्य** आहे. पूर्ण मनोविजयाच्या योगें ज्यांचे आत्मे स्थितधी आणि स्थितप्रज्ञ झाले आहेत अशांना तर याविषयींचें **अज्ञान** लांबून हि स्पर्श करूं शकत नाहीं.... चर्चसंबंधीं सर्व कल्पना आतां आपल्या खऱ्या स्वरूपांत व्यक्त झाल्या आहेत —म्हणजे निसर्गाला आणि निसर्गाच्या प्रत्येक नैतिक मूल्याला **हलकें** ठरविण्याची पृथ्वीच्या पाठीवरील अति निंद्य आणि खोडसर लबाडी. पुरोहिताचें हि सत्यस्वरूप आतां चांगलें उघडकीस आलें आहे—म्हणजे, अत्यंत घातकी जातीचें बांडगूळ, जीवनाला गुरफटून टाकणारा साक्षात् विषारी कोळी....ह्या पुरोहितांनीं आणि त्यांच्या चर्चेनें ज्या कांहीं भीतिप्रद तत्त्वांचा शोध लावला त्यांची खरी किंमत काय आहे, **आणि तीं कोणत्या अंतिमाला धरून आहेत**, हें आम्हांला हल्लीं ज्ञात झालें आहे आणि

आमच्या **सदसद्विवेकबुद्धीला** हि तें पटलें आहे. या शोधांच्या योगें मनुष्याचें स्वतःला अपवित्र करण्याचें कार्य पूर्ण सिद्ध झालें आहे हें पाहून कोणाला हि दुःखाचा उसासा आल्यावांचून राहणार नाहीं. " परलोक ", " शेवटचा न्यायनिवाडा ", " आत्म्याचें अमरत्व ", खुद्द " आत्मा " ह्या कल्पना म्हणजे इतकीं थोरलीं मनुष्याचा शुद्ध छळ करण्याचीं उपकरणें आहेत, इतक्या थोरल्या निर्दयपणाच्या पद्धति आहेत; यांचा आश्रय करून त्यांच्या जोरावर च ह्या धर्माचार्यांनी स्वतःचें वर्चस्व स्थापन केलें आणि तें आतांपर्यंत टिकविलें....प्रत्येकास हें सर्व माहीत आहे, **आणि इतकें असून हि प्रत्येक गोष्ट पूर्ववत् जशीच्या तशी आहे.** ज्याअर्थी हल्लींच्या काळीं आमचे मुत्सद्दी—जे इतर सर्व व्यवहारांत लोकभ्रमांपासून अगदीं अलिप्त राहतात आणि आचाराविचारांत ख्रिस्ती धर्माचे कट्टे विरोधक दिसतात—हे सुद्धां आपणांस अद्यापि ख्रिस्ती म्हणवून घेण्याचें टाकीत नाहींत आणि प्रभुभोजनविधीच्या प्रसंगीं त्यांत जाऊन सामील होतात त्या अर्थी औचित्य आणि स्वाभिमान यांचा शेवटचा तंतु तरी शिल्लक राहिला आहे कां असा प्रश्न विचारण्याचें कारण पडतें....कल्पना करा कीं, आपल्या सैन्याच्या शिरोभागीं आधिपत्य करणारा एखादा राजपुरुष—आपल्या राष्ट्राच्या आत्मगौरवाचें आणि अहंभावनेचें जणुं अत्यंत वैभवशाली प्रतीक—हा जर **निर्लज्जपणानें** आपणांस ख्रिस्ती म्हणवून घेऊं लागला तर हें दृश्य किती विचित्र आणि चमत्कारिक

दिसणार आहे!....तर मग ख्रिस्तीधर्म कशाचा निषेध करतो? तो कशाला " जगत् " ही संज्ञा देतो? ख्रिस्ती धर्माप्रमाणें " जगत् " शब्दाचा अर्थ च असा कीं, एखादा मनुष्य योद्धा आहे, न्यायाधीश आहे, देशभक्त आहे, तो स्वतःचें संरक्षण करतो, तो आपल्या मानापमानाची चाड धरतो, तो स्वतःचें हित पाहतो, तो स्वाभिमानसंपन्न असतो....प्रत्येक क्षणाची, प्रत्येक वासनेची, प्रत्येक नीतिमूल्याची वर्तणूक जी एखाद्या कर्माला प्रवृत्त करिते ती आजच्या काळीं ख्रिस्ती धर्माला विरोधक ठरते: मग अशा स्थितींत आधुनिक मनुष्य हा केवढा **असत्याचा गर्भपात** म्हटला पाहिजे कीं तो आपणांस **किंचित् लाज न धरतां** ख्रिस्ती म्हणवून घेण्याचें धाष्टर्य करितो!— —

## ३९

—माझ्या विवेचनांत चार पावलें मागें जाऊन मी तुम्हांला ख्रिस्ती धर्माचा **खरा** इतिहास कथन करतों.— " ख्रैस्त्य " हा शब्द च मुळीं भ्रामक आहे,—खरें सांगावयाचें म्हणजे जगांत एका मनुष्यापेक्षां अधिक ख्रिस्ती झाले च नाहींत, आणि तो एक क्रूसावर **मरण पावला**. " शुभवर्तमान क्रूसावर **देहपतन करितें झालें**. त्यानंतर भागाहून जें दुसरें " शुभवर्तमान " पुढें आलें तें मूळ ज्या शुभवर्तमानानुसार ख्रिस्ताचा जीवनक्रम होता त्याच्या विरूद्ध होतें: तें " अशुभवर्तमान " होतें, अदेवदूताचें वाक्य होतें. " श्रद्धा ",

ख्रिस्ताच्या मार्फत मोक्षांतील श्रद्धा, अशा श्रद्धेंत ख्रिस्ती-धर्माचें विशिष्टत्व पाहणें इतकें खोटें आहे कीं त्यायोगें मुर्ख-पणा पदरीं येणार आहे: ख्रिस्ती हें विशेषण यथार्थपणें लावितां येईल अशी वस्तु म्हणजे ख्रिस्ती तऱ्हेची वर्तनसरणी,—जो ख्रिस्त क्रूसावर मरण पावला त्याबरहुकूम जीवनक्रम.......... आजमितीस हि अशा तऱ्हेची वर्तनसरणी शक्य आहे; कांहीं मनुष्यांना तर ती अगदीं आवश्यक आहे: अस्सल ख्रिस्तत्व, आद्य ख्रिस्तत्व सर्व युगांत सर्व काळीं शक्य होण्यासारखें आहे...........धर्म **नव्हे**, तर एक प्रकारचा कर्ममार्ग, खरें पाहतां एक प्रकारचा अकर्ममार्ग, व्यापारेषु अव्यापार, आणि जगाहून अगदीं निराळा आयुष्यक्रम...........मनाच्या संवे-दनात्मक अवस्था, कोणत्या हि स्वरूपाची श्रद्धेची भावना, कांहीं वस्तु सत्य आहेत असा विश्वास ह्या सर्व गोष्टी पूर्णपणें निरर्थक आहेत, आणि जर मी त्यांची नैसार्गिक प्रवृतींशीं तुलना करून पाहिली तर योग्यतेनें त्यांचा पांचवा दर्जा लागेल हें कोणा हि मानसशास्त्रज्ञास चांगलें अवगत आहे: अधिक सूक्ष्मार्थानें, सर्व बौद्धिक कार्यकारणभावाचें तत्त्व च मुळीं चुकीचें आहे. एखादी गोष्ट केवळ मनाच्या संवेदनात्मक भावनेनें सत्य मानण्यांत ख्रिस्ती होण्यापर्यंत किंवा ख्रैस्त्याचा पुरस्कार करण्यापर्यंत मजल जाणें याचा अर्थ खऱ्या ख्रिस्त-त्वाचा निषेध करणें होय. **वस्तुतः जगांत ख्रिस्ती असे कोणी झाले च नाहींत.** "ख्रिस्ती," ज्याला आज दोन हजार वर्षें ख्रिस्ती म्हणून संबोधण्याचा प्रघात आहे असा मनुष्य

मानसशास्त्रदृष्ट्या केवळ त्याच्या अन्त:स्वरूपाबद्दल शुद्ध गैर-समजुतीचा परिणाम आहे. अधिक जवळून बारकाईनें पाहतां यद्यपि त्याचे ठायीं श्रद्धेची भावना दिसली तथापि तेथें नैसर्गिक मनोविकारांचें च पूर्ण वर्चस्व असतें – आणि ते विकार तरी कोणते तर सर्व च कामक्रोधादि षड्विकार! ––सर्व काळांत " श्रद्धा "––उदाहरणार्थ लूथरचें जीवनवृत्त पहा–हा केवळ एक झगा आहे, निमित्त आहे, पडदा आहे, ज्याच्या मागें ह्या मनोविकारांना मन:पूत क्रीडा करतां यावी, ––विवक्षित मनोविकारांच्या स्वैराचरणाच्या बाबतींत **डोळेझांक** करण्याची धूर्तपणाची शक्कल..........मी पूर्वीं वर्णन केल्याप्रमाणें " श्रद्धा " ही खरोखर ख्रिस्ती कपटपाटवाची एक क्लृप्ति च आहे; कारण लोक नेहमीं " श्रद्धे "चें नांव घेऊन आपल्या मनोविकारांनुसार आचरण कारितात..........ख्रिस्ती लोकांच्या कल्पनासृष्टींत वस्तुस्थितीच्या जवळजवळ येईल अशी एक हि कल्पना नाहीं: परंतु मी पूर्वीं च जाणून ठेवलें आहे कीं सर्व सद्वस्तूबद्दल स्वाभाविक द्वेषभाव हा या धर्माचा मूलभूत हेतु आहे, ती त्याच्या मुळाशीं एक च प्रेरक शक्ति आहे. यावरून काय निष्पन्न होतें? तर येथें हि मानसशास्त्राच्या क्षेत्रांत मिथ्याज्ञान किंवा अज्ञान आद्य महत्त्वाचें आहे––इतकें कीं त्याला वस्तूंचें अन्त:स्वरूप किंवा **मूलतत्त्व** निश्चित करण्याचें सामर्थ्य आहे. या त्याच्या कल्पनासमूहांतून कोणती हि एखादी कल्पना बाजूला करा आणि तिच्या जागीं वस्तुस्थितिदर्शक कोणती हि घडलेली गोष्ट आणून बसवा कीं

हा ख्रिस्ती धर्माचा सगळा च डोलारा गडगडला आणि नाम-शेष झाला म्हणून समजावें ! — उत्तुंग प्रदेशावरून निरीक्षण केलें असतां, ही अत्यंत विचित्र वस्तु, — केवळ मिथ्याज्ञानावर उभारलेला धर्म, येवढें च नव्हे तर मनुष्याच्या मनांत आणि देहांत विष कालवून जविनघात करणाऱ्या भ्रामक कल्पनांमध्यें आपलें बुद्धिसर्वस्व खर्चून नवीन नवीन क्लृप्त्या लढविणारा धर्म—**देवांनीं अवलोकन करण्यास योग्य दृश्य** आहे, — हे देव कसे तर जे देव असून शिवाय तत्त्ववेत्ते आहेत आणि ज्यांशीं आमचा नेक्सॉसच्या द्वीपावर घडलेल्या जगप्रसिद्ध संवादांत परिचय झालेला आहे. ज्यावेळीं ह्या देवांच्या मनांतील तत्संबंधीं उत्पन्न झालेली खंत नाहींशी होईल **(—आणि त्या च प्रमाणें आमच्या हि मनांतील !)** त्यावेळीं ते ख्रिस्ती लोकांनीं उभारलेल्या धर्माच्या या अद्भुत दृश्याबद्दल त्यांचे आभार मानतील : पृथ्वी नामक जो एक लहा-नसा क्षुद्र ग्रह आहे त्याकडे देवांनीं दृष्टिक्षेप करावा आणि त्याबद्दल कुतूहल दर्शवावें इतकें महत्त्व त्याला ह्या एका विचित्र गोष्टी-मुळें प्राप्त झालें आहे हें खरें..........म्हणून ख्रिस्ती लोकांस आपण कमी लेखतां कामा नये : ख्रिस्ती, — **असत्या-चरणांत निर्दोषत्वाच्या पायरीपर्यंत पोंचलेला** असत्यवादी, हा वानरापेक्षां फार श्रेष्ठ प्रतीचा आहे, — ख्रिस्ती मानवाच्या बाबतींत हल्लीं मानवोत्पत्तीसंबंधीं जी एक सर्वप्रसिद्ध उपपत्ति उपस्थित झाली आहे ती लागू करणें म्हणजे निवळ सौजन्याच्या बुद्धीनें त्याचा आदर करणें होय.

४०

—शुभवर्तमानाचें दैव खिस्ताच्या मरणसमयीं निश्चित झालें,—तें " क्रूसाच्या " आधारावर लोंबकळत राहिलें........ हें अनपेक्षित आणि कीर्तीला कलंक लावणारें मरण वास्तविक रीत्या एक सामान्य स्वरूपाचें मरण होतें. त्यामध्यें जो क्रूसाचा संबंध होता त्याबद्दल च काय तो प्रश्न आहे; असा क्रूस त्या काळच्या कायद्याप्रमाणें फक्त **हलक्यासलक्या बाजारबुणग्यांकरितां** राखून ठेविलेला होता,—हा भीतिकारक विरोधाभास त्याच्या शिष्यांच्या पुढें उभा राहिला आणि त्यांना साक्षात् जें मोठें कोडें पडलें तें हें : **तो कोण होता ? तें काय होतें ?**—ह्या शिष्यांच्या अत्यंत दुःखित झालेल्या आणि चलबिचल पावलेल्या अन्तःकरणांतील भावनांनीं उत्पन्न झालेली स्थिति, या तऱ्हेचें मरण हें आपल्या तत्त्वांचें **खंडन** करणारें अनुमान होऊं शकेल हा त्यांच्या मनांतील संशय, आणि " हें मरण नक्की या च तऱ्हेनें कां झालें ? " या वाक्याच्या शेवटचें भीतिदायक प्रश्नचिन्ह, या सर्वांची कल्पना प्रत्येकास उत्तम रीतीनें होण्यासारखी आहे. या ठिकाणीं प्रत्येक गोष्ट अवश्यंभावी असली पाहिजे, प्रत्येक गोष्टीला अर्थ असला पाहिजे, प्रत्येक गोष्टीला कारण आणि तें हि अवल दर्जाचें कारण असलें पाहिजे. शिष्याच्या प्रेमाला गुरुदेवाच्या संबंधीं एवंविध गोष्ट केवळ यदृच्छेनें घडली असें मानणें पसंत नसतें—केवळ त्या च वेळीं भूमि दुभंग झाली: " त्याला कोणी मारिलें ? " " त्याचा निसर्गजात शत्रु कोण

होता ? "—या प्रश्नानें विजेच्या तेजाप्रमाणें आकाश फाटून गेलें. उत्तर: **सत्ताधीश** यहुदी धर्म, त्याचा अधिकारी वर्ग. यापुढें शिष्याला आपण प्रचलित संस्थेच्या **विरुध्द** बंड केलें आहे हें कळूत चुकलें, ही गोष्ट घडून आल्यानंतर त्याला येशू हा **प्रचलित संस्थेच्या विरुद्ध एक बंडखोर होता** हें समजलें. तावत्कालपर्यंत ख्रिस्ताचे ठिकाणीं ही युद्धाची भावना, हें न—म्हणण्याचें आणि न—करण्याचें अंग अस्तित्वांत नव्हतें; इतकें च काय, पण त्याचें संपूर्ण जीवन या भावनेच्या उलट होतें. त्या लहानशा बाल्यावस्थेंतील पंथाच्या अनुयायांना या प्रकारच्या मृत्युमार्गांत सर्वांत जो मुख्य महत्वाचा भाग होता तो बिलकुल समजला नाहीं; तो हा कीं, येथें **क्रोध** नामक विकारावर विजय आणि त्यापासून व्यावृत्ति यांचा उत्तम धडा घालण्यांत आला होता. आणि यावरून च उघड दिसतें कीं त्यांना त्यांच्या स्वरूपाचा किती थोडा बोध झाला होता ! मुळाशीं येशूच्या मनांत आपल्या मरणानें आपल्या मताचें अति स्पष्ट सार्वजनिक **उदाहरण** घालून देणें आणि त्याचा उत्तम पुरावा दाखविणें या शिवाय दुसरा कांहीं हेतु असणें शक्य दिसत नाहीं........परंतु त्याच्या शिष्यांना ह्या मरणाबद्दल **क्षमा** बाळगण्याचा विचार लांबून हि शिवला नाहीं--खरोखर जर त्यांनीं अशी क्षमेची वृत्ति धारण केली असती तर तें त्यांचें कृत्य शुभवर्तमानाच्या अगदीं मूलभूत तत्त्वांना धरून घडलें असतें,— शिवाय त्यांच्या ठिकाणीं स्वत: अन्त:करणाच्या अति निर्मळ आणि

सौम्य शांततेनें या तऱ्हेचें मरण अवलंबिण्यास **तयार** होण्याचें धारिष्ट नव्हतें............अर्थात् शुभवर्तमानाच्या तत्त्वांशीं अत्यंत विरुद्ध जी **सूडाची** भावना तिचा पुनश्च त्यांच्यावर पगडा बसला. त्याच्या मरणाबरोबर आपण हि मरून जावें हें त्या पंथास अशक्य होतें : "नुकसानीची भरपाई" आणि "न्यायाचा निवाडा" यांची आवश्यकता उत्पन्न झाली (—आणि खरोखर "हानिमूल्य", "दंड", "न्याय" यां वांचून दुसरें शुभवर्तमानाला अधिक विरुद्ध काय होतें!) सामान्य जनतेंत प्रचलित असलेली तारकप्रभूच्या आगमनाची कल्पना पुनरपि उचंबळून वर आली; सर्व लक्ष एका ऐतिहासिक कालप्रसंगावर वेधून राहिलें : आणि "देवाचें राज्य" खिस्ताच्या शत्रूंचा फैसल्ला करण्याकरितां भूलोकावर खालीं उतरलें. परंतु यावरून काय सिद्ध होतें तर प्रत्येक गोष्टीविषयीं या शिष्यवर्गांत पूर्ण अज्ञान भरून राहिलें होतें : "देवाचें राज्य" म्हणजे जणुं शेवटच्या अंकांतील शेवटचा प्रवेश, भावी काळचें आश्वासन असें ते खरोखर च मानीत हें केवढें आश्चर्य! परंतु वस्तुतः शुभवर्तमानांत "देवाचें राज्य" हें प्रत्यक्ष जीविताचें आस्तित्व, जीविताचा ओघ, जीविताची सफलता यांचें निदर्शक आहे. खिस्ताच्या मरणाप्रमाणें तंतोतंत जें मरण तें च खरें "देवाचें राज्य" होय. आतां या च विशिष्ट काळीं सदहू शिष्यवर्गाच्या ठायीं याहुदीय फरीसी लोकांबद्दल आणि धर्मशास्त्रज्ञांबद्दल जी पूर्वापार द्वेषभावना आणि तिरस्कारबुद्धि वसत होती ती त्यांनीं प्रभु

येशूच्या जीवनचरित्रांत घुसडून दिली—आणि या प्रकारें त्यांनीं त्याला स्वत:ला च एक उत्तम फरीसी आणि धर्मशास्त्री बनविलें! उलटपक्षीं, ह्या सर्वस्वी धर्मवेड्या माथेफिरूंच्या रानटी पूज्यभावाला, येशूनें शुभवर्तमानांत प्रत्येक मनुष्याला आपण देवाचें लेंकरूं आहों असा जो अधिकार दिला होता, तो या पुढें सहन होईनासा झाला : त्यांनीं आपला सूड, येशूला अगदीं बेअक्कल रीतीनें परमोच्च पदावर नेऊन बसविण्यांत आणि त्याची आपणांपासून पूर्ण फारकत करून टाकण्यांत साधून घेतला : ज्या प्रमाणें पूर्वकालीं यहुदी लोकांनीं आपल्या शत्रूंवर सूड उगवण्याच्या हेतूनें आपल्या देवाला आपणांपासून अलग करून अति उच्च स्थानीं चढविलें त्या सारखा च हा प्रकार होता. केवळ एकमेव देव, आणि केवळ एकमेव देवपुत्र:—दोन्ने हि सारखे च क्रोधाच्या विकाराचे परिणाम होत.

## ४१

—आणि या वेळेपासून पुढें एका बाष्कळ प्रश्नास महत्त्व येऊन बसलें: "देवानें असें कसें होऊं दिलें?" या प्रश्नास त्या काळच्या त्या लहानशा पंथांतील विकृत मेंदूच्या भक्तांनीं जें उत्तर दिलें तें इतकें मूर्खपणाचें होतें कीं तें ऐकतांक्षणीं च अक्षरश: भयानें थरकांप व्हावा: पापांची क्षमा करण्या करितां देवानें आपला मुलगा **बळी** दिला. अरेरे! शुभवर्तमानाची इतिश्री किती जलदीनें आणि तातडीनें झाली! अपराधाच्या क्षालनाबद्दल यज्ञ, आणि तो हि अत्यंत बीभत्स

आणि रानटी पद्धतीचा,—अपराधी लोकांच्या पापाबद्दल **निर-पराधी** व्यक्तीचा यज्ञ! केवढा भयप्रद पेगनपणा!—कारण येशूनें च तर स्वतः "पाप" नामक कल्पना रद्द केली होती,—त्यानें देव आणि मानव यांतील अंतर पूर्णपणें तोडून टाकलें होतें, त्यानें जीव आणि शिव यांतील भेद काढून त्यांच्या ऐक्यांत आपलें **जीवन चालविलें**, या प्रकारचें अद्वैत हें च **त्याचें** "आनंदाचें वर्तमान" होतें.....आणि त्यानें हा कांहीं एखादा विशिष्ट हक्क म्हणून प्रतिपादला **नाहीं**!—येथून पुढें क्रमाक्रमानें त्या तारक प्रभूच्या नमुन्यांत शेवटचा न्यायनिवाडा आणि "द्वितीयावतरण", यज्ञीय स्वरूपाचा मृत्यु आणि **पुनरुत्थान** हीं मतें गोंविलीं गेलीं; आणि या सर्वांचा परिणाम, शुभवर्तमानाचें एक च एक जें "आत्यंतिक सुखा"चें परम रहस्य तें जादूच्या कांडीनें भारल्यासारखें एकाएकी अदृश्य झालें आणि त्याच्या जागीं **मरणोत्तर** स्थितीची कल्पना येऊन बसली!....संत पाउल, ज्याच्या यच्चयावत् सर्व कृतींत यहुदी रब्बीचा म्हणजे धर्मशास्त्र्याचा बेशरमपणा ओतप्रोत भरलेला होता, त्या संत पाउलानें सदहू कल्पनेचें—किंवा अधिक सयुक्तिक म्हणजे कल्पनेच्या बाजारबसवेपणाचें—पुढीलप्रमाणें आविष्करण केलें आहे: "जर ख्रिस्त मरणांतून उठला नाहीं तर आमची श्रद्धा व्यर्थ आहे."—आणि एका क्षणांत, सर्व अशक्य कोटींतील आश्वासनांपैकीं अत्यंत तिरस्करणीय असें जें आश्वासन, म्हणजे वैयक्तिक आत्म्याच्या अमरत्वाचें **निर्लज्जपणाचें** मत, तें शुभवर्तमानांतून

उद्धृत होऊन बाहेर प्रकटता पावलें....संत पाउलानें या अमर-त्वाचा लागली च आपल्या प्रवचनांत, प्रत्येक व्यक्तिमात्रास मिळणारें पारितोषिक, या अर्थानें उपयोग हि केला.

## ४२

क्रूसावरील मरणानें कशाचा अंत झाला हें आतां तुमच्या चांगलें लक्षांत आलें असेल: बौद्धधर्मांतील पद्धतीच्या शांतते-कडे, इहलोकांतील खऱ्या सुखास्थितीकडे–केवळ आश्वासनांत देऊं केलेल्या सुस्थितीकडे नव्हे–एका नवीन आणि स्वतंत्र प्रयत्नाचा. कारण, मी पूर्वीं दर्शविल्याप्रमाणें या दोन अवनतिप्रसर धर्मपंथांत हा च एक मूलभूत भेद आहे: बौद्ध-धर्मांत आश्वासन थोडें पण फलसिद्धि पुष्कळ, तर ख्रिस्ती-धर्मांत आश्वासनांची रेलचेल पण फलाच्या नांवानें शून्य.– " शुभवर्तमानाच्या पाठोपाठ लागली च **अशुभवर्तमान** उद्भव पावलें–आणि तें संत पाउलानें जाहीर केलें. संत पाउल हा तारकप्रभूच्या नमुन्याच्या अगदीं उलट बाजूच्या टोंकास अस णाऱ्या नमुन्याचा मूर्तिमंत पुतळा आहे; द्वेष, द्वेषाची दृष्टि, आणि द्वेषाचें कठोर तर्कशास्त्र यांत त्याचा हात धरणारा कोणी नाहीं. आणि या देवदूतद्वेष्ट्यानें आपल्या द्वेषाला कोणाचा बळी घेतला नाहीं? सर्वांत मोठा असा खुद्द तारक प्रभूचा च बळी घेतला : त्यानें त्याला **आपल्या** क्रूसावर खिळून मारलें. एकदां या खोटे पुरावे तयार करण्यांत हातखंडा अस-लेल्या साधूनें द्वेषप्रेरित होऊन ख्रिस्ताच्या चरित्रांत आपणा

स्वतःस फायदेशीर तेवढें पाहण्याचा कृतसंकल्प केल्यानंतर ख्रिस्ताचें चरित्र, त्याचें उदाहरण, त्याचें मत आणि मरण, व शुभवर्तमानांतील जें जें कांहीं सत्य आणि युक्त, यांपैकीं कशाचा हि मागमूस राहिला नाहीं. वस्तुस्थिति **नाहीं** : ऐतिहासिक सत्य **नाहीं**!....आणि पुनः एकवार यहुद्यांच्या भिक्षुकीवृत्तीनें इतिहासाच्या विरुद्ध तो च पूर्वीचा बडा गुन्हा केला,—त्यानें ख्रिस्ती धर्मांतून कालचा दिवस आणि त्याच्या मागचा दिवस अजीबात काढून टाकला; त्यानें **आपल्या पदरचा ख्रिस्ती धर्माच्या उत्पत्तीचा इतिहास बनविला.** इतकें करून हि तो थांबला नाहीं: त्यानें इस्रायलांच्या इतिहासाचा पुनः एकदां विपर्यास केला, इतका कीं तो **आपल्या** धर्मकार्याचा पूर्वरंग दिसावा: पूर्वीच्या सर्व भविष्यवाद्यांनीं **त्याच्या** च " तारकप्रभू " चा उल्लेख केलेला होता....यानंतर ख्रिस्ती चर्चनें तर सर्व मानवजातीच्या च इतिहासाचा विपर्यास करून तो केवळ ख्रिस्ती धर्माचा उपोद्घात आहे असें ठरविलें....तारकप्रभूचा नमुना, त्याचा उपदेश, त्याचें जीवन, त्याचा मृत्यु, त्याच्या मृत्यूंतील गर्भितार्थ, आणि त्या मृत्यूनंतर त्याला अनुसरून घडलेल्या गोष्टी —यांपैकीं एक हि बाब मल्लीनाथीवांचून शुद्ध राहिली नाहीं, एक हि बाब लांबून हि सत्याच्या सदृश दिसेल अशा स्वरूपांत उरली नाहीं. संत पाउलानें त्या उदात्त जीवनवृत्ताचा गुरुत्वमध्यबिंदु च आपल्या मूळ पदापासून हालविला आणि मृत ख्रिस्ताच्या " पुनरुत्थाना " च्या बनावट कथेला पुष्टि

देण्याकरितां तो त्या चरित्राच्या **पूर्वकालांत** नेऊन बसविला. मुळांत त्याला तारकप्रभूच्या चरित्रापासून कांहीं उपयोग होण्यासारखा नव्हता,–त्याला फक्त त्याच्या क्रूसावरील मृत्यूशीं, **आणि** त्यापेक्षां कांहीं अधिक गोष्टीशीं कर्तव्य होतें. संत पाउलासारखा मनुष्य ( ज्याचें घर स्टोइकपंथीयांच्या म्हणजे उदासी बैराग्यांच्या विद्येची चावडी होती ) हा जेव्हां तारकप्रभूच्या शाश्वत अस्तित्वाचा पुरावा केवळ आपल्या दृष्टिभ्रमांतून योजून सादर करतो तेव्हां त्याच्या प्रामाणिकपणाबद्दल शंका उत्पन्न होते; आणि जेव्हां तो हा दृष्टिभ्रम सत्य म्हणून प्रतिपादण्यास लागतो तेव्हां त्यावर विश्वास ठेवणें हें मानसशास्त्रज्ञाच्या बाबतींत तरी अति मूर्खपणाचें ठरतें: संत पाउलाला साध्याची अपेक्षा होती, अर्थात् त्यानें साधनांची आकांक्षा धरली....ज्यावर त्याचा स्वतःचा विश्वास नव्हता त्यावर ज्या लोकांत त्यानें **आपल्या** मतांचा प्रसार केला त्या खुळचट लोकांनीं अंधपणें विश्वास ठेवला.–त्याला जें काय पाहिजे होतें ती सत्ता; संत पाउलाच्या द्वारें धर्मपुरोहितानें पुनरपि सत्तेची महत्त्वाकांक्षा बाळगली,–त्याला केवळ जेणेंकरून सामान्य जनसमूहावर करडी सत्ता स्थापन करतां येईल, जेणेंकरून त्यांचें संघटन होऊन त्यापासून कळप बनतील, अशा च प्रकारच्या कल्पना, मतें आणि लाक्षणिक चिन्हें यांचा उपयोग करतां आला. ख्रिस्ती धर्माचा कोणता भाग पुढें महंमद पैगंबरानें जसाचा तसा उचलला? संत पाउलाची ही विशिष्ट निर्मिति, ही त्याची धर्मपुरोहिता-

च्या भावनेची जुलमी सत्ता स्थापन करण्याची आणि कळप बनविण्याची युक्तिः अमरत्वाच्या ठिकाणीं विश्वास—म्हणजे, " शेवटच्या न्यायासनापुढील निवाड्या " चें सिद्धान्तमत....

## ४३

जेव्हां आयुष्याचा गुरुत्वमध्यबिंदु त्या कालांतून काढून पलीकडल्या कालांत—म्हणजे शून्यांत—स्थापित करण्यांत येतो तेव्हां त्या आयुष्याचा सबंध तोल बिघडून जातो. वैयाक्तिक अमरत्वाचें हें बडें थोतांड सर्व विवेकशक्तीचा आणि नैसर्गिक प्रेरणांचा नाश करणारें आहे,—या प्रेरणांत जें जें कांहीं हितकारक आहे, जें जीवनपोषक आहे, आणि जें भविष्यत् काळच्या अस्तित्वाबद्दल ग्वाही देणारें आहे तें सर्व या पुढें संशयास्पदतेच्या कोटीला गेलें. जीविताचा अर्थ च आतां असा करण्यांत आला कीं तो एखादा शुष्क आणि निरर्थक प्रयत्न दिसावा....सार्वजनिक कार्याविषयीं उत्सुकता कशाला पाहिजे? आपल्या जन्मभूमीविषयीं आणि वाडवडिलांविषयीं उपकार मानण्याचें कारण काय? स्वकीय बांधवांबरोबर सह-कार्य करून आत्मविश्वास कां दाखवा? जगाच्या हिताबद्दल नसती काळजी आणि उठाठेव कोणी सांगितली?....या सर्व गोष्टी म्हणजे इतकीं थोरलीं " मोहजाळीं " पसरलेलीं आहेत; " सरळ मार्गांत " इतके थोरले अडथळे आहेत. " फक्त एक च गोष्ट आवश्यक आहे "..... प्रत्येक मनुष्याचा, "अमरात्मा " या नात्यानें, दुसऱ्या मनुष्याशीं समान दर्जा असावा;

संपूर्ण मानववर्गांत प्रत्येक मनुष्याच्या " मोक्षप्राप्ती " ला त्रिकालाबाधित महत्त्व यावें; आणि क्षुद्र हटवाद्यांना व तीन-चतुर्थांश वेड्यांना सृष्टीचे नियम आपल्या सुखाकरितां पाहिजे तेव्हां **मोडले** जातात असें मानण्याचा हक्क असावा,—या सारखें प्रत्येक प्रकारच्या स्वार्थसाधूपणास अति उद्दाम रीतीनें संख्येच्या अनंतावधीपर्यंत भव्य रूप देणें हें इतकें अश्लाघ्य आहे कीं त्याबद्दल जितका तिरस्कार दाखवितां येईल तितका थोडा च होणार आहे. आणि खरोखर या वैयक्तिक आत्म-श्लाघेचें किळसवाणें स्तुतिस्तोत्र गाऊन च खिस्ती धर्मानें जगांत विजय मिळवलेला आहे,—या उपायानें या धर्मानें सर्व रोगी आणि नतद्रष्ट लोकांना, सर्व बंडखोर आणि फितूर लोकांना, सर्व अकालीं गाभटलेल्या लोकांना, सर्व रद्दी आणि कचरावजा लोकांना आपल्या बाजूला वळवून आणलें. " आ-त्म्याचें मोक्षसाधन " —स्पष्ट शब्दांत सांगावयाचें म्हणजे " सर्व जग माझ्या बिंदूभोंवतीं फिरत आहे "...." सर्वांना समान हक्क " या सिद्धांताचें विष खिस्तीधर्मानें अत्यंत पूर्णत्वानें प्रसृत केलें आहे: हें खैस्त्य कसें, तर ज्यानें हृदयांत अगदीं गुप्तपणें खोल वसत असलेल्या दुष्ट विकारांना प्रेरित होऊन मानवांमानवांतील दूरत्वाच्या आणि पूज्यत्वाच्या सर्व प्रकृष्ट भावनांविरुद्ध—म्हणजे सर्व उन्नतीच्या आणि सांस्कृतिक प्रगतीच्या **आवश्यक** भावनांविरुद्ध—दारुण युद्ध पुकारलें आहे; सामान्य जनसमूहाच्या रागद्वेषांचा आधार घेऊन त्यानें आमच्या सारख्यांच्या विरुद्ध, जगांत जें जें कांहीं उच्च,



दा. क्र. 4382

उदात्त, उन्नत आहे त्याच्या विरुद्ध, संपूर्ण आनंदमय सृष्टीच्या विरुद्ध, आणि जगांतील आमच्या सुखानिधानाच्या विरुद्ध आपलीं सर्व प्रमुख शस्त्रास्त्रें पाजळून तयार ठेविलीं आहेत.... प्रत्येक संत पीटर आणि संत पाउल यांना " अमरत्व " बहाल करणें या सारखा उदात्त मानवत्वावर अति मोठा आणि अति निंद्य बलात्कार जगांत दुसरीकडे कोठें हि घडून आलेला नाहीं.–आणि येथें ख्रिस्तीधर्मापासून उगम पावून अगदीं राजकारणापर्यंत पोंचणाऱ्या आणि त्यांत आपला शिरकाव करून घेणाऱ्या एका घातुक कारणतत्त्वाचें महत्त्व कमी लेखतां कामा नये! आधुनिक काळीं विशिष्ट जातीचे हक्क, स्वामित्वाचे हक्क, स्वतःविषयीं स्वाभिमानाची वृत्ति, बरोबरीच्या विषयीं आदराची भावना—अर्थात् असमानतेच्या **दूरभावांतील सरसिकता**–यांचा उच्चार करण्याचें धैर्य कोणाच्या हि अंगांत नाहीं. या धैर्याभावामुळें आमचें राजकारण रोगग्रस्त झालें आहे!–सर्व आत्म्यांच्या समानत्वाच्या मिथ्या कल्पनेनें श्रेष्ठकनिष्ठभावनिष्ठ अभिजात मनोवृत्तीचें पूर्णत्वानें उच्चाटन घडून आलें आहे. आणि " महत्तमसंख्याकांचे हक्क " या कल्पनेंतील विश्वास हा च जर आज जगांतील सर्व **राज्यक्रांत्या** घडवून आणीत आहे आणि पुढें हि सारखा आणीत राहील असें म्हटलें, तर, या सर्वांचें पाप ख्रिस्तीधर्माच्या आणि प्रत्येक राज्यक्रांतींत दिसून येणारे भयंकर गुन्हे आणि रक्तपात यांना उत्तेजन देणाऱ्या त्या धर्मांतील नैतिकमूल्यांच्या माथीं बसेल यांत तिळमात्र

शंका नाहीं. ख्रिस्तीधर्म म्हणजे जें जें कांहीं उच्चपदाधिष्ठित आहे तद्विरुद्ध पोटावर सरपटत चालणाऱ्या सर्व नीच प्राण्यांनीं उभारलेलें बंड होय: " नीचां " चें शुभवर्तमान **नीचत्वाला** च न्यावयाचें....

## ४४

—प्राथमिक ख्रिस्ती समाजांचे **ठिकाणीं** जी अवनति अगोदर च दृढबद्ध झाली होती तिचा उत्कृष्ट पुरावा या दृष्टीनें शुभवर्तमानांचें पुस्तक अति महत्त्वाचें आहे. यहुदी रब्बींच्या मिमांसकी दोषैकदृष्टीनें संत पाउलानें जें जें तर्काच्या परम सीमेला नेऊन पोंचविलें तें सर्व ख्रिस्ताच्या मरणोत्तर सुरू झालेल्या अपकृष्टतेच्या ओघाचें शुद्ध स्वाभाविक रूप होतें. हें शुभवर्तमानाचें पुस्तक वाचतांना अत्यंत सावधगिरी ठेवणें जरूर आहे; त्यांत असलेल्या प्रत्येक शब्दाच्या मागें अनेक अडचणी दडून बसलेल्या आढळतात. येथें मी कबूल करतों, आणि लोक हि हें अन्यथा मानणार नाहींत अशी आशा बाळगतों, कीं या च एका कारणाकरितां मानसशास्त्रज्ञाला आनंदाच्या उकळ्या फुटतील असा तो ग्रंथ आहे,—भाबड्या हेकटपणाच्या सर्वस्वी विरुद्ध, बुद्धीच्या सूक्ष्म विवेचनांतील परमोत्कृष्टता आणि मनाला भ्रष्ट करण्याच्या विलक्षण कलेंतलि अंतिम निपुणता दर्शविणारा असा. या प्रकारें बैबल हा एक अद्वितीय ग्रंथ आहे. त्याशीं तुलना करतां येईल असा पृथ्वीच्या पाठीवर दुसरा ग्रंथ च नाहीं. येथें आपणांस जर खरा माग

काढावयाचा असेल तर **पहिली** गोष्ट ही लक्षांत ठेवली पाहिजे कीं आपण यहुदी लोकांत उभे आहोंत. पवित्रपणाची नक्कल, जी येथें शब्दशः प्रतिभेच्या स्वरूपाला पोंचली आहे आणि जी इतरत्र कोठें हि ग्रंथाचे ठिकाणीं काय किंवा व्यक्तीचे ठिकाणीं काय बैबलच्या जवळ जवळ सुद्धां प्राप्त झालेली दिसून येणार नाहीं, ही वाचेंतील आणि क्रियेंतील शुद्ध अनृताची प्रतिमा, जी या ग्रंथांत कलेच्या पूर्णतेला गेली आहे, तो कांहीं एखाद्या व्यक्तिगत गुणाचा परिणाम नाहीं किंवा निसर्गातील अलौकिक दैवगतीचा खेळ नाहीं. हे गुण म्हणजे **वंशाची** परंपरागत देणगी आहे. पवित्रानृतकथनाची कला,—या कलेंत च यहुदी धर्माचें संपूर्ण जीवन आहे. अशा यहुदी लोकांच्या हातांत अनेक शतकें जो या कलेचा अति व्यवस्थित रीतीनें शिक्षणाच्या व आचरणाच्या द्वारें परिपोष झाला तो च पुढें ख्रिस्ती धर्मांत एकदम अंतिम निपुणतेच्या स्थितीला जाऊन पोंचला. ख्रिस्ती,—हा असत्याचा आणि अनृताचा **पुतळा**,—पुनः एकवार यहुदी आहे—नव्हे तो त्रिवार यहुदी आहे....धर्मपुरोहिताच्या कर्माचारांत प्रदर्शित होणारे कल्पित विचार, सूचक चिन्हें, आणि खोटे आविर्भाव यांचा उपयोग करण्याची अनिवार्य इच्छा, आणि त्या बरोबर च दुसरा प्रत्येक कर्माचार, दुसरा प्रत्येक प्रकारचा सत्यासत्य व युक्तायुक्त ठरविण्याचा साधनमार्ग यांचा निषेध करण्याची उपजत भावना—हें सर्व कांहीं निवळ परंपरेनें घडत नाहीं, तर त्यांत रक्ताचा संबंध असतो : तें केवळ

आनुवंशिकत्वाच्या संस्कारामुळें निसर्गासारखें कार्य करण्यास समर्थ होतें. संपूर्ण मानवजात, सर्व बुद्धिमान् पुरुष, आणि सर्व उत्तमोत्तम कालपर्याय-( याला एक च मनुष्य अपवाद आहे आणि कदाचित् तो केवळ राक्षसतुल्य समजला जाण्याचा संभव आहे )-यांनीं या बाबतींत आपणांस फसवून घेतलें आहे. शुभवर्तमान हें एक **शुद्ध सोज्वळ भावाचें पुस्तक** म्हणून वाचण्यांत येतें....जेथें सद्गुणाचा आव घालून जें बेमालूम फसवणुकीचें कार्य चालतें त्याचें हें कांहीं अगदीं च क्षुल्लक चिन्ह आहे असें समजूं नये.-खरोखर जर आपणांस एक क्षणभर हि ह्या सर्व अक्कल गुग करणाऱ्या धर्मवेड्यांचें आणि तोतया साधूंचें खरें स्वरूप पाहण्यास मिळालें तर सर्व च गोष्टी संपुष्टांत येतील—आणि केवळ या च एका कारणामुळें ज्या अर्थीं **माझ्या** वाचनांत त्यांचा असा एक हि शब्द येत नाहीं कीं ज्यांत त्यांचे ढोंगी आविर्भाव निदर्शित होत नाहींत, **त्या अर्थीं मी त्यांचा अंत करून टाकला आहे.** ....आपले डोळे आकाशाकडे लावण्याचा जो त्यांचा एक विधिमार्ग आहे तो मला अगदीं दुःसह वाटतो.-खिस्ती धर्माचें हें एक सुदैव च होय कीं बहुजनसमाज हा पुस्तकांच्याकडे केवळ **वाङ्मय** या दृष्टीनें पाहतो. आपण आपली दिशाभूल करून घेतां कामा नयेः "कोणाचें बरेंवाईट निवडूं नका!" असें हे साधू शिकवितात, पण जर कोणी त्यांच्या वाटेंत आड आला तर ते त्याची सरळ नरकाकडे रवानगी करतात. ज्या अर्थीं ते देवावर न्याय निवाड्याचें

काम सोंपवितात त्या अर्थीं ते स्वतःच न्याय निवाडा करतात; ते जो देवाचा महिमा गातात तो त्यांचा स्वतःचा महिमा असतो; जे सद्गुण त्यांना स्वतःला आचरतां येतात—किंवा अधिक सयुक्तिक म्हणजे लोकांवर आपलें वर्चस्व गाजविण्याकारितां ज्यांची त्यांना आवश्यकता असते—ते च सद्गुण ते दुसऱ्यांवर लादतात :— ते असा मोठा आव आणतात कीं आपण सद्गुणाकरितां झगडत आहों, आपण सद्गुणाच्या साम्राज्याकरितां झगडत आहों. "आम्हीं नीतीकरितां जगतों, नीतीकरितां मरतों, नीतीकरितां आत्मयज्ञ करतों" (—"सत्य", "प्रकाश", "देवाचें राज्य") : खरें पाहिलें असतां ते जें करतात तें केल्यावांचून त्यांना गत्यंतर च नसतें. त्यांच्या नैसर्गिक भीरुत्वामुळें त्यांना एखाद्या हांजीहांजीखोराप्रमाणें सदा नम्रभाव धारण करावा लागतो; कोनाकोपऱ्यांत दडून बसावें लागतें; छायेंत अप्रसिद्ध राहावें लागतें; आणि पुन्हा हें सर्व नीतीचें **कर्तव्यकर्म** दिसावें असें त्याला रूप देणें भाग पडतें : आतां त्यांची ही जी नम्रवृत्ति दिसते तीच नीति म्हणून प्रस्थापित होते आणि त्यांची लीनता त्यांच्या धर्मपरायणतेची आणखी एक साक्ष पटविते........

........काय हा नम्र, पवित्र, आणि सदय थोतांडाचा चमत्कार ! "आमच्या चांगुलपणाची साक्ष आमची नीति आहे"...........नीतीच्या द्वारें लोकांना ठकविण्याची युक्ति या दृष्टीनें च तुम्हीं शुभवर्तमानांचीं पुस्तकें वाचा : नीति ही या क्षुद्र लोकांनीं सर्वस्वी आत्मसात् करून टाकली आहे,—नीति

काय करूं शकते हें त्यांना पक्कें ठाऊक आहे! मनुष्यजातीच्या नाकांत वेसण घालून तिला वागविण्याचा सर्वांत उत्तम मार्ग नीति होय! खरी गोष्ट अशी आहे कीं जे लोक आपणांस **देवाचे लाडके** समजतात ते च येथें समजून उमजून अत्यंत **आढ्यतेनें** विनयाचें ढोंग करतात : या रीतीनें हे खिस्ती, " सद्गुणी आणि न्यायी, " आपणां स्वतःस एकदां च कायमचें एका पक्षांत म्हणजे " ऋता " च्या पक्षांत सामील करतात—आणि अवशिष्ट मानवजातीला दुसऱ्या म्हणजे " ऐहिका " च्या पक्षांत ढकलून देतात.........आजपर्यंत जगांत दृश्यमान झालेल्या महात्मत्वाच्या सर्व खुळांत या खुळाचा प्रकार फार घातुक होता : क्षुद्र आणि यःकश्चित् विकृतबुद्धीच्या धर्मवेड्यांनीं आणि असत्यवाद्यांनीं " ईश्वर", " सत्य ", " प्रकाश", " आत्मा ", " प्रेम ", " ज्ञान ", " जीवित ", अशा प्रकारच्या तात्त्विक कल्पनांवर आपला च एकट्याचा हक्क सांगण्यास प्रवृत व्हावें, आणि " ऐहिका " पासून अलग राहण्याच्या बुद्धीनें आपल्या भोंवतीं कुंपण घालण्याकरितां जणुं काय ह्या सर्व गोष्टी आपल्या नांवाशीं समानार्थक आहेत असें मानावें हा काय चमत्कार आहे!—वेड्यांच्या सदनांत टाकण्यास लायक अशा यहुदी लोकांवर हि ताण करणाऱ्या या क्षुद्रांनीं सर्व नीतीचीं मूल्यें आपल्याला जशी सोइस्कर होतील तशी पिळगटून टाकलीं; इतकीं कीं, खिस्ती म्हटला कीं जणुं काय तो च एकटा बाकीच्या सर्व मानवजातीचा तत्त्वार्थ, तिखटमीठ, प्रमाणदंड, आणि " शेवटचें न्यायासन " ठरावा

............हा सर्व अनिष्ट प्रसंग शक्य होण्याचें कारण एक च होतें; तें हें कीं, या प्रकारचें महात्मत्वाचें वेड वंशपरंपरागत रीतीनें—हा वंश म्हणजे यहुदी वंश—जगांत प्राचीन काळापासून चालत आलेलें होतें : ज्या क्षणीं यहुदी आणि यहुदीय–ख्रिस्ती यांमध्यें मतभेद उत्पन्न झाले त्या क्षणीं त्या ख्रिस्त्यांना, पूर्वीं यहुदी लोकांनीं आपल्या उपजत मनोवृत्तीनें स्वत:च्या संरक्षणार्थ ज्या ज्या युक्त्या योजिल्या होत्या, त्या सर्वांचें आतां त्या यहुदी शत्रूंच्या विरुद्ध च अवलंबन केल्यावांचून गत्यंतर नव्हतें. यहुदी लोकांनीं मात्र तावत्कालपर्यंत त्या युक्त्या फक्त जंटाइलांच्या म्हणजे यहुदेतरांच्या विरुद्ध अमलांत आणलेल्या होत्या. ख्रिस्ती म्हणजे अराजक यहुदी, —यापेक्षां कांहीं अधिक नव्हता.

## ४५

—या नादान लोकांनीं आपल्या डोक्यांत कोणकोणत्या अजब वस्तु भरल्या आहेत आणि **आपल्या प्रभूच्या तोंडांत** काय काय वचनें घातलीं आहेत याचीं कांहीं उदाहरणें मी मासल्याकरितां तुम्हांला सादर करतों : त्यांत तुम्हांला "सुंदर आत्म्यांनीं" केलेलीं आत्मनिवेदनें पहावयास सांपडतील.—

"आणि जो कोणी तुमचा सत्कार करणार नाहीं व तुमचें वचन ऐकणार नाहीं त्याच्या विरुद्ध पुरावा म्हणून, तुम्हीं त्या

शहरांतून निघून जाल तेव्हां तुमच्या पायाची धूळ तुम्हीं झाडून टाका. मी तुम्हांला खरोखर सांगतों, त्या शहराची स्थिति अखेरच्या न्यायासनासमोर सोडोम आणि गोमोरा यांची जी स्थिति होईल त्या हि पेक्षां अधिक वाईट होईल." (मार्क ६-११)–**यांतील विचार किती शुभवर्तमानास शोभण्यासारखे आहेत!...**

"आणि माझ्यावर श्रद्धा ठेवणाऱ्या या बालकांपैकीं कोणा एखाद्यास जो कोणी इजा करील त्याच्या गळ्याभोंवतीं जात्याची तळी बांधून त्यास समुद्रांत फेंकून द्यावा हें फार उत्तम." (मार्क ९-४२)–केवढी **शुभवर्तमानाला अनुरूप सात्त्विक कल्पना!..........**

"आणि जर तुमचा डोळा तुम्हांस अनीतिमान् करीत असेल तर तो उपटून टाका. देवाच्या राज्यांत प्रवेश करणारे जे तुझ्यासारखे लोक आहेत त्यांचा एक डोळा असलेला पुरवला, परंतु दोन डोळे शाबूत राहून नरकाच्या अग्नींत प्रवेश करणें नको; ज्या नरकांत त्या डोळ्यांचा कृमि मरत नाहीं व अग्नि विझून जात नाहीं." (मार्क ९-४७-४८). या वचनांत जो डोळा शब्द आहे त्याचा वास्तविक तसा अक्षरशः अर्थ नाहीं.

"मी तुम्हांला खरोखर सांगतों, येथें उभे असणाऱ्यां पैकीं कांहींजण असे आहेत कीं त्यांना देवाचें राज्य पूर्ण वैभवांत प्रस्थापित झालेलें प्रत्यक्ष दृष्टीस पडे पर्यंत मरणाचा

स्वाद घेण्याची पाळी येणार नाहीं." (मार्क ९-१)—**खूप गप्प ठोकून दिलीस**, सिंहा! * ........

"जो जो माझ्या मागून येईल त्यानें आपल्या व्यक्तित्वाचा पूर्ण लोप करून क्रूस हातांत घ्यावा व माझा अनुयायी व्हावें. **कारण**............" (**मानसशास्त्रज्ञाची टीका.** ख्रिस्ती नीतींत "कारण" हा शब्द पूर्ववाक्याचें समर्थन करण्याऐवजीं खंडन करतो. अर्थात येथें नीतीचीं "कारणें" च नीतीचें खंडन करतात. याला म्हणावी ख्रिस्ती पद्धति.) मार्क (८-३४).

"तुम्हीं लोकांच्या वर्तनावर मत देऊं नका म्हणजे तुमच्या वर्तनावर कोणी टीका करणार नाहीं; कारण तुम्हीं ज्या न्यायपद्धतीनें दुसऱ्यावर मत द्याल त्या च पद्धतीनें तुमच्यावर टीका होईल." (मॅथ्यू ७-१-२)—"न्यायी" न्यायाधिशाच्या तोंडांत न्यायासंबंधीं काय विचित्र कल्पना!...........

"तुमच्यावर जे प्रेम करतात त्यांच्यावर जर तुम्हीं प्रेम कराल तर तुम्हांला बक्षीस काय मिळणार? कारण सरकारी करांचा ठेका घेणारे पापी लोक सुद्धां तसें करीत नाहींत

*शेक्स्पीयरच्या "मध्यवसंतनिशास्वप्न" (अं. ५ प्र० १) नामक नाटकांतील "भली गर्जना केलीस, सिंहा" या वाक्याचें अनुकरण. ख्रिस्ती वाङ्मय आणि कला यांत संत मार्काचें बिरुद चिन्ह सिंह आहे ही गोष्ट येथें लक्षांत घेतली म्हणजे वरील वाक्यांतील स्वारस्य तेव्हां च कळणार आहे.

काय? जर तुम्हीं आपल्या बांधवांना च नमस्कार कराल तर तुम्हीं इतरांपेक्षां अधिक काय केलें? सरकारी ठेकेदार सुद्धां असें करीत नाहींत काय?" (मॅथ्यू ५-४६-४७). ख्रिस्ती प्रेमाचें तत्त्व: तें आपणांस **चांगला मोबदला मिळाला पाहिजे असा आग्रह धरितें**........

"तुम्हीं जर मनुष्यांना त्यांच्या उल्लंघनाबद्दल क्षमा करणार नाहीं तर तुमचा **बाप** तुमच्या उल्लंघनांबद्दल क्षमा करणार नाहीं." (मॅथ्यू ६-१५)—सदर "बापा" ला हा चांगला च पेंच आहे!

"देवाचें राज्य आणि त्याचा ऋताचा मार्ग हीं प्रथम तुम्हीं साध्य करा; म्हणजे ह्या सर्व वस्तू तुमच्या ठिकाणीं येऊन भर घालतील." (मॅथ्यू ६-३३)–"ह्या सर्व वस्तू" म्हणजे अन्न, वस्त्र, व इतर आवश्यक पदार्थ. सौम्य भाषेंत बोलावयाचें म्हणजे ही **चूक** आहे..........नुकता च वर देव शिंपी बनलेला दिसतो,–निदान कांहीं बाबतींत तरी....

"त्या दिवसाविषयीं तुम्हीं आनंद प्रदर्शित करा आणि हर्षानें उड्या मारा: कारण, पहा, तुमचें स्वर्गांत मिळणारें बक्षिस फार मोठें आहे: कारण या च तऱ्हेनें त्यांच्या पित्यांनीं भविष्यवाद्यांना वागविलें होतें." (ल्यूक ६-२३) — किती हे उद्धट बाजारबुणगे! ते आपली तुलना प्राचीन भविष्यवाद्यांशीं करण्याचें धाष्टर्य करतात.......

"तुम्हीं देवाचें देऊळ आहां व देवाचा आत्मा तुमच्यांत वास करीत आहे हें तुम्हांस माहीत नाहीं काय? जर कोणी

मनुष्य देवाचें देऊळ बाटवील तर देव त्याचा नाश करील; कारण देवाचें देऊळ पवित्र आहे व तें देऊळ तुम्हीं च आहां." (संत पाउल १, कॉरिंथियन्स ३-१६-१७)–असल्या विचारसरणीबद्दल जितका तिरस्कार दाखवावा तितका थोडा च आहे............

"संत लोक जगांतील सत्यासत्याचा निर्णय करतील हें तुम्हांस माहीत नाहीं काय? आणि जर तुम्हीं जगांतील गोष्टींचा निर्णय करण्यास समर्थ आहां तर अगदीं लहानसहान गोष्टींचा निर्णय करण्यास तुम्हीं अपात्र आहां काय?" (संत पाउल १, कॉरिंथियन्स ६-२)–दुर्दैवानें हें नुसतें एखाद्या वेड्यापिराचें भाषण नाहीं...........हा भयंकर भोंदू पुढें आणखी काय म्हणतो तें पहा–"तुम्हांला माहीत नाहीं काय कीं आम्हीं देवदूतांचा सुद्धां न्याय करतों? मग ऐहिक गोष्टी ज्या आहेत त्यांचा न्याय करूं च करूं"

"या जगांतील शहाणपणाला देवानें मूर्खपणाचें रूप दिलें नाहीं काय? कारण देवाच्या संकल्पाप्रमाणें, जेव्हां जगांतील शहाणपणाला देवाचें ज्ञान होईना असें दिसून आलें तेव्हां धर्मावर प्रवचन देऊन मूढ मार्गानें श्रद्धा ठेवणाऱ्या लोकांस मुक्ति मिळावी अशी देवानें योजना केली...........ऐहिक सुखाच्या मागें असणारे ज्ञानी लोक, पराक्रमी लोक व उच्च वर्णीय अभिजात लोक यांना देव मुक्ति देत नाहीं: या जगांतील मूर्खपणाच्या गोष्टींनीं ज्ञानी लोकांचा पाडाव करण्याचा देवाचा संकल्प आहे; या जगांतील दुर्बल वस्तूंनीं बलवानांचा

पाडाव करण्याची देवाची योजना आहे; आणि नीच व तिरस्कृत पदार्थ हे देवानें पसंत केले आहेत; आणि, **हें पहा**, नास्ति या सदरांखालीं येणाऱ्या वस्तूंच्या द्वारें आस्ति या पक्षांत येणाऱ्या वस्तूंचा पराभव करण्याची देवाची मनीषा आहे : या सर्वांचा उद्देश हा च आहे कीं त्याच्या समोर कोणत्या हि आधिभौतिक गोष्टींचें वर्चस्व राहूं नये." (संत पाउल १ कॉरिंथियन्स १–२० इत्यादि ).–हा उतारा प्रत्येक प्रकारच्या चांडाल नीतीच्या मनःस्थितीचें उदाहरण या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचा आहे; त्याचें रहस्य **जाणण्यां**करितां वाचकांनीं माझा "नीतीची पूर्वपीठिका" हा ग्रंथ पहावा : या ग्रंथांत **आभिजात** नीति, आणि **क्रोध** व सूडाची विफलित तृष्णा यांपासून उत्पन्न झालेली चांडाल नीति यांतील विरोध प्रथम च मी प्रकाशांत आणला आहे. संत पाउल हा एक बडा सूडाचा प्रचारक होता.......

## ४६

**या पासून काय निष्पन्न होतें ?** हें च कीं "नवा करार" वाचतांना आपण आपले हातमोजे घालणें श्रेयस्कर आहे. असल्या डांबराचें इतकें निकटवर्तित्व आपणांस मलिन केल्याखेरीज खास राहणार नाहीं. या "प्राथमिक ख्रिस्ती" लोकांशीं संबंध करणें तो पोलंडांतील यहुद्यांप्रमाणें जरा जपून च केला पाहिजे : येथें आमच्या आक्षेपाचीं कारणें निवेदन करण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं...........फक्त इतकें सांगितलें

म्हणजे पुरे कीं, त्यांच्यापासून दुर्गंध येतो.— नव्या करारामध्यें सहानुभूतिदर्शक असा एखादा तरी भाग दिसेल म्हणून पाहिलें परंतु तें व्यर्थ गेलें. त्या मध्यें स्वातंत्र्य, स्नेहभाव, मनाचा मोकळेपणा, आणि प्रामाणिकपणा यांचा लेश हि नाहीं. या पुस्तकांत माणुसकीचा ओनामा सुरू देखील झालेला नाहीं, आणि येथें **शुचिर्भूत** मनोभावनांचा तर सर्वतोपरि अभाव आहे.... नव्या करारांत फक्त असद्भावनांचा उल्लेख केलेला आहे; त्यांत धैर्याची द्योतक अशी एक हि गोष्ट नाहीं; ह्या लोकांना आपल्या असद्भावनांचें समर्थन करण्याचें हि धैर्य नाहीं. सर्वत्र भीरुता आहे, सर्वत्र आपले डोळे मिटून घेणें आणि आत्मवंचन करणें आहे. नवा करार वाचल्यानंतर त्यापुढें दुसरें कोणतें हि पुस्तक अधिक शुचि दिसूं लागतें: उदाहरणार्थ, संत पाउलाला खालीं ठेवल्यावर लागली च मी पेट्रोनियसाला हातांत घेतला आणि त्याची ती मोहक लेखनशैली पाहून मला जो आनंद झाला तो सांगतां पुरवत नाहीं. पेट्रोनियस हा निंदाप्रचुर आणि श्लेषयुक्त वाङ्मय लिहिण्यांत मोठा बाका ग्रंथकार आहे. डोमेनिको बोकॅशिओ यानें सीझर बोर्जीया याबद्दल जें पार्माच्या ड्यूकाला लिहिलें आहे तें पेट्रोनियसाला जसेंच्या तसें लागू पडतें: “ **तो एक मूर्तिमंत आनंदोत्सव** च आहे ”—त्याचे विचार पुष्टितुष्टिकारक आणि समतोल असल्यामुळें जगाच्या अंतापर्यंत टिकतील असे आहेत.... हे क्षुद्र धर्मवेडे आपल्या सर्व अंदाजांमध्यें चुका करतात आणि सर्वांत महत्त्वाच्या बाबतींत घसरतात. ते परमतांवर हल्ला कर-

ण्यास जातात; पण ज्यावर ते आपला मोर्चा वळवितात त्याला त्या च कारणानें प्रसिद्धि येते. ज्या मनुष्यावर हे " प्राथमिक ख्रिस्ती " तुटून पडतात तो मनुष्य त्यायोगें दूषित होतो असें मुळीं च नाहीं....उलट " प्राथमिक ख्रिस्त्यां " चा विरोध हा एक प्रकारचा मान च ठरतो. नवा करार वाचून त्यांत ज्या गोष्टींना शिव्याशाप दिलेले आहेत त्या खरोखर आदरणीय आहेत असें वाटल्यावांचून रहात नाहीं—" इहलोकांतील शहाणपण " याबद्दल तर बोलावयास च नको; कारण, संत पाउला सारख्या त्वंपुरा करण्यांत पटाईत उपद्व्यापी अहंमन्यानें " धर्मप्रवचनांच्या मूढमार्गानें " त्याचा पाडाव करण्याचा किती जरी अट्टाहास केला तरी तो निष्फळ च व्हावयाचा. यहुदी फरीसींचा कर्मठवर्ग आणि लेखकवर्ग यांचें या विरोधा पासून हित च झालें आहे: ज़्या अर्थीं त्यांचा या गाबाळगचाळ लोकांनीं अति निंद्य प्रकारें द्वेष केला आहे त्या अर्थीं त्यांच्यांत खरोखर च कांहीं तरी सत्त्व असलें पाहिजे हें उघड आहे. हे त्यांना ढोंगी म्हणत,—जसें काय या " प्राथमिक ख्रिस्ती " उपटसुंभ्यांना दुसऱ्यावर हा दोषारोप करण्याची मुभा च होती!—कांहीं म्हटलें तरी या फरीसी आणि लेखक वर्गांना समाजांत विशिष्ट जात्यधिकार होते : येवढें पुष्कळ झालें, चांडाळांच्या द्वेषाला यापेक्षां अधिक कांहीं लागत नाहीं. मला जी भीति वाटते ती ही कीं " पहिला ख्रिस्ती "—आणि तसा च **मला कदाचित् या पुढें भेटूं शकेल असा शेवटचा ख्रिस्ती** सुद्धां—हा आपल्या

अगदीं हाडींमाशीं खिळलेल्या अशुद्ध भावनांच्या योगें प्रत्येक जातिसिद्ध विशिष्टाधिकाराच्या विरुद्ध बंड करणारा आहे; तो " समान हक्कां " बद्दल अविरत झगडतो आणि केवळ त्या च कारितां आपला जन्म आहे असें समजतो!....सूक्ष्म रीतीनें पाहतां त्याला असें केल्यावांचून दुसरा मार्ग च नसतो ....जर एखाद्याची इच्छा आपण व्यक्तिशः " देवाच्या लाड- क्या लोकांपैकीं एक ",—किंवा " देवाचें देऊळ " अथवा " देवदूतांचा न्यायाधीश ",—बनावें अशी असली तर या शिवाय दुसरें निवड करण्याला कोणतें तत्त्व च नाहीं; उदा- हरणार्थ, सचोटी, बुद्धि, पुरुषत्व आणि स्वाभिमान, किंवा सौंदर्य आणि मनःस्वातंत्र्य यांच्या प्रमाणभूत पायावर उभा- रलेलें तत्त्व हें " ऐहिक ", अतएव **मूलतः दुष्ट** च ठरणार हें उघड आहे. तात्पर्य: " प्राथमिक खिस्ती " मनुष्याच्या तोंडचा प्रत्येक शब्द खोटा आहे, त्याची प्रत्येक कृति त्याच्या उपजत भावनेला धरून असत्याकडे जाणारी आहे,—त्याचीं सर्व नीतीचीं मूल्यें आणि तीं प्राप्त करून घेण्याचीं साधनें पूर्णपणें जीवनाला विघातक आहेत; परंतु ज्या मनुष्याचा तो द्वेष करतो, ज्या **वस्तूला** तो झिडकारून देतो, त्या प्रत्येक वस्तूला मात्र **किंमत आहे**....खिस्ती मनुष्य, आणि विशे- षतः खिस्ती धर्मपुरोहित, म्हटला म्हणजे ती एक **नीतीचीं मूल्यें ठरविण्याची कसोटी च आहे** — — येथें मला सांगितलें च पाहिजे असें नाहीं कीं, संपूर्ण नव्या करारांत फक्त **एक** च व्यक्ति अशी दिसते कीं तिच्याबद्दल आपणांस

आदर प्रकट केल्यावाचून राहवत नाहीं. ती व्यक्ति म्हणजे रोमन प्रांताधिपति पायलेट. यहुदी लोकांतील खाजगी भांडणाला **विशेष** महत्त्व देणें हें त्याच्या हातून होईना. एक यहुदी कमी काय किंवा एक जास्त काय–त्याची त्याला काय गणती होती?....ज्या रोमन अधिकाऱ्याच्या न्यायासनासमोर " सत्य " या शब्दाचा अति निर्लज्जपणानें दुरुपयोग करण्यांत आला त्याच्या अभिजात मनोवृत्तीपासून उत्पन्न झालेल्या तिरस्कारामुळें नव्या करारांत एका उक्तीची महत्त्वाची भर पडली आहे, कारण तेथें फक्त त्या एका च उक्तीला **नीतीची किंमत आहे,**—आणि या उक्तीनें नव्या करारावर केवळ टीका केली आहे येवढें च नाहीं तर तिनें त्याचा साक्षात् चक्काचूर करून टाकला आहे : " सत्य काय आहे ! "....

४७

—ज्या एका विशिष्ट गोष्टीमुळें आमचा इतर लोकांशीं मतभेद आहे ती गोष्ट म्हणजे आम्हांस इतिहासांत काय, किंवा सृष्टींत काय, किंवा सृष्टीच्या मागें काय कोठें च ईश्वर दिसत नाहीं ही नव्हे,–तर ज्या वस्तूला लोक " देव " म्हणून पूज्य लेखतात त्या वस्तूला आम्हीं " दैवी " समजत नाहीं, तर भिकार, अनर्थक, हानिकारक समजतों; केवळ चुकीचा परिणाम समजत नाहीं, तर **जीविता विरुद्ध गुन्हा** समजतों....आम्हीं देव असा देव मानीत नाहीं....जर ह्या

ख्रिस्ती देवाचें अस्तित्व कोणी आम्हांस **सिद्ध** करून दाखविलें तर त्याचे ठिकाणीं विश्वास ठेवणें अधिक च अशक्य होईल.—थोडक्यांत सांगावयाचें तर: **संत पाउलानें उपस्थित केलेला देव हा मुळीं देवाचा अभाव आहे.** —ख्रिस्ती धर्मासारखा धर्म, ज्याचा वस्तुस्थितीशीं केव्हां च संबंध येत नाहीं आणि यदाकदाचित् आला च तर वस्तुस्थितीनें किंचित् डोकें वर केल्याबरोबर ज्याचा तत्काळ शक्तिपात होतो, हा स्वभावत: च "इहलोकांतील शहाणपण" —अर्थात् **शास्त्रज्ञान**, याचा कट्टा शत्रु असणार हें उघड आहे. हा धर्म ज्या ज्या साधनांनीं मानसिक शिस्त, बौद्धिक विषयांतील विशदपणा आणि कठोरपणा, बुद्धीची उदात्तता आणि स्वातंत्र्य हे गुण विषदिग्ध होतील, निंदास्पद ठरतील, आणि **नीच म्हणून पुकारले जातील** त्या सर्व साधनांना उचलून धरणार यांत हि कसला च संदेह नाहीं. "श्रद्धा" ही आज्ञार्थानें शास्त्राचा **निषेध** करणार,—आणि **आचरणांत** ती येनकेनप्रकारेण गप्पाष्टक चालवणार हें सुद्धां तितकें च निःसंशय आहे. मूळ संत पाउलाला हें थोतांड उत्तम **कळलें**—"श्रद्धा" ही आवश्यक आहे; आणि नंतर चर्चला संत पाउल उत्तम कळला.... संत पाउलानें जो "देव" आपणाकरितां उपस्थित केला,—हा देव कसा तर जो "इहलोकांतील शहाणपणा" ला "निष्फल" ठरवितो (या ऐहिक शहाणपणाकडे किंचित् बारीक नजरेनें पाहिलें असतां अंधश्रद्धेचे दोन मोठे प्रतिस्पर्धी जे भाषाशास्त्र आणि भैषज्यशास्त्र ते येथें आपोआप दिसून येतात),—तो वास्त-

विकरीत्या संत पाउलाचा असें करण्याचा दृढ **निश्चय** च होता : स्वतःच्या इच्छेला " देव ", " पवित्र आज्ञा " वगैरे नांवें देणें ही यहुदी कारवाईची परमावधि आहे. संत पाउल हा " इहलोकांतील शहाणपणा " ला मूढ ठरविण्याचा अत्याग्रह धरतो : त्याचे शत्रु म्हणजे अलेक्झांड्रियाच्या पाठशाळांतील **मोठमोठे जुने** भाषाशास्त्रज्ञ आणि भिषग्वर होत; या च लोकांवर त्यानें आपलें शस्त्र उगारलें. खरी गोष्ट अशी आहे कीं असा कोणी भाषाशास्त्रज्ञ नाहीं किंवा भेषजाचार्य नाहीं कीं जो त्या च बरोबर **ख्रिस्तविरोधक** नाहीं. कारण जो भाषाशास्त्री असतो तो " पवित्र ग्रंथां " च्या **मागें** नजर फेंकतो; आणि जो भिषग्वर असतो तो इंद्रियविज्ञानशास्त्रदृष्ट्या सांप्रदायिक ख्रिस्त्याच्या नासक्या स्थितीच्या **मागें** दृष्टि देतो. भिषग्वर " असाध्य रोग " म्हणून निदान करतो, भाषाशास्त्री " असत्य लेख " म्हणून निर्णय देतो.

४

—बैबलच्या आरंभीं **ज्ञानाच्या** विरुद्ध देवाला जी मरणप्राय धडकी भरली होती तत्संबंधीं एक सुप्रसिद्ध कथा आहे. तिचा तत्त्वार्थ कोणाला कळला आहे काय?....कोणाला हि कळला नाहीं. तत्त्वतः पुरोहिती बाण्याच्या धर्मपुस्तकांत आरंभीं च पुरोहिताची मोठी अंतस्थ अडचण वर्णिली जावी हें अगदीं स्वाभाविक आहे : **त्याला** फक्त एक च मोठें भय असतें, **तस्मात्** " देवाला " हि एक च मोठें भय असलें पाहिजे.—

तो पुराणा देव, केवळ " चित्स्वरूप ", अन्तर्बाह्य पीठाचार्य, आणि पूर्णांत पूर्ण, हा आपल्या नंदनवनाभोंवतीं स्वेच्छेनुरूप मंदगतीनें फेऱ्या घालीत आहे; परंतु तो कंटाळलेला दिसतो. कंटाळलेल्या स्थितीला देवांना हि कांहीं उपाय सांपडत नाहीं. मग त्यानें काय केलें? त्यानें मानव निर्माण केला, —मानव हा करमणूक करणारा आहे....परंतु, पहा, मनुष्य सुद्धां कंटाळूं लागला. सर्व च स्वर्गलोकांना जी ही विशिष्ट प्रकारची आपात्ति प्राप्त होते तिच्याबद्दल देवाच्या करुणेला इतका पाझर फुटला कीं तो सर्व मर्यादा ओलांडून बाहेर गेला : म्हणून त्यानें पुढें आणखी दुसरे प्राणी निर्माण केले. देवाची **पहिली** चूक : मनुष्याला ह्या इतर प्राण्यांपासून करमणूक होईलसें वाटेना,—त्यानें त्यांवर स्वामित्व मिळविलें, त्याला आपण एक " प्राणी " आहों ही कल्पना मानवेना. म्हणून देवानें स्त्री निर्माण केली. आणि खरोखर त्या घटकेपासून कंटाळा आपल्या स्थितीला कंटाळला,—परंतु त्या बरोबर दुसऱ्या हि कित्येक गोष्टी कंटाळून बाजूला पडल्या. स्त्री ही देवाची **दुसरी** चूक.— " स्त्री ही आपल्या अत्यभ्यंतर स्वभावांत अहिवत् आहे म्हणून तिचें मूळ नांव **हीवा** ", —प्रत्येक धर्मपुरोहिताला ही गोष्ट ज्ञात आहे. " सर्व पाप ह्या जगांत स्त्रीच्या द्वारें आलें ",—प्रत्येक धर्मपुरोहिताला ही हि गोष्ट ज्ञात आहे. " **तस्मात् ज्ञान** सुद्धां स्त्रीच्या द्वारें आलें " ....पुरुष हा केवळ स्त्रीपासून ज्ञानवृक्षाचा आस्वाद घेण्यास शिकला.—यामुळें काय झालें? त्या जीर्ण देवाला भीतीनें पछा-

डिलें. मनुष्य हा त्याची **सर्वांत मोठी** चूक ठरला; त्यानें स्वतःला एक प्रतिस्पर्धी निर्माण केला; ज्ञानानें तुम्हांला **देवाच्या बरोबरीचें** केलें,—मनुष्य शास्त्रीय ज्ञानानें वागूं लागला कीं पुरोहितांचें आणि देवांचें मरण च ओढवलें म्हणून समजावें!—तात्पर्यः शास्त्रज्ञान ही सर्वांत मोठी प्रतिषिद्ध वस्तु आहे,—तें च एक निषिद्ध मानलें आहे. शास्त्रज्ञान हें **पहिलें**, सर्व पातकांचें बीजभूत, आद्य पातक आहे. **हें च काय तें नीतीचें सार.**—" तूं ज्ञान करून घेऊं **नकोस** ": —हें झालें म्हणजे इतर सर्व त्याच्या मागें आलें. देवाची त्रेधा उडाली, पण त्याची बुद्धि नष्ट झाली नाहीं. ज्ञानापासून मनुष्य अलिप्त राहण्यास काय करावें? युगानुयुगें त्याच्या पुढें हा च एक मुख्य प्रश्न होता. उत्तर : मनुष्याला स्वर्गाच्या बाहेर लोटून दिला पाहिजे! सुख, आणि रिकामा वेळ यांपासून विचाराचा उगम होतो,—सर्व विचार असद्विचार असतात.... मनुष्यानें विचार करतां **कामा नये.** —आणि त्या " स्वयंभू पुरोहिता " नें एकेक मार्ग शोधून काढले, — क्लेश, मृत्यु, गर्भिणी अवस्थेचें महत्त्वाचें संकट, सर्व तऱ्हेच्या यातना, वैक्लव्य, पीडा, आणि सगळ्यांत श्रेष्ठ म्हणजे **रोग**,—हीं सर्व शस्त्रास्त्रें त्यानें केवळ ज्ञानशत्रूशीं झगडण्याकरितां उपयोगांत आणलीं! संताप पावल्यानें मनुष्य विचार करूं शकत नाहीं....आणि इतक्या सर्व सावधगिरीच्या युक्त्या जरी योजण्यांत आल्या तरी! काय भयंकर प्रसंग! ज्ञानाचें कार्य उंच मनोऱ्याप्रमाणें वाढत च चाललें, त्यानें प्रत्यक्ष स्वर्गावर चढाई

केली, त्यानें देवांच्या मृत्यूची घंटा वाजविली,–आतां काय करावें?–त्या बुड्ढ्या देवानें **युद्ध** निर्माण केलें; त्यानें राष्ट्रां-राष्ट्रांत फूट पाडली, मानवांमानवांत यादवी माजविण्याची युक्ति योजली (–पुरोहितवर्गाला युद्धाची सतत जरूर असते ....). युद्ध हें इतर अनेक गोष्टींप्रमाणें ज्ञानाच्या प्रगतींत मोठा अडथळा आणणारें आहे!—काय चमत्कार! ज्ञान, **पुरोहिताचें जूं झुगारून देण्याचें कार्य,** उलट वाढत्या च प्रमाणावर आहे.–शेवटीं तो बुड्ढा देव अखेरचा निश्चय करतां झाला : " मनुष्य हा तर शास्त्रज्ञ झाला च,–**याला कांहीं उपाय नाहीं, त्याला बुडवून मारला पाहिजे!**"....

## ४९

तुम्हांला माझा भावार्थ समजला च असेल. बैबलच्या आरंभीं च संपूर्ण भिक्षुकी मन:प्रवृत्तीचें आविष्करण झालें आहे.—पुरोहिताच्या मतें एक च महा संकट आहे, आणि तें संकट म्हणजे शास्त्रीय ज्ञान,–कार्यकारणभावाची न्याय्य कल्पना. परंतु, एकंदरीनें पाहतां, शास्त्राची भरभराट केवळ सुखाच्या परिस्थितींत होते,—मनुष्याला " ज्ञानोपार्जनार्थ " मुबलक वेळ पाहिजे, आणि नेहमींपेक्षां जास्त मनाची तरतरी पाहिजे...." **तस्मात्** मनुष्याला सुखविहीन केला पाहिजे ",–हें सर्व युगांतील पुरोहितांचें पालुपद आहे.–तुम्हीं या ठिकाणीं अगोदर च ताडलें असेल कीं या प्रकारच्या विचारसरणीच्या अनुरोधानें जगतांत प्रथम कोणती वस्तु उद्भव पावली असावी:

—" पाप "....अपराध आणि शासन,—संपूर्ण " विश्वाची नैतिक रचना ",—ही कल्पना शास्त्राच्या विरुद्ध अर्थात् च मनुष्याला पुरोहिताच्या तावडींतून केव्हां च सुटतां येऊं नये या करितां उपस्थित करण्यांत आली आहे....मनुष्यानें आपली दृष्टि बाह्य सृष्टीकडे देतां कामा **नये**, त्यानें ती अन्तःसृष्टी-कडे वळविली पाहिजे; त्यानें विद्यार्थी या दृष्टीनें वस्तूंच्या ठिकाणीं चौकसपणानें आणि सावधपणानें पाहतां कामा नये; त्यानें अगोदर कांहीं पाहतां च कामा नये : त्यानें **कष्ट सो-शीत** राहावें : आणि त्यानें कष्ट च सोशीत राहिलें पाहिजे, नाहीं तर त्याला प्रतिक्षणीं धर्माचार्यांची जरूर कशी भासावी? येथें भेषजाचार्यांचें काम नाहीं. येथें जर कोणाची जरूर असेल तर तारकप्रभूची होय!—दोष आणि प्रायश्चित्त यांची कल्पना व तिच्या बरोबर " देवकृपा ", " मुक्ति ", " क्षमा ", हीं तत्त्वें अन्तर्बाह्य **थोतांडें** असून त्यांत मानसशास्त्राच्या दृष्टीनें सत्याचा लवलेश नाहीं. तीं मनुष्याचें **कारणसंविज्ञान** नष्ट करून टाकण्याकरितां निर्माण केलीं आहेत; कार्यकारणभावाच्या कल्पनेवर तो एक जोराचा हल्ला आहे!—आणि हा हल्ला मुष्टीचा **नाहीं**, सुरीचा **नाहीं**, किंवा रागद्वेषांतील सरळपणाचा **नाहीं**! तर तो मुळाशीं अत्यंत भेकडपणा, भोंदूपणा आणि स्वाभाविक नीचवृत्ति यांनीं प्रेरित झालेला आहे! हा **पुरो-हिताचा** हल्ला आहे! हा **परोपजीवी आणि परान्नपुष्ट प्राण्याचा** हल्ला आहे! जमिनीखालीं राहणाऱ्या फिकट रंगाच्या जळवांचें रक्तशोषण च तें!—....जेव्हां एखाद्या कर्माचें शुद्ध

नैसर्गिक फल " नैसर्गिक " म्हणून मानलें जात नाहीं, तर धर्मभोळेपणाच्या " देव ", " पिशाचें ", " आत्मे " इत्यादि भ्रामक कल्पनांनीं पारितोषिक, शासन, सूचना, आणि शिक्षण-मार्ग यांच्या रूपांत केवळ नीतीचे परिणाम म्हणून एखाद्या जादूच्या प्रयोगासारखें मानलें जातें,—तेव्हां ज्ञानाचा सर्व च पाया ढांसळला,—**तेव्हां मानवप्राण्याच्या विरुद्ध अति मोठा गुन्हा घडून आला,** असें समजावें.-—पाप, मी पुनश्च सांगतों, हें जें मनुष्याच्या हातून स्वतःचें स्वतःला अपवित्र करून घेण्याचें **जबरदस्त** साधन निर्माण करण्यांत आलें आहे तें शास्त्र, संस्कृति, आणि मनुष्याच्या अन्तःकरणांतील प्रत्येक प्रकारची उच्च आणि उदात्त भावना पूर्णपणें अशक्य करून टाकण्याकरितां होय; पापाचा पुरस्कार केल्यानें पुरोहिताला **सत्ता** मिळवितां आली.

## ५०

—या ठिकाणीं " श्रद्धा " आणि " श्रद्धाळु " यांच्या मानसिक स्थितीची मीमांसा केल्यावांचून मला पुढें जातां येणार नाहीं; ही मीमांसा श्रद्धाळु लोकांना स्वाभाविकरीत्या फायदेशीर होणार आहे. जर आज असे कोणी कित्येक असतील कीं ज्यांना आपणांस " श्रद्धाळु " म्हणवून घेणें हें किती अश्लील आहे—किंवा ही स्थिति किती दूरपर्यंत नासलेल्या अवस्थेची व हतजीवितेच्छेची द्योतक आहे—याची कल्पना नसेल, तर त्यांना तें समजून देण्यास मी उद्याचे पलीकडे जात

नाहीं. माझा आवाज जे कोणी बाहिरट असतील त्यांना सुद्धां ऐकूं जाईल.—मी जें कांहीं कानांनीं ऐकिलें आहे तें जर मला फसवीत नसेल तर मला असें ठाऊक आहे कीं ख्रिस्ती लोकांत एक सत्यमापनाचा विशिष्ट प्रकार आहे त्याला ते "शक्तीचा पुरावा" हें नांव देतात. "श्रद्धा मुक्ति देते; **तस्मात्** ती सत्य आहे".—येथें असा आक्षेप घेतां येईल कीं मुक्ति ही मुळांत च सिद्ध करण्यांत आलेली नाहीं तर केवळ तिचें **आश्वासन** देण्यांत आलें आहे: "श्रद्धा" ही मुक्तीची एक बंधनकारक अट आहे,—**जर** एखाद्याजवळ श्रद्धा असेल **तर** त्याला मुक्ति मिळेल....परंतु पुरोहितानें श्रद्धावंताला ज्या गोष्टीबद्दल आश्वासन दिलें आहे **ती** खरोखर घडून येईल याला प्रमाण काय? कारण हें आश्वासन "परत्र" लोकाला धरून असल्यामुळें तें प्रत्यक्ष प्रयोगानें कधीं च सिद्ध होण्यासारखें नाहीं.—येथें मुळाशीं जो "शक्तीचा पुरावा" मानण्यांत येतो तो पुनः एकवार जशाचा तसा श्रद्धारूप असतो, कीं त्या योगें च केवळ जी गोष्ट घडून येईल अशाबद्दल श्रद्धा आश्वासन देते ती गोष्ट घडून आल्यावांचून रहात नाहीं. सूत्ररूपानें असें म्हणतां येईल: "माझी श्रद्धा आहे कीं श्रद्धा मुक्ति देते; **तस्मात्** ती सत्य आहे".—परंतु येवढें म्हटल्यावर आमचे सर्व बाण संपून गेले. हें "तस्मात्" पद सत्यनिर्णयाच्या बाबतींत अगदीं **तर्कविरुद्ध** आहे.--आतां आपण किंचित् तंग ढिला करून मुक्ति ही श्रद्धेनें सिद्ध होते (केवळ ईप्सित स्वरूपाची **नव्हे**, आणि केवळ पुरोहिताच्या अविश्व-

सनीय मुखांतून आश्वासनरूपानें बाहेर पडलेली नव्हे ) असें घटकाभर मानूं या : मुक्ति—किंवा नीतीच्या परिभाषेंत बोलावयाचें म्हणजे सुखवृत्ति—हें सत्याचें प्रमाण कसें होऊं शकेल? हा पुरावा इतका लंगडा आहे कीं, " सत्य काय आहे " या प्रश्नास उत्तर देतांना जेव्हां आपल्या मनावर सुखाच्या भावनेचा परिणाम होतो तेव्हां हें असत्याचें लक्षण आहे, निदान तें सत्य तरी अत्यंत संशयास्पद आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. " सुखा " च्या द्वारें पुरावा हा च सुखाचा पुरावा आहे—दुसरें कांहीं नाहीं; " सत्य " सिद्धांत हे असत्य सिद्धांतांपेक्षां अधिक सुख देतात असें मानण्यास काय जागा आहे? आणि सृष्टीच्या पूर्वकल्पित संवादी घटनेला धरून सत्य सिद्धांतांच्या मागोमाग आनंद हा ठेवलेला च असें तरी म्हणावयास काय आधार आहे? जगांतील अति मोठ्या विचारसंपन्न आणि आचारसंपन्न तत्त्ववेत्त्यांचा अनुभव याच्या अगदीं **उलट** आहे. सत्याचा एकेक पावला इतका प्रदेश काबीज करण्यास दारुण झगडे करावे लागले आहेत, आणि त्यांत आपल्या अन्तःकरणाला, आपल्या स्नेहभावाला, आणि आपल्या जीवितावरील विश्वासाला अति प्रिय असणाऱ्या वस्तूंचे यज्ञ करावे लागले आहेत. सत्य संपादण्याकरितां महात्मत्व लागतें: सत्याची सेवा ही सर्व सेवांत अतिशय खडतर आहे.—मग बुद्धीच्या प्रदेशांत सरळपणा म्हणून जो म्हणतात त्याचा अर्थ काय? त्याचा अर्थ हा कीं, मनुष्य स्वतःच्या मानसिक प्रवृत्तींविषयीं अति कडक असतो,

तो "सुंदर भावनां" विषयीं तिरस्कार दर्शवितो, आणि तो कोणत्या हि तत्त्वाविषयीं होय किंवा नाहीं म्हणण्यास सदसद्विवेकबुद्धीचा उपयोग करतो! —— —— श्रद्धा मुक्ति देते; **तस्मात्** श्रद्धा खोटें बोलते........

## ५१

श्रद्धेपासून कांहीं प्रसंगीं मुक्ति मिळूं शकते, एका च कल्पनेचा **सतत ध्यास** लागल्यामुळें मुक्ति मिळते, इत्यादि सर्व कल्पना खोट्या आहेत; श्रद्धेनें डोंगर उचलण्याचें कार्य होत **नाहीं**, परंतु पूर्वीं जेथें त्यांचें आस्तित्व नसतें तेथें मात्र ते तत्काळ उत्पन्न होतात—ह्या सर्व गोष्टी एखाद्या **वेडयांच्या सदनांत** सहजगत्या फेरी मारली असतां उत्तम प्राचीतीस येणार आहेत. उघड च कोणा हि पुरोहिताला हें पटणार **नाहीं**: कारण तो उपजत बुद्धीनें च रुग्णावस्थेला रुग्णावस्था व वेड्याच्या सदनाला वेड्याचें सदन म्हणणें नाकबूल करतो. ख्रिस्तीधर्माला रुग्णावस्थेची **इष्टापत्ति** च आहे, जशी प्राचीन ग्रीसला निरामयत्वाच्या समृद्धिसंपन्न स्थितीची इष्टापत्ति होती. चर्चच्या संपूर्ण मुक्तिविषयक घटनेचा साक्षात् अंतस्थ हेतु **मनुष्याला रोगी बनविणें** हा आहे. आणि खुद्द चर्च हें च आपल्या अंतिम ध्येयाच्या स्वरूपांत कॅथॉलिक पंथाच्या **वेड्यांचें सदन** नाहीं काय?—ह्या संपूर्ण भूलोकाला च वेड्याचें सदन बनविण्यांत आलें नाहीं काय?—ज्या तऱ्हेचा धार्मिक मनुष्य उत्पन्न करणें हा चर्चचा उद्देश आहे तो

**नासक्या** मानुष्याचा नमुना होय. ज्या काळीं एखादी धर्मातील क्रांति लोकांवर आपलें वर्चस्व मिळविते त्या काळीं बहुधा मज्जातंतूंच्या रोगाची सांथ पसरलेली असते; धार्मिक मनुष्याची " अन्तःसृष्टि " ही एखाद्या चिडखोर आणि हतवीर्य लोकसमुदायाच्या " अन्तःसृष्टी " शीं अगदीं हंसूं येईल इतकी सदृश असते; ख्रिस्तीधर्म मनुष्यजातीला नीतीचें सर्वश्रेष्ठ मूल्य म्हणून ज्या " अत्युच्च " अवस्था बहाल करतो त्या सर्व अपस्माराच्या स्वरूपाच्या आहेत,—चर्चेनें **देवाची महती वाढविण्याकरितां शुद्ध** वेडे किंवा अट्टल सोदे अशांना च केवळ पवित्र म्हणून ठरविलें आहे. एकदां मी प्रायश्चित्त आणि मुक्ति एतद्विषयक संपूर्ण ख्रिस्ती शिक्षणक्रमाला ( हा शिक्षणक्रम आज मितीस इंग्लंडांत उत्तम पहावयास सांपडतो ) **पुनः पुनः उचल खाणारा वेडाचा झटका** असें म्हटलें होतें; आणि जी जमीन अगोदर च त्याला अनुकूल होईल अशा रीतीनें तयार झालेली असते,—म्हणजे जी रोगजंतूंनीं परिपूर्ण भरून गेलेली असते, अशा जमीनींत च त्याची अत्यंत व्यवस्थित रीतीनें लागवण होते, असें मत प्रतिपादलें होतें. ज्या कोणाला वाटेल त्या प्रत्येकाला च कांहीं ख्रिस्ती होतां येत नाहीं : कोणा हि मनुष्याचें ख्रिस्तीधर्मांत " धर्मांतर " होत नाहीं,—तो तितक्या प्रमाणांत रोगग्रस्त असला पाहिजे..........उलट ज्यांना स्वतः चें आरोग्य राखणें आणि शत्रूबद्दल तिरस्कार दाखविणें या दोहोंबद्दल सारखें च मुबलक धैर्य आहे असे **आम्हीं** आणि आमच्या पक्षाचे लोक

जी या धर्माची निर्भर्त्सना करतात ती किती यथायोग्य आहे हें पहाण्यासारखें आहे. कारण हा धर्म च असा आहे कीं,— जो लोकांना शरीराविषयीं भलत्या च गोष्टी शिकवितो; जो आत्म्याविषयींच्या भ्रामक कल्पनांचा त्याग करण्यास केव्हां च तयार होत नाहीं; जो शरीराला पुरेसें पोषक अन्न मिळूं न देण्यांत सद्गुण समजतो; जो निरामय स्थितींत 'देविल' किंवा सैतान, 'मोहजाल' किंवा मायावर्त इत्यादि प्रकारच्या काल्पनिक शत्रूंशीं झगडा करीत बसतो; जो प्रेतवत् शरीरांत सर्वगुणसंपन्न आत्मा निवास करणें शक्य आहे असें आपल्या मनाशीं ठरवितो; आणि जो ह्या अंतिमाला धरून एक नवीन च खुळचटपणें डोक्यांतून बाहेर पडलेली फिकट आणि रोगट "पूर्णत्वा" च्या ध्येयाची कृति घेऊन तिला "पवित्रपणा" च्या पदवीला नेऊन पोंचवितो,—हा पवित्रपणा कसा तर जो निःसत्व, दुर्बल, आणि अपकृष्टतेच्या पराकाष्ठेला पोंचलेल्या शरीराचा निदर्शक आहे! ........युरोपीय चळवळ ह्या दृष्टीनें ख्रिस्ती संप्रदायाचें कार्य हें अथपासून इतिपर्यंत सर्व तऱ्हेच्या गाळाचें व कचऱ्याचें एकत्र सांठवण आहे (—आणि हे च कचरावजा गाळसाळ लोक, ख्रिस्तीधर्माच्या द्वारें, सत्तेची आकांक्षा बाळगतात). हा धर्म एका विवक्षित मानववंशाचा ऱ्हास दर्शवीत **नाहीं**, तर तो जगांतील प्रत्येक ठिकाणाहून एकमेकांकडे आकर्षित होऊन एकत्र गोळा झालेल्या सर्व प्रकारच्या नासक्या कुजक्या मानवव्यक्तींचा सामुदाइक जमाव आहे. ख्रिस्तपूर्व प्राचीन काळाच्या—**उदात्त** प्राचीन काळाच्या—

केवळ भ्रष्टतेमुळें च ख्रिस्तीधर्माचा अवतार शक्य झाला हें म्हणणें, कांहीं लोक समजतात त्या प्रमाणें, यथार्थ नाहीं: हल्लींच्या काळीं कित्येक पढतमूर्ख या कल्पनेला उचलून धरण्याची जी खटपट करतात तिचा जितका कडक रीतीनें निषेध करावा तितका थोडा च आहे. ज्या वेळीं रोमच्या अखिल साम्राज्यांत रोगी, आणि पतित चांडाळ यातींनीं ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला त्यावेळीं तेथें **तद्विरुद्ध नमुन्याचे** लोक—उमद्या सरदारवर्गीतील लोक—अत्युच्च दशेंत आणि परिपूर्ण अवस्थेंत हयात होते. परंतु महत्तमसंख्याकांच्या हातांत सत्ता गेली; ख्रिस्ती मनोभावनेंतील लोकसत्तेचा विजय झाला........ख्रिस्तीधर्म हा " राष्ट्रीय " नव्हता, तो मानववंशाच्या आधारावर प्रस्थापित झालेला नव्हता,—जीवितापासून भ्रष्ट झालेल्या सर्व बेवारशी लोकांना तो चांगला पटतो, त्याला सर्व ठिकाणीं सहज दोस्त मिळूं शकतात. रोगग्रस्तांच्या दीर्घद्वेषावर ख्रिस्तीधर्माची इमारत उभारली आहे; त्याची स्वाभाविक वृत्ति सुदृढ आणि निरोगी यांच्या **विरुद्ध** आहे. जी जी वस्तु सुसंघटित, स्वाभिमानपूर्ण, धीरोदात्त, आणि सौंदर्यसंपन्न असते ती ती वस्तु या धर्माच्या डोळ्याला आणि कानाला दु:सह होते. पुन्हा मी तुम्हांला संत पाउलाच्या बिनमोल शब्दांची आठवण करून देतो: " आणि देवानें जगांतील **दुर्बल** वस्तु, आणि **मूर्ख** वस्तु, आणि **नीच** वस्तु, आणि **तिरस्कृत** वस्तु यांची पसंती केली: " हें च त्याचें सिद्धांत वाक्य, या बिरुदानें अवनतीचा विजय झाला.—**क्रूसावरील देव**—ह्या चिन्हाचा भयंकर

अंतस्थ हेतु अद्याप कोणाला च कसा कळत नाहीं?—जें जें दु:खांत खिचपत असतें, जें जें क्रूसावर लटकतें तें दैवी आहे ........आपण सर्व क्रूसावर लोंबकळत आहोंत. तस्मात् आपण दैवी आहोंत............फक्त आपण च दैवी आहोंत........ ख्रिस्तीधर्म हा विजयी आहे; तद्द्वारें अभिजात शीलाचे लोक नष्ट झाले,—ख्रितीधर्म हा आजपर्यंत मानवजातीवर ओढवलेल्या आपत्तींपैकीं सर्वांत मोठी आपत्ति होय.——

## ५२

ख्रिस्तीधर्म हा मनाचे ठायीं ज्या ज्या कांहीं सुव्यवस्थित वृत्ति असतात त्यांना विरोध करून राहतो,—तो ख्रिस्ती पद्धतीची विवेकबुद्धि म्हणून शुद्ध रोगट विवेकबुद्धीचा आश्रय करतो; जें जें कांहीं खुळचट असतें त्याची तो बाजू उचलतो; तो " बुद्धिमत्ते " वर निरामय बुद्धीच्या स्वाभिमानावर शापवृष्टि करतो. ख्रिस्तीधर्माचें सर्व सार रुग्णावस्थेंत असल्यामुळें त्या धर्माचें विशिष्टांग जी " श्रद्धा " ती सुद्धां या रुग्णावस्थेचें च एक रूप असणार हें उघड आहे; आणि म्हणून च ज्ञानाकडे जाणारे जे सर्व ऋताचे, सत्याचे, आणि शास्त्राचे मार्ग आहेत त्यांना निषिद्ध ठरवून चर्चेनें त्यांचा अव्हेर केला आहे............संशय मनांत येणें हें च अगोदर पाप आहे ........ख्रिस्ती पुरोहिताच्या ठिकाणीं मानसिक शुचितेचा जो पूर्ण अभाव असतो, आणि जो त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट व्यक्त होतो, तो त्याच्या नासक्या अवस्थेचा परिणाम होय.

अपस्मारानें पछाडिलेल्या स्त्रिया आणि गंडमाळांनीं पीडिलेलीं पोरें यांचें निरीक्षण केलें असतां स्वाभाविक रीत्या सदा असत्याकडे प्रवृत्ति, निष्कारण खोटें बोलण्याची खोड, आणि सरळ पाहण्याची व सरळ चालण्याची असमर्थता इत्यादि प्रकारें अवनतीचा दर्शक भरपूर पुरावा तेव्हां च दिसून येणार आहे. " श्रद्धा " या वस्तूचा सरळ अर्थ सत्य काय आहे हें समजून घेण्याकडे जाणून बुजून दुर्लक्ष करणें. धार्मिक मनुष्य, मग तो पुरोहितवर्गापैकीं स्त्री असो वा पुरुष असो, हा असत्यवादी असतो, कारण व्याधिग्रस्त असतो : त्याची उपजत भावना च त्याला सत्यानें आपला पाय कोठें हि स्थिर करतां कामा नये अशी **मागणी** करिते. " जें रुग्णस्थिति निर्माण करतें तें सुष्ट असतें: जें ऋद्धीपासून, समृद्धीपासून आणि बलसिद्धीपासून उगम पावतें तें दुष्ट असतें: " हा श्रद्धाळूंच्या मताच्या निष्कर्ष. **खोटें बोलण्याचा निग्रह**—दुराग्रही देवशास्त्री कोण हें ओळखण्याची माझ्या मतें ही निश्चित खूण आहे.—देवशास्त्र्याची दुसरी खूण म्हणजे **भाषाशास्त्राच्या** ज्ञानाविषयीं अपात्रता. आतां भाषाशास्त्र या शब्दानें मी जें काय समजतों त्यापासून सामान्यत : इतका च बोध घ्यावयाचा कीं, भाषाशास्त्र म्हणजे शुद्धवाचनाची कला, अर्थ करण्यांत गोष्टी जशा घडल्या असतील तशा त्यांचा विपर्यास न करतां विचारांत घेणें, आणि जिज्ञासेच्या भरांत सावधपणा, धिमेपणा, आणि सूक्ष्मपणा न सोडणें. भाषाशास्त्र म्हणजे अर्थ लावण्यासंबंधीं अति **सावध वृत्ति**, मग तें पुस्तक असो, वर्तमानपत्रां-

तील बातमी असो, मानवाच्या भवितव्यतेचें लिखित असो, वा वायुमापनशास्त्राचे गणित असो,—" आत्म्याची मुक्ति " हा विषय असला तरी त्याला हि नियम तो च........जेव्हां एखादा देवशास्त्रज्ञ,—मग तो बार्लिनमधला असो किंवा रोममधला असो,—दाविदाच्या सामांच्या अति श्रेष्ठ प्रतीच्या मार्गदर्शक दीपिकेच्या प्रकाशाच्या द्वारें " पवित्रग्रंथां " तील एखाद्या ऋचेचा अर्थ सांगण्याचा प्रयत्न करतो, किंवा आपले दिव्य स्वानुभव कथन करण्याचा आव घालतो, अथवा क्वचित् आपल्या राष्ट्राच्या सेनेच्या विजयोत्सवाचें वर्णन करूं लागतो तेव्हां ती त्याची पद्धति इतकी बिलक्षण **धाष्टर्याची** दिसते का ती पाहून कोणा हि भाषाशास्त्रज्ञाच्या अंगावर शहारे आल्यावांचून राहणार नाहींत. आणि या हि पेक्षां अधिक जेव्हां कोणी पवित्र जीवनाचे पुरस्कर्ते आणि स्वाबिया प्रांतांतील इतर नंदी आपल्या धुरकट खोपटांतील दररोजच्या क्षुद्र जीवनाच्या कहाण्या " देवाचा वरदहस्त, " " दयेचा " चमत्कार, " दैवाची " लीला, " मोक्षाचे " साक्षात्कार इत्यादि भाबड्या कल्पनांनीं सजवून मोठ्या गंभीरपणें सांगूं लागतात तेव्हां तर या भाषाशास्त्रज्ञांची काय त्रेधा उडत असेल ती विचारावयास च नको ! ह्या क्षुद्रांनीं आपल्या बुद्धीचा,—प्रशस्त भावनेचा असें म्हणणें सोडून च द्या,—जरी किंचित् उपयोग केला असता तरी त्यांना अशा प्रकारचे अर्थ करण्यानें आपण देवाच्या हस्तकौशल्याचा केवढा उपमर्द करीत आहोंत आणि त्यायोगें आपल्या पदरांत किती पोरकटपणा आणि मूर्खपणा

येत आहेत याचा चांगला बोध झाला असता. आमच्या अंगीं प्रेमळ धार्मिकतेचा किंवा भक्तीचा जरी किंचित् ओलावा नसला, तरी जो देव आमच्या नाकांत सर्दी झाल्याबरोबर ती ताबडतोब बरी करण्यास धांवतो, किंवा आमच्या डोक्यावर मेघ वृष्टि करूं लागल्याबरोबर आम्हांस गाडींत नेऊन बसविण्याची तजवीज करतो, अशा देवाबद्दल आम्हांस कींव आल्यावांचून रहात नाहीं. हा देव इतका हास्यास्पद आहे कीं जर तो कदाचित् अस्तित्वांत असला च तर त्याचें सर्वथा उच्चाटण होणें अगत्याचें आहे. देव हा घरांतील नोकर, डाकेचा शिपाई, आचारी पाणक्या (–संतलीलामृतांतील संतांचा आणि भक्तिविजयांतील भक्तांचा पाठीराखा ),–थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे जगांत ज्या सहजासहजीं अत्यंत मूर्खपणाच्या गोष्टी घडून येतात त्यांचा वाचक हा शब्द आहे........" देवाची करणी " या कल्पनेवर आज " सुसंस्कृत " जर्मनींतलि एकतृतीयांश जनता ज्या अर्थानें विश्वास ठेवते तो अर्थ त्या देवाचें अस्तित्व च मूलतः खंडन करणारा आहे, किंबहुना यापेक्षां अधिक जोराचें खंडन दुसऱ्या कोणत्या हि अर्थानें होणार नाहीं. आणि कांहीं म्हटलें तरी हा वाद जर्मन लेकांच्या विरुद्ध त्यांच्या गळयांत येणार आहे यांत संशय नाहीं.

५३

एखाद्या तत्त्वाकरितां प्राणत्याग करणाऱ्या मनुष्याच्या योगें त्या तत्त्वाची बाजू दृढ होते व त्याला पुरावा मिळतो

ही कल्पना इतकी अनिश्चित आहे की, ज्याचा कांहीं सत्याशीं संबंध आहे असा कोणी आत्मयज्ञ करणारा धर्मवीर आजपर्यंत जगांत कधीं झाला होता किंवा नाहीं या प्रश्नाला मी यत्किंचित् किंतु न बाळगतां नकारात्मक उत्तर देईन. हा धर्मवीर ज्या विशिष्ट पद्धतीनें आपलें सत्याचें लहानसें गांठोडें जगाच्या डोक्यावर फेंकतो त्या पद्धतीवरून च त्याच्या बौद्धिक सरळपणाची नीच अवस्था आणि त्याची "सत्या" च्या प्रश्नाला उत्तर देण्याची वक्र विचारसरणी तत्काळ प्रत्ययास येते. या कारणामुळें अशा मनुष्याच्या वादाचें खंडन करण्याची मुळीं जरूर च उरत नाहीं. सत्य ही कांहीं अशी वस्तु नाहीं कीं ती एकाला मिळेल आणि दुसऱ्याला न मिळाली तरी चालेल: सत्याबद्दल अशा प्रकारची कल्पना केवळ गांवढ्यांना आणि लूथरसारख्या गांवढळ धर्मप्रवर्तकांना च पटणारी आहे. बुद्धीच्या क्षेत्रांत मनुष्याच्या सदसद्विवेकाचा अंश जितका जास्त वाढेल तितका तो या मुद्यविषयीं जास्त नम्रपणा दाखवील हें पक्कें समजावें. पांच गोष्टी **जाणणें**, आणि नंतर मोठ्या खुबीनें हात वारून **बाकीच्या** जाणण्यास नाकारणें...." सत्य, " —प्रत्येक धार्मिक प्रवक्ता, प्रत्येक पंथाभिमानी, प्रत्येक विचारस्वातंत्र्यवादी, प्रत्येक समाजसत्तावादी, आणि प्रत्येक चर्चाधिकारी यांची सत्याविषयीं जी कल्पना आहे तीवरून असें सप्रमाण सिद्ध होतें कीं मनाचें संयमन आणि इंद्रियांवर प्रभुत्व हीं जीं दोन सत्याच्या संशोधनार्थ—सत्याच्या अगदीं लवमात्र संशोधनार्थ—अवश्य लागणारीं अंगें आहेत त्यांत

यांचा प्रवेश हि झालेला नाहीं.—जातां जातां हें सांगितलें पाहिजे कीं, तत्त्वाकरितां आत्मयज्ञ करणाऱ्या धर्मवीरांच्या मृत्यूंनीं जगाच्या इतिहासांत फार मोठी हानि घडून आलेली आहे : त्यांनीं लोकांना भलत्या मार्गाला लाविलें........ज्या कार्याकरितां एखादा मनुष्य आपला देह ठेवतो ( किंवा ज्यांत, ख्रिस्तीधर्माच्या प्राथमिक काळाप्रमाणें, आत्मयज्ञ करण्याची सांथ च उद्भवते ), त्या कार्यांत कांहीं तरी तथ्यांश असला पाहिजे असा जो निष्कर्ष सर्व वेडेपीर, स्त्रिया, आणि सामान्य लोक काढतात,—हा निष्कर्ष सर्व संशोधनाच्या मार्गांत अड-थळा आणतो, नव्हे तो संशोधनाच्या आणि सावधपणाच्या तत्त्वाला बाधक होतो. तत्त्वाकरितां मरण पतकरणाऱ्या धर्म-वीरांनीं सत्याच्या कार्याला **अपाय** केला आहे........आज मितीस सुद्धां ज्याकडे एरवीं कोणी ढुंकून पहाणार नाहीं अशा एखाद्या अप्रसिद्ध पंथाला हि यदाकदाचित् त्याचा कोठें किंचित् छळ झाला तरी लोकांत चांगलें नांव मिळवितां येतें. काय ? एखाद्या कार्याकरितां यद्यपि कोणी आपल्या प्राणांची आहुति दिली तत्रापि त्या कार्याचें वास्तविक रूप किंचिन्मात्र बदलूं शकेल काय ? जरी एखादा प्रमाद सन्माननीय ठरला तरी तो आपल्या मूळच्या प्रमादाच्या च स्वरूपांत कायम राहणार हें उघड आहे; मात्र त्यांत आणखी एका प्रलोभक गुणाची भर पडेल यांत संशय नाहीं : प्रिय देवशास्त्रज्ञहो, तुमच्या असत्याचाराकरितां आम्हीं तुम्हांला धर्मवीर होऊं देण्याची संधी देऊं अशी तुमची कल्पना आहे काय ?—एखादी वस्तु

जपून बर्फावर ठेवल्यानें जसें तिचें योग्य खंडन (पाणी) होतें, तद्वत् देवशास्त्र्याचें खंडन करण्यांत आलें पाहिजे. जगांतील सर्व इतिहासप्रसिद्ध छळकरी लोकांचा जो मूर्खपणा झाला तो हा च कीं, ज्या गोष्टीशीं ते झगडले तिला त्यांनीं आत्मयज्ञाचा मोहक गुण बहाल केला, आणि या रीतीनें तिचा मान केल्यासारखें दर्शविलें........एखाद्या चुकीपुढें आज मितीस हि स्त्रिया लोटांगण घालतात; कारण, चुकीकरितां कोणी तरी क्रूसावर मृत्यु पावलें असें त्यांना सांगण्यांत आलें आहे. **या वरून क्रूस हा एक प्रमाणभूत पुरावा आहे काय?** परंतु या सर्व गोष्टींविषयीं आज हजारों वर्षें मानवजातीला ज्याची आवश्यकता वाटत आहे तें फक्त एका च पुरुषानें कथन केलें आहे,—झरथुष्ट्र.

"ते ज्या मार्गानें गेले त्या मार्गावर त्यांनीं रक्तानें अक्षरें लिहून ठेवलीं, आणि त्यांच्या मूर्खपणानें शिकविलें कीं सत्य हें रक्तानें सिद्ध होतें.

"परंतु रक्त हें सत्याचें सर्वांत हलकें प्रमाण आहे; रक्त हें अति शुद्ध शिक्षणांत हि विष कालवतें, आणि त्याला भ्रामक कोटीला नेऊन हाडवैराच्या स्थितीला पोंचवितें.

"आणि जेव्हां एखादा मनुष्य आपल्या मताकरितां अग्निप्रवेश करतो, तेव्हां त्या पासून काय सिद्ध होतें? हें च कीं, जेव्हां एखाद्याचें मत स्वतःच्या ज्वलनाच्या व्यतिरिक्त उदय पावतें तेव्हां तें अधिक श्रेयस्कर असतें." ("एवमब्रवीझ्झरथुष्ट्रः" भाग २, प्रकरण २६, विषय—'धर्मपुरोहित', ऋचा ३०-३२).

५४

तुम्हीं आपली फसवणूक करून घेऊं नका: मोठीं मनें नास्तिक असतात. झरथुष्ट्र नास्तिक आहे. बल, आणि मनाच्या शक्तीपासून—अपरंपार शक्तीपासून—उद्भव पावणारें स्वातंत्र्य हें नास्तिकवृत्तीच्या द्वारें प्रगट होतें. एखाद्या तत्त्वाला नैतिक मूल्य आहे किंवा नाहीं या बद्दल ज्यांचें मत ठाम झालेलें असतें अशा मनुष्यांचा कांहीं उपयोग नाहीं. ठाम मतें तुरुंग होत. ठाममतवाले फार दूरचे पहात नाहींत, ते विशेष उंचीवरून खालीं अवलोकन करीत नाहींत: परंतु एखाद्या वस्तूला नैतिक मूल्य आहे किंवा नाहीं याबद्दल मत देण्याचा अधिकार येण्यास मनुष्याला आपल्या **खालीं** आणि आपल्या **मागें** पांचशें मतें दिसलीं पाहिजेत........जी विभूति मोठमोठ्या कार्यांची अपेक्षा धरिते आणि त्या बरोबर च त्यांच्या साधनांची इच्छा करिते, ती निश्चयानें नास्तिकवृत्तीची असते. प्रत्येक ठाममतापासून अलिप्त राहणें हें बलाचें द्योतक आहे, स्वत:चे डोळे स्वतंत्रपणें उघडण्याच्या शक्तीचें निदर्शक आहे........नास्तिकाची उत्कट उत्साहवृत्ति, त्याच्या जीवनाचा आधार व शक्ति, जी त्याच्या स्वत:पेक्षां हि अधिक ज्ञानयुक्त व अनियंत्रितसत्ताभिमानी असते, ती त्याची सर्व बुद्धिमत्ता आपल्या कारणीं खर्ची घालते; ती त्याला विधिनिषेधात्मक कर्माचाराबद्दल बेफिकीर बनविते; ती त्याला अपवित्र साधनांचें देखील अवलंबन करण्यास धैर्य देते; आणि कांहीं बाबतींत तर ती त्याला आपलीं मतें ठाम करण्यास प्रवर्तक होते. ठाम मत

**साधन** म्हणून : केवळ ठाम मताच्या साधनानें च पुष्कळ कार्य घडून येतें. उत्कट उत्साहवृत्ति ही ठाममतांचा उपयोग करून घेऊन त्यांना आपल्या ठिकाणीं पचविते, ती त्यांच्या पुढें मान वांकवीत नाहीं—तिला स्वतःच्या सार्वभौमसत्तेची जाणीव असते. उलट : श्रद्धेची आवश्यकता, ज्यांत कांहीं ठाम होय किंवा नाहीं सांगितलें आहे अशा तत्त्वाची—म्हणजे कार्लाइल-गिरीची (हा शब्दप्रयोग करण्याची मला परवानगी असावी) आवश्यकता, हें **दुबळेपणाचें** चिन्ह आहे. श्रद्धा बाळगणारा मनुष्य, प्रत्येक स्वरूपांतील आणि प्रत्येक अवस्थेंतील "श्र-द्धाळु," हा निश्चयपूर्वक परावलंबी असतो;--तो आपलें **आपण** अंतिम होऊं शकत नाहीं, तो स्वतःच्या अन्तःप्रेरणेनें स्वतःचें अंतिम ठरवूं शकत नाहीं. "श्रद्धाळु" हा आपला आपण कोणी नसतो, तो केवळ दुसऱ्याच्या हातांत एक बाहुलें होतो, त्याचा कोणी तरी **उपयोग करून** घ्यावा लागतो, त्याला कोणी तरी हातांत धरून वागविणारा पाहिजे असतो. त्याच्या उपजत भावनेला स्वार्थत्यागरूप नीतीबद्दल अति आदर वाटतो : त्याच्या ठायीं वसत असलेला प्रत्येक गुण, त्याचें दूरदर्शित्व, त्याचा स्वानुभव, त्याचा आत्माभिमान, हे सर्व त्याला ह्या विशिष्ट नीतीचें अवलंबन करण्यास उत्तेजन देतात. प्रत्येक प्रकारची निष्ठा ही स्वभावतःच आत्मनिषेध आणि आत्मवियोग यांचें आविष्करण करिते.... आतां मनु-ष्याच्या वर्तनाला आळा घालून बाह्यतः त्याला एका जागीं स्थिर करणाऱ्या नीतीच्या नियंत्रणाची बहुजनसमाजाला किती

आवश्यकता आहे, आणि तसें च हे नियंत्रण, किंवा अधिक सयुक्तिक म्हणजे दास्य, दुर्बल इच्छेच्या मनुष्याला आणि विशेषत: स्त्रीला आपला उत्कर्ष करून घेण्यास कशी एक च आश्रयभूत अंतिम अवस्था आहे, याचा जर कोणी थोडा विचार केला तर त्यास निश्चितमत किंवा "श्रद्धा" म्हणजे काय याचा अर्थ तेव्हां च कळणार आहे. निश्चितमताच्या मनुष्याला श्रद्धेच्या ठायीं मोठा पाठिंबा सांपडतो. कित्येक गोष्टींबद्दल निवळ अंधपणा असणें, कोणत्या हि गोष्टीबद्दल नि:पक्षपाती नसणें, कोणत्या तरी एका च पक्षाला सदा चिकटून राहणें, प्रत्येक नैतिक मूल्य ठरविण्याच्या बाबतींत कडक रीतीनें एका च मताची तरफदारी करणें आणि तें अपरिहार्य आहे असें मानणें—केवळ ह्या च मानसिक अवस्थांमध्यें अशा प्रकारचा मनुष्य आपलें आयुष्य कंठू शकतो. परंतु हें सर्व सत्यवादी मनुष्याच्या,–सत्याच्या विरुद्ध, त्याच्या अगदीं उलट बाजूचें आहे........श्रद्धाळु मनुष्याला "सत्य" आणि "असत्य" या प्रश्ना बद्दल विवेकबुद्धि धारण करण्याची मोकळीक च नसते: ह्या मुद्यासंबंधीं सरळपणा राखणें म्हणजे त्याचा तत्काळ अध:पात च झाला म्हणून समजावें. त्याच्या रुग्णावस्थेंतील विचाराच्या मर्यादा त्याला आपल्या ठाममतवादीपणांतून सरळ धर्मवेडा किंवा माथेफिरू बनवितात,—सॅव्होनारोला, लूथर, रूसो, रॉब्सपीअर, सँ–सिमाँ,–हे सर्व वास्तविकरीत्या सर्वतंत्रस्वतंत्र बलवान् आत्म्यांच्या विरुद्ध जातीचे नमुने आहेत. परंतु ह्या रुग्ण मनोवृत्तीच्या दुर्बल आत्म्यांचे, ह्या कल्पना-

मय क्षेत्रांतील अपस्मारपीडितांचे बडेपणाचे आविर्भाव सामान्य जनसमूहावर मोठा परिणाम करितात,—धर्मवेडे हे चित्रासारखे शोभायमान दिसतात, आणि मनुष्यजातीला युक्तिवाद ऐकण्यापेक्षां आविर्भाव पाहणें पसंत पडतें.

५५

"श्रद्धे" च्या मनःस्थितीच्या मीमांसेंत आणखी एक पाऊल पुढें टाकूं. निश्चितमतें हीं असत्यवादापेक्षां हि सत्याला अधिक विघातक आहेत किंवा काय याबद्दल कांहीं काळापूर्वीं नुकते च माझ्या मनांत विचार येऊन गेले ("मानवी परिपूर्ण—मानवी" भाग १ सूत्र ५४ आणि ४८३). आतां येथें मी हा प्रश्न निकालांत काढण्याकरितां स्पष्ट विचारतों : निश्चितमत आणि असत्याविधान यांत कांहीं तरी फरक आहे काय? —सर्व जगाची समजूत अशी आहे कीं यांत फरक आहे, पण सर्व जगाची समजूत वाटेल त्या गोष्टीबद्दल वाटेल ती असूं शकते! प्रत्येक निश्चित मताला त्याचा इतिहास असतो, त्याच्या मागें सुरवातीपासून पायऱ्या असतात, त्याचा अंधारांत चांचपडण्याचा आणि प्रमाद करण्याचा काळ असतो : पुष्कळ काळ **अनिश्चित** दशेंत राहिल्यानंतर तें निश्चित होतें, पुष्कळ काळ त्या बद्दल साशंकवृत्ति असते ती हळूहळू जावी लागते. काय? असत्य हें निश्चितमताचें गर्भांतील रूप असूं शकणार नाहीं काय?—कधीं कधीं हें परिवर्तन होण्यास व्यक्ति बदलण्याचा च अवकाश असतो : पुष्कळ वेळां बापाचे ठायीं जें

असत्य असतें तें मुळाचे ठिकाणीं निश्चितमत होतें.—जें आपण पाहिलें तें पाहिलें नाहीं म्हणणें, ज्या प्रकारानें तें नक्की पाहिलें त्या प्रकारानें त्याची गणना न करणें, याला मी असत्य म्हणतों : मग तें असत्य चारचौघां देखत सांगितलें आहे किंवा नाहीं हा प्रश्न नाहीं.—सर्वांत मोठें सामान्य स्वरूपाचें असत्य म्हणजे जें आपण आपल्याशीं करतों तें : दुसऱ्याशीं असत्य बोलणें हें तदपेक्षेनें अपवादात्मक ठरतें. आतां जें आपण पाहिलें तें पाहिलें नाहीं म्हणणें, किंवा ज्या प्रकारानें तें नक्की पाहिलें त्या प्रकारानें त्याची गणना न करणें, ही गोष्ट जो कोणी एखाद्या पक्षाला जाऊन मिळतो किंवा एखाद्या संप्रदायाची दीक्षा घेतो त्याला अगदीं महत्वाची पहिली अट म्हणून पाळावी लागते : जो मनुष्य एखाद्या पक्षाचा किंवा संप्रदायाचा अनुयायी होतो तो निश्चयानें असत्यवादी बनतो. उदाहरणार्थ, जर्मन इतिहासकार घ्या. त्यांची अशी पक्की समजूत आहे कीं रोमन लोक अनियंत्रित सत्तावादी होते, आणि ट्यूटॉन लोकांनीं जगांत प्रथम स्वातंत्र्याची कल्पना प्रसृत केली : या निश्चितमतवादांत आणि असत्यांत काय फरक आहे? इतकें समजल्यानंतर, जेव्हां सर्व च पक्ष—त्यांत जर्मन इतिहासकार हि आले च—अगदीं सहजगत्या नीतीची अगडबंब भाषा वापरतांना दिसतात तेव्हां त्यांत कांहीं आश्चर्य वाटण्याचें कारण उरत नाहीं!—जो मनुष्य एखाद्या पंथाचा पुरस्कार करतो, मग तो पंथ कोणता हि असो, त्याला जी प्रतिक्षणीं नीतीची आवश्यकता भासते ती केवळ त्या मनुष्याचें जीवित

त्या नीतीवर अवलंबून असतें म्हणून होय.-" हें आमचें निश्चित मत आहे : आम्हीं सर्व जगाला तें सांगण्यास तयार आहों, आम्हीं त्या करितां जगतों आणि त्या करितां मरतों,- ज्याच्या जवळ असें कांहीं निश्चितमत आहे त्याला आम्हीं मान देतों ! "-या प्रकारचे उद्गार कित्येक यहुदिद्वेष्ट्यांच्या तोंडून बाहेर पडलेले मी ऐकले आहेत. अहो सद्गृहस्थ हो, तुम्हीं म्हणतां त्याच्या अगदीं उलट वस्तुस्थिति आहे ! एखादा यहुदिद्वेष्टा केवळ तत्त्वाकरितां खोटें बोलतो येवढयावरून कांहीं तो यत्किंचित् हि सन्मान्य ठरत नाहीं........धर्मपुरोहित,— जे अशा बाबतींत मोठे तार्क्ष्यदृष्टीचे असतात, आणि ज्यांना असल्या निश्चितमतवादाच्या विरुद्ध—म्हणजे एखादें काम साधून घेण्याकरितां तत्त्वानें आचरिलेल्या असत्याच्या विरुद्ध—काय काय आक्षेप निघण्यासारखे आहेत हें पूर्णपणें ज्ञात असतें, अशा धर्मपुरोहितांनीं या ठिकाणीं यहुदी लोकांपासून फार दूरदर्शीपणानें " देव ", " देवाची इच्छा ", " देवाचा साक्षात्कार ", इत्यादि कल्पना जशाच्या तशा उचलल्या. कांटनें सुद्धां आपल्या "नीतीच्या जातिसिद्ध आज्ञे " ला धरून या च मार्गाचें अवलंबन केलें : ही च त्याची व्यावहारिक बुद्धीची विचारसरणी होय.—कांहीं प्रश्न असे असतात कीं त्यांमध्यें मनुष्याला सत्यासत्याचा निर्णय च करतां येत नाहीं; सर्व प्रमुख प्रश्न, नैतिक मूल्याचे सर्व प्रमुख सिद्धांत, हे मनुष्याच्या विचारशक्तीच्या बाहेर आहेत....बुद्धीच्या मर्यादा जाणणें—हें च खरें तत्वज्ञान होय. देवानें मनुष्याला आपला शब्द कशाकरितां दिला ?

देव उगीच एखादी अवास्तव गोष्ट करील काय ? मनुष्याला आपण होऊन चांगलें काय आणि वाईट काय हें कांहीं च कळत नाहीं, म्हणून देवानें त्याला आपली इच्छा प्रकट केली ........तात्पर्य : पुरोहित खोटें बोलत नाहीं, पुरोहित ज्या गोष्टींसंबंधीं बोलतो त्यांत " खरें " किंवा " खोटें " हे प्रश्न च उपस्थित होऊं शकत नाहींत; अशा गोष्टींत खोटें बोलणें शक्य च होत नाहीं. कारण, खोटें बोलावयाचें असेल तर अगोदर तेथें खरें काय आहे हें समजणें आवश्यक आहे. परंतु येथें च तर मनुष्याला कांहीं जाणतां येत नाहीं : तस्मात् पुरोहित हा च केवळ देवाची तुतारी आहे.—या प्रकारचें पौरोहिती बाण्याचें तार्किक अनुमान हें निखालस याहुदीय नाहीं किंवा निखालस ख्रिस्ती हि नाहीं; असत्यकथनाचा हक्क आणि " ईश्वरप्रणीत धर्मा " चें दूरदर्शी धोरण हे संपूर्ण पुरोहितवर्गाचे च जातिसिद्ध गुण आहेत, मग तो अवनत ख्रिस्तीकाळांतलि असो वा उन्नत पेगनकाळांतलि असो (-पेगन म्हणजे जुन्या ग्रीक आणि रोमन लोकांप्रमाणें जे कोणी ख्रिस्ती-लोकांहून निराळे लोक जीवनासंबंधीं आदर दर्शवितात, आणि जे " देव " हा शब्द सकलवस्तुमात्रांसंबंधीं कृतज्ञतेच्या भावार्थानें उपयोजितात ते सर्व). " धार्मिक कायदा ", " देवाची इच्छा ", " अपौरुषेय पवित्र ग्रंथ ", आणि " ईश्वरी प्रेरणा ".-ह्या सर्व कल्पना पुरोहितवर्ग ज्या स्थितींमध्यें सत्ताधारी होतो आणि ज्यांच्या साहाय्यानें तो ती सत्ता कायम राखतो त्या स्थितींचे केवळ निदर्शक शब्द आहेत,-ह्या कल्पना सर्व

पौरोहिती धर्मघटनांच्या मुळाशीं, सर्व प्रकारच्या आचारमय व विचारमय वर्णाश्रमसंस्थांच्या मुळाशीं त्यांना आधारभूत असलेल्या दिसून येतात. "पवित्रानृत",—जें कॉनफ्यूशिअसचा धर्म, मनुप्रणीत धर्म, महमदी धर्म, आणि ख्रिस्ती चर्च यांत सामान्यतः गोंवलेलें आढळतें, तें प्लेटोच्या ठिकाणीं सुद्धां वास करीत असलेलें दृष्टोत्पत्तीस येतें. "सत्य येथें आहे";—जेथें जेथें हा शब्दप्रयोग उच्चारला जातो तेथें तेथें त्याचा अर्थ **पुरोहित असत्य कथन करतो** असा समजावा.

५६

सगळ्यांत मोठा मुद्याचा प्रश्न हा कीं, कोणत्या **अंतिम** ध्येयांकरितां असत्यें आचरलीं जातात? ख्रिस्ती धर्मांतील साधनांवर जो **माझा** आक्षेप आहे तो येवढ्या च करितां कीं त्या धर्मांत "पवित्र" अंतिमांचा सर्वथैव अभाव आहे. त्यांतलि अंतिम साध्यें निवळ **दुष्ट** आहेत: जीवित विषमय करणें, त्याची निंदा आणि निषेध करणें, देहाचा तिरस्कार करणें, पापाच्या कल्पनेनें मनुष्याला भ्रष्ट करून अपकृष्टतेला नेणें,—म्हणून त्याचे साधनमार्ग हि तितके च दुष्ट आहेत.—मी जेव्हां **मनूचा** स्मृतिग्रंथ वाचला तेव्हां माझ्या मनांत ज्या भावना प्रकट झाल्या त्या याच्या अगदीं उलट होत्या; हा ग्रंथ इतका उच्च दर्जाचा आणि अलौकिक बुद्धिमत्तेचा दर्शक आहे कीं, त्याचें बैबलच्या बरोबर एका च वेळीं एका च श्वासांत नांव **उच्चारणें** हें देखलि **तत्त्वाच्या** विरुद्ध पाप केल्यासारखें होईल. याचें

कारण काय याबद्दल तुम्हांला तेव्हां च तर्क करतां येईल : त्याच्या पाठीशीं आणि त्याच्या आंत खरें तत्त्वज्ञान आहे; त्यामध्यें केवळ याहुदीय रब्बी पांडित्याचा आणि धर्मभोळे-पणाचा दुर्गंधयुक्त अर्क नाहीं,—तर त्यांत अगदीं चिकित्सक मानसशास्त्रज्ञास हि कांहीं तरी मनन करण्यासारखा विषय आहे. आणि येथें सर्वांत अतिशय महत्त्वाची जी बाब आहे ती विसरतां कामा नये; ती ही कीं, हा ग्रंथ आपल्या मूल-भूत तत्त्वानुसार सर्व प्रकारच्या बैबलवजा धर्मग्रंथांहून अगदीं निराळ्या स्वरूपाचा आहे : त्याच्या रचनेप्रमाणें दोन अभि-जात वर्ण, तत्त्वज्ञानी ब्राह्मण आणि युद्धविशारद क्षत्रिय हे सर्व जनपदाचें योग्य रक्षण करतात आणि त्याला नीतीचा मार्ग दाखवितात; हा ग्रंथ उच्च दर्जाच्या नैतिक मूल्यांनीं ओत-प्रोत भरलेला आहे, तो पूर्णत्वाच्या भावनेनें परिपूरित आहे, त्यांत जीवनाबद्दल महान् आदर दर्शविला आहे, आणि त्यांत स्वतःविषयीं आणि जीविताविषयीं आनंदमय स्थितीची विजय-भावना प्रकट केली आहे,—या संपूर्ण ग्रंथावर सूर्याचें वरेण्य भर्ग तळपत आहे.—ज्या सर्व गोष्टी खिस्ती धर्म आपल्या अगाध गांवढळपणानें दडपून टाकतो : प्रजोत्पादन, स्त्री, वि-वाह,—त्या सर्व गोष्टींचें या स्मृतिग्रंथांत अत्यंत आस्थेनें, पूज्य भावानें, प्रेमानें, आणि विश्वासानें फार गंभीरपणें विवेचन कर ण्यांत आलें आहे. ज्या चोपड्यांत पुढील अश्लील आणि घाणे-रडे शब्द ग्रथित असलेले आढळून येतात तें चोपडें स्त्रिया आणि मुलें यांच्या हातांत देण्यास कोण कसा धजावेल ?—

" व्यभिचार टाळण्याकरितां प्रत्येक पुरुषानें आपली स्वतःची विवाहित स्त्री करावी, आणि प्रत्येक स्त्रीनें आपला स्वतःचा विवाहित पुरुष करावा....जळत राहण्यापेक्षां विवाहित होणें बरें ".* आणि मी असें विचारतों कीं, जावत्कालपर्यंत मनुष्याची जन्मोत्पत्ति च खिस्ती करून टाकलेली आहे,—म्हणजे **पुरुषसंबंधाशिवाय गर्भधारणा** या कल्पनेनें दूषित केलेली आहे, तावत्कालपर्यंत खिस्ती होणें सभ्य दिसेल काय? ....मला मनूच्या स्मृतिग्रंथावांचून दुसरा ग्रंथ च माहीत नाहीं कीं ज्यांत स्त्रीविषयीं प्रेमपूर्ण आणि दाक्षिण्ययुक्त अशीं इतकीं विपुल वचनें पहावयास सांपडतील. हे वृद्ध, केश पिकलेले, मुनिवर्य आणि ऋषिश्रेष्ठ, यांच्या ठिकाणीं स्त्रियांचें कौतुक करण्याचें आणि त्यांचा मान राखण्याचें असें कांहीं कौशल्य आहे, कीं त्याला जगांत दुसरीकडे कोठें तोड च नाहीं. एके ठिकाणीं मनु म्हणतो: " स्त्रीचें मुख, कुमारीचें वक्षस्थळ, अर्भकाची प्रार्थना, आणि यज्ञाचा धूर हीं सदा शुचि असतात". अन्यत्र तो लिहितो: " सूर्याचा प्रकाश, धेनूची छाया, वायु, जल, अग्नि, आणि कन्येचा श्वासोच्छ्वास, यांवांचून अधिक कांहीं परिपूत नाहीं ". आणि शेवटीं—कदाचित् हें पवित्रानृत असूं शकेल:—" नाभीच्या ऊर्ध्वभागीं शरीरांतील सर्व छिद्रें पवित्र आहेत, नाभीच्या अधोभागीं सर्व अपवित्र आहेत. फक्त कुमारिकेच्या ठायीं संपूर्ण देह पवित्र आहे ".

* संत पाउल, १. कॉरिंथियन्स ७. २,९.

५७

ख्रिस्तीधर्मांतील साधनांची अपवित्रता मुद्देमालासह सांपडते; फक्त ख्रिस्तीधर्मानें आपल्या पुढें जें ध्येय ठेविलें तें आणि मनूच्या स्मृतिग्रंथांतील ध्येय या दोहोंची तुलना करून पाहिली पाहिजे, व या दोन अगदीं परस्पर विरुद्ध अंतिमांवर कडक प्रकाश पाडला पाहिजे. ख्रिस्ती धर्मावर टीका करणारास ख्रिस्तीधर्म **तिरस्करणीय** आहे असें दाखविल्याशिवाय दुसरा पक्ष च रहात नाहीं. मनूच्या स्मृतीसारखा धर्मशास्त्रग्रंथ हा प्रत्येक उत्तम कायद्याच्या ग्रंथाप्रमाणें च उदयास येतो : तो सर्व जुन्या अनुभवांचा, पूर्वोपायात्मक धोरणांचा, आणि पुष्कळ काळ प्रयोगावस्थेंत असलेल्या नीतिमार्गांचा सारभूत संग्रह करतो, तो वस्तूंना निश्चितार्थानें मर्यादा लावतो, तो यापुढें नवीन कांहीं निर्माण करीत नाहीं. या प्रकारच्या ग्रंथाचें संहितीकरण होण्यास जें मूळ अत्यावश्यक अंग आहे तें हें कीं,—एखादें **सत्य** प्राप्त करून घेण्याकरितां दीर्घ काल आणि दीर्घ श्रम लागले असतां जीं साधनें त्या सत्यास सत्तेचा अधिकार मिळवून देतात तीं साधनें तें च सत्य तर्कवादानें सिद्ध करीत बसणाऱ्या इतर सर्व साधनांपासून मूलतःच भिन्न आहेत, या गोष्टीचें परिज्ञान असणें. कोणता हि कायद्याचा ग्रंथ केव्हां हि त्या कायद्याची उपयुक्तता, त्याचीं कारणें, आणि तत्संबंधीं पूर्वीं होऊन गेलेली कार्याकार्यचर्चा यांची कहाणी सांगत बसत नाहीं : कारण जर तो असें करील तर खात्रीनें आपल्या आज्ञापक वाणीला मुकेल, "तूं केलें पाहिजे"

ही वाक्यरचना, कायदा पाळला जाण्याची ही च पहिली अट होय. हा सर्व प्रश्न बरोबर अशा पद्धतीचा आहे.—एखाद्या राष्ट्राच्या विकसनांतील एका विवक्षित अवस्थेंत, त्यामधील सर्वांत अधिक क्रांतदर्शी वर्ग (म्हणजे जो फार दूरपर्यंत मागचें व पुढचें अवलोकन करतो असा वर्ग) आपल्या राष्ट्र-बांधवांनीं कोणत्या प्रकारें जीवितधारणा केली पाहिजे—अर्थात् त्यांना ती करतां येणें **शक्य** आहे—याविषयीं आपला अनुभव कायमचा प्रस्थापित व्हावा एतदर्थ निवेदन करतो. त्याचा उद्देश इतका च कीं आपण जे अनेक शतकें प्रयोग केले व जे **भयंकर** प्रसंग अनुभविले त्याच्या मोबदला शक्य तितकें पूर्ण आणि समृद्धिकारक पीक आपल्या पदरांत पडावें. अर्थात् आतां यापुढें ज्या गोष्टींचा मुख्यतः त्याग करावयाचा त्या ह्या कीं,—आणखी इतउत्तर ते च ते प्रयोग करीत बसणें, वस्तूंचे अर्थ हा काळपर्यंत ज्या प्रवाही स्थितींत होते ती च स्थिति चालू ठेवणें, त्या अर्थांचें निरीक्षण परीक्षण आणि चिकित्सा **अनंतावधीपर्यंत** करीत राहणें. या सर्वांचा प्रतिबंध करण्या करितां एक दुहेरी तट बांधण्यांत येतो : पहिला तट, **स्वयंसिद्ध धर्म** (श्रुति); ही पहिली प्रतिज्ञा,– या प्रतिज्ञे-प्रमाणें प्रत्येक धर्माचाराची उपपत्ति मुळांत मानवापासून लावतां येत नाहीं, हा धर्माचार कोणा हि मानवानें स्वतःच्या बुद्धीनें योजला नाहीं किंवा तो त्याला अनेक शतकांच्या प्रमादानंतर मोठ्या शोधा अंतीं सांपडला असें हि नाहीं, तर त्याची उत्पत्ति अपौरुषेय आहे, तो पूर्णपणें आणि अक्षरशः इति-

हासाच्या क्षेत्राच्या बाहेर आहे, तो एखाद्या दैवी प्रसादाप्रमाणें अचानक पदरांत पडला आहे, तो सृष्टीच्या नियमाविरुद्ध घडलेला चमत्कार आहे, तो केवळ परमेश्वरप्रणीत संदेश आहे ... दुसरा तट, **परंपरित धर्म** ( स्मृति ); ही दुसरी प्रतिज्ञा,—या प्रतिज्ञेप्रमाणें हे धर्माचार अगदीं प्राथमिक युगापासून परंपरेनें चालत आलेले प्राप्त झाले आहेत; त्यांच्याविषयीं यत्किंचित् संशय धारण करणें महापातक आहे, तो आपल्या पूर्वजांच्या विरुद्ध गुन्हा आहे. या श्रुतिस्मृतिप्रणीत धर्माची सत्ता पुढील दोन तत्त्वांनुसार प्रस्थापित होते : तो देवानें **दिला,** तो पितरांनीं **जगविला.**—अशा प्रकारच्या आचारविचारात्मक पद्धतींत जो उच्च तऱ्हेचा युक्तिवाद दिसतो त्यांतील मुख्य उद्देश हा आहे कीं, जो जीवनमार्ग एकदां युक्त म्हणून ठरला ( म्हणजे जो दीर्घ काळच्या अति परिश्रमपूर्वक सूक्ष्म संशोधनाच्या अनुभवानें **प्रमाणभूत** झाला ) त्यांतून पायरी-पायरीनें मनाच्या संविच्छक्तीचा व्यापार अशा रीतीनें काढून घ्यावयाचा कीं शेवटीं त्या मनाच्या सर्व उपजत भावना पूर्ण-पणें यंत्राप्रमाणें कार्यकारी व्हाव्या,—जीवनाच्या कलेंतील प्रत्येक प्रकारच्या निपुणतेवर अविच्छिन्न स्वामित्व मिळविण्याचा हा केवळ एक च एक शक्य कोटींतील आधारभूत पाया आहे. मनूच्या स्मृतीप्रमाणें कायदेशास्त्राचा ग्रंथ निर्माण करणें हें राष्ट्राला भविष्यकाळांतील प्रभुत्व, भविष्यकाळांतील पूर्णत्व,—अत्युच्च जीवनकलेंत परम नैपुण्य मिळविण्याचा अधिकार—बहाल करण्यासारखें आहे. **अशा अंतिमाकडे**

**दृष्टि देऊन तें जीवन मनाच्या संविच्छक्तीपासून पृथक् करण्यांत आलें पाहिजे** : प्रत्येक पवित्रानृताचा उद्देश हा च असतो.–**वर्णांची व्यवस्था**,–अत्यंत उच्च, सर्वांत श्रेष्ठ अशी ( चतुर्वर्णात्मक ) शासनसंस्था,–ही केवळ **निसर्गघटित व्यवस्थेला**, पहिल्या प्रतीच्या नैसर्गिक धर्मस्थापनेला, अनुमतिपूर्वक पुष्टि आहे इतकें च; अशा संस्थेवर कोणत्या हि कृत्रिम नवीन आचाराचा, "आधुनिक विचाराचा" पगडा बसूं शकत नाहीं. प्रत्येक निरामय समाजांत तीन प्रकारच्या वेगवेगळ्या नमुन्यांचे वर्ग पडतात; हे वर्ग परस्परांशीं सापेक्षभावानें ग्रथित असतात आणि शरीरशास्त्राच्या नियमान्वयें एकमेकांपासून मध्य केंद्राकडे आकर्षिले जातात. यांपैकीं प्रत्येकाचा स्वतःचा आरोग्यमार्ग, स्वतःचें कार्यक्षेत्र, स्वतःची विशिष्ट पूर्णत्वाची भावना, आणि स्वतःचें कलानैपुण्य हीं निरनिराळीं स्वतंत्र असतात. येथें हें जें विभजन होतें तें **निसर्ग** करतो, **मनु** करीत नाहीं. यांतील पहिल्या वर्णांत बुद्धीचें बल मुख्य असतें, दुसऱ्या वर्णांत शरीरबल आणि रजोगुण यांचें प्राधान्य असतें, आणि तिसऱ्या वर्णांत या दोहोंपैकीं कोणत्या हि गुणाचें वैशिष्टय नसतें; हा तिसरा मध्यम प्रतीच्या लोकांचा वर्ण होय,—हा वर्ण बहुसंख्याक असतो, पहिले दोन **निवडक** अल्पांचे असतात. सर्वांत श्रेष्ठ वर्ण ( ब्राह्मण )—मी त्याला **अत्यल्पसंख्याक** वर्ण म्हणतों,–हा पूर्णत्वाच्या शिखराला पोंचलेला वर्ण होय; या वर्णाला आपल्या **अल्पसंख्याकत्वाचे** आणि पूर्णत्वाचे विशेष हक्क असतात : हा

पृथ्वीतलावरील संपूर्ण सुख, सौंदर्य आणि सद्गुण यांचा प्रतिनिधि होण्याचें कार्य या वर्णांतील लोकांच्या शिरावर असतें. केवळ बुद्धिमत्तेंत श्रेष्ठ अशा लोकांना च सौंदर्य आणि सुंदर पदार्थ यांचा हक्क आहे : केवळ अशा लोकांत च सद्गुण हा दुर्बलपणा नसतो. " सौंदर्य हें अति थोड्या निवडक व्यक्तींकरितां आहे " अशी लॅटिन म्हण आहे : सद्गुण हा विशेषाधिकार आहे. उलट पक्षीं, या वर्णांतील लोकांना सगळ्यांत अति निषिद्ध जर कोणती गोष्ट असेल तर तिटकारा उत्पन्न होईल अशा प्रकारची बर्तणूक, किंवा निराशादर्शक मुद्रा—जी मुद्रा प्रत्येक वस्तुमात्राला हिडीस रूप देते,—अथवा एकंदर जगांतील सामान्य वस्तुस्थितीसंबंधीं कोपाचें आविष्करण. कोप हा चांडालाचा हक्क आहे, आणि तसा च निराशावाद. " **जगत् पूर्ण आहे**"—हें तत्त्व मेधावान् विप्रतमाला त्याची उपजत भावना च शिकविते, ही भावना आदरमय असते; " अपूर्णता, आमच्याशीं तुलनेनें **निकृष्टतेचे** सर्व पर्याय, दूरता, दूरतेचें स्वारस्य, इतकें च काय पण प्रत्यक्ष चांडाल हा देखील या पूर्णत्वाचें अंग आहे. " बुद्धिमत्तेंत सर्वश्रेष्ठ अशा या **पूर्णबलवान्** विप्रवर्गाला जेथें इतरांना विनाशाचें भय वाटतें तेथें सुखाचें निधान प्राप्त होतें : ज्ञानमार्गांतील चक्रव्यूह, स्वतःशीं आणि इतरांशीं अति निस्पृह आणि कठोर वर्तन, निष्काम कर्मानुष्ठान; त्यांचा आनंद स्वतःचें स्वतःवर स्वामित्व होय : त्यांचे ठायीं वैराग्य हा सहज धर्म बनतो, ती त्यांना आवश्यक स्थिति असते, ती त्यांची उपजत भावना होऊन

राहते. कष्टप्रद तपश्चर्या ते आपला जातिसिद्ध हक्क समजतात; ज्यांच्या दडपणाखालीं इतरांचा चक्काचूर होऊन जाईल अशा प्रकारचीं कर्मे ते लीलेनें आपल्या शिरावर घेतात, तो त्यांचा **करमणुकीचा** विषय होतो.....ज्ञान, हें तपश्चर्येचें च रूप आहे.—असे हे विप्रवर्य अत्यंत वंदनीय, साक्षात् भूदेव च होत : आणि इतकें असून हि पुनः त्यांची आनंदीवृत्ति आणि दयाशीलता यांत किमपि न्यून पडत नाहीं. ते सत्ता गाजवितात, याचें कारण ते त्याची इच्छा करतात असें नाहीं तर ती त्यांची **प्रकृति** असते; त्यांना दुसऱ्या प्रतीचें स्थान स्वीकारण्याचा विकल्प च नाहीं.—दुसऱ्या प्रतीचा वर्ण ( क्षत्रिय ), हे धर्माचे संगोपक असतात; समाजाची सुव्यवस्था आणि सुरक्षितता सर्वस्वी त्यांच्या शिरावर असते; ते अभिजात युद्धकलाभिज्ञ असतात; त्यांतील मुख्याधिपति राजा असतो; असा राजा क्षात्रतेजाचा अत्युच्च नमुना, न्यायाचा अधिशास्ता, आणि धर्माचा पालनकर्ता असतो—हा द्वितीय वर्ण पहिल्या बुद्धिप्रधान ब्राह्मणवर्णाची अमलबजावणी करणारी शासनसंस्था होय; हे क्षात्रिय आपल्या नियतकर्मांत ब्राह्मणांच्या बरोबरीनें त्यांच्या अगदीं समीपवर्ती असतात; अधिशासनात्मक कर्ममार्गांत जो **जाडाभरडा** भाग असतो तो ते स्वतःकडे घेऊन, त्यापासून ब्राह्मणांना मोकळे ठेवतात,—ते ब्राह्मणांचे परिवारक, जणुं त्यांचा उजवा हात, त्यांचे पट्ट शिष्य असतात. ह्या सर्व गोष्टींत, मी पुनश्च सांगतों, कांहीं एक न्यायाला सोडून नाहीं, कांहीं एक “ कृत्रिम ” नाहीं; या वांचून

जें निराळें असतें तें कृत्रिम असतें,–अशा त्या निराळ्यापासून च खरोखर निसर्गाला शरम वाटते....वर्णांची व्यवस्था, आणि श्रेष्ठकनिष्ठ वर्गरचना ही केवळ साक्षात् जीवनाचा परमोच्च नियम घालून देते; तीन पृथक् नमुन्यांचें तीन ठिकाणीं वर्गीकरण हें समाजधारणेकरितां, आणि उच्चोच्च नमुन्यांचें संवर्धन होण्याकरितां अत्यंत आवश्यक आहे, – हक्कांची विषमता ही च फक्त एक मूळ हक्कांच्या अस्तित्वाला साधक स्थिति आहे.–हक्क हा एक व्यक्तीचा सुख भोगण्याचा विशेष अधिकार होय. आणि प्रत्येक वर्णाला आपआपल्या परीं आपआपला हक्क आहे. आपण दोन वर्णांबरोबर तिसऱ्या म्हणजे मध्यमपतीच्या वर्णाच्या हक्कांची योग्यता कमी लेखतां कामा नये. जीवित हें नेहमीं शिखराकडे अधिकाधिक कठीण होत जातें,–जशी थंडी वाढते तशी जबाबदारी वाढते. उच्च संस्कृति शंक्वाकृति असते : ती केवळ आपल्या रुंद बैठकीवर उभी राहूं शकते, तिचें पहिलें अत्यावश्यक अंग म्हणजे बलवान् आणि सुसंघटित असा मध्यम दर्जाच्या लोकांचा वर्ग. हुन्नर, व्यापार, कृषिकर्म, भौतिकविद्या, आणि कलाकुसरीचे बहुतेक भाग, –एका शब्दांत सांगावयाचें तर औद्योगिक आणि वैयापारिक धंद्यांचा संपूर्ण प्रदेश हा केवळ मध्यम वर्गाच्या सामर्थ्याला आणि आकांक्षेला अनुरूप आहे; असले धंदे उच्च अपवादक कोटींतील लोकांच्या योग्यतेच्या बाहेर असतात, कारण या धंद्यांना अनुसरून जी विशिष्ट मनोभावना निर्माण होते ती केवळ अल्पसंख्याकांच्या सत्तेविरुद्ध

असते असें नाहीं तर तितकी च अराजकतेच्या हि विरुद्ध असते. व्यक्तीचे ठिकाणीं, आपण सार्वजनिक उपयोगाचे आहों, आपण एक चक्र आहों, आपण कांहीं कार्य करणारे आहों, अशी जी वृत्ति दृष्टोत्पत्तीस येते तिच्या मागें खचित कांहीं पूर्वार्जित असतें : जी गोष्ट बहुसंख्याक वर्गाला इतकीं थोरलीं बुद्धिवान् यंत्रें बनविते ती गोष्ट कांहीं समाज घडवून आणीत नाहीं, तर त्या वर्गाचे ठिकाणीं जो एका विशिष्ट प्रकारचा **आनंद** उपभोगण्याचें सामर्थ्य असतें तो आनंद च केवळ ती गोष्ट घडवून आणतो; मध्यम वर्गाला आपण मध्यम आहोंत यांत च आनंद वाटतो; त्यांचे ठिकाणीं एका कर्मांत नैपुण्य, विशिष्ट कौशल्य, ही नैसर्गिक भावना असते. मध्यम वर्गामध्यें **स्वभावतः** च कांहीं आक्षेपार्ह आहे असें मानणें हें गहन विचाराच्या तत्त्ववेत्त्यास बिलकुल शोभण्यासारखें नाहीं. कारण अपवादात्मक कोटींतील सर्वश्रेष्ठ पुरुष पैदा होण्यास पहिली आवश्यक अवस्था म्हणजे समाजांत मोठा मध्यम वर्ग असणें; अशा वर्गाच्या योगें उच्च संस्कृति निश्चितता पावते. जेव्हां एखादा अपवादक पुरुषश्रेष्ठ मध्यम वर्गांतील कोणा हि सामान्य मनुष्याला आपल्या स्वतःपेक्षां किंवा आपल्या बरोबरीच्या पेक्षां हि अधिक सौम्यतेनें आणि काळजीनें वागवितो, तेव्हां तें केवळ त्याच्या अंतःकरणाचें सौजन्य असतें असें नाहीं—तर तें त्याचें कर्तव्य च असतें....हल्लींच्या काळांतील बाजारबुणग्यांमध्यें मी सर्वांत अधिक कोणाचा द्वेष करतों? तर समाजसत्तावादी बाजारबुणगे, चांडाळधर्मप्रचारक

यांचा; जे कर्मसंगी अज्ञ जनांचा बुद्धिभेद करतात, त्यांचें सुख हिरावून घेतात, आणि त्यांची आपल्या लहानशा जीवनमार्गांत जी समाधानवृत्ति असते ती दूषित करून टाकतात,—जे त्यांना मत्सरग्रस्त बनवितात, आणि जे त्यांना सूडाची बुद्धि शिकवितात....अन्याय हा केव्हां हि विषम हक्कांत वास करीत नाहीं; तो समान हक्क मागण्यांत वास करतो. **वाईट** काय आहे? परंतु मी पूर्वीं च या प्रश्नाला उत्तर देऊन टाकलें आहे: जें जें कांहीं दुर्बलता, असूया आणि **सूड** यांपासून उद्भवतें तें सर्व वाईट आहे.—अराजक आणि ख्रिस्ती हीं एका च गर्भाशयांतून जन्मास आलेलीं अपत्यें होत....

५८

प्रत्यक्ष व्यवहारांत मनुष्य जें खोटें बोलतो तें कोणता उद्दिष्ट हेतु साधण्याकरितां हें पाहणें फार अगत्याचें आहे: असत्यकथनानें तो कोणाचें रक्षण करतो का **नाश** करतो. **ख्रिस्ती** आणि **अराजक** या दोघांना एका कंसांत एकत्र गोंवणें अगदीं न्याय्य होणार आहे. त्यांचे उद्देश, त्यांच्या मनोभावना, केवळ नाशकारक आहेत. या विधानाचें प्रत्यंतर इतिहासांत स्पष्ट रीतीनें पहावयास सांपडेल: इतिहास तें मोठमोठ्या ठळक अक्षरांनीं अगदीं मनाला धक्का बसेल अशा प्रकारें लिहून दाखवितो. नुकतें च आपण मनुप्रणीत धर्मशास्त्राचें स्वरूप अवलोकन केलें; अशा धर्मशास्त्राचा उद्देश जीविताचा **उत्कर्ष**

होण्याकरितां शक्य तितके अत्युच्च साधनमार्ग घालून देणें, आणि समाजाचें भव्य शरीरयंत्र चिरस्थायी कसें होईल हें पाहणें,—खिस्ती धर्माचें अंगीकृत कार्य अशा प्रकारची समाजघटना मोडून टाकणें, **कारण अशा प्रकारच्या समाजसंस्थेच्या द्वारें च केवळ जीविताचा उत्कर्ष घडून येतो.** एका पक्षीं ( मनुस्मृतिप्रणीत वर्णाश्रमधर्मांत ), युगानुयुगें प्रयोगावस्थेच्या व अनिश्चिततेच्या दीर्घकाळानें बुद्धीच्या पदरीं पडलेलें निखालस ज्ञान हें भावी काळांतील अति दूरचीं उच्च ध्येयें प्राप्त करून घेण्याकरितां, आणि शक्य तितकें विपुल, समृद्ध व परिपूर्ण पीक तयार करून तें सांठविण्याकरितां अति कसोशीनें उपयोगांत आणलें जातें : तर उलट दुसऱ्या पक्षीं ( बायबलप्रणीत खिस्तीधर्मांत), त्या पिकाची एका रात्रींत **राखरांगोळी** झालेली निदर्शनास येते. उदाहरणार्थ रोमचें साम्राज्य घ्या. त्या काळीं स्थित असलेलें हें **रोमन साम्राज्य** हॉरेस कवीनें आपल्या काव्याला उद्देशून म्हटल्याप्रमाणें खरो खर **पंचरशी धातूपेक्षां हि अधिक टिकाऊ** होतें. जगाच्या इतिहासांत इतरत्र कोठें हि दिसून येणार नाहीं अशाप्रकारें अत्यंत प्रतिकूल परिस्थितींत हि पूर्णपणें सुसंघटित झालेलें अति भव्य शासनयंत्र,—ज्याशीं तुलना करून पाहतां त्याच्या पूर्वीं होऊन गेलेलीं आणि त्याच्या मागून झालेलीं सर्व राज्ययंत्रें जणुं एखाद्या ठिगळें लावलेल्या वस्तूप्रमाणें मूल्यहीन, दिखाऊ आणि बटबटीत दिसतात,—अशा रोमन **साम्राज्याचा म्हणजे " मोहमय जगता " चा नायनाट कर-**

ण्याचें " पवित्र " व्रत त्या पवित्र अराजकांनीं आरंभिलें, इतकें कीं या कामांत त्यांनीं एकावर एक दोन दगड धड-राहूं दिले नाहींत,—शेवटीं त्या साम्राज्याचे ट्यूटॉनिक आणि इतर रानटी जातींनीं लचके तोडून तेथें आपलीं राज्यें स्थापिलीं. खिस्ती आणि अराजक हे दोघे हि सारखे च अवनतीचे नासके परिणाम होत; हे दोघे हि असे **रक्त-शोषक** आहेत कीं त्यांना पदार्थांचें चूर्ण करणें, त्यांचे ठायीं विष पेरणें, आणि त्यांना करपऊन त्यांचा कोळ करणें या क्रियांशिवाय दुसऱ्या क्रिया करण्याचें सामर्थ्य च नाहीं. या दोघांची उपजत भावना च त्यांना जें जें कांहीं आपल्या पायावर ताठ उभें राहतें, जें महनीय, चिरस्थायी, आणि भविष्याविषयीं हमी घेणारें असतें त्या सर्वांबद्दल **दारुण वैर** धारण करण्यास प्रवृत्त करिते...खिस्तीधर्म हा **रोमन साम्राज्यास** भक्षण करण्याकरितां एक राक्षस च उत्पन्न झाला,—एका रात्रींत त्यानें रोमन लोकांची अति विशाल कृति नष्ट करून टाकिली; नाहीं तर तिनें मोठा विस्तृत प्रदेश मिळवून त्यावर **चिरकाळ टिकेल** अशी प्रचंड संस्कृति स्थापन करण्याचा घाट घातला होता.—अजून हि कोणाला हें कळत नाहीं काय? जें **रोमन साम्राज्य** आपणास माहीत आहे, आणि जें अधिकाधिक पूर्णत्वानें माहीत करून घेण्याची उत्कंठा रोमन प्रांतांचा इतिहास वाचून आपल्या ठिकाणीं वाढत आहे, तें एक अति मोठ्या प्रमाणावर आंखलेल्या कलेचें अद्भुत प्रदर्शन च होतें. तथापि तो केवळ आरंभ च होता; त्याची रचना

अशी होती कीं त्याची योग्यता काळाच्या सहस्रकांनीं सिद्ध व्हावी,—आजमितीपर्यंत या पद्धतीचें पुनः कांहीं रचलें गेलें नाहीं; हें च काय, पण या प्रमाणावर शाश्वत स्वरूपाचें कांहीं रचलें जावें अशी कल्पना तेव्हांपासून कोणा मनुष्यांच्या स्वप्नांत हि आली नाहीं!—ह्या साम्राज्याची शरीररचना दुर्गुणी बादशहांशीं तोंड देण्याइतकी पुरेशी सुदृढ होती : व्यक्तींच्या बरेवाईटपणाचा परिणाम वास्तूच्या रचनेवर कांहींएक होतां कामा नये—हें सर्व मोठ्या वास्तुशास्त्राचें आद्य तत्त्व आहे. परंतु दूषितांमध्यें अति दूषित जे ख्रिस्ती त्यांशीं मात्र तोंड देण्याइतकी पुरेशी दृढता तिच्या ठिकाणीं नव्हती....हे आंतून पोखरणारे विनाशक कृमि, यांनीं रात्र, धुकें आणि दुटप्पीपणा यांच्या आवरणाखालीं कुटिल पद्धतीचा अवलंब करून प्रत्येक मनुष्याचें प्रेम संपादन केलें, आणि त्याच्याशीं सहवास करून त्याच्या अंतःकरणांतील सत्य वस्तूंविषयीं सर्व कळकळ आणि वास्तविक सत्यांविषयीं सर्व मनोवृत्ति बदलून टाकण्याचा उपक्रम केला; या भेकड, बायक्या, व मिठास टोळीनें क्रमाक्रमानें त्या प्रचंड मंदिरापासून प्रत्येक " आत्म्या " ला परावृत्त करण्याचा सपाटा चालविला,—जे सर्व एकेक मूल्यवान्, वीर्यवान्, धैर्यवान् स्वभावाचे नागरिक होते कीं ज्यांना रोमचें हित हें च आपलें स्वतःचें हित, तें च आपलें जीवितसर्वस्व, तें च आपलें अभिमानपद वाटे. धर्मवेड्यांची चोरटी कारवाई, धार्मिक समितींच्या गुप्त सभा, निरुपद्रवी प्राण्याचा यज्ञ, आणि रुधिर-

प्राशनानें होणारा **तांत्रिक देवसमागम** या सारख्या नरक-तुल्य कृष्णकल्पना, व सर्वांवर ताण म्हणजे हळूहळू पेटवि-लेला द्वेषाग्नि,—चांडाळाच्या द्वेषाचा अग्नि,—हे आणि यासारखे गुण रोमवर स्वामित्व मिळवूं शकले; अशा च प्रकारच्या धर्माचें पूर्वस्वरूप पूर्वीं एकदां ग्रीस देशांत व्यक्त झालें असतां त्यावेळीं तद्विरुद्ध एपिक्यूरसनें युद्ध पुकारलें होतें. ल्युक्रे-शियसचे ग्रंथ वाचून पाहतां एपिक्यूरसनें कोणाचें खंडन केलें तें तत्काल लक्षांत येतें, पेगन धर्माचें **नाहीं**, तर "ख्रिस्ती" धर्माचें,—म्हणजे अपराध, शासन, व अमरत्व या कल्पनांच्या योगें लोकांचीं मनें दूषित करणाऱ्या धर्माचें. एपिक्यूरसनें ज्या **पाताळगामी** संप्रदायांशीं युद्ध आरंभिलें त्या संप्रदायांमध्यें ख्रिस्तीधर्माचें संपूर्ण गुणरूप गूढ रीतीनें वास करीत होतें— आत्म्याचें अमरत्व नाकारणें हें त्याकाळीं खरें **तारण** होतें. —आणि एपिक्यूरस विजयी झाला, रोमन साम्राज्यांतील प्रत्येक संभावित तत्त्वज्ञ एपिक्यूरसच्या मताचा होता : नंतर **संत पाउल अवतीर्ण झाला**....संत पाउल,—रोमच्या विरुद्ध मूर्तिमंत चांडालद्वेष, आणि तसा च " जगता " च्या विरुद्ध, यहुद्याच्या विरुद्ध, **अत्युच्च स्वरूपाच्या** शाश्वत यहुदी नमुन्याच्या विरुद्ध जणुं हा चांडालद्वेष हाडामासानें आणि प्राणानें युक्त होत्साता जो शरीरधारी बनला तो च हा संत पाउल होय....त्यानें मुख्य जें धोरण बांधलें तें हें कीं, यहु-द्यांपासून पृथक् अशा लहानशा ख्रिस्ती पंथाच्या चळवळीच्या मदतीनें सर्व जगांत वणवा कसा पेटवून देतां येईल; आणि

"क्रूसावरील देव" या चिन्हाच्या साहाय्यानें, जे कोणी मातींत दडपून गेलेले, जे गुप्तपणें बंडाचें निशाण घेऊन उभे असलेले, व जे अराजकांच्या कटांतून पैदा झालेले, अशा सर्वांना एकत्र जमा करून एक प्रचंड शक्ति कशी बनवितां येईल. "कारण मुक्ति ही यहुद्यांकरितां च आहे".—ख्रिस्तीधर्म हा सर्व तऱ्हेच्या जमीनीखालीं गुप्तपणें वावरणाऱ्या पंथांचें सार काढून घेऊन व त्यांना बाजूला सारून त्यांच्या संमिश्रणानें बनलेलें रूप आहे,—असे कांहीं पंथ म्हणजे, ओसिरिसचा पंथ, महामाया जगज्जननीचा पंथ, मिथ्रसचा पंथ : संत पाउलाची अचाट बुद्धि हें शोधून काढण्यांत दिसून येतें. या बाबतींत त्याची उपजत बुद्धि इतकी बिनतोड होती कीं, सत्याचा घात करण्याची यत्किंचित् काळजी न करतां, त्यानें हे सर्व चांडालपंथ सहज मोहक कसे दिसतील अशाप्रकारच्या एकेक नवीन कल्पना काढल्या, आणि त्या केवळ आपण च खुद्द निर्माण केलेल्या आपल्या "तारक प्रभू" च्या तोंडून वदविल्या इतकें च नाहीं, तर त्यानें त्या तारकाला असें रूप दिलें कीं मिथ्रसच्या पुरोहिताला सुद्धां हा नवीन देव ओळखीचा वाटावा....हा त्याचा दमास्कसचा काळ होय : त्यानें पाहिलें कीं या मोहमय "जगता" ची किंमत कमी करण्यास आत्म्याच्या अमरत्वावरील विश्वासाची जरूर आहे, रोमवर वर्चस्व मिळविण्यास "नरका" ची कल्पना योग्य आहे, व ऐहिक जीविताचा उच्छेद करण्यास "परलोक" प्राप्तीची इच्छा समर्थ आहे....सर्वविध्वंसक आणि ख्रिस्तोपासक हे

दोन शब्द जर्मन भाषेंत प्रासयुक्त आहेत, आणि ते केवळ समान प्रासाचे च आहेत असें नाहीं.

५९

पुरातन जगाचे सर्व श्रम निष्फळ झाले : अशा प्रकारच्या अति भीषण प्रसंगासंबंधीं माझ्या भावना व्यक्त करण्यास मला शब्द आठवत नाहींत.—आणि ज्या अर्थी त्याचे श्रम केवळ पूर्वतयारीचे असून त्यानें वज्रासारख्या बळकट आत्मविश्वासानें पुढें हजारों वर्षें टिकणाऱ्या मंदिराचा पाया घातला त्या अर्थी ही एक च गोष्ट लक्षांत घेतां त्या प्राचीन जगाचें खरोखर सर्व **अर्थसर्वस्व** लयास गेलें असें म्हणण्यास हरकत नाहीं!....ग्रीकांचा उपयोग काय होता? रोमनांचा तरी उपयोग काय होता?—विद्यासंपन्न संस्कृतीची सर्व प्रकारची पूर्व सामग्री गोळा झाली, सर्व तऱ्हेच्या शास्त्रीय पद्धति अस्तित्वांत आल्या, उत्तम रीतीनें अर्थ लावण्याची अति मोठी अप्रतीम कला प्रस्थापित झाली— जी कला परंपरा, संस्कृति आणि शास्त्रीय एकात्मता यांना अपरिहार्य स्थिति असते,—भौतिक शास्त्र आणि त्याबरोबर च हातांत हात घालून गणितशास्त्र व यंत्रशास्त्र यांना उत्तम प्रकारें चलन मिळालें,—खरी वस्तुस्थिति जाणण्याचें ज्ञानेंद्रिय, सर्व इंद्रियांत शेवटचें व अति महत्त्वाचें इंद्रिय, याची जोपासना करण्याकरितां विद्यालयें निघालीं व तीं कित्येक शतकांच्या परंपरेनें जुनींपुराणीं हि होऊन बसलीं! हें सर्व तुम्हांस अवगत आहे काय? पुढील

महत्कार्याचा आरंभ करण्यास अनुकूल असें प्रत्येक **महत्त्वाचें** ज्ञान शोधून तयार ठेवलें होतें:—ज्ञानाच्या पद्धति, याबद्दल जितके वेळां सांगावें तितकें थोडें च आहे, ह्या अत्यंत कठीण असतात पण तितक्या च त्या प्रधान महत्त्वाच्या असतात, आणि पुन्हां त्यांना रूढी आणि आळस यांशीं दीर्घकाळपर्यंत झगडा करावा लागतो. आज आम्हीं आपल्या अनिर्वचनीय आत्मसंयमाच्या जोरावर—कारण आमच्या सर्वांच्या देहांत कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारें ख्रिस्ती धर्मानें पक्क्या केलेल्या दुष्ट भावना अजून जिवंत आहेत,—जें कांहीं पुनरपि यशस्वी रीतीनें संपादिलें आहे, उदाहरणार्थ, वस्तुस्थितीबद्दल निःपक्षपाती दृष्टि, सावधगिरीनें काम करण्याची हातोटी, अगदीं सूक्ष्म तपासिलांत हि धैर्य आणि गांभीर्य, ज्ञानार्जनांत पूर्ण **ऋजुता**,—हें सर्व त्या काळीं पूर्ण भरांत होतें; दोन हजार वर्षांपूर्वीं तें तेथें होतें! आणि या शिवाय अत्युत्कृष्ट व्यवहारचातुर्य आणि नाजुक अभिरुची त्या काळीं वास करीत होती. केवळ मेंदूला शीण देणाऱ्या स्वरूपाची **नव्हे**! गांवढळ चालीरीतीच्या " जर्मन " संस्कृतीच्या स्वरूपाची हि **नव्हे**! तर मूर्तिमंत, मनुष्यांच्या बाह्य आचारांत आणि अन्तर्गत विचारांत व्यक्त होणारी,—थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे सद्वस्तुस्वरूपाची होती....हें **सर्व व्यर्थ गेलें**! एका रात्रींत तें स्मृतिशेष झालें!—ग्रीक! रोमन! उपजत श्रेष्ठभाव, उपजत सदभिरुचि, पद्धतशीर संशोधन, संघटनात्मक आणि अनुशासनात्मक कलेंत परमावधीचें कौशल्य, श्रद्धा, मानवी भवितव्यते

विषयीं अत्युत्कट इच्छा, रोमन साम्राज्यांत मूर्तत्व पावलेल्या वस्तुमात्राविषयीं महान् आदर, हे सर्व गुण इंद्रियांपुढें हळहळीत उभे राहतात, इतका भव्य डौलदारपणा केवळ एका कलात्वांत च प्रकट झाला होता असें नाहीं तर वस्तुत्वांत, सत्यत्वांत व जीवित्वांत हि तो आविर्भाव पावला होता.— आणि एका रात्रींत हें सर्व पार रसातळास गेलें, निसर्गाच्या उत्पातानें नाहीं! मठ्ठ डोक्याच्या ट्यूटॉन्स लोकांनीं किंवा जड पायाच्या व्हँडाल लोकांनीं हि त्याला तुडवून मारलें नाहीं! तर लबाड, चोरट्या, अदृष्ट, आणि रक्तहीन पिशाच्चांनीं त्याचा खरा नाश केला! आणि ही संस्कृति जिंकण्यांत आली नाहीं, —तर केवळ तिचें रक्त शोषण्यांत आलें!....मनांत कोंडून ठेवलेली सूडाची तृष्णा, दुष्ट असूया, शिरजोर झाली! प्रत्येक नीच मनुष्य, आंतून व्याधिग्रस्त मनुष्य, दुष्ट भावनांनीं पछाडलेला मनुष्य, गांवाबाहेर राहणारीं सर्व भुतेंखेतें एका क्षणांत वर्चस्व गाजवूं लागलीं!—ख्रिस्ती धर्माच्या चळवळ्यांपैकीं कोणा हि एखाद्याचे लेख वाचा—उदाहरणार्ण, संत औगुस्तिन—म्हणजे कोणत्या प्रकारचे गलिच्छ लोक ह्या चळवळींत वरच्या जागेवर जाऊन बसले ते प्रत्यक्ष कळून येतील, त्यांचा स्पष्ट दुर्गंध येईल. ख्रिस्ती चळवळींतील पुढाऱ्यांना बुद्धि व धोरण कमी होतें असें जर तुम्हांस वाटत असेल तर तो मोठा भ्रम आहे:—वा! हे चर्चचे प्रिय वृद्ध पिते महाधूर्त, पवित्रतेच्या मर्यादेला जाऊन पोंचतलि इतके धूर्त, होते! त्यांच्यांत जो कमीपणा होता तो निराळ्या च प्रकारचा होय.

निसर्गानें त्यांची उपेक्षा केली होती,—तो त्यांना सभ्यतेच्या, शिष्टतेच्या, आणि शुचितेच्या भावनांची अगदीं मर्यादित हि देणगी देण्यास विसरला....आपापसांत बोलावयाचें तर ते मनुष्य या नांवाला सुद्धां पात्र नाहींत. इस्लाम जो ख्रिस्ती धर्माचा तिरस्कार करतो तो हजारों पटीनें वाढविला तरी क्षम्य च होईल; कारण धर्माच्या बाबतींत इस्लाम हा मनुष्याचा पूर्व संकेत धरून चालतो.

६०

ख्रिस्तीधर्मानें प्रथम, प्राचीन ग्रीक आणि रोमन संस्कृती-पासून जी आपणास फलसमृद्धि प्राप्त करून घेतां आली अ-सती ती बुडवून टाकली, आणि नंतर इस्लामी संस्कृतीपासून जें फल मिळवितां आलें असतें तें हि पार नाहींसें केलें. स्पेन-मधील संस्कृतच्या शिखरास गेलेला मूर लोकांचा समाज, कीं जो स्वरूपतः आमच्या आजच्या संस्कृतीशीं अधिक संलग्न दिसतो, आणि जो ग्रीस व रोमपेक्षां हि आमच्या इंद्रिय-वृत्तीला व अभिरुचीला अधिक मानवतो, तो **पायाखालीं तुड-वून मारण्यांत आला** (—कोणत्या जातीच्या पायांनीं हें कर्म केलें तें मी सांगूं इच्छित नाहीं), कां ?—तर त्याचा जन्म अभिजात आणि वीरवृत्तीच्या भावनांपासून झाला होता, व त्यानें जीवनाचा आदर केला होता—इतका कीं, दुर्मिळ आणि शेलक्या अशा मूरांच्या इस्लामी चैनबाजीच्या पदार्थांनीं तें जीवन ओतप्रोत भरून गेलेलें होतें!....या नंतर क्रूसेडच्या

धर्मवीरांनीं अशा संस्कृतीच्या विरुद्ध संग्राम पुकारला कीं, ज्या संस्कृतीपुढें वास्तविकरीत्या त्यांनीं नम्रभाव धारण करून धुळींत डोकें घालणें शोभलें असतें,—ज्या संस्कृतीशीं तुलना करतां हल्लींची आपली एकोणिसाव्या शतकांतील संस्कृति सुद्धां दरिद्री आणि "थेरडी" दिसेल.—त्यांना खरोखर लूट पाहिजे होती : प्राच्य देश धनसंपन्न होते....सौजन्या-करितां तरी आपण आपले पूर्वग्रह विसरूं या! क्रूसेडचीं धर्म-युद्धें—उच्च दर्जाची चांचेगिरी, दुसरें कांहीं नाहीं! जर्मन उम-राव—मुळांतील 'व्हिकिंग' म्हणजे पश्चिम किनाऱ्यावरील समुद्रांतील लुटारू, अशा लोकांचें असल्या युद्धांत फार चांगलें फावतें : ह्या जर्मन उमरावांना कसें वळवावें हें चर्चला उत्तम कळत होतें....जर्मन उमराव हे चर्चचे नित्याचे च "संर-क्षक गाडदी" असत, ते चर्चच्या तैनातींत त्याच्या सर्व दुष्ट प्रवृत्तींना मदत करण्यास सदैव सज्ज असत; पण **या सर्वां-बद्दल त्यांना चांगलें च प्रायश्चित्त मिळालें**....कल्पना करा कीं चर्चनें पृथ्वीवरील सर्व अभिजात वस्तूंशीं घनघोर संग्राम पुकारावा आणि तो केवळ जर्मन समशेर, जर्मन रक्त, आणि जर्मन साहस, यांच्या मदतीनें चालवावा! या मुद्यासं-बंधीं एक भाराभर उद्वेगजनक प्रश्न उपस्थित करतां येतील. उच्च संस्कृतीच्या इतिहासांत जर्मन उमरावांना मुळींच स्थान नाहीं म्हटलें तरी चालेल : कारण उघड आहे. ख्रिस्ती धर्म आणि मद्यार्क—हीं दोन मनुष्याला बिघडविणारीं फार मोठीं साधनें आहेत. वस्तुतः इस्लामी धर्म आणि ख्रिस्ती धर्म यांमध्यें

बरेंवाईट निवडण्याचा प्रश्न च राहिलेला नाहीं, आणि तसा च अरब आणि यहुदी यांमध्यें. याचा निर्णय पूर्वीं च आपोआप होऊन गेला आहे : या कामांत आतां कोणाला हि आवडनिवड करण्यास मोकळीक नाहीं. प्रत्येक मनुष्य एक तर चांडाळ जातीपैकीं असतो किंवा **नसतो**...." रोमशीं युद्ध शस्त्रानें मरण येईपर्यंत! इस्लामशीं तह आणि सलोखा": जर्मन बादशाहांमध्यें जो अत्यंत स्वतंत्र वृत्तीचा बाणेदार व प्रतिभावान् पुरुष होऊन गेला त्याचें हें वचन आहे,—द्वितीय फ्रेडरिक, याच्या केवळ मनांत च हें तत्त्व वागत होतें असें नाहीं तर तें त्यानें **कृतींत आणलें**. काय? जर्मन व्यक्ति ही **शिष्ट** मनोभावना धारण करण्यास अगोदर प्रतिभासंपन्न आणि स्वतंत्र वृत्तीची च असणें अत्यावश्यक आहे काय? जर्मन व्यक्ति ही **ख्रिस्ती** मनोभावना धारण करण्यास कोणत्या काळीं कशी प्रवृत्त झाली याचें मला तरी अजून गूढ आहे.

## ६१

या ठिकाणीं पुनः एकवार एका गोष्टीचें स्मरण करून देणें अगत्याचें आहे; मग त्यापासून जर्मन लोकांना या हि पेक्षां शंभर पटीनें अधिक विषाद वाटला तरी हरकत नाहीं. जर्मन लोकांनीं संस्कृतीचें शेवटचें सगळ्यांत मोठें पीक युरोपाकरितां जें सांठवून ठेवणें अत्यंत इष्ट होतें तें बुडवून टाकलें,—तिनें **जुन्या विद्येचा घडून आलेला नवावतार** नष्ट कर-

ण्याचें श्रेय संपादिलें. हें विद्येचें पुनरावतरण कोणत्या स्वरूपाचें होतें याबद्दल अद्याप कोणास कांहीं समजलें आहे काय? कोणास समजून घेण्याची इच्छा आहे काय? ख्रिस्ती नैतिक मूल्यांचें मूल्यांतरीकरण, ख्रिस्ती मूल्यांच्या विरुद्ध मूल्यें, अभिजात मूल्यें, यांना विजय मिळवून देण्याकरितां सकल साधनांच्या, सर्व मनोवृत्तींच्या आणि संपूर्ण बुद्धिमत्तेच्या साहाय्यानें चालविलेला प्रयत्न....आतांपर्यंत सारखें हें च महायुद्ध चालू आहे : विद्येच्या या पुनरुज्जीवनाच्या प्रश्नावांचून दुसरा अधिक महत्त्वाचा प्रश्न च अद्याप उपस्थित झाला नाहीं,—माझा संपूर्ण प्रश्न म्हणजे हा च विद्येच्या नवजीवनाचा प्रश्न होय:—ह्या पुनरुज्जीवनाच्या चळवळींत आपल्या मूल तत्त्वाला न सोडतां शत्रूच्या अगदीं केंद्रस्थानीं अघाडीच्या सर्व सैन्यानिशीं त्याला प्रत्यक्ष तोंड देऊन जितक्या निकरानें हल्ला करण्यांत आला तितक्या निकराचा हल्ला अन्यत्र कोठें पहावयास सांपडणार नाहीं. अगदीं निव्हाळ्याच्या मर्मस्थानावर, साक्षात् ख्रिस्तीधर्माच्या सिंहासनावर हल्ला चढवून तेथें त्या पीठावर अभिजात मूल्यें प्रस्थापित करणें,—म्हणजे त्या जागीं अधिष्ठित असणाऱ्या व्यक्तींच्या ठिकाणीं, त्यांच्या मूलभूत कामनांत, वासनांत, आणि भावनांत, या नवीन मूल्यांचा योग्य शिरकाव करून देणें .... मी माझ्या कल्पनाचक्षूपुढें एक दृश्य अवलोकन करतों, असें कीं जर तें शक्य झालें असतें तर आपल्या सौंदर्यातिशयानें आणि अति शोभायमान रंगांच्या मिश्रणानें पूर्णपणें

जादूसारखें भासलें असतें—मला तर तें उच्च दर्जाच्या सौंद-र्याच्या भव्यपणानें सर्वांगांनीं नितांत स्फुरण पावणारें व चमत्कृतिजनक तेजाच्या किरणांनीं चमकणारें दिसत आहे, ज्याच्या अन्तर्भागीं कलेचें कौशल्य इतक्या दैवी थाटाचें आहे—नरकाच्या परिस्थितींत हि दैवी—कीं अशा तऱ्हेचें अन्य दृश्य सहस्त्रकेंचीं सहस्त्रकें शोधित फिरलें तरी कोणाला कोठें आढळणार नाहीं; असें हें मी आपल्या कल्पनाचक्षूपुढें निर्माण केलेलें चित्र इतकें अर्थपूर्ण आणि त्याचप्रमाणें इतकें विलक्षण विरोधाभासात्मक आहे कीं तें पाहून स्वर्गांतील देवांच्या आपल्या अमृत हास्यानें मुरकुंड्या पडतील,—**सीझर बोर्जिया पोप होणें**....मी काय म्हणतो हें तुमच्या लक्षांत आलें काय?....तर मग ठीक आहे, ज्याची आज **मला** च एकट्याला तळमळ लागून राहिली आहे तो च हा विजय घडून आला असता :—या विजयानें ख्रिस्ती धर्माचें **पार उच्चाटन झालें असतें**!—परंतु काय झालें? एक जर्मन मठवासी, लूथर, रोमला आला. हा मठवासी, ज्याच्या रोमरंध्रांत अपरिपक्क पुरोहिताच्या सर्व द्वेषपूर्ण भावना ओतप्रोत भरून राहिल्या होत्या, तो रोममधील अभिनवविद्यावतार पाहून रागानें लाल झाला....ख्रिस्तीधर्माला त्याच्या **मुख्य अधिकाराच्या** च जागीं पादाक्रांत करून टाकण्याचा हा जो महान् चमत्कार घडून आलेला होता त्याचें रहस्य मोठ्या कृतज्ञताबुद्धीनें समजून घेण्याऐवजीं,—त्याच्या द्वेषाग्नीनें ह्या दृश्यापासून आणखीं नवीन इंधनें कशीं मिळवावीं इकडे आपलें सर्व लक्ष

घातलें. शुद्ध धर्मवेडा मनुष्य केवळ आपल्या स्वतःच्या च हिताचा विचार करतो.—लूथरच्या दृष्टीला पोपची संस्था भ्रष्ट झालेली दिसून आली, परंतु वास्तविकरीत्या तद्विरुद्ध परिस्थिति त्याच्या अगदीं डोळ्यासमोर ढळढळीत टक लावून उभी होतीः पुराण भ्रष्टता, **आदिम पाप**, शुद्ध खैस्त्य-हें आतां कांहीं च पोपच्या पीठावर शिल्लक **नव्हतें**! तर जीवित! जीविताचा जयजयकार! सर्व थोर, सुंदर आणि साहसी वस्तूंबद्दल महान् आदर!....आणि लूथरनें चर्चला पुनः प्रस्थापित केलें; त्यानें त्यावर हल्ला चढविला. या प्रकारें ही विद्येच्या नवीन अवताराची चळवळ अर्थशून्य होऊन बसली, हा महत्प्रसंग **वाया** गेला!—अहो, या जर्मनांनीं आतांपर्यंत आमचें किती नुकसान केलें याची गणती आहे काय? वंध्यात्व—हा च काय तो जर्मनांच्या सर्व क्रियाशक्तीचा परिणाम.—लूथरची धर्मसुधारणा, लायब्निझ, कांट आणि नाममात्र जर्मन तत्त्वज्ञान, स्वातंत्र्याचीं युद्धें, जर्मन साम्राज्य—या प्रत्येक बाबतींत नीट निरीक्षण करून पाहिलें असतां पूर्वीं असलेल्या स्थितींत कांहीं एक फेरफार घडलेला दिसत नाहीं व इष्ट वस्तूंपैकीं एक हि **प्राप्त झालेली आढळत नाहीं**....मी कबूल करतों, हे जर्मन माझे शत्रु आहेत : त्यांच्या ठायीं स्थित असलेल्या धार्मिक कल्पनांत आणि नैतिक अर्थांत जो सर्व प्रकारचा गलिच्छपणा भरला आहे त्या बद्दल मला त्यांचा तिरस्कार वाटतो, आणि प्रत्येक प्रश्नाविषयीं निखालस होय किंवा नाहीं सांगण्याचा प्रसंग आला असतां जें त्यांनीं भेकडपणाचें व्रत अंगिकारलें

आहे त्या बद्दल मी त्यांना तुच्छ लेखतों. जवळजवळ हजार वर्षेपर्यंत त्यांनीं ज्या ज्या गोष्टींत हात घातला त्यांत इकडचें तिकडे करून घोंटाळा उडवून दिला आहे; सर्व अर्धवट कार्यें आणि ज्यां बद्दल युरोपीय लोकांना वीट आलेला आहे अशीं सर्व तीन–अष्टमांश कार्यें या सर्वांचें खापर जर्मन लोकांच्या डोक्यावर फोडलें पाहिजे. खिस्तीधर्मांतील पंथांपैकीं जो सर्वांत अपवित्र, सर्वांत दुराराध्य, आणि सर्वांत दुराधर्ष असा जो " प्रॉटेस्टंट " पंथ त्याची नैतिक जबाबदारी सर्वतोपरी जर्मन लोकांवर च आहे....जर आपण खिस्तीधर्माच्या तावडींतून केव्हां च मुक्त होऊं शकलों नाहीं, तर त्याचा दोष **जर्मन** लोकांवर च लादण्यांत येईल.

६२

—इतकें सांगून मी आतां हें परीक्षण संपवितों आणि आपला निकाल जाहीर करतों. मी खिस्तीधर्माचा **निषेध** करतों, आणि त्यावर अत्यंत तीव्र आरोप ठेवून –इतके तीव्र कीं आजपर्यंत कोणा हि निषेधकाच्या तोंडून ते निघाले नसतील —त्याला विरोध करतों. माझ्या मतें मनुष्याला जेवढ्या म्हणून भ्रष्टतेच्या प्रकारांची कल्पना करतां येईल त्या सर्वांत हा धर्म अग्रेसर आहे, आणि पुनः भ्रष्टतेच्या सीमेची जेवढी कल्पना करतां येईल तितक्या सीमेला जाण्याची त्याची तयारी आहे. खिस्ती चर्चनें आपल्या भ्रष्टीकरणाच्या तडाक्यांतून कोणाला हि सुटूं दिलें नाहीं : त्यानें प्रत्येक नीतीच्या अर्थाचें

तद्विरुद्ध अर्थीत परावर्तन केलें, प्रत्येक सत्याला असत्य कोटींत काढलें, आणि प्रत्येक ऋजु प्रवृत्तीला शरम वाटण्यासारखें कुटिल रूप दिलें. त्याच्या दयाशीलतेच्या योगें सुखाचें वरप्रदान मिळालें असें जो कोणी म्हणणारा असेल त्यानें माझ्यापुढें येऊन म्हणण्याचें धाडस करावें! कोणत्या हि स्वरूपाच्या दुःखाचें **परिमार्जन** करणें हें तर त्याच्या मूलभूत हितसंबंधांच्या अगदीं विरुद्ध आहे; साक्षात् त्याचें जीवन च दुःखावस्थांच्या अस्तित्वावर अवलंबून आहे; स्वतःला चिरस्थायी करून घेण्याकरितां या धर्मानें दुःखाच्या अवस्था निर्माण केल्या....उदाहरणार्थ, पाप नामक रोगजंतु : या दुःखाची मानवजातीच्या संपत्तींत भर टाकण्याचें कार्य प्रथम ख्रिस्ती चर्चनें केलें!—" देवाच्या पुढें सर्व आत्म्यांची समता". —हें **असत्य विधान** सर्व नीचमनोवृत्तीच्या मनुष्यांच्या **द्रोहाला** कारणीभूत झालें, तो एक अराजकी कल्पनेचा बांबगोळा ठरला, त्याचा शेवट राज्यक्रांतींत घडून आला, ती आधुनिक कल्पना बनली, आणि तें संपूर्ण समाजघटनेच्या विनाशाचें तत्त्व होऊन राहिलें,—हें असत्य विधान खरोखर **ख्रिस्ती** डायनामाइट होय....ख्रिस्तीधर्माच्या " दयाशीलत्वा " मुळें मिळणारें सुखाचें वरप्रदान! स्वतःच्या विरुद्ध स्वतःला अपवित्र करून घेण्याची कला वाढविणें, कांहीं झालें तरी असत्यकथन न सोडणें, आणि **दयाशीलत्वाच्या** नांवाखालीं सर्व उदात्ताच्या आणि सत्याच्या भावनांबद्दल द्वेष आणि तिरस्कार माजविणें, यांना च तुम्ही ख्रिस्तीधर्मापासून मिळालेलें सुखाचें

वरप्रदान म्हणतां काय?—परोपजीवित्व ही च एक चर्चची पद्धति आहे; मानवजातीपासून सर्व रक्त, सर्व प्रेम, सर्व जीवि ताशा, शोषण करून घेणें, आणि तें हि पंडुरोगी पवित्र ध्ये यांच्या साहाय्यानें. "परलोक" म्हणजे इहलोकाचा निषेध करण्याची उत्कट इच्छा; क्रूस म्हणजे आजपर्यंत जगांत उद्भव पावलेल्या कटांमध्यें सर्वांत गुप्त आणि भुयारांत जमून केलेल्या कटाच्या धंद्याची निशाणी,—आरोग्य, सौंदर्य, सुसंघटितपणा धैर्य, बुद्धि, मनाचें औदार्य, यांच्या विरुद्ध, साक्षात् जीविताच्या विरुद्ध....

ख्रिस्तीधर्माविरुद्ध हा जो त्रिकालाबाधित आरोप आहे तो मी सर्व भिंतीवर, जेथें जेथें भिंती असतील तेथें तेथें, मोठ्या आनंदानें लिहून ठेवीन,—माझ्याजवळ अशीं अक्षरें आहेत कीं जीं आंधळ्याला सुद्धां दिसूं शकतील....ख्रिस्तीधर्म हा एक च महा शाप आहे असें मी समजतों, तो अति प्रचंड आणि खोल असा एक च सद्वस्तुविपर्यास आहे, ती एक च सूडाची उपजत भावना आहे,—त्याला अतिशय विषारी साधनें वापरणें, अतिशय वक्र मार्गांचा अवलंब करणें, व अतिशय गुप्त व नीच युक्त्या उपयोगांत आणणें, याबद्दल कांहीं च दिक्कत वाटत नाहीं,—मनुष्यजातीवर हा एक च एक कधीं पुसला जाणार नाहीं असा काळाकुट्ट डाग आहे असें मी समजतों....

आणि ज्या **अमंगल दिवशीं** हें दैवदुर्विलसित घडून आलें त्या दिवसापासून **काल** गणण्यांत येऊं लागला—ख्रिस्ती धर्माच्या जन्मकालाच्या तिथीपासून!—**त्याच्या अंतकालाच्या तिथीपासून कां नाहीं?—आजपासून?** सर्व अर्थांचें अर्थांतरीकरण!....

**समाप्त.**

आपुल्या ज्योतींत जळण्या तत्पर
होई बा सत्वर निश्चयानें ।
निश्चयानें कैसें तेज पावशील
जरी न होशील राख आधीं ॥ १ ॥

मत्सराचे डोळां सान दिसशील
जई उडशील उंच व्योमीं ।
व्योमीं उंच ऊडे धैर्याचा सागर
द्वेषाचें आगर होय जनीं ॥ २ ॥

—" सदसतांच्या पलीकडे ".

# ख्रिस्तांतक निट्झ्शे

## नीट्झ्शेच्या ख्रिस्तांतकाचें पर्यालोचन

## ख्रिस्तांतक हा नीट्झशेचा शेवटचा ग्रंथ होय.

हा ग्रंथ नीट्झशेनें मूळ योजलेल्या एका चतुर्विभागात्मक मोठ्या ग्रंथाचा पहिला भाग आहे. त्या ग्रंथाचें नांव '**अखिल नैतिक अर्थांचें अर्थांतरीकरण**'. हा ग्रंथ नीट्झशेच्या हातून पूर्णतेला गेला नाहीं. तथापि त्यांतील हा जो एक च पहिला भाग तयार झाला त्यावरून व पुढील भागांचे जे त्यानें मथळे योजून ठेवले होते त्यांवरून त्या संपूर्ण ग्रंथाचें स्वरूप लक्षांत येण्यासारखें आहे. हे चारी भागांचे मथळे येणेंप्रमाणें:—

( १ ) **ख्रिस्तांतक**—ख्रिस्तीधर्मावर चढविलेला टीकेचा हल्ला.

( २ ) **मुक्तात्मा**—सर्वसंहारक चळवळीच्या दृष्टीनें तत्त्वज्ञानावर टीका.

( ३ ) **नीतिध्वंसक**—अत्यंत विनाशक स्वरूपाच्या अज्ञानाच्या म्हणजे नीतीच्या विरुद्ध टीका.

## (४) शंभुभैरव–शाश्वत उत्पत्तिलयाचें तत्त्वज्ञान.

य प्रकारें सदरहु 'ख्रिस्तांतक' हा ग्रंथ एका मोठ्या कल्पनेचें एक अंग आहे. हा ग्रंथ इ. स. १८८८ च्या सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या दिवशीं इटलीमध्यें ट्यूरिन येथें समाप्त झाला. कारण त्या च दिवशीं त्यानें आपल्या 'जुन्या कल्पनामूर्तींच्या अस्तमानाचा संधिप्रकाश' नामक पुस्तकाला प्रस्तावना लिहिली आणि तिचे शेवटीं ही गोष्ट मुद्दाम नमुद करून ठेवली. ह्या लहानशा त्रोटक प्रस्तावनेचा पहिला परिच्छेद अवलोकन केला असतां या विशिष्ट ग्रंथसमाप्तीच्या दिवशीं त्याची मनोवृत्ति कोणत्या प्रकारची होती हें उत्तम निदर्शनास येतें. तो म्हणतो:–

'पदोपदीं औदासिन्य उत्पन्न करणाऱ्या अति जबाबदारीच्या कर्मांत मनाची उल्हसित वृत्ति कायम राखणें हें कांहीं कमी कौशल्याचें काम नाहीं. आणि खरोखर अशा उल्हसित वृत्तीवांचून दुसरें अधिक आवश्यक काय असणार! जी गोष्ट पैदा करण्याला अशा उल्हासित वृत्तीची मदत मिळत नाहीं ती गोष्ट केव्हां हि जयाला जात नाहीं. बलाचा अतिरेक हा च एक बलाचें निश्चित प्रमाण आहे.–सर्व **मूल्यांचें मूल्यांतरीकरण**,–हा प्रश्न इतका कृष्णतिमिर आणि जगडव्याळ आहे कीं तो त्या पृच्छकावर च आपली छाया पाडतो,–हें काम इतकें बिकट महत्त्वाचें आहे कीं जो तें मोठ्या उत्सुकतेनें आपल्या शिरावर घेतो त्याला वारंवार सूर्यप्रकाशांत येऊन ही उत्सुकता झाडून टाकवी लागते, कारण तिच्या खालीं तो अगदीं दडपून जाऊन अर्धमेला होतो. हें साध्य प्रत्येक साधनाला समर्थक असतें; या मार्गावरील प्रत्येक गोष्ट जीविताला उपकारक होते. सर्वांत श्रेष्ठ काय, तर युद्ध जे कोणी

महात्मे आपल्या अन्तःकरणाच्या प्रदेशांत फार लांबवर शिरलेले असतात, अथवा जे अति खोल विचारांत वृद्धिंगत झालेले दिसतात त्या सर्वांचें एक च एक अति मोठें शाश्वत धोरण म्हणजे युद्ध होय. युद्धांतील जखम पुनःपुनः भरून येणाऱ्या बलाला उत्तेजित करते. फार वर्षांपासून मी एक पुरातन लॅटिन म्हण आपलें बिरुद वाक्य केलें आहे, त्या वाक्याचें मूळ ठिकाण मी पंडितांच्या जिज्ञासेपासून मुद्दाम दूर ठेवतों; तें वाक्य असेंः—माझें प्राणनकर्म वाढत आहे, वीरत्वाच्या जखमेपासून च माझें वीरत्व द्विगुणित होत आहे."

यावरून नीट्झशेला प्रस्तुत ख्रिस्तांतक ग्रंथ लिहिण्याचे वेळीं केवढी बिकट जबाबदारी वाटत होती, आणि त्या बरोबर च त्याला आपल्या मनाची समता किंचित् हि ढळूं न देण्याची किती तीव्र जाणीव होती हें स्पष्ट दिसून येतें. ख्रिस्तांतक लिहून त्यानें 'सर्व मूल्यांचें मूल्यांतरीकरण' याचा एक भाग संपविला. इ. स. १८८८ हें संपूर्ण वर्ष निट्झशेच्या मताप्रमाणें त्याच्या आयुष्यांतील फार मोठें महत्वाचें वर्ष आहे. या वर्षांत त्यानें चार स्वतंत्र गद्यपद्यात्मक लेख लिहिले.—

**(१) 'जुन्या मूर्तींच्या अस्तमानाचा संधिप्रकाश'**—नीट्झशेच्या म्हणण्याप्रमाणें यांतील तत्त्वज्ञान हातांत हातोडा घेऊन पुकारलें आहे. अर्थात् या ग्रंथांत युरोपनें गेल्या दोन हजार वर्षांत ज्या जुन्या ख्रिस्ती नीतीच्या कल्पनांच्या मूर्ति मोठ्या प्रेमानें आणि पवित्र भावानें घट्ट उराशीं बाळगून ठेविल्या होत्या त्यांचा त्यानें टीकेच्या हातोड्या खालीं चक्काचूर करून टाकिला आहे. म्हणून च नीट्झशे हा आपणास 'मूर्तीभंजक' व

' नीतिविध्वंसक ' म्हणवून घेतो, आणि हिंदुपुराणांतील लय-कारक शंभूच्या भैरवमूर्तीप्रमाणें ग्रीक देवमंडलांतील संहारक गुणांचा देव जो ' डायोनिसस् ' त्याचा परम भक्त मानतो. हा ग्रंथ नीट्झ्शेनें सप्टेंबरच्या तिसऱ्या तारखेस इटलीमध्यें ' सिल्स मारिआ ' गांवीं पूर्ण केला, व तो सातव्या तारखेस छापखानेवाल्यांचेकडे छापण्यास दिल्यानंतर लागलीच पुढील ' ख्रिस्तांतक ' ग्रंथ लिहिण्यास हातीं घेतला वर सांगितलें च आहे कीं या ग्रंथाची प्रस्तावना ' ख्रिस्तांतका ' च्या समाप्तीच्या दिवशीं म्हणजे ता० ३० सप्टेंबर रोजीं लिहिण्यांत आली. तथापि या ग्रंथांत आणखी कांहीं महत्त्वाची भर आक्टोबर महिन्यांत घालण्यांत येऊन तो ग्रंथ कायमचा हातावेगळा झाला.

(२) ' झरथुष्ट्राचीं गीतें '—येथें प्रथम च झरथुष्ट्र या नांवाबद्दल ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं सदर नांव नीट्झ्शेनें आपणा स्वतःकरितां योजलें आहे. झरथुष्ट्र किंवा जरत्-त्वष्ट्र हा फार प्राचीन काळचा आर्य असुर ऋषि होय. हें विशिष्ट नांव धारण करण्यांत नीट्झ्शेनें एकदम पहिल्या तडाक्यासरशीं आपल्या ख्रिस्तीपणाचा निषेध केला हें उघड आहे. मूळ झरथुष्ट्र हा मोठा नीतिवादी होता. किंबहुना त्याचा मझ्दयस्नी झरथुष्ट्री संप्रदाय हा शुद्ध नीतिप्रधान आहे. तथापि ही नीति आर्य स्वरूपाची असल्यामुळें ती सेमेटिक म्हणजे अनार्य नीतीपासून सर्वस्वी भिन्न आहे. ही नीति मुख्यतः द्वंद्वावर उभी आहे व द्वंद्व हें जगताच्या

विसृष्टीचें आदिकारण आहे. अर्थात् अशा प्रकारची नीति द्वंद्वनिर्द्वंद्वाचा विचार करणाऱ्या नीट्झ्शेला प्रथम पासून मान्य झाली यांत नवल नाहीं. तथापि नीट्झ्शेनें झरथुष्ट्राचा धर्म व त्यांतील विशिष्ट सांप्रदायिक नीति जशीच्या तशी आपल्या तत्त्वज्ञानांत अवलंबिली असें नाहीं. त्यानें केवळ खिस्तीधर्माच्या विरुद्ध आर्य धर्मांतील प्रसिद्ध पुरुषाचें हें नांव आपल्या तत्त्वज्ञानाला योग्य आहे असें पाहून धारण केलें इतकें च. या नांवाखालीं जें जें कांहीं त्यानें लिहिलें आहे तें सर्व त्याचें स्वतःचें आहे. त्यांत प्राचीन झरथुष्ट्राचा वस्तुतः कांहीं संबंध नाहीं. अशा झरथुष्ट्राला त्यानें ' खिस्ताविरोधक ', ' नीतिध्वंसक ', ' नास्तिकवादी ', वगैरे जीं विशेषणें लावलीं आहेत तीं सर्व आपल्या स्वतःच्या खिस्तीधर्माच्या विरोधक भावनेला धरून होत. नीतिविध्वंसक म्हणजे खिस्तीधर्मांतील विशिष्ट चांडाळनीतीचा विध्वंस करणारा, आर्यधर्मांतील उच्च ब्राह्मणनीतीचा विध्वंस करणारा नव्हे. नास्तिकवादी म्हणजे खिस्ताचा एक विशिष्ट देव आणि त्या देवाचें सत्य न मानणारा, आर्यधर्मांतील अनेक देवांचें अस्तित्व अमान्य करणारा नव्हे. अर्थात् यावरून झरथुष्ट्राचें किंवा ' झरथुष्ट्र ' नाम धारण करणाऱ्या नीट्झ्शेचें सत्य काय किंवा देव काय, हे खिस्तीधर्मांतील सत्यापासून व देवापासून सर्वतोपरि भिन्न आहेत हें निर्विवाद आहे. नीट्झ्शेनें पांच वर्षांपूर्वीं म्हणजे इ. स. १८८३ मध्यें या झरथुष्ट्राच्या नांवानें प्रथम च आपला सर्व प्रसिद्ध काव्यात्मक ग्रंथ लिहिला. त्याचा पूर्ण मथळा ' **एवम-**

ब्रवीझ्झरथुष्ट्रः ' असा आहे. हा नीट्झ्शेचा सर्वांत मोठा आणि आवडता ग्रंथ होय. या ग्रंथांत त्याचें संपूर्ण तत्त्वज्ञान भरलें आहे. खिस्तांतकाच्या प्रस्तावनेंत जें त्यानें म्हटलें आहे कीं, —" हा ग्रंथ फार थोड्या लोकांकरितां आहे; त्यांपैकीं अद्याप एक हि उत्पन्न झाला असेल किंवा नाहीं याची शंका आहे; एखादा कोणी असला च तर तो माझ्या ' एवमब्रवीझ्झरथुष्ट्रः ' या ग्रंथाचें परिशीलन केलेला असावयाचा " तें या च काव्यग्रंथाला अनुलक्षून आहे. अशा झरथुष्ट्राच्या नांवानें पुनः या वर्षीं नीट्झ्शेनें जीं कांहीं किरकोळ गीतें लिहिलीं तीं पुढें त्याच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झालीं.

( ३ ) '**नैतिक अर्थांचें अर्थांतरीकरण**' या बड्या ग्रंथाचा प्रथम पाद. हा च प्रस्तुत खिस्तांतक ग्रंथ होय. नीट्झ्शेचें संपूर्ण तत्त्वज्ञान आर्य नीतीनें म्हणजे वैदिक वर्णाश्रमधर्मांतील श्रुतिस्मृतींच्या नीतीनें ओतप्रोत भरलेलें आहे. त्यांत द्वंद्वावर उभें राहून निर्द्वंद्वाकडे दृष्टि आहे. अर्थात् अशा आर्य नीतीच्या दृष्टीनें च केवळ खिस्ती नीति ही त्याच्या मतें शुद्ध चांडालनीति आहे. ' चांडाल ' हा शब्द हि त्यानें च आपल्या ग्रंथांत जागोजाग योजला आहे. अशा नीतीचें पूर्ण उच्चाटन करणें आणि तिच्या जागीं दुसरी निराळी उच्च स्वरूपाची नीति स्थापणें हें च त्याच्या शब्दांत ' जुन्या अर्थांचें अर्थांतरीकरण ' होय. या कारणाकरितां च त्यानें आपल्या हातांत हातोडा घेतला आहे व या संहारक कामांत च तो आपणांस डायोनिसस् किंवा शंभुभैरव या नांवानें संबोधून

घेत आहे. या संपूर्ण ग्रंथाचा जरी त्याचे हातून एक च भाग लिहिला गेला असला आणि बाकीचे तीन भाग लिहिण्याचे राहिले असले तरी त्या तीन भागांत काय विषय आला असता हे नीट्झशेच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणारास त्याच्या इतर ग्रंथांवरून सहज ताडतां येण्यासारखें आहे. कारण प्रस्तुत ख्रिस्तांतकांत जो विषय आला आहे तो त्याच्या मागील ग्रंथांत प्रसंगाप्रसंगानें अनेकवार अनेक प्रकारें खंडशः प्रसिद्ध झालेला आहे. उदाहरणार्थ त्याचा 'बलेच्छा' नामक दोन भागांत प्रसिद्ध असलेला ग्रंथ घ्या. त्यांत हे सर्व विषय त्रोटक रीतीनें पांगून पांगून आले आहेत. हा ग्रंथ मुख्यतः अनेक टांचणें व टिपणें यांनीं भरलेला आहे व तो त्याच्या पश्चात् छापण्यांत आलेला आहे. या ग्रंथांतील कांहीं उतारे जसेच्या तसे किंवा क्वचित् निराळ्या शब्दांत सदरहु ख्रिस्तांतक ग्रंथांत उद्धृत झाले आहेत. यावरून पूर्वीं जो विषय अनेकवार लिहिला गेला व त्याचीं टिपणें करून ठेवण्यांत आलीं तीं च घेऊन त्यानें ख्रिस्तांतक हा ग्रंथ संगतवार लिहून काढला आणि या च रीतीनें त्याचा पुढील तीन हि भाग लिहिण्याचा संकल्प होता हें उघड सिद्ध होतें.

(४) 'ईक्ष पुरुषं' किंवा नीट्झशेचें आत्मचरित्र. हा ग्रंथ नीट्झशेनें १५ आक्टोबर १८८८ मध्यें लिहिण्यास हातांत घेतला. आणि तो ४ नोव्हेंबर रोजीं अवघ्या तीन आठवड्याचे आंत समाप्त केला. १५ आक्टोबर हा त्याच्या ४५ व्या वर्षाचा वाढदिवस होय. सदर ग्रंथाच्या आरंभी

या विशिष्ठ मंगल दिवसाला अनुलक्षून त्यानें पुढील उद्गार काढले आहेत आणि त्यांत च आपण आत्मचरित्र लिहिण्यास प्रवृत्त कां झालों हें कळविलें आहे:—

" हा परिपूर्ण दिवस, या दिवशीं सर्व च गोष्टी परिपक्कतेला जात आहेत. आणि द्राक्षें च केवळ तांबुस होऊं लागलीं आहेत असें नाहीं तर माझ्या जीवनायूवर सूर्यप्रकाशाचा किरण पडला आहे: मी माझ्या मागें दृष्टि टाकिली, मी माझ्या पुढें नजर फेंकली, आणि इतक्या अनेक उत्तमोत्तम गोष्टी एकसमयावच्छेदेंकरून माझ्या अवलोकनांत कधीं च आल्या नाहींत. मी माझें चवेचाळीसावें वर्ष जें आज काळाच्या उदरांत पुरून टाकलें तें फुकट गेलें नाहीं; तें पुरून टाकण्याचा मी हक्क संपादन केला—कारण त्यामध्यें ज्यांत कांहीं जीव होता त्याचें रक्षण झालें आणि तें अमरत्वाला गेलें. **सर्व नैतिक अर्थांचें अर्थांतरीकरण** याचा प्रथमाध्याय, **झरथुष्ट्राचीं गीतें, मूर्तींचा संध्याप्रकाश,** म्हणजे हातांत हातोडा घेऊन तत्त्वज्ञान सांगण्याचा माझा प्रयत्न—ह्या सर्व गोष्टी या वर्षांतील सुफलितें आहेत, आणि केवळ त्याच्या चरमपादांतील. **माझ्या संपूर्ण आयुष्याबद्दल मला आभार दर्शविल्यावांचून कसें राहवेल ?**

या कारणाकरितां मी आतां माझें जीवनवृत्त कथन करण्यास हातीं घेत आहें. "

हें जीवनवृत्त नीट्झशेनें मुख्यत: आपल्या ग्रंथकर्तृत्वाला वरून लिहिलें आहे. आणि या एका च विषयावांचून वाचकाला तरी त्याचेपासून आणखी निराळें काय पाहिजे आहे? कारण तो आमरणान्त बालब्रह्मचारी मुनि होता. अर्थात् त्याला ग्रंथकर्तृत्वाशिवाय दुसरा कसला च संसाराचा व्याप नव्हता. आरंभीं भाषाविवेचक, पुढें मानसचिकित्सक, नंतर

तत्त्वार्थदर्शी, आणि शेवटीं विदेहीमुक्त, असा त्याच्या आयुष्याचा एका पुढें एक चार पर्यायांत गुणविकास आहे. अशा स्थितींत त्याचे ठिकाणीं जें अखंड वाचन आणि दीर्घ मनन चाललें होतें त्याचें च प्रतिबिंब त्याच्या सर्व ग्रंथांत दृष्टीस पडावें यांत नवल नाहीं. त्याच्या निदिध्यासाचा एक च विषय: मनुष्याची पूर्णोन्नति कशांत आहे. याला अनुलक्षून त्याचें संपूर्ण तत्त्वज्ञान, नीतिज्ञान व समाजज्ञान आहे. आणि त्यांत च त्यानें मनुष्याच्या उन्नतीच्या मार्गांत अडथळा आणणाऱ्या प्रत्येक लहानमोठ्या वस्तूवर आपल्या प्रखर टीकेचें जबरदस्त हत्यार उगारलें आहे. हा च त्यानें म्हटल्याप्रमाणें त्याचे हातांतील हातोडा. या हातोड्याचे घाव घालून त्यानें पूर्वीचे ख्रिस्ती नीतिचे अर्थ—जे त्याच्या मताप्रमाणें मनुष्याला सदा अवनतदशेंत कुचंबत ठेवणारे आहेत —त्यांचा अगदीं चेंदामेंदा करून टाकला. याला च तो ' जुन्या अर्थांचें अर्थांतरीकरण ' किंवा ' जुन्या मूल्यांचें मूल्यांतरीकरण ' हें नांव देतो. या हातोड्याचें कार्य तो एका ठिकाणीं त्याच्या च तोंडून पुढील प्रमाणें वदावितो तें लक्षांत घेण्यासारखें आहे:—

### हातोडा बोलतो !

" इतका कठीण कां !"—एकदां कोळसा हिऱ्याप्रत बोलता झाला: " तर मग आपण जवळचे नातेवाईक नाहीं काय ? "

" इतके मृदु कां ! माझ्या बंधुजनांनों; हा माझा तुम्हांला सवाल आहे. कारण तुम्हीं माझे सहोदर भ्राते नाहीं काय !

" इतके मृदु कां, इतके दासवृत्तीचे आणि ढिसूळ ! तुमचीं मनें

त्यागाकडे आणि आत्मत्यागाकडे इतकी ओढ कां घेतात ? तुमच्या डोळ्यांत दैवाचा इतका अल्पांश कां दिसतो ?

" आणि जर तुम्हीं दैवाचे पुरुष झालां नाहींत व निर्घृणता स्वीकारली नाहींत, तर माझ्या सहवासांत एक दिवस विजयाचा आस्वाद घेण्याची तुम्हांला आशा तरी कशी करतां येईल ?

" आणि जर तुमच्या ठिकाणची दृढता पैलू पाडून घेऊन चमकत राहिली नाहीं, तर तुम्हीं माझ्या समवेत एक दिवस नवीन सृष्टि निर्माण करण्याची तरी आशा कशी बाळगूं शकाल ?

" कारण सर्व निर्माणकर्ते मनाचे दृढ असतात. आणि तुम्हांला आपल्या हाताचा ठसा जसा मेणावर उठवावा तसा काळाच्या सहस्रकांवर उठविण्यांत धन्यता वाटली पाहिजे,—

—जसा पितळेच्या पत्र्यावर,—पितळेचा च पत्रा काय तर त्याहून घट्ट, त्याहून उजळ,—अशा सहस्रकांच्या भवितव्यतेवर लेख कोरण्यांत तुम्हीं आनंद मानला पाहिजे.—जो अत्युच्च आर्यपदावर विराजमान होतो तो च केवळ अंतर्बाह्य वज्रासारखा कठीण असतो.

हा नीतिमूल्यांचा नवीन तक्ता, हे माझ्या बंधुजनांनों, मी तुमच्या शिरावर स्थापन करीत आहेः वज्रासमान कठीण व्हा. "

—" एवमब्रवीझ्झरथुष्ट्रः " ३·२९

येथें नीट्झ्शेला मनुष्याचे ठिकाणीं जें काय पाहिजे आहे तें आर्यत्व होय ही गोष्ट उघड दिसून येते. आर्य नीति जशी टणटणीत आहे तशी ख्रिस्ती नीति नाहीं. म्हणून साहजिक च त्याला ख्रिस्ती नीतीचा तिरस्कार वाटतो. तो स्वतः ख्रिस्ती धर्मांत जन्म पावला असल्यामुळें आणि त्यावर जन्मापासून ख्रिस्ती संस्कार झाले असल्यामुळें त्याला ख्रिस्ती धर्माच्या विरुद्ध एतत्सदृश ज्या आर्य कल्पना सुचतात त्या अन्तः-

करण्यांतील देववाणीप्रमाणें स्फूर्तिजन्य भासतात. खिस्ती धर्माच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे हें त्याचें शुभवर्तमान, त्याचे आनंदाचें वर्तमान होय. ज्या वर्तमानानें पूर्वीच्या शुभाला अशुभ ठरविलें आणि आनंदाला दुःखमय करून टाकलें. अशा स्फूर्तीचें स्वरूप त्यानें आपल्या आत्मचरित्रांत एके ठिकाणीं अविष्कृत करून दाखविलें आहे तें अत्यंत मार्मिक आहेः—

—"आधुनिक १९ व्या शतकाच्या शेवटच्या काळीं प्राचीन टणटणीत युगांतील कवि, 'स्फूर्ति' या शब्दानें कोणत्या अर्थाचें ग्रहण करीत होते याची कोणाला तरी कांहीं स्पष्ट कल्पना आहे काय? जर नसेल तर ती मी वर्णन करून सांगतों. एखाद्या मनुष्याचे ठिकाणीं जरी किंचित् धर्मभोळेपणाचा अवशेष असला तरी त्याला आपण कोणी तरी एक देवाचे अवतार आहोंत, किंवा देवदूत आहोंत, किंवा सर्वसामर्थ्यवान् विभूतिमत्त्वाचे मध्यस्थ आहोंत, ही भावना पूर्णपणें बाजूला टाकणें सर्वथा अशक्य होतें. देवाच्या प्रकटीभवनाची किंवा सर्व आकाशवाणीची कल्पना,-अशा अर्थानें कीं कांहीं तरी एखादें जें मनुष्याला पायापासून डोक्यापर्यंत अति गंभीरपणानें हालवून सोडतें आणि मुग्ध करून टाकतें तें त्याच्या डोळ्याला आणि कानाला अत्यंत अवर्णनीय सत्यत्वानें आणि स्पष्टत्वानें एकाएकीं गोचर होतें--ही कल्पना अगदीं साधी गोष्ट वर्णन करिते. मनुष्य ऐकतो—पण तें तो पहावयास जात नाहीं; मनुष्य स्वीकारतो—पण तें तो कोण देतो याची पृच्छा करीत नाहींः एखादा विचार एकदम विजेच्या लोळाप्रमाणें आविर्भाव पावतो, तो आवश्यकतादर्शक असा बिनचुक स्फुरतो—या कामांत आपली स्वतःची केव्हां हि कसली च आवडानिवड नसते. या ठिकाणीं मनाची इतकी विलक्षण तन्मयता होऊन जाते कीं कधीं कधीं तिचा अत्युत्कट वेग ओसरण्याचे वेळीं डोळ्यांतून अश्रुधारा वाह-

तात, आणि पायाला जशी एकदम आपोआप गति मिळते तशी पुढें ती आपोआप बंद हि होते. हा सर्व काळ आपण बिलकुल आपल्या हातांत नाहीं अशी भावना असते, आणि त्या च बरोबर आनंदाच्या अपरिमित नाजुक शिरशिऱ्या आणि गुदगुल्या अगदीं पायाच्या तळव्यापर्यंत उतरल्याचें मनाला स्पष्ट संवेदन होतें,–या ठिकाणीं आनंदाच्या खोल वृत्तींतील अति दुःखाचे आणि औदासिन्याचे जे अंश असतात ते बाकीच्या सर्व देहाला विरोधात्मक न होतां उलट अशा प्रकारच्या प्रकाशप्रवाहांत रंगछायेप्रमाणें शोभादायक च होतात. येथें लयसाम्यात्मक संबंध जोडणारी मनोवृत्ति संपूर्ण साकार जगताला आवृत करून टाकते ( दिग्लंब, फार मोठ्या प्रदेशाला वेढून टाकणाऱ्या लयसाम्याची बलवदिच्छा, हें येथें स्फूर्तीच्या बलाचें मापन करणारें एक च एक सर्वांत मोठें साधन आहे आणि म्हणून तें त्याच्या दाबाला आणि ताणाला पुष्टि देणारें एक प्रकारचें जोडकांड च आहे ). येथें जी प्रत्येक गोष्ट घडते ती अगदीं सहजासहजी, जणुं काय तो स्वातंत्र्याचा, निरपेक्षतेचा, बलाचा आणि दैवी शक्तीचा अति जोराचा तुफानी उद्रेक च होय. सगळ्यांत मोठी लक्षांत येण्यासारखी गोष्ट म्हणजे त्यांतील उपमादि अलंकारांची सहजसिद्ध प्रवृत्ति; येथें काल्पनिक काय आणि लाक्षणिक काय याबद्दलचें सर्व भान नाहींसें होतें; येथें मनोगत प्रगट करण्याकरितां जी जी गोष्ट साधन म्हणून पुढें येते ती अत्यंत सुसंबद्ध, अत्यंत सत्य आणि अत्यंत साधी असते. झरथुष्ट्राच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे वस्तुतः ती अशी भासते कीं जणुं काय सर्व गोष्टी आपण होऊन आपल्याकडे धांव घेतात आणि उपमेच्या पदावर आरूढ होतात.

" येथें सर्व वस्तुमात्र तुझ्या वाग्विहारांत लीलेनें प्रवेश करतात आणि तुझीं स्तोत्रें गातात; कारण त्यांना तुझ्या पाठीवर आरोहण करण्यांत धन्यता वाटते. येथें तूं प्रत्येक उपमेवर आणि दृष्टांतावर आरूढ

होतोस, व प्रत्येक सत्याचा ठाव घेतोस. येथें सर्व जगतांतील स्वर आणि वाक् यांचीं मंदिरें तुझ्या पुढें आपले दरवाजे सताड उघडतात. येथें संपूर्ण सद्भाव शब्दमय होतो आणि संपूर्ण जगद्भाव तुझ्यापासून शब्दोच्चार कसा करावा हें शिकतो, "--हा माझा स्फूर्तीचा अनुभव आहे. आणि " असा च माझा हि आहे " असें ज्याला खात्रीपूर्वक सांगतां येईल अशा पुरुषास शोधण्यास मला हजारों वर्षांच्या मागें जावें लागेल हें निःसंशय आहे."

नीट्झशेच्या मताप्रमाणें अशी स्फूर्ति फार प्राचीन काळीं होमर सारख्या ग्रीक कवींना झाली होती आणि आतां तशी च ती मला होत आहे. ह्या स्फूर्तींत जी देववाणी निघत आहे ती मानवी जीविताला परम उपकारक आहे. अर्थात् अशा दिव्य स्फूर्तीनें त्यानें जीं नवीन नीतीचीं प्रमेयें काढलीं तीं सर्वस्वी आर्य स्वरूपाचीं असल्यामुळें ख्रिस्ती नीतीच्या विरुद्ध तिला साहाजिक च मारक झालीं. नीट्झश हा अर्वाचीन विद्या आणि कला यांत पूर्ण पारंगत होता. त्यायोगें त्याची सर्व नैतिक विचारसरणी भौतिकशास्त्रांना धरून आहे. तथापि त्याच्या मतें भौतिकशास्त्रज्ञ हा अत्युच्च तत्त्वज्ञानी असतो असें नाहीं. भौतिकशास्त्राचें स्वरूप च असें आहे कीं तो केवळ मध्यम वर्गांतील मनुष्याच्या ज्ञानाचा विषय व्हावा. जसें शास्त्र तशी च कला. चातुर्वर्ण्याच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे असें शास्त्र आणि कला मुख्यतः वैश्य वर्णाचा विषय होईल, उच्च ब्राह्मण वर्णाचा कदापि होणार नाहीं. ब्राह्मणवर्णाचा विषय म्हणजे धर्म, नीति, आणि अध्यात्म होय. असा अध्या-

त्मज्ञानी हा खरा ज्ञानी आहे. हें अध्यात्म निसर्गाशीं विसंगत नसतें. किंबहुना तें निसर्गाचें तत्त्व अवलोकन करून च त्यावरून अंतिम सिद्धांत स्थापन करितें. म्हणून भौतिकशास्त्रानें अध्यात्मापुढें सदैव दासवृत्ति च स्वीकारली पाहिजे हें उघड आहे. त्यानें त्यावर आपला पगडा मिरवण्याच्या दृष्टीनें केव्हां हि त्याची हेटाळणी करतां कामा नये. मनुष्याच्या युक्त जीवनाला चालन भौतिक शास्त्रानें मिळत नाहीं, नीतीनें व धर्मानें मिळतें. केवळ शास्त्रज्ञानानें मनुष्य " ज्ञानी " होत नाहीं, अध्यात्मज्ञानानें होतो. शास्त्रज्ञानानें पैदा होणारें सुख केवळ इंद्रियजन्य असतें. आध्यात्मिक ज्ञानांत उत्पन्न होणारें सुख " बुद्धिग्राह्य " आणि " अतींद्रिय " असतें. म्हणून तें साहजिक च इंद्रियानुवर्ती सुखाचा त्याग करून "आत्यंतिक" पदाला प्राप्त होतें.

यावरून खरें अध्यात्म जसें आर्य ब्राह्मणवर्णात दिसून येतें तसें ख्रिस्ती साधुसंतांत दिसत नाहीं असें जें नीट्झ्शेनें म्हटलें आहे तें यथार्थ आहे. त्याच्या मतें हे साधुसंत कळप करून राहणाऱ्या जनावरांपेक्षां अधिक श्रेष्ठ दर्जाचे नसल्याकारणानें त्यांच्या ठिकाणीं आमचा अत्यंत अविश्वास आहे, त्यांबद्दल आम्हांला काडीची किंमत वाटत नाहीं, त्यांचे आचारविचार आम्हांला अति हीन दिसतात असे त्यानें त्यांच्याविषयीं जागोजाग उद्गार काढले आहेत. तो म्हणतो या ख्रिस्ती संतांनीं आपल्या असद्विचारांत जे देव, स्वर्ग, मोक्ष, जीव, जगत्, जीवितार्थ, श्रद्धा, सत्य, न्याय इत्यादि मोठमोठ्या तात्त्विक शब्दांचें

अवडंबर केलें आहे तें पोकळ आहे. त्यांत त्यांनीं त्या शब्दांचे पूर्वींचे सर्व उच्च अर्थ विकृत करून टाकिले आहेत. म्हणून त्याच्या मताप्रमाणें ख्रिस्ती धर्मांत बिलकुल तथ्यांश नाहीं. ख्रिस्ती नीति ही तर त्यानें चांडालनीति म्हटली आहे. ती मूळ क्षुद्र लोकांनीं आपल्या क्षुद्र स्वार्थाकरितां प्रचलित केली आणि पुढें देवाच्या नांवानें सर्व मानवजातीच्या डोक्यावर परमोच्च ध्येय म्हणून बसविली. मानवी सुधारणेंत यासारखें दुसरें अवनतीचें अति निंदास्पद रूप निर्माण झालेलें कोठें हि दिसून येणार नाहीं. पुनः या क्षुद्रांनीं नीतीच्या प्रांतांत असा मोकाट धुमाकूळ माजविला कीं जणुं काय हे कूटप्रश्न कांहीं फारसे मोठ्या ज्ञानाचे नाहींत तर ते पाहिजे त्याला पाहिजे तसे सहज समजण्यासारखे आहेत, आणि विशेषतः पीटर आणि पाऊल यांना तर त्यांबद्दल कसली च अडचण नाहीं. त्यायोगें नीट्झश म्हणतो—

"मला त्यांच्या पवित्र ग्रंथांत कोठें हि 'देववाणी' ऐकूं येत नाहीं: तर सर्वत्र अप्रत्यक्ष रूपानें अति गूढ क्रोधाची भावना दिसून येते. ही भावना म्हणजे द्वेषाचें अत्यंत कपटी रूप आहे, आणि तें निंदा व नाश या दोहोंत सारखें च स्फुट होणारें आहे. अशा द्वेषाला उच्च विभूतिमत्त्वाच्या गुणांचा साक्षात्कार होणें सर्वथा अशक्य आहे..." ( बलेच्छा, खंड १ सूत्र २०६ ).

नीट्झश म्हणतो पुष्कळ शहाण्या लोकांना असें वाटतें कीं ज्या अर्थीं ख्रिस्ती धर्माला ग्रीक तत्त्वज्ञानावर विजय मिळवतां आला त्या अर्थीं त्या धर्मांत ग्रीक व रोमन धर्मापेक्षां

अधिक सत्य भरलें आहे. पण ही गोष्ट सर्वथैव खोटी आहे. खिस्ती तत्त्वज्ञानाचा ग्रीक तत्त्वज्ञानावर विजय म्हणजे सत्याचा असत्यावर विजय नव्हे तर उलट असत्याचा सत्यावर विजय होय. हा नीचांचा प्रातिष्ठित उच्चांवर, रासवटांचा गुणगणमंडित सभ्यांवर, रानट्यांचा सुसंस्कृत नागरिकांवर, हीनांचा अभिजात आर्यांवर, म्हणजे एका शब्दांत चांडाळांचा शुचिष्मंत ब्राह्मणांवर, केवळ संख्याबळानें विजय आहे इतकें च. याला प्रत्यंतर आधुनिक भौतिक शास्त्रांच्या उदयांत दिसून येणार आहे. हीं शास्त्रें पायऱ्हो आणि एपिक्यूरस यांच्या तत्त्वज्ञानांशीं जितकीं अंगोपांगानें जुळतात तितकीं खिस्ती धर्माशीं जुळत नाहींत ( मानवी—सर्वथैव मानवी, खंड १ सूत्र ६८). तीं खिस्ती धर्माला सर्वतोपरि झुगारून देतात. तथापि पायऱ्हो आणि एपिक्यूरस हे दोघे हि ग्रीक तत्त्वज्ञानांतलि मोठीं दणदणीत उदाहरणें नाहींत, तर त्याच्या रुग्ण स्थितीचीं दर्शक रूपें आहेत. पायऱ्हो हा ग्रीकांतलि सर्वदुःखवादी बुद्ध च होय. अर्थात् त्याच्या उलट एपिक्यूरस हा सर्वसुखवादी चार्वाक आहे. म्हणून दोघे हि सारखे च नासलेले. नीट्झशेनें खिस्तांतकांत बौद्ध धर्म हा खिस्ती धर्मापेक्षां निसर्गाशीं अधिक जुळून आहे असें म्हटलें आहे. त्या च प्रमाणें पायऱ्हो काय किंवा एपिक्यूरस काय या दोघांचें तत्त्वज्ञान यद्यपि एकेका टोंकाला गेलेलें असलें तत्रापि तें खिस्ती धर्माप्रमाणें सर्वथा निसर्गाला सोडून व त्याला तुच्छ लेखून बनलें नाहीं. म्हणून या दोघांचा हि

आधुनिक भौतिकशास्त्रांशीं मेळ दिसला तर त्यांत कांहीं नवल नाहीं. वैदिक तत्त्वज्ञान तर बोलूनचालून निसर्गाच्या अवलोकनांत च सिद्ध होणारें आहे. उदाहरणार्थ, ऋग्वेदांतील नासदीयसूक्त व त्यावरील आमचें भाष्य पहा. आधुनिक भौतिकशास्त्रें किती हि वाढलीं आणि प्रगल्भतेला गेलीं तरी तीं वैदिक तत्त्वज्ञानाला किंचित् हि बाधक होत नाहींत, तर उलट सर्व प्रकारें पुष्टिकारक च होतात. सारांश, वैदिक तत्त्वज्ञान हें खरोखर सनातन आहे, त्रिकालाबाधित आहे, यांत संशय नाहीं.

हा खिस्तीधर्म आणि वैदिकधर्म यांतील भेद स्पष्ट कळण्याकरितां विश्वनिर्मितीच्या कालगणनेचें एक च उदाहरण घेतलें असतां पुरें होईल. खिस्ती बैबलमध्यें हा काल इ. स. पूर्वीं ४००४ वर्षें सांगितला आहे व त्यांत पहिल्या सहा दिवसांत देवानें सृष्टि निर्माण करून शेवटीं मानवाला जन्म दिला व देव विश्रांति पावला असें म्हटलें आहे. हा मानवजन्माचा नक्की काळ कोणता होता तो दर्शविण्याकरितां १७ व्या शतकांत मँचेस्टर युनिव्हर्सिटींतील एका पाद्री व्हाइस् चान्सेलरनें त्यावर घटित केलें आहे. तें खिस्तपूर्व वर्ष ४००४, महिना आक्टोबर, ता० २३, प्रातःकाळीं ९ वाजतां होय! या घटितावरून पाहिजे तर एखाद्या एतद्देशीय फलज्योतिष्यानें मानवजातीचें भविष्य वर्तवावें. येथें येशूच्या पूर्वीं ४००४ असें आडनेडें वर्ष कां तर येशूचा जन्मशक खऱ्या जन्मानंतर चार वर्षांनीं सुरू झाला म्हणून. अर्थात् येशूच्या

वास्तविक जन्मापूर्वी हा काळ ४००० वर्षांचा आहे व तो प्राचीन वैदिक कृतयुगाच्या वर्षसंख्ये इतका तंतोतंत आहे. वैदिक कल्पनेप्रमाणें कृतयुग हें आद्ययुग होय. म्हणून या युगाच्या आरंभीं मानवजातीचा आद्यपितर आदिमनु किंवा आदाम जन्म पावला असें म्हटलें तर त्यांत कांहीं गैर नाहीं. परंतु बैबलमध्यें सदर कालासंबंधीं इतका मोठा विचार नाही. तेथें देवाचा दिवस म्हणजे किती काळाचा हें सांगण्यांत आलें नाहीं. वैदिक पुराणांत जसा देवाचा एक दिवस मानवाच्या एका वर्षा बरोबर म्हणजे ३६० दिवसांबरोबर सांगितला आहे तसा तेथें कांहीं च प्रकार नाहीं. म्हणून च हें ख्रिस्ती भाकड पुराण अर्वाचीन शास्त्रीय शोधांच्या काळीं मागें पडलें तर त्यांत कांहीं नवल नाहीं. आधुनिक भूस्तरशास्त्र, प्राणिप्रस्तरशास्त्र, ज्योतिर्विज्ञानशास्त्र, जीवोत्क्रांतिशास्त्र, मानवविकासशास्त्र, यांच्या आधारें डॉ० कीथ म्हणतो मानवजन्माचा काळ १२००००० वर्षांपूर्वींचा आहे. इतकें च नाहीं तर आतां त्यानें तो काळ ९०००००० वर्षांपूर्वी नेऊन बसविला आहे! अर्थात असा हा शास्त्रीय विश्वनिर्मितीचा काळ ख्रिस्ती धर्मग्रंथांत सांगितलेल्या काळाशीं कसा जुळणार व ख्रिस्तीधर्म आणि भौतिकशास्त्र यांचें कसें पटणार? पण तें च भारतीय ज्ञानाकडे पहा. त्यांतील विश्वकालगणना कोणत्या हि शास्त्राला कदापि दाद देणार नाहीं. पुढील देवपूजाविधींतील संकल्पाची सुरवात पहा—‘ **श्रीमद्भगवतो महापुरुषस्य विष्णोराज्ञया प्रवर्तमानस्य अद्य ब्रह्मणो द्वितीये**

**परार्धे श्री श्वेतवाराहकल्पे वैवस्वतमन्वंतरे अष्टाविंशतितमे महायुगे बौद्धावतारे कलिप्रथमचरणे शालीवाहनशके इ०'**—यांत जी कालगणना आहे ती शतकांनीं केली नाहीं किंवा सहस्रकांनीं हि केली नाहीं तर **महायुगांनीं** केली आहे व एकेक महायुग ४३ लक्ष २० हजार मानववर्षांचें आहे. अशीं एक हजार महायुगें झालीं म्हणजे ब्रह्मदेवाचा एक दिवस होतो. सूर्यसिद्धांताप्रमाणें समस्तजगदुत्पात्तिस्थितिलयकारक महाविष्णूच्या नाभिकमलापासून उत्पन्न झालेल्या विद्यमान ब्रह्मदेवाचें आयुर्मान शंभर वर्षांचें आहे. त्यांपैकीं पहिलीं पन्नास वर्षें संपून सांप्रत त्याचें एकावनावें वर्ष चालू आहे. अशा ब्रह्मदेवाच्या एका दिवसांत १४ मनु होतात. पैकीं आतांपर्यंत सहा मन्वंतरें होऊन गेलीं व हल्लीं सातवें वैवस्वत नामक मनूचें मन्वंतर चालू आहे. प्रत्येक मन्वंतरांत सरासरी ७१·४३ महायुगें पडतात. पैकीं वर्तमान मन्वंतरांत २७ महायुगें संपून अठ्ठाविसावें चालू आहे. पुनः या महायुगांतील कृत, त्रेता आणि द्वापर हीं युगें संपून कलियुगाच्या ४ लक्ष ३२ हजार वर्षांपैकीं शालिवाहन शकाच्या हल्लींच्या शुक्ल नाम संवत्सरीं त्याचीं ५ हजार ३० वर्षें पुरीं होऊन पुढें ४ लक्ष २६ हजार ९७० वर्षें शिल्लक आहेत! अशा या अचाट कविकल्पने पुढें भौतिकशास्त्रज्ञांच्या सर्व कल्पना मागें पडल्या तर त्यांत कांहीं नवल नाहीं.

नीट्झशेनें जें आपलें आत्मवृत्त लिहिलें आहे तें केवळ मागें सांगितल्या प्रमाणें स्वतःच्या ग्रंथकर्तृत्वासंबंधीं होय, यांत त्यानें

अगदीं सरळ सत्याचें अवलंबन केलें आहे. कोणता ग्रंथ कोणत्या परिस्थितींत निर्माण झाला, त्यांतील कल्पना कसकशा सुचत गेल्या, त्याचा काळ कोणता होता, स्थळ कोणतें होतें, त्या वेळीं मनस्थिति कशी होती इत्यादि प्रश्नांचा या आत्मवृत्तांत इत्थंभूत उलगडा झाला आहे. येथें बिलकुल लपंडाव नाहीं. नीट्झ्शेला लपंडावाचा जात्या च तिरस्कार होता. त्यानें आपल्या ' नीतिची पूर्वपीठिका ' नामक ग्रंथांत असत्याचें प्रामाणिक आणि अप्रामाणिक असे दोन प्रकार सांगितले आहेत. आणि त्यांचें येणेंप्रमाणें विवरण केलें आहे.—

" आमचे हल्लींचे सुशिक्षित लोक, आमचे ' सद्वर्तनी ' लोक, खोटें बोलत नाहींत—हें खरें आहे; पण यांत कांहीं त्यांचा मोठा मान वाढत आहे असें नाहीं ! खरें असत्य, निर्व्याज, सुनिश्चित, ' प्रामाणिक ' असत्य ( ज्याची किंमत प्लेटोच्या शब्दांत कोणाला हि ऐकतां येण्यासारखी आहे )—असें असत्य या लोकांना दूरवर न पेलण्यासारखें अति कठीण डोईजड ओझें आहे; जें करावयास सांगण्यास लोकांना धर्माच्या सांप्रदायिक नीतीचा प्रतिबंध आहे तें च त्यांना करावयास सांगणें, त्यांचे डोळे त्यांच्या स्वतःकडे उघडण्यास लावणें, आणि ' खरें ' आणि ' खोटें ' यांतील भेद त्यांना आपल्या स्वतःच्या च ठिकाणीं पहावयास शिकवणें. अशा लोकांना केवळ अप्रामाणिक असत्य च मानण्यासारखें आहे. ज्या ज्या वस्तूचा ख्रिस्ती सद्गुणांशीं संबंध येतो त्या त्या वस्तूला दुसऱ्या कोणत्या हि वस्तूशीं अप्रतिष्ठित असत्यवादित्व म्हणजे निखालस असत्यवादित्व धारण केल्यावांचून दुसरा मार्ग च नसतो. तथापि हें असत्यवादित्व मोठें साधेंभोळें, सौम्य आणि गोंडस दिसणारें असतें. हीं ' सद्गुणी मनुष्यें ',—हीं सर्व च सद्गुणाच्या रंगानें अन्तर्बाह्य रंगून गेलेलीं दिसतात, परंतु आर्यत्वाच्या

दृष्टीनें पहाल तर तीं कायमचीं कलंकित आणि पतित असलेलीं आढळून येतात. अर्थात् अशांपैकीं कोण मायेचा पूत ' मानवासंबंधीं ' अधिकाधिक सत्य पाहण्याचें धारिष्ट करील ? किंवा ज्यास्त स्पष्ट बोलावयाचें म्हणजे अशांपैकीं कोण मानवाचें सत्य चरित्र लिहिण्यास तयार होईल ? एक किंवा दोन उदाहरणें: लॉर्ड बायरननें आपली स्वतः-ची इत्थंभूत जीवनकहाणी लिहून ठेविली होती, पण थॉमस् मूरच्या सौजन्यातिशयाला ती मानवली नाहीं; त्यानें आपल्या स्नेह्याचे तत्संबंधीं सर्व कागदपत्र जाळून टाकले. डॉ. ग्विन्नर, शोपेन्हौएरचा मरणोत्तर क्रियादर्शी, यानें हि तो च प्रकार केल्याची वदंता आहे; कारण शोपेन्हौएरनें आपल्या स्वतःसंबंधीं आणि कदाचित् स्वतःच्या विरुद्ध हि पुष्कळ लिहून ठेवलें असण्याचा संभव आहे. बीथोव्हेनचा अमेरिकन चरित्रकार ' सद्गुणप्रेमी ' थेयर यानें आपलें लेखन मध्यें च एकदम थांबविलें: कां तर तो त्या साध्या आणि सन्मान्य चरित्राच्या कथनांत एका अडचणीच्या मुद्द्यावर आला, आणि तो मुद्दा त्याला पुढें सहन करवला नाहीं. तात्पर्य: हल्लींच्या काळीं कोण शहाणा मनुष्य स्वतःसंबंधीं एक प्रामाणिक शब्द लिहिण्याचें धाडस करील ? अशाची गणना पवित्र परंतु मूर्ख साहसिकतेच्या माळेंत करावी लागेल..."

आत्मवृत्त लिहिण्यांत नीट्झ्शेचा मुख्य हेतु काय आहे हें समजण्याकरितां त्यानें त्या ग्रंथाला जो लहानसा उपोद्घात जोडला आहे तो येथें जसाचा तसा सादर करणें योग्य होईल. हा चार परिच्छेदांत आहे. ते येणेंप्रमाणें—

१

" ज्या अर्थीं मी माझ्या बंधुवर्गापुढें त्यांनीं पूर्वी ऐकिली होती किंवा नव्हती अशा स्वरूपाची अति मोठी मागणी करण्याकरितां

लवकर च त्यांच्या सन्मुख उभा ठाकण्याचा संकल्प केला आहे, त्या अर्थी मी कोण आहे आणि काय आहें याबद्दल येथें निवेदन करणें मला अत्यावश्यक वाटत आहे. खरें पाहतां, ही गोष्ट आतांपर्यंत सर्वत्र जाहीर झाली असली पाहिजे; कारण मी आपणा स्वतःसंबंधीं केव्हां च "तोंड बंद ठेवलेलें" नाहीं. परंतु माझ्या कार्याचा अति मोठेपणा आणि माझ्या समकालीन लोकांचा अति लहानपणा यांमध्यें जें विलक्षण अंतर आहे तें ह्या एका च गोष्टीनें सिद्ध होत आहे कीं, लोकांनीं अद्याप माझें नांव ऐकिलें नाहीं किंवा माझें तोंड पाहिलें नाहीं. मी माझ्या स्वतःच्या स्वसंपादित गुणांवर जिवत आहे, आणि मी खरोखर च जिवंत आहे असें सुद्धां कदाचित् माझ्याबद्दल एखाद्या पूर्वग्रहाचें लक्षण होणार आहे. ओब्र–एंगडाईन येथें उन्हाळ्यांत जे कोणी पंडित निवास करावयास येतात त्यांपैकीं कोणा हि बरोबर मला बोलण्याची जी अति जरूर वाटते ती केवळ मी जिवंत **नाहीं** ही गोष्ट माझ्या मनाला पटविण्याकरितां होय...अशा परिस्थितींत, हें एक कर्तव्य आहे–आणि तें असें आहे कीं तद्विरुद्ध माझें नित्याचें वाक्संयतत्व आणि त्या हि पेक्षां अधिक अंशानें माझ्या मनोभावनांची उपजत स्वाभिमानवृत्ति हीं उघड बंड करीत आहेत–हें कर्तव्य कोणतें? तर असें म्हणणें: **ऐका! कारण मी असा असा मनुष्य आहे. स्वर्गांतील देवांप्रीत्यर्थ तरी मला भ्रांतीनें दुसऱ्या कोणाबरोबर लेखूं नका!**

२

मी, उदाहरणार्थ, उगीच कोणी तरी एखादा पोकळ मनुष्य नाहीं, किंवा नीतीचा राक्षस नाहीं. उलट, आतांपर्यंत ज्या कोणाला सद्गुणी व सदाचारी म्हणून सन्मानिलें जात आहे अशा मनुष्याच्या जातीहून मी स्वभावतः भिन्न जातीचा आहे. आपापसांत बोलावयाचें म्हणजे माझ्या दृष्टीनें ही गोष्ट अशी आहे कीं तीबद्दल मला अत्यंत अभिमान

वाटावा. मी डायोनिसस तत्त्ववेत्त्याचा शिष्य आहे, आणि संत म्हणवून घेण्यापेक्षां वनचर म्हणवून घेणें मला अधिक प्रिय आहे. परंतु हें पुस्तक एकदां वाचा च ! कदाचित् हा विरोध उल्हासित वृत्तीनें आणि त्या च बरोबर सहानुभूतीनें प्रकट करून दाखविण्यांत मला येथें चांगलें यश आलें असेल-कदाचित् या ग्रंथाचा हा च एक हेतु असेल, नाहीं कोणी म्हणावें ?

जी गोष्ट घडवून आणण्याबद्दल मला कदापि ग्वाही देतां येणार नाहीं अशी गोष्ट म्हणजे मानवजातीला 'सुधारणें' ही होय. मी नवीन कल्पनामूर्ति उपस्थित करीत नाहीं, जुन्या च मूर्तींना मातीचे पाय असण्यांत काय हाल भोगावे लागतात तें चांगलें कळूं दे. मूर्तींचें उच्चाटन करणें ( सर्व मनोमय कल्पनांना मी मूर्ति हें नांव देतों ) हा च माझा खराखुरा धंदा आहे. ज्या प्रमाणांत कल्पनामय सृष्टीला मोहानें थारा दिला जातो त्या च प्रमाणांत सत्यसृष्टीची किंमत, तिचा अर्थ आणि तिचें सत्यत्व तिच्यापासून लुबाडिलें जातें...सत्य जग आणि मिथ्या जग—वेदान्ताच्या भाषेंत माया आणि ब्रह्म...आतां-पर्यंत कल्पनेच्या असत्यानें सत्याच्या मूर्तीला डोकें वर काढूं दिलें नाहीं; त्या योगें मानवाच्या उपजत वृत्तींचा झरा लटका पडला, खोटा ठरला; इतका कीं जे नीतीचे अर्थ मनुष्याच्या ऐश्वर्याला, त्याच्या भविष्याला आणि त्याच्या भविष्यांतील उच्च हक्काला साक्षात् **विरोधक** आहेत त्यांचे च सर्वत्र देव्हारे माजविण्यांत आले.

३

ज्याला माझ्या लेखनाच्या हवेंत श्वसन कसें करावें याची जाणीव आहे त्याला ती हवा उत्तुंग प्रदेशांतील आहे, बलवर्धक आहे, याचा चांगला अनुभव आहे. ही हवा सहन करण्याची मनुष्याची अगोदर कुडी बनून गेलेली पाहिजे, नाहीं तर तींत तो पार गारठून जाण्याचा संभव आहे. येथें हिम सन्निध आहे, येथील एकांतवास भीषण आहे—

परंतु येथें प्रत्येक वस्तुमात्र सूर्यप्रकाशांत किती शांत रीतीनें स्थित आहे! येथें श्वसन तरी किती मोकळेपणानें करतां येतें! येथें सृष्टीचा केवढा पसारा स्वतःच्या पायाखालीं भासमान होतो! तत्त्वज्ञान, जें मी आतां-पर्यंत समजत आलों आहे तें तत्त्वज्ञान अशा स्वरूपाचें आहे कीं हिम-प्रदेशांत उत्तुंग शैलशिखरावर स्वेच्छेनें एकांतांत विहार करणें—सृष्टींत जें कांहीं विलक्षण आणि आक्षेपार्ह असेल, ज्यावर आतांपर्यंत धर्माच्या सांप्रदायिक नीतीचा बहिष्कार पडलेला असेल त्या सर्वांचा ठाव घेणें. मना केलेल्या प्रदेशांतून या प्रकारें भटकत फिरण्यापासून प्राप्त झालेल्या पुष्कळ अनुभवाच्या योगानें सामान्यतः हितावह दिसणाऱ्या गोष्टीं-बद्दल—ज्या गोष्टींपासून आतांपर्यंत लोकांना पुष्कळ नीतीचीं तत्त्वें आणि काव्याच्या कल्पना सुचलेल्या आहेत—माझें मत अगदीं निराळें बनून गेलें आहे. तत्त्ववेत्त्यांचे गुप्त इतिहास, त्यांच्या बड्या नांवाखालीं दिसणारीं त्यांचीं मानसचित्रें, या सर्व गोष्टी माझ्यापुढें उघड्या झाल्या. अमुक अमुक मनाला किती सत्य सांगितलेलें पेलतें; तें स्वतः किती सत्य सांगण्याचें धाष्टर्य करितें ?—हे प्रश्न माझ्यापुढें नीतीच्या अर्थाचा कस लावण्याकरितां अधिकाधिक येऊं लागले. चूक ( शुद्ध काल्पनिक तत्त्वावर विश्वास) हा अंधपणा नाहीं; चूक हा भ्याडपणा आहे...प्रत्येक विजय, ज्ञानांतील प्रत्येक पुढील पाऊल, हा धैर्याचा, स्वतःसंबंधीं कष्टप्रद तपाचा, स्वतःसंबंधीं पवित्र शुचितेचा परिणाम आहे. मी अशा काल्पनिक तत्त्वांचें खंडन करण्यास जात नाहीं. मी जें काय करतों तें त्यांच्या सन्निध डाग लागूं न देण्याकरितां आपल्या हातांत हातमोजे चढवितों... ' जें प्रतिषिद्ध असतें तें मिळवण्याचा आम्हीं प्रयत्न करतों " अशी एक लॅटिन उक्ति आहे: हा मथळा योजून माझें तत्त्वज्ञान एक दिवस विजयी होणार हें खास; कारण आजतागाईत जें कांहीं अति कडकपणें निषिद्ध मानण्यांत आलें आहे तें च केवळ निरपवाद सत्य आहे.

## ४

माझ्या संपूर्ण ग्रंथकर्तृत्वाच्या जीवनक्रमांत माझा झरथुष्ट्र हा स्वतंत्रपणें एकमेव स्थान घेऊन बसला आहे. या ग्रंथांत मी माझ्या बंधुवर्गाला आतांपर्यंत त्यांना ज्या कांहीं देणग्या मिळाल्या असतील त्या सर्वांत अत्यंत मोठी देणगी दिली आहे. हा ग्रंथ, ज्यांतील वाक् युगांच्या पलीकडचा ध्वनि काढीत आहे, हा केवळ या भूतलावरील अत्युच्च ग्रंथ आहे, अगदीं अक्षरशः शैलशिखरावरील हवेंत खेळणारा ग्रंथ आहे,—इतका कीं हा संपूर्ण सृष्टीचा पसारा, ही मानवजात, त्याच्या पायाखालीं अगणित योजनें दूर उभी ठाकलेली आहे,—येवढें च नाहीं तर तो अत्यंत खोल विचारांचा ग्रंथ आहे, सत्याच्या अगदीं अंतरोदराच्या विपुलत्वांतून उदय पावलेला आहे; ही एक कधीं न आटणारी ज्ञानवापी आहे,--तींत केव्हां हि घागर सोडा, ती सत्त्वांच्या सुवर्णजलानें भरून आल्याखेरीज रहावयाची नाहीं. येथें रुग्णता आणि बलेच्छा यांच्या बीभत्स संमिश्रणांत जे पैदा होतात आणि ज्यांना लोक धर्मसंस्थापक म्हणून संबोधितात अशांपैकीं कोणी “ रसुलिल्ला ” म्हणजे देवाचा प्रेषित बोलत नाहीं. जर कोणाला आपल्या ज्ञानाचा अक्षम्य अपराध करावयाचा नसेल तर त्यानें झरथुष्ट्राच्या तोंडांतून बाहेर पडलेल्या पुढील शब्दध्वनीकडे—अमृतवर्षाव करणाऱ्या ध्वनीकडे—आपलें योग्य लक्ष पुरवावें:—

“ अति प्रस्तब्ध शब्द अति मोठ्या वादळाचे वार्ताहर असतात; खबूतराच्या पावलाबरोबर जे विचार येतात ते जगाचे नेते होतात.

“ अंजीर वृक्षावरून खालीं पडतात; ते सुंदर आणि मधुर असतात, आणि जेव्हां ते पडतात, तेव्हां त्यांच्या तांबड्या सालीं फाटून जातात.

“ परिपक्व अंजिरांच्या ठायीं मी उत्तर वायु आहें.

“ म्हणून, अंजिरांप्रमाणें च माझ्या मित्रांनो, हीं नीतिवचनें

तुमच्यापुढें टपटप गळत आहेत; तर आतां तुम्हीं त्यांतील गोड रस आणि मधुर गीर प्राशन करा.

" भोंवतीं सर्व शरदृऋतु, निरभ्र आकाश आणि तळपणारें मध्यान्ह आहे. "

येथें कोणी तुमच्याशीं धर्मवेडा बोलत नाहीं; हें कांहीं " धर्मप्रवचन " नाहीं, ह्या पृष्ठांतून श्रद्धेची मागणी करण्यांत येत नाहीं. यांतून तेजाचा अपार निधि आणि आनंदाचें उदपान, बिंदुबिंदूनें, माझे शब्द बाहेर पडत आहेत--मंद आणि सौम्य पदविन्यास हा या संलापांचा स्वरावरोह आहे. असल्या गोष्टी केवळ उद्घांतील अति श्रेष्ठाकडे वळतात; या ठिकाणीं श्रवणाचा लाभ होणें हा एक दुर्लभ हक्क आहे; ज्याला पाहिजे त्याला झरथुष्ट्राचे शब्द ऐकण्यास कान असूं शकतात असें नाहीं. केवळ ह्या च कारणांच्या योगें झरथुष्ट्र हा प्रलोभक नाहीं काय?...परंतु, खरोखर, जेव्हां तो प्रथम च आपल्या एकांतस्थानीं मागें जातो तेव्हां तो स्वतः काय बोलतो हें तुम्हांस विदित आहे काय? अगदीं उलट, कोणता हि " साधु ", " संत ", " जगदुद्धारक ", आणि असा च दुसरा कोणी नासकाकुजका जें बोलेल त्याच्या उलट...त्याचे केवळ शब्द च नाहींत तर तो स्वतः च अशांच्यापासून अगदीं निराळा आहे.

" माझ्या शिष्यांनों, आतां मी एकटा च जातों! तुम्हीं सुद्धां येथून जा, आणि एकेकटे जा! असें च मला पसंत पडेल.

" खरोखर, मी तुम्हांला अनुज्ञा करतोंः तुम्हीं मला सोडून दूर व्हा आणि झरथुष्ट्राच्या विरुद्ध शस्त्र धारण करा! आणि या हि पेक्षां उत्तम, त्याचे जवळ असण्याबद्दल तुम्हीं लाज बाळगा! कदाचित् त्यानें तुम्हांला फसविलें असेल.

"जो ज्ञानाचा वीर असतो तो केवळ आपल्या शत्रूंवर च प्रेम करण्यास समर्थ असतो असें नाहीं, तर तो आपल्या मित्रांचा हि द्वेष करूं शकतो.

" जो मनुष्य शिष्यभावांत टिकून राहतो तो आपल्या गुरूचें ऋण केवळ हलक्या रीतीनें फेडतो. आणि तुम्हीं माझ्या गळ्यांतील माळ कां ओढून घेत नाहीं ?

" तुम्हीं मला सन्मान देतां; परंतु जर करतां तुमचा आदर एक दिवशीं मोडून पडला तर ? काळजी घ्या, नाहीं तर एखादा पुतळा तुम्हांला चिरडून टाकील.

" तुम्हीं म्हणतां झरथुष्ट्राचे ठायीं तुमची श्रद्धा आहे ! पण झरथुष्ट्राची किंमत काय ? तुम्हीं माझे ठायीं श्रद्धा ठेवतां: पण सर्व च श्रद्धाळूंची किंमत काय ?

" जरी तुम्हीं मला पाहिलें असलेंत तरी अद्याप तुम्हीं आपल्या स्वत:ला देखिलें नाहींत. असें च सर्व श्रद्धाळू करतात. म्हणून च सर्व श्रद्धा इतकी अल्पमोलाची आहे.

" आतां मी तुम्हांला आज्ञा करितों मला सोडून द्या आणि स्वत:ला शोधून काढा; आणि जेव्हां तुम्हीं सर्व माझा प्रतिषेध कराल तेव्हां च केवळ मी तुमच्याकडे परत येईन."

येथें आरंभीं नीट्झ्शेनें आपण या च वेळीं आपलें आत्मवृत्त लिहिण्यास प्रवृत्त कां झालों याचें कारण सांगितलें आहे. या वेळीं त्यानें ' सर्व नीतिमूल्यांचें मूल्यांतरीकरण ' हा बडा ग्रंथ लिहिण्यास सुरवात केली होती व त्याचा पहिला भाग म्हणजे प्रस्तुत ' ख्रिस्तांतक ' हा ग्रंथ पूर्ण झाल्याबरोबर पंधरा च दिवसांनीं त्यानें हें आत्मवृत्त लिहिण्यास हातीं घेतलें. अर्थात् सदर ख्रिस्तांतकांत जें त्यानें ख्रिस्ती धर्माचें खंडन केलें आहे आणि इतिउत्तर ख्रिस्ती लोकांनीं ख्रिस्ती नीति झुगारून देऊन आर्य नीतीचा

स्वीकार करावा म्हणून प्रतिपादिलें आहे ती च त्याची आपल्या बंधुवर्गाजवळ मोठी मागणी आहे, आणि त्या च करितां आपलें स्वरूपाविष्करण करण्याचा त्याचा ह्या आत्मवृतांत उद्देश आहे. तो म्हणतो वास्तविक रीत्या मी कोण आहें हें आतांपर्यंत सर्व युरोपला कळून चुकण्यास पाहिजे होतें, कारण मी आपणा संबंधीं माझ्या ग्रंथांत जागोजाग उल्लेख केले आहेत. शिवाय माझीं मतें आज वीस वर्षें जगांत उत्तरोत्तर अधिकाधिक प्रसार पावत आहेत. तथापि माझ्याकडे लोकांचें जावें तितकें लक्ष न जाण्याचें कारण एक च आहे, तें हें कीं माझें कार्य समजण्याची सांप्रत काळीं युरोपच्या बुद्धीला ऐपत नाहीं. ही गोष्ट अगदीं अक्षरशः खरी आहे. शिवाय दुसरा एक जगाचा नियम आहे व तो डिझरायलीनें आपल्या ग्रंथांत एका ठिकाणीं नमुद केला आहे. तो म्हणतो, जो मनुष्य आपल्या काळाच्या पुढें बुद्धिमत्तेंत फार दूरवर गेलेला असतो त्याच्या हयातींत त्याचे समकालीन लोक त्याच्याकडे पूर्ण दुर्लक्ष करतात आणि तो मेल्यावर पश्चात् त्याच्या ग्रंथांतून त्याच्या विचारांचा अपहार करतात. ही गोष्ट जशी डिझरायलीला स्वतःला लागू होती तशी च नीट्झ्शेला हि लागू आहे. नीट्झ्शेच्या हयातींत त्याच्या देशबांधवांनीं त्याच्याकडे किंचित् हि लक्ष दिलें नाहीं. म्हणून च तो येथें म्हणतो कीं मी आतांपर्यंत जरी इतकें लेखन केलें असलें तरी लोकांनीं अद्याप माझें नांव ऐकिलें नाहीं किंवा माझें तोंड हि पाहिलें

नाहीं. नीट्झ्शेचा इतरांपेक्षां जर्मन लोकांवर फार रोष आहे व तो त्यानें आत्मवृत्तांत निरनिराळ्या प्रसंगीं व्यक्त केला आहे. हल्लीं नीट्झ्शेचा जो पत्रव्यवहार छापून प्रसिद्ध आहे त्यांत त्याचे काळीं त्याचे ग्रंथांबद्दल युरोपांतील विद्वान म्हणून गणल्या जाणाऱ्या लोकांत किती अनास्था होती तें दिसून येतें. उदाहरणार्थ, त्याचा अति मोठा आणि आवडता ग्रंथ ' एवमब्रवीझ्झरथुष्ट्र: ' हा घ्या. या ग्रंथाच्या त्यानें प्रथम पांचपन्नास च प्रति काढविल्या होत्या व त्या ठळक ठळक विद्वांनांकडे अभिप्रायार्थ पाठविल्या होत्या. पण त्याच्या हयातींत त्यावर कोणा एकाचा हि अभिप्राय त्याला मिळाला नाहीं. फ्रान्सांतील तत्कालीन बडा इतिहासकार तन् यानें तर कित्येक वर्षें त्या ग्रंथाचें पान हि उघडून पाहिलें नाहीं. अर्थात् अशा स्थितींत नीट्झ्शेनें जें म्हटलें आहे कीं मी माझ्या स्वतःच्या स्वसंपादित गुणांवर जिवंत आहें तें अक्षरशः खरें आहे. नीट्झ्श हा पुष्कळ वर्षें आपला देश सोडून इटलीमध्यें रहात होता. त्याच्या बहुतेक मोठमोठ्या ग्रंथांचें लेखन या च देशांत घडून आलें. या काळांत तो बहुधा एंगडाइन् नदीच्या उत्तर तीरावर सिल्स-मारिया नामक गांवीं रहात असे. म्हणून च त्यानें म्हटलें आहे कीं उन्हाळ्याकरितां जे कोणी पंडित येथें हवा खाण्यास येतात त्यांची व माझी जेव्हां क्वचित् भेट होते तेव्हां त्या भेटींत मला माझ्या जिवंतपणापेक्षां मृतत्वाची साक्ष पटते. याचा अर्थ, एक तर, मी जनसंमर्दापासून दूर एकांतवासांत रहात

असल्यामुळें तो एक प्रकारचा मृत्यु च आहे; किंवा एकांतांत राहणें हें च खरें माझें जिवंत राहणें असल्यामुळें बाहेर जनसंमर्दांत येणें हा मृत्यु आहे. खरें च आहे—' या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी । यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ' हें भगवद्वचन नीट्झशे सारख्या क्रांतदर्शी महामुनीला यथार्थ लागू पडण्यासारखें आहे.

नीट्झश म्हणतो, मी ' लोकां ' पासून—सामान्य जनसंमर्दापासून —दूर राहतो. त्यांच्यांत मिसळणें म्हणजे मी आपला मृत्यु समजतो. अर्थात् मी ' लोकमान्य ' नाहीं. लोकमान्य होण्याची मला तादृश इच्छा नाहीं. नीट्झशेला जर कोणत्या गोष्टीचा परम तिरस्कार असेल तर तो लोकमान्यत्वाचा होय. म्हणून च कोणा लोकमान्याला जर नीट्झशेचा नीट बोध झाला नाहीं तर त्यांत नवल नाहीं. त्यानें आपल्या ग्रंथांतून जागोजाग ' लोक ' या वस्तूची छाननी करून ' लोकमान्य ' ही चीज काय असते तिचें अंतर्बाह्य स्वरूप दर्शविलें आहे व ती कशी पैदा होते याचा ऊहापोह केला आहे—मग हा लोकमान्य धार्मिक उपदेष्टा असो, सामाजिक सुधारक असो, वा राजकीय चळवळ्या असो. अशा लोकांचा आपल्याशीं संपर्क न व्हावा म्हणून च तो स्वदेश सोडून इटलींत एकांतस्थानीं राहण्यास गेला. परंतु आतां त्याला आपण कोण आहों हें सांगण्याचा जेव्हां प्रसंग प्राप्त झाला तेव्हां ती गोष्ट त्याच्या स्वाभाविक मौनव्रताला आणि स्वाभिमानवृत्तीला बरी वाटली नाहीं. तथापि तसें करण्यावांचून गत्यंतर नव्हतें. या

विशिष्ट काळीं त्याला आपलें प्रसिद्धीकरण कर्तव्य वाटलें. कारण तसें न केलें तर लोकांत आपल्याविषयीं गैरसमज होऊन आपल्या कार्याची हानि होईल अशी त्याला भीति वाटली. जगाच्या इतिहासाकडे पाहतां नीट्झशेची ही भीति अयथार्थ नव्हती. आजपर्यंत जगांत त्याच्या सारख्या पुष्कळ थोर पुरुषांच्या मतांचा विपर्यास झालेला दिसून येतो.

याचें अति मोठें उदाहरण म्हणजे भगवद्गीता होय. गीतेंत भगवंतांनीं द्वैत व अद्वैत या शब्दांचा कोठें हि नामनिर्देश केला नाहीं. किंबहुना त्यांना हे शब्द व त्यांतील कल्पना हि माहीत नव्हत्या. त्यांचा सर्व भर सांख्यतत्त्वज्ञानाच्या अनुरोधानें द्वंद्व-निर्द्वंद्वावर होता. ते रागद्वेषादि द्वंद्वांच्या पलीकडे गेलेल्या नित्यसंन्यासी कर्मयोग्याला—

' ज्ञेयः स नित्यसंन्यासी यो न द्वेष्टि न कांक्षति ।
निर्द्वंद्वो हि महाबाहो सुखं बंधात्प्रमुच्यते ॥ '

या प्रकारें ' निर्द्वंद्व ' या शब्दानें संबोधितात. परंतु चमत्कार हा कीं, पुढील शंकराचार्य नामक एका संन्यासी वेदान्त्यानें त्यांना या निर्द्वंद्वाच्या अढळ पदावरून ढकलून, आपण एक नवीन च निर्माण केलेल्या अद्वैतपदावर आणून बसविलें. निर्द्वंद्व व अद्वैत यांत जमनिअस्मानाचें अंतर आहे हें नासदीय-सूक्ताचें भाष्य वाचणारास आतांपर्यंत पूर्णपणें कळून चुकलें च असेल. निर्द्वंद्वांत जगताचा सत्यत्वानें प्रतिपाल होतो, तर अद्वैतांत तें मिथ्यात्वानें सर्वथैव झुगारिलें जातें याचा प्रत्यय पुढील गीताध्यानांत चांगला येणार आहे:—

असल्यामुळें तो एक प्रकारचा मृत्यु च आहे; किंवा एकांतांत राहणें हें च खरें माझें जिवंत राहणें असल्यामुळें बाहेर जनसंमर्दीत येणें हा मृत्यु आहे. खरें च आहे—' या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी । यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ' हें भगवद्वचन नीट्झ्शे सारख्या क्रांतदर्शी महामुनीला यथार्थ लागू पडण्यासारखें आहे.

नीट्झ्श म्हणतो, मी ' लोकां ' पासून—सामान्य जनसंमर्दापासून —दूर राहतो. त्यांच्यांत मिसळणें म्हणजे मी आपला मृत्यु समजतो. अर्थात् मी ' लोकमान्य ' नाहीं. लोकमान्य होण्याची मला तादृश इच्छा नाहीं. नीट्झ्शेला जर कोणत्या गोष्टीचा परम तिरस्कार असेल तर तो लोकमान्यत्वाचा होय. म्हणून च कोणा लोकमान्याला जर नीट्झ्शेचा नीट बोध झाला नाहीं तर त्यांत नवल नाहीं. त्यानें आपल्या ग्रंथांतून जागोजाग ' लोक ' या वस्तूची छाननी करून ' लोकमान्य ' ही चीज काय असते तिचें अंतर्बाह्य स्वरूप दर्शविलें आहे व ती कशी पैदा होते याचा ऊहापोह केला आहे—मग हा लोकमान्य धार्मिक उपदेष्टा असो, सामाजिक सुधारक असो, वा राजकीय चळवळ्या असो. अशा लोकांचा आपल्याशीं संपर्क न व्हावा म्हणून च तो स्वदेश सोडून इटलींत एकांतस्थानीं राहण्यास गेला. परंतु आतां त्याला आपण कोण आहों हें सांगण्याचा जेव्हां प्रसंग प्राप्त झाला तेव्हां ती गोष्ट त्याच्या स्वाभाविक मौनव्रताला आणि स्वाभिमानवृत्तीला बरी वाटली नाहीं. तथापि तसें करण्यावांचून गत्यंतर नव्हतें. या

विशिष्ट काळीं त्याला आपलें प्रसिद्धीकरण कर्तव्य वाटलें. कारण तसें न केलें तर लोकांत आपल्याविषयीं गैरसमज होऊन आपल्या कार्याची हानि होईल अशी त्याला भीति वाटली. जगाच्या इतिहासाकडे पाहतां नीट्झशेची ही भीति अयथार्थ नव्हती. आजपर्यंत जगांत त्याच्या सारख्या पुष्कळ थोर पुरुषांच्या मतांचा विपर्यास झालेला दिसून येतो.

याचें अति मोठें उदाहरण म्हणजे भगवद्गीता होय. गीतेंत भगवंतांनीं द्वैत व अद्वैत या शब्दांचा कोठें हि नामनिर्देश केला नाहीं. किंबहुना त्यांना हे शब्द व त्यांतील कल्पना हि माहीत नव्हत्या. त्यांचा सर्व भर सांख्यतत्त्वज्ञानाच्या अनुरोधानें द्वंद्व-निर्द्वंद्वावर होता. ते रागद्वेषादि द्वंद्वांच्या पलीकडे गेलेल्या नित्यसंन्यासी कर्मयोग्याला—

‘ ज्ञेयः स नित्यसंन्यासी यो न द्वेष्टि न कांक्षति ।

**निर्द्वंद्वो** हि महाबाहो सुखं बंधात्प्रमुच्यते ॥ ’

या प्रकारें ‘ निर्द्वंद्व ’ या शब्दानें संबोधितात. परंतु चमत्कार हा कीं, पुढील शंकराचार्य नामक एका संन्यासी वेदान्त्यानें त्यांना या निर्द्वंद्वाच्या अढळ पदावरून ढकलून, आपण एक नवीन च निर्माण केलेल्या अद्वैतपदावर आणून बसविलें. निर्द्वंद्व व अद्वैत यांत जमनिअस्मानाचें अंतर आहे हें नासदीयसूक्ताचें भाष्य वाचणारास आतांपर्यंत पूर्णपणें कळून चुकलें च असेल. निर्द्वंद्वांत जगताचा सत्यत्वानें प्रतिपाल होतो, तर अद्वैतांत तें मिथ्यात्वानें सर्वथैव झुगारिलें जातें याचा प्रत्यय पुढील गीताध्यानांत चांगला येणार आहे:—

असल्यामुळें तो एक प्रकारचा मृत्यु च आहे; किंवा एकांतांत राहणें हें च खरें माझें जिवंत राहणें असल्यामुळें बाहेर जनसंमर्दांत येणें हा मृत्यु आहे. खरें च आहे—'या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी । यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः' हें भगवद्वचन नीट्झ्शे सारख्या क्रांतदर्शी महामुनीला यथार्थ लागू पडण्यासारखें आहे.

नीट्झ्श म्हणतो, मी 'लोकां' पासून—सामान्य जनसंमर्दापासून—दूर राहतो. त्यांच्यांत मिसळणें म्हणजे मी आपला मृत्यु समजतो. अर्थात् मी 'लोकमान्य' नाहीं. लोकमान्य होण्याची मला तादृश इच्छा नाहीं. नीट्झ्शेला जर कोणत्या गोष्टीचा परम तिरस्कार असेल तर तो लोकमान्यत्वाचा होय. म्हणून च कोणा लोकमान्याला जर नीट्झ्शेचा नीट बोध झाला नाहीं तर त्यांत नवल नाहीं. त्यानें आपल्या ग्रंथांतून जागोजाग 'लोक' या वस्तूची छाननी करून 'लोकमान्य' ही चीज काय असते तिचें अंतर्बाह्य स्वरूप दर्शविलें आहे व ती कशी पैदा होते याचा ऊहापोह केला आहे—मग हा लोकमान्य धार्मिक उपदेष्टा असो, सामाजिक सुधारक असो, वा राजकीय चळवळ्या असो. अशा लोकांचा आपल्याशीं संपर्क न व्हावा म्हणून च तो स्वदेश सोडून इटलींत एकांतस्थानीं राहण्यास गेला. परंतु आतां त्याला आपण कोण आहों हें सांगण्याचा जेव्हां प्रसंग प्राप्त झाला तेव्हां ती गोष्ट त्याच्या स्वाभाविक मौनव्रताला आणि स्वाभिमानवृत्तीला बरी वाटली नाहीं. तथापि तसें करण्यावांचून गत्यंतर नव्हतें. या

विशिष्ट काळीं त्याला आपलें प्रसिद्धीकरण कर्तव्य वाटलें. कारण तसें न केलें तर लोकांत आपल्याविषयीं गैरसमज होऊन आपल्या कार्याची हानि होईल अशी त्याला भीति वाटली. जगाच्या इतिहासाकडे पाहतां नीट्झशेची ही भीति अयथार्थ नव्हती. आजपर्यंत जगांत त्याच्या सारख्या पुष्कळ थोर पुरुषांच्या मतांचा विपर्यास झालेला दिसून येतो.

याचें अति मोठें उदाहरण म्हणजे भगवद्गीता होय. गीतेंत भगवंतांनीं द्वैत व अद्वैत या शब्दांचा कोठें हि नामनिर्देश केला नाहीं. किंबहुना त्यांना हे शब्द व त्यांतील कल्पना हि माहीत नव्हत्या. त्यांचा सर्व भर सांख्यतत्त्वज्ञानाच्या अनुरोधानें द्वंद्व-निर्द्वंद्वावर होता. ते रागद्वेषादि द्वंद्वांच्या पलीकडे गेलेल्या नित्यसंन्यासी कर्मयोग्याला—

'ज्ञेयः स नित्यसंन्यासी यो न द्वेष्टि न कांक्षति ।

**निर्द्वंद्वो** हि महाबाहो सुखं बंधात्प्रमुच्यते ॥'

या प्रकारें 'निर्द्वंद्व' या शब्दानें संबोधितात. परंतु चमत्कार हा कीं, पुढील शंकराचार्य नामक एका संन्यासी वेदान्त्यानें त्यांना या निर्द्वंद्वाच्या अढळ पदावरून ढकलून, आपण एक नवीन च निर्माण केलेल्या अद्वैतपदावर आणून बसविलें. निर्द्वंद्व व अद्वैत यांत जमीनअस्मानाचें अंतर आहे हें नासदीयसूक्ताचें भाष्य वाचणारास आतांपर्यंत पूर्णपणें कळून चुकलें च असेल. निर्द्वंद्वांत जगताचा सत्यत्वानें प्रतिपाल होतो, तर अद्वैतांत तें मिथ्यात्वानें सर्वथैव झुगारिलें जातें याचा प्रत्यय पुढील गीताध्यानांत चांगला येणार आहे:—

" पार्थाय प्रतिबोधितां भगवता नारायणेन स्वयं
व्यासेन ग्रथितां पुराणमुनिना मध्येमहाभारतम् ।
अद्वैतामृतवर्षिणीं भगवतीमष्टादशाध्यायिनी
मंब त्वामनुसंदधामि भगवद्गीते भवद्वेषिणीम् ॥ "

येथें गीतेला ' अद्वैतामृतवर्षिणी ' = अद्वैतामृताचा वर्षाव करणारी, व ' भवद्वेषिणी ' = संसाराचा द्वेष करणारी अशी म्हटली आहे. ज्यानें मुख्यतः ' हें प्रवर्तित चक्र ' चालू ठेवण्याकरितां अर्जुनाला कर्ममार्गास लावण्याचा प्रयत्न केला त्या श्रीकृष्णाला हें गीतेचें ध्यान पाहून हंसें च येईल, नव्हे ह्या संसारद्वेष्ट्या अद्वैती आचार्यांचा तिरस्कार वाटेल. पुनः या वैदिक कर्मभ्रष्ट आचार्यांनीं गीतेंतील ' त्रैगुण्यविषया वेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन ' इत्यादि श्लोकांचा अर्थविपर्यास करून गीतेला वेदांपासून बाजूला केली आहे. या ठिकाणीं सदर श्लोकांचे अर्थ व त्यांवरील विवरण आमच्या गीताभाष्यांत पाहण्यास सुचविल्यावांचून आम्हांस राहवत नाहीं. कारण त्यांत च गीतेची या संन्यासी आचार्यांच्या अवैदिक मार्गापासून मुक्तता आहे. दुसरें उदाहरण ख्रिस्ताचें. मूळ ख्रिस्त हा पूर्णपणें निर्मम, निर्मत्सर, निरहंकार, विरागी, अद्वैती स्वरूपाचा जोगी होता. पण पुढें संत पाउलाच्या हातांत तो लोभी, मत्सरयुक्त, विकारग्रस्त, भांडखोर, द्वैती स्वरूपाचा धर्मप्रवर्तक होऊन बसला. ही गोष्ट नीट्झ्शेनें प्रस्तुत ख्रिस्तांतक ग्रंथांत चांगली दर्शविली आहे. परंतु त्या हि पेक्षां अधिक म्हणजे इतकी सावधगिरी घेणारा नीट्झ्शा याचें स्वतःचें च उदाहरण घ्या. तो मरून

आतां पावशतक झालें न झालें तों च त्याच्या मतांचा विपर्यास त्याच्या अनुयायांत व भक्तजनांत होत चाललेला दिसून येतो. त्याचें तत्त्वज्ञान द्वंद्वमय असल्या कारणानें तें साहाजिक च विरोधाभासात्मक आहे. अर्थात् ज्या अर्थीं तो आपणास ख्रिस्तांतक म्हणवितो त्या अर्थीं तो च खरा ख्रिस्तानुयायी आहे असें त्याचे ख्रिस्ती भक्त प्रतिपादन करूं लागले आहेत. मूळ यहुद्यांनीं क्रूसावर खिळलेला मानवी ख्रिस्त काय, किंवा संत पाउलप्रणीत देवपदाला गेलेला ख्रिस्त काय, नीट्झ्शेनें दोघांना हि सारखें च पण निरनिराळ्या मुद्यांवर अवमानिलें आहे, व आपण ह्या ख्रिस्ती वातावरणापासून सर्वथा अलग आहोंत म्हणून पुकारिलें आहे. तथापि त्याला हि ख्रिस्ती या नांवानें संबोधणारे लोक निघाले च आहेत. हें भविष्य डोळ्या पुढें ठेऊन च नीट्झ्श येथें म्हणतों माझें खरें स्वरूप पहा. तें दर्शविण्याकरितां च मी हें आत्मवृत्त लिहीत आहे. मी पूर्णपणें सर्वतंत्रस्वतंत्र आहे. माझ्यासारखा तत्त्वदर्शी गेल्या कित्येक हजार वर्षांत कोणी झाला नाहीं. माझी बरोबरी अज्ञानानें किंवा दुराभिमानानें दुसऱ्या कोणाशीं करूं नका. माझें नांव भ्रांतीनें दुसऱ्या कोणाच्या हि नांवाबरोबर उच्चारूं नका. **मी ख्रिस्ती नाहीं**, ख्रिस्त विरोधक आहे. मी डायोनिसस आहे. मी लयकारक शंभुमहादेवाचा अवतार आहे. **मी ख्रिस्तांतक आहे.**

पुनः नीट्झ्श म्हणतो, मी नीतिवादी नाहीं, व सद्गुणांचा पुतळा हि नाहीं. येथे नीति म्हणजे ख्रिस्ती नीति व सद्गुण

म्हणजे ख्रिस्ती सद्गुण होत. अशा सद्गुणांपासून मीं निराळा आहे, तद्विरुद्ध आहे. सद्गुणी माणसांच्या जातींत मी आपला समावेश करून घेत नाहीं, व यांत च मला अभिमान वाटतो. डायोनिससचा म्हणजे शंभुभैरवाचा भक्त म्हणवून घेण्यांत मी सर्वसंहारक आहे असें जाहीर करतों. परंतु त्याबरोबर च मी उत्पत्तिकारक हि आहे ह पुनः पुनः बजावून सांगतों. मी जुन्या नीतिचा संहार करतों व नवीन नीति निर्माण करतों. या दोन नीतीच्या भिन्न जातींतील भेद दाखविण्याकरितां च मी हें आत्मवृत्त लिहीत आहे. ख्रिस्ती धर्मांत मानवाला **सुधारणें** हें मुख्य कार्य आहे. मीं त्याच्या विरुद्ध आहे. कारण माझ्या मतें ख्रिस्ती पद्धतीनें मानवाला सुधारणें म्हणजे त्याला रोगी बनवून पंगु करणें. ही गोष्ट मी ख्रिस्तांतकांत उत्तम विशद करून दाखविली आहे. मी नीतीच्या उगीच कल्पनामूर्ति बनवीत नाहीं. कारण सत्यसृष्टीला सोडून बनविण्यांत आलेल्या अशा मूर्ति पंगु कशा असतात हें जुन्या धर्मांत स्पष्ट दिसत आहे. ह्या कल्पनांनीं सत्यसृष्टीला खोटें ठरविलें व त्या योगें मनुष्याच्या मूळ नैसर्गिक वृत्ति मागें पडून त्यांची जागा दुसऱ्या कृत्रिम वृत्तींनीं आक्रमण केली यांत च मनुष्याची भयंकर हानि झाली आहे.

माझे विचार पटण्याला मनुष्य खंबीर मनाचा पाहिजे. तो लोकांतील शुद्ध लोकमान्य असून उपयोगी नाहीं. त्याला सत्य पेललें पाहिजे. सत्याच्या कटु वचनानें तो गडबडून जातां कामा नये. सत्य हें कटु असतें. तें कधीं मनाला प्रिय

होत नाहीं. मी सत्यवक्ता आहे. म्हणून मी इतर सामान्य जनांपासून दूर, फार दूर, एकांतांत निवास करतों. तथापि सत्य हें अति शुचि आणि पवित्र असतें. म्हणून असें सत्य वदणारा मी उंच शैलशिखरावर मोकळ्या हवेंत राहतों. येथील हवा फार पुष्टिकारक आहे. पण येथें हिमाची कडक थंडी आहे. ती सोसण्याला मनुष्याला दम पाहिजे. माझे विचार वाचण्याची संवय पाहिजे, तर च त्यांत वाचकाला गोडी लागेल. प्रथम त्याला कटुपणामुळें कष्ट पडतील पण त्यांतील प्रसादामुळें महदानंद प्राप्त होईल. नीट्झशेनें ख्रिस्तांतकाच्या आरंभीं आपण उत्तरेकडे उंच प्रदेशांत राहतों म्हणून जें म्हटलें आहे त्याचा च येथें अनुवाद आहे. तो म्हणतो, आपले विचार कडक आहेत. ते मनुष्याला गारठून टाकणारे आहेत, परंतु ते सत्य आहेत. ‘ हितं मनोहारि च दुर्लभं वचः ’—जें हितकर असतें तें मनोहारि नसतें तर मनाला अप्रिय होणारें असतें. म्हणून च ‘ अप्रियस्य च पथ्यस्य वक्ता श्रोता च दुर्लभः ’— अप्रिय आणि पथ्य बोलणारा वक्ता दुर्लभ व श्रोता हि दुर्लभ. या कविवचनाचा जणुं नीट्झशेनें येथें आपल्या ठिकाणीं उलगडा केला आहे. तो म्हणतो, मी पथ्यकारक बोलणारा आहे. अर्थात् तें अप्रिय होणारें आहे. म्हणून तें ऐकणारा श्रोता हि अति दुर्लभ आहे. हें दुर्लभत्व त्यानें आपल्या उंच शैलशिखरावर थंडीच्या कडाक्यांत राहण्याच्या अवस्थेचें द्योतक ठरविलें आहे. येथें थंडी इतकी कडक आहे कीं ती शरीराला गोठविते. हें च अप्रियत्व. पण येथील हवा

इतकी मोकळी आहे कीं ती बलाचें संवर्धन करिते. हें पथ्यत्व.

एतत्स्वरूप सत्याच्या उंच शैलशिखरावर विराजमान झालें असतां सृष्टीचा पसारा कसा दिसतो याचें येथें सुंदर वर्णन आहे. जणुं सर्व सृष्टि पायाखालीं म्हणजे नजरेखालीं येते. अशा सृष्टीचें निरीक्षण करून त्यांत जें दिसेल तें यथातथ्य सांगणें हें च तत्त्वज्ञान. हें तत्त्वज्ञान फार प्राचीन काळीं वैदिक ऋषींना प्राप्त झालें होतें. म्हणून च ते मंत्रद्रष्टे होत. कारण ह्या मंत्रांतील अर्थ त्यांनीं सृष्टींत साक्षात् अवलोकन केला होता. अशा तत्त्वज्ञानांत च केवळ शुद्ध सत्य, निर्मळ सत्य, पहावयास मिळतें. त्यामध्यें मनुष्याच्या केवळ कल्पनामय मूर्तींचा मागमूस हि नसावयाचा. म्हणून अशा तत्त्वज्ञानांत आपोआप च काल्पनिक नीतीनें बहिष्कृत केलेल्या गोष्टींचा अंतर्भाव होतो. ख्रिस्ती धर्मांतील काल्पनिक नीतीनें सत्याचा अपलाप करून जे नीतीचे खोटे नियम काढले आहेत त्या योगें सृष्टींतील खऱ्या वस्तुस्थीतीला धक्का बसला, सत्य असत्य ठरलें, व सर्वत्र असत्याचें प्राबल्य झालें. हें बहिष्कृत सत्य येथें चांगलें उजेडांत येतें व त्याचें महत्त्व कळून त्याला तुच्छ लेखणाऱ्या सांप्रदायिक नीतीची तुच्छता मनाला पटते. म्हणून नीट्झ्श म्हणतो खरें तत्त्वज्ञान ह्या ख्रिस्ती नीतीला झुगारून दिल्यावांचून प्राप्त होणें शक्य नाहीं. खरें तत्त्वज्ञान म्हणजे उंचावरून स्वतंत्रपणें निसर्गाकडे पहाणें, त्यांतील तत्त्वार्थ समजून घेणें आणि तो साक्षात्

क्रियेमध्यें अवलंबणें. असें तत्त्वावलोकन करीत असतां, नीट्झश म्हणतो, मला कांटसारख्या पूर्वग्रहदूषित तत्त्वज्ञांचें खरें मानासिक स्वरूप दिसून आलें. या मनाला शुद्ध सत्य पेललें नाहीं. त्याला तें उच्चारण्याचें धैर्य झालें नाहीं. कांट हा खिस्ती नीतीला धरून तत्त्वज्ञान सांगूं लागला व सत्या पासून च्युत झाला. चूक म्हणजे आंधळेपणा नव्हे तर भेकडपणा होय, न दिसणें नव्हे तर दिसलेलें भीतीनें न बोलणें होय. अर्थात् अशी चूक न करणें व धैर्यानें सत्य सांगणें हा च खरा विजय आहे. यांत जे कष्ट आहेत ती च तपश्चर्या. अशा तपश्चर्येंत शुचिता व पावित्र्य आहे. तादितर नीति असत्य स्वरूपाची अतएव अशुचि व अपवित्र होय. खिस्ती नीति व कांटची नीति अशुचि आहे. नीट्झश म्हणतो, अश प्रकारच्या सत्याला सोडून काल्पनिक नीतीचें स्तोम करणाऱ्या धर्माचें व तत्त्वज्ञानाचें खंडन करण्यास जाणें म्हणजे कालाचा उगीच अपव्यय आहे उंच प्रदेशावर उभें राहून केवळ एका दृष्टिपाताबरोबर हें असत्य प्रत्ययास येतें. त्याकरितां त्याचें खंडन करण्याची जरूर रहात नाहीं. मात्र त्याच्या जवळून गेलें असतां त्याची घाण हाताला न लागावी म्हणून तेवढ्या-पुरती मी सावधगिरी बाळगतों. शेवटीं नीट्झश म्हणतो खिस्ती धर्मानें जें कांहीं आक्षेपार्ह मानलें आहे व निषिद्ध ठरवलें आहे तें च खरें सत्य आहे. म्हणून अशा निषिद्ध व आक्षेपार्ह वस्तूंचा मुद्दाम जाणूनबुजून अवलंब करून मी आपलें तत्त्वज्ञान

बनविलें आहे. व तें सत्य असल्याकारणानें जरी आज नाही तरी कालांतरानें खास विजयी होणार आहे.

सदहु उपोद्घातांत शेवटीं नीट्झशेनें आपल्या 'एवमब्रवीझ्झरथुष्ट्रः' या ग्रंथाचें माहात्म्य वर्णिलें आहे त्याच्या मताप्रमाणें हा ग्रंथ जगांत अति मोठा अभूतपूर्व आहे. तो म्हणतो हा ग्रंथ कोणी एखाद्या बुद्ध, ख्रिस्त किंवा महमद या सारख्या धर्मस्थापकानें लिहिलेला नाहीं. कारण हे सर्व धर्मस्थापक बहुधा एका बाजूनें मानसिक रोगानें पछाडलेले आणि दुसऱ्या बाजूनें बलाची इच्छा धारण करणारे असतात. म्हणून त्यांच्या तोंडांतून झरथुष्ट्राच्या दिव्य वाणीप्रमाणें अमृतवर्षाव होणें अशक्य आहे. हे झरथुष्ट्राचे विचार कसे आहेत, तर परिपक्क अंजिरांप्रमाणें रसभरित आणि गोड. म्हणून नीट्झशे म्हणतो झरथुष्ट्राच्या ग्रंथांत कोणी धर्मवेडा बोलत नाहीं, येथें एखादें धर्मावर प्रवचन चाललेलें नाहीं, येथें कोणी कोणाला आपल्या वचनावर श्रद्धा ठेवण्यास सांगत नाहीं, तर येथें तेजस्वी, ओजस्वी भ्राजस्वी, अमृतस्रावी, आनंदमय, बलदायक शब्दांची वृष्टि आहे. हे शब्द सामान्य जनसंमर्दाकरितां नाहींत, तर अभिजात पुरुषश्रेष्ठाकरितां आहेत; संघाकरितां नाहींत, तर उद्घाकरितां आहेत. 'उद्घ' आणि 'संघ' किंवा श्रेष्ठशाही आणि लोकशाही, या दोहोंत नीट्झशेचें तत्त्वज्ञान उद्घाला अनुसरून आहे, संघाला नाहीं असें म्हटलें म्हणजे तें सामान्यतः वैदिक स्वरूपाचें आहे, वेदान्ती स्वरूपाचें नाहीं असें ठरतें. वैदिक तत्त्वज्ञान हें वर्णाश्रमधर्माच्या मार्गावर

उच्चाचें उच्चत्व रक्षण करून त्याला परमोच्च पदावर चढविणारें आहे. अर्थात् त्यांत आचारावर मोठी भिस्त आहे. येथें व्यक्ति स्वतंत्र नाहीं तर नित्य कर्माशीं बद्ध आहे. उलट, वेदान्ती तत्त्वज्ञान हें बौद्ध धर्माच्या मार्गावर नीचैक वर्णात उतरून तेथें च निर्वाणांत स्तब्ध होणारें आहे. अर्थात् त्यांत आचाराला फारसें महत्त्व नाहीं, कर्म केवळ चित्त-शुद्धयर्थ आहे, आणि व्यक्तिमात्राला ज्या वेळीं विरजा येईल त्या वेळीं सररहा प्रव्रज्या घेण्यास मोकळीक आहे. उद्घाचें बल व्यक्तीच्या गुणांत असल्यामुळें तेथें सर्वविषमता आहे व तींत श्रेष्ठकनिष्ठ पर्याय आहेत. संघाचें बल संख्येंत असल्यामुळें तेथें सर्वसमता आहे व तींत श्रेष्ठाला खालीं ओढण्याकडे प्रवृत्ति आहे. म्हणून नीट्झ्शा म्हणतो, माझ्या झरथुष्ट्राचे बोल ऐकण्यास सर्वांना च सारखे कान असतात असें नाहीं, म्हणजे सर्वांना ते समजण्याची पात्रता असते असें नाहीं. कारण त्याच्या मतें झरथुष्ट्र हा कोणी एखादा साधु. संत किंवा जगदुद्धारक नाहीं. हे सर्व आपआपल्यापरी सारखे च लोकमान्य होत. यांना आपल्याभोंवतीं लोक जमविण्यांत, संप्रदाय काढण्यांत, मठ स्थापण्यांत, पीठें उभारण्यांत, पंथ बनविण्यांत आणि संस्थानें सजविण्यांत महत्त्व येतें. याला च ते लोकसंग्रह असें नांव देतात. उलट झरथुष्ट्र हा लोकविद्वेषी व लोकत्यागी आहे. तो स्वस्थानी एकांतांत जातेवेळीं आपल्या शिष्यांना उद्देशून जे शब्द बोलतो ते कोणा हि लोकमान्याच्या संदेशाहून भिन्न असतात. तो

म्हणतो, मी आपल्या मार्गानें एकटा च जातों, माझे बरोबर कोणी येऊं का, व तुम्हीं हि एकेकटे च आपल्या मार्गानें जा. तुम्हीं झरथुष्ट्रावर प्रेम करूं नका, उलट त्याचा द्वेष करण्यास शिका. तुम्हीं त्याची भक्ति करूं नका व त्याचें शिष्यत्व हि सांगूं नका. त्याचे जवळ असण्याचा अभिमान बाळगण्यापेक्षां लाज बाळगा. त्यानें आपणास शिकविलें म्हणण्यापेक्षां फसविलें म्हणा. कारण जो ज्ञानाचा वीर असतो तो जितका आपल्या शत्रूवर प्रेम करतो तितका च आपल्या मित्रांचा द्वेष करूं शकतो.

पुन: झरथुष्ट्र आपल्या शिष्यांना उद्देशून म्हणतो, जे शिष्य सदैव आपल्या गुरूजवळ शिष्यभावांत राहतात ते त्या योगें गुरूचें ऋण उत्तम प्रकारें फेडतात असें नाहीं. कारण ते स्वत: कधीं मोठे होण्याची आकांक्षा च धरीत नाहींत. म्हणून झरथुष्ट्र म्हणतो, हे माझ्या शिष्यांनों, तुम्हीं आपलें शिष्यत्व टाकून द्या व गुरूचे गुरू बना, गुरूच्या गळ्यांतील माळ हिसकावून घ्या, त्याचें स्थान हस्तगत करा. ही आर्यनीति होय: बापाला मुलाच्या मोठेपणाचें कौतुक वाटावें व मुलानें बापाच्या मोठेपणाचा हेवा करावा; गुरूनें शिष्याकडून पराभव चिंतावा व शिष्याला गुरूचें ज्ञान लघु भासावें. असे सत्पुत्र व सच्छिष्य यद्यपि जगतांत फार थोडे होऊन गेले असले तरी सर्व आर्यपुत्रांनीं तसें व्हावें हें च येथील झरथुष्ट्राच्या शब्दांतील मर्म आहे. असे सत्पुत्र म्हणजे शिकंदर व शिवाजी, आणि सच्छिष्य म्हणजे याज्ञवल्क्य व

अरिस्टॉटल होत. पहिल्या दोघांनीं आपल्या पित्यांपेक्षां अति मोठे पराक्रम केले व दुसऱ्या दोघांनीं आपल्या गुरूंपेक्षां ज्ञानांत अति मोठी मजल मारली हें इतिहासांत प्रसिद्ध च आहे. म्हणून झरथुष्ट्र म्हणतो, तुम्हीं मला सन्मान देण्याचें सोडून द्या, कारण ज्या आदरानें तुम्हीं आज मला सन्मान देत आहां तो आदर पुढें कालांतरानें कदाचित् ढांसळून पडेल. काळजी घ्या, नाहीं तर अशा आदरानें उभारल्या जाणाऱ्या पुतळ्या खालीं सांपडून चिरडून जाल.

हे झरथुष्ट्राचे बोल अर्वाचीन काळच्या लोकमान्यांनीं व त्यांच्या भक्तजनांनीं सदैव हृदयांत बाळगणें जरूर आहे. ह्या लोकमान्यांची जिवंतपणीं इच्छा च ही कीं आपल्या भक्तांनीं आपल्या मागें आपलीं स्मारकें व पुतळे उभारावे आणि जयंत्या व पुण्यतिथ्या कराव्या. याला च उपनिषदांत लोकैषणा म्हटली आहे व तिच्यापासून ज्ञात्यानें दूर राहावें असें सांगितलें आहे. कित्येक ठिकाणीं तर हे लोकमान्य आपल्या हयातींत आपण स्वतः च आपलीं स्मारकमंदिरें बांधवून व पुतळे करवून तयार ठेवतात. अर्थात् त्यांच्या भक्तजनांना व शिष्यवृंदांना अशीं स्मारकें करून व पुतळे उभारून आपल्या गुरूच्या ऋणांतून मुक्त झालों व आपल्या आयुष्याची इतिकर्तव्यता संपली असें वाटणें साहजिक आहे. येथें जसें गुरूनें स्वतः आपलें गुरुपण केलें तसें भक्तानें आपण आपलें भक्तपण बजाविलें अशी भावना आहे. परंतु यांत च गुरु व शिष्य या उभयतांच्या मनाची लघुता, बुद्धीची हीनता, व कार्याची क्षुद्रता

सारखी च व्यक्त होत आहे. आर्यधर्मांत जर कशाचा निषेध असेल तर तो एतत्सदृश स्मारकांचा व पुतळ्यांचा होय. आर्य धर्मांत फक्त देव आणि पितर हे पूजार्ह आहेत. देवांची पूजा ते गुणांचे अधिष्ठाते व पितरांची पूजा ते जन्मदाते म्हणून. ही पूजा अनुक्रमें स्वाहाकारानें व स्वधाकारानें आहे. यां-शिवाय इतर मृत वा जिवंत मानवाची पूजा नाहीं. मृताच्या प्रेतपूजेबद्दल तर आर्यधर्मांत मोठा कटाक्ष आहे. छांदोग्योप-निषदांत जी इंद्रविरोचनांच्या आत्मज्ञानाची कथा आहे तींत असुर हे मृत देहाची पूजा करणारे आहेत म्हणून त्यांचा निषेध केला आहे. ह्या आसुरी चालीला अनुसरून च अर्वा-चीन खिस्ती व मुसलमानी धर्मांत प्रेताचें पूजन शिरलें आहे. खिस्ती धर्मांत जो ' ट्रान्सबस्टँशिएशन् ' = द्रव्यांतरीकरणानें प्रभुभोजनविधि आहे त्यांत खिस्ताचें रुधिर मद्यद्वारें प्राशन करण्याची व खिस्ताचें मांस इतर मांसाच्या द्वारें भक्षण कर-ण्याची कल्पना आहे. या चालीवरून प्राचीन रोमन लोक तत्कालीन खिस्तीधर्मानुयायांना नरमांसभक्षक समजत व खिस्ताचें वाहन गाढव असल्यामुळें त्यांना रासभपूजक मानीत. खिस्तीधर्मांत प्रेताच्या थडग्यावर पुष्पहार वगैरे घालण्याची चाल आहे व मुसलमानी धर्मांत पुष्पें वाहून शिवाय धूपदीप दाखविण्याची चाल आहे. ह्या दोन्ही धर्मांहून अधिक निकृष्ट दशेला गेलेल्या हल्लींच्या हिंदुधर्मांत हि संन्याश्यांच्या—आणि विशेषत: शंकराचार्यादि जगद्गुरु म्हणून मिरविणाऱ्या मठीय संन्याश्यांच्या समाधिपूजनांत हें च आसुरी प्रेतपूजन शिरलें

आहे. मूळ हिंदुधर्मांत देवालयें आहेत मानवालयें नाहींत. याचा अर्थ देवळांतून मूर्ति देवांच्या आहेत मानवांच्या नाहींत. राम व कृष्ण हे मानव नाहींत देव आहेत. म्हणून त्यांच्या कोठें दोहोंपेक्षां अधिक भुजांच्या हि मूर्ति आहेत. नीट्झ्शेला या प्रकारचें मानवपूजन बिलकुल मान्य नाहीं. तो जिवंत वा मृत कोणा हि मानवाचा पुतळा करून त्याचें पूजन करण्याच्या मताविरुद्ध आहे. ह्या मानवपूजनाचें बंड इंग्लंडांत कार्लाइलनें 'वीरपूजन' या नांवाखालीं उगीच आवाच्या सवा माजविलें आहे असें त्याचें म्हणणें आहे. त्याची कार्लाइलच्या एकंदर तत्त्वज्ञानाबद्दल च अति तुच्छ बुद्धि आहे. 'अन्न न पचल्याकारणानें आलेलें नैराश्य' म्हणजे कार्लाइल, असें त्यानें त्याचें एका ठिकाणीं स्वरूपवर्णन केलें आहे. कार्लाइलला कांहीं तरीं श्रद्धेला विषय पाहिजे होता. तो त्याला 'वीरा' च्या ठिकाणीं सांपडला, म्हणून त्यानें वीरपूजनाची कल्पना काढली. नीट्झ्श म्हणतो यांत च त्याचें दुर्बलत्व दिसून येतें. त्याचा मोठा दोष म्हणजे त्यानें श्रद्धा व सत्य या दोहोंना एका च माळेंत गोंविलें ( बलेच्छा १·४९९ ). म्हणून त्याला वीराचा खरा स्वभाव समजला नाहीं. त्यानें वीराला सर्वोत्तम मनुष्य ठरवितांना त्याच्या ठायीं ख्रिस्ती सद्गुणांचे आरोप केले. कारण कार्लाइल हा ख्रिस्ती 'प्युरिटन' म्हणजे सोंवळा ख्रिस्ती होता. इंग्लंडमध्यें बकल आणि कार्लाइल यांपैकीं एकानें वीराला लोकमान्य बनविलें व दुसऱ्यानें देवमान्य बनविलें आणि या प्रकारें दोघांनीं मिळून त्याला मानवी मोठेपणा-

पासून पदच्युत केलें. कार्लाइलबद्दल नीट्झ्शेनें आपल्या ' मूर्तींचा संधिप्रकाश ' नामक ग्रंथांत ' स्वकालाबरोबर युद्धांतील चकमकी ' प्रकरणांत येणेंप्रमाणे मत प्रकट केलें आहे.—

" मी हल्लीं थॉमस कार्लाइलूचें चरित्र वाचीत आहे.—न कळतां आणि न समजतां चाललेलें प्रहसन, बद्धकोष्ठ स्थितींतील मनोवृत्तींच्या वीरनीतीचें प्रदर्शन.—कार्लाइल, मोठमोठे शब्द आणि आविर्भाव यांचा पुतळा, प्रवाहपतित प्रवक्ता, ज्याला कोणत्या ना कोणत्या स्वरूपाची जाज्वल्य श्रद्धा हुडकून काढण्याची एकसारखी तळमळ लागली होती पण ती हस्तगत करण्याचें सामर्थ्य मात्र बिलकुल नव्हतें, —असा कार्लाइल हा एक उंच कल्पनासृष्टींत भराऱ्या मारणारा नमुनेदार कवि आहे! नुसती श्रद्धेची जाज्वल्य तळमळ दर्शविली म्हणजे लागली च ती तेथें उमटते असें नाहीं तर उलट तेथें च तिचा पूर्ण अभाव दिसून येतो. वास्तविकरीत्या जो मनुष्य खरा श्रद्धावान् असतो तो सहज नास्तिकतेच्या सुखोपभोगांत रममाण होऊं शकतो; कारण तो पूर्णपणें बलवान्, सुदृढ, आणि सुसंहत असल्यामुळें सुखाचा आस्वाद घेण्यास सर्वथा सुपात्र असतो. बलवान् श्रद्धेच्या पुरुषांविषयीं आदराच्या भावनेचा कोट उभारून त्याखालीं कार्लाइल हा अगदीं दडपून गेलेला दृष्टीस पडतो, आणि म्हणून तो जे कोणी आपणापेक्षां कमी मूर्ख असतील त्यांच्यावर आग पाखडण्याचा प्रयत्न करतो. त्याला शब्दांमध्यें महाध्वनि निर्माण केल्याखेरीज गत्यंतर च राहात नाहीं. स्वतःसंबंधीं स्वतःची तीव्र आणि शाश्वत अप्रामाणिकवृत्ति—हा त्याचा विशिष्ट गुण; या गुणाच्या योगें तो मोठा मनोरंजक विषय होऊन बसला आहे.—तथापि हें खरें कीं इंग्लंडांत तो केवळ प्रामाणिक म्हणून प्रशंसिला जात आहे. असो, याला च इंग्लिश म्हणतात; आणि इंग्लिश लोक हें दांभिकाग्रणींचें राष्ट्र आहे ही गोष्ट लक्षांत घेतां यांत कांहीं

विशेष आश्चर्य मानण्यासारखें नाहीं तर तें अत्यंत स्वाभाविक आहे. सारांश, कार्लाइल हा अन्तःकरणांत शुद्ध नास्तिक आहे पण तो आंग्ल असल्यामुळें आपण तसें नाहीं हें भासविण्याचा सतत प्रयत्न करतो आणि त्यांत च मोठें भूषण मानतो. ”

हें कार्लाइलचें चित्र पाहिलें म्हणजे त्याच्या ‘वीरपूजना’ ची यथार्थ कल्पना होते. नीट्झ्शेच्या मतें वीरपूजकाची स्थिति सदा अकर्तृत्वाची असते. वीर हा जितका हिंमतवान् कर्ता पुरुष दिसतो तितका च त्याचा पूजक बेहिमती नाकर्ता असतो. किंबहुना त्याला आपलें नाकर्तेपण झांकण्याकरितां च वीरपूजनाची जरूर भासते. वीरानें वीराचा आदर करणें निराळें व भक्तानें वीराला देव बनविणें निराळें. वीर वीराचा द्वेष करील, त्याशीं झुंझेल, त्यावर शस्त्राचे घाव घालील, त्याला प्रसंगीं ठार हि मारील. पण येथें च द्वेषांत प्रेम व हननांत आदर दिसून येणार आहे. नीट्झ्शेचा झरथुष्ट्र एका ठिकाणीं म्हणतो,—“ आम्हांस शत्रु पाहिजेत परंतु ते द्वेषार्ह असावेत, तिरस्कारार्ह नकोत; म्हणून च आम्हीं पुष्कळ क्षुद्र शत्रूंकडे दुर्लक्ष करतों व आमच्या बरोबरीचा कोणी तरी एक च वीर आमच्याकरितां राखून ठेवतों. ” याला उदाहरणें जशीं होमरच्या ईलियडमध्यें आहेत तशीं रामायणमहाभारतांत हि आहेत. रावणाचा वध रामाच्या च बाणानें व्हावयाचा, लक्ष्मणाच्या नाहीं. कर्ण हा अर्जुनाकडून आणि दुर्योधन भीमाकडून च मारले जावयाचे. आर्यपुराणाप्रमाणें असे दोन शत्रुवीर किंवा वीरशत्रु सारखे च देवावतार

असूं शकतात. उदाहरणार्थ परशुधारी राम आणि धनुर्धारी राम. मात्र नवीनाच्या तेजापुढें जुन्याचें तेज कायमचें मावळतें व तो हतप्रभ म्हणजे सदेव होत्साता ' चीरंजीव ' राहतो. तथापि या त्याच्या ऐहिक चिरजीवत्वांत च त्याचा शाश्वत मृत्यु असतो, तर दुसऱ्याच्या स्वर्गारोहणांत त्याचें शाश्वत अमरत्व सिद्ध होतें. येथें दोन वीर परस्परांशीं वैरभावानें झगडतात परंतु एकमेकांकडे आदरबुद्धीनें पाहतात. येथें एकमेक एकमेकांच्या कर्माचें अनुकरण करतात, परंतु त्यांत स्वतःचें वैशिष्ट्य किमपि ढळूं देत नाहींत. म्हणून राम हा आपल्या स्वतःच्या धनुष्याचा अभिमान बाळगतो, तो दुसऱ्याच्या शस्त्राचा अवलंब करीत नाहीं. शिवाजीनें अफझुल-खानाला ठार मारून त्याची तरवार हस्तगत केली पण आपली स्वतःची ' भवानी ' टाकली नाहीं. येनाच्या लढाईनंतर नेपोलियनच्या हातीं जेव्हां फ्रेडरिक दि ग्रेटची तरवार लागली आणि जेव्हां ती धारण करण्याविषयीं जनरल रॅप्पनें त्याला आग्रह केला तेव्हां तो म्हणाला,—" पूर्वी एकदां मला स्पेनच्या वकीलानें पाहिल्या फ्रान्सिस राजाची तरवार नजर केली होती, तशी च माझ्याकडे एकदां इराणच्या वकीलानें जंगीजखानाची तरवार भेट आणली होती, आणि आतां ही प्रशियाच्या महावीराची तरवार माझ्या हातीं आली आहे व ती तूं मला धारण करण्यास सांगत आहेस; पण, शहाण्याच्या कांद्या माझ्याजवळ हो **माझी** तरवार आहे हें तूं पहात नाहींस काय! " हे निर्घृण वीर एकमेकांचें अनुकरण कसें

करतात हें रोमच्या इतिहासांत मेरिअस, सला, सीझर, पॉम्पे यांच्या चरित्रांत उत्तम निदर्शनास येतें. यांना एकमेकांच्या इतिहासाची जरूर भासते पण ती त्यांचीं स्मारकें करण्याकरितां किंवा पुतळे उभारण्याकरितां नव्हे तर त्यांच्या सारखा पराक्रम करून वीरत्व संपादण्याकरितां. कारण येथें क्वचित् एकाच्या पुतळ्याच्या छायेंत दुसऱ्याचा वध दिसणार आहे. नेपोलियननें शिकंदर व हानिबाल यांची चरित्रें वाचलीं. कशाकरितां ? तर त्या दिग्विजयी वीरांप्रमाणें आपण हि पूर्व दिशा जिंकण्याकरितां व आल्प्सपर्वत ओलांडण्याकरितां ! वीर वीराला देव करील, पण त्या देवत्वांतून त्याचें वीर्य कधीं हि काढून टाकणार नाहीं. शिकंदरापुढें हर्क्यूलीस व शिवाजीपुढें हरिकृष्ण हे वीर देव होते. जसें श्रीकृष्णानें मथुरेंत कंसाच्या सभेंत जाऊन त्याला सिंहासनावरून खालीं ओढलें तसें च शिवाजीनें आग्र्यास औरंगझेबाच्या दरबांत जाऊन व त्यावर सिंहासारखीं झडप घालून त्याला खालीं ओढावयाचें व त्या सिंहासनावर आपण विराजमान होऊन तेथून आपल्या सार्वभौमत्वाची द्वाही फिरवावयाची असा घाट घातला होता. महाराष्ट्राच्या दुर्दैवानें त्याचा हा धाडसी प्रयत्न सफल झाला नाहीं ही गोष्ट निराळी. एरवी शिवाजीला तेथें आपल्या बरोबर आपले मोठमोठे मंत्री घेऊन जाण्याचें कांहीं कारण नव्हतें. नेपोलियनचा तरी शिकंदराच्या पावलावर पाऊ ठेऊन पूर्व दिशा जिंकण्याचा डाव कोठें साधला?

येथें एक गोष्ट लक्षांत ठेवणें जरूर आहे कीं वीर हा कर्माकडे लक्ष देतो फलाकडे नाहीं. त्याचें कर्मावर प्रेम असतें फलावर नसतें. नीट्झश म्हणतो जी गोष्ट प्रेमानें केली जाते ती सदसतांच्या पलीकडे असते ( सदसतांच्या पलीकडे, सूत्र १९३ ). वीराचें प्रेम जितकें युद्धकर्मावर असतें तितकें त्यांतील लाभालाभ व जयाजय यांवर नसतें. तो कर्म करतांना एखाद्या हिंस्त्र पशूप्रमाणें किंचित् हि मागेंपुढें पहात नाहीं. येथें च त्याची अनैतिहासिक वृत्ति दिसून येते. त्याला युद्ध—सतत युद्ध—पाहिजे असते. कारण त्यांत च त्याच्या वीरत्वाचें पोषण व वर्धन घडून येतें. उदाहरणार्थ, शिकंदर, सीझर शिवाजी व बाजीराव पहा. अशा युद्धकर्मांत लाभ होवो व अलाभ होवो, जय मिळो वा अजय मिळो, त्याची त्यांना क्षिति नसते.महत्त्व कर्माचें, त्यांतील फलाचें नाहीं. म्हणून च श्रीकृष्ण अर्जुनाला युद्ध कर—मग त्यांत मेलास तरी वहावा व जगलास तरी वहावा—असें सांगतो. त्याच्या मतें ' हतो वा प्राप्स्यासि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ' या न्यायानें वीराला दोन्ही फलें सारखीं च श्रेयस्कर असतात. या प्रकारें फलाशारहित कर्म हें च त्याच्या मताप्रमाणें निष्काम कर्म, हें च नियतकर्म, हें च स्वधर्मपर कर्म होय. हें च वेदांचें मत आहे. आणि हें च नीट्झशेनें आपल्या तत्त्वज्ञानांत सर्वतोपरि अवलंबिलें आहे. हें तत्त्व वीराच्या कर्मांत जितकें उत्तम दिसतें तितकें दुसरीकडे कोठें हि दिसून येत नाहीं, किंबहुना अशा कर्मांत च वीराला

वीरत्व येतें. तो भावी पराभवाच्या भीतीनें कर्मापासून कदापि पराङ्मुख होत नाहीं. अफझुलखानाशीं द्वंद्वयुद्ध करण्यापूर्वीं शिवाजीनें आपल्या राज्याची निरवानिरव या च दृष्टीनें केली. नेपोलियन प्रत्येक युद्धप्रसंगीं पराजय झाला असतां व्यवस्थित रीतीनें मागें कसें हटावयाचें याची अगोदर योजना करून ठेवीत असे. म्हणून च वीराच्या पुरुषार्थांत केव्हां हि दैव आड येत नाहीं. तो दैवावर हवाला देतो पण त्याची फारशी क्षिति बाळगीत नाहीं. सीझर पदोपदीं दैव हातांत घेऊन चालतो पण तें च दैव शेवटच्या घटकेला प्रतिकूल झालेलें पाहून हि ट्रोजन वीर हेक्टर किंवा कौरव वीर दुर्योधन यांच्याप्रमाणें स्वकर्मापासून रतिभर मागें घेत नाहीं. कर्म म्हणजे नीट्झ्शेनें यथार्थ म्हटल्याप्रमाणें ( बलेच्छा २. ६६१ ) वृद्धि आणि प्रभुत्वसिद्धि. अर्थात् वीराच्या कर्मांत एक तर तो वृद्धि पावून प्रभुत्व मिळवील किंवा अंत पावून स्तब्ध होईल. त्याला कर्माच्या पुढें या दोहोंची किंमत नाहीं. तो या दोहोंच्या पलीकडे निर्द्वंद्वांत स्थित होऊन कर्म करणारा आहे आणि यांत च त्याचें खरें वीरत्व आहे. किंबहुना निर्द्वंद्व हें फलाशात्यागपूर्वक कर्म करण्यांत च सिद्ध होत असल्यामुळें असें कर्म करणें हा त्याचा देहस्वभाव आहे.

वीर हा आर्य आहे. आर्य हा वीर आहे. आर्याचा धर्म वैदिक आहे. कारण या धर्मांतील यज्ञकर्मांत ' रायस्पोषाय सुप्रजास्त्वाय सुवीर्याय ' या कामना आहेत. यांतील नीति

शुद्ध आर्य नीति आहे. ती उद्धाची नीति. नीट्झ्शेनें या नीतीला प्रभुनीति म्हटली आहे. उलट, बौद्धनीति व ख्रिस्ती नीति ही संघाची नीति. नीट्झ्शेनें तिला दासनीति ठरविली आहे. अर्वाचीन हिंदुधर्मांतील नीति अशी च दासवृत्तीची निदर्शक आहे. उद्धांतील प्रत्येक **लोकप्रभु** असतो. संघांतील प्रत्येक **लोकमान्य** होऊं पाहतो. उद्धांतील लोकप्रभु उच्च स्वातंत्र्यभावांत देवांशीं समानता दर्शवितो व मानवामानवांत विषमता पाहतो. संघांतील लोकमान्य देवाशीं शाश्वत दासभावानें विषमता राखून सर्व मानवलेकरांचे ठायीं समानता कल्पितो. म्हणून च वैदिक धर्मांत देव अनेक आहेत आणि ते मानवाच्या कार्यांत त्याला पदोपदीं मदत करून परम उपकारक होणारे आहेत. कारण ते सर्व निरनिराळ्या गुणांचे अधिष्ठाते आहेत. उलट, ख्रिस्ती धर्मांत प्रेम आणि करुणा या गुणांचा एक च देव आहे आणि तो मानवावर कायमचा रुष्ट असून केवळ आपल्या पुत्राच्या द्वारें त्यावर कृपेची छाया पाडणारा आहे. ख्रिस्तीधर्मांत देवपुत्रानें मनुष्याच्या पापक्षालनार्थ एकदां च आपल्या देहाचा यज्ञ केला आहे आणि त्यायोगें मनुष्यमात्राची यज्ञापासून कायमची फारकत झाली आहे. येथें मानवानें केवळ रागावलेल्या देवाचा अनुग्रह संपादन करण्याकरितां त्याची प्रार्थना करावयाची येवढी च कल्पना आहे. परंतु वैदिक धर्मांत क्रियेला प्रतिक्रिया व फेडीला परत फेड असल्यामुळें येथें खरा देवमानवांत न्याय आहे. येथें देव मानवावर उपकार करतो तर

मानव हि देवावर उपकार करतो. हा उपकार मानवाच्या यज्ञकर्मांत असतो. मानवानें यज्ञ केला नाहीं तर देवाला प्रगट होतां येत नाहीं. देवाचें प्रकटीकरण मानवाचे ठायीं त्याच्या यज्ञांत आहे. म्हणून च " देवान्भावयतानेन ते देवा भावयंतु वः । परस्परं भावयंतः श्रेयः परमवाप्स्यथ ॥ "—असें भगवंताचें यथार्थ वचन आहे. अर्थात् येथें देवाबद्दल अवास्तव भीति नाहीं तर त्याच्या उच्च गुणाबद्दल महान् आदर आहे; आणि हा आदर दासभावाचें चिन्ह नसून कृतज्ञतेचें दर्शक आहे. येथें शाश्वत पापाची कल्पना च नाहीं; म्हणून येथें देवाबद्दल शाश्वत भीतीचें कारण नाहीं. आर्यधर्माचें, आर्यसमाजाचें, आर्यनीतीचें आणि आर्यवृत्तीचें मुख्य रहस्य म्हणजे कृतज्ञता. कृतज्ञतेला प्रतियोगी सूड होय. कृतज्ञता आणि सूड हें द्वंद्व असून त्यांतील दोन्हीं कोटी मनुष्यमात्राच्या उच्च जीवनाला कारणीभूत आहेत. अर्थात् कृतज्ञता आणि सूड या दोहोंचा मनुष्याला सारखा च हक्क आहे. कृतज्ञता जर अमृतापेक्षां गोड म्हटली तर सूड हा मधापेक्षां मधुर म्हणून शेक्सपीयरनें वर्णिला आहे. सूडाची भावना कृतज्ञतेनें नष्ट होते. मनुष्याला कृतज्ञता दर्शविण्याचा अवसर दिला नाहीं तर तो सूडाची कास धरतो. निर्द्वंद्वाच्या भाषेंत कृतज्ञतेंत सूड व सूडांत कृतज्ञता आहे. ख्रिस्ती पुराणांत मानवाला सैतानानें ज्ञानाचा दरवाजा उघडून दिला अशी कथा आहे. येथें सैतान देवावर सूड उगविण्यास गेला पण त्यांत त्याचा मानवावर सहजासहजी उपकार घडून आला. याबद्दल मान-

वानें वास्तविकरीत्या त्याचे आभार मानावयास पाहिजे होते. पण उलट तो आपणांस चिरकाळ अज्ञानाच्या स्थितींत ठेवणाऱ्या देवावर च प्रेम करूं लागला म्हणून देवानें सैतानभाव धारण करून त्याला कायमचा पतित केला, आणि त्याच्या कृतघ्नपणाचें त्याला योग्य प्रायश्चित्त दिलें. वैदिक धर्मांत पदोपदीं उपकाराबद्दल कृतज्ञता आणि अपकाराबद्दल सूड असल्यामुळें तेथें या दोन्ही भावनांचा मनुष्याचे ठिकाणीं उत्तम परिपोष आहे, आणि त्याकरितां वेदांत देव अनेक आणि त्यांचे शत्रु हि अनेक वर्णिले आहेत. नीट्झ्शेनें या द्वंद्वाची मिमांसा आपल्या 'मानवी, सर्वथैव—मानवी' या ग्रंथांत भाग १ सूत्र ४४ मध्यें फार उत्तम केली आहे ती येणेंप्रमाणें:—

"**कृतज्ञता आणि सूड.**—वीर पुरुष कृतज्ञ कां असतो याचें कारण हें : त्याचा उपकर्ता, त्यावर जे उपकार करतो तद्वारें त्या वीर पुरुषाच्या क्षेत्रांत चुकीनें अतिक्रम करतो,—म्हणून आतां हा उपकारानें बद्ध झालेला तें ऋण फेडण्याकरितां उलट त्या आपल्या उपकारकर्त्याच्या क्षेत्रांत कृतज्ञतादर्शक यज्ञकर्मांनें फार आंत प्रवेश करूं लागतो. हा एक सूडाचा च अति सौम्य प्रकार आहे. यज्ञकर्मांनें आपली कृतज्ञताबुद्धि व्यक्त केल्यावांचून आणि त्यांतील समाधान मिळविल्यावांचून त्या वीरपुरुषाच्या मनाला आपण निर्बल आहोंत कीं काय व सदैव असें च निर्बल राहूं कीं काय अशी तळमळ लागून राहते. म्हणून च प्रत्येक आर्यमानवजातीचा समाज, जो आपणास मुळांत बलवान् वीरपुरुषांचा समाज समजतो, तो व्यक्तिमात्राच्या कर्तव्यकर्मांत कृतज्ञतेच्या गुणाला आद्यस्थान देतो.—स्विफ्टनें तर असें सर्वसामान्य

विधान केलें आहे कीं माणसें जितक्या प्रमाणांत सूडाची आकांक्षा बाळगतात तितक्या च प्रमाणांत कृतज्ञताबुद्धि धारण करितात. ”

मनुष्याला कृतज्ञता आणि सूड किंवा प्रेम आणि द्वेष या दोहोंचें सारखें च शिक्षण मिळालें पाहिजे यावर नीट्झ्शेचा मोठा कटाक्ष आहे ( कित्ता सू० ६०१ ). वैदिक यज्ञकर्मांत या दोहोंचें उत्तम शिक्षण मिळण्याची जशी योजना आहे तशी इतरत्र कोठें हि नाहीं. येथें पूजार्हांबद्दल जितकी पूजा नांदत आहे तितका च द्वेषार्हांबद्दल यथार्थ द्वेष वसत आहे. येथें यजनीय देवांचें जसें यजन सांगितलें आहे तसें च ‘ योऽस्मान्द्वेष्टि यं च वयं द्विष्मः ’ अशा शत्रूंचें योग्य हनन दर्शविलें आहे. येथें देवांबद्दल प्रेम आहे म्हणावें तर भीति आहे व भीति आहे म्हणावें तर प्रेम आहे. येथें खरोखर देवांच्या महनीय गुणांबद्दल आदर आहे. प्रेम आणि आदर यांच्या भावना निरनिराळ्या आहेत त्या नीट्झ्शेनें येणेंप्रमाणें उलगडून दाखविल्या आहेत—

“—प्रेम कामना धरितें, भीति त्यागबुद्धि बाळगते. म्हणून च कोणाला हि एका व्यक्तीपासून प्रेम आणि आदर या दोहोंचा सारखा लाभ होणें शक्य नसतें, निदान एका काळीं तरी तो खास होत नाहीं ( स्त्रियांना मात्र ही गोष्ट केव्हां च कळत नाहीं ). याचें कारण हें कीं, जो कोणी दुसऱ्या एखाद्यास सन्मान देतो तो त्या ठिकाणीं बलाचें वर्चस्व पहातो,—अर्थात् तो तेथें भय धारण करतो, म्हणजे त्याची त्या ठिकाणीं आदरयुक्त भीतीची भावना बनते. परंतु प्रेम म्हटलें कीं तेथें बलाची कल्पना नाहीं, भेदभाव नाहीं, तुटकपणा नाहीं वरिष्ठपणाची जाणीव नाहीं, किंवा कनिष्ठपणाची वृत्ति नाहीं. कारण

प्रेम हें कोणाचा आदरपूर्वक सन्मान करण्यास जात नाहीं. म्हणून च महत्त्वाकांक्षी पुरुषांना प्रेमाची अपेक्षा नसते. त्यांना दुसऱ्यांनीं आपल्यावर प्रेम करण्याचा मनांतून च काय पण उघड सुद्धां राग येतो. ” ( कित्ता सू० ६०३ )

यावरून ख्रिस्तीधर्मांत मानवाला जें देवावर प्रेम करण्यास सांगण्यांत येतें तें अवास्तव ठरतें. कारण हा देव मानवावर सदा रुष्ट असल्यामुळें मानवाला त्याची सदा भीति आहे. बरें अशा देवाबद्दल आदर धारण करावा तर तो प्रेम आणि करुणा यांचा देव वर्णिला आहे. म्हणजे येथें देवाबद्दल प्रेम हि बाळगतां येत नाहीं आणि आदर हि दर्शवितां येत नाहीं अशी अनवस्था उत्पन्न होते. परंतु वैदिकधर्मांत अग्नि, सोम, मित्र, वरुण, इंद्र, प्रजापति इत्यादि जे देव आहेत ते सर्व अनुग्रह आणि निग्रह या दोहोंत सारखे च दक्ष असल्यामुळें त्यांचे ठिकाणीं मानवाची जशी प्रेमपूर्वक भक्ति आहे तशी च आदरपूर्वक भीति आहे. तथापि या भीतींत देवाशीं बरोबरी करावी अशी भावना आहे, व प्रेमांत त्याशीं सायुज्यता मिळवावी अशी कल्पना आहे. म्हणजे येथें च खरी विभक्तपणांत भक्ति आहे व भक्तपणांत अविभक्तता आहे.

कार्लाइलला ‘ सत् ’ आणि ‘ असत् ’ किंवा सुष्ट आणि दुष्ट या नैतिक द्वंद्वाचा अर्थबोध झाला नव्हता. म्हणून त्याला देवाचें देवत्व कशांत असतें हें कळलें नव्हतें. अर्थात् त्याला वीराच्या गुणांचा साक्षात्कार नव्हता. नीट्झ्शेनें आपल्या ‘ मानवी, सर्वथैव-मानवी ’ ग्रंथांत ( भा. १ सू. ४९ ) सद-

सत् द्वंद्वांतील मूळ नैतिक उत्पत्तींचा इतिहास दोन रूपांत दर्शविला आहे तो पाहिला असतां कार्लाइलच्या वीरपूजनाचें खरें स्वरूप तेव्हां च लक्षांत येणार आहे.—

"—सत् आणि असत् यांतील नैतिक कल्पनेच्या उत्पत्तीचा मूळ द्विविध इतिहास आहे, ( १ ) प्रभु जातींतील अन्तःकरणांत उमटलेला, आणि ( २ ) पीडाग्रस्त व निर्बल अन्तःकरणांतून बाहेर पडलेला. पहिला मार्ग प्रकृष्ट आर्यांचा. या मार्गांत जो कोणी 'ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहं' या न्यायानें सुष्टाला सुष्टपणें आणि दुष्टाला दुष्टपणें वागविण्यास समर्थ असतो आणि म्हणून जो आपल्या ठायीं कृतज्ञता आणि सूड हे दोन्ही गुण सारखे धारण करतो त्याला च 'सत् किंवा सुष्ट ही संज्ञा दिली जाते; अर्थात् याच्या उलट जो बलहीन असतो, ज्याला परत फेड करण्याचें सामर्थ्य नसतें तो त्याच कारणानें 'असत्' किंवा क्षुद्र ठरतो. सुष्ट हा आपल्या नैसर्गिक गुणकर्मांनें च 'सत्' कोटींत प्रवेश करतो. या कोटींत प्रत्येक मनुष्य व्यक्तिशः दुसऱ्याशीं परत फेडीच्या भावनेनें ऋणबद्ध असल्यामुळे येथें साहजिक एकराष्ट्रीयत्वाची समानवृत्ति निर्माण होते. उलट क्षुद्र दुर्मानव हा 'असत्' कोटींत अन्तर्भाव पावतो. या कोटींत व्यक्तिमात्रांच्या बलहीनत्वामुळें एकराष्ट्रीयत्वाची केव्हां च समानवृत्ति निपजणें शक्य नसतें. 'सत्' हा 'वर्ण' होय. 'असत्' हा शुद्ध धुळीचा डोंगर आहे. सत् आणि असत् किंवा सुष्ट आणि दुष्ट हे शब्द फार काळपर्यंत उच्च आणि नीच, प्रभु आणि दास या शब्दांचे अनुक्रमें पर्यायवाचक होते. दुसऱ्या पक्षीं, शत्रु हा असत् म्हणून मानला जात नसे. कारण त्याला उसनें फेडण्याचें सामर्थ्य असें. होमरमध्यें ट्रोजन आणि ग्रीक हे दोघे हि सुधीर दर्शविले आहेत. जो आपणास पीडा करतो तो असत् म्हणजे वाईट नव्हे, जो तिरस्करणीय असतो तो

असत् होय. ' सत् ' किंवा सुष्ट मनुष्य हा ' सत् ' किंवा आर्य वर्णात च निर्माण व्हावयाचा. अशा शोभन भूमींतून कुत्सित फल निघणें सर्वथा अशक्य आहे. यदाकदाचित् अशा उच्च अभिजात वर्णांतील एखाद्या व्यक्तीनें जर त्या वर्णाला न शोभण्यासारखें कृत्य केलें तर त्याचा दोष तो आपल्यावर न येऊं देण्याचा आटोकाट प्रयत्न करतो; उदाहरणार्थ, तें कृत्य देवानें घडवून आणिलें, देवानें त्या भल्या मनुष्याची दृष्टि आंधळी केली आणि त्याचें मन बिघडविलें म्हणून त्याचे हातून असें कृत्य झालें.—

दुसरा मार्ग निकृष्ट चांडाळांचा. या मार्गांत प्रत्येक मनुष्य दुसऱ्याकडे द्रोही, प्रमत्त, साहसी, निष्ठुर, सोदा या दृष्टीनें पाहतो,—मग तो सत् असो वा असत् असो, सुजात असो वा कुजात असो, सुष्ट असो वा दुष्ट असो; दुष्ट हा शब्द येथें प्रत्येक मानवाला लावावयाचा, नव्हे कल्पनेच्या कक्षेंत येईल अशा प्रत्येक प्राणिमात्राला, म्हणजे देवाला देखील; मानवी काय किंवा दैवी काय, सर्व च असत् सर्व च दुष्ट. कोणी जर खरोखर चांगलें करूं लागला, मदत देऊं लागला, करुणा वाहूं लागला, किंवा प्रेम दर्शवूं लागला, तर त्या ठिकाणीं भयानें द्वेषाचें चिन्ह पाहणें, तें सर्व बुद्धिनाशक, मोहकारक व मृत्युदायक मानणें,—थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे तें एक संभावित मात्सर्याचें लक्षण समजणें. या प्रकारच्या प्रकृतिस्वभावामुळें कोणा हि व्यक्तींच्या ठिकाणीं कोणतें हि जानपद कधीं हि अस्तित्वांत यावयाचें नाहीं, आणि यदाकदाचित् आलें च तर तें अगदीं निकृष्ट स्वरूपांत रहावयाचें. अशा स्थितींत जेथें जेथें एतत्सदृश सदसद्भावना निर्माण होते तेथें तेथें व्यक्तींचा काय, जातीचा काय, किंवा कुलाचा काय अधःपात जवळ आला म्हणून समजावें.—आमची अर्वाचीन सुधारणा प्रभु जातींच्या आणि वर्णांच्या भूमीवर वाढलेली आहे. "

तथापि ही सुधारणा ख्रिस्तीधर्माला धरून आहे. अर्थात् तींत

आर्य आणि अनार्य किंवा उद्द आणि संघ या दोहोंचें विलक्षण संमिश्रण झालेलें आहे. तींत जें कांहीं आर्यत्व दिसतें तें सर्व प्राचीन ग्रीक व रोमन संस्कृतींतून उतरलेलें आहे आणि जें अनार्यत्व दिसतें तें खिस्तीधर्मीतून पैदा झालेलें आहे. या दोहोंतील नीतीच्या सदसत्कल्पना आणि त्यांना अनुसरणाऱ्या अंतिम सुखाच्या भावना परस्परांशीं अगदीं विरोधात्मक आहेत. त्यांचें यथार्थ स्वरूप नीट्झ्शेनें 'नीतीची पूर्व पीठिका' नामक ग्रंथांत ' सत् आणि असत् अथवा सुष्ट आणि दुष्ट ' या प्रथम कल्पांतील दशम सूत्रांत येणेंप्रमाणें दर्शविलें आहे.—

"......जे " सुजात " असतात ते स्वतःचे ठिकाणीं " सुख " साक्षात् **अनुभवितात**; म्हणजे त्यांना आपल्या शत्रूंच्या कडे पाहून त्यावरून कृत्रिम रीतीनें सुख बनविण्याची आवश्यकता नसते; किंवा ( द्रोही चांडालयातींत जशी प्रवृत्ति असते कीं ) सुखाचा नुसता शब्दोच्चार करीत बसावें अथवा सुखाचे **आंत आपणास पाहून घ्यावें** असें हि त्यांस करण्याची गरज नसते; आणि तसें च ते आपल्या ठिकाणीं गुणानें परिपूर्ण, बलोत्कर्षानें अन्वित, आणि म्हणून **निश्चयानें** कार्यक्षम असल्यामुळें सुखाची कर्मापासून केव्हां हि ताटातूट करावयाचा वेडेपणा करीत नाहींत—त्यांच्या मतें कर्मामध्यें च निश्चयेंकरून सुख अवतरतें ( किंबहुना ' यु प्रत्ताइन ' ह्या सुखवाचक ग्रीक शब्दाचा मूळ धात्वर्थ कर्मदर्शक आहे )—याच्या अगदीं उलट स्थिति बलहीन आणि पीडित चांडालवर्गातील सुखाची आहे; त्यांचा चिडका, विषारी, कुत्सित व द्रोही स्वभाव लक्षांत घेतां त्यांच्या सुखाचें स्वरूप अगदीं तत्त्वार्थानें जर एखाद्या अमली पदार्थाच्या निशेसारखें, प्रेतासारखें स्थिर, स्वस्थ, शांत, जणुं " साबाथ ", मनाचा शक्तिपात आणि इंद्रियांची शिथिलता,—एका शब्दांत सांगा-

वयाचें म्हणजे शुद्ध निष्क्रियता—यांसारखें दिसलें तर त्यांत कांहीं नवल नाहीं. सुजात आर्य मनुष्य हा आपणा स्वतःशीं सदैव उघड्या मनानें आणि विश्वासबुद्धीनें वागतो ( ' सुजात ' वाचक ग्रीक शब्दामध्यें ' सत्य ' आणि ' तेजस्विता ' या अर्थांचा ध्वनि आहे ); तर उलटपक्षीं कुजात द्रोही मनुष्याला आपणाशीं सत्यतेनें काय किंवा तेजस्वितेनें काय, प्रामाणिकपणानें काय किंवा विश्वासानें काय केव्हां च वागतां येत नाहीं. त्याचा आत्मा सदा द्वेषैकदृष्टीनें तिरवा पाहतो; त्याचें मन सरळ रस्ता सोडून नेहमीं वाकडे तिकडे मार्ग, गुप्त भुयारें, आणि पार्श्वद्वारें यांच्याकडे मोठ्या हौसेनें वळतें; प्रत्येक प्रच्छन्न वस्तूंत त्याला आपलें स्वतःचें जग दिसतें, आपली स्वतःची सुरक्षितता भासते, आपला स्वतःचा उपशामक गंधलेप मिळतो; तो मूक राहण्यांत, झालेलें न विसरण्यांत, संधीची वाट पाहण्यांत, गरजेपुरतें स्वतःकडे लघुत्व घेण्यांत आणि प्रसंगोपात्त आत्मनिंदा करण्यांत अत्यंत पटाईत असतो. अशा द्रोही मनुष्याची जात स्वभावतःच इतर आर्य जातींच्यापेक्षां मोठी दूरदर्शी ठरली तर त्यांत कांहीं नवल नाहीं. तथापि ती त्या गुणाला जो मान देते तो निराळ्या च दृष्टीनें असतो. म्हणजे खरोखर, तो गुण तिच्या अस्तित्वाला च विशेष महत्वानें कारणीभूत झालेला असतो. उलट अभिजात आर्यपुत्रांमध्यें हा दूरदर्शीपणाचा गुण सुविलास आणि सदभिरुचि यांच्या नाजुक परिमळानें सहजासहजीं अनुरंजित होत्साता त्यांच्या उपजत प्रभुत्वाच्या स्वाभाविक वृत्तींना अनुसरून घडणाऱ्या पूर्ण निश्चयात्मक कर्मांत फारसा प्रमुखत्वानें भाग घेत नाहीं; इतकेंच काय, पण पुष्कळ वेळां जेव्हां ते संकटाच्या किंवा शत्रूच्या विरुद्ध मोठ्या निकरानें आणि वीर्यानें हल्ला चढवीत असतात, अथवा जेव्हां त्यांच्या ठायीं क्रोध, प्रेम, आदर, कृतज्ञता इत्यादि गुणांच्या अति हर्षनिर्भरानें उकळ्या फुटत असतात—कीं ज्या वृत्तीच्या योगें हे श्रेष्ठ आत्मे सर्व काळीं एकमेकांचे उच्च स्वरूप ओळखतात—

अशा वीरांच्या कर्मांत सदर दूरदार्शित्वाच्या गुणाचा खरोखर अभाव च दिसून येतो. जेव्हां अशा पुरुषश्रेष्ठाच्या ठिकाणीं क्रोधाचा प्रादुर्भाव होतो तेव्हां तो तत्काळ क्रियेमध्यें फलित होऊन निःशेष होतो, आणि म्हणून तेथें मागें विषाचा बिंदु हि उरत नाहीं; शिवाय त्या क्रोधाचा स्फोट फार तर एखाद दुसऱ्या स्थळीं होतो इतकें च, म्हणजे तो ठिकठिकाणीं असंख्य स्थळीं केव्हां च विस्तार पावत नाहीं; पण पंगु आणि दुर्बल मनुष्याच्या बाबतींत मात्र ही गोष्ट केवळ अपरिहार्य असते. आपल्या शत्रूंचा, आपल्या संकटांचा, आणि आपल्या दुष्कृत्यांचा उगीच फार काळ चावून चिकटपणें विचार करीत बसणें हे त्या श्रेष्ठ पुरुषाच्या आटोक्याबाहेर असतें–किंबहुना पूर्ण बलवान् स्वभावाचें हें लक्षण च आहे; अशा पुरुषांजवळ आपल्या प्रवाही दलाला पाहिजे तसा आकार देऊन झालेली जखम पूर्णपणें भरून काढण्यास आणि ती पार विसरून जाण्यास मुबलक साधनसामग्री असते; अर्वाचीन इतिहासांत याचें उत्तम उदाहरण म्हणजे मिरॅबो होय,–हा मिरॅबो कोणी आपला अपमान केला काय किंवा कोणी आपणाशीं नीचपणानें वागला काय याची कसली च स्मृति बाळगीत नसे; झालेली गोष्ट तो सहज विसरून जात असल्यामुळें त्याला क्षमा करण्याचा कधीं प्रसंग च प्राप्त झाला नाहीं. असा पुरुष खरोखर, केरसुणीच्या एका फटकाऱ्याबरोबर अगणित जंतूंना आपल्यापासून इतके दूर उडवून लावतो कीं त्यांचा त्याला कधीं स्पर्श च होऊं नये, नाहीं तर त्यांनीं इतरांप्रमाणें त्याच्या हि शरीरांत कायमचें वास्तव्य करण्यास मागेंपुढें पाहिलें नसतें. अशा प्रकारच्या धीरोदात्त वीरवृत्तींत च वास्तविकपणें ‘ आपल्या शत्रूवर प्रेम ” ही कोटी पाहतां येणें शक्य आहे ( अर्थात् ती जर खरोखर जगतांत कोठें दिसणें शक्य असेल तर ) या महात्म्यांच्या हृदयांत आपल्या शत्रूबद्दल किती तरी आदर निःसंशय वसत असलेला आदळतो–आणि त्यांची ती पूज्य संभावना अगोदर च प्रेमाला

सेतुरूप होऊन बसते! ते आपला शत्रु आपल्या स्वतःकरितां आपलें वैशिष्ट्य म्हणून रक्षण करण्याची धडपड करतात. ज्या सन्माननीय पुरुषाच्या चारित्र्यांत तिरस्कार करण्यासारखी एक हि जागा नसते पण मान देण्यास मात्र विपुल अवसर असतो अशा पुरुषावांचून त्याला अन्य कोणता हि शत्रु सहन होत नाहीं! उलटपक्षीं, द्रोही चांडाल हा ज्याला " शत्रु " म्हणून लेखतो त्याचें स्वरूप पहा—आणि येथें च आपल्याला त्याची क्रियाशक्ति, त्याची निर्मायकबुद्धि उत्तमप्रकारें दिसून येते; तो आपल्या मनांत " वाईट शत्रु, " " दुष्ट मनुष्य " असें भेसूर चित्र निर्माण करतो; आणि खरोखर ही जी त्याची मूळ कल्पना असते तीवरून पुढें तिला विरुद्ध प्रतियोगी सुष्ट मनुष्याची कल्पना उत्पन्न होते—असा " सुष्ट मनुष्य " कोण ? तर तो स्वतः-तो आपण स्वतः ! "

येथें खिस्ती सद्गुणाची कल्पना मूळ कशी उत्पन्न झाली तें निदर्शनास येतें. येथें सर्व मनोविकार अन्तःशत्रु मानले आहेत. हे च वेदान्तांतील षड्रिपु होत. अर्थात् अशा षड्रिपूंनीं पछाडिलेले जे कोणी ते सर्व बाहिःशत्रु. अशांचा निःपात झाल्याखेरीज देवाचें राज्य स्थापन व्हावयाचें नाहीं. पण देव म्हटला कीं तो या षड्रिपूंनीं पूर्णपणें युक्त असावयाचा. या नियमाला खिस्ती देव अपवाद नाहीं. मग षड्रिपूंचा निःपात म्हणजे एकप्रकारें देवाचा च निःपात होय. खिस्तीधर्मांत जर कोणती सैतानाची शिकवण असेल तर ती वासनांचें निर्मूलन करून देवाचें राज्य स्थापन करण्यास सांगणें. नीट्झ्शे म्हणतो आम्हांस अन्तःशत्रु पाहिजेत व बहिःशत्रु हि पाहिजेत. कारण शत्रु असल्यावांचून युद्ध नाहीं, युद्धावांचून

वीरत्व नाहीं, वीरत्वावांचून देवभाव नाहीं, देवभावावांचून विजय नाहीं, व विजयावांचून महात्मत्व नाहीं. म्हणून आम्हीं शत्रूचा निःपात करीत नाहीं, त्याशीं युद्ध करून त्यावर विजय मिळवितों. आम्हांस शत्रु असेल तर त्याचा आम्हीं योग्य अभिमान बाळगू, नसेल तर नवीन निर्माण करूं. कारण त्यांत च आम्हांला मोठेपणा येणार आहे. या संबंधीं त्यानें एके ठिकाणी स्पष्ट विवरण केलें आहे तें येणेंप्रमाणें:—

" कामवासनेला दैवी रूप दिलें म्हणजे तें च प्रेम सिद्ध होतें: अशा प्रेमाची सिद्धि हा ख्रिस्तीधर्मावर फार मोठा विजय आहे. दुसरा विजय म्हणजे आम्हीं जें शत्रुत्वाला दैवी रूप दिलें आहे तो होय. त्यांत जी मुख्य गोष्ट आम्हांला ढळढळीत दिसून आली ती ही कीं शत्रु असण्यांत अति मोठा फायदा आहे: थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे शत्रु निर्माण केल्याबरोबर आम्हीं पूर्वीं जें जें कांहीं केलें आणि संपादिलें त्याच्या अगदीं सर्वतोपरि उलट करण्याचा आणि संपादण्याचा प्रसंग आतां आम्हांस प्राप्त झाला आहे. सर्व काळीं सर्व युगांतील ' चर्च ' नामक धर्मसंस्थेची एक च एक इच्छा कीं आपल्या शत्रूचा निःपात व्हावा: परंतु आम्हीं जे अनीतिवादी आणि ख्रिस्तांतक आहोंत त्यांना मात्र चर्च जिवंत राहण्यांत च आपलें हित वाटत आहे. हल्लींच्या राजकीय जीवनांत सुद्धां शत्रुत्वाला अधिक दैवी रूप आलेलें दिसणार आहे,—अधिक सावध, अधिक विचारयुक्त, अधिक सोज्वळ. प्रत्येक राजकीय पक्षाला आपल्या विरुद्ध पक्षाचे तुकडे तुकडे होऊन तो नष्ट न होऊं देण्यांत च स्वतःचें स्वसंरक्षणात्मक हित दिसूं लागलें आहे; आणि हा च न्याय मोठ्या प्रमाणावर सर्व च राजकारणाला लागू आहे. कोणती हि नवीन रचना, विशेषतः हल्लींच्या जर्मन साम्राज्यासारखी रचना, अशा रचनेला मित्रांच्या पेक्षां शत्रूंची च

गरज अधिक आहे: केवळ प्रतिपक्षाच्या विरोधानें च तिला आपल्या अस्तित्वाच्या आवश्यकतेची जाणीव होईल, केवळ प्रतिपक्षाच्या विरोधानें च तिचें अस्तित्व आवश्यक होईल. आणि आम्हीं तरी आपल्या " अन्तःशत्रूं ' शीं अक्षरशः या च प्रकारें वागतों: या विषयांत आम्हीं सुद्धां शत्रुत्वाला दैवी रूप दिलें आहे, या विषयांत आम्हांला सुद्धां शत्रुत्वाची खरी किंमत कळून आली आहे. मनुष्याच्या अन्तःकरणांत ज्या मानानें विरुद्ध भावनांची सुसंमृद्धि असेल त्या मानानें च तो केवळ कार्यकर्ता असावयाचा; त्याचें तारुण्य कोठपर्यंत तर जोंपर्यंत त्याचा आत्मा वस्तूंकडे सुखैकदृष्टीनें पाहूं लागला नाहीं व शांतीला चटावला नाहीं तोंपर्यंत. आमच्या मनांतून ती जुनी कामना —" आत्म्याची शांति ", ख्रिस्तीधर्माचें अंतिम ध्येय, यावांचून दुसरी कोणती हि गोष्ट दुरावत चालली नाहीं. आम्हांला ती ख्रिस्ती नीतिची दूध देणारी गाय, तो शुद्ध सदसद्विवेकबुद्धीच्या सुखाचा लोण्याचा गोळा यांबद्दल तिळमात्र मात्सर्य वाटत नाहीं. ज्या मनुष्यानें युद्धसंन्यास केला त्यानें खरा प्रकृष्ट जीवनाचा च संन्यास केला..." ( मूर्तींचा संधिप्रकाश—निसर्ग विरुद्ध नीति, सू. ३ )

सुख, सद्गुण व सुष्टपणा यांची हीं नीट्झशेनें केलेली मीमांसा कार्लाइलला कळली नव्हती म्हणून त्याला वीराची योग्य कल्पना झाली नाहीं. त्याचा देव ख्रिस्ती होता. म्हणून त्याला आपला वीर देवपदावर पोंचवितां आला नाहीं. वैदिक धर्मांत देव हा वीर आहे म्हणून वीर हा सहज देवत्व पावणारा आहे. ख्रिस्ती देव हा केवळ करुणा व प्रेम वागविणारा आहे. तथापि तो रागावतो. परंतु त्याला आपल्या खऱ्या शत्रूचें किंचित् हि वांकडें करतां येत नाहीं. म्हणून तो त्याचें उट्टें गरीब मानवावर काढतो. उलट वैदिक इंद्र हा

**' जठरे सोमं तन्वी सहो महो भरति शीर्षणि क्रतुं '** जठरांत सोम, तनूचे ठायीं महान् बल, व डोक्यांत क्रियासंपन्न ज्ञान धारण करणारा आहे. तो वज्रानें आपल्या शत्रूंचा संहार करतो व स्वभक्तांना देवपदावर चढवितो. हे इंद्रभक्त खरे वीर होत. ते इंद्राशीं पराक्रमांत स्पर्धा करतात व त्याचें स्थान हस्तगत करण्याची आकांक्षा बाळगतात. अशा वीरांचें वीरत्व कार्लाइलाला कळणें स्वभावतःच दुरापास्त आहे. कारण एक तर तो ख्रिस्ती आहे व दुसरें आंग्ल जातीचा आहे. नीट्झ्शेच्या मतें आंग्लांची जात आणि आर्यांचें तत्त्वज्ञान यांची मुळांत च फारकत आहे. एतत्संबंधीं त्याचे विचार पुढीलप्रमाणें आहेत ते कोणा हि एतद्देशीय आधुनिक सुशिक्षिताला मननीय वाटल्यावांचून राहणार नाहींत.——

" हे आंग्ल—ही कांहीं तत्त्वज्ञांची जात नाहीं. बेकन हा सामान्यतः तत्त्वज्ञानाच्या आत्म्यावर घ गदा घालतो; हॉब्स, ह्यूम व लॉक हे तर आज कित्येक शतकें ' तत्त्वदर्शी ' या वस्तूला हीनत्व आणून तिची किंमत कमी करीत आले आहेत. कांट जो उठला आणि आपलें डोकें वर करून चालू लागला तो मुख्यतः ह्यूमला प्रतिरोध करण्या करितां. ' मला लॉकचा तिरस्कार वाटतो ' असे लॉकबद्दल जे शेलिंगनें उद्गार काढले ते यथार्थ होते. ह्या इंग्रजांनीं जगाला जें यांत्रिक नादानपणाचें रूप दिलें तद्विरुद्ध युद्ध पुकारण्यांत गटेच्या बरोबर हेगेल आणि शोपेनहॉर यांनीं हि सारखी च कंबर बांधली; तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रांतील दोन प्रतिभावान् भ्रातृमल्ल—जर्मन विचाराच्या दोन परस्पर विरुद्ध ध्रुवस्थानांकडे ज्यांनीं आपल्या निरनिराळ्या स्वतंत्र दिशा आंखल्या आणि त्यायोगें ज्यांनीं केवळ भ्रात्यांना च साजेल अशा

प्रकारचे एकमेकांशीं अन्यायाचें वर्तन केलें ते हेगेल आणि शोपेन-हार.—इंग्लंडमध्यें ज्या कशाची कमतरता आहे, आणि जी कमतरता सदैव कायम आहे, ती त्या अर्धवट नाटक्या वावदूकाला पूर्णपणें ज्ञात होती,—तो मठ्ठ मेंदूचा मूर्खशिरोमणी, कार्लाइल, ज्यानें आपल्या विकार-दर्शक मुद्राविकारांखालीं स्वतःसंबंधीं जें कांहीं त्याला ज्ञान होतें तें झांकून टाकण्याचा जन्मभर प्रयत्न केला: तें ज्ञान कोणतें, तर ज्या गोष्टीचा कार्लाइलच्या ठिकाणीं पूर्ण अभाव होता असें बुद्धीचें वास्तविक बल, प्रज्ञाचक्षूची क्रांतदृष्टि, एका शब्दांत सांगावयाचें म्हणजे तत्त्वविवेचक अध्यात्मज्ञान. अशाप्रकारच्या अतत्त्वज्ञ जातीनें ख्रिस्तीधर्माला घट्ट कवटाळून धरावें हा तिचा देहस्वभाव च आहे—त्यांना " नीतिमान् " होण्याकरितां आणि माणुसकी संपादण्याकरितां त्या धर्मांतील आचारविचारांची विशेष **गरज** आहे. इंग्रज माणूस हा जर्मनापेक्षां अधिक घुम्या, विषयलंपट, हेकट, आणि पशुतुल्य आहे; आणि म्हणून तो या च कारणानें दोहोंमध्यें अधिक नीच आहे परंतु तसा च अत्यंत भाविक आहे : त्याला ख्रिस्तीधर्माची सर्वतोपरी **अधिक गरज** आहे. ह्या इंग्रजी ख्रिस्तीधर्माला जो एक विशिष्ट आंग्ल विषादाचा आणि दारूच्या अति सेवनानें येणाऱ्या निशेचा दर्प चढलेला आहे तो तीक्ष्ण घ्राणेंद्रियांना तेव्हां च भासमान होण्यासारखा आहे. तथापि सबळ पुराव्यावरून असें सिद्ध करितां येईल कीं हा धर्म त्यांच्या त्या विषादाला आणि दारूच्या विषाला भंजक औषध म्हणून उपयोजिण्यांत येत आहे—एका अतिमंद विषाच्या विरुद्ध त्याला मारक दुसरें अतिप्रखर वीष: मेंग्या स्वभावाच्या रानवट लोकां-करितां या हि पेक्षां अधिक जहाल वीष आहे तें या पुढें आणखी एक पायरी पलीकडे आहे;—तें कोणतें, तर आत्मनिर्वाण. हा इंग्रजांचा स्वाभाविक रानवटपणा आणि गांवढळ दांभिकपणा ख्रिस्तीधर्माच्या सोंगाखालीं, आणि विशेषतः त्यांतील प्रार्थना व सामगायन यांच्या

अवडंबराखालीं अगदीं बेमालूम झांकला जात आहे ( किंवा अधिक सयुक्तिक म्हणजे, तो त्यायोगें उत्तम प्रकारें विशद होऊन व्यक्तता पावत आहे ); आणि खरोखर हा शुद्ध दारुड्यांचा आणि विषया-सक्त द्विपादांचा कळप जो पूर्वीं ' मेथॉडिस्ट ' पंथाच्या ( आणि त्या-नंतर आलीकडे ' मुक्तीफौजे ' च्या ) आश्रयाखालीं केवळ नीतीच्या डुरकण्या फोडण्यास शिकला होता, त्याला एखादी अनुतापाची लहर येणें म्हणजे सापेक्षतः त्याच्या वकूबाप्रमाणें त्याला ' माणुसकी ' ची अत्युच्य दशा प्राप्त होणें होयः इतकें आपणांस विचारांतीं कबूल करणें भाग आहे. तथापि अगदीं साध्या माणसासारख्या इंग्रजांत हि जें खरोखर खंत वाटण्यासारखें आहे तें हें कीं त्याच्या ठिकाणीं गाय-नाचा अभाव आहे, मग तें गायन लक्षणार्थानें घ्या किंवा वाच्यार्थानें समजा : त्याच्या आत्म्याच्या आणि देहाच्या चलनवलनांत कोठें च लय नाहीं आणि लास्य नाहीं : खरोखर त्याला लय आणि लास्य यांची इच्छा नाहीं आणि ' गाना ' ची हौस नाहीं. त्याला बोलतांना ऐका; अत्यंत सुंदर अशा इंग्रज स्त्रियांना चालतांना पहा—पृथ्वीवरील दुसऱ्या कोणत्या हि देशांत त्यांच्या इतक्या रमणीय कपोतिका आणि हंसा दृष्टीस पडणार नाहींत; शेवटीं त्यांना गातांना ऐका ! परंतु आतां हें मी तुम्हांस फार च सांगितलें..." ( सत् आणि असत् यांच्या पलीकडे, अध्याय ८, जन आणि जानपद, सूत्र २५२ ).

या प्रकारें कार्लाइल हा ख्रिस्ती इंग्रज किंवा इंग्रजी ख्रिस्ती असल्यामुळें या दुहेरी दोषांच्या योगें त्याला वीराचें खरें हृद्गत समजलें नाहीं तर त्यांत कांहीं नवल नाहीं. तो वीरावर ख्रिस्ती सद्गुणांचा आरोप करतो. परंतु ते सद्गुण खऱ्या वीर-नीतिशास्त्राप्रमाणें असद्गुण असतात. त्याची वीरपूजनावरील व्याख्यानें शब्दावडंबरानें ओतप्रोत भरलेलीं आहेत. पण असें

शब्दावडंबर केल्यावांचून त्याला आपला मानसिक ताण शिथिल करणें अशक्य होतें. नीट्झ्शे म्हणतो ( आनंदमय विज्ञान, सू० ९७ ), कित्येक ग्रंथकारांना आपल्या क्रोधाचें उपशमन करण्याकरितां शब्दावडंबर लागतें जसें लूथर किंवा शोपेनहॉर; तर कित्येकांना आपल्या तार्किक कोट्या लढविण्याची हौस तृप्त करण्याकरितां त्याची आवश्यकता भासते, जसें कांट ( आणि या देशांत शंकराचार्य ). कित्येकांना एक च कल्पना निरनिराळ्या रूपांत व्यक्त करण्याकरितां तें पाहिजे असतें, जसें माँतेन; तर कित्येकांना उत्कृष्ट पदलालित्य आणि सुंदर अर्थालंकार साधण्याकरितां त्याचा अवलंब करण्याची लालसा उत्पन्न होतें, जसें गठ्ठे. परंतु कार्लाइलचें मात्र सगळें च निराळें. त्याचें शब्दावडंबर केवळ मनांतील गोंधळ महान् ध्वनीच्या खालीं दडपून टाकण्याकरितां निर्माण झालें आहे. त्याचें वीरपूजन शुद्ध अकरणरूपाचें आहे. अशा वेड्या वीरपूजकांचें स्वरूप आणि त्यांच्या वीरपूजनाचें रहस्य नीट्झ्शेनें आपल्या ' उषा ' नामक ग्रंथांत सूत्र २९८ मध्यें मोठ्या मार्मिक रीतीनें विशद केलें आहे तें येणेंप्रमाणें.—

" वीरपूजन आणि त्याचे वेडे उपासक—जे वेडेपीर एखाद्या साक्षात् हाडामासाच्या श्रेष्ठ नमुन्याचे भक्त बनतात ते जोंपर्यंत स्वतः अकरणरूप धारण करतात तोंपर्यंत ठीक असतात, आणि त्या रूपांत ते अति उग्र दिसतात. ते ज्या वस्तूचा निषेध करतात ती त्यांना उत्तम ज्ञात असते, आणि ज्या अर्थीं ते आपले मूळ सुरक्षित स्थान सोडून बाहेर पडतात परंतु ज्या ठिकाणीं आपणास पुनः केव्हां तरी परत यावें लागेल याबद्दल सतत गुप्त भीति बाळगतात त्या अर्थीं

ते आपली वास्तविक स्थिति हि चांगली जाणतात. म्हणून च ते आपल्या नकारवृत्तीनें पूर्व स्थानावर परत येणें अशक्य होईल अशी खटपट करतात. परंतु जेव्हां ते एखादी क्रिया करण्याचा स्पष्ट विधि अवलंबतात तेव्हां ते तत्काळ आपले डोळे अंशतः मिटून काल्पनिक चित्रें रेखाटूं लागतात ( बहुधा हें सर्व जे कोणी त्यांचा मार्ग अवलंबीत नाहींत त्यांना उपद्रव देण्याकरितां असतें ). आतां कदाचित् हें त्यांचें करणें मोठें कौशल्याचें मानलें जाईल—ही गोष्ट कबूल आहे, पण त्यांत च खरा अप्रामाणिकपणा दिसून येणार आहे.

"हा आपल्याला प्रिय अशा वीरपुरुषाचें मनोमय चित्र रेखाटणारा कल्पक भक्त प्रथमतः त्या पुरुषाला आपल्या स्वतःपासून इतका दूर ठेवतो कीं त्याचें खरें रूप त्याला स्पष्टपणें पाहतां च येणें शक्य नसतें, आणि नंतर तो आपली सर्व कल्पनाशक्ति खर्च करून त्या ठिकाणीं कांहीं तरी " सुंदर " अवलोकन करतो—म्हणजे प्रमाणशीर ध्यान, अस्पष्ट रूपरेषा, संदिग्ध आकार. पुनः ज्या अर्थीं तो त्या अंतरिक्षांत तरंगणाऱ्या दूरस्थ काल्पनिक प्रतिमेचें लांबून च पूजन करण्यांत धन्यता मानतो त्या अर्थीं त्याला त्या आपल्या इष्टदेवतेचें गांवढळ अपवित्र जनसंमर्दापासून संरक्षण करण्याकरितां देऊळ बांधणें अत्यावश्यक वाटतें. तो त्या देवळांत आपल्या जवळ जें जें कांहीं पूज्य आणि पवित्र असेल तें तें सर्व त्या पूजार्ह देवतेला समर्पण करण्याकरितां घेऊन येतो, आणि या प्रकारें तो त्या मूर्तीला सर्व बाजूंनीं अलंकृत करून तिचें माहात्म्य अधिकाधिक वाढविण्याची खटपट करतो. अखेर तो तिला पूर्णपणें देवरूप देण्यांत विजय मिळवितो खरा, पण, अरेरे त्यांत च त्या देवाला मात्र कायमचें हीनत्व येतें ! हें सर्व कसें घडून येतें याचें परिज्ञान असणारी तेथें एक शक्ति असते. ती शक्ति म्हणजे त्याचा स्वतःचा बौद्धिक सद्सद्विवेक. आणि तशी च तेथें दुसरी हि एक शक्ति असते ती नकळत या सर्व खटाटोपाच्या विरुद्ध बंड करते. ती शक्ति म्हणजे साक्षात्

तो देवपदाधिरूढ झालेला वीरपुरुष. तो या सर्व पूजाअर्चा आणि धूप दीप यांच्या योगें इतका पराकाष्ठेचा असह्य होतो कीं यापुढें तो आपलें स्वतःचें खरें अद्वैरी पण शुद्ध मानवी रूप अत्यंत स्पष्ट आणि भयानक रीतीनें प्रकट करतो.

' अशा स्थितींत ह्या वेड्या भक्ताला आपली सुटका करून घेण्यास एक च मार्ग मोकळा असतो; तो आपला व आपल्या सहकारी बांधवांचा छळ मोठ्या शांतपणानें सहन करतो, आणि ही सर्व हाल-अपेष्टा केवळ देवाच्या कसोटीस उतरण्याकरितां आहे अशा प्रकारची एक नवीन च आत्मवंचनात्मक उदात्त मनाची समजूत करून घेतो. तो आपल्या स्वतःच्या विरुद्ध तोंड देण्यास उभा ठाकतो, आणि असें करतांना जणुं काय आपणास अनुभवानें रंजलेगांजलेल्यांचा कैवार घेण्यास सर्वतोपरि अधिकार आहे अशा वृत्तीनें ' देह जावो अथवा राहो। पांडुरंगीं दृढ भावो।' या प्रकारची तत्त्वाकरितां देहत्याग करण्याची साधुत्वाची ऐट आणून अहंकाराच्या उंच शिखरावर आरोहण करतो. या मासल्याचीं कांहीं उदाहरणें नेपोलियनच्या भक्तमालिकेंत सहज सांपडण्यासारखीं आहेत. खरोखर, ज्या कोणी आपल्या काळांत " विभूतिमान् " आणि " वीर्यवान् " यांच्या सन्मुख साष्टांग प्रणिपात घालावयास लावण्याचें अद्भुत तत्त्व पिकविलें असेल तर तें नेपोलियननें. वास्तविक रीत्या हें तत्त्व १९ व्या शतकाच्या चिकित्सक स्वभावाला अगदीं पारखें आहे—तथापि नेपोलियनबद्दल बायरनसारख्या महाकवीनें " आपण असल्या विभूतीपुढें क्षुद्र कीटकासारखे आहों " असे उद्गार काढावे यांत त्याला लाज कशी वाटली नाहीं कोणास कळे. (हे साष्टांग प्रणिपाताचे दिव्य शोध थॉमस् कार्लाइलनें लाविले आहेत,–तो सदा चिरचिऱ्या वृत्तीचा मद्दड डोक्याचा घमेंड्यानंदन, ज्यानें आपलें लांबलचक आयुष्य स्वकीय आंग्ल बांधवांच्या रुक्ष व्यावहारिक बुद्धीला काव्याचीं पुटें देण्याच्या प्रयत्नांत खर्चीं घातलें!) "

हें कार्लाइलच्या वीरपूजनाचें स्वरूप अवलोकन केलें असतां वीराला खच्ची करून त्याचा देव कसा बनविण्यांत येतो याची चांगली उपपत्ति लागते. येथें मानवांत देवत्वाचा अभाव असल्यामुळें देवांतील मानवत्व काढून टाकण्यांत आलें तर त्यांत कांहीं नवल नाहीं. हा खिस्ती देवकरणाचा प्रकार जसा कार्लाइलनें अवलंबिला आहे तसा च तो हल्लींच्या हिंदुधर्मांत हि—प्राचीन वैदिक धर्मांत नव्हे—अवलंबिलेला दृष्टोत्पत्तीस येणार आहे. प्राचीन वैदिक धर्मांत देव हा आपल्या मानवभक्ताला ऐहिक अभ्युदयाच्या परिसीमेला नेऊन पारमार्थिक निःश्रेयसाच्या अंतिम पदाला पोंचविणारा आहे. अर्थात् तेथें मानवाला सदा देवांशीं बरोबरी करण्याचें धैर्य आहे. उदाहरणार्थ, ऋग्वेदांत इंद्र आणि अग्नि या देवतांना उद्देशून कण्वगोत्रांतील ऋषींनीं गायिलेल्या पुढील ऋचा पहा. येथें हे ऋषि साक्षात् देवांना त्यांनीं आपल्या भक्तजनांशीं कसें वागावें याचा जणुं धडा घालून देत आहेत आणि त्यांत त्यांशीं आपण बरोबरी करीत आहेत:—

" यदिंद्राहं यथा त्वमीशीय वस्व एक इत् ।
स्तोता मे गोषखा स्यात् ॥
शिक्षेयमस्मै दित्सेयं शचीपते मनीषिणे ।
यदहं गोपतिः स्याम् ॥ "

( ऋ. ८.१४.१–२ )

हे इंद्रा, जसा तूं आहेस तसा जर मीं तुझ्या जागीं एकटा च एक वसूचा म्हणजे संपत्तीचा स्वामी असतों तर माझा स्तवन-

कर्ता केव्हां च गोषखा म्हणजे गोधनांनीं परिपूर्ण होऊन गेला असता. हे शचीपते, मी जर तुझ्या सारखा गोधनांचा स्वामी असतों तर त्या माझ्या ज्ञानी भक्तजनाला पुष्कळ दिलें असतें आणि ऐश्वर्यसंपन्न करून टाकलें असतें.

" यदग्ने मर्त्यस्त्वं स्यामहं मित्रमहो अमर्त्यः।
सहसः सूनवाहुत ॥
न त्वा रासीयाभिशस्तये वसो न पापत्वाय संत्य।
न मे स्तोतामतीवा न दुर्हितः स्यादग्ने न पापया ॥"
(ऋ० ८. १९. २५–२६)

हे अग्ने, सूर्याप्रमाणें तेज धारण करणारा, बलाचा पुत्र असणारा, आणि आम्हीं दिलेल्या घृताच्या आहुति घेणारा असा तूं जर माझ्यासारखा मर्त्य असतास आणि मी तुझ्यासारखा अमर्त्य असतों तर हे ऐश्वर्यवान् देवा, तुला मी मिथ्यापवादांत रडावयास लाविलें नसतें, आणि हे पूजनीय देवा, तुला पापत्वांत हि आक्रोश करीत बसविलें नसतें; हे अग्ने, माझा स्तवनकर्ता कधीं हि दुर्मति, दुःस्थिति, आणि दुर्भाग्य यांत खिचपत राहिला नसता.

परंतु वैदिक धर्माच्या जागीं जेव्हां हिंदुधर्म स्थानापन्न झाला तेव्हां सर्व च मनु पालटला. यज्ञ गेला आणि भक्ति आली, तपन गेलें आणि भजन शिरलें, दान गेलें आणि नाम राहिलें. अर्थात् पूर्वींचे इंद्रवरुणादि यजनीय देव मागें पडले व त्यांची जागा विष्णुमहेशादि भजनीय देवांनीं व्यापिली. पुनः या नवीन देवांचें मूळ तात्त्विक रूप हि कायम राहिलें नाहीं, तर त्यांना

केवळ शूद्रांच्या दासनीतीला साजेल असें निराळें हीन रूप प्राप्त झालें. मागें सांगितलें च आहे कीं, वैदिक धर्म हा ब्राम्हणप्रधान आर्य द्विजांचा धर्म; हिंदुधर्म हा शूद्रप्रधान दाससेवकांचा धर्म. वैदिकधर्मांत बलाचें संवर्धन आहे, हिंदुधर्मांत दौर्बल्याचें संगोपन आहे. म्हणून च हिंदुधर्मांत,—

**" जे का रंजले गांजले। त्यासि म्हणे जो आपुले।**
**तो चि साधु ओळखावा। देव तेथें चि जाणावा॥ "**

—या प्रकारें साधूचें व देवाचें वर्णन आहे. ही उक्ति जशीच्या तशी खिस्ताच्या तोंडीं शोभेल अशा स्वरूपाची आहे. कारण खिस्ताचा देव व धर्म हा मुख्यतः रंजलेगांजलेल्यांचें तारण करण्याकरितां च उपस्थित झाला आहे. वैदिक धर्माला मूल आधार द्वंद्वनिर्द्वंद्व तत्त्वज्ञानाचा आहे. हिंदु धर्माला सर्व आधार द्वैताद्वैत वेदान्ताचा आहे. या वेदान्तांतील द्वैत घेतलें तर त्यांत मानव हा सदा देवाचा दास राहावा, त्यानें कधीं च देवपदाला जाऊं नये अशी स्थिति आहे. उदाहरणार्थ माध्व द्वैत घ्या. ह्या द्वैतांत आणि खिस्ती द्वैतांत तिळमात्र अंतर नाहीं. उलट, वेदांत ' बृहद्वदेम विदथे सुवीराः ' या प्रकारें जगतांत वीरत्व संपादून आणि यज्ञांत मोठमोठीं स्तोत्रें गाऊन देवभावाला जावयाचें आणि ' ते ह नाकं महिमानः सचंत यत्र पूर्वे साध्याः सन्ति देवाः ' या न्यायानें स्वर्गांत जेथें पूर्वींचे साध्यदेव निवास करीत असतील तेथें त्यांच्या सभेंत माहिमानत्वानें विराजमान व्हावयाचें अशी अत्युच्च आर्यत्वाची कल्पना आहे. बरें, जर अद्वैत घेतलें तर तेथें सर्वस्तब्धता आहे. मग

ह्या स्तब्धतेला निर्वाण म्हणा किंवा मोक्ष म्हणा. कांहीं म्हटलें तरी त्याचा मानवजीविताला तादृश उपयोग नाहीं, कारण त्यांत जगताला स्थान नाहीं. द्वैतांत जर सार्वत्रिक युद्ध दिसतें तर अद्वैतांत सार्वत्रिक शांति पुकारली जाते. किंबहुना अशी शांति प्रस्थापित करण्या करितां च अद्वैताचा जन्म आहे. खरोखर ऐहिक जीवनकलहांत रंजलेगांजलेल्यांच्या मनोदौर्बल्याचें हें उत्तम द्योतक आहे. नीट्झशेनें एके ठिकाणीं नृपांगणगत दरबारी मनुष्याच्या केविलवाण्या स्थितीचें वर्णन केलें आहे. अशा मनुष्याच्या अंगीं जो मरूय गुण लागतो तो तासचे तास खडे तिष्ठत **उभें राहण्याचें सामर्थ्य** असणें. अर्थात् अशा मनुष्याला मरणोत्तर जर कोणत्या मोक्षाची इच्छा असेल तर ती **बसावयाची परवानगी** मिळणें ही होय. अद्वैत हें उभें राहून कंटाळलेल्या भक्ताला बसावयाची परवानगी आहे. ती शुद्ध क्रियाशून्य अवस्था आहे. तींत युद्धकर्म नाहीं, वीरवृत्ति नाहीं, यज्ञगुण नाहीं, देवभाव नाहीं, आणि ब्रह्मपद हि नाहीं.

खिस्तीधर्माचा मूळ उत्पादक सर्वथैव अद्वैती वृत्तीचा होता पण त्याचा धर्म मात्र सर्वथैव द्वैती बनविण्यांत आला. म्हणून खिस्तीधर्मांत द्वैत आणि अद्वैत या दोहोंतील झगडा उत्तम पहावयास सांपडतो. देवानें आपला पुत्र जगतांत शांति प्रस्थापित करण्याकरितां पाठविला पण तो युद्धाचा भयंकर वणवा लावून गेला. असा च प्रकार हिंदुधर्मांत आहे. येथें हि द्वैत आणि अद्वैत या दोहोंच्या जन्मजात कलहामुळें त्या दोहों-

तील सर्व दोष एकवटले आहेत. खिस्तीधर्मात केव्हां हि अप-कारांचें उसनें फेडण्यास सांगितलें नाहीं तर सर्व भार देवावर घालून निमूटपणें सदा दुःख सहन करण्यास शिकविलें आहे. उदाहरणार्थ, मॅथ्यू अ० ५·३८–४१ पहा :—

**“ डोळ्याबद्दल डोळा व दांताबद्दल दांत, असें पूर्वीच्या कायद्यांत सांगितलेलें होतें; पण आतां मी सांगतों, कोणी आततायी अंगावर आला तर त्याला प्रतिकार करूं नका : जो कोणी तुमच्या उजव्या गालावर मारील त्याच्याकडे दुसरा पुढें करा; जो कोणी तुमच्यावर फिर्याद करून बंडी हिसकावून घेईल त्याला आणखी अंगरखा घेऊं द्या; आणि जो कोणी तुम्हांला एक कोस वेठीला नेईल त्याच्याबरोबर दोन कोस अधिक जा ! ”—**

ही शुभवर्तमानांतील खिस्ताची नीति भगवद्गीतेंतील श्रीकृष्णाच्या नीतीहून अगदीं भिन्न आहे. गीतेंत आततायी शस्त्र घेऊन अंगावर चालून आला असतां त्याशीं युद्ध करून त्याला ठार मारण्यास सांगितलें आहे. जुन्या यहुदी धर्मांत डोळ्याला डोळा व दांताला दांत अशी शुद्ध मोबदल्याची नीति होती पण तिचा येथें खिस्तानें आरंभीं च निषेध केला आहे. जुनी यहुदी नीति प्राचीन आर्यनीतींतून उतरली असल्यामुळें तिचें वैदिक मनुस्मृतीशीं व आवेस्तिक वंदिदादशीं पुष्कळ ठिकाणीं साम्य दिसून येतें. परंतु खिस्ती धर्मानें तिचा त्याग केला आहे. अर्वाचीन हिंदुनीति खिस्ताच्या वरील उक्तीशीं

तंतोतंत जुळणारी आहे. एका अर्वाचीन हिंदु दासकवीनें मराठींत रचलेलें आणि शिक्षणखात्यानें लहान मुलांच्या शिक्षणपाठांत गोविलेलें पुढील कवन पहा:—

" दिधलें दुःख परानें उसनें फेडूं नये चि सोसावें ।
शिक्षा देव तयाला करिल म्हणोनि उगे चि बैसावें ॥"

—यांतील काव्य जितकें उच्च आहे तितकी च कल्पना उच्च आहे, व भक्त जितका मोठा आहे तितका च देव मोठा आहे. भक्त जर उसनें फेडण्याची खटपट करणार नाहीं तर देव तरी त्याबद्दल कशाला यातायात करील कोणास कळे! प्राचीन वैदिक नीति या हिंदुनीतीच्या अगदीं उलट आहे, कारण ती प्रभुनीति आहे. तींत—

"यो मा हृदा मनसा यश्च वाचा यो
ब्रह्मणा कर्मणा द्वेष्टि देवाः ।
यः श्रुतेन हृदयेनेश्णता च
तस्येन्द्रवज्रेण शिरश्छिनद्मि ॥'

—जो माझा हृदयानें आणि मनानें द्वेष करतो आणि जो मोठ्या अट्टाहासानें देवांचा द्वेष करतो, तसा च जो ऐकून, योजून व इच्छून आमचा द्वेष करतो त्याचा मी इंद्रवज्रानें शिरच्छेद करतो,—या प्रकारची खरी वीरभावना आहे. ही भावना जेव्हां वैदिक समाजांतून सर्व—भूतीं—एक—आत्मत्वाच्या वेदान्तानें नष्ट केली तेव्हां त्याला हिंदुरूप प्राप्त झालें व तो ओघानें च खिस्तीधर्मातील दासनीतीच्या मार्गाकडे वळला. उलट, खिस्ताची दासनीति ज्या खिस्ती राष्ट्रांनीं कळत वा नकळत

टाकून दिली तीं राष्ट्रें आज आर्यमार्गावर जगताचें प्रभुत्व संपादून बसलीं असा इतिहास आहे. उदाहरणार्थ, इंग्रजी राजाच्या ढालीवरील पुढील फ्रेंच बिरुद पहा—'Honi soit qui mal y pense' =जो आमचें वाईट **चिंतील** त्यानें याद राखून असावें. हें बिरुद तिसऱ्या एडवर्ड राजापासून आजतागाईत चालत आलें आहे, आणि त्या राष्ट्राची इतरांशीं तदनुरूप वृत्ति असल्याकारणानें त्याची उत्तरोत्तर जगांत भरभराट होत गेली आहे. येथें केवळ वाईट **करणारावर** च कटाक्ष नाहीं तर **चिंतणारावर** आहे हें लक्षांत ठेवणें जरूर आहे, आणि हिंदुस्थानांतील प्रचलित पीनलकोडांत तर त्याची या हि पलीकडे मजल गेलीं आहे. तेथें राजद्रोहाच्या कलमांत राजाचा द्वेष करणें येवढा च गुन्हा नसून त्यावर **प्रेम न करणें** हा गुन्हा ठरविण्यांत आला आहे! या वरून खिस्ताच्या नीतितत्त्वांशीं उघडाउघड विरोध करणाऱ्या राष्ट्रांनीं पुनः आपणास खिस्ती म्हणवून घेणें हें केवळ ढोंगीपणाचें च नाहीं तर निर्लज्जपणाचें लक्षण आहे असें जें नीट्झ्शेनें खिस्तांतकांत म्हटलें आहे तें यथार्थ सिद्ध होत आहे.

हिंदुदेव हा खिस्ती देवाहून स्वरूपानें फारसा निराळा नाही. फरक इतका च कीं हिंदुदेव अनेक आहेत, खिस्ती देव एक आहे. तथापि हिंदूंत एकेका विशिष्ट देवाला धरून अनेक संप्रदाय आहेत आणि त्या त्या संप्रदायांत त्या त्या एकेका देवाचें च सर्व स्तोम आहे, जसें वैष्णवांचा देव विष्णु व शैवांचा शिव. शिवाला वेदांत स्थान नाहीं, विष्णूला आहे; पण वेदां-

तील विष्णु हिंदु विष्णूपेक्षां निराळा आहे. याचा उलगडा आमच्या नासदीयसूक्तभाष्याच्या पूर्वार्धांत साविस्तर करण्यांत आला आहे. अशा विष्णूचे हिंदुधर्मांत अनेक अवतार आहेत. हा विष्णु कचित् आपल्या मूळ स्वरूपांत भक्तिभावानें धारण केला जातो तर कचित् अवतार रूपांत भजण्यांत येतो. म्हणून च कोणी नृसिंहभक्त आहेत तर कोणी वराहभक्त आहेत. प्राचीन चालुक्य राजांचें कुलदैवत वराह होतें. कोणी परशुरामभक्त आहेत तर कोणी वामनभक्त आहेत, कोणी रामभक्त आहेत तर कोणी कृष्णभक्त आहेत. माध्वसंप्रदाय विष्णुवादी आहे, वाल्लभ संप्रदाय कृष्णवादी आहे, व समर्थसंप्रदाय रामवादी आहे. पुनः विष्णुकूटावांचून जें दुसरें शिवकूट आहे त्यांत शिवाबरोबर गौरी, गणपति, शारदा, कार्तिकेय इत्यादि शिवाच्या नात्याचा सर्व गोतवळा आहे. या शिवाय दत्तात्रेयासारखे स्वतंत्र देव आहेत ते निराळे. अर्वाचीन महाराष्ट्रांतील संख्येनें सर्वांत मोठा संप्रदाय म्हणजे वारकरीसंप्रदाय होय. हा मुख्यतः शूद्रांचा संप्रदाय आहे. अर्थात् यांत हिंदुधर्मांतील सर्व गुणदोष उत्तम रीतीनें दिसून येणार आहेत. हा मूळ भागवतधर्माच्या पायावर उभारला आहे, भागवतधर्म भक्तिप्रधान आहे, भक्तीचा आद्य पुरस्कर्ता नारद आहे, आणि नारद हा शूद्र आहे. या संप्रदायाचा देव विठ्ठल. हा विठ्ठल विष्णु आहे व कृष्ण हि आहे. विठ्ठल हा शब्द विष्णुशब्दापासून निघाला आहे. असा विठ्ठल एकटा च कटावरी हात ठेवून विटेवरी उभा असल्या कारणानें तो विष्णूचा बौद्धावतार आहे, तर त्याच्या बरोबर रुक्म-

णीच्या नावानें निराळें देवालय झालें असल्याकारणानें तो त्याचा कृष्णावतार हि बनून राहिला आहे; तथापि रामदासानें त्याच्या ठिकाणीं आपल्या रामाचें दर्शन घेतलें अशी कथा आहे. अद्वैतवेदान्ताप्रमाणें ‘ काया ही पंढरी आत्मा हा विठ्ठल ’ असा संतांचा आशय आहे, आणि ख्रिस्ती ग्रंथकार नॉव्हेलिस याचें हि असें च मत असल्याचें कार्लाइलनें आपल्या वीरपूजनावरील व्याख्यानांत नमुद केलें आहे. हें च काय पण प्रत्यक्ष येशू ख्रिस्तानें शरीर हें च देऊळ ठरवून देवाचें राज्य स्वतःच्या अन्तःकरणांत पहावयास सांगितलें आहे. या प्रकारें वारकरी सांप्रदायांत आणि ख्रिस्ती सांप्रदायांत जें साम्य आहे तें केवळ द्वैतमार्गावर च नाहीं तर अद्वैतमार्गावर हि आहे.

वास्तविक रीत्या विठोबा जो पंढरीस आला तो पुंडलिकाची धर्मनिष्ठा पाहण्याकरितां. हा पुंडलिकाचा प्रसंग हिंदुधर्मांत अत्यंत उज्ज्वल आहे. पुंडलीक हा आपल्या आईच्या सेवेंत गर्क होता. जेथें कायावाचामनें कर्तव्य आचरिलें जातें तेथें च धर्माची सिद्धी होते आणि त्यांत च देव प्रकटता पावतो. हा देव एका बाजूनें आपल्या भक्ताचा मित्र असतो तर दुसऱ्या बाजूनें शत्रु होतो. मित्र या नात्यानें तो त्याच्या कर्माचें कौतुक करतो तर शत्रु या नात्यानें तो त्याला त्या कर्मांतून पराङ्मुख करण्यास पाहतो. ही च देवानें करावयाची भक्ताची परीक्षा. या परीक्षेंत जर भक्त उतरला तर तो स्वतः देवपदावर चढतो आणि देवाला तेथून खालीं अदेवपदावर लोटतो. ख्रिस्तीधर्माच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे जेव्हां देवाचा सैतान होतो

तेव्हां भक्ताचा देव बनतो. येथें पुंडलीक देवाच्या कसाला उतरला म्हणून देवाला सर्वथा अदेवस्थितींत शतकानुशतकें स्वस्थ उभें राहणें भाग पडलें. असा हा ‘ शुद्धबुद्धमुक्त ’ देव म्हणजे एका शब्दांत क्रियाशून्य देव पुढील भक्तजनांना भक्तीचा महान् विषय होऊन राहिला. मूळ पुंडलिकानें आपलें कर्तव्य सोडून या देवाकडे किंचित् हि दृष्टि दिली नाहीं. तर त्याचे कडे एक वीट फेंकून तीवर माझें काम संपेपर्यंत उभा रहा म्हणून सांगितलें. कर्मांत देव उत्पन्न होणें हें च त्या कर्माचें फल. असा देव उत्पन्न झाला असतां हि त्या कडे न राहणें हें च गीतेंत सांगितलेलें फलाशारहित कर्म किंवा निष्काम कर्म होय. पुंडलिकानें असें कर्म आचरिलें. म्हणून तो देवाच्या वराला सुपात्र झाला. या अर्थानें ‘ पुंडलीकवरदे हरि विठ्ठल ’ हें विठ्ठलाचें बिरुद यथायोग्य आहे. पण तें पुंडलिकानें आपल्या निष्कामकर्मानें विठ्ठलाला मिळवून दिलें आहे. यांत सामर्थ्य पुंडलिकाचें आहे, विठ्ठलाचें नाहीं; स्वकर्मांत निरत असलेल्या वीराचें आहे, सदा याचना करीत बसणाऱ्या दुबळ्याचें नाहीं. परंतु पुंडलिकाच्या नंतर या विठ्ठलाच्या पुढील भक्तांची स्थिति पहा. त्यांनीं आपलीं सर्व नियतकर्में सोडून रात्रंदिवस त्याचा पिच्छा पुरविला आणि वेळीं अवेळीं त्याचीं काल्पनिक स्तुति-स्तोत्रें गाण्यांत व अर्थहीन नामगजर करण्यांत जन्माचें एक च सार्थक मानिलें. जो देव श्रीरामचंद्राच्या व श्रीकृष्णाच्या अव-तारकालीं या भूतलावर महान् पराक्रम करून गेला त्या देवाला या भक्तांच्या घरीं इतकें दीनपण आलें कीं त्यापुढें

खिस्ताचा देव मुद्धां मोठा दिसावा. ज्यानें रावणाचें हनन करण्याकरितां धनुष्यबाण हातीं घेतला त्यानें जनीच्या घरीं पीठ दळलें, व ज्यानें अर्जुनाला युद्धोन्मुख करण्याकरितां गीता सांगितली त्यानें एकनाथाच्या घरीं पाणी वाहिलें! जसा ज्याचा भाव तसा त्याचा देव असें म्हटलें म्हणजे देवाला कांहीं च किंमत उरत नाहीं. असा देव शुद्ध पाण्यासारखा असतो. त्याला स्वतःचें कांहीं च वैशिष्टय नसतें. ज्याशीं तें मिळवावें त्यासारखा त्याचा रंग होऊन जातो.

पण देव म्हटला कीं तेथें विभूतिमत्त्व आलें, तेज आलें, क्रिया आली, अर्थात् वीरत्व आलें. साक्षात् वीराची भक्ति करणें काम फार कठीण आहे. कारण तो आपलें स्वतःचें नियत कर्म करण्यांत जितका निष्ठुर असतो तितका च दुसऱ्याकडून तें करून घेण्यांत अति कठोर होतो. उदाहरणार्थ, नेपोलियन घ्या. तो म्हणे माझ्या कोशांत 'अशक्य' हा शब्द नाहीं. शिवाजीमहाराज गोब्राह्मणप्रतिपालक होते पण एकदां एका ब्राह्मण कारकुनानें कर्मांत कसूर केल्याबरोबर 'ब्राह्मण म्हणून मुलाहिजा धरणार नाहीं' अशी त्यांनीं त्यास स्पष्ट शब्दांत ताकीद दिली. फ्रेडरिक् दि ग्रेट्नें आपल्या एका बड्या अधिकाऱ्यास त्यानें रणांगणावर शिबिरांत आपल्या पत्नीस पत्र लिहिण्याकरितां चुकून शिस्तीच्या बाहेर पांच मिनिटें अधिक दिवा ठेवला म्हणून मृत्यूची शिक्षा फर्माविली. जर्मनीचा कॅथॉलिक बादशहा पांचवा चार्लस यानें धर्मगुरु पोपला त्यानें राजकारणांत निष्कारण ढवळाढवळ चालविली म्हणून कारागृहांत

टाकिलें. आणि इकडे महाराष्ट्रांत कोन्हेरराव पटवर्धन यानें राजकारणांत उगीच लुडबुड करणाऱ्या करवीर पीठाच्या शंकराचार्यांच्या मठावर पेशव्यांच्या हुकुमानें स्वारी करून त्याला पळवून लाविलें. सारांश, वीराच्या जवळ दयामाया नाहीं, तेथें कर्तव्यांत किंचित् हयगय खपणार नाहीं, तेथें भोळ्याभाविकाला व दीनदुबळ्याला हृदयाशीं कंवटाळण्याचा वेदान्ती अस्ताव्यस्तपणा नाहीं, तर तेथें कर्मांतील चुकीस तत्काल प्रायश्चित्त अशी मीमांसकी शिस्त आहे. म्हणून च वीराला देव बनविल्यावांचून दुबळ्या भक्ताचें चालत नाहीं. मूळ श्रीरामाचा भक्त हनुमान आणि श्रीकृष्णाचा धनंजय. पण ह्या अवतारी वीर पुरुषांना पंढरीस देवपदावर स्थापन केल्याबरोबर हनुमान आणि धनंजय कोणीकडे पळाले कोणास ठाऊक! येथें देवाला वीरत्वापासून च्युत करण्यांत भक्ताचा विजय आहे. असा विजय संतांच्या लीलामृतांत किंवा भक्तांच्या अमृतलीलांत उत्तम पहावयास सांपडतो. नीट्झ्शेनें ख्रिस्तांतकांत जें ख्रिस्ती देवाचें वर्णन केलें आहे तें हुबेहुब या हिंदु संतांच्या व भक्तांच्या देवाला लागू पडण्यासारखें आहे: **देव आंधळ्यापांगळ्यांची काठी झाला.**

याला अपवाद एका च काळीं उदय पावलेल्या दोन वीर पुरुषांच्या चरित्रांत आहे,—एक रामदास आणि दुसरा शिवाजी. प्रभुंचा प्रभू जो राम तो जसा इतरत्र दासांचा दास होऊन विराम पावला तसा प्रकार येथें घडला नाहीं. येथें जो रामाचा 'दास' झाला तो जगतांत 'समर्थ' पद पावला.

म्हणून च 'दास रामाचा आणि समर्थ जनाचा' अशी रामदासाची शिकवण आहे आणि ती त्यानें आपल्या चरित्रांत सार्थ करून दाखविली आहे. खरें च आहे, रामाचें दास्य करण्यांत जो आज्ञाधारकत्वाचा धडा मिळतो तो च पुढें समर्थ होऊन प्रभुत्व संपादण्यांत कामीं पडतो. नीट्झशेनें म्हटलें आहे ज्याला आज्ञाप्रतिपालनाची शिस्त लागते त्याला च आज्ञा फर्मावण्याचें सामर्थ्य येतें. अर्थात् येथें च खरें 'इंद्रस्य सख्यममृतत्वमश्याम्' या वैदिक श्रुतीप्रमाणें भक्ताला देवाचें सख्य घडतें व अमृतत्वाची प्राप्ति होते. येथें रामदासानें आपल्य रामाजवळकाय मागितलें आहे तें लक्षांत घेण्यासारखें आहे.—
—'मागों नेणें दे रे राम। मज न कळें तें दे रे राम'—
दुसऱ्या जवळ याचना करण्याचा प्रसंग न यावा, व अज्ञान नाहींसें व्हावें यावांचून आर्यपुत्रानें दुसऱ्या कशाची इच्छा बाळगावी? प्राचीन वामदेव ऋषीनें तरी आपल्या अग्निदेवाजवळ याहून निराळी दुसरी कोणती इच्छा प्रकट केली आहे?—

'मा भ्रातुरग्ने अनृजोर्ऋणं वे
मा सख्युर्दक्षं रिपोर्भुजेम।'—

—हे अग्ने, सरळ वृत्तीनें न वागणाऱ्या भ्रात्याचें ऋण आमच्या डोक्यावर राहूं देऊं नकोस, आणि मित्र काय किंवा शत्रु काय यांच्या दाक्षिण्यावर आमचा योगक्षेम चालेल असें करूं नकोस.—जें चरित्र रामदासाचें तें च शिवाजीचें. एक ब्राह्मणवीर, दुसरा क्षात्रियवीर. एकानें रामाचा आश्रय केला, दुसऱ्यानें साक्षात् शक्तीची कास धरली. ही शक्ति त्याच्या अंगीं

युक्त संचार करूं लागली. तिनें त्याच्या घरीं खांद्यावर कावड वाहिली नाहीं, तर डोक्यावर स्वराज्य वाहिलें. तिनें एका खानाचा वध केला, दुसऱ्याच्या अन्तःकरणांत धडकी बसवून त्यास पळवून लाविलें, व प्रत्यक्ष बादशहाच्या दरबारांत त्याच्या सिंहासनावर उड्डाण करून त्याला तेथून पदच्युत करण्याचा घाट घातला !

हे खरे वीर, हे खरे देव. अशा वीरांतील देवत्व किंवा देवांतील वीरत्व न समजल्या कारणानें हिंदु संतांनीं जसें वीराला खच्ची करून देवाला दास बनविलें तसें च कार्लाइलनें वीरपूजनांत वीराला लोकमान्य करून लोकमान्याला वीर बनविलें. अर्थात् एखाद्या लोकमान्यानें जर कार्लाइलच्या धर्तीवर वीरपूजनाला उचलून धरिलें तर त्यांत कांहीं आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं. हल्लीं या देशांत जे सर्वत्र प्राचीन वीरांचे उत्सव बोकाळले आहेत त्यांची मानसशास्त्रदृष्ट्या या प्रकारें चांगली उपपत्ति लागते. शिवाजीचा उत्सव—मग तो जन्माचा असो वा राज्यारोहणाचा असो—जावत्कालपर्यंत तो त्याच्या दगडाच्या मूर्तींत किंवा रंगाच्या तजबिरींत आहे आणि जावत्कालपर्यंत त्याच्या भक्तजनांना त्याचीं स्तुतिस्तोत्रें गाण्यापलीकडे दुसरें कांहीं कर्तव्य नाहीं तावत्कालपर्यंत ठीक आहे. पण यदाकदाचित् हा शिवाजी पुनः खरोखरीची हालचाल करूं लागला तर प्रथम या भक्तवृंदाची च कोण दाणादाण उडेल याची कल्पना करावी. यांतील प्रत्येकजण त्याचा शत्रु बनेल. कारण शिवाजी झाला कीं प्रथम तो लोकमान्याचें

वर्तमानपत्र बंद पाडील, त्याचे द्रव्यनिधि हस्तगत करील, त्याच्या सभा उधळून लावील, आणि त्याचे स्वराज्यसंघ मोडून टाकील. सीझरचा इतिहास पहा, नेपोलियनचा पहा, क्रॉम्वेलचा पहा, शिवाजीचा पहा. सीझरनें रोमन सेनेटची दाणादाण केली, नेपोलियननें नॅशनल असेंब्ली उधळून लाविली, क्रॉम्वेलनें पार्लमेंटचा पोरकट खुळखुळा भिरकावून दिला, आणि शिवाजीनें तर आपलें अर्धे अधिक आयुष्य द्रोही स्वजनांचें पारिपत्य करण्यांत खर्ची घातलें. त्याला परकीय शत्रूंवर स्वारी करण्याचे अगोदर स्वकीय आप्तेष्टांचा समाचार घ्यावा लागला, खानाचा वध करण्याचे अगोदर मोऱ्याला जमीनदोस्त करणें भाग पडलें, व विजापुरावर मोर्चा नेण्याच्या अगोदर मुधोळवर नांगर फिरविण्याचा प्रसंग आला. पुन:जशी शिवाजीची जयंति तशी च लोकमान्याची हि जयंति! दोहोंत अंतर फारसें नाहीं. एकानें स्वराज्य केलें दुसऱ्यानें उच्चारलें इतकें च. सगळा च विदुषकांचा बाजार. अशा बाजारांत वीराला कांहीं किंमत उरली नाहीं आणि तो देवपदाला जाऊन हास्यास्पद ठरला तर त्यांत कांहीं नवल नाहीं. बिचाऱ्या रामदासाची तर त्याच्या झोळीवाल्या भक्तांनीं या हि पेक्षां दैना केली आहे: **येथें वीराला साधु बनविण्यांत आलें आहे.** तथापि अर्वाचीन लोकमान्य [demagogue] त्या हि पलीकडे आहे. तो देव आहे आणि साधु आहे, रामदास आहे आणि शिवाजी आहे. कारण देव म्हणून जशी त्याची जयंति आहे तशी साधु म्हणून पुण्यतिथी आहे! त्याच्या भक्तांनीं त्याला श्रीकृष्णा-

सारखा चतुर्भुज तर केव्हां च करून टाकला आहे, आतां फक्त ख्रिस्तासारखा काट्याचा मुकुट डोक्यावर चढवून भक्तीच्या क्रूसावर राज्याभिषेक करण्याची च काय ती बाकी राहिली आहे, म्हणजे हें वीरदेवाचें चित्र पूर्ण होईल.

श्रेष्ठ पुरुषाचें मुख्य लक्षण हें कीं तो सर्वांशीं फटकून वागतो. तो इतरांशीं बरोबरी करण्यास जात नाहीं, व त्याला इतरांनीं आपल्याशीं बरोबरी केलेली खपत नाहीं. तो गुण ओळखतो आणि कर्मावर लक्ष देतो. जे कोणी गुणानें आपल्या बरोबरीचे असतात त्यांशीं तो समानता दाखवितो. असें करण्यांत तो आपलें स्वतःचें आर्यत्व इतरांचे ठायीं पाहतो. तो त्यांशीं समानभावानें वागण्यांत स्वतःचें गौरव करून घेतो. तो जसें घेतो तसें देतो. त्याला दुसऱ्याचे उपकार आवडत नाहींत. तो जेव्हां देतो तेव्हां ते दुसऱ्यावर उपकार असतात. तो आपल्या पलीकडे उंच पहात नाहीं. कारण त्याला आपल्या पलीकडच्या उंचाची जरूर भासत नाहीं. तो आपण च सर्वांत उंच असण्याची आकांक्षा बाळगतो. तो आपल्या खालीं अधोभागीं पाहतो किंवा दृष्टिसमोर समांतर भागीं पाहतो. कारण त्याला वाटत असतें आपण परमोच्च पदावर विराजमान आहोंत. इतिहासांत असे समानगुणांचे महात्मे म्हणजे वसिष्ठ आणि राम, आरिस्टॉटल् आणि शिकंदर, रामदास आणि शिवाजी हे होत. अशा श्रेष्ठ पुरुषांचें नीट्झ्शेनें जें स्वरूपाविष्करण केलें आहे तें प्रत्येक आर्यपुत्रानें वाचून मनन करण्यासारखें आहे. तें येणें-प्रमाणें:—

" भोळ्या भावड्यांच्या कानांना कटु वाटलें तरी हरकत नाहीं पण मी इतकें सांगण्याचें धाष्टर्य करतों कीं अहंभाव हा श्रेष्ठ आत्म्याचा स्वभावधर्म च आहे. त्याला वाटतें जे कोणीं " आमच्या " सारखे वीर असतात त्यांचा केव्हां हि न बदलणारा ठाम सिद्धांत च हा कीं इतर सर्व प्राणीमात्रांनीं स्वाभाविक रीत्या आपली सेवा केली पाहिजे आणि आपल्या करितां स्वतःचे प्राण वेंचले पाहिजेत. असा हा वीरात्मा आपल्या अहंभावाचें अस्तित्व इतक्या निभ्रांत वृत्तीनें अवलोकन करतो कीं त्यांत त्याला कांहीं निर्दयपणा, निष्ठुरपणा, किंवा निरर्गलपणा यांपैकीं कशाची जाणीव असलेली दिसून येत नाहीं, इतकें च काय पण हा अहंभाव कांहीं तरी वस्तुगत आद्यतत्त्वाच्या नैसर्गिक पायावर उभा आहे अशी त्याची दृढ समजूत असतेः—त्याला जर क्वचित् त्याचा निर्देश करण्याकरितां कांहीं संज्ञा योजावीशी वाटली तर तो म्हणेलः " हा जातिसिद्ध न्याय आहे. " तथापि कांहीं विशिष्ट परिस्थितींत तो प्रथम बरेच आढेवेढे घेऊन असें मान्य करतों कीं जगतांत आपल्य सारखे आपल्या बरोबरीचे दुसरे हि कांहीं समानगुणधर्मीय पुरुष आहेत. या प्रकारें गुणावरून वर्णाचा असा हा प्रश्न त्यानें एकदां सोडविल्यानंतर लागली च तो ज्या विश्वासानें विनय आणि स्वाभिमान यांच्या बाबतींत आपल्या स्वतःच्या संबंधीं वागतो त्या च विश्वासानें आतां जणुं अन्तःकरणांतील दैवी घटनेंत ठरल्याप्रमाणें—जी घटना अन्तरिक्षांतील सर्व तारकांना ज्ञात असते—तो त्या आपल्या बरोबरीच्या समानवर्णीय पुरुषांत जाऊन मिसळतो. ही त्यानें केवळ आपल्या बरोबरीच्या समानवर्णीयांशीं संबंध ठेवण्यांत योजलेली युक्ति आणि दाखविलेली आत्ममर्यादा म्हणजे त्याच्या त्या मूळ अहंकारवृत्तीचें च निदर्शक असें आणखी एक अधिक उदाहरण आहे—प्रत्येक तारा असा च अहंकारवृत्तीचा असतो; तो त्यांचे ठायीं आपणा स्वतःचा सन्मान करतो, आणि तो जे अधिकार त्यांना स्वेच्छेनें बहाल करतो त्यांच

असे अधिकार आणि मानसन्मान परस्परांनीं परस्परांस देणें यांत च संगतिकरणाचें संपूर्ण सार आहे आणि हा च निसर्गाचा एक अबाधित नियम आहे असें तत्त्व निःशंक प्रतिपादन करतो. आर्य आत्मा, हा आपल्या स्वभावाच्या अगदीं मूलवृत्तींत भिनून गेलेल्या परस्परसंभावनेच्या अति उत्कट आणि शीघ्र संवेदनात्मक उपजतबुद्धीनें प्रेरित होत्साता, जसें घेतों तसें देतो. ( येथें कालिदासानें रघुराजाच्या दानशीलते संबंधीं "आदानं हि निसर्गाय सतां वारिमुचामिव"—सज्जनांचें आदान वारिमुचाप्रमाणें विसर्गाकरितां असतें, असे जे उद्गार काढले आहेत ते किती समर्पक दिसणार आहेत ! ). बरोबरीच्या आर्यवर्णांतील पुरुषांत 'अनुग्रहा'च्या कल्पनेला फारसें महत्त्व नसतें आणि किंमत हि नसते; आतां जशीं आकाशांतून मस्तकावर प्रकाशाचीं किरणें पडावीं, किंवा तहानेलेल्या मुखांत मेघांतील दवबिंदूंची वृष्टि व्हावी अशा स्वरूपाचा एक दानाचा अत्युच्च प्रकार आहे; तथापि असल्या क्रिया आणि खेळ यांच्या कडे आर्य अन्तःकरणाची तादृश प्रवृत्ति नसते. त्याचा अहंभाव च त्याला येथें प्रतिरोध करतो : सामान्यतः तो कधीं हि स्वेच्छेनें "उंच" नजर करीत नाहीं-- एक तर तो समोर, समांतर दृष्टीनें आणि स्वेच्छापूर्वक पाहतो, किंवा खालीं अधःस्थळीं अवलोकन करतो—आपण फार उंच शिखरावर आहोंत अशी त्यास जाणीव असते." ('सत् आणि असत् यांच्या पलीकडे', ) अध्याय ९ 'आर्य म्हणजे काय?' सू० २६५ ).

सारांश, नीट्झ्शेचा झरथुष्ट्र आपल्या अनुयायी शिष्यवर्गाला अनुलक्षून म्हणतो, तुम्हीं माझ्यासारख्या मानवाचीं व्यर्थ स्मारकें करण्याचें आणि त्याचे पुतळे उभारण्याचें सोडून द्या. त्याच्या जयंत्या करूं नका आणि पुण्यतिथ्या हि पाळूं नका. कारण त्यांत तुम्हांला मोठेपणा न येतां त्याला मात्र

हीनपणा येणार आहे. तुम्हीं म्हणतां कीं झरथुष्ट्रावर जी आमची श्रद्धा आहे ती हें आम्हांस करावयास लाविते. परंतु झरथुष्ट्राची किंमत काय, आणि तुम्हां श्रद्धाळूंची तरी किंमत काय, याचा तुम्हीं कांहीं विचार केला आहे काय? तुम्हीं झरथुष्ट्राला बाहेरून पाहिलें खरें, पण स्वतःला अन्तःकरणांत साक्षात्कारिलें आहे काय? सर्व श्रद्धाळू असें च करतात आणि म्हणून त्या श्रद्धेला कांहीं किंमत नसते. उलट जे वीरपुरुष असतात ते जितकी स्वतःच्या कर्मावर श्रद्धा ठेवतात तितकी दुसऱ्या कशावर ठेवीत नाहींत. ते स्वतःला उत्तम रीतीनें जाणतात म्हणून ते झरथुष्ट्राला हि चांगले ओळखतात. अर्थात् ते त्याचें मंदिर उभारून स्मारक करण्याचा हव्यास धरीत नाहींत तर त्याच्या कर्माचें अनुकरण करण्याची आकांक्षा बाळगतात. येथें ते त्याशीं गुणानें बरोबरी करतात आणि क्वचित् कर्मांत त्याच्या पुढें मजल मारतात. म्हणून शेवटीं झरथुष्ट्र आपल्या शिष्यांना अखेरची आज्ञा करतो कीं, मला सोडा आणि स्वतःला शोधून काढा. जेव्हां तुम्हीं माझा कायेनें, वाचेनें आणि मनानें प्रतिषेध कराल तेव्हां च मी तुमच्याकडे आनंदानें परत येईन, कारण तेव्हां च मला तुमच्या मोठेपणाबद्दल प्रेम व कौतुक वाटेल आणि तुमच्या वीरकर्माबद्दल माझे मनांत आदर उत्पन्न होईल.

या प्रकारें नीट्झशेच्या झरथुष्ट्राचा सर्व रोख श्रेष्ठ, अति श्रेष्ठ स्वरूपाचा मानव नमुना तयार करण्याकडे आहे. मूळ झरथुष्ट्र आर्य आहे आणि येथें नीट्झशेच्या जवळ त्याच्या

आर्यत्वाची परिसीमा आहे. म्हणून च नीट्झशे हा आर्यधर्मांतील सर्व कल्पनांबद्दल महान् आदर बाळगतो व खिस्तीधर्मांतील सर्व कल्पनांबद्दल परम तिरस्कार प्रकट करतो. अर्थात् ही आपल्या मनाची स्थिति कसकशी विकास पावत गेली तिचें रूप स्पष्टपणें दर्शविण्याकरितां त्यानें आपलें आत्मवृत्त लिहिलें आहे आणि त्याला जो आरंभीं उपोद्घात जोडला आहे त्याचा शेवट वरील प्रमाणें झरथुष्ट्राच्या दिव्य शब्दांत केला आहे.

नीट्झशेनें हें आत्मचरित्र ' एक्से होमो ' या इतिहास प्रसिद्ध लॅटिन वाक्याच्या मथळ्याखालीं लिहिलें आहे. Ecce Homo = ईक्ष सोमं ( सोम्याला = मनुष्याला = ह्या विशिष्ट पुरुषाला, पहा = Behold the Man) ' एक्से ' हा शब्द साक्षात् संस्कृत ईक्ष शब्दाचा लॅटिन पर्याय आहे व ' होमो ' हा शब्द वैदिक मनुष्यवाचक ' सोम ' शब्दाचा अपभ्रंश आहे. वैदिक सोम = झेंदिक हओम = लॅटिन होमो. त्यापासून इंग्रजींत human हा शब्द आला आहे. खिस्ताचा इहलोकांतील रोमन न्यायाधीश जो पांटिअस् पायलेट त्यानें त्याच्या विरुद्ध न्याय करून व त्याला देहांताची शिक्षा देऊन ती शिक्षा अमलांत आणण्याकरितां जेव्हां यहुदी पुरोहितांच्या स्वाधीन केलें तेव्हां त्याला उद्देशून वरील शब्द आपल्या भाषेंत उच्चारले. हे शब्द संत योहान्नानें आपल्या शुभवर्तमानांत जसेच्या तसे नमूद केले आहेत; आणि आजपर्यंत पुष्कळ चित्रकारांनीं सदर मथळ्याखालीं, खिस्ताच्या मरणा-

पूर्वीं त्याच्या शत्रूंनीं ज्याप्रकारें त्याच्या अंगावर जांभळा झगा घालून आणि डोक्यावर काट्याचा मुकुट ठेवून त्याचें यहुद्यांच्या राजाचें रूप सजविलें होतें त्याप्रकारें चित्र रंगविलें आहे. हे च शब्द आतां येथें नीट्झशेसारख्या कट्टया खिस्तविरोधकानें आपल्या आत्मवृत्ताच्या मथळ्याच्या जागीं योजले आहेत. जसा आजपर्यंत तो पुरुष पहात आला आहांत तसा आतां या पुढें त्याचा प्रतिस्पर्धी हा पुरुष पहां.

या मथळ्याचे विवरणार्थ नीट्झशेनें त्याला जोडून पुढील वाक्य घातलें आहे.—‘ जो असतो तो कसा होतो ’. ‘ असणें ’ आणि ‘ होणें ’ हें द्वंद्व आहे. असण्यावांचून होणें नाहीं आणि होण्यावांचून असणें नाहीं असा त्यांतील दोन कोटींचा परस्पर संबंध आहे. असण्यामध्यें गुण आहे, होण्यामध्यें कर्म आहे. गुणावांचून क्रिया नाहीं, क्रियेवांचून गुण नाहीं. अर्थात् ‘ यद्यदास्ति तत्तद्भवति ’ = जें असतें तें होतें, या न्यायानें नीट्झश म्हणतो मी जों झालों तों मूळ कोणत्या गुणापासून हें दर्शविण्याकरितां च केवळ हें आत्मचरित्र लिहीत आहे आणि त्याचे चार भाग पाडून ओळीनें त्यांत पुढील चार प्रश्नांचा उलगडा करीत आहेः—(१) मी इतका शहाणा कां? ( २ ) मी इतका बुद्धिमान् कां? ( ३ ) मी इतकीं उत्तम पुस्तकें कां लिहितों? ( ४ ) मी दैवाचा पुरुष कां?

नीट्झशेच्या मरणोत्तर त्याचें चरित्र त्याची बहीण एलिझाबेथ फोर्स्टर–नीट्झश हिनें लिहिलें आहे. सदर चरित्र ह्या

आत्मवृत्ताच्या बरोबर जोडून पाहिलें म्हणजे नीट्झ्शेचें संपूर्ण अन्तर्बाह्य स्वरूप उत्तम दृग्गोचर होणार आहे. नीट्झ्शेचा जन्म प्रुशियामध्यें सॅक्सनी प्रांतांत लुट्झेन शहरानजीक रोकेन नामक गांवीं इ० स० १८४४ च्या आक्टोबर महिन्याच्या १५ व्या तारखेस सकाळीं १० वाजतां झाला. त्याचा बाप तेथील देवळाचा मुख्याधिकारी होता. ही जागा त्याला त्या वेळचा प्रुशियाचा राजा चौथा फ्रीड्रिक विल्हेल्म याच्या साक्षात् कृपाप्रसादानें मिळाली होती. १५ आक्टोबर हा या राजाचा जन्मदिवस होता. अर्थात् त्या दिवशीं नीट्झ्शेचा जन्म झाल्यकारणानें त्याच्या बापानें तो एक मोठा सुयोग मानून या आपल्या प्रथमापत्याचें नांव होहेन्झोलर्न राजघराण्यांतील त्या च फ्रीड्रिक विल्हेल्म राजाचें ठेवलें. नीट्झ्श म्हणतो ह्या माझ्या जन्मदिवसाचा मला एक मोठा फायदा झाला: तो हा कीं माझ्या सर्व बाल्यदशेंत माझा वाढ दिवस सार्वत्रिक राष्ट्रीय महोत्सवाचा होता. नीट्झ्शेच्या जन्मकाळीं त्याच्या बापाचें वय ३१ वर्षांचें व आईचें १९ वर्षांचें होतें. त्याचीं उभय मातापितरें खिस्तीधर्माच्या प्रॉटेस्टंट पंथांतील प्रतिष्ठित पुरोहित कुळांत जन्म पावलीं होतीं. नीट्झ्शेला पुढें खिस्तीधर्माचा, प्रॉटेस्टंट पंथाचा आणि पुरोहित वर्गाचा जसजसा तिटकारा वाटूं लागला तसतसा आपल्या जर्मनराष्ट्रीयत्वाचाहि फारसा अभिमान राहिला नाहीं. याचें कारण सांगतांना तो म्हणतो मुळांत च मी शुद्ध जर्मन रक्ताचा नाहीं. माझे पूर्वज पोलिश सरदार होते. अर्थात् माझ्या ठिकाणीं जी

वर्णांच्या अभिमानाची उपजत भावना आहे ती मला त्यांच्या पासून च वांशिक हक्कानें प्राप्त झाली आहे. माझी दृष्टि केवळ माझ्या प्रांतापुरती किंवा देशापुरती नाहीं. मी आधुनिक जर्मनांच्या पेक्षां फार मोठा जर्मन आहे. आधुनिक साम्राज्यवादी जर्मनांना माझी दृष्टि येणार नाहीं. मी जर्मनराजकारणाच्या पलीकडचा शेवटचा जर्मन आहे. मी जर्मनवृत्तीपेक्षां अधिक युरोपीय वृत्तीचा आहे.

नीट्झ्शेची आई फ्रांझिस्का ओएल्हर हिचें कुळ शुद्ध जर्मन होतें, आणि त्याची पितामही अर्डमुथ क्रॉस्से हिचें हि कुळ जर्मन होतें. अर्डमुथ ही वायमर येथील रहिवासी असल्याकारणानें तिचें गटेच्या मंडळींत जाणें येणें असें. तिचा भाऊ कोनिग्सबर्ग येथें धर्मशास्त्राचा अध्यापक होता आणि पुढें हर्डरच्या मृत्यूनंतर तो वायमर येथें त्याचे जागेवर आला. तिचे दोन विवाह झाले. दुसरा संबंध ऐलेनबुर्गचा शालाधिकारी डॉ० नीट्झ्श याशीं घडला. त्याचा हि हा द्वितीय संबंध च होता. या संबंधापासून इ० स० १८१३ च्या महायुद्धाच्या वर्षी आक्टोबर महिन्याच्य १० व्या तारखेस ज्या दिवशीं नेपोलियन बोनापार्ट हा आपल्या आघाडीच्या सैन्यासह ऐलेनबुर्ग शहरांत शिरला त्या च दिवशीं नीट्झ्शेच्या बापाचा जन्म झाला. नीट्झ्श म्हणतो सॅक्सनी प्रांतांतील सर्व स्त्रियांप्रमाणें माझी आजी नेपोलियनची मोठी चहाती होती आणि कदाचित् माझ्या ठिकाणीं जी त्याचे बद्दल आजमितीपर्यंत भक्ति आहे ती मला आनुवंशिकत्वानें तिचे पासून च प्राप्त झाली असण्याचा संभव

आहे. नीट्झ्शेच्या बहिणीनें त्याच्या चरित्रांत जी आपल्या उभयतां आईबापांच्या कुळांतील स्त्रीपुरुषांची कहाणी कथन केली सांगितली आहे तींत मुख्यतः पुढील तीन बाबी आर्यत्वाच्या दृष्टीनें अति महत्वाच्या दिसणार आहेत,-(१) त्यांची निरोगी आणि सुदृढ शरीरप्रकृति, (२) त्यांचें दीर्घ आयुर्मान, आणि (३) त्यांचें बहुप्रजात्व. ती म्हणते माझ्या आईच्या आईला एकंदर ११ अपत्यें झालीं आणि त्या सर्वांना तिनें आपल्या अंगावर पाजून वाढविलें. माझ्या बापाच्या बापाला १२ अपत्यें झालीं, माझा बाप त्यांतील शेवटला. पुनः दोन्ही कुळांतील स्त्रीपुरुषाचें सामान्य आयुर्मान ७० पासून ९० पर्यंत होतें. फक्त माझा बाप च इ० स० १८४९ मध्यें वयाचे ३८ वे वर्षीं दगडाच्या पायरीवरून घसरून पडून आणि मस्तक ठेंचून अकालीं मृत्यू पावला. नीट्झ्शेला आपल्या बापाबद्दल फार अभिमान होता. तो म्हणतो माझ्या बापासारखा बाप मिळणें हा एक मी मोठा हक्क समजतों : जीवन, जीवनाबद्दल महान् आस्तिक्यभाव यावांचून बाकी जें कांहीं मी हक्कांच्या सदरांत लेखतों तें सर्व या एका गोष्टींत अन्तर्भाव पावतें. त्याचेपासून मला जो सर्वांत मोठा लाभ झाला तो हा कीं, जगताच्या अति उच्च आणि अति नाजुक वातावरणांत सहज प्रवेश करून घेण्यास मला कोणता हि विशेष हेतु धारण करावा लागला नाहीं, तर किंचित् धीर धरावा लागला इतकें च. अशा उच्च वातावरणांत च मला घरच्या सारखें मोकळें वाटतें. तेथें च माझ्या अन्तःकरणांतील सर्व भावना स्वैर क्रीडा करतात.

नीट्झ्शेची बहीण त्याच्या चरित्रांत म्हणते, माझा भाऊ अगदीं बाल्यावस्थेपासून धष्टपुष्ट आणि निरोगी होता. त्याचे डोळे मोठे सुंदर आणि पाणिदार होते. तो स्वभावतः अति मर्यादशील आणि गंभीर वृत्तीचा होता. त्याचा बाप वारला तेव्हां त्याचें वय अवघें पांच वर्षांचें होतें. त्याच्या बापाचा अकालीं मृत्यु ही त्या घराण्यावर फार मोठी आपत्ति आली. अशा स्थितींत त्याच्या तरुण मातेनें आपल्या दोघां लहान मुलांना व वृद्ध सासूला घेऊन नाउमबर्ग नामक एका जवळच्या खेडेगांवीं बिऱ्हाड केलें, आणि तेथें गरीबींत मुलांना अगदीं स्पार्टन शिस्तीचें आणि साधेपणाचें वळण लावून वाढविलें. तिच्या माहेरची स्थिति बऱ्यापैकीं होती. पण तिनें माहेरचा आश्रय केला नाहीं. तथापि तिच्या बापाला मात्र या वेळेपासून च आपल्या नातवाच्या विलक्षण बुद्धिमत्तेबद्दल साक्ष पटली होती.

नीट्झ्शेचें सर्व प्राथमिक शिक्षण नाउमबर्ग येथील लहान व्याकरणशाळेंत झालें. पुढें तो इ० स० १८५८ मध्यें आपल्या वयाच्या १४ वें वर्षीं प्फोर्टा येथील उच्च पाठशाळेंत शिरला-तेथें त्याला सहा वर्षांची शिष्यवृत्ति मिळाली होती. शिस्तीच्या आणि शिक्षणाच्या कामांत ही शाळा त्या काळीं अत्यंत नांवाजलेली होती. येथें विद्यार्थ्यांकडून पाठ तयार करून घेतले जात आणि त्याच्या मनावर व शरीरावर कडक देखरेख ठेवण्यांत येई. नीट्झ्शे आपल्या ग्रंथांत शिक्षणांतील शिस्तीवर जो विशेष जोर देतो तो या शाळेंतील स्वतःच्या प्रत्यक्ष अनुभवावरून होय. प्फोर्टा येथील शाळेचा शिक्षण-

क्रम पूर्ण झाल्यानंतर बऱ्याच उशीरा म्हणजे वयाच्या २० वे वर्षीं तो विश्वविद्यालयांत प्रविष्ट झाला. या काळांत शाळेच्या अभ्यासक्रमाशिवाय त्यानें स्वतंत्र रीतीनें जे नानाविध विषयांत परिश्रम केले ते पुढें त्याला अतिशय उपयोगी पडले. किंबहुना त्यांत च त्याच्या अद्वितीय बुद्धिमत्तेला चलन मिळालें. लहानपणापासून त्याला आपल्या बापाप्रमाणें च गायनाची, काव्याची आणि साहित्याची अभिरुचि होती. तिला व्याकरणाची व निरुक्तीची जोड मिळाल्याबरोबर त्याची बुद्धि अष्टपैलु झाली आणि ज्याप्रमाणें एखादी पुष्पकलिका एकदम उमलावी त्याप्रमाणें ती सर्वांगांनीं एकदम प्रफुल्लता पावली. याचा प्रत्यय, विश्वविद्यालयांत प्रविष्ट झाल्याबरोबर लवकर च त्यानें जो एक भाषाशास्त्रावर लेख लिहिला आणि त्याचा गुरु रिट्श्ल यानें त्या लेखाची अत्यंत तारीफ करून तो एका प्रसिद्ध शालापत्रकांत छापविला, यांत दिसून येतो.

इ. स. १८६४ मध्यें नीट्झ्शेनें प्रथम बॉन्न येथील विश्वविद्यालयांत प्रवेश करून तेथें भाषाशास्त्र आणि धर्मशास्त्र हे विषय घेतले. तथापि सहा महिन्यांत च त्याला धर्मशास्त्राचा कंटाळा आला आणि एक वर्षानें त्यानें त्या विद्यालयाला हि रामराम ठोकून इ. स. १८६५ मध्यें आपला आवडता गुरु जो रीट्श्ल त्याचे मागोमाग लाइप्झिक् येथील विश्वविद्यालयाचा आश्रय केला. तेथें त्यानें भाषाशास्त्रांत अति परिश्रम करून प्राविण्य मिळविलें. या कामांत त्याला पूर्वींच्या प्फोर्टा येथील शाळेंतील शिक्षणाचा फार फायदा झाला. या शाळेंतील

शिक्षकवर्ग आपआपल्या विषयांत इतका तयार होता कीं नीट्झ्श म्हणतो तो कोणत्या हि विश्वविद्यालयांतील पंडितांच्या आसनावर विराजमान होण्यास सुपात्र झाला असता. अशा शिक्षकवर्गाच्या हाताखालीं कोणत्या हि विद्यार्थ्याला आपल्या अभिरुचीप्रमाणें प्राचीन इतिहासाच्या कोणत्या हि प्रांतांत पूर्णपणें अवगाहन करण्यास प्रोत्साहन मिळे. प्फोर्टा येथील पाठशाळेंत नीट्झ्शेनें शेवटचा जो महत्त्वाचा लॅटिन निबंध लिहिला तो प्राचीन मेगारी कवि थिओग्निस यावर होय. हा च निबंध त्यानें पुढें इ. स. १८६६ च्या जानेवारीच्या १८व्या तारखेस लाइप्झिक् येथें नवीन स्थापन झालेल्या भाषासंशोधकमंडळापुढें वाचून दाखविला. थिओग्निस हा प्राचीन ग्रीक इतिहासांत ' एस्थॉस ' चा म्हणजे उच्च आर्यवर्णाचा चहाता आणि पुरस्कर्ता म्हणून प्रसिद्ध आहे. एस्थॉस् = अस्ति सः = तो आहे = तो सत्य आहे = तो आर्य आहे. या प्रकारें 'एस्थॉस' हा ग्रीक शब्द मूळ ' अस् ' धातूपासून निघाला असून तो आर्यत्वाबरोबर वीरत्व, शूरत्व हे उच्च गुण दर्शवितो. या शब्दाच्या उलट नीच वर्णाबद्दल ' डाय्लॉस् ' = दासः हा शब्द भिरुता दाखवितो. अशा डाय्लॉसच्या नीच वर्णाबद्दल थिओग्निसाला परम तिरस्कार होता. नीट्झ्शेच्या सर्व तत्त्वज्ञानांत जो आर्यत्वाबद्दल अत्युत्कट अभिमान दिसून येतो त्याचें मूळ बीज ह्या त्याच्या पहिल्या निबंधांत च दिग्दर्शित होतें. शिवाय येथें ही गोष्ट लक्षांत ठेवणें जरूर आहे कीं त्याचा गुरु रिट्श्ल याला जो त्याच्या बुद्धिमत्तेबद्दल एकदम विश्वास

वाटला आणि त्यावर त्याचें प्रेम जडलें तें या च विशिष्ट निबंधाच्या योगें होय.

लाइप्झिक् येथील विश्वविद्यालयांतील तीन वर्षांच्या प्रौढ विद्यार्थीदशेंत नीट्झ्शेच्या शरीराचा, मनाचा, व बुद्धीचा विकास पूर्णतेला गेला. या काळांत त्याची शरीरप्रकृति अति उत्तम होती. पोहणें, बर्फावरून घसरत जाणें, आणि मोकळ्या हवेंत यथेच्छ फिरणें हे त्याचे व्यायामाचे मार्ग होते. यद्यपि तो लहानपणापासून च गंभीर वृत्तीचा होता तथापि त्यांत विनोदाची छटा होती. त्याचा मनोनिग्रह दांडगा असून त्याचे ठायीं ज्ञानाला अवश्य लागणारे श्रद्धा, तत्परता, आणि संयतेंद्रियत्व हे तीन गुण उत्कटत्वानें वास करीत होते. त्याचा स्वभाव अति सरळ, मोकळा, निष्कपटी आणि निगर्वी होता. त्याचें हास्य प्रेमळ अन्तःकरणांतून उचंबळून बाहेर पडे आणि आपल्या शुद्ध आणि सात्विक वृत्तीची साक्ष देई. सारांश, त्याचा देह आणि आत्मा हे एकमेकांना साजेसे होते. अर्थात् त्याची अलौकिक बुद्धि त्याच्या असामान्य शरीरबळाशीं पूर्णपणें मिळून होती. त्याचे ठायीं पुढें एक च मोठा दोष उत्पन्न झाला. तो हा कीं लहानपणापासून शाळेंतील केवळ अभ्यासाच्या च योगें नाहीं तर इतर विविध वाचनाच्या अति परिश्रमामुळें त्याची दृष्टि फार मंद झाली. इतकी कीं त्याला पुढें पुढें एक दोन हातावरचें दिसेना. लाइप्झिगच्या विद्यार्थीदशेंत यद्यपि त्यानें बुद्धीच्या निरनिराळ्या क्षेत्रांतील ज्ञानजलांत यथेच्छ निमज्जन केलें तथापि तो कोणत्या हि एका विचाराच्या

लाटेंत वाहवला नाहीं किंवा मताच्या भोंवऱ्यांत सांपडला नाहीं, तर त्यानें स्वतःच्या बलानें आपला विचाराचा ओघ स्वतंत्र कायम ठेवला. या तीन वर्षांच्या काळांत त्याच्या मनावर ज्या विशिष्ट तीन गोष्टींचा संस्कार झाला त्या येणेंप्रमाणें:—

( १ ) हेलेनिझम् म्हणजे प्राचीन ग्रीक संस्कृति.

( २ ) शोपेनहौएर आणि त्याचें तत्त्वज्ञान.

( ३ ) रिचर्ड वाग्नेर आणि त्याचें गानकाव्य.

हेलेनिझमच्या योगें त्याची दृष्टि अतिव्यापक झाली आणि त्याला पुढें ख्रिस्ती धर्मांतील आणि आधुनिक युरोपी संस्कृतींतील यथार्थ गुणदोष पाहण्याची शक्ति आली; शोपेनहौएरच्या तत्त्वज्ञानांत त्याला बौद्धधर्माच्या निराशावादांतील रहस्य उलगडलें; आणि रिचर्ड वाग्नेरच्या गानकाव्यांत त्याला ख्रिस्तीधर्माच्या नासलेल्या स्वरूपाचा साक्षात्कार झाला. हेलेनिझमवर त्याचें प्रेम अव्याहत कायम राहिलें, परंतु शोपेनहौएर आणि वाग्नेर यांना मात्र त्यानें यथाप्रसंगीं काडीचा किंतु न बाळगतां आपणापासून पार झुगारून दिलें.

नीट्झशेनें बॉन्न येथें विश्वविद्यालयांत प्रथम प्रवेश केल्याबरोबर कांहीं काळ जो धर्मशास्त्राचा अभ्यास केला आणि नंतर तें शास्त्र सोडून दिलें याचें मुख्य कारण त्याला त्यांत कांहीं नवीन शिकण्यासारखें दिसलें नाहीं. त्याला आपल्या घरगुती शिक्षणांत च त्या शास्त्राची पूर्ण ओळख झाली होती. तो ११।१२ वर्षांच्या वयाचा असतांना च बायबलमध्यें इतका प्रवीण होता कीं तें ओळीनें पाठ म्हणे. त्याच्या घरांत त्याची

एक आई, एक आजी, आणि दोन आता अशा चार धर्मशील बाया होत्या आणि त्यांत हा एक येवढा च मुलगा होता. त्याला दुसरें भावंड म्हणजे त्याची एक लहान बहीण. असा हा मुलगा इतक्या लहान वयांत च इतका गंभीर आणि विचारमग्न दिसे कीं त्यावेळच्या त्याच्या एका लंगोटीयार मित्रानें त्याचे संबंधीं जे उद्गार काढले आहेत ते लक्षांत घेण्यासारखे आहेत. तो म्हणतो—" जसजसा मी त्याचा अधिकाधिक विचार करतो तसतसा तो मला त्या वेळीं जणुं १२ वर्षें वयाचा भगवान् येशू च यहूदाच्या देवळांत उभा असलेला दृष्टीस पडतो". म्हणजे जसा येशू हा मूळ यहुदी देवळांत भाविकपणें जातयेत असून पुढें तो त्या देवळाचा शत्रु बनला तसा च नीट्झ्शे हा हि मूळ खिस्ती बायबलचा भक्त असून पुढें तो त्याचा कट्टा वैरी झाला.

नीट्झ्शे हा बॉन्नच्या विश्वविद्यालयांत १८६४ च्या आक्टोबर मध्यें शिरला. येथें तो जेमतेम एक वर्षभर होता. त्याला तेथील पाठशाळेचें मूळपासून च प्रेम नव्हतें. तेथें त्याचें मन आभ्यासाकडे लागेना. त्यानें हें सर्व वर्ष फुकट उनाडक्या करण्यांत घालविलें. इतर सहाध्यायांबरोबर खेळ खेळणें, कळपामध्यें तासचे तास चकाट्या पिटीत बसणें,वेळीं अवेळीं यथेच्छ बीअर पिणें आणि तंबाखू ओढणें, व मन मानेल तसें बेशिस्त वागणें यांत तो इतका दंग झाला कीं त्या अतिरेकाचा पुढें त्याचा च त्याला अति वीट येऊन त्याच्या मनानें एकदम उलट खाल्ली, आणि त्यानें बीअरची बाटली व तंबाखूची नळी

जी पार झुगारून दिली ती कायमची. इतकें च नाहीं तर पुढें ज्याच्या ज्याच्या हातांत ती त्याला दिसे त्याचा त्याचा तो तिरस्कार करूं लागला. तो म्हणे माझें तत्त्वज्ञान दारू पिणारा आणि तंबाखू ओढणारा यांना कधीं च कळणार नाहीं.

तथापि बॉन्नच्या विश्वविद्यालयांत नीट्झ्शेला जो एक मोठा फायदा झाला तो हा कीं त्याचा प्रो. रिट्श्ल याशीं विद्यार्थी या नात्यानें पहिला संबंध जुळून आला. फ्रीड्रिक् विल्हेल्म रिट्श्ल (१८०६–१८७६) हा युरोपांत अर्वाचीन काळांतलि फार मोठा भाषाशास्त्रज्ञ म्हणून प्रसिद्ध आहे. तो १८३९ पासून जर्मनींतील शिक्षणखात्यांत जुन्या ग्रीक व लॅटिन वाङ्मयाचा आणि साहित्यशास्त्राचा अध्यापक होता. ऐतिहासिक पद्धतीच्या वाङ्मयात्मक टीकेचा तर तो आद्यजनक गणला आहे. नीट्झ्शेच्या प्रथम दर्शनाबरोबर च त्याला त्याच्या बुद्धिमत्तेचा साक्षात्कार आला आणि तेव्हांपासून त्याचें त्यावर जें अकृत्रिम प्रेम बसलें तें आमरणान्त कायम राहिलें. म्हणून च रिट्श्ल हा १८६४ च्या अखेरीस बॉन्नचें विश्वविद्यालय सोडून बाहेर निघाल्याबरोबर लागली च नीट्झ्श हा सुद्धां त्याच्या मागोमाग बॉन्न सोडून लाइप्झिक् येथें त्याच्या हाताखालीं येऊन दाखल झाला. पुढें या गुरुशिष्यांत इतका घरोबा जमला कीं नीट्झ्श हा वारंवार रिट्श्लच्या घरीं जाई आणि तेथें त्याची बायको त्याला फार ममतेनें वागवी. त्याच्या सांनिध्यानें तो जुन्या ग्रीक व रोमन विद्या शिकला, त्याच्या साहचर्यानें त्याला ऐतिहासिक पद्धतीच्या चिकित्सक विवेचनाचें वळण लागलें, त्याच्या वशि-

त्यानें त्याला विश्वविद्यालयांत अध्यापकाची जागा मिळाली, त्याच्या मदतीनें त्याच्या पहिल्या लेखाला त्या काळच्या प्रसिद्ध शालापत्रकांत अग्रेसरत्वाचें स्थान लाभलें, आणि त्याच्या ओळखीनें त्याचा रिचर्ड वाग्नेर याशीं निकट परिचय घडून आला.

बॉन्न येथील पाठशाळेंत सबंध वर्ष उनाडक्या करण्यांत फुकट गेल्यानंतर नीट्झ्शेच्या मनाला जी एक प्रकारची विषण्णता आली होती त्या स्थितींत तो १८६५ मध्यें लाइप्झिक् येथें येऊन दाखल झाला. या च वेळीं त्याला अकस्मात् एका जुन्या पुस्तकविक्याच्या दुकानांत शोपेन्हौएरच्या ' डी वेल्ट आल्स विल्ले उंड फोरस्टेल्लुग '=इच्छा आणि कल्पना यांची सृष्टि, नामक पुस्तकाची एक रद्दी प्रत आढळली. ती त्यानें केवळ जिज्ञासेनें विकत घेतली आणि वाचून काढली. या पुस्तकाचा त्याच्या अगोदर च निरुत्साही झालेल्या मनावर अपरंपार परिणाम घडून आला. या काळीं शोपेनहौएरचें नांव जर्मनींत फारसें प्रसिद्ध नव्हतें. तो एकांडा वीर त्या च कारणानें मागें पडला होता. या काळीं जर्मन विद्यापीठांत कांट आणि हेगेल, शेलिंग आणि हर्बार्ट, लोट्झ आणि फिश्ट यांचें प्राबल्य होतें. लाइप्झिक्च्या विश्वविद्यालयांत जेव्हां नीट्झ्शेचा प्रवेश झाला तेव्हां तेथें तत्त्वज्ञानाचा अध्यापक फेक्नर होता आणि त्याच्याजवळ शोपेनहौएरला फारसा मान नव्हता.

नीट्झ्श हा १८६९ मध्यें आपल्या वयाच्या २१ व्या वर्षीं हें पुस्तक वाचून शोपेनहौएरचा परम भक्त बनला. त्याला या काळीं त्या प्रसिद्ध युरोपी बुद्धाचा नैराश्यवाद पूर्णपणें मानवला. शोपेनहौएर ( १७८८-१८६० ) हा मूळ कांटचा अनुयायी होता. पण पुढें तो त्याचा पक्का विरोधक झाला. त्याला कांटच्या धर्माच्या बाबतींतील कोलांट्या उड्या बिलकुल आवडल्या नाहींत. त्याला त्याचीं घरसोडीचीं नीतितत्त्वें हि मान्य झालीं नाहींत. तो आपल्या उत्तर वयांत उपनिषदांच्या मार्गावर बौद्ध निर्वाणांत रममाण झाला. त्याच्या बसावयाच्या जागेंत एका कोपऱ्यांत भगवान् बुद्धाची सोन्यानें मढविलेली प्रतिमा प्रमुखत्वानें ठेवलेली असे, जवळ च मेजावर दूपेरॉंची उपनिषदांच्या लॅटिन भाषांतराची प्रत सदा उघडलेली असे, आणि खालीं बैठकीवर त्याचा आवडता 'आत्मा' नामक कुत्रा बसलेला असे. उपनिषदांचा ग्रंथ त्याच्या नित्याच्या उपासनेच्या पाठांतला होता. असा हा शोपेनहौएर गेल्या शतकांत जर्मनींत अत्यंत स्वतंत्र वृत्तीचा बाणेदार तत्त्वज्ञ होऊन गेला. त्याच्या तत्त्वज्ञानांतील मुख्य कल्पना 'जीवनेच्छा' होय. ही जीवनेच्छा केवळ जीवदेहाची च उपजत वृत्ति असते असें नाहीं तर ती विश्वांतील आद्यशक्ति आहे. शोपेनहौएरच्या या कल्पनेनें ख्रिस्ती कल्पनेच्या मुळावर च आघात केला आणि त्या धर्माला खोटें ठरविलें. ख्रिस्ती धर्मांत जगताच्या बुडाशीं एक सर्वज्ञ परमेश्वर आहे आणि त्याच्या आज्ञा पाळणें हें मनुष्याच्या इच्छेवर अवलंबून आहे. अर्थात् ख्रिस्ती-

धर्मान्वयें परमेश्वराच्या ठिकाणीं बुद्धिज्ञान आणि मनुष्याच्या ठिकाणीं इच्छास्वातंत्र्य या दोन आद्य शक्ति आहेत. शोपेनहौएरनें हें तत्त्व बदललें. तो म्हणतो विचार शक्ति किंवा बुद्धिज्ञान हें परिणामरूप किंवा कार्यरूप आहे, कारणरूप नाहीं. सर्वारंभीं जीवनेच्छा हें प्रबळ कारण आहे. या जीवनेच्छेनें प्रेरित होत्साता मनुष्य शत्रुहनन आणि अन्नवर्धन करण्यास प्रवृत्त होतो. सुख आणि दुःख हें द्वंद्व जीवनेच्छेशीं जोडलेलें आहे. तथापि त्यांत ‘सुख पाहतां जवापाडें । दुःख पर्वता येवढें ।’ अशी स्थिति आहे. खरें सुख एका कामनेनें दुसरी कामना मारल्यावांचून सिद्ध होत नाहीं. म्हणून वासनात्याग हा च एक सुखाचा मार्ग आहे. खरा सुखी कोण? तर ज्यानें आपल्या वासनांचा पूर्ण त्याग केला, ज्यानें आपल्या सर्व आशा आणि आकांक्षा भस्म करुन टाकल्या असा निर्वाणाप्रत म्हणजे शून्याप्रत गेलेला योगी, संन्यासी, यति किंवा महंत हा होय. या प्रकारें ही विचारसरणी सर्वातोपरि बुद्धाची आहे हें निराळें सांगावयास नको च.

नीट्झ्शेच्या मनावर यद्यपि त्याच्या लहान व अननुभवी वयांत शोपेनहौएरच्या उपरिनिर्दिष्ट सर्वदुःखवादित्वाचा पगडा बसला तथापि तो फार काळ टिकला नाहीं. त्याला आपल्या स्वतःच्या मननांत निराळीं तत्त्वें दिसूं लागलीं, आणि तेव्हांपासून तो शोपेनहौएरला सोडून निराळा झाला. शोपेन-

होएरला जर बुद्धाचें " सर्वं दु:खं दु:खं । सर्वं क्षणिकं क्षणिकं । " हें तत्त्व मानवलें असें म्हटलें तर नीट्झशेला तद्विरुद्ध गीतेचें " सुखमात्यंतिकं यत्तद्बुद्धिग्राह्यमतींद्रियम् " हें तत्त्व स्फुरलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण त्याच्या मतें जीवन हें शोपेनहौएर म्हणतो त्या प्रमाणें जरी अत्यंत दु:खमय असलें तरी मनुष्यानें त्याला कंटाळून सर्वसंगपरित्यागपूर्वक संन्यासाच्या मार्गाला जावयाचें नाहीं तर धैर्यानें त्या दु:खाला तोंड द्यावयाचें. याला त्यानें तराजूचा दृष्टांत दिला आहे तो अत्यंत समर्पक आहे. ज्या प्रमाणें तराजूच्या दोन पारड्यांत दोन जिन्नस सारखे तोलावयाचे त्या प्रमाणें मनाच्या तराजूंत प्रलोभक सुख आणि प्रक्षोभक दु:ख यांनां समसमान वागवावयाचें. गीतेच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे हें च सुखदु:खांचे ठिकाणीं ' समत्व ' होय. हा च तिनें प्रतिपादलेला ' योग '. हें च ' कर्मसु कौशल '. या कर्मकौशल्यानें मनुष्याला ' दुखेष्वनुद्विग्नमना: सुखेषु विगतस्पृह: ' अशी ' स्थितधी ' ची वृत्ति बनवितां येतें. नीट्झशेच्या अवलोकनांत जर गीता आली असती तर त्याला हा उलगडा तेव्हां च झाला असता. तथापि शोपेनहौएरच्या विरुद्ध त्यानें हें दिव्य तत्त्व स्वयंस्फूर्तीनें जाणलें यांत च त्याचा खरा मोठेपणा आहे.

या च काळांत म्हणजे इ. स. १८६९ मध्यें नीट्झशेचा वाग्नेरशीं संबंध जुळून आला. विल्हेल्म रिचर्ड वाग्नेर हा १९ व्या शतकांतील बडा संगीत नाटककार जर्मनींत लाइ-

प्झिक् येथें १८१३ मध्यें जन्मला आणि ब्रिरॉइट येथें १८८३ मध्यें मृत्यु पावला. यानें जशी युरोपीय नाटकांत मोठी सुधारणा केली तशी च युरोपीय संगीतांत मोठी क्रांति घडवून आणली अशी याची ख्याति आहे. नीट्झ्शेपेक्षां हा वयानें पुष्कळ ३१ वर्षांनीं मोठा होता. किंबहुना तो नीट्झ्शेचा गुरु रिट्श्ल याच्या बरोबरीचा केवळ त्याहून ६।७ वर्षांनीं लहान होता. लाइप्झिक् येथें विश्वविद्यालयांत असतांना नीट्झ्शेला जो आपल्या गुरूच्या घरीं प्रेमाचा पाहुणचार मिळत असे तेथें च त्याचा प्रथम वाग्नेरच्या बहिणीशीं परिचय झाला आणि तिच्या द्वारें त्याची वाग्नेरशीं पहिली मुलाखत त्याच्य घरीं घडून आली. यापूर्वीं नुकतें च वाग्नेरचें " ट्रिस्टन् आणि इसोल्डे " हें नामांकित नाटक प्रसिद्ध होऊन त्याचे प्रयोग हि झालेले होते. मागें सांगितलें च आहे कीं नीट्झ्श हा संगीताचा मोठा भोक्ता होता. इतकें च नाहीं तर तो स्वतः त्या कलेंत निष्णात होता. त्याच्या कानावर " ट्रिस्टन् उंड इसोल्डे " या नाटकांतील संगीताचे स्वर पडल्यापासून अगोदर च तो वाग्नेरचा भक्त बनला होता. त्याला त्यांत पूर्वींच्या संगीत नाटकांपेक्षां फार मोठी सुधारणा दिसून आली. वाग्नेरच्या नाटकाचा विशिष्ट गुण म्हणजे त्यांतील संविधानकाची एकमुखता आणि पात्रांची प्रमाणबद्धता हा होय. शिवाय त्यांतील काव्य जसें संगीताशीं, तसें च संगीत काव्याशीं एकरूप होतें.

तथापि नीट्झ्शेला वाग्नेरबद्दल जो विशेष आदर वाटला तो त्याच्या शोपेनहौएरवरील स्वतंत्र प्रेमामुळें होय. कारण

जसा नीट्झ्शे तसा च वाग्नेर हा हि शोपेनहौएरचा मोठा चहाता होता. शोपेनहौएरचें स्वतंत्र तत्त्वज्ञान या दोघांना सारखें च मानवलें आणि दोघांची वृत्ति स्वतंत्रपणें त्या तत्त्वज्ञानाचा आपआपल्या कार्यांत पूर्ण उपयोग करून घेण्याकडे वळली. अर्थात् नीट्झ्शेची वाग्नेरशीं पहिली मुलाखत झाल्याबरोबर तत्काल दोघांची मैत्री जमली आणि दिवसेंदिवस ती अधिकाधिक वृद्धिंगत होत गेली. लुसर्न नामक गांवाजवळ ट्रिब्शेन खेड्यांत वाग्नेरचें घर होतें. तेथें त्यानें नीट्झ्शेला सुट्टीच्या दिवसांत पाचारण केलें आणि इ० स० १८६९ आणि १८७० या दोन सालांतील नाताळची सुट्टी नीट्झ्शेनें त्याच्या घरीं आनंदानें घालविली. जर्मनीमध्यें कोणाला आपल्या घरीं नाताळांत बोलावणें हें अति निकट प्रेमाचें आणि साहचर्याचें लक्षण समजतात. या वरून त्या दोघांचें या काळीं किती सख्य होतें तें दिसून येतें. येथें त्या दोघांचे शोपेनहौएरच्या तत्त्वज्ञानावर मोटमोठे कडाक्याचे वाद चालत. दोघांना हि शोपेनहौएरचे पूर्वपक्ष मान्य होत पण त्याचीं निगमनें मात्र पटत नसत. या वाक्विवादांत नीट्झ्शेला वाग्नेरच्या ठायीं ज्या ‘ डायोनिसियन् ’ वृत्तीनें प्राचीन ग्रीक कलेला उद्धरिलें होतें ती सर्वसंहारक वृत्ति आढळून आली. कारण त्या काळीं जर्मनींत सर्वत्र रूढ असलेली गायनकला अगदीं निरंग आणि बेचव बनून गेलेली होती. अशा कलेला रूढीच्या पाशांतून सोडवून तेजस्वी करण्याकडे वाग्नेरचा कल होता. आणि या कामांत त्याला नीट्झ्शेच्या विचारसरणीचा अति उपयोग झाला.

नीट्झ्शेनें आपला पहिला ग्रंथ " दुःखपर्यवसायी नाटकाचा जन्म " हा मूळ वाग्नेरच्या कार्याला पुष्टि देण्याकरितां लिहिला आणि तो त्याला च स्नेहभावानें अर्पण केला. वाग्नेरला हि त्याबद्दल फ़ार कृतज्ञता वाटली. या ग्रंथांत त्यानें प्रथम च अपॉलो विरुद्ध डायोनिसस् किंवा विष्णु विरुद्ध भैरव अशी मांडणी केली. विष्णु हा पुष्टिकारक देव आहे तर भैरव हा लयकारक आहे. म्हणून वैष्णवी शक्ति ही जें जसें असेल तसें त्याचें संरक्षण करिते तर भैरवी शक्ति ही जीर्ण-जरठ, रोगीखुजट, निर्बलनपुंसक यांचा योग्यप्रकारें संहार करिते. नीट्झ्शेला अपॉलोपेक्षां डायोनिससचें महत्त्व जास्त वाटलें. कारण त्याच्या मतें त्यावांचून जगांत ख्रिस्तीधर्माच्या द्वारें माजलेला दुबळेपणा नाहींसा होणें शक्य नव्हतें. त्याला प्रथमतः शोपेनहौएरच्या ठिकाणीं डायोनिसस् दिसला, नंतर वाग्नेरच्या ठायीं आढळला. परंतु इतकें खरें कीं तो स्वतःच अन्तर्बाह्य डायोनिसस् होता. त्यानें त्यांचे ठिकाणीं केवळ आपलें प्रतिबिंब पाहिलें. म्हणून पुढें कालांतरानें त्याची दृष्टि निवळल्यानंतर त्याला त्या दोघांत हि विशेष राम दिसला नाहीं. त्यानें जसा सरळपणें शोपेनहौएरला झिडकारला तसा च वाग्नेरचा हि धिःकार करण्यांत किंचित् किंतु बाळगला नाहीं. नीट्झ्श आणि वाग्नेर यांचा स्नेहसंबंध १८६६ पासून १८७८ पर्यंत सरासरी बारा वर्षें टिकला. या काळांत वाग्नेर हा आपल्यासारखा च पक्का ख्रिस्तविरोधक आहे या समजुतीनें नीट्झ्श हा कट्टा वाग्नेरभक्त होता पण पुढील दहा

वर्षांत १८७९ पासून १८८९ पर्यंत, म्हणजे तो विदेही अवस्थेंत प्रवेश करीपर्यंत त्याचा तीव्र विरोधक बनून राहिला. तथापि हा विरोध केवळ तात्त्विक स्वरूपाचा होता. त्यांत वैयक्तिक द्वेष किंवा मात्सर्य याचा लवलेश हि नव्हता. ही गोष्ट त्या दोघांनीं हि जीं आपआपलीं आत्मचरित्रें लिहिलीं आहेत ( वाग्नेरचें " माझें चरित्र " व नीट्झ्शेचें " पहा हा पुरुष " ) त्यांत स्पष्ट निदर्शनास येते.

नीट्झ्श हा खरा तत्त्वज्ञ होता. वाग्नेर केवळ कलावंत होता. नीट्झ्शेला तत्त्वज्ञानाच्या मार्गांत किंचित् अनृत खपत नव्हतें. वाग्नेरला कलेच्या प्रदर्शनांत पदोपदीं अनृताचें अवलंबन केल्यावांचून गत्यंतर नव्हतें. हें त्या दोघांतील विरोधाचें मुख्य कारण आहे. जोंपर्यंत ते दोघे शोपेनहौएरच्या तत्त्वज्ञानापुरती चर्चा करीत तोंपर्यंत सर्व ठीक होतें. पण जेव्हां नीट्झ्श हा आपलीं स्वतंत्र प्रमेयें काढूं लागला तेव्हां तीं जशींच्या तशीं जाणून पचविणें वाग्नेरच्या शक्तीच्या बाहेर गेलें. ही गोष्ट वाग्नेरवरील प्रेमातिशयामुळें नीट्झ्शेला पुष्कळ काळ कळली नाहीं. त्याला तो आपल्यासारखा च बाणेदार तत्त्वज्ञ वाटे. इतकें च नाहीं तर जेव्हां त्यानें ग्रीक ' ट्रॅजेडी ' वरील आपला पहिला ग्रंथ लिहिला तेव्हां त्यांत त्यानें त्याच ठायीं आपल्या तत्त्वज्ञानाचें अंतिम सार पाहिलें. त्यानें त्याला डायोनिसस् कल्पिलें. वास्तविक तो ग्रीक डायोनिसस् नव्हता तर ख्रिस्ती सेंट फ्रान्सिस होता, ' झरथुष्ट्र ' नव्हता तर ' पार्सिव्हल ' होता, नीट्झ्शे

नव्हता तर वाग्नेर होता. नीट्झ्शेला आपल्या विद्यार्थीदशेंतील उत्साहाच्या भरांत आरंभीं जसा शोपेनहौएर अपूर्व वाटला तसा च वाग्नेर हि असामान्य दिसला. त्या काळीं इतरत्र कोठें न दिसणारी जी थोडी स्वातंत्र्याची वृत्ति त्या दोहोंत खेळत होती ती पाहून त्यांचे ठिकाणीं त्याचें मन बसलें. हा काळ फ्रान्सचें साम्राज्य लयास जाऊन जर्मनीचें साम्राज्य स्थापन होण्याचा होय. जर्मनीला फ्रान्सवर विजय मिळाल्याबरोबर जो एक प्रकारचा भ्रम झाला कीं आपली संस्कृति, आपली विद्या व आपली कला सर्वश्रेष्ठ आहे त्याचें निरसन करणें नीट्झ्शेला अत्यावश्यक वाटलें. त्याच्या मतें जर्मनीचा जय हा केवळ तींतील सरळ क्षात्रतेजाचा आणि युद्धांतील शिस्तीचा विजय होता. त्यांत संस्कृतीचा वगैरे कांहीं एक संबंध नव्हता. उलट जर्मनीपेक्षां फ्रान्सची च संस्कृति अधिक श्रेष्ठ होती. परंतु विजयाच्या मदांत जर्मनीला आपल्या सर्व च गोष्टी मोठ्या दिसूं लागल्या. अशा काळीं क्षुद्र बुद्धीच्या आणि कोत्या मनाच्या लेखकांचा तेथें इतका विलक्षण सुळसुळाट झाला कीं त्या खालीं शोपेनहौएरसारखे ज्ञानाचे खरे वीर लोपून गेले. नीट्झ्शेच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे त्या काळीं जर्मनींत सर्वत्र “ फिलिस्टिनिझम् ” चा किंवा “ नरसूगिरी ” चा पगडा बसला होता. “ सगळे च नरसू ”. त्यांत बरा कोण आणि बुरा कोण ? अशा नरसूंच्या बाजारांत नीट्झ्शेनें डेव्हिड स्ट्रौस्स नामक एक उमदा नरसू निवडून “ डेव्हिड् स्ट्रौस्स, ख्यापक आणि लेखक ” ( David Strauss, der Bekenner und der

Schriftsteller ) या मथळ्या खालीं एक लेख लिहिला आणि तो १८७३ मध्यें प्रसिद्ध केला. डेव्हिड् स्ट्रौस्स हा मध्यम दर्जाचा आणि सामान्य कर्तृत्वाचा लेखक जर्मनींत १८०८–१८७४ मध्यें होऊन गेला. त्यानें १८३५ मध्यें 'येशूचें चरित्र' ( Das Leben Jesu ) हा ग्रंथ लिहिला आणि त्यानंतर नीट्झ्शेला टीकाविषयक झालेला "जुनी आणि नवी धर्मश्रद्धा" (Der alte und der neue Glambe) हा ग्रंथ १८७२ मध्यें लिहिला. या ग्रंथांत त्या काळीं जर्मनींत सर्वत्र फैलावलेली कृतकृत्यतेची आणि संतोषप्रवणतेची वृत्ति मोठ्या भडक रंगांत रेखाटलेली दिसून येते. नीट्झ्शेचें मुख्य तत्त्व जें पुरुषाचा पुरुषोत्तम करणें त्याला जर कोणती अति विघातक गोष्ट असेल तर ही संतोषप्रवणतेची आणि कृतकृत्यतेची वृत्ति (Erbarmliches Behagen) होय. पण नरसूंचा तर सर्व भर अशा च संतोषप्रवणतेवर असतो. त्यांच्या शिक्षणाचें हें च ध्येय कीं "निर्वाहःप्रतिपन्नवस्तुषु" = असलेल्या वस्तूंत निर्वाह करावयाचा, नसलेल्या वस्तु निर्माण करण्याच्या भरीस पडावयाचें नाहीं. हा 'प्रतिपन्नवस्तुषु निर्वाह' (Smug content) त्या काळच्या सर्व च लहान मोठ्या जर्मन शिक्षकांच्या आणि लेखकांच्या अंगीं इतका खोल बिंबून गेला होता कीं त्यांना त्यांत च आपण सर्वज्ञ आहों, हें च काय पण आपण परमेश्वरासारखें सर्वशक्तिमान् अतएव सर्वव्यापी आहों, असें वाटे. तथापि ही घमेंड केवळ त्यांच्या नासक्या बुद्धीवर आणि पोकळ पांडित्यावर पांघरूण होती इतकें च.

पुन : नरसू (Culture-Philistine) म्हटला कीं तो जसा एखादा राजदरबाराला चटावलेला सामान्य वृत्तपत्रकार, कवि, लेखक, नाटककार किंवा विनोदकार असावयाचा, तसा च सदा सदंश निवडण्याची आकांक्षा धरणारा (Eclectic) आणि तडजोड करण्याची इच्छा बाळगणारा (Compromising) दिसावयाचा. आरिस्टॉटल्नें म्हटलें आहे जो सदा सदंश निवडण्यास जातो तो निश्चयानें असाद्विवेकी असतो; आणि नीट्झ्शेनें म्हटलें आहे जो सदा तडजोड करावयास पाहतो तो निःसंशय मेकडमनाचा दिसतो. खरें च आहे, द्वंद्वाच्या नियमाप्रमाणें सर्व सद्वस्तूंचा कधी एकत्र संग्रह होणार नाहीं, —कारण जेथें सत् तेथें च असत् असावयाचें; आणि उच्च जीवनविषयांत कधीं तडजोड करून चालणार नाहीं, तर तेथें जसें असेल तसें भीषण स्वीकारून रहावयाचें. नीट्झ्शेनें स्ट्रौस्सवरील लेखांत एतत्सदृश नरसूगिरीचा योग्य समाचार घेतल्यानंतर आपलें ध्येय काय आहे तें दर्शविण्याकरितां पुढील वर्षीं ह्मणजे १८७४ सालीं “ शोपेनहौएर, नमुनेदार शिक्षक ” (Schopenhauer als Erzieher) हा लेख लिहिला आणि त्यानंतर दोन वर्षांनीं १८७६ सालीं वाग्नेरवर “ बिरॉइट् येथें रिचर्ड वाग्नेर ” (Richard Wagner in Beyreuth) हा लेख प्रसिद्ध केला. आतां नीट्झ्शेनें स्ट्रौस्सवरील लेखांत यद्यपि त्यावर फार कडक टीका केली असली तथापि त्यांत त्याची किंचित् हि वैयक्तिक द्वेषबुद्धि किंवा असद्भाव दिसून येत नाहीं. किंबहुना स्ट्रौस्स ही व्यक्ति कोण हें हि त्याला पुरतें माहीत नव्हतें

या बद्दल त्यानें आपल्या आत्मचरित्रांत स्पष्ट खुलासा केला आहे: "कोणा हि विशिष्ट व्यक्तिमात्रावर हल्ला करण्याची माझी कधीं च इच्छा नसते—मी केवळ व्यक्तीच्या ठिकाणच्या व्यक्तित्वाचा उपयोग महत्कारी भिंगाप्रमाणें करतों; मला ज्या विषयाचें महत्त्व वाचकाला पटवावयाचें असतें तो विषय त्याच्या डोळ्यांत सहज भरावा म्हणून मी तें भिंग त्या विषयावर धरून दाखवितों." स्ट्रौस्सला सुद्धां ही टीका वाचल्यानंतर ह्या कोण अनोळखी लेखकानें आपणावर येवढा हल्ला केला याबद्दल महदाश्चर्य वाटलें. पण या कामांत नीट्झशेचा हेतु इतका च होता कीं आपल्या देशावर जें हें असाद्विचाराचें वारें आलें आहे त्याचा वेळीं च प्रतिकार व्हावा. ही टीका प्रसिद्ध झाल्यानंतर थोड्या च दिवसांनीं ( फेब्रुवारी ७, १८७४ ) स्ट्रौस्स एकाएकीं मरण पावला. हें ऐकून आणि आपल्या टीकेच्या प्रहारामुळें च केवळ या वृद्ध पंडितावर ही आपत्ति इतक्या लवकर ओढवली हें पाहून नीट्झशेला परम दुःख झालें आणि त्या भरांत त्यानें पुढील, तत्त्वज्ञानी पुरुषाला शोभतील असे, उद्गार काढले: " अरेरे, मी कोणाचा द्वेष करण्याकरितां आणि शत्रुत्व संपादण्याकरितां कांहीं खरोखर जन्माला आलों नाहीं." ही त्याची वृत्ति नीट अवलोकन केली आणि दुसऱ्यांवर टीका करण्यांत त्याचा मुख्य हेतु कोणता होता हें जाणलें म्हणजे तो प्रथम शोपेनहौएर आणि वाग्नेर यांचा परम भक्त असून पुढें कट्टा शत्रु कसा बनला आणि त्यानें त्यांचे इतक्या कठोरपणानें वाभाडे कां काढले याची बरोबर उपपत्ति लागते.

शौपेनहौएर आणि वाग्नेर यांवर नीट्झ्शेनें जे पहिले अत्यंत स्तुतिपर लेख लिहिले ते मूळ त्यानें त्या काळच्या विद्यापीठांतून आणि पाठशाळांतून बाहेर पडणाऱ्या पंडितंमन्य पढतमूर्खांचा आणि त्यांच्या पुस्तकी ज्ञानाचा समाचार घेण्याकरितां जी एक " वेळीं अवेळीं सुचलेले विचार " ( Unzeitgemasse Betrachtungen ) या नांवाखालीं लेखमाला सुरू करण्याचें योजिलें होतें तींत प्रसिद्ध केले. या मालेंतील पहिला लेख १८७३ मध्यें " डेव्हिड् स्ट्रौस्स " वर लिहून झाल्यानंतर १८७४ च्या जानेवारींत त्यानें ' इतिहासाचे मानवजीवनावर सुष्ट व दुष्ट परिणाम ' ( Vom Nutzen und Nachtheil der Historie fur das leben ) हा लेख लिहिला आणि त्या च वर्षीं आगष्ट महिन्यांत शौपेन्हौएरवर व पुढील वर्षाच्या अखेरीस वाग्नेरवर असे दोन लेख लिहून ही माला संपविली. त्याचे मनांत मूळ ही माला २४ लेखांत तयार करून तींत ' वाङ्मय आणि मुद्रण ', ' कला आणि चित्रकार ', ' उच्च शिक्षण आणि नमुनेदार शिक्षक ', ' जर्मन आणि विरुद्ध-जर्मन ', ' युद्ध आणि राष्ट्र ', ' धर्म आणि समाज ', ' समाज आणि व्यापार ', ' शास्त्र आणि समाज ', ' नगर आणि नागरिक ', ' स्वातंत्र्य आणि त्याचे मार्ग ', इत्यादि विषय गोंवावयाचे होते. पण शेवटीं सदर माला वरील चार लेखांत च समाप्त झाली. डेव्हिड स्ट्रौस्स हा त्या काळीं एक लोकमान्य तत्त्वज्ञ व शिष्ट सुधारक म्हणून गणला गेला होता. तो मूळचा धर्मोपदेशक असून पुढें धर्माचा टीकाकार झाला. पण त्याची टीका धर्माच्या विरुद्ध

सामान्य नास्तिकवाद उत्पन्न करण्यापलीकडे फारशी गेली नाहीं. म्हणून त्याचे अनुयायी पूर्वी जितके भाविक ख्रिस्ती होते तितके आतां भाविक सुधारक बनले इतकें च. बाकी त्यांच्यांत कांहीं ज्ञानाचा अधिक शिरकाव झाला असें नाहीं. ही त्यांची पूर्वींच्या धार्मिकभावांतील वा नूतन नास्तिकभावांतील सारखी च भोळी संतोषप्रवणता पाहून नीट्झशेला जो त्यांचा तिरस्कार वाटला त्या भरांत त्यानें डेव्हिड् स्ट्रौस्सवर मागें सांगितल्याप्रमाणें टीकेचें हत्यार उपसलें. या टीकेंत नीट्झशेनें म्हटलें आहे—

" जीवनाचा अर्थ काय या प्रश्नाचें उत्तर देण्याचें स्ट्रौस्स आपल्या ग्रंथांत अजीबात टाळतो. ' जीवनार्थ कलह आणि त्यांत बलवानाचा जय ' या तत्त्वांतून नवीन नीति—अर्थात् ख्रिस्तीधर्माच्या नीतीहून भिन्न नीति—काढण्याचें धैर्य दाखविण्याचा प्रसंग आला असतां तो तो घालवितो. यांत त्याचे ठिकाणीं सत्यप्रेमाचा अभाव दिसून येतो. तो केवळ पाद्रीभट, संतांचे चमत्कार, व पुनरुत्थानाचें ऐतिहासिक खूळ असल्या क्षुद्र गोष्टीवर टीकेचा मारा करतो. याला फारसें धैर्य लागत नाहीं. त्यानें जर डार्विनच्या उपरिनिर्दिष्ट जीवनतत्त्वांतील अक्षरांच्या अनुसंधानानें नीतीचीं प्रमेयें काढण्याचें सत्यप्रेम धारण केलें असतें तर त्याच्या भोंवतालीं जमलेल्या नरखूवर्गांपैकीं प्रत्येक जण त्याचा शत्रु झाला असता. पण आतां ते सर्व त्याचे मित्र आहेत. ख्रिस्तीधर्मांतील बिनमहत्वाच्या बाबींशीं टक्कर देण्यांत च त्यानें आपला सगळा वेळ गमावला. त्या धर्माच्या बुडाशीं असलेल्या मुख्य कल्पनेला त्यानें हात घातला नाहीं आणि तिच्या विरुद्ध तिला हाणून पाडणारी दुसरी कल्पना पुढें आणण्याचें धारिष्ट केलें नाहीं. त्या कारणानें त्याचें सर्व तत्त्वज्ञान शिळें, पचपचीत आणि रद्दी ठरलें " ( डेव्हिड स्ट्रौस्स; व्याख्याक आणि लेखक. )

नीट्झ्शेचा हा स्ट्रौस्सवरील टीकेचा हल्ला तत्त्वाच्या परीक्षणांत जितका अति तीक्ष्ण आहे तितका च आत्मप्रत्ययाच्या, सत्य-प्रेमाच्या, आणि धैर्यातिशयाच्या बाबतींत केवळ असामान्य आहे. कारण हा काळ म्हणजे फ्रान्सचा बादशहा तिसरा नेपोलियन सेदानच्या रणांगणावर आपल्या संपूर्ण सैन्यासह जर्मनीला शरण आल्यानंतर फक्त तीन चार वर्षांचा होय. अशा काळीं जर्मनीला आपल्या संस्कृतीचा जो गर्व झालेला होता तो पोकळ आहे, ती संस्कृति सर्वथैव नासलेली आहे, आणि तिची जर वेळीं च सत्याच्या ज्वालेंत शुद्धि केली नाहीं तर ती जर्मन सुधारणेचा सर्वस्वी नाश केल्यावांचून कदापि राहणार नाहीं असें तत्त्व स्पष्टपणें प्रतिपादन करणें हें कांहीं सामान्य धैर्याचें काम नव्हतें. येथें ही गोष्ट लक्षांत ठेवणें जरूर आहे कीं नीट्झ्शेच्या मतें ख्रिस्तीधर्मावर खरी टीका करणें म्हणजे मुख्यतः त्या धर्मांतील सर्व नीतिमूल्यांचें उच्चाटन करून त्या जागीं तद्विरुद्ध दुसरीं नीतिमूल्यें प्रस्थापित करणें हें होय. परंतु ही गोष्ट स्ट्रौस्सला समजणें शक्य नव्हतें. कारण तें त्याच्या ऐपतीच्या बाहेर होतें. अर्थात् या काळीं स्ट्रौस्सवर टीका करण्यांत नीट्झ्शेनें जणुं ही गोष्ट आपण च स्वतः केव्हां तरी साक्षात् करून दाखवूं अशी प्रतिज्ञा केली आणि ती पुढें आपल्या सर्व लेखांत आणि विशेषतः शेवटच्या ख्रिस्तांतकांत खरी करून दाखविली. म्हणून स्ट्रौस्सवरील टीका ही त्याच्या भावी कार्याची एकप्रकारें प्रस्तावना च होती आणि तींत स्ट्रौस्सच्या आणि तत्सदृश सर्व नरसूंच्या दोषाविष्करणापेक्षां

स्वतःच्या कार्यकर्तृत्वाचें दृढ आश्वासन होतें असें मानण्यास हरकत नाहीं.

स्ट्रौस्सवर टीका प्रसिद्ध केल्यानंतर पुढील वर्षी म्हणजे १८७४ सालीं नीट्झशेनें ' इतिहासाचे मानवजीवनावर सुष्ट व दुष्ट परिणाम ' हा टीकात्मक लेख लिहिला. याचें कारण हें कीं त्या काळीं जर्मनींतील विद्यापीठांतून इतिहासशास्त्राचें फार स्तोम माजलें होतें. ज्याला त्याला ' इतिहासाची दृष्टि ' आली असून जो तो ' इतिहाससंशोधक ' बनला होता ! ह्या इतिहास-दृष्टीनें प्रत्येक जर्मनाला वाटूं लागले कीं आपण ' जगाच्या प्रगतींत उत्क्रांतीचा कळस ' गांठला आहे. यावर सदर लेखांत नीट्झश म्हणतो, ' इतिहासाची दृष्टि ' हें आधुनिक सुशि-क्षिताच्या मनाला भ्रम उत्पन्न करणारें वेड आहे; जगाची प्रगति ही शुद्ध माया आहे; आणि उत्क्रांतीचें तत्त्व हें नाकर्त्याला अकर्मांत स्तब्ध राहण्यास निमित्त आहे. त्याच्या मतें इतिहास हा फार थोड्या शेलक्या लोकांकरितां असतो, सर्वसामान्य बहु-जनांकरितां नसतो; प्रौढांकारितां असतो, पोरांकारितां नसतो; प्रकृष्टांकरितां असतो, निकृष्टांकरितां नसतो,—कारण त्या योगें निकृष्टाचा बुद्धिभेद होऊन तो गोंधळांत पडतो आणि नाश पावतो. इतिहास हा मागील अनुभवाचा धडा असतो, आणि असा धडा गिरविण्याची ऐपत फार थोड्यांना असते. चालू जीवनकर्माला मदत करण्यापलीकडे इतिहासाला कांहीं अर्थ नसतो आणि आपल्यापैकीं पुष्कळांना गतगोष्टींचें विस्मरण झाल्या-वांचून जीवनकर्म चालवितां येत नाहीं. म्हणून मानवजीवनाचें ध्येय

काय आहे हें अगोदर जाणून आणि तें डोळ्यापुढें ठेवून इति-हासाचें परिशीलन करणें योग्य होईल. नाहींतर तो इतिहास केवळ निरुपयोगी च नाहीं तर अपायकारक होण्याचा संभव आहे. पूर्वीच्या काळांत जें जें कांहीं घडलें तें सर्व परमेश्वराच्या संकेतानुसार एका अंतिम पूर्णत्वाला धरुन आहे असें समजणें फार धोक्याचें आहे. कारण खरी गोष्ट अशी आहे कीं पुष्कळ ऐतिहासिक प्रसंग अर्थशून्य आहेत, विशेषतः इति-हासकारांना ज्या प्रसंगांचें मोठ्या भडक रंगांत वर्णन कर-ण्याची चटक आहे असे—राजसत्ता, लोकमत, बहुजननिर्णय इत्यादि. एका शिवाजी किंवा नेपोलियना सारख्या महापु-रुषाच्या मतांना किंवा कृत्यांना जी किंमत आहे ती जगांतील सर्व पार्लमेंटांच्या मतांना किंवा कृत्यांना नाहीं. येथें च नीट्-झ्शेच्या भावी आर्यनीति किंवा प्रभुनीति ( Herren-moral) विरुद्ध अनार्यनीति किंवा दासनीति( Sklav-moral ) चें बीज दिसून येणार आहे.

सदर्हु लेखांत नीट्झ्शेनें प्रथम इतिहासाची छाननी करून नंतर केवळ शब्दनाद करणाऱ्या क्षुद्र इतिहासकारांचा आणि इतिहाससंशोधकांचा चांगला समाचार घेतला आहे. त्या काळीं अशा लेखकांचा जर्मनींत फार सुळसुळाट झालेला होता. हे लोक जुन्या वीरांच्या हेतूंचा बरेंवाईटपणा आपल्या काळच्या हेतुंवरून ठरवीत आणि त्यांचीं कृत्यें आपल्या कृत्यांशीं ताडून पहात. इतकें च नाहीं तर ते आपल्या कृत्यांचें समर्थन त्यांचे दाखले देऊन करीत. उदाहरणार्थ, हल्लीं हिंदुस्थानांतील प्रत्येक

लहानमोठ्या लेखकाला लोकशाही पाहिजे आहे, तर अशी लोकशाही प्राचीन महाभारतांत होती किंबहुना वेदांत होती अशा स्वरूपाचें हें समर्थन असें. अशा 'सर्व-नरसू' काळांत एखाद्या विशिष्ट शोपेनहौएरसारख्या प्रतिभावान् पुरुषाची सर्वत्र हेळसांड झालेली दिसली तर त्यांत कांहीं नवल नाहीं. ही हेळसांड अशा पुरुषाकडे केवळ दुर्लक्ष करण्यानें च होते असें नाहीं. तसें असतें तर एकपरीं बरें झालें असतें. पण त्या हि पेक्षां वाईट म्हणजे त्याची इतर सर्वसामान्य लेखकब्रुवांबरोबर समानत्वानें सांगड घालण्यांत येते. नीट्झशेनें आपल्या 'मूर्तींचा संधिप्रकाश' नामक ग्रंथांतील 'स्वकालाबरोबर युद्धांतील चकमकी' या प्रकरणांत एके ठिकाणीं 'आणि' या उभयान्वयी अव्ययाचा दुरुपयोग कसा करण्यांत येतो याचें उदाहरण दिलें आहे. तो म्हणतो,—

"—मला कधीं कधीं हा अत्यंत दुष्ट शब्द उच्चारलेला ऐकण्याचा फार तिरस्कार वाटतो. केव्हां ? तर जेव्हां जर्मन लोक "गटे आणि शिलर" असा प्रयोग करतात तेव्हां. मला कित्येक वेळां अशी भीति वाटते कीं ते 'शिलर आणि गटे' असा हि प्रयोग करीत असतील. ......काय, अद्याप कोणाला शिलर कसा आहे याचा शोध लागला नाहीं काय ?—पण या शिवाय दुसरे हि कांहीं "आणि" आहेत, व ते यापेक्षां हि अधिक तिरस्करणीय आहेत. मी माझ्या स्वतःच्या कानानें ऐकलें आहे—आणि इतकें खरें कीं तें फक्त विद्यापीठांतील शिक्षकवर्गामध्यें !—लोक सहज बोलतांना म्हणतात 'शोपनहौएर आणि हार्टमान्न.'.........( सूत्र १६ ).

हार्टमान्न हा शोपेनहौएरचें अनुकरण करणारा त्याचा एक

सामान्य शिष्य होता. त्यानें आपल्या गुरूच्या नैराश्यवादाची तीक्ष्णता कमी करून आधुनिक रुचीला पसंत पडेल असा त्यांत मसाला घातला आणि त्याची मूळची सर्व चव बिघडवून टाकली. अशा हार्टमानचा शोपेनहौएरच्या बरोबरीनें एका कंसांत केलेला नामनिर्देश नीट्झ्शेसारख्या औद्धिक वृत्तीच्या तत्त्वज्ञाला कसा मानवणार ? असा च प्रकार या देशांतील आधुनिक नरसूशाहींत जसाचा तसा आपल्या डोळ्यासमोर घडत असलेला दिसून येतो. "पारसनीस, खरे आणि राजवाडे." सगळे च नरसू सर्रहा हा प्रयोग करीत असलेले अद्याप कोणाच्या नजरेस आलें नाहीं कां ? बिचारे राजवाडे. त्यांनीं हा प्रयोग आपल्या हयातींत च पाहिल्या कारणानें ते इतिहाससंशोधनाचें काम टाकून प्राचीन भाषांचें व्याकरण आणि निरुक्त अशा अनन्यसामान्य विषयांत शिरले. तथापि येथें हि कोणी नरसू त्यांना स्वस्थ बसूं देईल व 'श्वानो युवानो मघवान:' अशी साक्षात् पाणिनीची साक्ष देऊन "दादोबा, जोशी आणि राजवाडे" या प्रकारें त्यांचा इतर क्षुद्र शालोपयोगी व्याकरणकारांच्या नांवाशीं संबंध जोडणार नाहीं याची तरी खात्री काय सांगावी ?

नीट्झ्शेचा हा 'वेळीं अवेळीं सुचलेले विचार' या लेखमालेंतील इतिहासावरील लेख १८७४ च्या जानेवारींत पुरा झाल्यानंतर लागली च पुढें आगष्ट महिन्यांत त्यानें शोपेनहौएर वर अत्यंत स्तुतिपर लेख लिहिला म्हणून मागें सांगितलें च आहे. नीट्झ्शेच्या मतें या काळांत जर्मनीमध्यें जे 'सगळे च

नरसू 'प्रगति, उत्क्रांति, सुधारणा, संस्कृति इत्यादि शब्दांचे सार्वत्रिक ध्वनि काढीत होते त्यांना त्या शब्दांचे अर्थ नीटसे कळत नव्हते. ते आपल्याला इतिहासाची दिव्य दृष्टि आली आहे असें समजत. परंतु त्यांपैकीं कोणाला च इतिहासाचें खरें कार्य काय आहे, त्याचा वास्तविक उपयोग कोणाला होतो, तदितर त्याचा दुरुपयोग होण्याचा संभव किती असतो इत्यादि गोष्टींचें लवमात्र ज्ञान नव्हतें. म्हणून नीट्झशेनें प्रथमतः या सर्व प्रश्नांचा सदर इतिहासावरील लेखांत स्वतंत्रपणें विचार करून नंतर इतिहासाचा खरा उपयोग ज्या कांहीं थोड्या क्रियावंत व कल्पनावंत नरश्रेष्ठांना होण्यासारखा असतो अशांपैकीं एक आपल्या काळचें ताजें शोपेनहौएरचें उदाहरण घेऊन " शोपेन-हौएर, नमुनेदार शिक्षक " या नांवाखालीं हा लेख लिहिला आहे. येथें ' शिक्षक ' शब्दाचा अर्थ एखाद्या सरकारी पाठ-शाळेंतील भाडोत्री ' मास्तर ' किंवा ' प्रोफेसर ' असा नाहीं, तर शुद्धब्राह्मणवृत्तीनें चालणारा स्वतंत्रबाण्याचा महातत्त्वज्ञ राष्ट्रशिक्षक असा आहे. अशा पुरुषांना च केवळ प्राचीन वीरांच्या पराक्रमांपासून खरा आल्हाद प्राप्त होतो इतकें च नाहीं तर पुढें आचरण करण्यास योग्य धडा मिळतो.

नीट्झशेच्या दृष्टीला वंशाची समुन्नति वीर पैदा करण्यामध्यें आहे. असा वीर, त्याच्या मतें, भूत काळाच्या दडपणाखालीं चिरडून न जातां भविष्यकाळचें ओझें शिरावर घेण्यास सर्व-तोपरि समर्थ असतो. नीट्झशेला या काळीं हें वीरत्व एकट्या शोपेनहौएरच्या ठिकाणीं आढळून आलें आणि म्हणून त्यानें

त्याचें मोठ्या आदरानें प्रस्तुत लेखांत स्तवन केलें. येथें शोपेनहौएरचें जें चित्र रंगाविण्यांत आलें आहे तें मुख्यत: खरा तत्वज्ञ कसा असतो हें दर्शविण्याकरितां होय. अशा तत्वज्ञापासून इतर पुराणांतील वांगी पुराणांत ठेवणारे बोलघेवडे धंदेवाईक तत्त्वज्ञ—मग ते देवळांतील व्यासपीठावर विराजमान होऊन शंकराचार्यांच्या मायावादावर रसभरित निरूपण करणारे असोत किंवा युनिव्हर्सिटींतील खुर्चीवर आसनस्थ होऊन कांटच्या 'कॅटेगोरिकल् इंपेरेटिव्ह' वर अगडबंब व्याख्यान झोडणारे असोत—किती विरुद्ध वृत्तीचे असतात याचें नीट्झशेनें या लेखाचे शेवटीं फार सुंदर रीतीनें वर्णन केलें आहे.

नीट्झशेच्या मतें आधुनिक मनुष्य हा कांहीं बाबतींत फार आळशी असतो आणि बाकीच्या सर्व बाबतींत अति भेकड दिसतो. नरजन्माला येऊन आपण आपलें सार्थक केलें पाहिजे असें जरी त्याला पुष्कळ वाटलें तरी तसें करण्याचें त्याला प्राय: धैर्य होत नाहीं. तो शेजाऱ्याला भितो. आपण अमुक रीतीनें वागलों तर तो काय म्हणेल ? म्हणून मनुष्य स्वोद्धाराला निश्चयानें पारखा होतो. कारण "उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत्" या न्यायानें स्वत:चा उद्धार जर आपण स्वत: करून घेतला तर च होतो नाहीं तर होत नाहीं. अशा स्थितींत खरा तत्वज्ञ कोण तर जो "कोणी निंदा अथवा वंदा। आम्हां स्वहिताचा धंदा।" या वृत्तीनें कोणाची भीति न धरतां आणि भीड न बाळगतां विचार, उच्चार आणि आचार या तिहींत एक सूत्रानें चालतो. असा तत्त्वज्ञ शोधून काढण्याच्या च इच्छेनें

केवळ नीट्झ्श ह्मणतो, मी हें आर्थर शोपेनहौएरचें चरित्र लिहिण्यास हातांत घेतलें आहे. अर्थात् या चरित्रांत त्यानें शोपेनहौएरचें वर्णन करण्याऐवजीं आपली महत्त्वाकांक्षा ध्वनित केली आहे, आणि शौपेनहौएरचें तत्त्वज्ञान निवेदन करण्याऐवजीं आपली स्वोद्धाराची दिशा निदर्शित केली आहे. म्हणून हा लेख एकपरी नीट्झशेच्या भावी कार्याची प्रस्तावना च म्हटली पाहिजे.

हल्लींच्या युरोपांतील युनिव्हर्सिट्यांतून, नीट्झ्श म्हणतो, जी शिक्षणपद्धति प्रचारांत आहे ती प्राचीन ग्रीक आणि रोमन शिक्षणपद्धतींहून फार निराळ्या स्वरूपाची आहे. प्राचीन ग्रीक आणि रोमन शिक्षणक्रमांतून जसे एक एक उत्तमोत्तम तत्त्वज्ञ आणि कलाज्ञ निर्माण होत तसे हल्लींच्या युनिव्हर्सिट्यांतून होत नाहींत. हल्लीं जर्मनीमध्यें जर कोणाच्या मनांत आपण वक्तृत्वकला किंवा लेखनकला संपादन करावी असें आलें तर त्याला सोय नाहीं. कारण तसें करण्यास त्याला कोणी शिक्षक मिळणार नाहीं किंवा कोठें शाळा दिसणार नाहीं. बोलणें आणि लिहिणें या दोन अति उच्च दर्जाच्या कला आहेत आणि त्या संपादन करण्यास योग्य मार्गावर फार परिश्रम करावे लागतात या गोष्टीची हल्लीं कोणाला जाणीव हि असल्याचें दिसत नाहीं. म्हणून अगदीं मोठमोठ्यांच्या घरीं सुद्धां खऱ्या कलानिपुण शिक्षकाची आवश्यकता भासत नाहीं. बरें; हा शिक्षकवर्ग ज्या युनव्हार्सिट्यांतून तयार होतो त्यांची स्थिति पहा, म्हणजे मनुष्याला खरा मनुष्यपणा शिकण्यास किती अडचणी आहेत त्या लक्षांत येतील. हल्लींचा प्रोफेसर जितका

एखाद्या शास्त्राचा विचार करतो तितका मनुष्यपणाचा करीत नाहीं. म्हणून त्याचें सर्व शिक्ष संस्कृतिविहीन असतें. सारांश, हल्लीं कोणाला वक्तृत्वाचें किंवा लेखनाचें चांगलें शिक्षण कां मिळत नाहीं तर तसें करण्यास त्याला कोणी योग्य शिक्षक मिळत नाहीं म्हणून; व हल्लींचा प्रोफेसर विपरीत बुद्धीचा, आणि विकृत भावनेचा कां दिसतो, तर त्याचें सर्व शिक्षण अमानवी कल्पनाजालांत —म्हणजे शुद्ध शास्त्रांत—झालेलें असतें म्हणून. अशा स्थितींत, नीट्झ्श म्हणतो, कोणा हि विचारी मनुष्याच्या मनांत असा प्रश्न आल्यावांचून राहणार नाहीं कीं,—" नीतीच्या परिणतीला आणि कीर्तीच्या परिसीमेला पोचलेले मानव-श्रेष्ठांचे उच्च नमुने आजच्या आमच्या संपूर्ण पिढींत—विद्वान् आणि अविद्वान्, लहान आणि मोठ्या— कोठें पहावयास मिळतील, कीं ज्यांचे ठिकाणीं नीतीचें परमोत्कृष्ट सार पूर्णपणें प्रकट झालेलें दिसावें? जगांतील सर्व मोठमोठ्या विकास पावलेल्या समाजांतून सर्व मोठमोठ्या महत्त्वाच्या प्रसंगीं धर्मनीतीवर जे गहन विचार चालत ते आज कोणीकडे लुप्तप्राय झाले?" अशा विचारांना आज कांहीं किंमत नाहीं म्हणून त्यांचे मोक्ते हि कोणी निपजत नाहींत. आम्हीं आमचा आजचा नैतिक व्यवहार केवळ प्राचीनांनीं मिळवून ठेविलेल्या मांडवलावर करीत आहोंत. त्यांत नवीन भर घालण्याचें सामर्थ्य आमचे पाशीं नाहीं. आहे तें उधळून टाकण्याचें मात्र काम आम्हीं करीत आहोंत. हल्लींच्या आमच्या

समाजांत एतद्विषयक गोष्टींचा कोणी नामनिर्देश हि करीत नाहीं, आणि कोणी चुकून माकून केला च तर तो इतका अज्ञानमय आणि अनुभवशून्य असतो कीं त्याबद्दल त्याची कींव करावी कां तिरस्कार दाखवावा हें समजत नाहीं. शेवटीं एका शब्दांत सांगावयाचें म्हणजे आमच्या आजकालच्या पाठशाळा आणि त्यांतील शिक्षकवर्ग हा नैतिक शिक्षणाचा प्रश्न निघाला कीं त्याकडे एकदम पाठ वळवितो किंवा फार तर त्याबद्दल एखादा पुस्तकी पाठ निवेदन करतो. सद्गुण आणि सदाचार हे निवळ शब्द आहेत. इतके जुने कीं त्यांकडे पाहून या नवीन विद्वानांना हंसू येतें.—आणि त्याहून वाईट, जेव्हां ते त्यांकडे पाहून हंसत नाहींत; कारण त्यांत ते ढोंग करतात.

यावरून नीट्झशेला केवळ शब्दज्ञानापेक्षां आचाराचें महत्त्व किती वाटे तें दिसून येतें. तो आचारांत च संपूर्ण शिक्षणाचें सार मानी. त्याच्या मतें नुसतें पुस्तकी शिक्षण हें शिक्षण च नव्हे. म्हणून केवळ शब्दपांडित्य करणारा पुस्तकी गुरु हा खरा गुरु नव्हे. हल्लींचे पाठशाळांतलि सर्व गुरु असे च आहेत. खरा गुरु होण्याची लायकी एका तत्त्वज्ञान्याचे ठायीं असते आणि त्याचें सर्व तत्त्वज्ञान त्याच्या आचरणांत दिसून येतें. म्हणून नीट्झश म्हणतो—

" तत्त्वज्ञानी पुरुषापासून मला जो फायदा दिसतो तो हा कीं तो च मला केवळ एक अनुकरणीय आदर्श होऊं शकतो. मनुष्य आपल्या आचरणानें संपूर्ण राष्ट्रेंचीं राष्ट्रं आपल्यामागें ओढून नेईल यांत

किंचित् हि संशय बाळगण्याचें कारण नाहीं. याला हिंदुस्थानच्या इतिहासांत दाखला आहे. किंबहुना हिंदुस्थानचा इतिहास हा हिंदु तत्त्वज्ञानाचा च इतिहास होय. परंतु हा आदर्श त्याच्या बाहेरच्या जीवनक्रमांत दिसला पाहिजे, केवळ त्याच्या पुस्तकांत सांठविलेला असून उपयोगाचा नाहीं. उदाहरणार्थ, प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञानीं घ्या. त्यांचें तत्त्वज्ञान कांहीं त्यांच्या वाणींत आणि लेखांत च नव्हतें तर त्यांच्या आहाराविहारांत, कपड्यालत्त्यांत, व सर्वसामान्य चालीरीतींत ओतप्रोत भरलेलें होतें. आमच्या हल्लींच्या जर्मन तत्त्वज्ञानांत असा जिवंत आदर्श पाहण्यास मिळत नाहीं.........आणि म्हणून च मी म्हणतों कीं जर्मनींतील तत्त्वज्ञानानें आतां "शुद्ध बुद्धि" चा नाद सोडून शोपेनहोएरच्या चारित्र्याकडे पहावें."

एक अर्वाचीन इंग्रज ग्रंथकार म्हणतो हल्लींच्या लोकशाहीच्या काळीं कोणा हि अद्वितीय बुद्धिमत्तेच्या ज्ञानी पुरुषास राहण्यास कोठें च जागा मिळणार नाहीं. उदाहरणार्थ शेलेला इंग्लंडांत रहातां येणें शक्य नव्हतें. जी स्थिति इंग्लंडांत शेलेची ती च जर्मनींत होल्डरीन् आणि क्लाइस्ट यांची. गटे आणि शोपेनहौएर, बीथोव्हेन आणि वाग्नेर हे अत्यंत खंबीर मनाचे आणि टणक डोक्याचे असल्याकारणानें त्यांचा आपल्या देशांत कसा बसा निभाव लागला. गटेचे आपल्या लेखांतून जागोजाग उल्लेख पाहिले म्हणजे त्याच्या मानसिक कष्टाची कल्पना येते. बोनापार्टानें गटेची भेट घेतल्यानंतर जवळच्या अधिकाऱ्याला म्हटलें "हा पुरुष पहा, याला आपल्या आयुष्यक्रमांत किती कष्ट सोसावे लागत आहेत." अशा गटेला जर्मनींतील सगळे च नरसू मोठा सुखी प्राणी

समजत. जणुं काय त्याला यांच्या घोळक्यांत मिसळून सुखाचा लवमात्र आस्वाद घेणें शक्य होतें! हें च काय पण यापुढें जाऊन हे लोक म्हणतात कीं त्याच्यांत राहून जो आपणांस धन्य मानीत नाहीं तो एक मूर्ख असला पाहिजे. अर्थात् अशा पुरुषाचे ठिकाणीं जी साहजिक एकांतप्रियता वास करिते तिच्यावर ते एक प्रकारचें गूढ पाप चिकटवितात. बिचारा शोपेनहौएर, त्याचें गूढ पाप इतकें च होतें कीं तो भोंवतालच्या सर्व नरसूवजा द्विपादांपेक्षां आपल्या तत्त्वज्ञानाची किंमत अधिक मानी. तो गटेपासून जी गोष्ट शिकला आणि जिच्या योगें त्याच्या मनाला अति उद्विग्नता प्राप्त झाली ती हीं कीं, समकालीनांच्या हेळसांडीपासून आपण आपल्या तत्त्वज्ञानाचें कसें हि करून संरक्षण केलें पाहिजे आणि त्याचें अस्तित्व राखलें पाहिजे. ग्रंथांची हेळसांड करण्यांत, गटे म्हणतो, जर्मन लोकांचा मोठा हातखंडा आहे. ते तत्संबंधीं इतकें ताटस्थ्य स्वीकारतात आणि मौन भजतात कीं त्यापुढें कोणी ग्रंथकार हताश व्हावा. याचा प्रत्यय शोपेनहौएरला त्याच्या अद्वितीय ग्रंथाच्या पहिल्या च आवृत्तीच्या वेळीं येऊन चुकला. कारण ती सर्व आवृत्ति आपल्या वाचकाच्या अभावीं जशीच्या तशी केराच्या पेटींत काढून टाकावी लागली. एका संस्कृत कवीनें म्हटलें आहे—

"बोद्धारो मत्सरग्रस्ताः प्रभवः स्मयदूषिताः।
अबोधोपहताश्चान्ये जीर्णमङ्गे सुभाषितम्॥"

—जे जाणते आहेत ते मत्सरानें ग्रासलेले आहेत, जे धनिक

आहेत ते गर्वानें नासलेले आहेत, आणि बाकीचे सर्व अज्ञानानें व्यापलेले आहेत; अशा स्थितींत जर सुभाषित आपल्या च ठिकाणीं जीर्ण झालें तर त्यांत नवल कसचें!— ही कवीची स्थिति झाली. तत्त्वज्ञान्याची स्थिति याहून भीषण असते. ती शोपेनहौएरच्या चरित्रांत चांगली निदर्शनास येते. आपला अति मोठा ग्रंथ केवळ लोकांनीं त्याकडे दुर्लक्ष केल्यामुळें बुडून जाईल कीं काय या भीतीनें त्याच्या मनाला फार अस्वस्थता आली. कारण देशांतील कोणी महत्त्वाचा मनुष्य तो ग्रंथ हातांत घेईना किंवा उघडून पाहीना. पुष्कळ काळ त्यानें कोणी त्याची पृच्छा करील म्हणून वाट पाहिली आणि शेवटीं जेव्हां त्याला एक वाचक मिळाला तेव्हां तो इतका हर्षनिर्भर झाला कीं तें पाहून, नीट्झ्श म्हणतो, आमच्या सारख्याच्या अन्तःकरणाला पीळ पडल्यावांचून रहात नाहीं. कारण थोर पुरुषाच्या मानसिक कष्टाची ही परमावधि आहे. लोकांना ज्ञानाची आवड असेल, आज नाहीं उद्यां ते त्याबद्दल आस्था दाखवितील या आशेनें त्यानें रोज एखाद्या जिज्ञासु ग्राहकाची अपेक्षा करावी आणि शेवटीं निराश होऊन आपल्या आवडत्या कुत्र्याजवळ येऊन बसावें हा त्याचा दिनक्रम असे. त्याला या 'आत्मा' नामक कुत्र्यावांचून दुसरा मनाचें समाधान करून घेण्यास मानवकोटींतील एक हि स्नेही नव्हता. आणि म्हटलें आहे;— एक आणि शून्य यांत अनंतत्व भरलें आहे, जसें सत् आणि असत् यांमध्यें. ज्याला कोणी एखादा जिव्हाळयाचा स्नेही असतो त्याला सर्व जग विरुद्ध गेलें तरी

साक्षात् एकलकोंडेपणाचा अनुभव येत नाहीं. प्राचीन उपनिषत्कार तत्त्वदर्शी महामुनींना जी सतत चिंता वाटे ती आपणांस अंतेवासी कसा मिळेल व आपली ज्ञानाची परंपरा रक्षण कशी होईल याबद्दल होय. समकालीनांच्या अवहेलनेपासून प्रतिभावान् ग्रंथकाराच्या मनाला केवढी उद्विग्नता प्राप्त होते याचें यथार्थ चित्र महाकवि भवभूति यानें आपल्या 'मालतीमाधव' नाटकाच्या आरंभीं उत्तम रेखाटलेलें आहे तें कोणा हि रसिकाचे हृदयांत खोल प्रवेश केल्यावांचून राहणार नाहीं:-

" ये नाम केचिदिह नः प्रथयंत्यवज्ञां
जानंतु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः।
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा
कालो ह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी ॥ "

—जे कोणी आमची अवज्ञा करून ती लोकांत पसरवितात त्यांनीं खास समजावें कीं हा प्रयत्न त्यांच्या करितां नाहीं; माझ्या सारखे ज्याचे मनोधर्म आहेत असा कोणी तरी पुढें मागें निर्माण होईल च होईल,–कारण काल हा अनंत आहे आणि पृथ्वी विस्तीर्ण आहे !—तत्त्ववेत्त्याजवळ या प्रकारचें मनाचें समाधान करून घेण्यास जर तत्त्वज्ञान नसतें तर जगांत त्याची स्थिति फार कठीण झाली असती. जो अनुभव भवभूतीचा तो च शोपेनहौएरचा, आणि तो च नीट्झ्शेचा. त्यांना मोठी काळजी कीं,–

" नैसर्गिकी सुरभिणः कुसुमस्य सिद्धा
मूर्ध्नि स्थितिर्न चरणैरवताडनानि ॥ "

—ज्या सुवासिक कुसुमाची नैसर्गिक स्थिति मस्तकावर बसण्याची तें पायाखालीं तुडविलें जाणें योग्य नाहीं.—अशा महापुरुषांचा एकलकोंडेपणा किती भीषण असतो याची तुम्हांला जर कल्पना नसेल तर ती मी करून देतों असें म्हणून नीट्झशेनें त्याचें पुढील शब्दांत वर्णन केलें आहे.

" जेव्हां जेव्हां मोठमोठे समाज आपआपलीं राज्ययंत्रें, धर्मसंस्था आणि लोकमत धारण करून असतात, म्हणजे थोडक्यांत सांगावयाचें तर जेव्हां जुलमाचें प्राबल्य झालेलें असतें, तेव्हां तेथें एकांतप्रिय तत्त्वज्ञानी पुरुषाबद्दल निश्चयानें द्वेष माजून राहतो: कारण तत्त्वज्ञान हें मनुष्याला असें स्थान प्राप्त करून देतें कीं तेथें जुलमाचें वारें हि न शिरावें, अगदीं अन्तस्थ पवित्र स्थान, हृदयांतील चक्रव्यूहाचा केंद्र: ज्याकडे पाहून जुलमी लोकांना हताशपणें मनगटें चावण्याची पाळी यावी. या स्थानीं हे एकांतप्रिय पुरुष अगदीं गूढ निवास करतात. तथापि येथें हि त्यांच्या पाठीशीं एक अति मोठें संकट दडून बसलेलें असतें. यद्यपि ह्या पुरुषांनीं अन्तस्थ स्वातंत्र्य मिळविलें असलें तत्रापि त्यांना बाह्य जगांत राहून च व्यवहार करावयाचा असतो. ते आपल्या जन्मानें, वर्णानें, शिक्षणानें आणि देशानें इतर अनेक लोकांशीं अनंत प्रकारच्या नात्यांनीं जखडलेले असतात. त्यांची स्वतःची परिस्थिति आणि इतरांचे स्नेहसंबंध लक्षांत घेतल्यावांचून त्यांना गत्यंतर नसतें. आणि म्हणून त्यांच्या भोंवतीं जीं जीं अनेकशः मतें इतस्ततः वावरत असतात त्या सर्वांत त्यांना कांहींना कांहीं भाग घ्यावा लागतो: जो जो दृष्टिपात निषेध दर्शवीत नाहीं तो तो मान्यतादर्शक मानला जातो, जो जो हस्तक्षेप नाश करीत नाहीं तो तो सहायक समजण्यांत येतो. हे एकांतप्रिय मुक्तात्मे निश्चितार्थानें जाणत असतात कीं जें आपण वास्तविकरीत्या नाहीं तें बाहेर

लोकांत सतत दिसत आहेत. जरी ते स्वतः ऋत आणि सत्य यांवांचून दुसऱ्या कशाची इच्छा करीत नसले तरी ते आपल्याबद्दल लोकांनीं केलेल्या अयथार्थ ग्रहाच्या जाळ्यांत गुरफटून गेलेले असतात; आणि ती त्यांची उत्कट इच्छा त्यांच्या क्रियेभोंवतीं जें खोट्या मतांचें, असत् विधानांचें, अयोग्य कल्पनांचें, विपरीत भावनांचें, अर्धवट समजुतींचें आणि सहेतुक स्तब्धतेचें दाट धुकें जमत असतें त्याला प्रतिरोध करूं शकत नाहीं. आणि त्यांच्या भ्रुकुटीवर विषण्णतेचे मेघ उमटतातः कारण अशा स्वभावाचे महात्मे मरणापेक्षां हि मिथ्याचारित्वाच्या प्रसंगांचा अधिक द्वेष करतातः आणि हे असले सतत कटु प्रसंग त्यांची वृत्ति ज्वालामुखीसारखी भयप्रद बनवितात. ते आपणांस जबरदस्तीनें करावा लागणारा एकांतवास आणि मनःसंयमन यांबद्दल जेव्हां मधून मधून सूड घेण्याकरितां आपल्या गुहेंतून बाहेर पडतात तेव्हां त्यांची मुद्रा उदासीनपणें अति भीषण दिसते आणि त्यांचे शब्द व क्रिया उत्स्फोटक होऊन त्यांत बहुधा त्यांची स्वतःची च आहुति घेतली जाते..............."

नीट्झ्शेनें या स्वरूपाच्या तत्त्वज्ञान्याचें उदाहरण शोपेनहौएरच्या ठिकाणीं दिलें आहे आणि त्याबरोबर हाइन्रिक् फॉन् क्लाइस्ट याचें नांव त्या च सदरांत दाखल केलें आहे. तथापि हें वर्णन त्या दोघांपेक्षां हि नीट्झ्शेला च स्वतःला अधिक लागू होण्यासारखें आहे. त्यानें शोपेनहौएरचे बाबतींत जीं तीन स्वभावसिद्ध संकटें दर्शविलीं आहेत तीं सामान्यतः सर्व च तत्त्वज्ञान्यांच्या बाबतींत जशींच्या तशीं लागू पडतात असें म्हटलें आहे. अर्थात् तीं त्याच्या स्वतःच्या च अनुभवाचीं संकटें आहेत हें उघड आहे. तीं संकटें येणेंप्रमाणें:—

(१) एकांतवासांत राहण्याचा खडतर प्रसंग येणें.

(२) शुद्धबुद्धिवादाच्या चक्रांत अनपेक्षित रीतीनें सांपडणें.

(३) ध्येयत्याग का आत्मत्याग या संशयांत गुरफटून जाणें.

हीं सर्वसामान्य संकटें सोडून दिलीं तर प्रत्येक तत्त्वज्ञानी पुरुषाला देशकालमानाप्रमाणें कांहीं दुसऱ्या विशिष्ट संकटांशीं तोंड देणें भाग पडतें. त्याचें आपल्या काळाशीं जें युद्ध जुंपतें तें वरवर पाहणारास त्याच्या स्वतःशीं च असतें. कारण त्यांत त्याच्या सर्वस्वाचा नाश होत असलेला दिसून येतो. पण खरोखर तो जें युद्ध करतो तें त्या काळांतील त्याच्या मोठेपणाच्या आड येणारीं म्हणजे त्याच्या ऋत-सत्याच्या मार्गांत उपस्थित होणारीं जीं घातक तत्त्वें असतात त्यांच्या विरुद्ध असतें. या दृष्टीनें पाहतां शोपेनहौएरचा मोठेपणा त्याला जो आपल्या काळाशीं दारुण झगडा करावा लागला त्यांत सिद्ध होणार आहे. अर्थात यावरून, नीट्झ्श म्हणतो, आपणांस आपला मोठेपणा राखण्याकरितां आपल्या काळाच्या विरुद्ध कसें वागलें पाहिजे याचा धडा शोपेनहौएरपासून जसा मिळेल तसा दुसऱ्या कोणापासून मिळणार नाहीं हा एक त्याला गुरु करण्यांत मोठा फायदा आहे. कारण त्याच्या लेखांत त्याच्या काळची परिस्थिति जशी उत्तम दृग्गोचर होते तसें त्याच्या आचारांत स्वकालाविरुद्ध कसें झगडावें हें चांगलें प्रत्ययास येतें.

शोपेनहौएर हा नीट्झ्शेच्या अगोदरच्या पिढींत होऊन गेला. त्याच्या मृत्यूच्या वेळीं नीट्झ्श पंधरा वर्षांचा

होता. त्याच्या मरणोत्तर दहा वर्षांनीं जर्मनीचें फ्रान्सशीं युद्ध होऊन जर्मन साम्राज्य स्थापन झालें. या काळांतील आपल्या देशाची स्थिति वर्णन करतांना नीट्झ्श म्हणतो, हल्लींच्या काळीं जर्मनींतील लोकांना स्वत:बद्दल जो कांहीं विलक्षण मोठेपणा वाटत आहे तो जर खरोखर तसा असता तर त्यासारखी आनंदाची व अभिमानाची दुसरी गोष्ट नव्हती. आज जर्मनींत असे कित्येक भोळसर लोक आहेत कीं त्यांना मनापासून वाटतें १८७०–७१ च्या युद्धप्रसंगानंतर जगाला चांगलें वळण मिळालें, आणि जीवनाबद्दल उगीच कडक आणि उदासीन वृत्ति बाळगणारांचें प्रत्यक्ष पुराव्यानें निराकरण झालें. त्यांच्या मतें नवीन जर्मन साम्राज्याच्या स्थापनेबरोबर शोपेनहौएरसारख्या तत्त्वज्ञान्याचा शुद्ध " नैराश्यवाद " जो कोणीकडे पार उडून गेला त्याचा पत्ता नाहीं. आमच्या आजच्या काळांतील राष्ट्रशिक्षक या नात्यानें शोपेनहौएरचा गुण ओळखण्यास, नीट्झ्श म्हणतो, हीं व ह्यासारखीं सर्वत्र प्रसार पावलेलीं आणि विशेषत: आमच्या युनिव्हार्सिट्यांतून प्रचलित असलेलीं मतें खोडून टाकणें अत्यावश्यक आहे. विद्वान, विचारी आणि सन्मान्य म्हणून गणल्या जाणाऱ्या ह्या पंडितंमन्यांच्या टोळक्यांत जेव्हां हा असला स्वकीय काळाच्या पुढील किळसवाणा तोंडपुजेपणा नजरेस येतो तेव्हां त्या सारखी दुसरी लज्जास्पद गोष्ट नाहीं हें आपणांस कबूल करणें भाग आहे. खरें तत्त्वज्ञान हें आपल्या नैसर्गिक गांभीर्याच्या योगें शुद्ध वर्तमानपत्री

लिखाणापासून किती दूर असतें याकडे आपण जें सहज दुर्लक्ष करतों त्याचा हा मोठा पुरावा आहे. असल्या लोकांच्या ठिकाणीं तत्त्वज्ञानाबद्दल च काय पण धर्माबद्दल हि सर्व उच्च भावना नष्ट झाल्या असून त्या जागीं आशावादित्वापेक्षां वृत्तपत्रकाराची वृत्ति येऊन बसली आहे, आणि त्या अनिष्ट वृत्तीनें जसा दैनिक वृत्तपत्रांवर ताबा मिळविला आहे तसा च त्यांच्या संपूर्ण दिनचर्येवर हि पगडा बसविला आहे. —**जें तत्त्वज्ञान एखाद्या राजकीय घडामोडीच्या प्रसंगाच्या द्वारें मानवी जीवनाचा बिकट प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करितें किंवा सुटला आहे असें मानितें तें मिथ्या तत्त्वज्ञान होय.** जगाच्या उत्पत्तीपासून आतापर्यंत असंख्य राज्यें उदयास आलीं आणि अस्तास गेलीं; ही जुनीच कथा आहे. मग एखादी राजकीय घडामोड पृथ्वीच्या पाठीवर राहणाऱ्या सर्व च मनुष्यांची एक कायमची सुखी आणि समाधानी जात बनवूं शकेल असें कसें म्हणावें? जर कोणी एखादा मायेचा पूत हें शक्य आहे असें अगदीं अन्तःकरणापासून मानीत असेल तर त्यानें ताबडतोब सरकारी अधिकाऱ्याकडे वर्दी द्यावी. तो जर्मन-युनिव्हर्सिटींत तत्त्वज्ञानाचा प्रोफेसर होण्यास निःसंशय लायक ठरेल,—जसा बर्लिन येथें हार्म्स, बॉन्न येथें युर्जेन मेयर, व म्यूनिक येथें कारिएर. याला आमच्या पुण्यांतील प्रोफेसरांचीं समान उदाहरणें द्यावयाचीं तर भानु किंवा भाटे, जोग किंवा साठे हीं व एतत्सदृश दुसरीं अनेक देतां येतील.

या देशांत इंग्रजी राज्य स्थापन झाल्यापासून येथें युरोपांतील ख्रिस्ती नमुन्याच्या शिक्षणसंस्था निघाल्या आणि त्यांतून युरोपांतील नमुन्याचा च नवीन शिक्षित वर्ग निर्माण झाला. ही युरोपी शिक्षणपद्धति प्राचीन ग्रीक व रोमन शिक्षण पद्धतीपेक्षां स्वरूपानें फार भिन्न आहे असें नीट्झ्शेचें मत आहे. अर्थात् ती आमच्या प्राचीन आर्य शिक्षणपद्धतीपेक्षां सर्वतोपरि निराळी दिसली तर त्यांत कांहीं नवल नाहीं. मूळ युरोपांत हें शिक्षणकार्य ख्रिस्ती चर्चच्या हातांत होतें. पण पुढें धर्मसुधारणेच्या काळानंतर तें हळूहळू राजसत्तेखालीं नियंत्रित झालें. म्हणून त्यांत प्रथम जशा चर्चच्या सत्तेला धरून मर्यादा घालण्यांत आल्या तशा आतां राजसत्तेला धरून त्या निश्चित झाल्या आहेत. तथापि युरोपी राज्ययंत्रें कोणत्याना कोणत्या रूपांत ख्रिस्तीधर्मानुयायी असल्याकारणानें तेथील शिक्षणपद्धतींत अद्यापपावेतों ख्रिस्ती कल्पनांचा रंग कायम रहावा यांत नवल नाहीं. युरोपी ख्रिस्तीधर्म आणि आर्य वैदिकधर्म यांत जमीनअस्मानाचें अंतर आहे. एक चांडाळमूल्यें धारण करणारा तर दुसरा ब्राह्मणमूल्यें प्रतिपाळणारा. म्हणून एकांत शुचित्वाची परमावधि झालेली दिसते तर दुसऱ्यांत अशुचित्वानें राहणें हें देवाची कृपा संपादण्याचें उत्तम साधन समजलें जातें. वैदिक धर्मांत मानवानें देव व्हावें ही कल्पना आहे. देव ही तेजस्वितेची मूर्ति आहे. आणि तेजस्विता ही शुचिभावांत सिद्ध होणारी आहे. उलट ख्रिस्तीधर्मांत मानवानें देवापुढें सदा दास

भावांत राहण्याची कल्पना आहे म्हणून ख्रिस्तीधर्मांत शुचित्वाला मान नाहीं. तेथें अमंगळ स्थितींत दीनवृत्ति धारण केल्यानें च देवाच्या राज्यांत सुलभ प्रवेश करून घेतां येतो पुनः देवाच्या राज्यांत मानवाच्या पापाबद्दल रदबदली करणारा देवपुत्र हा इहलोकीं क्रूसावर मरण पावला असल्यामुळें ख्रिस्तीधर्म हा कृष्णवस्त्रें परिधान करून आणि त्यावर क्रूसाचें भयानक चिन्ह लटकावून सदा सुतकी स्थितींत राहणारा आहे. ख्रिस्तीधर्मापूर्वींच्या यहुदी धर्माचा पवित्र रंग जांभळा होता. मुसलमानी धर्माचा रंग हिरवा आहे. कारण तो महमदाला फार प्रिय होता. त्याला ख्रिस्त्यांच्या काळ्या कफन्यांचा अति तिरस्कार वाटे. पार्शीधर्माचा रंग तांबडा आहे. कारण पार्श्यांचा झरथुष्ट्री धर्म हा शुद्ध आर्यधर्म असल्याकारणानें त्याला साहजिक च सूर्याच्या अस्तोदयांचे रंग पूज्य आहेत. बौद्ध भिक्षूंचा रंग पिवळा, तर वैदिक संन्याश्यांचा काषाय, व समर्थ संप्रदायाचा हुरमुजी,—असे हे जगांत निरनिराळ्या धर्मपंथांना धरून निरनिराळे रंग पवित्र म्हणून गणले जात आहेत अर्थात् ख्रिस्तीधर्माचा जो कुट्ट काळा रंग आहे तो त्या धर्मावर ख्रिस्ताच्या मरणापासून पसरलेल्या सुतकी औदासिन्याचें यथार्थ लक्षण आहे. असा हा अशुभ रंग ख्रिस्ती लोक आपल्या भोजनप्रसंगीं शुभ मानतात. कारण ‘ प्रभुभोजन ’ हा त्या धर्मांत मोठा महत्त्वाचा विधि आहे. या भोजनांत ते प्रभु येशूचें पवित्र मांस खातात आणि रक्त पितात. त्या च प्रमाणें हा रंग त्यांच्या युनि-

व्हर्सिटयांतून महत्त्वाचा गणला आहे. इतका कीं त्यांतील कोणता हि समारंभ या रंगाचे झगे चढविल्या वांचून होऊं शकत नाहीं. याच्या उलट वैदिक धर्मांतील ब्राह्मण 'स्नातक' हा अध्ययन पूर्ण झाल्यानंतर स्नान करून आणि परिपूत होऊन धुतलेलीं शुभ्र वस्त्रें परिधान केलेला पाहिला म्हणजे ' सत्त्व ' विरुद्ध ' तम ' या द्वंद्वाची चांगली प्रचीति येते आणि या दोन टोंकांच्या मधील रजोगुणाच्या पट्टयावरील निरनिराळ्या तांबड्या, पिंवळ्या, हिरव्या व निळ्या रंगांत चालणाऱ्या जगांतील इतर नानाविध धर्मपंथांतील बरेवाईटपणा ओळखण्यास मदत होते.

या प्रकारें आमच्या वैदिक राष्ट्रांतील शिक्षणक्रमांत प्राचीन आर्यपद्धतीचा सत्त्वगुणप्रधान मार्ग बंद होऊन अर्वाचीन खिस्ती पद्धतीचा जो तमोगुणप्रधान मार्ग शिरला आहे, म्हणजे तेज जाऊन अंधकार आला आहे किंवा शुचिता जाऊन मलीनता पसरली आहे, तो पाहिला म्हणजे चालू शिक्षणाची किंमत समजते आणि हें शिक्षण मुख्यतः ब्राह्मणाला शूद्र करणारें किंवा देवाला सैतान बनविणारें कसें आहे तें ध्यानांत येतें. प्राचीन आर्य शिक्षणपद्धति चातुर्वर्ण्यांतील एका ब्राह्मणवर्णाच्या हातांत होती आणि तो वर्ण कोणा सरकारच्या नियंत्रणाखालीं नसून स्वतंत्रपणें आपलें अध्ययनाध्यापनाचें कार्य करीत होता. ही पद्धति मुसलमानी अमलांत जशीच्या तशीं कायम राहिली. कारण मुसलमानी सरकारानें हल्लींच्या खिस्तीसरकाराप्रमाणें शिक्षण आपल्या

ताब्यांत घेतलें नव्हतें. म्हणून येथें विद्या व शास्त्रें शिक-विणारीं एकेक स्वतंत्र ब्राह्मणकुलें सर्वत्र पसरलेलीं असून त्यांत विद्यादानाचें काम एकेका आचार्याकडे परंपरेनें अव्याहत चालत असे. असा च प्रकार थोड्याबहुत फरकानें प्राचीन ग्रीक 'अ‍ॅकॅडमीज' संबंधीं दिसून येतो. ह्या अ‍ॅकॅडमीज एकेका प्लेटो किंवा आरिस्टॉटल यांच्या तंत्रानें चालत. त्यांना पाहिजे तर राजे देणग्या वगैरे देऊन मदत करीत पण त्यांत ढवळाढवळ करण्याचा त्यांना अधिकार नसे. याप्रकारें सदर अ‍ॅकॅडमीज म्हणजे स्वतंत्र गुरुकुलें च होतीं. त्यांतील सर्व शिक्षणक्रम कुलगुरूंच्या मतानें आंखण्यांत येई. त्यांत सरकारचा कांहीं संबंध नसे. परंतु आर्वाचीन युरोपी युनिव्हर्सिट्या ह्या सर्वतोपरि सरकारच्या तंत्रानें चालल्या आहेत. अशा स्थितींत मुख्यतः सर्व विद्यांत अति श्रेष्ठ जी अध्यात्मविद्या तिला निश्चयानें धक्का बसतो. कारण या युनिव्हर्सिट्यांतील तत्त्वज्ञानाच्या शिक्षणांत खऱ्या तत्त्वज्ञानाची पायमल्ली होते. सारांश, जें शिक्षण जर्मनीसारख्या स्वतंत्र व स्वावलंबी राष्ट्रांत हि सर्व प्रकारें अनिष्ट व अहितावह ठरतें तें ह्या देशांतील परकीय राजसत्तेच्या खालीं किती अनिष्ट व अहितावह होईल हें निराळें सांगावयास नको च. शिवाय ह्या शिक्षणांत ख्रिस्तीधर्माचा जो अंतर्बाह्य रंग चढलेला आहे तो दरवर्षी काळे झगे परिधान करून पदवी घेण्यास जाणाऱ्या आमच्या युनिव्हर्सिटि-शिक्षितांच्या ध्यानांत जितका लवकर यावयास पाहिजे होता तितका अद्याप आलेला दिसत नाहीं. नीट्झ्शेनें

१८७३ सालीं सदर शोपेनहौएरवरील लेखांत त्या वेळच्या आपल्या देशांतील युनिव्हर्सिटींत प्रचलित असलेले जे दोष ढळढळीत दाखविले आहेत ते आज आमच्या युनिव्हर्सिटीकडे पाहून जसेच्या तसे प्रत्ययास येत आहेत. त्यानंतर गेल्या पन्नास वर्षांत युरोपांतील युनिव्हर्सिट्यांची स्थिति निराळ्या मार्गावर सुधारणेच्या पंथास लागली आहे असं नाहीं तर उलट त्या जुन्या जीर्ण मार्गावर च अधिकाधिक बिघडत चालली आहे. तेव्हां अशा स्थितींत त्या युनिव्हर्सिट्यांचें अंधपणें किंवा हताशपणें अनुकरण करणाऱ्या आमच्या शिक्षणसंस्थांसंबंधीं तर बोलावयास च नको. नीट्झश म्हणतो—

" हल्लीं ज्या एका विशिष्ट सिद्धांताचा घरोघरीं मोठमोठ्यानें शंखनाद चालला आहे त्याचे कटु परिणाम आम्हांस आतां च दिसूं लागले आहेत. हा सिद्धांत म्हणजे राजकीय संस्था हें च एक मनुष्याचें अंतिम ध्येय आहे, अशा संस्थेची सेवा करण्यापलीकडे मनुष्याला अधिक उच्च कर्तव्य नाहीं: मला तर असें वाटते कीं या विचारानें आपण केवळ रानटी अवस्थेंत मागें जात आहोंत इतकें च नाहीं तर मूर्खपणाच्या गर्तेत बुडत आहोंत. ज्या मनुष्याला राजसेवा ही च एक इतिकर्तव्यता वाटते त्याला तीहून अधिक उच्च अंतिमाचें ज्ञान नसतें असें च म्हणावें लागतें; तथापि इतकें खरें कीं तिच्या पलीकडील प्रदेशांत व्यक्ति आहेत आणि कर्तव्यें हि आहेत,—आणि त्या कर्तव्यांपैकीं मला जें राजसेवेपेक्षां अधिक उच्च प्रतीचें कर्तव्य वाटतें तें हें कीं सर्व बाजूंनीं मूर्खपणाचा ध्वंस करणें—आणि त्यांत हि विशेषतः वरील प्रकारचा मूर्खपणा. माझी दृष्टि अशा पुरुषश्रेष्ठांकडे आहे कीं ज्यांच्या ध्येयाच्या कल्पना केवळ राजकीय सुस्थितीला

चिकटून राहिल्या नाहींत तर त्या पलीकडे फार लांबवर पोंचल्या आहेत, असे पुरुष म्हणजे ज्ञानी तत्त्ववेत्ते—आणि त्यांपैकीं सुद्धां जे केवळ संस्कृतीच्या जगाशीं संबद्ध आहेत असे, आणि पुन्हा ती संस्कृति कशी तर जी " राजकीय सुस्थिती " पासून सर्वथा अलिप्त आहे. मानवी सुधारणेच्या नागमोडी शृंखलेंत जे अनेक दुव्वे आहेत त्यांपैकीं कांहीं शुद्ध सुवर्णाचे आहेत पण बाकीचे सर्व केवळ कथलाचे आहेत म्हणून समजावें.

" आमच्या काळांतील खरा तत्त्वज्ञ संस्कृतीकडे कोणत्या दृष्टीनें पाहतो ! मी खास सांगतों कीं युनिव्हर्सिटींतील जीं हीं प्रोफेसरें आपल्या नूतन परिस्थितीबद्दल इतक्या समाधानवृत्तीचीं बनलीं आहेत त्यांच्याहून अगदीं निराळ्या. तो चालू जीवनाच्या वाढत्या घाईत आणि गर्दीत संस्कृतीचा पूर्ण उच्छेद करणारीं एकेक लक्षणें स्फुट होतांना पहात असल्याचें दिसत आहे. धर्माच्या पाण्याला ओहोटी लागून ठायीं ठायीं दलदलीत खांचरें आणि सांचलेलीं डबकीं मागें राहिलीं आहेत: राष्ट्रांराष्ट्रांत वैरभावानें अधिकाधिक फूट पडत जाऊन तीं एकमेकांच्या नरडीचा घोट घेण्याची संधी पहात आहेत. ज्या भौतिकशास्त्रांचें येवढें स्तोम माजविण्यांत येत आहे तीं शास्त्रें कोणत्या हि एका सर्वसामान्य ध्येयाच्या अभावीं स्वातंत्र्याच्या मार्गावर अंधपणानें सैरावैरा धावत आहेत, आणि प्रत्येक स्थिर तत्वाला पारखीं होऊन आपल्या ठिकाणीं फाटून जात आहेत. सुशिक्षित म्हटले जाणारे वर्ग द्रव्यार्जनाच्या तिरस्करणीय प्रवाहांत अहमहमिकेनें कोणीकडच्या कोणीकडे वाहून गेले आहेत. जग हें या पूर्वीं कधीं च इतकें ऐहिक झालें नव्हतें, आणि सद्भाव व प्रेम यांपासून कधीं च इतकें दुरावून गेलें नव्हतें. अशा या ऐहिक धक्काबुक्कीच्या काळांत विद्यावंतांची कोणी पर्वा करीत नाहीं आणि त्यांना कोठें मान हि मिळत नाहीं; ते स्वतः च दिवसेंदिवस अधिकाधिक अस्थिर वृत्तीचे, विवेकहीन आणि

प्रेमशून्य होत चालले आहेत. पुढें येणाऱ्या निश्चित रानटी अवस्थेपुढें प्रत्येक वस्तुजात नमून वागूं लागली आहे, आणि त्यांत कला व शास्त्रें यांचा हि समावेश होत चालला आहे. सुशिक्षित लोक इतके खाला-वले आहेत कीं ते च खरे शिक्षणाचे शत्रु बनले आहेत, कारण ते ह्या विश्वव्यापी रोगाकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करीत आहेत इतकें च नाहीं तर त्याची चिकित्सा करणाऱ्या भेषजाच्या मार्गांत अडथळा आणीत आहेत. जर कोणी त्यांच्या दुर्बलतच्या विरुद्ध ब्र काढला किंवा त्यांच्या ठायीं दिसणाऱ्या निर्लज्जपणाच्या अनृतवादित्वाबद्दल टीका केली तर हे मज्जातंतुविहीन क्षुद्र प्राणी अति चिडीला जातात. ते असें भास-विण्याचा प्रयत्न करतात कीं आपण मागील काळाच्या पुढें फार मजल मारली आहे, आणि ते अशा ताठ्यानें चालतात कीं आपण कृतकृत्य आहोंत. पण ही त्यांची कृतकृत्यतेची कृत्रिम भावना बुद्धीला गम्य होत नसल्यामुळें कारुण्यास्पद ठरते............"

नीट्झशेनें ही स्वकालीन जर्मनींतील सुशिक्षितांची जी स्थिति वर्णन केली आहे ती आज आमच्या देशांतील युनि-व्हर्सिटी-शिक्षितांना बरोबर लागू पडते. अशा सुशिक्षितांच्या किंवा वास्तविक रीत्या कुशिक्षितांच्या ठिकाणीं आपल्या पूर्व संस्कृतीचा नाश होत असलेला दिसला तर त्यांत नवल नाहीं. युरोपांत जे जे प्रयोग होऊन गेले ते ते येथें हि जसेच्या तसे होऊं लागले आहेत. नीट्झश म्हणतो, आम्हीं हल्लीं परमाणु-युगांत किंवा अधिक सयुक्तिक म्हणजे परमाणुयुगांतील अव्य-वस्थेच्या स्थितींत रहात आहोंत. पूर्वीं ख्रिस्तीधर्माच्या मध्य-युगीन काळीं ख्रिस्ती चर्चनें सर्व परस्परविरोधी शक्ति आपल्या हातांत ठेवल्या होत्या किंवा त्यांवर आपल्या सत्तेचा दाब

बसविला होता. हा दाब जेव्हां कमी झाला तेव्हां त्या एकदम वर उसळी मारून आल्या आणि एकमेकींच्या व चर्चच्या विरुद्ध उठल्या. पुढें प्रॉटेस्टंट धर्मसुधारणेनें असें तत्त्व प्रतिपादन केलें कीं मनुष्याच्या आयुष्यांतील पुष्कळ बाबी 'आद्यजीवाणू' प्रमाणें आपल्या ठायीं पूर्ण स्वतंत्र आहेत, त्यांना धर्माच्या मार्गदर्शिकत्वाची बिलकूल जरूर नाहीं: स्वत:चें अस्तित्व राखण्याकरितां ह्या सुधारणेला इतकी किंमत द्यावी लागली. ख्रिस्ती चर्चनें आपल्या पूर्वींच्या अति प्राचीन धर्मांच्या बाबतींत ही च युक्ति अवलंबून त्यांत कलहाचें बीज पेरलें होतें, आणि त्यावर आपलें अस्तित्व राखलें होतें. आतां सर्व च गोष्टी राजकीय सत्तेच्या हातांत येऊं पहात आहेत. अशा काळीं, नीट्झ्श म्हणतो, सर्व बाबी मूर्खांच्या आणि लुच्चांच्या, धनलोभी स्वार्थसाधूंच्या आणि पशुतुल्य लष्करी टोणप्यांच्या तंत्रानें चाललेल्या दिसत आहेत. सर्व गोष्टींना सुव्यवस्था लावण्याचें आणि जन्मजात शत्रूंना एका लगामांत आणण्याचें काम आज राजसत्तेनें उचललें आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे ही राजसत्ता पूर्वीं लोक जसे धर्मापुढें नमत तसे आतां आपल्यापुढें नमावेत अशी इच्छा धारण करून आहे.

साक्षात् क्रांतींच्या व अव्यवस्थेच्या काळापेक्षां तत्पूर्वींच्या संक्रमणकाळांत मनुष्याची स्थिति फार बिकट असते, त्याला तिष्ठत राहण्याचें फार संकट वाटतें आणि तो प्रत्येक क्षण आशाळभूतपणानें कंवटाळण्यास पाहतो; त्यायोगें त्याच्या ठिकाणीं सर्व प्रकारच्या नीच वृत्ति उमटतात, म्हणजे तो

पराकाष्ठेचा भेकड, लोभी आणि विश्वासघातकी बनतो. अशा स्थितींत त्याला खरा मार्गदर्शक कोण होईल आणि अनुकरण करण्यासारखा गुरु कोण भेटेल हा प्रश्न पुढें उभा राहतो. नीट्झश म्हणतो आमच्या हल्लींच्या काळांत रूसो, गटे आणि शोपेनहौएर हे तीन महापुरुष उदय पावले. ते निरनिराळ्या प्रकारचे तीन मानवनमुने होत. त्यांपैकीं पहिला शुद्ध भावनाप्रधान, दुसरा ज्ञानप्रधान आणि तिसरा तपःप्रधान आहे. पहिल्याचे ठायीं जी जळजळीत भावना असते ती सामान्य जनतेवर मोठा परिणाम घडवून आणते आणि त्याचें पर्यवसान राज्यक्रांतींत होतें. दुसऱ्याचे ठायीं जें विचारप्राबल्य असतें त्याची सामान्य जनतेला वार्ता हि नसते पण तें कांहीं थोड्यांना फार उपकारक होतें. पहिल्याची अवनति 'कॅटिलाइन' मध्यें म्हणजे धिंग्राशाहींत म्हटली तर दुसऱ्याची 'फिलिस्टाइन' मध्यें म्हणजे नरसूशाहींत होते. शोपेनहौएरचा नमुना निराळें चित्र दर्शवितो. येथें खडतर तपश्चर्या आहे. अर्थात् येथें तेज व बल आहे. हा नमुना खरा शोपेनहौएरपेक्षां स्वतः नीट्झशेचा च आहे. हा तत्त्वदर्शी पुरुषाचा नमुना. याचें सर्व कर्म ज्ञानयुक्त व ज्ञान क्रियायुक्त असतें. त्याचा उलगडा सर्वसामान्य जीवनाच्या नियमांहून निराळ्या उच्च जीवनाच्या नियमांनीं होतो. तेथें खोल आस्तिक्यभाव वास करतोः मग तेथें जरी सर्व कर्में सामान्य लोकजीवनाच्या कर्मांहून अगदीं उलट दिसलीं तरी हरकत नाहीं. म्हणून तेथें कष्ट, सतत कष्ट दृष्टोत्पत्तीस येतात. परंतु

तेथें च माइस्टर एखार्ड म्हणतो त्या प्रमाणें "मनुष्याला पूर्णतेला नेणारें सर्वांत जलद वाहन कोणतें तर स्वेच्छेनें कष्ट सोसण्यास तयार होणें"—म्हणजे तप आचरणें, हें तत्त्व अंगीं बाणलेलें असतें.

" जो जो मनुष्य, " नीट्झ्श म्हणतो, " हें ध्येय आपल्या डोळ्यापुढें ठेवतो त्याचा आत्मा अधिकाधिक उच्च होऊं लागतो; आणि त्याला शोपेनहौएरच्या वळणावर जाण्याची उत्कट इच्छा होते;— शुद्ध आणि कल्पनातीत धीराचा, बौद्धिक बाजूनें सर्वभक्षक अग्नीसारखा, आणि शास्त्रज्ञ म्हणून गणल्या जाणाऱ्या मनुष्याच्या थंडगार व तिरस्करणीय " ताटस्थ्य " वृत्तीपासून फार दूर राहणारा; विषण्ण आणि उदासीन दृष्टि सोडून इतका उंच गेलेला कीं आपण जें कांहीं सत्य संपादिलें त्या करितां प्रथम प्राण अर्पण करण्यास तयार होणारा, अर्थात् आपल्या कळकळीमध्यें समुत्पन्न होणाऱ्या दारुण कष्टाची खोल जाणीव बाळगणारा. त्याचें मनोधैर्य त्याच्या ऐहिक सुखाच्या आड येईल, त्याचें ज्या व्यक्तींवर प्रेम असेल त्याशीं तो शत्रुत्व पैदा करील, आणि त्याचा ज्या संस्थांशीं संबंध असेल त्यांपासून तो फटकून बाजूला सरेल; तो कोणा व्यक्तीची किंवा वस्तूची पर्वा करणार नाहीं मग त्यांपासून त्याला किती हि अपाय होवो; तो काय आहे हें कोणाला च समजावयाचें नाहीं, किंबहुना तो ज्या वस्तूंचा द्वेष करीत असेल त्यांच्याशीं च त्याचा संबंध जोडण्यांत येईल, आणि ऋताच्या अन्वेषणांत त्याच्या पदरीं अनृताचें माप पडेलः पण त्यानें आपलें समाधान आपला गुरु जो शोपेनहौएर त्याच्या पुढील शब्दांत करून घेतलें पाहिजेः " सुखाचें जीवित अशक्य आहे, मनुष्यानें जी अति मोठी आकांक्षा धरावयाची ती वीर्याच्या जीविताची; जसा एखादा मनुष्य इतरांच्या कल्याणाकरितां आपल्यापेक्षां अति मोठ्या प्रतिस्पर्ध्याशीं

सतत झगडा करून विजय मिळवितो पण त्याबद्दल कोणी च त्याचा उपकार मानीत नाहीं. लढाई संपल्यावर केवळ त्याच्या डोळ्यांत तेज आणि वीर्य चमकतें आणि बाकी तो दगडासारखा थंड होतो. तो मेल्यावर त्याचें नांव पुढें येतें व त्याला वीराचा मान मिळतो. पण जिवंतपणीं सर्व आयुष्यभर जी त्याची इच्छा युद्धांतील कष्टानें जर्जर झालेली असते व अनुपकार आणि कृतघ्नपणा यांच्या योगें भग्न होऊन गेलेली दिसते ती शेवटीं निर्वाणांत स्तब्ध होते." या प्रकारचें वीर्यशाली जीवन, त्यांतील सर्व मानभंगाच्या प्रसंगांसह —जे लोक त्याचीं स्तुतिस्तोत्रें गातात, त्याचे पुतळे उभारतात, स्मारकें बांधतात आणि उत्सव करतात त्यांच्या क्षुद्र कल्पनांशीं फार च थोडें जुळतें. जितक्या प्रमाणांत हे लघु असतात तितक्या प्रमाणांत तो मोठा होतो मग त्याला मोठेपणास चढविणारें त्याचें सर्व कार्य केवळ त्याच्या आत्मसुखार्थ स्वतःच्या सर्व शक्ति खर्च होऊन झालेलें असो ............"

नीट्झशेनें ऋत आणि सत्य यांच्या मार्गात असलेल्या महापुरुषाचीं जीं तीन रूपें दर्शविलीं आहेत तीं (१) तत्त्वज्ञ, (२) कलाज्ञ, आणि (३) साधु, हीं होत. या तिहींचा एका शब्दात निर्देश करावयाचा तर भगवद्गीतेच्या मार्षेत 'योगी' या शब्दांत करतां येईल. भगवंत अर्जुनाला योग्याचें महत्त्व एकेकट्या तपस्वी, ज्ञानी व कर्मी यांपेक्षां अधिक आहे असें सांगून "तस्माद्योगी भवार्जुन" अशी अनुज्ञा करतात. अर्थात् योगी हा तपस्वी, ज्ञानी व कर्मी या तिहींचा समुच्चय आहे हें उघड आहे. त्याच्या योगांत 'कर्मसु कौशल' म्हणजे कलानिपुणता आहे. येथें च मन, वाक्, काया एकत्र होतात आणि विचार, उच्चार, आचार यांचे ठायीं एकात्मता

दिसून येते. नीट्झ्शेनें प्रथम असा योगी शोपेनहौएरचे ठिकाणीं पाहिला आणि नंतर कालांतरानें त्याला त्यांत कमीपणा दिसूं लागल्याबरोबर त्याचा परित्याग करून त्यानें आपली दृष्टि प्राचीन आर्य झरथुष्ट्राकडे वळविली आणि तेथें च ती कायमची स्थिर केली. हा झरथुष्ट्र कसा तर गाथा ' अहुनवइति ' मध्यें म्हटल्याप्रमाणें " यानिम् मनो, यानिम् वचो, यानिम् श्यौथ्नेम् अशौनो झरथुष्ट्रहे "—जो शुद्ध मनानें, शुद्ध वचनानें, आणि शुद्ध कर्मानें परिपूत झालेला. असा योगी निर्माण करण्यांत, नीट्झ्श म्हणतो, निसर्गाला आपलें कार्य सफल झालें म्हणून धन्यता वाटते आणि त्या भरांत कृतकृत्य होत्साता जणुं तो आनंदानें उंच उडी मारतो. हा योगी केव्हां हि कर्मत्याग करणारा नसतो तर सर्वथा कर्माचा पुरस्कार करणारा असतो. तथापि त्याचें ध्येय सामान्य मनुष्याच्या ध्येयाहून स्वरूपतः च भिन्न असल्यामुळें त्याचा कर्माचरणाचा मार्ग हि सामान्य मनुष्याच्या मार्गाहून भिन्न असतो. त्यांत जी मुख्य मूलभूत कल्पना असते ती **संस्कृतीची** होय. ज्या अर्थी निसर्गाला खरी पूर्णता तत्त्वज्ञ, कलाज्ञ आणि साधु निर्माण करण्यांत येते त्या अर्थीं संस्कृतीच्या दृष्टींपुढें एक च गोष्ट असते, ती ही कीं, आपल्यांपैकीं प्रत्येक जणांतून तत्त्वज्ञ, कवि आणि साधु जितका बाहेर प्रकट करून दाखवितां येईल तितका दाखवावयाचा. निसर्गाला आपलें आध्यात्मिक ध्येय गांठण्यास जितका तत्त्वज्ञ कारणीभूत असतो तितका च कलाज्ञ म्हणजे कवि हि कारणीभूत होतो. म्हणून च गटेनें

एके ठिकाणीं म्हटलें आहे.—“ मी पुष्कळदां सांगितलें आहे आणि सदा तें च सांगेन कीं, निसर्गाच्या आणि मानवाच्या कर्माचें पर्यवसान केवळ एका ललितकाव्यांत आहे, बाकी सर्व फोल आहे ”

पुनः तत्त्वज्ञ आणि कवि यांप्रमाणें निसर्गाला साधूची हि आवश्यकता आहे. कारण साधु म्हटला कीं तेथें निश्चयानें अहंभाव कमी होऊन सर्वांभूतीं आत्मत्वाची भावना उमटलेली असावयाची: निसर्गांतील “ होत राहण्या ” (Becoming) च्या नाटकाला जो शेवटचा अद्भुत रूपांतराचा प्रवेश कदापि गांठता येत नाहीं, पण ज्या प्रवेशांत मानवोन्नतीची पूर्णता असल्यामुळें त्यांत निसर्गाच्या अंतिम मोक्षाची सिद्धी होते आणि म्हणून तो गांठण्याकरितां सदर नाटकाची सारखी धडपड चाललेली असते, तो साधूच्या नेत्रांना जसा चटकन् दिसतो तसा दुसऱ्या कोणाला दिसत नाहीं. अर्थात् आपणांस तत्त्वज्ञ आणि कवि यांच्या प्रमाणें साधूच्या हि निकट सहवासाची निःसंशय जरूर आहे: कांहीं क्षण असे येतात कीं त्या वेळीं प्रेमाच्या शुद्ध अग्नींतून निघालेल्या ज्वालेच्या प्रकाशांत आपण ‘ अहं ’ हा शब्द पार विसरून जातो; आपल्या पलीकडील सृष्टींत असें कांहीं तरी असतें कीं तें या वेळीं आपल्या डोळ्यांना भासमान होतें: आणि म्हणून च आपण आपल्या अन्तःकरणांत ह्या उभय अन्तर्बाह्य सृष्टींना मध्यें जोडणारा एखादा पूल असावा अशी चिंता करतो. आपल्या नित्याच्या सामान्य स्थितींत आपणांला मोक्षप्राप्तीचें कसलें च

साधन निर्माण करतां येत नाहीं. म्हणून आपण आपला स्वतः-च्या द्वेष करूं लागतो. आणि तें च पुढें नैराश्यवादाला कारण होतें. शोपेनहौएरनें आपल्या काळाला जो नैराश्यवाद शिक-विला तो या च स्वरूपाचा होता. हा नैराश्यवाद फार जुना, संस्कृतीच्या आकांक्षे इतका जुना आहे. अर्थात् तो तिचें फल नाहीं तर मूळ आहे, शिखर नाहीं तर पाया आहे. अंतिम नाहीं तर आरंभ आहे: कारण कित्येक वेळां आपणांस आपल्या क्षुद्र व्यक्तित्वाच्या पलीकडील कांहीं अधिक व्यापक गोष्टींबद्दल द्वेष करण्यास शिकावें लागतें---केव्हां? तर जेव्हां आपणांस तत्काल प्रिय वाटणाऱ्या वस्तूंपासून दुसऱ्या कांहीं निराळ्या वस्तूंवर प्रेम करण्यास शिकावयाचें असतें. या प्रकारें, नीट्झ्शे म्हणतो, जेव्हां आपण या जन्मीं काय किंवा पुढील जन्मीं काय, तत्त्वज्ञ, कलाज्ञ आणि साधु यांच्या उच्च अवस्थेला जाऊन पोंचतों म्हणजे योगी बनतों तेव्हां आपल्या रागद्वेषाला एक नवीन च विषय आपल्या समोर उपस्थित होतो. आपलें कार्य, त्या कार्याचा प्रदेश, आणि त्यांतील राग-द्वेषादि द्वंद्वें हीं सामान्य मनुष्याच्या कार्यक्षेत्राहून फार भिन्न असतात. म्हणून च आपणांस आपल्या ठिकाणीं शोपेनहौएरचा नमुना तयार करण्याकरितां आपल्या मार्गांत आड येणाऱ्या प्रत्येक गोष्टिशीं अविरत युद्धाचें अवलंबन करणें आवश्यक होतें.

पुष्कळ वेळां एखादी गोष्ट समजण्यास जितकी सोपी दिसते तितकी ती उमजण्यास फार कठीण असते; उदाहरणार्थ

पुढील तत्त्व घ्या—" मानवजातीनें जे अखंड परिश्रम करावयाचे ते केवळ व्यक्तिशः महात्मे निर्माण करण्याकरितां होतः हें तिचें एक च एक कार्य आहे, दुसरें कांहीं नाहीं. " जो नियम जगांतील इतर वनस्पतिसृष्टींत व प्राणीसृष्टींत सर्रहा दृष्टोत्पत्तीस येतो तो च येथें मानवसमाजाला व त्याच्या अंतिमाला लागू करण्यास सांगितला आहे. तो हा कीं, ज्याला प्रगति म्हणतात ती केवळ व्यक्तींचीं उच्चोच्च रूपें तयार करण्यांत सिद्ध होते. हीं रूपें अति दुर्मिळ, पण अति चिकाटीचीं, विविधक्रियाशक्तीचीं आणि उत्पादकवृत्तीचीं असतात. परंतु समाजाच्या अंतिमाबद्दल ज्या सामान्यलोकव्यवहारांतील कल्पना आहेत त्या या नियमाला सर्वथा अडथळा आणतात. मानवेतर पशुसृष्टींत व वनस्पतिसृष्टींत आपणांस असें आढळून येतें कीं जेथें एक जाति एका विशिष्ट टोंकावर उच्च अवस्थेला प्राप्त होते तेथें उत्क्रांतीचा हेतु सर्वांना च त्या उच्च पदवीला नेऊन पोंचवावयाचें, किंवा त्यांतून नवीन नमुने बनवावयाचें असा नसतो;—तर कांहीं यदृच्छाजात व्यक्तिरूपें इतस्ततः अनुकुल परिस्थितीच्या आश्रयानें निर्माण करावयाचीं येवढा च असतो. यावरून मनुष्यानें जो धडा घ्यावयाचा तो अशा दैवी विभूति निर्माण होण्याला जी अनुकुल परिस्थिति लागते ती तयार करणें. मनुष्याला आपलें अंतिम जाणण्याची शक्ति असल्यामुळें च केवळ हें शक्य आहे. परंतु येथें जी गोष्ट सदैव त्याच्या मार्गांत आडवी येते ती ही कीं, तो आपलें अंतिम आज्ञानानें वा

मूर्खपणानें ' सर्वभूतमात्रां ' च्या सुखांत, किंवा ' पुष्कळांच्या पुष्कळ ' सुखांत, किंवा ' सर्वहितदर्शक लोकशाही' च्या विस्तारांत पहावयास जातो. कोणी मनुष्य कसल्या हि राजकीय संस्थेकारितां प्राणत्याग करण्यास जितका सहज तयार होतो तितका एखाद्या व्यक्तीकारितां जर तिनें आज्ञापिलें तर होत नाहीं. एका मनुष्यानें केवळ दुसऱ्या एका मनुष्याकरितां जीवधारणा व प्राणत्याग करावा ही कल्पना त्याच्या बुद्धीला कधीं च पटण्यासारखी नसते: " आपलें जीवित कोणा विशिष्ट एका करितां नाहीं, तर प्रत्येका करितां, किंवा फार तर त्यांतील शक्य तितक्या अधिकांकरितां असावें! " रे समंजस न्यायदर्शी गड्या, जणुं काय एखादा महामूल्याचा आणि विशेष महत्वाचा प्रश्न बहुजनमतानें ठरण्यांत च अधिक न्याय्यता आहे अशी का तुझी समजूत आहे? कारण वादाचा मुद्दा तर असा आहे—" तुझें जीवित, तुझें वैयक्तिक जीवित, कोणत्या मार्गानें गेलें असतां अति उच्च मूल्य आणि अति खोल अर्थ राखून ठेवील, आणि त्याचा शक्य तितका थोडा व्यय करील? " ही गोष्ट, तूं आपलें जीवित जेव्हां एखाद्या अति दुर्मिळ आणि मूल्यवान् नरश्रेष्ठाच्या अर्थाकरितां खर्च करण्यास तयार होशील तेव्हां च सिद्ध होईल, उगीच फालतु बहुजनहिताकरितां नव्हे. कारण हे बहुजन एकेकट्या व्यक्तिभावांत पाहिले तर त्यांच्यासारखे गचाळ आणि टाकाऊ जगांत दुसरें कांहीं दिसणार नाहीं. नीट्झश म्हणतो, या प्रकारची विचारसरणी जेव्हां देशांतील प्रत्येक तरुणाच्या हृद-

यांत खोल विंबून जाईल तेव्हां च त्याचा तरणोपाय आहे; एरवीं नाहीं: त्यानें एका बाजूनें आपणा स्वतःस निसर्गाच्या हस्तकौशल्यांतील चुकलेला नमुना समजून दुसऱ्या बाजूनें आपण त्याच्या अति विशाल कल्पनांचा साक्षीभूत पुरावा आहोंत असें मानून घेतलें पाहिजे. " निसर्गाचा हेतु आपल्या ठायीं जरी दैवयोगें सिद्धीस गेला नाहीं तरी तो दुसऱ्या कोठें फलद्रूप होण्यास मी एक साधन होईन " असें म्हणून त्यानें निसर्गाच्या थोर कल्पनेला मान देणें हें त्याचें कर्तव्य आहे.

हे आणि यासारखे विचार मनांत घोळूं लागले कीं, नी ट्झ्श म्हणतो, कोणा हि श्रद्धावान् पुरुषाला संस्कृतीच्या कक्षेंत प्रवेश मिळविण्यास सुलभ जातें. कारण संस्कृति ही प्रत्येक मनुष्याच्या आत्मज्ञानाचा आणि असंतुष्टतेचा परिपाक आहे. तो अशा संस्कृतीकडे पाहून उच्च स्वरानें म्हणेलः " मी माझ्या पेक्षां वर कांहीं तरी उंच पहात आहे, माझ्या पेक्षां अधिक श्रेष्ठ आणि अधिक मानवी: तें प्राप्त करून घेण्यास सर्वांनीं मला मदत करावी, आणि मी हि जे कोणी माझ्यासारखे जाणणारे आणि कष्टणारे असतील त्या सर्वांना मदत करीन,— कीं त्या योगें शेवटीं अशी एक दिव्य विभूति उदयास यावी कीं ज्या विभूतीला आपल्या स्वतःच्या ज्ञानाचें आणि प्रेमाचें, सर्वदर्शित्वाचें आणि क्रियाशक्तीचें पूर्णत्व आणि अनंतत्व यांचा साक्षात्कार झाला आहे, जी संपूर्ण विश्वाशीं तादात्म्य पावली आहे, आणि जी जीवनाचें निरीक्षण करून त्यावर निर्णय देण्यास सर्वसमर्थ आहे. " हा

आत्मप्रत्यय कोणाला देऊं करूं म्हटलें तर तें फार कठीण आहे. कारण श्रद्धा शिकविणें अशक्य आहे. तथापि ' श्रद्धावान् लभते ज्ञानम् ' या न्यायानें श्रद्धेनें च केवळ ज्ञान प्राप्त होतें आणि आत्मप्रत्यय येतो. अशा आत्मप्रत्ययांत मनुष्याला आपली दृष्टि आपल्या स्वतःबद्दल तिरस्कार मानून घेण्याकडे वळवावी असें च केवळ वाटत नाहीं, तर जो उच्च आत्मा तावत्कालपर्यंत गुप्त असतो त्याला शोधून काढून त्याचे ठायीं ती सर्व बळ खर्चून लावावी असें वाटतें. या प्रकारें जो मनुष्य आपली आशा भावी काळांत अवतार धारण करणाऱ्या वीर पुरुषावर स्थिर करतो तो च आपलें " संस्कृतीच्या आंतील प्रथम प्रवेशन " करून घेतो. या प्रवेशनाचीं बाह्य लक्षणें अशीं, स्वतःच्या क्षुद्रत्वाबद्दल लाज वाटूं लागणें किंवा राग येणें; स्वतःच्या कोतेपणाबद्दल द्वेष निपजणें; आपण दुर्लक्ष करून टाकून दिलेल्या राशींतून पुनः डोकें सतत वर करून चालणाऱ्या मानवश्रेष्ठाबद्दल आदरबुद्धि दर्शविणें; उच्च जीवनाविषयीं धडपड करणाऱ्या सर्व वस्तुमात्रांबद्दल सहानुभूति बाळगणें; निसर्गाच्या कार्यांत, जेव्हां तो, नानाप्रकारचे चित्रविचित्र उपाय योजून—मग त्यांत त्याला यश येवो वा न येवो,—वीरवृत्तीचा श्रेष्ठ नमुना निर्माण करण्याकरितां आटोकाट परिश्रम करतो तेव्हां त्याला ऐन वेळीं मदत करणें हें आपलें कर्तव्य आहे अशी थोर जाणीव धरणें: कीं त्या योगें आपण ज्या समानशील आणि समानव्यसन लोकांच्या समवेत संस्कृतिच्या प्रदेशांत वावरतों ते सर्व लोक आपणांस जणुं

एखाद्या अति मौल्यवान् मंदिराच्या उभारणीला लागणाऱ्या दगडालाकडांच्या साधनसामग्रीचे ढीग समजतात आणि उच्च स्वरानें ओरडून सांगतात कीं—" या आणि आम्हांस मदत करा! आम्हांस एका वर एक रचा, कारण आम्हीं पूर्णत्वास जावें अशी आमची इच्छा आहे. "

' संस्कृति' हा आर्य शब्द आहे. त्याला समानार्थी जर्मन शब्द ' कुल्टुर ' आहे. कुल्टुर शब्दाचा मूळ अर्थ पिकाकरितां जमीन नांगरून तयार करणें. अशी नांगरून तयार झालेली जी जमीन ती च संस्कृत जमीन होय. कारण 'संस्कृत' शब्दाचा अर्थ जीवर सम्यक् क्रिया घडली आहे अशी वस्तु किंवा व्यक्ति. जमीनीवर सम्यक् क्रिया म्हणजे नांगराची. अशी नांगरून तयार केलेली संस्कृत जमीन पुढील पीक देण्यास सुपात्र होते. नीट्झ्शेच्या डोळ्यापुढें ' कुल्टुर ' शब्दाचा येवढा मोठा अर्थ आहे. वैदिक चातुर्वर्ण्यांत तर संस्कृती कडे फार लक्ष आहे. ही संस्कृति जशी वस्तूवर तशी च व्यक्तीवर योग्य संस्कार घडले म्हणजे सिद्ध होते. ज्या भाषेवर व्याकरणाचे युक्त संस्कार घडतात ती संस्कृत भाषा. ज्या व्यक्तीवर धर्माचे युक्त संस्कार घडतात ती संस्कृत व्यक्ति. ती च वैदिक व्यक्ति. कारण आर्य-वैदिक-धर्मांत संस्कारांचें जितकें महत्त्व आहे तितकें दुसऱ्या कोणत्या धर्मांत नाहीं. वैदिक चातुर्वर्ण्यांतील उच्च ब्राह्मणवर्णांत जन्मापासून मृत्यूपर्यंत अनेक संस्कार आहेत. इतकें च नाहीं तर जन्मापूर्वीं गर्भावस्थेंत व मृत्यूनंतर प्रेतावस्थेंत हि संस्कार

आहेत. संस्कारानें द्विजत्व येतें म्हणजे दुसरा जन्म प्राप्त होतो. ही शुद्ध आर्य कल्पना आहे. ती जशी वैदिक देव-आर्यांत प्रचलित आहे तशी च अवैस्तिक असुर-आर्यांत हि आहे. पार्श्यांतील 'नौझोत'=नवजात संस्कार हा हिंदूंतील 'द्विजात' संस्कारा सदृश आहे. हें द्विजत्व व्यक्तीला उच्चकर्मानुष्ठान करण्यास सर्वथा योग्य अशी उच्च अवस्था प्राप्त करून देतें. सारांश, वैदिक धर्मांत उच्च वर्णाच्या व्यक्तीला अधिकाधिक उच्चोच्च कर्में करून अधिकाधिक उच्चोच्च पदप्राप्ति करून घेण्याकरितां एका जन्मांत संस्कारानें अनेक जन्म आहेत; उदाहरणार्थ, उपनयनांतील व्रतबंधानें जसा ब्रह्मचर्याश्रमांत बटूला दुसरा जन्म आहे तसा अग्निष्टोमांतील दीक्षाग्रहणानें गृहस्थाश्रमांत आग्निहोत्री यजमानाला तिसरा जन्म आहे.

नीट्झ्शेला प्रथम वैदिक संस्कृतीचा परिचय शोपेनहौएरच्या ग्रंथांपासून झाला. पुढें मनुस्मृतच्यिा अभ्यासानें तो त्याचे ठिकाणी दृढ झाला. वैदिक संस्कृतींत चार वर्ण आणि चार आश्रम अशी व्यवस्था असून शिवाय कर्म-पुनर्जन्माचें तत्त्व आहे. एकावर एक वर्णांची व्यवस्था समष्टीच्या उन्नत्यर्थ व एकावर एक आश्रमांची व्यवस्था व्यष्टीच्या उन्नत्यर्थ आहे. अर्थात् वैदिक संस्कृतींत जसें 'कुल्टुर' चें रूप भासमान होण्यासारखें आहे तसें खिस्तीसंस्कृतींत नाहीं. किंबहुना 'खिस्तीसंस्कृति' हा पदान्तर्गत अर्थविरोध असल्यामुळें 'संस्कृति' हा शब्द च 'खिस्ती' या शब्दाशीं जोडणें अय-

थार्थ होणार आहे. जें कांहीं खिस्ती असेल तें कदापि संस्कृति-सिद्ध असूं शकणार नाहीं, आणि उलट जें कांहीं संस्कृति-सिद्ध असेल तें कदापि खिस्ती होऊं शकणार नाहीं. नीट्झशेला संस्कृतीचें रूप दिसलें म्हणून त्यानें खिस्तीधर्म टाकला, किंवा त्यानें खिस्तीधर्म टाकला तेव्हां त्यास संस्कृतीचें रूप दिसलें. संस्कृतीचा अर्थ त्यानें आपल्या ग्रंथांत जागोजाग विशद करून दाखविला आहे. आणि अशा संस्कृतीवर च त्याच्या सर्व नीतितत्त्वज्ञानाचा भर आहे. तो म्हणतो प्रत्येक मनुष्यानें 'कुल्टुर'चें खरें रहस्य कशांत आहे याची आपल्या मनाशीं खात्री करून घ्यावी--सत्य-पुरुष निर्माण करण्यांत, दुसऱ्या कशांत नाहीं. हा च पुरुषोत्तम होय. त्याचे ठायीं संस्कृतीचें पर्यवसान आहे. यावरून खरी संस्कृति आणि खोटी संस्कृति यांतील भेद कळतो आणि हल्लींच्या शिक्षणमार्गांत जी खोटी संस्कृति किंवा संस्कृतीचा आभास सर्वत्र पसरला आहे त्याचा चांगला प्रत्यय येतो.

नीट्झशेनें ह्या खोट्या कुल्टुरचें किंवा असत्संस्कृतीचे तीन भाग पाडले आहेत. ते पुढील तीन प्रकारच्या स्वार्थांना धरून होत,--(१) वैयक्तिक स्वार्थ, (२) राजकीय स्वार्थ, आणि (३) सामाजिक स्वार्थ. वैयक्तिक स्वार्थ हा शुद्ध द्रव्यावर दृष्टि ठेवणाऱ्या धंदेवाइकाचा स्वार्थ होय. या स्वार्थाला संस्कृतीच्या मदतीची गरज भासते, आणि उलट तो संस्कृतीला मदत करतो. पण त्यांत तो आपल्या हेतुनुरूप तीवर मर्यादा घालूं पाहतो. या लोकांची अनुमानशृंखला येणें

प्रमाणें असते: " आपणाला जितकें ज्ञान आणि शिक्षण मिळणें शक्य आहे तितकें मिळविलें पाहिजे; त्याकरितां त्याची जितकी गरज उत्पन्न करतां येईल तितकी केली पाहिजे; पुनः त्यापासून जितका नफा काढतां येईल तितका काढला पाहिजे; आणि तदुत्तर त्यापासून जितकें ऐश्वर्य मिळवितां येईल तितकें मिळवून त्याचा घेतां येईल तितका उपभोग घेतला पाहिजे." —ही सिद्धांतसारणी मनाला मोठी भूल पाडणारी आहे यांत शंका नाहीं. या सिद्धांताचे पुरस्कर्ते शिक्षणाची व्याख्या करतांना त्या व्याख्येंत, मनुष्याला जी अन्तर्दृष्टि आपल्या स्वतःच्या इच्छा आणि त्यांची सफलता या कामांत पूर्णपणें " आपल्या काळाचें अपत्य " बनविते आणि द्रव्य संपादण्याकरितां लागणाऱ्या सर्व उत्तमोत्तम साधनांचा अवलंब करण्यास आज्ञापिते, तिचा मुख्यत्वानें समावेश करतात. या शिक्षणाचा उद्देश " चालू " माणूस तयार करावयाचा, जसें आपण नाण्यामध्यें " चालू " नाणें म्हणतो; आणि यांच्या मतानें जितकीं " चालू " माणसें अधिक तितकें जनतेचें सुख अधिक. म्हणून हल्लींच्या शिक्षणपद्धतींचा हेतु असा कीं प्रत्येक मनुष्य आपआपल्या शक्तीप्रमाणें जितका " चालू " होण्यास शिकेल तितका शिकवून तयार करावयाचा, आणि त्यानें पैदा केलेल्या विशिष्ट ज्ञानाच्या मांडवलांतून त्याला जितकें भरपूर यश आणि सुख मिळवितां येईल तितकें मिळवून देण्याची संधी द्यावयाची. त्याला (आपल्या उदार शिक्षणांत) आपली स्वतःची जी काय किंमत आहे ती बरोबर कळून

आपल्या जीवनापासून आपण काय पैदा केलें पाहिजे याची स्पष्ट कल्पना आली म्हणजे झालें; आणि त्याला असें खात्री-पूर्वक समजलें पाहिजे कीं " बुद्धि आणि मत्ता " किंवा " ज्ञान आणि पैसा " यांचा एकमेकांशीं निसर्गतः च अगदीं निश्चित संबंध आहे किंबहुना तो तसा असणें ही नैतिक आवश्यकता आहे. जें शिक्षण मनुष्याला एकांतप्रिय करतें, ज्याची दृष्टि द्रव्योपार्जनापासून फार दूर असते, आणि ज्याची प्राप्ति होण्यास कालाचा महान् अवधि लागतो तें सर्व शिक्षण फुकट ठरतें इतकें च नाहीं तर गर्हणीय मानलें जातें; लोक असल्या गंभीर आणि भारदस्त शिक्षणाकडे, ही एक " शिष्ट आत्मप्रौढी " आहे का " अनैतिक आनंदवृत्ति " आहे अशा भावनेनें तुच्छता पूर्वक पाहतात. अर्थात् ह्या सर्वसामान्य नीतीच्या कल्पनेप्रमाणें सच्छिक्षणाच्या उलट जें कांहीं असेल तें खरें ठरलें तर त्यांत नवल कसचें ? मनुष्याला द्रव्यार्जनार्थ लवकर मोकळें करण्यास शिक्षण हि लवकर तडकाफडकीनें संपलें पाहिजे, आणि तें अति थोड्या काळांत इतकें पुष्कळ झालें पाहिजे कीं त्या पासून मनुष्याला मुबलक पैसा मिळवितां आला पाहिजे. शिक्षणाचें मान व्यापारी हिताच्या धोरणानें च ठरलें पाहिजे. थोडक्यांत सांगावयाचें तर, " मनुष्याला ऐहिक सुख मिळविण्याचा जो निश्चित हक्क आहे त्या कारितां च केवळ शिक्षणाची आवश्यकता आहे. "

दुसरा राजकीय स्वार्थ. हा राज्यसंस्थेचा स्वार्थ होय. या स्वार्थाला हि संस्कृतीच्या जास्तींत जास्त प्रसरणाची व विश्व-

व्याप्तिची जरूर असते, आणि ही इच्छा पूर्ण करून घेण्याला त्याचे जवळ मोठमोठे साधनमार्ग सदा सज्ज असतात. शिक्षणाला केवळ प्रवृत्त करण्यांत च नव्हे तर त्याचें नियंत्रण करून त्याचा सर्व भार आपल्या शिरावर घेण्यांत एकदां या स्वार्थाचें नीट बस्तान बसलें म्हणजे त्याला संस्कृतीच्या प्रसारापासून इतर राष्ट्रांशीं स्पर्धा करण्यांत फार फायदा मिळतो. हल्लींच्या काळीं " उच्च सुधारलेलें राष्ट्र " म्हटलें कीं त्यांत विद्यमान राजकीय संस्थांना सामान्यत: जेवढ्या आत्मिक शक्तींचा आपल्या कामीं उपयोग होण्यासारखा असतो तेवढ्यांना च फक्त चालू पिढींत वावरण्यास मोकळीक द्यावयाची, अधिकांना नाहीं, इतका अर्थ समाविष्ट होतो,— जसा एखादा डोंगरावरून पडणारा पाण्याचा लोंढा, त्याला बंधारे घालून आणि कालवे काढून, फोडावयाचा आणि त्याची खच्ची केलेली शक्ति गिरणीचीं चाकें फिरविण्यांत उपयोजावयाची, कारण जर त्याच्या सर्व शक्तीला पूर्ण वाव देऊं म्हटलें तर ती गिरणीला उपकारक न होतां नाशकारक व्हावयाची. सारांश, " मोकळीक देणें " याचा अर्थ येथें " नियंत्रित करणें " असा झाला आहे.

तिसरा स्वार्थ सामाजिक स्वरूपाचा आहे. या स्वार्थांत ज्या लोकांना आपला स्वभाव दुसऱ्याला ताप देणारा किंवा कंटाळा आणणारा आहे असें वाटतें आणि म्हणून जे त्यावर " शिष्ट आचारा "चें पांघरूण घालण्याची इच्छा करतात त्यांना हि संस्कृतीचें अवलंबन करण्यांत हित दिसून येतें.

शब्द, मुद्रा, अभिनय, पोषाख आणि यांसारखे बाह्य आचार यांचा उपयोग दुसऱ्यावर खोटी छाप पाडून तींत आंतील गुणांची किंमत बाहेरील हावभावांनीं भरून काढण्याचा प्रयत्न करणें. नीट्झ्श म्हणतो, मला कित्येक वेळां असें वाटतें कीं आधुनिक मनुष्य हा शाश्वतचा एकमेकांशीं कंटाळलेला प्राणी आहे. आणि म्हणून त्याला आपण दुसऱ्याचें मनोरंजन कसें करावें याची कला संपादन करण्याची तळमळ आहे. हे लोक आपल्या कलावंतांना आपल्यापासून तिखटमीठ लावलेली चित्ताकर्षक पात्रें बनविण्याची पूर्ण मुभा देतात: ते स्वतः आपणांस पूर्वेच्या आणि पश्चिमेच्या मसाल्यांत शेंडीपर्यंत बुडवून घेतात, आणि आपल्या भोंवतीं एक प्रकारचा सुगंधाचा विलक्षण दरवळ उत्पन्न करतात. ते कोणाच्या हि रसनेला मानवतील अशी आपली तयारी ठेवतात: आणि म्हणून ते कोणाच्या हि पानांत पडले तरी सारखे च प्रिय होऊन जातात, मग तेथें चांगल्या रुचीची गरज असो वा वाईट रुचीची असो, कांहींतरी उदात्त पाहिजे असो वा ग्राम्य पाहिजे असो, संस्कृत असो वा प्राकृत असो, वीररसपरिप्लुत नाटक असो वा उकिरड्यांतील तमाशा असो..................
आधुनिक मनुष्याचे ठायीं हें "बाह्य शिष्टाचार"चें जें प्रेम वसत असलेलें दिसतें त्याला मुख्य कारणें तीन आहेत,—(१) आला क्षण पकडून त्याला आपल्या कामीं लावण्याचा विलक्षण हव्यास, (२) फळ पिकण्याची वाट न पाहतां तें कच्चें च तोडून घेण्याचा अधीरपणा, आणि (३) जीवनार्थ-

व्यापितेची जरूर असते, आणि ही इच्छा पूर्ण करून घेण्याला त्याचे जवळ मोठमोठे साधनमार्ग सदा सज्ज असतात. शिक्षणाला केवळ प्रवृत्त करण्यांत च नव्हे तर त्याचें नियंत्रण करून त्याचा सर्व भार आपल्या शिरावर घेण्यांत एकदां या स्वार्थाचें नीट बस्तान बसलें म्हणजे त्याला संस्कृतीच्या प्रसारापासून इतर राष्ट्रांशीं स्पर्धा करण्यांत फार फायदा मिळतो. हल्लींच्या काळीं " उच्च सुधारलेलें राष्ट्र " म्हटलें कीं त्यांत विद्यमान राजकीय संस्थांना सामान्यतः जेवढ्या आत्मिक शक्तींचा आपल्या कामीं उपयोग होण्यासारखा असतो तेवढ्यांना च फक्त चालू पिढींत वावरण्यास मोकळीक द्यावयाची, अधिकांना नाहीं, इतका अर्थ समाविष्ट होतो,— जसा एखादा डोंगरावरून पडणारा पाण्याचा लोंढा, त्याला बंधारे घालून आणि कालवे काढून, फोडावयाचा आणि त्याची खची केलेली शक्ति गिरणीचीं चाकें फिरविण्यांत उपयोजावयाची, कारण जर त्याच्या सर्व शक्तीला पूर्ण वाव देऊं म्हटलें तर ती गिरणीला उपकारक न होतां नाशकारक व्हावयाची. सारांश, " मोकळीक देणें " याचा अर्थ येथें " नियंत्रित करणें " असा झाला आहे.

तिसरा स्वार्थ सामाजिक स्वरूपाचा आहे. या स्वार्थांत ज्या लोकांना आपला स्वभाव दुसऱ्याला ताप देणारा किंवा कंटाळा आणणारा आहे असें वाटतें आणि म्हणून जे त्यावर " शिष्ट आचारा "चें पांघरूण घालण्याची इच्छा करतात त्यांना हि संस्कृतीचें अवलंबन करण्यांत हित दिसून येतें.

शब्द, मुद्रा, अभिनय, पोषाख आणि यांसारखे बाह्य आचार यांचा उपयोग दुसऱ्यावर खोटी छाप पाडून तींत आंतील गुणांची किंमत बाहेरील हावभावांनीं भरून काढण्याचा प्रयत्न करणें. नीट्झ्श म्हणतो, मला कित्येक वेळां असें वाटतें कीं आधुनिक मनुष्य हा शाश्वतचा एकमेकांशीं कंटाळलेला प्राणी आहे, आणि म्हणून त्याला आपण दुसऱ्याचें मनोरंजन कसें करावें याची कला संपादन करण्याची तळमळ आहे. हे लोक आपल्या कलावंतांना आपल्यापासून तिखटमीठ लावलेलीं चित्ताकर्षक पात्रें बनविण्याची पूर्ण मुभा देतात: ते स्वतः आपणांस पूर्वेच्या आणि पश्चिमेच्या मसाल्यांत शेंडीपर्यंत बुडवून घेतात, आणि आपल्या भोंवतीं एक प्रकारचा सुगंधाचा विलक्षण दरवळ उत्पन्न करतात. ते कोणाच्या हि रसनेला मानवतील अशी आपली तयारी ठेवतात: आणि म्हणून ते कोणाच्या हि पानांत पडले तरी सारखे च प्रिय होऊन जातात, मग तेथें चांगल्या रुचीची गरज असो वा वाईट रुचींची असो, कांहींतरी उदात्त पाहिजे असो वा ग्राम्य पाहिजे असो, संस्कृत असो वा प्राकृत असो, वीररसपरिप्लुत नाटक असो वा उकिरड्यांतील तमाशा असो..............

आधुनिक मनुष्याचे ठायीं हें " बाह्य शिष्टाचार "चें जें प्रेम वसत असलेलें दिसतें त्याला मुख्य कारणें तीन आहेत,—(१) आला क्षण पकडून त्याला आपल्या कामीं लावण्याचा विलक्षण हव्यास, (२) फळ पिकण्याची वाट न पाहतां तें कच्चें च तोडून घेण्याचा अधीरपणा, आणि (३) जीवनार्थ-

कलहांतील धांवपळ व चढाओढ, जिचा ठसा त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट उमटलेला दिसतो आणि त्याच्या प्रत्येक हालचालींत तो भासमान होतो. त्याचे ठायीं जणुं काय असें विष भिनलें आहे कीं तें त्याला स्वस्थपणें श्वासोच्छ्वास करूं देत नाहीं. चालू क्षण, लोकरीति, आणि बहुजनसंघ या त्रयीचा हा चिंतेनें व्याकुळ झालेला दास अस्ताव्यस्तपणें इतस्ततः सैरावैरा धांवत आहे. तो आपल्या ठिकाणीं मारदस्तपणा आणि उपयुक्तपणा नाहीं हें पूर्णपणें जाणत असल्यानें ती उणीव झांकण्याकरितां खोट्या साळसूदपणाचा आव आणतो. ही बाह्य संभावितपणाची उसनी ऐट मनुष्याच्या आंतील क्षुद्र वृत्तीबद्दल उत्पन्न होणाऱ्या स्वतःच्या तिरस्कारबुद्धीशीं अगदीं जखडलेली असते: पहिली आवरक बनते, दुसरी आवार्य होते. अर्थात् अशा स्थितींत शिक्षण हें एक मनुष्याच्या आपत्तीचें आणि नीचपणाचें, त्याच्या पशुतुल्य झगड्याचें, त्याच्या शाश्वत तृष्णेचें, आणि त्याच्या फलसंपादण्यांतील निर्लज्जपणाचें पांघरूण च म्हटलें पाहिजे.

या प्रमाणें हीं आर्थिक, राजकीय, आणि सामाजिक अशीं खोट्या संस्कृतीचीं किंवा संस्कृतीच्या आभासाचीं तीन रूपें आहेत. पहिल्यांत केवळ धंदेवाइकाच्या द्रव्योपार्जनाची प्रबल वृत्ति आहे, दुसऱ्यांत राजकीय सत्तेच्या रक्षणाची अत्युत्कट भावना आहे, आणि तिसऱ्यांत अंतस्थ दोष झांकण्याकरितां त्यांवर सद्गुणाची शाल घालण्याची अनिवार इच्छा आहे. या तिहींना जोडून हल्लींच्या शास्त्रीय युगांत, नीट्झ्शे म्हणतो,

या ' प्स्यूडो-कुल्टुर'चें किंवा असत्संस्कृतीचें एक चौथें रूप प्रकट झालें आहे. तें कोणतें, तर शास्त्राचा स्वार्थ आणि त्याच्या विद्वान् भृत्यगणाची विशिष्ट तऱ्हेवाइक वृत्ति.

" शास्त्राचा ज्ञानाशीं संबंध असा आहे कीं जसा लौकिक नीतीचा पवित्रपणाशीं: शास्त्र हे थंडगार आणि शुष्क, प्रेमविहीन, आणि असंतोष व तितीर्षा यांच्या खोल भावनांविषयीं अजाण असतें. तें आपलें हित साधतांना आपल्या भृत्यांना अपाय करितें, कारण तें आपल्या वृत्तीची छाप त्यांच्यावर उमटवितें आणि त्यांची मानवी आर्द्रता कोरडी करून टाकतें. जोंपर्यं आपण संस्कृतीचा अर्थ खरोखर शास्त्राच्या प्रगतींत पाहतों तों पर्यंत शास्त्र हें महान् तप आचरणाऱ्या पुरुषश्रेष्ठाच्या मार्गाकडे ढुंकून न पाहतां आपलें अन्तः-करण कठीण करून तसें च पुढें चालेल यांत शंका नाहीं. कारण शास्त्र हें फक्त भौतिक विद्यांचे प्रश्न अवलोकन करितें, त्याच्या प्रांतांत तपश्चर्येला स्थान नसतें किंबहुना त्याला त्याची ओळख हि नसते— जरी तप हा सुद्धां आपल्या ठिकाणीं कांहीं कमी महत्त्वाचा प्रश्न नाहीं! "

हल्लींच्या पंडितांची दृष्टि साक्षात् सत्यापेक्षां सत्यसंशोधनाच्या क्रियेकडे जास्त आहे, त्यांचा कल श्रद्धेपेक्षां विवादाकडे अधिक आहे. त्यांना विशेष हौस लढाईची आहे, आणि त्यांत जय मिळविणें हें त्यांचें अंतिम आहे,—सत्य हें केवळ त्याला निमित्त आहे. एखाद्या अर्वाचीन प्रोफेसरांत " कांहीं विशिष्ट सत्यें " शोधून काढण्याचा जो विलक्षण मोह दृष्टोत्पत्तीस येतो तो केवळ त्याच्या कांहीं ठराविक अधिकारी पुरुषांच्या, जातींच्या, मतांच्या, पंथांच्या, सत्तांच्या पुढील दास्यवृत्तींतून निष्पन्न झालेला असतो. कारण त्यांच्या बाजूला

सत्याचा पुरवठा करण्यांत आपल्याला फायदा आहे अशी त्याची ठाम समजूत आहे. अशा प्रकारच्या आधुनिक युनिव्हर्सिटींतून बाहेर पडलेल्या पंडितवर्यांचे नीट्झशेनें बारा विशिष्ट गुण कथन केले आहेत ते येणेंप्रमाणें.—

(१) सरळपणा आणि साधेपणा. केवळ आडमुठेपणा आणि बावळेपणा ( दुसऱ्याला फसवतां येणार नाहीं इतका बावळेपणा, कारण दुसऱ्याला फसविण्यास किंचित् जन्मजात अक्कल लागते ) यांपेक्षां जर हे गुण जास्त वर असतील तर च त्यांचा ज्ञानाला चांगला उपयोग होईल, नाहीं तर होणार नाहीं. कारण हे गुण सदा जुनीं तत्त्वें जुन्या भाषेंत बोलत असतात. त्यांना कांहीं नवीन पुढें आलेलें खपत नाहीं आणि पेलत हि नाहीं. त्यांचा आळस ज्ञान झिडकारण्यापेक्षां न बोलण्यांत अधिक दिसतो. त्या कारणानें त्यांचें एक सांप्रदायिक कडें बनतें. त्याच्या बाहेर ते ज्ञानाला जुमानीत नाहींत आणि सर्वांवर च पाखंडाचा आरोप करतात.

(२) जवळच्या पदार्थांकडे पाहण्याला तार्क्ष्य दृष्टि परंतु दूरचें आणि विश्वव्यापक अवलोकण्यास तिचा विलक्षण कोतेपणा. सामान्यतः प्रोफेसराचा दृष्टिप्रदेश फार लहान असतो. कारण त्याला आपले डोळे अगदीं जवळच्या पदार्थावर निखळून ठेवावे लागतात. त्याला एका बिंदूवरून दुसऱ्या बिंदूवर नजर द्यावयास आपलें सगळें च दर्शक यंत्र सबंधच्या सबंध फिरवावें लागतें. तो एखादें चित्र लहान लहान तुकडे करून त्यांत पहातो. जसा एखादा मनुष्य नाटकगृहांत आपल्या

छोट्या नाटकी दुर्बिणींतून क्वचित् डोकें तर क्वचित् दुसरा एखादा शरीराचा भाग पाहतो परंतु एकदम सर्वच्या सर्व साकल्यानें कांहीं पाहूं शकत नाहीं. हे निरनिराळे तुकडे त्याच्या दृष्टिपथांत कधीं च एकत्र जुळत नाहींत. तो त्यांची जुळणी केवळ अनुमानानें करतो. आणि त्यायोगें त्याला संपूर्ण वस्तूची खरी कल्पना कधीं च होत नाहीं. उदाहरणार्थ, तो एखादा ग्रंथ शलाकापत्रन्यायानें मध्यें च कोठें तरी उघडतो, त्यांतील मजकूर मधून मधून वाचतो आणि त्यावरून तो त्या संपूर्ण ग्रंथाची किंमत ठरवितो. या पेक्षां त्याला कांहीं करवत नाहीं. तसें च त्याच्या पुढें जर एखादें तैलचित्र आणलें तर त्याच्या दृष्टीला त्या वरील मोठमोठे रंगलेप दिसतात इतकें च.

(३) आपल्या स्वतःच्या आवडीनिवडींत ठराविक आणि नेमस्त विचारसरणी. त्याला इतिहासांत जो विशेष आनंद वाटतो याचें मुख्य कारण त्याला भूतकाळांतील सिद्धक्रियांचे ठिकाणीं आपल्या स्वतःच्या हेतूंचा मनाला वाटेल तसा आरोप करतां येतो. उंदराला आपल्या बिळावर पूर्ण सुरक्षितता आणि स्वास्थ्य वाटतें. तो सर्वप्रकारच्या निर्मर्याद बुद्धिमत्तेच्या विशाल कल्पनांच्या विरुद्ध सदैव डोळ्यांत तेल घालून राहतो. परंतु प्राचीन इतिहासांतील ज्या सर्वसामान्य हेतूंबद्दल त्याला सहानुभूति वाटते ते हेतु मात्र तो मोठ्या परिश्रमानें खणून काढण्याचा प्रयत्न करतो. सामान्यतः जें कांहीं अति दुर्मिळ आणि अलौकिक, भव्य आणि सत्य, शुद्ध

आणि परिपूत असतें तें ओळखण्याची आणि त्याची योग्यता जाणण्याची त्याला किंचित् हि पात्रता नसते.

(४) सहृदयतेचा अभाव. त्या योगें तो जीवच्छेद करण्यास सहज तयार होतो. ज्ञान जन्माला आणण्यास जी कडकडीत तपश्चर्या लागते तिचा त्याला गंध नसल्यानें जेथें इतर माणसें भयानें दबकतात तेथें तो निर्भय संचार करितो. तो स्वभावानें थंड आणि निर्दय असतो. तो वरून मोठा धैर्यवान दिसतो पण आंतून तसा नसतो,—खेंचराला कधीं भोंवळ येत नाहीं म्हणून तें थोडें च धीट ठरतें?

(५) आत्मविश्वासाचा अत्यंताभाव, अथवा स्वत:विषयीं लघुमानबुद्धि. तो जरी जगताच्या गलिच्छ सांधीकोपऱ्यांत रहात असला तरी त्याचे ठिकाणीं त्यागभावना किंवा नम्रताबुद्धि किंचित् हि वसत असलेली दिसणार नाहीं. त्याला स्वत:विषयीं अगदीं अन्त:करणपूर्वक वाटतें कीं आपण नभांत उंच उडणारे नाहीं तर जमीनीवर सरपटणारे आहोंत. त्या कारणानें तें एक मोठें करुणास्पद दृश्य होतें.

(६) आपले पुस्तकी गुरू आणि चळवळे यांचेबद्दल एकैकनिष्ठा. तो अगदीं अंत:करणापासून त्यांना सहायभूत होण्याचा संकल्प करतो, आणि हें सहाय आपण सत्याच्या द्वारें फार उत्तम करूं शकूं असें मानतो. तो कृतज्ञताबुद्धि बाळगतो. कारण शास्त्राच्या भव्य मदिरांत त्याला त्यांच्या कृपेनें प्रवेश मिळालेला असतो. केवळ स्वत:च्या मार्गानें तो तेथें केव्हां च पोंचूं शकला नसता. आज जो कोणी मनुष्य एखादा

नवीन संशोधनाचा प्रांत उघडा करतो आणि पुष्कळ हलके-सलके अनुयायी जमवून त्यांना तेथें कांहीं करतां येईल असें काम लावून देतो तो मनुष्य प्रसिद्धीस येण्यास फार काळ लागत नाहीं. कारण त्याच्या मागें मला मोठा घोळका त्याला पुढें लोटीत असतो. हे सगळे कृतज्ञता बाळगणारे शिष्य म्हणजे त्या गुरूचें खरें दुर्दैव ओढवलेलें असतें. कारण ते सर्व त्याची हुबेहुब नक्कल करण्यास जातात. ते सर्व आपल्या लघु मूर्तींचे ठिकाणीं गुरूचे एकोणएक दोष अतिशयोक्ती प्रत नेतात आणि तितक्या च मानानें त्याचे गुण तेथून निष्कासित करतात.

(७) तो इतर सर्व प्रोफेसरांच्या ठराविक मळलेल्या मार्गानें अनुसरतो; येथें सत्याची ऊर्मि कल्पनांच्या अभावा-पासून निघालेली असते, आणि जें चक्र एकदां सुरू झालें तें सतत फिरत राहतें. अशा वृत्तींचे लोक बहुधा उक्तिसंग्राहक, सारसंग्राहक, दीपिकाकार, दर्पणकार, सूचिकार, अनुक्रमणिका-कार वगैरे बनतात; ते विद्यामंदिराच्या एका विशिष्ट दालनांत धुंडाळणी करीत बसतात, त्यांच्या गांवीं नसतें कीं तेथें दुसरीं अनेक दालनें आहेत. त्यांच्या सर्व उद्योगांत गुरुत्वा-कर्षणाच्या जगड्व्याळ मूर्खपणाचा थोडाबहुत अंश दिसून येतो; आणि त्या योगें त्यांचे श्रम पुष्कळदां शेवटास जातात.

(८) कंटाळवाण्या रिकामपणाची भीति. जो खरा तत्त्वज्ञ असतो त्याला पुष्कळ रिकाम्या वेळे सारखें दुसरें कांहीं प्रिय नसतें. परंतु प्रोफेसराला मात्र अशा वेळेचा उपयोग कसा

करावा हें माहीत नसल्यामुळें तो तिला थरकांप भितो. पुस्तकें हा त्याचा जीवाचा आराम असतो; तो प्रत्येकाचे निरनिराळे विचार ऐकतो व सर्व दिवसभर मनाची करमणूक करून घेतो. बहुधा तो आपल्याशीं ज्यांचा वैयक्तिक संबंध आहे अशीं च पुस्तकें पसंत करतो, कारण त्यांत त्याला आपणास प्रियाप्रिय भावनांचा आस्वाद घेण्यास सांपडतो; पुन: हीं पुस्तकें कशीं तर जीं त्याच्या साक्षात् व्यक्तिभावाशीं, त्याच्या धंद्याशीं, त्याच्या राजकीय, कलात्मक वा एखाद्या व्याकरणाच्या किंवा शुद्धलेखनाच्या मुद्याशीं जोडलेलीं असतात; त्यानें जरी ज्ञानाच्या एका शाखेंत प्रभुत्व मिळविलेलें असलें तरी तेवढें त्याला आपला वेळ कंटाळल्यावांचून घालविण्यास पुरें होतें.

(९) भाकरी मिळविण्याचा हेतु, खरें पाहतां " उपाशीं पोटाची रड. " सत्याचा उपयोग जर तें हस्तगत झालें तर सत्ता मिळविण्याकडे किंवा मान आणि धन यांचा झरा उघडण्यास जो सुशोभितपणा लागतो तो आणण्याकडे करावयाचा. तथापि हें सत्य म्हणजे एक " विशिष्ट सत्य " समजावें: कारण सत्यें दोन प्रकारचीं आहेत आणि त्या दोहोंत फार अंतर आहे: एक किफायतीचें सत्य,—या सत्याची सेवा करणारांची संख्या फार मोठी असते, त्यांचें ब्रीदवाक्य हें कीं " बुद्धि हें पोटाचें साधन आहे; " (ingenii largitor venter), दुसरें बिनकिफायतीचें सत्य,—या सत्यावर जे थोडे लोक निष्ठा ठेवतात त्यांना वरील सिद्धांत बिलकुल मान्य नसतो.

(१०) आपल्या प्रोफेसर-बांधवांबद्दल आदर आणि त्यांच्या इतराजी बद्दल भय—मागच्या पेक्षां जरा उच्च दर्ज्याचा, विरळ स्वरूपाचा, पण अगदीं च असामान्य नव्हे. एका च प्रभावळींतील हे सर्व देव एकमेकांविषयीं इतकी असूयापूर्वक सावधागिरी बाळगतात कीं त्यांपैकीं जर कोणी एखाद्यानें कांहीं सत्यान्वेषण केलें तर तें सर्वतोपरि त्याच्या च नांवानें चाललें पाहिजे असा ते आग्रह धरतात, कारण त्यांत नुसता भाकरीचा च प्रश्न नसतो तर कीर्ति आणि अधिकार यांची प्राप्ति असते. एक दुसऱ्याला त्याच्या सत्यान्वेषणाबद्दल जो बहुमान देतो तो उलट त्यानें आपणास आपल्या सत्यान्वेषणाबद्दल द्यावा या हेतूनें होय. असत्य आणि प्रमाद यांचें खंडन इतक्या उंच स्वरानें करण्यांत येतें कीं काम करणारांची संख्या फारशी वाढूं नये; क्वचित् कांहीं थोड्या ताठ मानेच्या धृष्ट प्रमादांना किंचित् काळ उघड माथ्यानें वावरतां यावें म्हणून एखादें वास्तविक सत्य दडपून टाकण्यांत येतें; येथें कधीं "नैतिक स्वभाववैलक्षण्यां" ची वाण पडत नाहीं,—ज्यांना पूर्वीं लुच्चेगिरी म्हणत.

(११) "प्रतिष्ठावांछी विद्वान्"—हल्लीं ही पर फार दुर्मिळ होत चालली आहे. असा विद्वान् आपणाकरितां एखादें स्वतंत्र खातें उपस्थित करून जगांतील अपूर्व वस्तूंचें आस्थापूर्वक संशोधन करण्यांत भटकत राहतो, मग त्यांत त्याला स्वतःला किती जरी श्रम पडले, खर्च लागला, प्रवास घडला किंवा संपूर्ण जगाशीं दळणवळण ठेवण्याचा प्रसंग आला तरी

त्याला त्याचें कांहीं वाटत नाहीं किंबहुना त्यांत त्याला आनंद च वाटतो. त्याला आपण स्वतःच कोणी अपूर्व आहोंत असें ह्मणवून घेण्यांत मोठें भूषण वाटतें, आणि आपल्या बहुविध ज्ञानापासून स्वतःच्या उपजीविकेला साधन म्हणून कांहीं मिळविण्याचें त्याच्या स्वप्नीं सुद्धां येत नाहीं.

(१२) " मनोरंजनेच्छु विद्वान्. " ह्या विद्वानाला कूट प्रश्न शोधून काढण्याचा आणि उकलण्याचा फार नाद असतो; तथापि तो त्यांत फारशी शक्ति खर्च करीत नाहीं, कारण त्याला खेळाचें स्वारस्य दवडावयाचें नसतें. या प्रकारें ज्ञानाच्या प्रदेशांत जरी तो फार लांब प्रवेश करीत नसला तरी त्याच्या दृष्टिपथांत कित्येक वेळां असें कांहीं येतें कीं जें केवळ लोणीमाकरनिष्ठ पंडितवर्यांच्या सूक्ष्मदर्शक नजरेला कधीं च भासमान व्हावयाचें नाहीं.

या प्रकारें अर्वाचीन विद्याधर पंडिताचे बारा निरनिराळे गुण कथन करून नंतर नीट्झ्शेनें त्याचें जें स्वरूपाविष्करण केलें आहे आणि त्यांत त्याची खऱ्या प्रतिभासंपन्न ब्राह्मीदृष्टीच्या तत्त्वज्ञाशीं तुलना करून दाखविली आहे ती त्याच्या च शब्दांत जशीच्या तशी ग्रथित करणें युक्त होणार आहे. तो म्हणतो--

" हीं सर्व किंवा त्यांतील कांहीं मूलगुणतत्त्वें घेऊन आणि तीं एका जागीं कुटून त्यांचें एक मिश्रण केलें कीं हल्लींचा सत्याचा सेवक तयार होतो. एखादी परिपूर्ण अमानवी वस्तु बनविण्याकरितां— अगदीं अर्थशून्य, आणि म्हणून हेतुविरहित, ज्ञान—कांहीं अत्यंत मानवी लहान लहान हेतूंची रास करून तिचें रासायनिक संमिश्रण

करण्यांत आलें आहे, आणि त्याचा परिणाम म्हणजे हे आपले प्रोफेसर-मजकूर आहेत,—त्या शुद्ध स्वर्गीय तेजोमय ज्ञानाच्या प्रकाशांत इतका रूपांतर पावलेला कीं तो वचनविण्यास अगोदर जी मिश्रणाची आणि कुटण्याची यातायात झालेली होती ती सर्व पार विसरून गेलीं! हा मोठा चमत्कार आहे. तथापि कांहीं क्षण असे येतात कीं त्या वेळीं तें मागील कार्य जसेंच्या तसें सर्व स्मरणांत आणणें जरूर पडतें,—जेव्हां आपणांस अशा प्रोफेसरवर्यांचें संस्कृतीशीं नातें काय आहे हें पाहण्याचा प्रसंग येतो तेव्हां. कोणा हि विचारी पुरुषाला त्यानें किंचित् लक्ष देऊन पाहिलें असतां असें आढळून येणार आहे कीं हा प्रोफेसर आपल्या स्वतःच्या अगदीं सारभूत स्वरूपांत जन्मतःच अनुत्पादक आहे; आणि त्या योगें प्रतिभा आणि पांडित्य यांमध्यें विचार आणि आचार यांचे ठायीं कधीं न संपणारें वैर जुंपून राहिलें आहे. पांडित्य हें निसर्गाला ज्ञानाच्या कक्षेंत आणण्याकरितां त्याचे तुकडे पाडून त्याला मारून टाकण्याची इच्छा करतें, तर प्रतिभा ही त्याला नवीन सृष्टीची जोड देऊन त्याच्या जीवनाची अभिवृद्धि करण्यास झटते आनंदपूर्ण उत्साही काळाला पंडितवराची जरूर भासत नाहीं किंवा जाणीव रहात नाहीं; रोगपूर्ण निरुत्साही काळांत मात्र त्याची गणना अति उच्च आणि पूज्य कोटींत करण्यांत येते. ”

हल्लींच्या युनिव्हर्सिट्यांतून जें शिक्षण मिळत आहे तें खरें सांस्कृतिक शिक्षण नाहीं, उलट तें संस्कृतीला हानिकारक आहे. हल्लींच्या काळीं उच्च शिक्षणाचे सर्व परिश्रम पुढील चार प्रकारचीं निरनिराळीं वा समुच्चयानें एकत्र चार रूपें निर्माण करण्यांत खर्च होत आहेत,—(१) शब्दपांडित्य करणारा प्रोफेसर, (२) सरकारी नोकरी मिळविणारा कारकून, (३) द्रव्यावर दृष्टि ठेवणारा व्यवहारी, व (४) वर्तमानपत्र चाल-

विणारा "नरसू" (Bildungs Philister). हे सर्व शिक्षणाचा उपयोग आपला स्वार्थ अधिकांत अधिक किती साधेल तें पाहाण्याकडे करीत असतात त्यां पैकीं कांहीं चालू राजकारणांत वृथा लुडबुड करतांना आढळतात, आणि जो तत्त्वज्ञ आपल्या कार्यांत निमग्न असल्याकारणानें राजकारणापासून अलिप्त राहतो त्याच्याकडे तिरस्कार दृष्टीनें पाहतात. वास्तविकरीत्या या पंडितंमन्यांचे ठिकाणीं जशी तत्त्वज्ञानाला लागणारी 'निवृत्ति' नसते तशी राजकारणाला लागणारी 'प्रवृत्ति' हि नसते. म्हणजे यांच्यांत ब्राह्मणबल आणि क्षत्रियबल या दोहोंचा सारखा च अभाव असतो. ते शुद्रवृत्तीनें सेवाधर्म आचरतात आणि वैश्यवृत्तीनें द्रव्याची स्पृहा बाळगतात. नीट्झ्श म्हणतो, ज्या पुरुषाचे ठिकाणीं अध्यात्मज्ञानाचें वारें ( furor philosophicus ) खेळतें त्या ठिकाणीं राजकारणाचें वारें ( furor politicus ) शिरण्यास जागा च नसते, आणि म्हणून तो शहाणपणानें वर्तमानपत्रें वाचण्यापासून आणि राजकीय फंदांत पडण्यापासून पूर्णपणें अलग राहतो. तथापि जर कदाचित् देशावर एखादें खरोखर संकट कोसळलें तर तो त्यांत क्षणाचा हि विलंब न करतां इतरांबरोबर एकदम उडी घालील यांत किमपि संदेह नाहीं. जेव्हां खऱ्या मुत्सद्यांवांचून इतर बाजारबुणगे राजकारणांत उठाठेव करण्यास जातात तेव्हां त्या राज्याचें हित न होतां हानि च होते.

सारांश, हल्लींच्या शिक्षणक्रमांतून जी स्वार्थवृत्ति वाढत

चालली आहे तिच्या योगें खरा तत्त्वज्ञ पैदा होणें दुरापास्त झालें आहे. हल्लीं सर्वत्र नरसूवजा सुशिक्षिताला किंवा सुशिक्षित प्रोफेसराला जो मान आहे त्यांत च भावी तत्त्वज्ञाचा विनाश आहे. या पंडितमन्यांची वृत्ति अशा तत्त्वज्ञांबद्दल कवळ दाक्षिण्यरहित मुग्धतेची च नाहीं तर तिरस्काराच्या भावनेनें टीका करण्याची आणि नाक मुरडण्याची आहे, जणुं काय हे राजेश्री आपल्या पुढें एखादी अशी विचित्र आणि विकृत वस्तु पहात आहेत कीं तीबद्दल विचार करण्याला त्यांना फुरसत नाहीं व इच्छा नाहीं. अशा विलक्षण परिस्थितींत यदा कदाचित् एखादा तत्त्वज्ञ जन्मास आला तर तो यदृच्छेनें होय. तो शुद्ध निसर्गाचा खेळ समजला पाहिजे. परंतु निसर्ग हा आंधळ्यासारखा आहे. तो मनुष्यजातीवर जो तत्त्वज्ञाचा बाण सोडतो तो कोठें नेम धरून नसतो. त्याला नेम धरून बाण मारतां च येत नाहीं. ती सर्वथैव मानवी कला आहे, म्हणून हें काम मानवाच्या सांस्कृतिक शिक्षणांत च घडून आलें पाहिजे. तदभावीं हल्लींच्या युनिव्हर्सिटींतून बाहेर पडणारा पंडिताचा नमुना यद्यपि सार्वत्रिक पसरलेला दिसला तत्रापि तो खऱ्या तत्त्वज्ञापासून फार दूर आहे यांत बिलकुल संशय नाहीं. उदारहरणार्थ, कांट आणि शोपेनहौएर ही जोडी घ्या. अर्वाचीन सुशिक्षित जगाच्या दृष्टीला हे सारखे च तत्त्वज्ञ दिसतात. परंतु त्या दोहोंत महदंतर आहे, शोपेनहौएरचें शिक्षण प्रोफेसर होण्याकारितां कधीं च झालें नाहीं. तो लहानपणीं कांहीं काळ आपल्य

इच्छेच्या विरुद्ध एका मोठ्या व्यापारी पेढीवर कारकुनाचें काम करण्यास राहिला होता इतकें च. बाकी त्याचा पुढील सर्व आयुष्यक्रम स्वातंत्र्यांत गेला. म्हणून च तेथें त्याचे ठायीं खरें तत्त्वज्ञान प्रतिबिंबित झालें. उलट कांट हा जन्मभर युनिव्हर्सिटी प्रोफेसर होता. नीट्झ्श म्हणतो " युनिव्हर्सिटी **प्रोफेसर हा कधीं हि तत्त्वज्ञानी होऊं शकत नाहीं."** कांट हा मोठा पंडित असेल पण तत्त्वज्ञानी नव्हता हें खास. तो तत्त्वज्ञानाचा प्रोफेसर होता. कोणती हि कला संपादन करण्यास शक्ति, अभ्यास, आणि निपुणता हे जे तीन गुण लागतात त्यां पैकीं कांटचे ठायीं तत्त्वज्ञानी होण्याची शक्ति होती पण तिला अभ्यासाची जोड न मिळाल्यामुळें तेथें निपुणता झाली नाहीं आणि तो तसा च मरेपर्यंत कोशस्थ स्थितींत राहिला. येथें तत्त्वज्ञानी म्हणजे काय हें सांगणें जरूर आहे. मोठमोठे विचार केवळ शब्दांत करीत बसणारा नव्हे तर ते विचार प्रत्यक्ष आचरणांत आणण्याकरितां झटणारा. अर्थात् युनिव्हर्सिटी पंडितांतून आचाराच्या अभावीं असा तत्त्वज्ञ निपजणें अशक्य आहे. जो मनुष्य आपल्या अन्तरात्म्याच्या आणि बहिर्जगाच्या दरम्यान् कल्पना, मतें, प्रसंग, पुस्तकें इत्यादिकांना संचार करण्यास सवड देतो आणि जो इतिहासांत फडकण्याकरितां च केवळ जन्मास आलेला असतो तो कोणती हि वस्तु एकदम साकल्यानें पाहूं शकत नाहीं, आणि स्वतः आपण " एकदम साकल्यानें पाहिला " जात नाहीं. परंतु तत्त्वज्ञानी म्हटला कीं त्या ठिकाणीं या

दोन्हीं शक्ति असणें जरूर आहे. मनुष्याला आपलें बहुतेक सर्व अध्यात्मज्ञान स्वत:पासून च मिळवावयाचें असतें आणि स्वत: आपण आपल्या ठिकाणीं संपूर्ण विश्वाचें सारभूत रूप बनावयाचें असतें. अर्थात् जर कोणी आपण आपल्याकडे दुसऱ्या लोकांच्या मतपटलांतून पाहील तर तो आपल्या ठायीं त्या मतांव्यतिरिक्त दुसरें कांहीं पाहूं शकणार नाहीं हें उघड आहे. आणि हल्लींचा पंडितवर्य तर सर्वथैव या च प्रकारें पाहतो आणि आपलें जीवन चालवितो. तात्पर्य काय कीं कांट हा तत्त्वज्ञानाचा प्रोफेसर होता म्हणून तत्त्वज्ञानी नव्हता. परंतु शोपेनहौएर मात्र विचाराला आचाराची जोड देऊन वर्तणारा खरा तत्त्वज्ञानी होता. तो केव्हां हि तत्त्वज्ञानाचा प्रोफेसर झाला नाहीं यांत च त्याचा मोठेपणा दिसून येतो.

खरा तत्त्वज्ञ म्हटला कीं तो आपल्या ठिकाणीं पूर्णपणें स्वतंत्र असावयाचा. त्याला बाहेरचें किंचित् हि बंधन खपावयाचें नाहीं. अशा तत्त्वज्ञाचे ठायीं मुख्यत: जे गुण दृष्टीस पडतात ते वृत्तींत वीरत्व, मानवजातीचें उपजत ज्ञान, पंडिती शिक्षणाचा व कोत्या देशाभिमानाचा आणि तसा च आपला योगक्षेम कसा चालेल या काळजीचा अथवा सरकारी आश्रयाच्या अवलंबनबुद्धीचा सर्वथा अभाव. हें च खरें स्वातंत्र्य. अशा अति भीतिप्रद स्वातंत्र्याच्या वातावरणांत, नीट्झ्श म्हणतो, प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञ जन्मास येऊन वृद्धि पावत. अशा तत्त्वज्ञांपासून हल्लींचा “ हुकमी ” तयार होणार तत्त्वज्ञाचा नमुना अगदीं भिन्न आहे. तो ह्या उच्च तत्त्वज्ञा-

च्या मार्गांत येणारा मोठा अडथळा आहे. त्याचें वर्णन शोपे-नहौएरनें आपल्या ' युनिव्हर्सिटी-तत्त्वज्ञान ' या विषयावरील निबंधांत उत्तम केलें आहे. नीट्झ्शेनें त्या दोहोंतील यथार्थ अंतर दर्शवून त्यांची येणप्रमाणें मीमांसा केली आहे.——

" कोणतें हि सरकार कांहीं विशिष्ट व्यक्तींना तत्त्वज्ञाना करितां म्हणून जें ' स्वातंत्र्य ' बहाल करितें तें खरें पाहतां स्वातंत्र्य च नसतें तर ती एक त्या व्यक्तीचा चरितार्थ चालविण्याकरितां नोकरीची जागा असतें. ' तत्त्वज्ञानाला उत्तेजन ' याचा अर्थ हल्लींच्या काळीं कांहीं नियमित व्यक्तींना तत्त्वज्ञाना पासून पोट भरतां यावें म्हणून सरकारानें केलेली व्यवस्था. प्राचीन ग्रीक मुनींची स्थिति याहून फार निराळी होती. त्यांना सरकारांतून कसलें हि वेतन मिळत नसे पण सरकार त्यांना एखादी देणगी देऊन त्यांचा सत्कार करी, जसें झेनो नामक तत्त्वज्ञाला सरकारनें सुवर्णाचा मुगुट आणि मृत्तिकेचें स्मारकपात्र अर्पण केलें. सत्यापासून आपलें पोट कसें भरावें याचा मार्ग दाखविल्यानें कांहीं सत्याची सेवा घडेल असें मला सामान्यतः म्हणता येत नाहीं, कारण हा मार्ग दाखविणारा जो कोणी असेल त्याच्या आचरणावर सर्व कांहीं अवलंबून आहे. जो मनुष्य आपल्या बांधवांना उद्देशून असें म्हणतो कीं,—" माझी काळजी घ्या कारण मला तुमच्या पेक्षां कांहीं तरी जास्त चांगलें करावयाचें आहे—म्हणजे मला तुमची काळजी घ्यावयाची आहे, " त्याच्या ह्या गर्वाच्या उच्च कोटीची मला चांगली कल्पना करतां येते एखाद्या प्लेटो आणि शोपेनहौएर यांच्या सारख्याच्या ठिकाणीं अशा प्रकारची गर्वोक्ति पाहून आपण राग मानतां कामा नये; आणि त्या योगें च तर ते खरे युनिव्हर्सिटी तत्त्वज्ञ होण्यास लायक होते,—उदाहरणार्थ प्लेटो, हा कांहीं काळ दरबारी तत्वज्ञ होता म्हणून त्यानें तत्वज्ञानाचें माहात्म्य कमी होऊं दिलें नाहीं. पण कांटमध्यें मात्र सामान्य प्रोफेसराचा दासभाव दिसून

येतो. त्याचा सरकारशीं जो नोकरीचा संबंध होता त्यांत त्याचे ठिकाणीं कसला च मोठेपणा राहिला नाहीं; आणि म्हणून जेव्हां एकदां युनिव्हर्सिटी तत्त्वज्ञानावर सरकारची गदा आली तेव्हां त्यास त्या तत्वज्ञानाचें समर्थन करतां येईना. अशा वेळीं जर तेथें शोपेनहौ-एर आणि प्लेटो यांच्या वृत्तीचे लोक असते तर, मला वाटतें, त्यांना तें करण्याचा कधीं प्रसंग च आला नसता. कारण सरकारनें त्यांना असल्या जागांवर नेमण्याचें धारिष्ट च केलें नसतें. याचें कारण एक च आहे आणि तें अगदीं सरळ आहे. कोणतें हि सरकार असल्या वृत्तीच्या लोकांना भितें आणि तें ज्यांना भित नाहीं अशा च तत्वज्ञांना केवळ आपल्या मर्जीत घेतें. सरकारच्या मनांत उघड उघड तत्वज्ञानासंबंधीं एक प्रकारची विशिष्ट भीति वसत असते, आणि म्हणून तें आपणाजवळ त्याची कमतरता नाहीं असें भासविण्याकरितां पुष्कळसे तत्वज्ञ आपल्याकडे ओढून घेण्याचा प्रयत्न करितें-- तथापि त्याला आपल्या बाजूला अशा प्रकारचे लोक पाहिजे असतात कीं ज्यांना पदव्या पुष्कळ पण सत्ता काडीची नाहीं. अर्थात् जर क्वचित् कोणी एखादा आपली सत्याची सुरी काढून सरकारासकट प्रत्येक वस्तूचें अगदीं मर्मापर्यंत विच्छेदन करण्यास सिद्ध झाला तर जें सरकार अगोदर आपलें स्वतःचें अस्तित्व सर्वापेक्षां अधिक मानतें तें जसें एखाद्या वर डोकें करून आपला न्याय करण्यास प्रवृत्त होणाऱ्या धर्माला हाणून पाडील तसें च त्या तत्त्वज्ञानी पुरुषाला हि शत्रु समजून हद्दपार करील यांत शंका नाहीं. ज्या मनुष्याला सरकारचा पगारी तत्वज्ञ होण्याची इच्छा आहे त्यानें सर्व प्रकारच्या गूढ मार्गां-तील सत्यान्वेषणाच्या भरीस न पडावें हें बरें. निदान जोंपर्यंत तो त्या अधिकाराचा उपभोग घेत आहे तों पर्यंत तरी त्यानें तत्त्वज्ञाना-च्या सत्यापेक्षां सरकारच्या सत्तेला श्रेष्ठ समजणें अत्यावश्यक आहे, आणि केवळ ही सत्ता च नाहीं तर त्या सत्तेच्या अस्तित्त्वाला कारणी-

भूत सर्व गोष्टी—धर्माचा मर्यादित आकार, सामाजिक व्यवस्था, खडे सैन्य; ह्या सर्व वस्तूंवर " मला स्पर्श करूं नको " हें वाक्य कोरलेलें आहे. युनिव्हार्सिटी प्रोफेसराला कर्तव्यांचें आणि मर्यादांचें संपूर्ण चक्र आपल्या पुढें धारण करणें कधीं शक्य आहे काय? मला माहीत नाहीं. ज्या मनुष्यानें तें धारण केलें आहे आणि सरकारी नोकरी राखली आहे तो सत्याचा असत्य स्नेही आहे; ज्यानें तें धारण केलें नाहीं,– तो हि सत्याचा स्नेही नाहीं असें मला वाटतें.

" परंतु या सारखे सर्वसामान्यविचार मनुष्यजातीवर आपले परिणाम घडवून आणण्यास सदा च अति पंगू असतात. पुष्कळ लोकांना आपले खांदे उडवून नापसंती दर्शविण्यास येवढें पुरे होईल आणि ते म्हणतील,—" जणुं काय ह्या पृथ्वीतलावर एखादी थोर आणि शुद्ध वस्तु मनुष्याच्या स्वाभाविक गांवढळ वृत्तीला किंचित् हि वाव न देतां आपली स्वतःची धारणा करण्यास कधीं समर्थ झाली आहे! तुमचें असें म्हणणें आहे काय कीं सरकारनें तत्वज्ञानी पुरुषांस अधिकाराच्या नोकऱ्या देऊन त्यांची पोटाची तरतूद करण्या ऐवजीं त्यांचा छळ करावा? " या शेवटच्या प्रश्नाला उत्तर न देतां मी इतकें च म्हणेन कीं सरकारच्या कारणीं तत्त्वज्ञानाच्या ह्या " सवलती " आज काल फार पुढें जात आहेत. एक तर, सरकारला आपल्या शिक्षणखात्यांत तत्त्वज्ञानाचे जितके नोकर लागत असतील तितकी च तें स्वतःची संख्या निवडतें; अर्थात् तें अशी ऐट आणतें कीं आपणांस तत्त्वज्ञांतत्त्वज्ञांत चांगले कोण आणि वाईट कोण हें निवडण्याचें सामर्थ्य आहे, आणि शिवाय आपली अशी समजूत करून घेतें कीं आपल्या जवळ जेवढ्या जागा आहेत तेवढ्या सर्व भरण्यास इतक्या चांगल्या तत्त्वज्ञांचा भरपूर पुरवठा आहे. सरकार हें च कायतें एक तत्त्वज्ञानी पुरुषांचा गुण आणि संख्या ठरविण्यास अधिकारयुक्त साधन आहे. दुसरें, तें ज्यांची निवड करतें त्यांना कांहीं विशिष्ट

मानवसमूहांत एका ठराविक जागेवर एका ठराविक कार्याला कायमचें बांधून टाकतें; त्यांनीं जो कोणी अधर पदवीधर आपणांपुढें शिकण्यास येईल त्याला रोजच्या रोज ठराविक तासांत शिकाविलें च पाहिजे. येथें प्रश्न हा आहे कीं, कोणा हि तत्त्वज्ञाला आपल्या सदसद्विवेकबुद्धीला स्मरून आपणांस या प्रकारें जो कोणी विद्यार्थी जें कांहीं ऐकण्याची इच्छा करून आपणां पुढें येईल त्याला रोजच्या रोज तें शिकविण्यास बांधून घेतां येईल किंवा काय. आपल्याला जितकें येतें त्या पेक्षां अधिक दाखविण्याचा, आणि ज्या गोष्टी आपणांस आपल्या अति निकट सहवासांतील स्नेह्यासोबत्यांच्या च जवळ केवळ निर्भयपणें बोलतां येतील त्या गोष्टी अनोळखी श्रोतृवर्गापुढें बोलण्याचा त्यावर प्रसंग येणार नाहीं का? आणि सर्वांत अधिक, जेव्हां जेव्हां आणि जेथें जेथें त्याला आपली स्फूर्ति पाचारण करील तेव्हां तेव्हां आणि तेथें तेथें तिला अनुसरण्याचें आपलें बहुमोल स्वातंत्र्य आपणांस आपण जें कांहीं ठरलेल्या काळांत ठरलेल्या विषयावर विचार करण्यास बांधून घेतलें आहे त्या परिस्थितीनें च केवळ सोडून द्यावें लागणार नाहीं का? आणि हे विचार तरी कोणांपुढें करावयाचे, तर पोरांसोरांपुढें! असे विचार स्वभावतःच पौरुषविहीन नाहींत का? आणि समजा त्याला एखादे दिवशीं वाटलें कीं त्या च वेळीं आपणांजवळ कांहीं सांगण्यासारखे विचार नाहींत—तथापि त्याला आपल्या आसनावर बसलें हें पाहिजे आणि विचारपूर्ण आहोंत असें हि दर्शविलें पाहिजे! मग कसें?

"परंतु," कोणी म्हणेल, "तो कांहीं स्वतः विचार करणारा नाहीं तर विचारांचा संग्रह करणारा आहे, कोणी द्रष्टा नाहीं तर पूर्वींच्या सर्व दर्शनविद्यांत शिकून तयार झालेला एक मोठा पंडित आहे ( जसा राधाकृष्णन् किंवा रानडे ), इतकें च. अशा जवळ नित्य त्या पढलेल्या तत्त्वज्ञानांतील कांहींना कांहीं तरी आपल्या शिष्यवर्गाला माहीत नसलेलें सांगतां येण्यासारखें असावयाचें च." ही

तत्त्वज्ञानानें सरकारचे चरणीं सादर केलेली वास्तविक रीत्या तिसरी आणि अत्यंत धोक्याची ' सवलत ' आहे. या स्थितींत त्याला बहुश्रुतपणाच्या वेषांत म्हणजे ( अधिक विशेषत्वानें ) तत्त्वज्ञानाच्या इतिहासाच्या ज्ञानांत आपलें प्रदर्शन करणें भाग पडतें. जो खरा तत्त्वद्रष्टा असतो तो कवीप्रमाणें जीवनाकडे शुद्ध आणि प्रेमळ दृष्टींनीं पाहतो, आणि फार आंत खोल बुडी मारण्यास जाऊं शकत नाहीं;–आणि त्याला नाना प्रकारच्या विकृत मेंदूंतून बाहेर पडलेल्या अगणित चित्रविचित्र मतमतांतरांत पोखरीत बसण्यापेक्षां दुसरें कांहीं अधिक द्वेष्य नसतें. **हिंदुस्थानांत काय किंवा ग्रीसदेशांत काय, गतकाळच्या पांडित्याचा इतिहास हा खऱ्या तत्त्वद्रष्ट्याचा कधीं च विषय नव्हता**; आणि जो तत्त्वज्ञानाचा प्रोफेसर अशा प्रकारच्या गोष्टींत उद्योग करीत राहतो तो, फार तर, आपणांस लोकांनीं " हा काय मोठा हुशार पंडित, पुराणविद्याविशारद, भाषाशास्त्रकोविद, इतिहासतत्वसंशोधक आहे " असें म्हटलेलें ऐकून घेण्यांत मोठा संतोष मानतो, परंतु केव्हां हि त्यांतून " हा एक तत्त्वद्रष्टा आहे " असें निष्पन्न होत नाहीं. मी वर " फार तर " असे शब्द योजले: कारण कोणा हि विचारी मनुष्याला असें आढळून येणार आहे कीं युनिव्हर्सिटींतील तत्त्वज्ञानाच्या प्रोफेसरांनीं लिहिलेले बहुतेक सर्व पांडित्यप्रचुर ग्रंथ खऱ्या शास्त्रीय योग्यतेच्या अभावीं अगदीं रद्दी आणि सामान्यतः भयंकर कंटाळवाणे आहेत. उदाहरणार्थ, कोणाला बरें, ज्या ' लीथे ' नामक नदीच्या स्मृतिनाशक वाफेनें ग्रीक तत्त्वज्ञानाचा इतिहास वेढून टाकलेला आहे ती वाफ रिट्टर, ब्रांडिस, आणि झेलर यांच्या मद्दड ग्रंथांनीं, जरी ते फारसे शास्त्रशुद्ध नसले तरी, दूर करतां येईल? (आणि हा च प्रश्न या देशांत सर्वस्वी वरील ग्रंथकारांचें अनुकरण करून युनिव्हर्सिटीच्या खर्चानें हिंदू तत्त्वज्ञानाचा इतिहास लिहिण्यास प्रवृत्त झालेल्या बेलवलकर आणि रानडे या प्रोफेसरद्वयाच्या ग्रंथाला

तत्त्वज्ञ, कवि आणि साधु या तिहींचा एक च संगम झाला म्हणजे ती श्रीकृष्णासारख्या किंवा नीट्झ्शेच्या झरथुष्ट्रासारख्या परम योगेश्वराची च कोटी होय. तदितर तत्त्वज्ञ कवि, कवि साधु, व साधु तत्त्वज्ञ हे तीन निरनिराळे पर्याय उत्पन्न होतात. पैकीं पाहिल्यापेक्षां दुसरा श्रेष्ठ व दुसऱ्यापेक्षां तिसरा श्रेष्ठ असा त्यांत तरतमभाव दिसून येतो. मुख्य भर साधुत्वावर आहे. कारण त्यांत केवळ विचारापेक्षां किंवा केवळ उच्चारापेक्षां आचाराचें महत्त्व अधिक आहे. असा साधु कवि असला तर उत्तम आणि तत्त्वज्ञ झाला तर त्याहून उत्तम हें निराळें सांगावयास नको. या देशांत रामदासासारखे जे साधुवर्य झाले ते जसे कवि होते तसे तत्त्वज्ञ हि होते. राष्ट्राचे खरे शिक्षक हे च. तथापि हा नमुना कोणत्या हि युनिव्हर्सिटींतून पैदा होणारा नव्हे. तो स्वयमेव तयार होतो. परंतु त्या कारितां त्याचे भोंवतीं संस्कृतीचें उच्च वातावरण लागतें. रामदासाचे भोंवतीं वर्णाश्रमधर्माच्या अत्युच्च संस्कृतीचें वातावरण होतें. युनिव्हर्सिटीचें काम तत्त्वज्ञानांतील पंडित निर्माण करणें. रामदास पंडित नव्हता, तत्त्वज्ञानी साधु किंवा साधु तत्त्वज्ञानी होता. शिवाय तो उत्तमोत्तम कवि होता. या देशांतील पूर्वांच्या संस्कृतीचें तें परिपक्व फल आहे. त्याला निर्माण करण्याला राजसंस्थेपेक्षां धर्मसंस्था अधिक कारणीभूत होते, आणि त्याचे हातून धर्मांत राजकारण व राजकारणांत धर्म म्हणजे प्रवृत्तींत निवृत्ति व निवृत्तींत प्रवृत्ति यांची उत्तम प्रकारें जोपासना होते. हल्लींच्या युनिव्हर्सिटींतून बाहेर पड-

णाऱ्या पंडितांत जर असा एखादा नमुना कोठें नजरेस पडला तर तो त्या युनिव्हर्सिटीच्या कृपेनें नव्हे तर केवळ दैवयोगानें होय. त्याला आपल्या साधुत्वाबद्दल, कवित्वाबद्दल किंवा तत्त्वज्ञानाबद्दल त्या युनिव्हर्सिटीचा कांहीं च उपयोग झालेला नसावयाचा, अर्थात् त्याला त्या युनिव्हर्सिटीबद्दल कसला च आदर, प्रेम किंवा अभिमान दर्शविण्यास जागा नसावयाची हें उघड आहे. मग हें युनिव्हर्सिटीशिक्षण आणि विशेषत: त्यांतील तत्त्वज्ञान काय कामाचें आहे? हें शिक्षण देशांत खरा तत्त्वज्ञ निर्माण करण्याकरितां आहे का त्याच्या मार्गांत अडथळा आणण्याकरितां आहे? नीट्झ्श म्हणतो, तें जर खऱ्या तत्त्वज्ञाच्या मार्गांत अडथळा आणण्याकरितां असलें तर हें सर्व युनिव्हर्सिटीचें यंत्र जितकें लवकर ढांसळून पडेल आणि त्यांतील सरकारच्या व प्रोफेसरांच्या हातचलाख्या जितक्या लवकर बंद होतील तितकें बरें.

युरोपांत काय किंवा या देशांत काय, युनिव्हर्सिटीच्या चांगुलपणाबद्दल जो सर्वसामान्य दुर्लौकिक झाला आहे आणि निराशा पसरत चालली आहे त्याच्या मुळाशीं एक च कारण आहे तें, त्यांतील प्रोफेसरांचा उथळपणा, पोकळ घमेंड, आकुंचित् दृष्टि, आणि ध्येयाचा अभाव हें होय. इतिहास, तत्त्वज्ञान आणि विदग्ध वाङ्मय या विषयांत तर विद्यार्थ्यांना प्रोफेसरांच्या मदतीवांचून आपल्या परीक्षांची तयारी करतां येते. ही गोष्ट कोणाला हि स्वत:च्या अनुभवानें कळून येणारी आहे. नीट्झ्श आपल्या विद्यार्थीदशेंतील तत्त्वज्ञानाच्या प्रोफे-

जसाच्या तसा लागू होणार नाहीं कां? ). मी तर सर्वथा झेलरपेक्षां डायोड्जेनीस लाएर्टियस याला च वाचण्यास पसंत करीन. कारण डायोड्जेनिसमध्यें निदान जुन्या तत्त्वज्ञांचें तरी तेज वास करीत आहे, पण झेलरमध्यें तें जुनें तेज नाहीं आणि दुसरें हि कसलें नाहीं. आणि शेवटीं, तत्त्वज्ञानाच्या इतिहासापासून आमच्या तरुणांना काय लाभ आहे? मतमतांच्या गलबल्यांत त्यांना आपलें स्वतःचें एखादें मत बनविण्यापासून नाउमेद करावयाचें आहे काय? अथवा आज काल जें भरतवाक्य आपल्या हल्लींच्या प्रगतीच्या अफाट विस्ताराचें स्तुति-स्तोत्र गात आहे त्यांत त्यांना सामील होण्यास शिकवावयाचें आहे काय? त्यांनीं तत्त्वज्ञानाचा द्वेष करण्यास किंवा कदाचित् तिरस्कार करण्यास शिकावयाचें आहे काय? ज्या कोणाला, विद्यार्थ्यांना आपल्या तत्त्वज्ञानाच्या परीक्षांकरितां आपल्या दुर्दैवी डोक्यांत मानवी मनांतील अति वेडेपणाचे आणि तसे च अति मोठे व अति गंभीर प्रयत्न कोंबून भरण्यांत किती भयंकर यातना सहन कराव्या लागतात. हें माहीत आहे तो बहुधा वरील शेवटच्या प्रश्नांतील गोष्टीची च बरोबर अटकळ बांधील. तत्त्वज्ञानाचें परीक्षण करण्याची केवळ जी एक च रीत शक्य आहे आणि जी एका विशिष्ट गोष्टीचें निश्चित प्रमाण बांधते —म्हणजे कोणाला तें जीवनांत आणतां येईल किंवा नाहीं हें पाहणें-- ती रीत युनिव्हार्सिटीमध्यें केव्हां च शिकविली जात नाहीं: तेथें काय शिकविण्यांत येतें तर फक्त शब्दांचा कीस, आणि पुनः शब्द. कल्पना करा, एखादें तरुण डोकें, ज्याला जीवनाचा फारसा अनुभव नाहीं, त्यांत पन्नास पद्धति आणि त्यांवर पन्नास टीका ( केवळ शब्दावडंबरांत) कोंबकोंबून भरल्या आहेत, आणि त्या सर्वांचें एक मिश्रण झालें आहे, --त्याचें केवढें माजलेलें रान बनून जाईल, त्याला तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाचा किती तिरस्कार वाटूं लागेल! वस्तुतः हें तत्त्वज्ञानाचें शिक्षण च नव्हे, तर तत्त्वज्ञानाची परीक्षा पास होण्याचा मार्ग आहे:

याचा साहजिक परिणाम म्हणजे त्या त्रासून गेलेल्या परीक्षिताच्या तोंडून निघणारे पवित्र उद्गार, " मी तत्त्वज्ञानी नाहीं हे देवाचे मोठे उपकार आहेत, मी आपला एक साधा नागरिक आहे येवढें पुरे आहे. "

तत्त्वज्ञ, कवि आणि साधु ह्या तीन कोटी उत्तम पुरुषाच्या लक्षणांत गोंविल्या म्हणजे त्या वरून युनिव्हर्सिटी पंडिताची खरी किंमत कळते. हा पंडित क्वचित् तत्त्वज्ञ असेल, कवि होईल पण साधु केव्हां च बनणार नाहीं. तथापि त्याचें तत्त्वज्ञान कोणत्या दर्जाचें असतें तें वर नीट्झ्शेनें वर्णन करून दाखविलें च आहे. जी स्थिति तत्त्वज्ञानाची ती च काव्याची. त्याचे हातून एखादें ऐतिह्य काव्य झालें आहे किंवा होईल या बद्दल संशय बाळगण्याचें कारण नाहीं. उत्कट विकार आणि विचार प्रकट करण्याचें सामर्थ्य या शिक्षणांत नाहीं. अर्थात् येथें उत्कट आचार दिसला नाहीं तर नवल नाहीं. जेथें युरोपांतील युनिव्हर्सिट्यांची ही स्थिति तेथें येथलि युनव्हर्सिटींचा प्रश्न च नको. त्या तर सर्वतोपरि परतंत्र आहेत. अशा शिक्षणक्रमांतून स्वतंत्र वृत्तीचे बाणेदार वीर निपजणें सर्वथा अशक्य आहे. देशांत जेव्हां खरे तत्त्वज्ञ, खरे कवि, आणि खरे साधु निर्माण होतात तेव्हां त्या देशाचें भाग्य उदयास येतें. आतां हे तत्त्वज्ञ, कवि आणि साधु जितके आपल्या स्वात्म्याकडे पाहतात तितके देशाकडे पहात नाहींत असें म्हटलें तरी केवळ त्यांच्या सांनिध्यानें च देशाचें हित होतें. कारण त्यांचा आत्मा देशाला व्यापून देशाबाहेर असतो.

सरांचें जें वर्णन करतो तें सामान्यतः सर्व च प्रोफेसरांना लागू पडतें. तो म्हणतो, माझ्या विद्यार्थीदशेंत मला हे युनिव्हर्सिटी तत्त्वज्ञ अगदीं च सामान्य दर्जाचे दिसून आले. त्यांनीं इकडल्या तिकडल्या शास्त्रांतून जीं कांहीं थोडीं प्रमेयें एकत्र गोळा करून ठेवलीं होतीं त्यांवर च त्यांचा सर्व निर्वाह चाले. ते आपल्या विश्रांतीच्या वेळांत वर्तमानपत्रें वाचीत आणि गायनाचे जलसे ऐकत. ( हल्लीं त्यांना वेळ घालविण्याला 'ब्रिज' म्हणजे पत्त्यांची जुगार व 'बिलियर्ड' म्हणजे लांकडाचे चेंडूळ हीं नवीन साधनें उपलब्ध झालीं आहेत ). त्यांना त्यांचे समव्यवसायी बंधु वरवर मोठ्या शिष्टाचारानें पण आंतून तिरस्कारानें वागवीत. त्यांना फार थोडें येतें अशी त्यांची ख्याति असे, पण आपलें अज्ञान झांकण्या करितां कांहीं तरी संदिग्ध भाषणें बोलून वेळ मारून नेण्यांत ते तरबेज असत. जेथें सामान्य माणसें उघड्या डोळ्यानें फार लांब जाऊं शकणार नाहींत अशा दुर्ज्ञेय स्थळीं जाण्यांत आपणांस विशेष आवड आहे असें ते दाखवीत. कोणी भौतिक शास्त्रांबद्दल म्हणत,—" यां पैकीं एक हि मला द्रव्याचें मूलकारण समजून देऊं शकत नाहीं; अर्थात् मला त्यांचे बद्दल विचार करून काय करावयाचें आहे ?"—दुसरे कोणी इतिहासाबद्दल बोलत,—" कल्पनेच्या मनुष्याला हा इतिहास नवीन काय सांगणार आहे ? " मिळून ते सदासर्वदा एखादी गोष्ट शिकण्यापेक्षां कोणती च गोष्ट जाणून न घेण्याला आपल्या तत्त्वज्ञानांतून एकेक क्लृप्ति शोधून काढीत. यदाकदा-

चित् कचित् काळीं त्यांचें शिकण्याकडे मन वळलें च तर एक प्रकारची गुप्त भीति त्यांना खऱ्या शास्त्रापासून परावृत्त करी. मधून मधून कोणी एखादा आपलें कांहीं नवीन तत्त्व प्रतिपादन करण्यास पुढें येई पण त्यांत त्याला फारसें यश मिळत नसे. अशा स्थितींत जर कोणी एखाद्या भौतिक शास्त्रांच्या विद्यार्थ्यानें ह्या तत्त्वज्ञ पंडितांचा झगा धरून ओढलें आणि त्यांना आपलें तत्त्वज्ञानाचें शस्त्र शास्त्रावर चालविण्यास पाचारण केलें तर त्यांची अशी त्रेधा उडे कीं त्यांतून आपण कसें सुटतों असें त्यांना होऊन जाई. हल्लीं त्यांचा तत्त्वज्ञानावरील सर्व भरंवसा उडून गेला आहे आणि या पुढें त्या प्रातांत ते एक पाऊल हि पुढें घालतील किंवा नाहीं याची शंका आहे पूर्वीं त्यां पैकीं कांहींना असें वाटत होतें कीं आपण नवीन धर्मसंप्रदाय काढूं आणि तो जुन्या धर्माच्या जागीं स्थापन करूं. आतां त्यांच्या ह्या सर्व कल्पना आणि आशा मागें पडल्या आहेत आणि ते अगदीं थंड व सुस्त होऊन बसले आहेत. त्यांना आपल्या शुद्ध कल्पनाजन्य प्रमेयांना अनुभवाची जोड मिळविण्याची आवश्यकता भासूं लागली आहे आणि त्याकरितां ते किंचित् भौतिक शास्त्रांचें ज्ञान, प्रायोगिक मनोविज्ञान आणि थोडासा इतिहास पैदा करण्याची धडपड करीत आहेत. तथापि हें सगळें लोकांत आपण अधिक शास्त्रीय कसें दिसावें या करितां आहे. बाकी त्यांना आपल्या अन्तःकरणांतील अन्तःकरणापासून कांहीं त्या शास्त्रांबद्दल मोठेसें प्रेम आहे असें नाहीं आणि तत्त्वज्ञानाबद्दल हि नाहीं

अशी त्यांची विलक्षण अनुकंपनीय स्थिति झाली आहे. नीट्झ्श म्हणतो, या प्रकारें हे युनिव्हर्सिटींतील तत्त्वज्ञानाचे प्रोफेसर केवळ निरुपयोगी च आहेत असें नाहीं तर साक्षात् अपायकारक आहेत आणि त्यांना तसे बनविण्यास पुष्कळ अंशीं सरकारची नोकरी कारणीभूत आहे. तें कसें याचा उलगडा त्यानें पुढीलप्रमाणें केला आहे.—

"परंतु असें हि धरून चालूं कीं ही असत्तत्वज्ञांची टोळी हास्यास्पद आहे—आणि तें कोण नाकबूल करील? तथापि किती दूरपर्यंत ते अपायकारक हि आहेत? ज्या अर्थी ते तत्त्वज्ञानाला हास्यास्पद करतात त्या अर्थी त्या च कारणानें ते अपायकारक आहेत. जावत्कालपर्यंत ज्ञानाचें हें खोटें अनुकरण सरकारकडून उचलून धरलें जात आहे तावत्कालपर्यंत खऱ्या तत्त्वज्ञानाचा टिकाऊ परिणाम नष्ट च झाला पाहिजे, निदान तो मर्यादित तरी खास होणार; हें काम, या महत्कार्याच्या पुरस्कर्त्यांनीं आपणांवर जें हास्यास्पदंगत्वाचें अनिष्ट ओढवून घेतलें आहे त्यानें जितकें उत्तम होईल तितकें दुसरें कशानें होणार नाहीं, कारण तें त्या कार्यावर च खुद्द हल्ला करीत आहे. आणि म्हणून च मला असें वाटतें कीं तें संस्कृतीला तत्त्वज्ञानापासून राजकीय आणि विद्यापिठीय महत्व काढून घेण्याला उत्तेजन देईल, आणि सरकार व युनिव्हर्सिटि यांना सत्यासत्य तत्त्वज्ञानांत निवडानिवड करण्याच्या अशक्य कार्यापासून मुक्त करील. हे युनिव्हर्सिटितत्त्वज्ञ स्थानभ्रष्ट होऊन सैरावैरा धावूं लागोत, त्यांना अतःपर आपणांस एखादी सरकारी नोकरी मिळेल किंवा अधिकाराची जागा प्राप्त होईल या सारखे विचार हि मनांत आणूं देण्यास प्रतिबंध करा, त्यांच्या पुढें अधिक पदवीपदकांचें आमिष दर्शविण्याचें टाकून द्या,—हें च काय पण, त्यांचा छळ करा व त्यांना वाईट वागवा,—तुम्हीं

याचा अद्भुत परिणाम अवलोकन कराल. ह्या ज्ञानाच्या आभासात्मक मूर्ति भीतीनें थरकांप पावतील आणि ज्याला जेथें मिळेल तेथें निवाऱ्याचें स्थान घेण्यास धांवतील; कोणी धर्मोपाध्याय होईल, कोणी शाळापंतोजी बनेल, कोणी वृत्तपत्राच्या संपादकवर्गांत घुसेल, कोणी तरुणीशिक्षणांतील अभ्यासपाठ लिहूं लागेल, त्यांत जो अति शहाणा असेल तो शेतीचा धंदा पतकरील, आणि जो पोकळ डौल्या असेल तो राजकारणांत शिरेल. पक्षी उडून गेले कीं, सर्व घरटीं एकाएकीं रिकामीं पडतील: कारण मिथ्या तत्त्वज्ञांपासून मोकळें होण्यास उपाय फार सोपा आहे,—फक्त त्यांना पगार देण्याचें बंद करा. आणि सरकारी फायद्याच्या दृष्टीनें कोणत्या हि तत्त्वज्ञानाला उघड आश्रय देण्या ऐवजीं त्याकडे पूर्ण कानाडोळा करण्याचा हा च मार्ग उत्तम आहे. सरकार नामक वस्तूला शुद्ध सत्याची तादृश जरूर नसते; फक्त जें सत्य तिला उपयोगी पडतें, किंवा सत्य च काय पण जें जें कांहीं तिच्या कारणीं येतें—मग तें सत्य असो, अर्धसत्य असो, वा असत्य असो—तें सर्व तिला आपल्या संग्रहीं पाहिजे असतें. सरकारची सत्ता आणि तत्त्वज्ञानाचें सत्य यांचा मिलाफ होण्यांत जो अर्थ आहे तो केवळ त्या सत्यानें सत्तेच्या कारणीं बीनअटीनें उपयोगी पडण्याचें कबूल केलें आणि तिचें सुरक्षितत्व आपल्या स्वतःच्या अस्तित्वापेक्षां उच्च मानलें तर च होय, एरवीं नाहीं. सरकारच्या दृष्टीनें खरोखर च ही अति मोठी गोष्ट आहे कीं त्यानें सत्याला आपल्या जवळ पगारी नोकर बनवून ठेवावें. तथापि त्याला हें पक्कें ठाऊक असतें कीं सत्याचें सारभूत तत्त्व म्हणजे कोणापासून पगार न घेणें आणि कोणाची नोकरी न करणें. अर्थात् सरकारचा हा सत्यवेषधारी नाटकी नोकर असत्य ठरला, आणि सत्यापासून जें कार्य घडावयाचें तें घडवून आणण्यास नालायक दिसला तर त्यांत कांहीं नवल नाहीं—हें कार्य कोणतें तर सरकारची किंमत आणि पवित्रता

निश्चितार्थानें ठरविणें. जेव्हां एखादा मध्ययुगीन राजा आपणांस पोपनें राज्याभिषेक करावा अशी इच्छा करी पण पोप तें करण्यास संमति देत नसे, तेव्हां तो राजा तें काम करण्यास पोपच्या जागीं कोणी विरोधी पोप नेमी. ही गोष्ट कांहीं एका सीमेपर्यंत चांगलें कार्य करत; परंतु जेव्हां हल्लींचें सरकार आपली न्याय्यता स्थापीत करण्याकरितां एखादें “ विरोधी तत्त्वज्ञान ” उपास्थित करतें तेव्हां तीं सपशेल फसते; कारण त्याच्या विरुद्ध खरें तत्त्वज्ञान पूर्वी सारखें च किंवा अधिक नेटानें तोंड देऊन उभें असतें. मला अगदीं अन्तःकरणापासून विश्वासपूर्वक वाटतें कीं सरकारनें आपल्या हिताच्या दृष्टीनें च केवळ यापुढें तत्त्वज्ञानाशीं कसला संबंध ठेवूं नये, त्यापासून कशाची अपेक्षा करूं नये, आणि त्याला आपल्या मार्गानें जितकें लांबपर्यंत जातां येईल तितकें सुखेनैव जाऊं द्यावें. अशा तटस्थवृत्तीच्या अभावीं तत्त्वज्ञान हें अपायकारक व जुलमी होईल, आणि मग तें हाणून पाडल्यावांचून अन्य गति उरणार नाहीं.—सरकारला युनिव्हर्सिटीचे ठिकाणीं जो अर्थ दिसतो तो येवढ्या च पुरता कीं आज्ञाधारक आणि उपयोगी नागरिक कसे तयार होतील; अर्थात् त्यानें तरुण मुलांना तत्त्वज्ञानामध्यें परीक्षा देण्यास लावून हा आज्ञाधारकपणा आणि उपयोगीपणा संशयांत आणण्यापासून जपलें पाहिजे. कांहीं आळशी आणि टाकाऊ विद्यार्थ्यांना तत्त्वज्ञानाच्या अभ्यासापासून भेवडवण्याकरितां त्या विषयाचा बाऊ करणें हा एक चांगला मार्ग आहे हें खरें; पण हा फायदा दुसऱ्या कांहीं अधिक धाडसी आणि दांडग्या वृत्तीच्या विद्यार्थ्यांपासून या प्रकारच्या जबरदस्तीनें उत्पन्न होणाऱ्या संकटाला थोपवून धरण्यास पुरेसा नाहीं. ते मना केलेल्या पुस्तकांसंबंधीं जाणण्यास शिकतात, आपल्या शिक्षकवर्गावर टीका करूं लागतात, आणि शेवटीं युनिव्हर्सिटी तत्त्वज्ञानाचा आणि त्याच्या परीक्षांचा हेतु पूर्णपणें ओळखतात..........”

नीट्झ्शेच्या काळीं जर्मनींतील विद्यापीठांत हेगेलच्या मतांचा विलक्षण पगडा होता. त्या नंतर तो आतां पुष्कळ कमी झाला आहे. हेगेलनें प्रथम तर्कशास्त्र लिहिलें आणि नंतर त्या साच्यांत इतिहासशास्त्राचीं प्रमेयें काढलीं. त्या कारणानें हें इतिहासशास्त्र केवळ काल्पनिक बनलें. परंतु अशा च शास्त्राला सरकारनें उत्तेजन दिल्याकारणानें त्याचें युनिव्हर्सिटींत अपरंपार स्तोम माजलें, आणि त्या च मार्गानें युनिव्हर्सिटींत तत्त्वज्ञान आंखलें गेलें. नीट्झ्श म्हणतो, आतां हें हेगेलीय तत्त्वज्ञान सरकार आणि युनिव्हर्सिटी या दोघांना हि सारखें च निरुपयोगी झालें असल्याकारणानें त्यांनीं तें एकदम टाकून द्यावें आणि त्या विषयाच्या प्रोफेसरांच्या जागा कायमच्या बंद कराव्या. युनिव्हर्सिटींतील इतर शास्त्रांना तर हें शास्त्र अशास्त्र वाटूं लागलें आहे, आणि त्या योगें त्यांचे ठायीं त्या बद्दल तिरस्कार उत्पन्न झाला आहे. सारांश, युनिव्हर्सिटींत शिकविलें जाणारें तत्त्वज्ञान स्वाभाविक रीतीनें च असत्तत्त्वज्ञान ठरतें आणि त्या योगें युनिव्हर्सिटीची किंमत लोकांच्या डोळ्यांतून पार कमी होते. उलट खऱ्या तत्त्वज्ञानाला युनिव्हर्सिटीच्या बाहेर मोकळें मैदान सांपडतें आणि त्याचा फायदा अखिल जनतेला उत्तम प्रकारें मिळतो. म्हणून या संपूर्ण विषयाचा समारोप करतांना नीटझ्श म्हणतोः—

"सदर युनिव्हर्सिट्यांच्या बद्दल बाहेर जगांत जो एक प्रकारचा सार्वत्रिक तिरस्कार पसरत चालला आहे त्याला भरपूर कारणें आहेत; ह्या युनिव्हर्सिट्या भेकड आहेत असा त्यांचे बद्दल सामान्य दुर्लौकिक

आहे, लहान व्यक्ति मोठ्यांना भितात; आणि मोठ्या लोकमताला भितात; पुनः त्यांचे संबंधीं असा जनप्रवाद आहे कीं त्या आपल्या काळांतील उच्च विचाराचा पुढाकार घेत नाहींत तर त्याच्या मागून हळूहळू लंगडत चालतात, व सर्वमान्य शास्त्रांतील मूलभूत कल्पनांना कधीं चिकटून रहात नाहींत. उदाहरणार्थ व्याकरणशास्त्र घ्या. ह्या शास्त्राचा अभ्यास यद्यपि तेथें मोठ्या ज्यारीनें चालत असलेला दिसला तत्रापि कोणाला हि वक्तृत्व आणि लेखन यांत किती कडक शिस्तीनें शिक्षणाची आवश्यकता आहे याची तिळमात्र जाणीव असलेली दिसत नाहीं. हिंदुस्थानच्या प्राचीन भांडाराचे दरवाजे उघडे झाले आहेत, पण पंडितांना हिंदूंच्या अत्युच्च अविनाशी ग्रंथांची—म्हणजे त्यांच्या दर्शनविद्यांची–जितकी पशूला सारंगीवादनाची कल्पना असते त्याहून अधिक कल्पना नाहीं; तथापि शोपेनहौएरचें मत मात्र असें आहे कीं हिंदूतत्त्वज्ञानाशीं ओळख हा आमच्या शतकाला प्राप्त झालेला एक अति मोठा लाभ आहे. हल्लींच्या काळीं प्राचीन ग्रीक आणि रोमन विद्या लोकप्रिय क्रीडांगण होऊन बसल्या आहेत खरें, पण त्याचा परिणाम थोडा सुद्धां गुणांत आणि रूपांत उतरलेला दिसत नाहीं. विद्यार्थ्यांचें आचरण पहा, तें अनुकरणाला आदर्शभूत आहे असें कोणाला म्हणतां येईल? फ्रीड्रिख् ऑगुस्ट वोल्फ याची तडफ हल्लीं कोठें पाहण्यास मिळेल?—ज्याचे संबंधीं फ्रान्झ पासौ यास असें म्हणतां आलें कीं, जो कळकळीचा आणि मनुष्यत्वाचा मूर्तिमंत पुतळा होता आणि ज्याची शक्ति अर्ध्या जगाला प्रज्वलित करण्यास पुरेशी होती. अशा जागीं आतां युनिव्हर्सिटयांतून वर्तमानपत्री वळणाची वृत्ति वर डोकें करूं पहात आहे, आणि ती हि पुष्कळदां तत्त्वज्ञानाच्या नांवाखालीं; गुळगुळित वाक्प्रसर—वाणीचीं अगदीं कांतिवर्धक उटणीं—ओंठावर सदानकदा फाउस्ट आणि नथन शहाणा, आमच्या अति भिकारांतल्या

भिकार वाङ्मयीन नियतकालिकांची बाह्यमुद्रा आणि शब्दोच्चार, अलिकडें अलिकडें आमच्या पवित्र जर्मन काव्यगानाचा चिवचिवाट, आणि शिल्लर व गटे यांवर व्याख्यानांची झोड, — हें सर्व युनिव्हर्सिटीचा ओघ काळाच्या ओघाशीं मिळून गोंधळांत पडण्यास कसा प्रवृत्त झाला आहे त्याचें निदर्शक आहे. म्हणून च युनिव्हर्सिटयांच्या बाहेर, संस्कृतीला धरून त्यांचें रक्षण करण्याकरितां आणि त्यांवर टीका करण्याकरितां, एक उच्च प्रकारचें न्यायासन प्रस्थापित होणें अत्यंत महत्वाचें आहे; आाणि असें न्यायासन, जेव्हां तत्त्वज्ञान आपला संबंध युनिव्हर्सिटयांपासून शक्य तितक्या लवकर तोडून मोकळें होईल आणि प्रत्येक प्रकारच्या अनुचित हेतूपासून किंवा ढोंगापासून आपणांस परिपूत करून घेईल, तेव्हां तें च आपण स्वतः होण्यास समर्थ होईल. तें आपलें कार्य सरकारपासून धनाची वा मानाची अपेक्षा न करितां आणि काळाच्या ओघाला भीक न घालतां त्यां पासून फटकून बाजूला राहून उत्तम रीतीनें करील यांत कसला च संशय नाहीं. खरोखर तें, शोपेनहौएरप्रमाणें, आपल्या सभोंवार वावरत असलेल्या संस्कृति नामक वस्तूचा योग्य न्यायाधीश बनेल. या प्रकारें तत्त्वज्ञानी पुरुषाला सुद्धां आपण स्वतः युनिव्हर्सिटीचें अंगभूत होण्याचें नाकारून पण तिच्यावर दूरांतराबरून टीकेचें अस्त्र सोडण्यास प्रवृत्त होऊन तिच्या उपयोगी पडणें शक्य आहे. दूरांतर प्रतिष्ठा राखील.

“पण इतकें करून हि, पृथ्वीवरील तत्त्वज्ञानाच्या जीवनाशीं तुलनेनें पाहतां सरकारच्या जीविताची किंवा युनिव्हर्सिटीच्या प्रगतीची किंमत काय आहे ! कारण, माझा अर्थ अगदीं स्पष्ट करण्याकरितां म्हणावयाचें तर, एखादें सरकार किंवा युनिव्हर्सिटी चालू राहण्यापेक्षां पृथ्वीतलावर तत्त्वज्ञानी पुरुषाचा उदय होणें अपरिमितत: अधिक महत्त्वाचें आहे. ज्या प्रमाणांत लोकमतापुढें नमता आणि स्वातंत्र्याला

अपाय वाढत जातो त्या प्रमाणांत तत्त्वज्ञानाचें माहात्म्य वर डोकें करूं लागतें; ज्या काळीं रोमन लोकशाहीच्या पतनाचे निदर्शक आंचके येत होते, आणि तसें च ज्या काळीं रोमन साम्राज्यांत तत्त्वज्ञान आणि इतिहास या दोहोंचीं नांवें "प्रमुख बहिष्कृत नांवें" या सदरांत पडलीं होतीं त्या काळीं तें अगदीं उच्च शिखरावर जाऊन पोंचलें होतें प्लेटोपेक्षां ब्रूटसचें ठायीं हें तत्त्वज्ञानाचें माहात्म्य अधिक प्रामुख्यानें दृष्टीस पडतें. त्याचा काळ च असा होता कीं त्यावेळीं नीतिशास्त्रानें सामान्य धर्माधर्माकडे पाहणें बंद केलें होतें. हल्लीं तत्त्वज्ञानाला फारसें कोणी मानीत नाहीं, आणि आपणांस अशी पृच्छा करतां येईल कीं तें उचलून घेण्यास हल्लीं कोणी च कसा एखादा महान् योद्धा किंवा मुत्सद्दी पुढें येत नाहीं? याला उत्तर एक च आहे कीं, हल्लीं तत्त्वज्ञानाच्या नांवाखालीं जें युनिव्हर्सिटींतील पंडितंमन्य प्रोफेसराच्या जागत्या शहाणपणाचें लुकडें भूत मोकाट सुटलें आहे त्यानें त्याला पछाडिलें आहे; आणि त्या बरोबर त्याला खरें तत्वज्ञान हास्यास्पद दिसू लागलें आहे. तें त्याला भीतिप्रद दिसावयास पाहिजे होतें; आणि जे पुरुष अधिकारपदावर आरूढ व्हावयाचे त्यांना अशा तत्त्वज्ञानांतून जन्म पावलेल्या वीर्यशाली शक्तीचा बोध झाला पाहिजे. या भूपृष्ठावर एखादा मोठा तत्त्वज्ञ आपल्या ठायीं प्रबल शक्तींचा केंद्र कसा सिद्ध करून दाखवितो याचें वर्णन एका अमेरिकनानें केलें आहे तें त्यांनीं मननपूर्वक वाचावें. एमर्सन (आपल्या 'वर्तुळां' वरील निबंधांत) म्हणतो, "जेव्हां परमेश्वर ह्या पृथ्वी नामक ग्रहावर एखादा तत्त्वज्ञ मोकळा सोडतो तेव्हां सावध असा. कारण त्या वेळीं सर्व च वस्तुजातीला धोका प्राप्त होतो. तें असें घडतें कीं जसा एखाद्या मोठ्या शहरांत आगीचा भडका उठावा आणि कोणाला कशांत सुरक्षितता न दिसावी अथवा त्याचा शेवट कोठें होणार हें न कळावें. शास्त्राचें असें एक हि अंग राहणार नाहीं कीं जें उद्यांपर्यंत उलथें-

पालथें होऊन गेलें नाहीं; कोणती हि एखादी वाङ्मयविषयक प्रसिद्धि काय किंवा कीर्तीचीं अविनाशीं म्हणून समजलीं जाणारीं नांवें काय त्यांची पुनः उजळणी होणार नाहीं आणि तीं दूषणीय ठरणार नाहींत याची खात्री कोणाला च देतां येणार नाहीं............ मनुष्यांना चालू क्षणीं ज्या वस्तु प्रिय वाटतात त्या केवळ त्यांच्या मानसिक क्षितिजावर ज्या कल्पना उदय पावतात त्यांच्या योगें होय. अशा कल्पना चालू वस्तुस्थितीला फळांनीं भरलेल्या वृक्षाचें रूप देतात. एखादा नवीन संस्कृतीचा अंशांकुर मानवी व्यासंगांच्या संपूर्ण व्यवस्थेंत तत्काळ उलथापालथ करून टाकतो." या प्रकारचे हे विचाराचे नर जर भीतिप्रद दिसले तर स्पष्ट च ठरतें कीं आमचे युनिव्हार्सिटी बहाद्दर तसे कां नाहींत; याचें कारण एक च आहे, त्यांचे विचार परंपरेच्या छायेखालीं इतक्या शांतपणें मोहरतात कीं "जशीं कांहीं वृक्षानें आतां च फळें धरिलीं." ते कोणाला भीतिदायक होत नाहींत; ते गाझाचे दरवाजे काढून नेत नाहींत; आणि त्यांचीं सर्व क्षुद्र ध्यानें पाहून कोणाच्या हि मनांत डायोजेनीसनें पूर्वी एका तत्त्वज्ञाची स्तुति ऐकून जे उद्गार काढले ते च येणार आहेत: "ज्यानें इतक्या पुष्कळ काळ तत्त्वज्ञान केलें आणि अद्याप पावेतों कोणाला दुखविलें नाहीं त्याला त्याचे कोणते मोठे परिणाम दाखवितां येतील!" खरोखर, युनिव्हर्सिटी तत्त्वज्ञानाला आपल्या स्मारकमंदिरावर हीं च अक्षरें कोरलेलीं पाहिजे आहेतः—"त्यानें कोणाला हि दुखविलें नाहीं." परंतु हे शब्द जसा कोणी एखाद्या वृद्धा नारीच्या स्तुतींत योजील तसा सत्याच्या देवतेला लावणार नाहीं; आणि यांत कांहीं मोठें आश्चर्य नाहीं कीं जे कोणी सत्याच्या देवतेला केवळ वृद्धा नारी समजतात ते त्या च कारणानें कमपुरुष असतात आणि म्हणून स्वाभाविक रीत्या च खऱ्या बलशाली पुरुषाकडून अवमानिले जातात."

या प्रकारें नीट्झ्शेनें शोपेनहोएरवरील निबंधांत जे

युनिव्हर्सिटींतील शिक्षणाचें, शिक्षकांचें, आणि शिक्षितांचें टीकात्मक विवेचन केलें आहे तें सर्वथैव आर्यकल्पनांशीं आणि आर्यसंस्कृतीशीं जुळून आहे. सांस्कृतिक शिक्षण हें धनाकरितां, किंवा मानाकरितां नसतें तर आत्मकल्याणाकरितां असतें. याची कल्पना युरोपांतील लोकांस अद्याप यावयाची आहे. ती या निबंधावरून किंचित् येण्यासारखी आहे. हल्लींच्या घिसाड-युगांतील धांवपळीच्या विलक्षण घाईंत या शिक्षणाकडे पाह-ण्यास कोणास फुरसत नाहीं, आणि कोणी पाहूं लागला तर त्यास तें नीट दिसत हि नाहीं. खरें च आहे, मोटारीच्या चाकानें भरधांव पळणारास गोगलगाईच्या पायानें चालणाराचें स्वरूप कसें दिसावें? प्राचीन देवासुरांचे पुढारी इंद्र आणि विरोचन हे जेव्हां प्रजापतीकडे आत्मज्ञानार्थ हातांत समिधा घेऊन गेले तेव्हां प्रजापतीनें त्यांना प्रथम बत्तीस वर्षें आपल्या जवळ मुक्यानें ब्रह्मचर्यांत राहण्यास सांगितलें. त्यांत विरोचन गळाला पण इंद्र शेवटपर्यंत टिकाव धरून राहिला. अशा इंद्रानें जेव्हां एकंदर एकशेंएक वर्षें कडकडीत तप आचरलें तेव्हां त्यास आत्मज्ञान प्राप्त झालें अशी छांदोग्योपनिषदांत कथा आहे. हें तत्त्व हल्लींच्या काळांत मागें पडलें आहे. अर्थात् हल्लींच्या काळांत सांस्कृतिक शिक्षण हि तदभावीं लुप्तप्राय झाल्यास नवल नाहीं. नीट्झ्शनें सदर निबंधांत या तत्त्वाचा शोपेनहौएरचे ठिकाणीं चांगला उलगडा केला आहे. तथापि येथें शोपेनहौएर हा केवळ निमित्त मात्र आहे ही गोष्ट केव्हां हि विसरतां कामा नये. डॉ. कोगेलनें म्हटलें

आहे—" एखाद्या तत्त्वज्ञानी पुरुषाबद्दल येवढें स्तुतिस्तोत्र गाऊन पुनः त्यांत त्याच्या तत्त्वज्ञानासंबंधीं कांहीं च लिहिलेलें नसावें हा मोठा चमत्कार आहे; असा चमत्कार आजपर्यंत कोठें च पाहण्यांत आला नाहीं तो या निबंधांत पहावयास मिळतो." म्हणून च नीट्झ्शेला पुढें कालांतरानें जेव्हां असें आढळून आलें कीं या निबंधांत जें शोपेनहौएरचें नांव आहे तें वास्तविक रीत्या त्याचें नसून आपलें स्वतःचें आहे तेव्हां त्यानें आत्मचरित्रांत या बद्दल स्पष्ट खुलासा केला आहे. तो म्हणतो, " येथें प्रस्तुत स्थळीं शोपेनहौएर हा राष्ट्रशिक्षक नसून त्याचा विरोधक नीट्झ्श हा राष्ट्रशिक्षक आहे." याचें कारण उघड आहे. नीट्झ्शेला पुढें पुढें विचारांतीं शोपेनहौएर हा जीवनाचा नव्हे तर मृत्यूचा दूत दिसूं लागला, आणि त्यानें त्याला अधोगतीला नेणाऱ्या तत्त्वज्ञांच्या सदरांत काढलें. जे तत्त्वज्ञ कोणत्या च अंतिमाला नेत नाहींत अशा अर्धवट तत्त्वज्ञांपेक्षां हे अधोगतीला नेणारे तत्त्वज्ञ अधिक वाईट. अर्थात् नीट्झ्श आपल्या 'मूर्तींचा संधिप्रकाश' नामक ग्रंथांत म्हणतो, " आपण इच्छेला नकार घालणाऱ्या निराशावादी तर्कटाच्या पुढें अधिक मजल मारली पाहिजे. आपण शोपेनहौएरला च साक्षात् नाकारिलें पाहिजे." शोपेनहौएरच्या तत्त्वज्ञानांत जो इच्छेला नकार घालणारा नैराश्यवाद, आणि तपश्चर्येच्या मार्गांत आड येणारा हताशपणा आहे तो पाहून नीट्झ्शेचा त्याच्या वरील आदर ढळला आणि तो त्यापासून एकदम निराळा बाजूला सरला. त्याच्या भैरवी तत्त्वज्ञानापुढें

शोपेनहौएरचीं दुबळीं बौद्ध मतें क्षणभर हि उभीं राहूं शकलीं नाहींत. नीट्झ्शेचें तत्त्वज्ञान द्वंद्वाला धरून निर्द्वंद्वाकडे पाहणारें असल्यामुळें त्यांतील निराशा सापेक्ष आहे, तर शोपेनहौएरचें तत्त्वज्ञान द्वंद्वांतील एका कोटीचा स्वीकार करून दुसरीचा त्याग करणारें असल्यामुळें त्यांतील निराशा निरपेक्ष आहे, हा दोहोंमध्यें मोठा फरक आहे. अर्थात् नीट्झ्शेची निराशा दौर्बल्यांतून बाहेर पडणारी नाहीं तर बलांतून समुत्पन्न होणारी आहे, आणि तींत तपश्चर्येंतील कष्टाला समांतर आत्मानुभवाचा महदानंद आहे. या वरून शोपेनहौ-एर हा जर उपनिषदांच्या मार्गावरील बौद्ध तत्त्वज्ञानांत रममाण होऊन " सर्वं दुःखं दुःखं " या न्यायानें केवळ दुःखविलयाच्या निर्वाणपदावर उतरला असें म्हटलें तर नीट्झ्श हा मनुस्मृतीच्या मार्गावरील वैदिक तत्त्वज्ञानांत रंगून जाऊन " सुखमात्यंतिकं यत्तद्बुद्धिग्राह्यमतींद्रियं " या न्यायानें एका आत्यंतिक सुखाच्या ब्रह्मपदावर आरूढ झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. सारांश, शोपेनहौएर विरुद्ध नीट्झ्शे म्हणजे बौद्ध विरुद्ध वैदिक तत्त्वज्ञान होय.

आतां नीट्झ्श हा जसा बौद्धमतानुयायी शोपेनहौ-एरला सोडून निराळा झाला तसा च खैस्त्यमतानुयायी वाग्नेरला हि सोडून बाजूला सरला म्हणून मागें सांगितलें च आहे. मूळ तो जितका शोपेनहौएरचा भक्त होता तितका च वाग्नेरचा हि होता. पण शोपेनहौएरमध्यें बुद्ध दिसल्याबरोबर जसा त्यानें त्याचा परित्याग केला तसा च वाग्नेरमध्यें खिस्त

पाहिल्याबरोबर त्याचा हि त्यानें त्याग करण्यास लवमात्र मागें घेतलें नाहीं. अर्थात् या वरून नीटूझ्श हा जसजसा वैदिक तत्त्वज्ञानांत खोल शिरत चालला तसतसा बौद्ध आणि खैस्त्य यांचा पक्का विरोधक बनत गेला ही गोष्ट उघड सिद्ध होत आहे. त्यानें ' वेळीं अवेळीं सुचलेले विचार ' या मथळ्याखालीं जे चार लेख लिहिले त्यांतील पहिला लेख स्ट्रौस्सवर ( १८७३ ), दुसरा इतिहासावर ( १८७४ जानेवारी ), तिसरा शोपेनहौएरवर ( १८७४ आगस्ट ), आणि शेवटचा वाग्नेरवर ( १८७५–७६ ) सालीं लिहिला. पहिले दोन जितके टीकात्मक आहेत तितके च दुसरे दोन स्तुतिपर आहेत. पैकीं शोपेनहौएरवरील निबंधांत त्यानें राष्ट्रशिक्षक कसा असावा याचें आपल्या कल्पनेप्रमाणें जें वर्णन केलें आहे तें आतांपर्यंत वर नमुद केलें च आहे. शोपेनहौएरशीं त्याचा परिचय केवळ ग्रंथद्वारें होता पण वाग्नेरशीं मात्र साक्षात् होता. त्याला जसा प्रथम शोपेनहौएरमध्यें नमुनेदार तत्त्वज्ञ दिसला तसा वाग्नेरमध्यें नमुनेदार कलाभिज्ञ आढळला आणि त्या भरांत त्यानें ' बिरायट येथें रिचर्ड वाग्नेर ' हा लेख प्रसिद्ध केला. अर्थात् या लेखांत जो वाग्नेर आहे तो वास्तविक नाहीं तर नीटूझ्शेच्या कल्पनेंतील आहे हें उघड आहे. येथें त्यानें आपल्या तरुण वयांतील भक्तीच्या आणि उत्साहाच्या भरांत वाग्नेरची आणि त्याच्या कलेची जी अपरंपार स्तुति केली आहे तिचा अर्थ केवळ आपण आपल्या भावनेनें जाणला तर च समजणार आहे नाहीं तर नाहीं. या लेखांत त्यानें

आपल्या आवडत्या वीराला पूर्णत्वाला नेण्याला जे जे गुण अवश्य होते ते सर्व सढळ हातानें अर्पण केले आहेत, नव्हे त्यानें त्याला अगदीं देवपदावर नेऊन बसविलें आहे. यांत आश्चर्य भक्ताचें नाहीं तर त्या खोट्या देवाला आपण खरें आहोंत असें वाटलें याचें आहे. कारण हा निबंध प्रसिद्ध झाल्याबरोबर वाग्नेरनें त्याला पत्र पाठवून बिरायट येथें होणाऱ्या आपल्या पुढील नाटकाच्या रंगित तालमीला पाचारण केलें आणि त्यांत म्हटलें " प्रियमित्रा तुझें पुस्तक कांहीं अपूर्व आहे, तूं माझ्या संबंधीं इतकी माहिती कोठून मिळविलीस ? "

शोपेनहौएर आणि वाग्नेर. नीट्झ्शेनें हीं दोन्हीं चित्रें त्या त्या निबंधांत केवळ स्वमतांच्या पुष्टीकरणार्थ आपल्याला जशीं पाहिजे होतीं तशीं रंगविलीं असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. मात्र हें काम त्यानें जाणूनबुजून केलें असें नाहीं तर आपोआप घडून आलें. कारण त्या त्या वेळीं त्यांचे ठायीं त्याला ते ते गुण दिसले किंवा अधिक सयुक्तिक म्हणजे त्यानें ते तेथें आपल्या उत्कट कल्पनाचक्षूनें पाहिले. म्हणून च पुढें कांहीं कालानें जेव्हां त्याला एतत्संबंधीं खरें काय याचा साक्षात्कार आला आणि त्याचा भ्रमनिरास झाला तेव्हां त्यानें आपल्या आत्मचरित्रांत याचा स्पष्ट खुलासा केला आणि त्यांत आपलें पूर्वीचें मत कसकसें बदलत गेलें हें उघड करून दाखविलें. तो म्हणतो, " माझा ' बिरायट येथें वाग्नेर ' हा निबंध म्हणजे माझ्या स्वतःच्या भावी आकांक्षेचें

कल्पनादृश्य आहे........आतां आज जेव्हां मी त्याकडे मागें वळून पाहतों तेव्हां मला हें कबूल करणें भाग आहे कीं तो निबंध मुळांत केवळ माझ्या संबंधीं च बोलत आहे." पुनः सदर ग्रंथांत तो आणखी असे उद्गार काढतो, "माझ्या तरुण वयांत मी जें वाग्नेरच्या काव्यगानांत श्रवण केलें त्याचा वाग्नेरशीं अर्थाअर्थीं कांहीं संबंध नव्हता: जेव्हां मी डायोनिसियन म्हणजे भैरव गायनाचें वर्णन केलें तेव्हां केवळ मी जें ऐकलें होतें तें वर्णिलें, आणि या प्रकारें मी माझ्या स्वात्म्याच्या ठायीं जें काय धारण केलें होतें तें सर्व त्या नवीन कलेच्या सारगर्भीत भाषांतर आणि रूपांतर करून दाखविलें. याचा अति मोठा पुरावा म्हणजे माझा 'बिरायट येथें वाग्नेर' हा निबंध होय: ह्या पुस्तकांतील सर्व निश्चित मनोविज्ञानविषयक उताऱ्यांत जेथें जेथें 'वाग्नेर' हें नांव दृष्टीस पडेल तेथें तेथें वाचकानें निखालस **माझें** नांव किंवा 'झरथुष्ट्र' हें नांव वाचावें."

हे निबंध लिहिण्यांत नीट्झ्शेची मुख्य दृष्टि आधुनिक बिघडलेल्या परिस्थितीकडे होती आणि ती सुधारण्याकरितां जो उच्च मानवी नमुना पाहिजे तो कसा तयार होईल या बद्दल त्याचे मनांत एक सारखी तळमळ लागून राहिली होती. त्याच्या मतें ज्या मार्गांत असा नमुना तयार होतो तो च खरा संस्कृतीचा मार्ग आणि अशा संस्कृतीला उत्पादक आणि पोषक जें तत्त्वज्ञान व जी कला तें च खरें तत्त्वज्ञान आणि ती च खरी कला. बाकी सर्व तत्त्वज्ञान आणि कला असत्व-

रूपाच्या होत. अशा तत्त्वज्ञानाचें गुणकार्य दर्शविण्याकरितां त्यानें शोपेनहौएरचें उदाहरण घेतलें आणि कलेचा नमुना दाखविण्याकरितां वाग्नेरला पसंत केलें. त्यानें शोपेनहौएरचें क्रांतिकारक तत्त्वज्ञान वाग्नेरच्या कलेंत पाहिलें आणि ती कला त्याला सकृद्दर्शनीं आधुनिक परिस्थितीच्या सुधारणेला अत्यंत उपकारक दिसली. या परिस्थितीचें त्यानें वाग्नेरवरील निबंधांत जें वर्णन केलें आहे तें येणें प्रमाणें:—

"हल्लीं आमच्या काळची भावना किती विलक्षण रीतीनें विपर्यस्त झाली आहे आणि हल्लींचें आमचें युग या विपर्यया संबंधीं किती पूर्णपणें निस्संज्ञ बनलें आहे हें दाखविण्या करितां मी फक्त दोन च उदाहरणें सादर करतों. पूर्वींच्या काळीं व्याजबट्टा करणारे सावकार हे अगदीं मनापासून तिरस्काराच्या दृष्टीनें अवलोकिले जात असत, मग ते जरी किती उपयोगी मानण्यांत येत असले तरी हरकत नाहीं; कारण ही गोष्ट सामान्यतः सर्वांना च कबूल आहे कीं प्रत्येक समाजाला आपलीं आंतडीं जपून ठेवणें भाग असतें. परंतु आतां हल्लींच्या मानवत्वाच्या जीवितांत ते एक सत्ताधारी शक्ति होऊन बसले आहेत. कारण या जीविताचा जो अत्यंत प्रलोभक भाग आहे तो च ते बनून राहिले आहेत. तसें च पूर्वींच्या काळीं चालू दिवस किंवा चालू क्षण यांची फारशी मातब्बरी न करण्याकडे लोकांना बजावण्यांत येत असेः 'कशांत कांहीं आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं' असें सांगून ज्या गोष्टी शाश्वत आहेत त्यांची काळजी वाहण्यास उपदेशिलें जात असे. आतां आधुनिक माणसाच्या मनांत फक्त एक च प्रकारचा महत्त्वाचा अर्थ उरला आहे, आणि तो वर्तमानपत्र आणि तारायंत्र यांनीं आणलेल्या संदेशापुरता च मर्यादित आहे. प्रत्येक दिव्य कलाकाचा गुण वाढवा, तो कांहीं तरी हिशोबाला लावा,

आणि त्याची शक्य तितक्या जलद किंमत करा !—एखाद्याला वाटावें कीं या आधुनिक मनुष्यांच्या जवळ फक्त एक च सद्गुण काय तो शिल्लक राहिला आहे—मनाचें प्रसंगावधान. दुर्दैवानें तो अति किळसवाण्या आणि कधीं तृप्त न होणाऱ्या धनलोभाच्या सर्वव्यापित्वाशीं अगदीं तंतोतंत मिळून जातो, आणि चोरून पाहणारा फाजील चौकसपणा सार्वत्रिक उमटतो. कारण प्रश्न असा आहे कीं आजकाल मन हें खरें च अवधान बाळगून आहे कां? परंतु हा मुद्दा भावी न्यायाधिशांनीं सोडविण्याकरितां तसा च बाजूला टाकूं; आधुनिक मनुष्यांना चाळणींतून चाळून काढण्याचा त्यांना च एक हक्क आहे. तथापि हल्लींचें युग गांवढळ आहे ही गोष्ट आपणांस ढळढळीत पाहतां येण्यासारखी आहे, आणि तसें तें कां आहे तर ज्या गोष्टीकडे जुनीं उदात्त युगें केवळ तुच्छतापूर्वक पहात होतीं त्या च गोष्टींचें हें युग मोठ्या आदरभावानें पूजन करीत आहे. अर्थात् आज जर तें जुन्या काळच्या विज्ञानाचा आणि लालित्याचा सर्व अमोलिक संग्रह लुटून त्यांतील अति मौल्यवान वस्त्रप्रावरणांमध्यें नाचत बागडत असेल, तर असें करण्यांत तें केवळ आपल्या स्वतःच्या गांवढळपणाचें कुटिल ज्ञान प्रकट करून दाखवीत आहे इतकें च; कारण तें आपल्या अंगावर जो हा पोषाख चढवितें तो उबेकरितां नव्हे तर केवळ आपल्या भोंवतालच्या प्रदेशाला गूढांत नेऊन टाकण्याकरितां होय. आधुनिक मनुष्याचे ठायीं थंडीपासून रक्षण करून घेण्याच्या इच्छेपेक्षां मिथ्याभासानें स्वतःला झांकून घेण्याची इच्छा बलवत्तर दिसून येते. म्हणून च हल्लींच्या काळचे पंडित आणि तत्त्वज्ञ हे हिंदूंच्या आणि ग्रीकांच्या विद्येची आराधना, ज्ञान आणि शांति मिळविण्याकरितां करीत नाहींतः तर त्यांच्या अध्ययनाचा हेतु इतका च दिसतो कीं आपल्या काळांत आपण कोणी विद्वान आहोंत अशी आपणास काल्पनिक कीर्ति मिळावी. जे सृष्टिशास्त्रज्ञ आहेत ते राष्ट्रें आणि

व्यक्तिशः माणसें यांच्या मध्यें चालू संबंधांत जबरदस्ती, डावपेंच, आणि सूड यांचे जे पाशवी स्फोट होतात ते निसर्गाचे कधीं न बदलणारे नियम आहेत असें समजून त्यांचें वर्गीकरण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. इतिहासकार जे आहेत ते, भावी काळीं आमच्या पिढीला न्यायाचा जाब विचारणारा जो एक दिवस येणार आहे त्या दिवसाकरितां स्वतःच्या समर्थनाचा भक्कम पाया तयार करण्याच्या हेतूनें, प्रत्येक युगाला आपला स्वतःचा म्हणून कांहीं विशिष्ट हक्क असतो आणि आपल्या स्वतः पुरत्या कांहीं खास परिस्थिति उपस्थित होतात हें सिद्ध करण्यांत आस्थापूर्वक गर्क झाले आहेत. राजशासनाचें शास्त्र, वंशाचें, व्यापाराचें, आणि न्यायतत्त्वाचें, या सर्वांना हल्लींच्या काळीं केवळ क्षमायाचनेच्या पूर्वतयारीचें रूप आलें आहे; हें च काय, पण आज काल जी थोडी बुद्धिमत्ता, धन आणि मान यांच्या जबरदस्त यंत्रांत खर्ची न पडतां कार्यतत्पर असलेली दिसते ती सुद्धां आपल्या डोळ्यापुढें हें च एक ध्येय ठेवतें कीं चालू काळाचें समर्थन कसें करावें आणि तत्प्रीत्यर्थ क्षमेची याचना कशी भाकावी ! ”

प्रस्तुत निबंधांत नीट्झ्शेनें कलेची जी सुंदर मीमांसा केली आहे ती भैरवी स्वरूपाची आहे हें निराळें सांगावयास नको च. अशी कला जी प्राचीन ग्रीक वाङ्मयांत होती ती हल्लींच्या काळीं त्याला एका वाग्नेरच्या काव्यांत दिसून आली आणि त्याबरोबर वाग्नेर हा त्याला मोठा नमुनेदार कलाज्ञ वाटला. परंतु पुढें जेव्हां बाहेरची चकाकी जाऊन त्याचें अंतःस्वरूप उघडें पडलें तेव्हां तें त्याला अति हिडिस म्हणजे खिस्ती दिसूं लागलें. त्यानें शोपेनहौएर बरोबर वाग्नेरचा हि त्याग केला आणि त्याचे जागीं निराळा च झरथुष्ट्र आणून

बसविला. ही झरथुष्ट्राची मूर्ति शुद्ध कल्पनामय असल्यामुळें ती त्याला जशी पाहिजे होती तशी सजवितां आली आणि त्या नांवाखालीं अखेरपर्यंत त्यानें आपल्या सर्व तत्त्वज्ञानाची मांडणी केली. प्राचीन औपनिषदिक तत्त्ववेत्त्यांप्रमाणें च त्याला हि आपणांस कोणी गुरु व शिष्य असावेत अशी आकांक्षा होती, नव्हे त्याबद्दल त्याला तीव्र तळमळ लागून राहिली होती. तसें च आपणांस कोणी योग्य स्नेही असावेत असें हि त्यास वाटत होतें. त्यानें शोपेनहौएरला गुरु केला आणि वाग्नेरला जिव्हाळ्याचा दोस्त मानला. पण पुढें दोघे हि जेव्हां त्याला कुचकामाचे दिसले तेव्हां त्यानें क्षणाचा विलंब न करतां त्यांना झिडकारून टाकलें. त्याचा झरथुष्ट्र म्हणतो,– " जो ज्ञानाचा वीर असतो तो केवळ आपल्या शत्रूंवर च प्रेम करण्यास समर्थ असतो असें नाहीं तर तो आपल्या मित्रांचा हि द्वेष करूं शकतो. " शोपेनहौएर आणि वाग्नेर गेल्या नंतर त्यांची जागा दुसरे कोणी भरून काढतील कां अशी त्यास उत्कंठा लागली. त्यानें १८८९ मध्यें आपल्या बहिणीला पत्रांत लिहिलें,–" मी एका अति मोठ्या वादग्रस्त प्रश्नाला तोंड देऊन एकटा च उभा आहे. जणुं काय मी एखाद्या निर्जन अरण्यांत, अगदीं आद्यकालीन अरण्यांत वाट चुकून स्मृतिनष्ट झालों आहे: मला मदतीची अपेक्षा आहे, मला अंतेवासी शिष्यांची अपेक्षा आहे, मला गुरूची अपेक्षा आहे. आज्ञा प्रतिपालन करण्यांत किती तरी गोडी आहे! मी जर डोंगरावर रस्ता चुकलों तर ज्याला तो

माहीत असेल त्याची आज्ञा पाळीन; आजारी पडलों तर भेषजाच्या अनुरोधानें चालेन; आणि जर कोणा एखाद्या अशा सत्पुरुषास भेटलों कीं जो आमच्या नैतिक कल्पनांच्या योग्यायोग्यतेवर चांगला प्रकाश पाडूं शकेल तर त्याचें वचन शिरसा मान्य करून त्याचा अनुयायी होईन. पण मला कोणी भेटत च नाहीं—अंतेवासी नाहीं आणि गुरु तर त्याहून नाहीं. .... . मी एकटा आहे." १८८३ सालीं पीटर गास्टच्या पत्रांत तो म्हणतो, "ह्या जिवंत मानवलोकांत मला असे कोणी च कसे भेटत नाहींत कीं जे माझ्या पेक्षां फार वर उंच पाहतात आणि माझ्याकडे पाहण्यास त्यांना दृष्टि खालीं आणावी लागते? याचें कारण हें तर नसेल कीं त्या मानानें माझें संशोधन फार थोडें आहे?" शोपेनहौएर सुटल्यानंतर त्याचा गुरु गेला आणि वाग्नेर सुटल्यानंतर त्याचा स्नेही नष्ट झाला. शिष्य तर त्याच्या हयातींत त्याला कोणी लाभला च नाहीं. आपणाला सुहृदांची किती उणीव भासत आहे या बद्दल त्यानें आपले विचार आपल्या "सदसतांच्या पलीकडे" नामक ग्रंथाला "पर्वताच्या उंच शिखरावरून" (Aus hohen Bergen) नामक जें परिशिष्टरूपानें गाणें जोडलें आहे त्यांत स्पष्ट व्यक्त करून दाखविले आहेत.

खऱ्या तत्त्वज्ञाचें लक्षण हें च कीं तो जितका तत्त्वाला मान देतो तितका व्यक्तीला देत नाहीं. नीट्झ्श हा खरा तत्त्वज्ञ होता. प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञानी पुरुषांत तो आरिस्टॉटलला फार मान देतो परंतु प्रसंगविशेषीं त्याला चूक

ठरवून 'ट्रॅजिक' (भैरवी कला) शब्दाचा अर्थ आरिस्टाटलला कळला नाहीं तो मी च प्रथम जाणला असें मोठ्या प्रौढीनें प्रतिपादन करतो. प्लेटो आणि कांट या दोहोंबद्दल जरी त्याला सारखें च अप्रेम असलें तरी रूसोच्या धर्तीवर संघ-शाहीची तरफदारी करणाऱ्या कांटपेक्षां उद्घशाहीचा पुरस्कर्ता प्लेटो हा अनंतपटीनें बरा मानतो. तो पास्कलबद्दल हि बहु-मान दर्शवितो पण त्याचा खिस्तीपणा क्षणमात्र सहन करीत नाहीं. गटेचा तर तो अनन्यसामान्य भक्त होता. पण एकदां त्यावर हि त्यानें टीकेचें हत्यार उपसलें आणि त्याच्या मताचें खंडन केलें. गटेनें एका ठिकाणीं म्हटलें आहे, "यौवनावस्थेंत आपण केवळ विषयलंपट असतों, तारुण्यांत प्रेमाच्या उच्च भावनेनें ध्येयवादी बनतों, पुढें प्रेमाची ऊर्मि जशी कमी होते तसे नास्तिकमार्गाला लागतों, शेवटीं वार्ध-क्यांत निर्वाणाच्या महाशांतींत स्तब्धता पावतों." यावर नीट्झशे म्हणतो,–"असें नाहीं, निर्वाण हा जीवनाचा शुद्ध निषेध आहे. त्यांतील शांति म्हणजे मृत्यू च होय. त्या पेक्षां तरुणपणीं मरणें बरें. ग्रीक लोक वार्धक्याचा तिटकारा करीत. त्यांना तें बरें वाटत नसे. मला पूर्वीं आपल्या जवळ शिष्य असावेत असें वाटें. त्या बद्दल माझ्या आशा अगदीं अधीर झाल्या होत्या. आतां जसजसा मी अधिकाधिक विचार करीत आहे तसतसा माझा अधीरपणा जात चालला आहे, पण आशा मात्र कायम राहिल्या आहेत. मी जगताचा स्वामी होत आहे. मी जगद्भाव पावत आहे." ही

च खरी शांति. हें च खरें निर्वाण. पण तें गटे आणि शोपेनहौएर यांना आकलन न झालेलें गीतेचें ' बुद्धिग्राह्य ' आणि ' अतींद्रिय ' अशा आत्यंतिक सुखाच्या स्वरूपाचें ' ब्रह्मनिर्वाण ' होय, बुद्धाचें केवळ दुःखविलयात्मक, ब्रह्मशून्य ' निर्वाण ' नाहीं.

नीट्झशेला प्रथम शोपेनहौएरपासून निराशावादाचें रहस्य कळलें. पुढें त्यानें आपल्याठायीं त्याला व्यावहारिक आशावादित्वाचें रूप दिलें. ही च त्याची बौद्धमार्गाकडून वैदिक मार्गाकडे प्रगति झाली. त्याला मनुष्याची **अपूर्णता** जाणवली. इतकी कीं शोपेनहौएरवरील निबंधांत त्यानें मानवजातीला 'विनाशाचें क्षेत्र' हें नांव दिलें. पण येथें च तो थांबला नाहीं. ही अपूर्णता जाऊन मनुष्याची पूर्णता कशी होईल या प्रश्नाकडे त्याचें लक्ष वेधलें. त्याला ख्रिस्तीदेव या कामीं कुचकामाचा दिसला. हा देव कसा, तर एकटा च एक, ज्याला इतर देवांचें अस्तित्व खपत नाहीं असा. पुन्हा त्याला बुद्धाचा अदेववाद हि निरर्थक वाटला. त्यानें ग्रीक देवमंडलाकडे पाहिलें आणि त्याला ' देव एक **नाहीं** अनेक **आहेत** ' असा साक्षात्कार झाला. येथें च त्याला मनुष्याची पूर्णता कशांत आहे या प्रश्नाचा उलगडा झाला. **मनुष्य हा देवकोटींत गेला पाहिजे.** त्या वांचून त्याची पूर्णता नाहीं. ही शुद्ध वैदिक कल्पना आहे. ही एक च एक कल्पना त्याची शेवटपर्यंत कायम राहिली. या ध्येयाला धरून त्यानें मानवाचा, त्याच्या कर्मांचा, ज्ञानाचा आणि सदसत् आचरणाचा विचार केला. देवाबद्दल केवळ

भीति नाहीं तर आदरभाव, नुसतें प्रेम नाहीं तर कृतज्ञता-बुद्धि, शुद्ध प्रार्थना नाहीं तर यज्ञीय दान यांचें महत्त्व त्याला दिसूं लागलें. त्याला तपाचें सामर्थ्य कळलें. त्यानें बलेच्छे ( Will to Power ) च्या दृष्टीनें तपश्चर्येची ( Will to Suffer ) ची कास धरली. एका शब्दांत सांगावयाचें तर त्याला यज्ञ, दान, तप या त्रयींत देव दिसला. भगवंतांनीं म्हटलें च आहे, यज्ञ-दान-तप हीं मनीषींना पावन करणारीं असल्यामुळें " यज्ञदानतपः कर्म न त्याज्यं कार्यमेव तत्. " नीतीच्या संपूर्ण विधायक मार्गांत हे तीन च विधि मुख्य आहेत, अधिक नाहींत. या त्रयी पासून निष्पन्न होणाऱ्या तत्त्वज्ञानावर नीटझ्शेनें पुढें व्यक्तीच्या जीवनाचा आणि समाजाच्या धारणेचा विचार केला आणि त्यांत त्याला चातुर्वर्ण्याचें यथार्थ महत्त्व दिसून आलें. त्यानें स्ट्रौस्सवरील निबंधांत चारी वर्णांचा स्पष्ट उल्लेख केला आहे आणि खिस्तां-तकांत त्यां पैकीं पहिल्या तीन वर्णांचीं गुणकर्में विशद करून दाखविलीं आहेत.

चातुर्वर्ण्य ही निसर्गाची रचना आहे, मानवाची नाहीं, असें त्याचें ठाम मत आहे. त्यांतील श्रेष्ठकनिष्ठभाव ( Rangordung = Order of Rank ) हा संपूर्ण जीव-सृष्टीचा नियम आहे. तो जसा मानवदेहाच्या रचनेंत दिसतो तसा च त्याच्या समाजांत उतरतो. ही संस्कृति निश्चयानें भीषण पायावर उभारली जाते. कारण तींतील उच्च मानवाला अधिक उच्च बनण्याला जो मुबलक कालावधि लागतो तो

पुष्कळांनीं थोड्यांकरितां जेव्हां अति श्रम करावे तेव्हां सिद्ध होतो. हे श्रम करणारे दास असतात. चातुर्वर्ण्यांत ते शूद्र आहेत. आणि शूद्रांचें स्वाभाविक कर्म दास्य आहे असें श्रुतिस्मृत्यनुसार भगवद्गीतेंत सांगितलें आहे. अर्थात् संस्कृति जर नैसर्गिक म्हटली तर दास्य हें तितकें च नैसर्गिक ठरतें. कारण तो संस्कृतीचा पाया आहे. संस्कृतीची भव्य इमारत दास्याच्या भक्कम पायावर उभी राहते. सामान्यजनता ही अत्युच्चाला आधारभूत पाया होते. हें तत्त्व पूर्वीं जसें वोल्फनें जाणलें तसें च नीट्झ्शेला आकलन झालें. म्हणून नीट्झ्शेनें आपल्या स्मरणलेखांत म्हटलें आहे, "जेव्हां मी फ्रीड्रिख औगुस्ट वोल्फ यानें संस्कृतीच्या सिद्धीकरितां दास्याची आवश्यकता आहे हें तत्त्व प्रतिपादिलेलें पाहिलें तेव्हां माझ्यापूर्वीं या मोठ्या मनुष्यानें हे दणकट विचार स्पष्टपणें कसे प्रकट केले याबद्दल मला त्याची धन्यता वाटली, असे विचार इतर कोणा हि क्षुद्राच्या मनाला शिवले नाहींत." प्राचीन उपनिषदांनीं या अन्नमय जगतांत प्रत्येक खालची पर वरचीचें 'अन्न' आहे—म्हणजे पंचमहाभूतें हें वनस्पतींचें अन्न, वनस्पती प्राण्याचें अन्न, प्राणी मानवाचें अन्न, मानव देवाचें अन्न,–असें म्हटलें आहे. असें अन्न खाऊन च उच्चाचें उच्च गुणरूप तयार होतें. हा च उत्क्रांतीचा निरपवाद नियम होय. जुन्या ग्रीक व रोमन लोकांत दासवर्ग होता. म्हणून च तेथें इतकी संस्कृति जन्मास आली. हल्लीं समाजांतून जसजसें दास्य कमी होत आहे तसतसें

संस्कृतीचें रूप हीन बनत चाललें आहे. तथापि निसर्गांतून दास्य पूर्णपणें कधीं च नाहींसें होणार नाहीं, निराळ्या बुरख्याखालीं कायम राहील. कारण त्यावांचून निसर्गाचें गाडें चालणार नाहीं. हल्लीं सर्वत्र बोकळलेला सर्वस्वातंत्र्यवाद हा संस्कृतीला विघातक आहे. युरोपला खरी संस्कृति प्राप्त करून घ्यावयाची असेल तर निराळी सृष्टि च बनविली पाहिजे. उच्च मनुष्य– समान मनुष्य नव्हे–हें ध्येय पुढें ठेऊन समाजाची नवीन रचना केली पाहिजे. त्या करितां ख्रिस्ती नीतिमूल्यें टाकून मनुस्मृतीचीं नीतिमूल्यें अवलंबिलीं पाहिजेत, आणि जुनें तत्त्वज्ञान सोडून नवीन तत्त्वज्ञान निर्माण केलें पाहिजे. पांडित्य आणि शास्त्र हीं कांहीं परम अंतिमें नाहींत तर तीं केवळ तत्त्वज्ञानाचीं उपकरणें आहेत, त्याच्या सेविका आहेत, इतकें च.

नीट्झ्शेच्या या विचारसरणीला जॉर्ज ब्रँडीस यानें ‘ उच्चांच्या सत्ताधारीपणाला अनुसरून मूळापासून सुधारणा ’ ( Aristocratic Radicalism ) हें नांव दिलें आहे तर प्रो. हॉफ्फडिंग यानें ‘ मूळापासूनच्या सुधारणेला अनुसरून उच्चांचा सत्ताधारीपणा ’ ( Radical Aristocraticism ) असें म्हटलें आहे. खरें तत्त्व अवलोकन करण्यास लागणारी दिव्य दृष्टि नसल्याकारणानें एखादा सामान्य युनिव्हर्सिटी प्रोफेसर बाहेरच्या शब्दावडंबरांत कसा रममाण होतो याचें हें उत्तम निदर्शक आहे. नीट्झ्शेसारख्या खऱ्या तत्त्वज्ञाचें लक्षण हें च कीं तो तत्त्वाला जितका मान देतो तितका

दुसऱ्या कशाला देत नाहीं. अर्थात् त्याला जसें चातुर्वर्ण्याचें महत्त्व कळतें तसें ह्या युनिव्हार्सिटी प्रोफेसरांना कळत नाहीं. किंबहुना त्यांना त्याचें रहस्य जाणण्याची ऐपत च नसतें

'चातुर्वर्ण्य' हें एक च एक संस्कृतीला उपकारक समाजाचें रूप आहे. म्हणून हा दैवी समाज होय. भगवंतांनीं तो "मया सृष्टं" असा कथन केला आहे. तदितर सर्व प्रकारचे समाज कमी अधिक प्रमाणांनीं संस्कृतीला हानिकारक आहेत. अशा संस्कृतीच्या दृष्टीनें च केवळ नीट्झशेनें कला, शास्त्र, आणि तत्त्वज्ञान यांचा विचार केला आहे. प्रथम त्यानें शोपेनहौएरच्या ठिकाणीं तत्त्वज्ञानाची कला पाहिली आणि नंतर वाग्नेरच्या ठिकाणीं कलेचें तत्त्व जाणलें. तथापि त्याचें स्वतःचें ध्येय फार उच्च असल्याकारणानें त्याला शोपेनहौएरचें तत्त्वज्ञान आणि वाग्नेरची कला हीं दोन्ही कोतीं दिसूं लागलीं आणि त्यानें त्यांचा त्याग करून आपला स्वतंत्र मार्ग आंखला. वाग्नेर सुटल्यानंतर तो कलेकडून शास्त्राकडे वळला असें प्रो. रील्चें म्हणणें आहे. तथापि शास्त्र, कला, आणि तत्त्वज्ञान ह्या तिहींच्या समवायांत त्याला शेवटीं मानवी जीवनाचा उलगडा झाला हें खरें. त्याच्या मतें कला ही शुद्ध चैनीची वस्तु नाहीं. ती केवळ करमणुकीखातर अवलंबावयाची नाहीं. तर तें जीवनाचें आद्य तत्त्व आहे. मनुष्य हा कलावान् प्राणी आहे. कलेच्या योगें त्यास आपलें जीवन चालवितां येतें. कलेंत स्थिति आहे आणि कलेंत च उन्नति आहे. म्हणजे मानवाचा

संपूर्ण ' धारणात्मक ' धर्म कलात्मक आहे. हा च भगवंतांनीं गीतेंत कथन केलेला ' योग ' होय. त्याची व्याख्या ' कर्मसु कौशल ' अशी आहे. तथापि योग म्हटला कीं त्यांत यज्ञ आला च. आणि यज्ञ म्हटला कीं त्यांत दान आणि तप हें हि आलें. येथें च कलेंतील भीषणतेचा साक्षात्कार येतो. सामान्य मनुष्याला कलेंतील सुखाचा आस्वाद पाहिजे असतो. त्याच्या उपयुक्ततावादांतून किंवा सुखवादांतून ' पुष्कळांचें पुष्कळ सुख ' ही कल्पना निर्माण होते. परंतु खऱ्या कलावंताच्या दृष्टीला थोड्यांच्या अउच्च सुखाकरितां पुष्कळांचें महान् दुःख दिसत असतें. नीट्झशेनें " भीषण कलात्मक नाटकाचा जन्म " नामक ग्रंथांत स्पष्ट म्हटलें आहे कीं, जेव्हां कला ही करमणुकीखातर अवलंबिण्यांत येते तेव्हां ती निश्चयानें अधोगतीला जाते. अशी कला वाग्नेरच्या हातांत अवनत झालेली त्यानें पाहिली. म्हणून च तो वाग्नेरवर रुष्ट झाला व त्यानें त्याचा त्याग केला. पुन्हा कला ही कलेकरितां म्हटली कीं तींत लाभालाभ आणि जयाजय यांबद्दल पूर्ण बेफिकीर वृत्ति आली. याला च गीतेंत ' समत्व ' म्हटलें आहे, आणि योगाची दुसरी व्याख्या ' समत्वं योग उच्यते ' अशी केली आहे. म्हणून कलेची किंमत तिच्या परिणामावरून पहावयाची नसते. याला उदाहरण ख्रिस्तीधर्माचें आहे. त्या धर्माला जुन्या पेगन धर्मावर विजय मिळालेला असला तरी तेवढ्यानें तो धर्म उच्च ठरत नाहीं तर उलट कला, योग, आणि संस्कृति यांच्या अभावीं स्वाभाविक रीत्या च हीन ठरतो असें

नीट्झ्शेचें म्हणणें आहे. पुष्कळांना पुष्कळ सुख, किंवा नीचांना उच्च सुख मिळवून देण्याकरितां तो जन्मास आलेला आहे, आणि त्यांत च संस्कृतीच्या विनाशाचें बीज आहे. नीट्झ्श म्हणतो, सर्वांत अत्युच्च गोष्ट कोणती तर भीषण मृत्यु, आयुष्याची व्यर्थ लांब दोरी नव्हे. हें च काय, पण असा मृत्यु जीवनापेक्षां आणि विजयापेक्षां हि श्रेष्ठ आहे. पुष्कळ लोक जगावें कसें याचा विचार करतात पण कोणी च (एका भीष्माचार्यांशिवाय) मरावें केव्हां याचा करीत नाहींत.

सामान्य जनता किंवा लोक हे सदा सामान्य च असतात आणि म्हणून अगदीं अनुकंपा करण्यासारखे समानरूप दिसतात. त्यांत भेदाभेद निर्माण करणें हें संस्कृतीचें काम आहे. निसर्गांत-पशुपक्ष्यादि प्राणिसृष्टींत-सहज भेदाभेद दिसतो, पण तो नीच मार्गावर असतो. समाजांत तो मोडून सर्वांना सारखें रूप देण्याकडे प्रवृत्ति असते. संस्कृतींत पुनरपि भेदाभेद उच्च मार्गावर स्थापन करावा लागतो. ही च उत्क्रांतीची गति होय. पण ती मानवामानवांत श्रेष्ठकनिष्ठभाव निर्माण केल्यावांचून सिद्ध होत नाहीं. सर्व मानव समसमान झाले कीं उत्क्रांति थांबली. मूळ ख्रिस्ती धर्मानें उपस्थित केलेला आणि फ्रेंच राज्यक्रांतींत प्रतिष्ठा पावलेला जो सर्व-समतावाद आज सार्वत्रिक रीतीनें पुकारला जात आहे त्यांत मनुष्याचें व्यक्तिगत बल कमी होत चाललें आहे असें नीट्झ्शे प्रमाणें हॅव्हेलॉक एलिस् याचें हि मत आहे. नीट्झ्श म्हणतो, प्राचीन ग्रीक लोक जे इतके विलक्षण मनोवेधक आणि मह-

त्वाचे दिसतात याचें कारण त्यांच्यांत पुष्कळ मोठमोठे वीरपुरुष निर्माण झाले. अर्थात् ही गोष्ट कशी घडून आली हा मुख्य विचाराचा प्रश्न आहे. याचें उत्तर राष्ट्राच्या शिक्षणांत आहे. तो म्हणतो, मला ज्या एका च गोष्टीबद्दल विशेष कळकळ वाटते ती ही कीं व्यक्तीच्या शिक्षणाविषयीं लोकांचें कर्तव्य काय आहे. शिक्षण असें पाहिजे कीं त्यांत तरुण पुरुषाला तेज, ओज, आत्मप्रतीति आणि प्रेम हे गुण निश्चयानें प्राप्त व्हावेत. पण असें शिक्षण देणाऱ्या आज देशांत संस्था कोठें आहेत आणि शिक्षक तरी कोण आहेत? शिक्षणांतील मुख्य महत्त्वाचे विषय म्हणजे इतिहास आणि तत्त्वज्ञान हे होत. एकांत मानवाचें चरित्र कळतें आणि दुसऱ्यांत त्यांतील रहस्य उलगडतें. परंतु आज या दोहोंची स्थिति काय आहे? एका शब्दांत सांगावयाचें तर दोन्ही कलाविहीन आहेत. असा कलाविहीन इतिहास किती भाराभर शिकला आणि शिकविला तरी त्याचा उपयोग काय? नीट्‌झ्श म्हणतो, "हल्लींचें इतिहासाचें शिक्षण हें देशाच्या अवनतीचें आणि व्यक्तीच्या बलहीनतेचें भयंकर चिन्ह आहे. तें असें दर्शवीत आहे कीं देशांत जी पहिली तापाची सांथ पसरेल तिला हे लोक स्वतःच्या जिवाला धक्का पोंचेल इतक्या जवळ बळी पडतील—इतर सर्व तापांत राजकीय ताप. आतां, आधुनिक विचाराच्या इतिहासांत हे सुशिक्षित पंडित या बलहीनतेच्या परिस्थितीचें चांगलें उदाहरण आहे—सर्व प्रकारच्या सुधारणावादी आणि क्रांतिकारक चळवळींपासून अगदीं विरुद्ध. त्यांनीं

जें कार्य अंगीकृत केलें आहे तें खास श्रेष्ठ दर्जाचें नाहीं. 'प्रतिपन्नवस्तुषु निर्वाह' करण्यांत आणि त्यांत मिळणारें अल्प सुख उपभोगण्यांत ते पूर्ण संतुष्ट आहेत. कोणी स्वतंत्रपणानें आणि वीरवृत्तीनें पुढें पाऊल टाकणारा निघाला कीं हे सर्व मागें पडतात; तथापि त्यांची इतिहासप्रवणता मात्र किंचित् ढळत नाहीं, तर ती जशीच्या तशी कायम राहते." जी गोष्ट इतिहासाची ती च तत्त्वज्ञानाची. म्हणून पुनः तो म्हणतो, "या सुशिक्षित पंडितवर्यांपैकीं बहुतेकांना तत्त्वज्ञानापासून अशी अपेक्षा असते कीं त्यानें आपणांस जवळजवळ वस्तुस्थिति जाणण्यास शिकवावें—फक्त जवळजवळ वस्तुस्थिति—म्हणजे त्यांना तिच्याशीं मिळून जाण्यास बरें पडेल. आणि त्याचे अगदीं मोठमोठे पुरस्कर्ते त्याच्या निद्राजनक आणि तुष्टिदायक गुणांबद्दल इतकी विलक्षण स्तुति करतात कीं सर्व झोंपेच्या आणि जेवणाच्या भजकांना आपलें स्वतःचें ध्येय आणि तत्त्वज्ञानाचें ध्येय एक च आहे असें वाटावें........."

नीट्झश म्हणतो, हें सर्व सुधारण्याला एक च उपाय आहे. तो हा कीं, आधुनिक युरोपी जगाला प्राचीन ग्रीक संस्कृतीचें वळण लागलें पाहिजे आणि त्यावर पुनः पौर्वात्य संस्कार घडून आले पाहिजेत. हें द्विविध कार्य पूर्वीं बऱ्या शिकंदराच्या वेळीं जसें घडून आलें तसें आज हि घडून येणें महत्त्वाचें आहे. नाहीं पेक्षां हल्लीं जो सर्वत्र विदूषकांचा कलाशून्य बाजार माजला आहे तो मोडणें शक्य नाहीं. यावत्कालपर्यंत आपल्या भोंवतीं प्रत्येक वस्तु पीडा भोगीत

आहे आणि पीडा देत आहे तावत्कालपर्यंत आपण सुखी होणार नाहीं; जावत्कालपर्यंत सर्व मानववृत्तें जुलूम, विश्वासघात, आणि अन्याय यांनीं निश्चित होत आहेत तावत्कालपर्यंत आपण नीतिमान ठरणार नाहीं; आणि जावत्कालपर्यंत संपूर्ण मानवजात ज्ञानाकरितां धडपड करीत नाहीं आणि व्यक्तीला जीवनाच्या व ज्ञानाच्या अत्यंत स्थिर व युक्त रूपाला प्राप्त करून देत नाहीं तावत्कालपर्यंत आपण शहाणे हि समजले जाणार नाहीं. तर मग, जर कोणाला आपल्या जीवनांतील युद्धप्रसंगांत, उद्योगमार्गांत आणि यशोहानींत कांहीं तरी उच्च आणि उदात्त आहे असें ओळखतां आलें नाहीं, जर कोणाला भीषण नाटकापासून आपण मोठमोठ्या विकारांच्या लयसाम्यांत व त्यांना बळी पडणारांत आनंद कसा मिळवावा हें शिकतां आलें नाहीं तर हा तीन प्रकारची अपूर्णतेची भावना सहन करणें कसें शक्य होईल? असा प्रश्न करून नीट्झ्शेनें कलेच्या आणि विशेषतः भीषण नाटकांतील कलेच्या रहस्याचा पुढीलप्रमाणें उलगडा केला आहे.

" ......कला ही वस्तु व्यावहारिक आचरणाची मार्गदर्शिका किंवा अध्यापिका खास नाहीं: कोणी हि कलावंत केव्हां हि या अर्थानें शिक्षक किंवा उपदेशक असूं शकत नाहीं; भीषण नाटकांतील कथानायक ज्या गोष्टींच्या प्राप्तीकरितां धडपड करीत असतो त्या गोष्टी निश्चयानें इतक्या किंमतीच्या असतात असें नाहीं. स्वप्नसृष्टींत काय किंवा कलासृष्टींत काय, वस्तूंची किंमत जोंपर्यंत आपण त्यांच्या मोहिनीखालीं भारून गेलेले असतों तोंपर्यंत च टिकाव धरून राहते. जें कांहीं आपण, त्या काळापुरतें, प्रयत्न करण्यास इतकें योग्य मानतों,

आणि जें त्या भीषण नाटकांतील नायकाशीं जेव्हां तो आपल्या ईप्सित पदार्थाचा त्याग करण्या ऐवजीं मरण पत्करण्यास तयार होतो तेव्हां आपणांस सहानुभूति धारण करण्यास लाविते, तें जर रोजच्या जीवनक्रमांत तिकडचें इकडें आणून बसविलें तर तें आपली ती पहिली किंमत आणि क्रियाशक्ति क्वचित् च कायम राखील: म्हणून कला ही जो मनुष्य आपली आपण स्वतःची करमणूक करून घेत असतो त्याची च केवळ एक व्यवसायाची बाब होते. तींत आपणाला जी धडपड दिसून येते तें केवळ जीविताच्या कलहाचें ऋजुकरण असतें; तिचे मुख्य विचाराचे प्रश्न म्हणजे मनुष्याच्या कर्मांचे आणि संकल्पांचे जे अनंत गुंतागुंतीचे दृष्टचमत्कार आहेत त्यांचे संक्षेप कसे करतां येतील हें पाहणें. परंतु ह्या एका गोष्टीवरून च—कीं तो, बोलावयाचें च तर, अधिक साध्या जगताचा विचार आहे, जिवनाच्या कोडयाचा अधिक त्वरेनें उलगडा आहे—कला ही आपला मोठेपणा आणि अत्यावश्यकपणा प्राप्त करून घेते. जो कोणी मनुष्य जीवनापासून पीडा भोगीत असतो त्याला ह्या असल्या विचारावांचून गत्यंतर नसतें, जसें कोणा हि मनुष्याला झोंपेवांचून जिवंत राहणें शक्य नसतें. जसजसें निसर्गाच्या नियमांचें शास्त्र अधिकाधिक कठीण होतें तसतशी आपण ह्या ऋजुकरणाच्या कल्पनेची कास हि अधिकाधिक उत्कटतेनें धरूं लागतों, मग ती क्षणैकमात्र असली तरी हरकत नाहीं; आणि प्रत्येक मनुष्याचें सर्वसामान्य सृष्टिज्ञान आणि त्याचें नैतिक व आत्मिक क्रियासामर्थ्य यांच्या मधील ताण अधिक मोठा होतो. कला ही आपल्याजवळ **धनुष्याला कटकन् मोडण्यापासून थांबून धरण्याकरितां आहे.**

" व्यक्तीचें स्वात्मार्पण कांहीं तरी अव्यक्तिकापुढें घडून आलें पाहिजे—हें च भीषण नाटकाचें धोरण आहे: जी काळजी भयंकर मृत्यु आणि काळ मनुष्याचे ठिकाणीं उत्पन्न करीत असतात ती तो

विसरून गेला पाहिजे; कारण त्याच्या आयुष्यांतील कोणत्या तरी क्षणांत, त्याच्या संपूर्ण जीवनमर्यादेंतील काळाच्या कोणत्या तरी अंशभागांत, कांहीं तरी असें एखादें पवित्र त्याच्या पथांत आडवें येईल कीं जें त्याच्या सर्व युद्धसंग्रामांबद्दल व त्यांतील हालअपेष्टांबद्दल त्याला पूर्णपणें भरपाई करून देईल. याचा अर्थ **भीषणाबद्दल जाणीव असणें.** आणि जर एखादे दिवशीं सर्व च मानवजात नष्ट व्हावयाची असेल—आणि याला कोण आक्षेप घेईल!—तर तिला आपला भविष्यकाळचा अत्युच्च साधनमार्ग बहाल करण्यांत आला आहे; तो कोणता, तर तिनें अशा कांहीं ऐक्यामध्यें वाढावें व जगावें कीं तिला आपल्या अखेरच्या सार्वत्रिक प्रलयाशीं एका दिलानें—एका सर्वसामान्य भीषणतेच्या भावनेनें—तोंड देतां यावें: ह्या एका च साधनमार्गांत मनुष्याच्या सर्व प्रभावकारी शक्ति अडकून राहिलेल्या आहेत; मानवजातीनें त्याचा सर्वशः प्रत्यादेश करणें हा मानवप्रेमी पुरुषाच्या अन्तःकरणावर दुःखाचा मोठा घाव बसणार आहे. मला जें कांहीं या विषयासंबंधीं वाटतें तें इतकें च! मानवाच्या भविष्या-बद्दल आशा करण्याला आणि हमी देण्याला फक्त एक च गोष्ट शक्त आहे. ती ही कीं, **त्याची भीषणतेची जाणीव मरून जातां कामा नये.** जर करतां ती त्यानें पूर्णपणें गमावली, तर एक दुःखाक्रांत आरोळी—जिच्या सारखी पूर्वीं कधीं कोणी ऐकली नसेल—सर्व जगभर ठोकावी लागेल; कारण जें कांहीं आम्हीं जाणतों त्यांत उत्पन्न होणाऱ्या आनंदासारखा दुसरा अधिक पवित्र आनंद नाहीं—पृथ्वीवर पुनः भीषण विचाराचा जन्म कसा झाला. कारण हा आनंद सर्वतोपरि अव्यक्तिक आणि सर्वसामान्य आहे: ती मानव-जातीची आडदांड रानटी हर्षनिर्भरता आहे, नव्हे तर जें जें कांहीं मानवी आहे त्या सर्वांशीं त्याचें गूढ नातें असून त्यांत च मानवाची प्रगति आहे."

नीट्झ्शेला मूळ कलेचा बोध ग्रीक नाटकापासून झाला आणि त्यांत च त्याला तिचें भैरवी रूप दिसून आलें. त्याच्या पूर्वी जर्मनींत विंकेलमान्न आणि गऽटे यांना ग्रीक लोक हे आपल्या जिवाला फारसा त्रास न देतां केवळ ख्यालीखुशालींत आयुष्य कंठणारे वाटत होते. नीट्झ्शेनें हें सर्व च दृश्य बदलून टाकलें. त्याला ग्रीकांच्या आयुष्यक्रमांत गंमीरपणा भासमान झाला. त्याच्या मतें यद्यपि ग्रीकांना जगाच्या निरीक्षणांत निराशेनें पछाडिलें असलें तत्रापि त्यांच्या स्वामाविक वृत्तींत आशा भरलेली होती. म्हणून च त्यांच्यांत कला इतकी परिपूर्णतेला गेली. या कलेंत त्याला जन्म-मृत्यु किंवा उत्पात्ति-लय यांचें द्वंद दिसलें व त्यानें सिद्धांत बांधला कीं जन्म आणि मृत्यु किंवा उत्पत्ति आणि लय या दोन्ही कोटी मिळून वस्तु एक च आहे (Leben und Morden ist eins). त्याच्या मतें ग्रीस मधील मोठा वीरकलेचा काळ म्हणजे हेसिअड ( इ० स० पू० ८०० ) पासून एस्चायलस ( इ० स० पू ६०० ) पर्यंत होय. या च काळांत तेथें भीषण नाटकाचा उदय झाला. मूळ ग्रीक देवमंडलांत अपॉलो आणि डायोनिसस हे निरनिराळ्या गुणकर्मांचे निरनिराळे देव होते. यांना वैदिक आणि पौराणिक पर्याय अनुक्रमें वरुण आणि इंद्र व विष्णु आणि शिव हे देतां येतील. वरुण हा ‘ असुर ’ व इंद्र ‘ देव ’ आहे तसा च वरुण हा जेष्ठ व इंद्र कनिष्ठ आहे. असुर = असणारा. देव = चकाकणारा. अगोदर असणें आणि नंतर चकाकणें. संपूर्ण प्राणिसृष्टींत असण्याचा साक्षा-

त्कार प्राणनकर्मावरून म्हणजे श्वासोच्छ्वासावरून होतो. म्हणून 'अस्' धातूचा मूळ वैदिक अर्थ श्वसन करणें (to breathe) आणि नंतर असणें ( to be ) असा आहे. नीट्झ्शेच्या मतें Being ( सत् ) शब्दाचा मूळ अर्थ Breathing (श्वसणें ) आणि नंतर Existing ( असणें ) असा च आहे. अशा असण्या ( Being ) मधून जेव्हां होत राहण्या ( Becoming ) ची क्रिया घडते तेव्हां तें च 'जगत्' सिद्ध होतें; आणि त्या जगतांत उत्क्रांतींच्या ओघामध्यें 'अस्ति' वाचक असुर आणि 'माति' वाचक देव हे एकापुढें एक पर्याय निर्मिले जातात. अर्थात् सद्भाव हा चित्स्वरूपाला पावला किंवा अस्तित्व हें मातित्वाप्रत गेलें कीं तेथें च असुराचा देव बनतो. या प्रकारें 'असुर' वरुण हा स्थिर ( static ) किंवा स्थितिमान् आहे तर 'देव' इंद्र हा चर ( dynamic ) किंवा गतिमान् आहे; आणि वेदांत एकाला बैठा न्यायाचा देव व दुसऱ्याला पराक्रमी युद्धाचा देव मानून त्या प्रमाणें त्यांचें जागोजाग वर्णन केलें आहे.

आतां वेदांत जसा वरुण तसा पुराणांत विष्णु, आणि वेदांत जसा इंद्र तसा पुराणांत शिव आहे. विष्णु हा स्थितिकारक देव आहे तर शिव हा गतिकारक आहे, आणि म्हणून उत्पति-लयकारक आहे. अर्थात् तो यथार्थ महादेव आहे. हिंदुपुराणांतील या हरिहरांच्या जोडीप्रमाणें च ग्रीक पुराणांत अपॉलो आणि डायोनिसस ही जोडी आहे. अपॉलो हा स्थितिमान् ( static ) आणि डायोनिसस गतिमान् ( dynamic ) आहे.

अपॉलो हा स्वप्नसृष्टींतील देव आहे. म्हणून तो खऱ्या सृष्टींतील अनुभवापासून निराळा दिसतो. लुक्रेशियस म्हणतो, मानवाला प्रथम देवाचा साक्षात्कार स्वप्नांत झाला. नीट्झशेच्या मतें ग्रीकांचे ऑलिंपस पर्वतावरील देव हे त्यांच्या जीवनांतील प्रभुत्वाच्या बलशाली आणि तेजस्वी वृत्तींचीं निरनिराळीं केलेलीं देदीप्यमान दृश्य प्रतीकें होत. यावरून वैदिक देवतांप्रमाणें च त्या हि गुणांच्या मूर्ति होत्या हें उघड आहे. ग्रीकांना हे देव आपणांसारखे वाटत. ते आपले गुण त्यांत पराकाष्ठेला गेलेले अवलोकन करीत. म्हणजे हे देव सर्वतोपरि मानवी होते. ही कल्पना, नीट्झश म्हणतो, खिस्ती लोकांना लवकर समजत नाहीं आणि मानवत हि नाहीं. परंतु वास्तविक रीत्या देव हे मानवासारखे आचरण करतात म्हणून च त्याला प्रिय होतात. अशीं देवांचीं मानवी कृत्यें काव्यांतून गाणें, नाटकांतून दर्शविणें, दगडावर कोरणें, आणि भिंतीवर रेखाटणें ही च **कला** होय. अशा कलेंत निश्चयानें भीषणता अवतरते. जेव्हां ही भीषणता अनुभवाच्या कक्षेच्या बाहेर नेऊन पृथक् करण्यांत येते तेव्हां तो च आश्चर्य व चमत्कार यांचा विषय होतो.

डायोनिसस हा देव अपॉलोच्या विरुद्ध गुणाचा आहे. तो स्थिर नाहीं तर चर आहे, स्थावर नाहीं तर जंगम आहे, स्थितिमान् नाहीं तर गतिमान् आहे. अर्थात् तो मद्य प्राशन करतो आणि त्या भरांत नाचतो, बागडतो, हांसतो, खिदळतो आणि मोठमोठे पराक्रम

करतो. वैदिक इंद्र हा सुद्धां सोम प्राशन करून त्या मदांत ही च वृत्ति दर्शवितो आणि वृत्राचें हनन करतो. नीट्झशेच्या मताप्रमाणें असा डायोनिसस केवळ कर्मकर्ता च नाहीं तर साक्षात् कर्माची मूस किंवा कलेची प्रतिमा आहे, केवळ 'उपद्रष्टानुमंता' च नाहीं तर 'भर्ताभोक्तामहेश्वरः' आहे. हिंदू पुराणांत शिवाचें भैरवरूप या च प्रकारचें आहे. प्राचीन ग्रीक नाटकांत जें गायकनर्तकमंडळ होतें त्यांत अपॉलोला धरून एक आणि डायोनिससला धरून एक अशा नृत्यगायनाच्या दोन निरनिराळ्या पद्धति होत्या. अपॉलोच्या पद्धतींत प्रत्येक नर्तकी आपआपल्या ठिकाणीं स्वतंत्रपणें तद्रूपता पावे तर डायोनिससच्या पद्धतींत सर्वांची सरमेसळ होऊन एक च गोपाळकाला बने. हिंदूधर्मांतील शाक्तांच्या भैरवीतंत्रांत असा च गोपाळकाला युक्त मानला आहे. बलाचा किंवा शक्तीचा उपासक नीट्झशे याला ही डायोनिससच्या मार्गावरील नृत्यगायनाची शाक्त रीत पसंत पडली यांत नवल नाहीं. त्यानें आपल्या 'भीषण नाटकाचा जन्म' या लेखांत अपॉलो विरुद्ध डायोनिसस हा पक्ष घेतला आणि त्यांत संगीतकलेंतील भीषणतेचें तत्त्व विशद करून दाखविलें. त्याच्या ग्रंथाचें मूळ नांव "संगीताच्या रहस्याला धरून भीषण नाटकाचा जन्म" असें होतें. पुढें त्यानें या नांवांत थोडा फेरफार करून त्यांतील सामान्य विषयाचें दिग्दर्शन केलें,—

"भीषण नाटकाचा जन्म, अथवा ग्रीकधर्म आणि नैराश्यवाद."

गायन, वादन, नर्तन या त्रयीला ' संगीत ' अशी संज्ञा आहे. जगताचा जन्म संगीतांत आहे आणि मृत्यु हि संगीतांत आहे. अर्थात् जो उत्पत्तिलयांचा देव तो च संगीताचा अधिष्ठाता आहे. ग्रीक पुराणांत हा डायोनिसस व हिंदू पुराणांत शंभुभैरव आहे. नीट्झशेनें याला यथार्थ ' Becoming ' चा म्हणजे ' होत राहण्या'चा देव म्हटला आहे. त्याच्या मतें यांतील आनंद हा खरा आनंद होय. तैत्तिरीय उपनिषदांत मूळ आत्म्यानें जें जगत् निर्माण केलें तें त्याचें ' सुकृत ' म्हटलें असून असा सुकृतरस मिळाल्यानें तो ' आनंदी ' होतो असें सांगितलें आहे. म्हणून च नीट्झशेनें हा आनंद मिळविण्याकरितां ' Being ' ची म्हणजे निरपेक्ष आत्म्याची कल्पना नष्ट केली पाहिजे असा पक्ष स्वीकारला आहे. ' Being ' आणि ' Becoming ', असणें आणि होणें, सत् आणि भवत्, किंवा वेदांताच्या परिभाषेंत आत्मा आणि जगत् हें द्वंद्व एकदम घेतलें तर ठीक आहे, नाहींतर प्रत्येक कोटी निरपेक्ष मानण्यांत मोठा अनर्थ होणार आहे. जगताचें समर्थन म्हणजे पर्यायानें कलेचें च समर्थन आहे. कारण वर तैत्तिरीय उपनिषदांत निर्दिष्ट केल्याप्रमाणें जगत् हें आत्म्याचें सुकृत म्हणजे कला आहे. अर्थात् जगताला माया म्हणणारे आणि खोटें ठरविणारे जे धर्म ते कलेचे शत्रु होत. असे धर्म बौद्ध आणि ख्रैस्त्य हे आहेत. या धर्मांतील नीतिमार्गाबद्दल महान् संशय प्रकट केला पाहिजे. जीवनाचा आनंद हा केवळ त्यांनीं प्रतिपादिलेल्या मायामय

जगतापासून च मिळणें शक्य आहे, एरवीं नाहीं. जे लोक मायामय जगतापासून दुःख भोगतात ते च आपणांकरितां निर्वाणाची किंवा निरपेक्ष सताची मोहमय कल्पना निर्माण करतात. म्हणून खरा आनंद—अर्थात् जगतापासून मिळणारा आनंद—हा या प्रकारच्या एकांतिक सताचा नाश केल्यावांचून सिद्ध होणें शक्य नाहीं. शंभुभैरवासारख्या संहारक देवतेच्या उपासनेंत जो आनंद प्राप्त होतो तो च खरा आनंद होय.

संगीत हें अन्तर्निष्ठ आहे. इतर कला—काव्य, चित्र, पुतळे—बहिर्निष्ठ आहे. संगीत हें मनुष्याच्या अन्तर्गत वृत्तींचें प्रकटीकरण करतें-इच्छा, आकांक्षा, संकल्प इत्यादि. एका शब्दांत सांगावयाचें तर संपूर्ण मनोविकार. या प्रकारें संगीत हें अन्तःकरणाच्या अन्तःकरणांतील अगदीं खोल भावना आविष्कृत करून दाखवीत असल्याकारणानें शोपेनहौएरच्या मतें ही कला भौतिकाच्या पलीकडे आध्यात्मिक स्वरूपाची आहे. संगीतांत आपल्या मुख्य भावना—आपल्या जीवनाचा आधारभूत स्वर—जीवनाविषयीं आपली मनाची उत्कट वृत्ति, जीवनाला धरून आपलें धोरण—मग तें त्याला पोषक असो वा विघातक असो—या सर्वांचें उत्तम आविष्करण होतें. असें संगीत नीट्झ्शेला अति प्रिय होतें आणि तें च त्याला ग्रीकांच्या भीषण नाटकाच्या मुळाशीं दिसून आलें. ग्रीकांचे ठायीं या संगीताचा उगम प्रथम डायोनिससच्या उपासनेंत धार्मिक स्फूर्तीनें घडून आला, आणि नंतर त्याचा पगडा त्यांच्या

संपूर्ण जीवनविषयक मनोवृत्तींवर कायमचा बसून राहिला. त्यांनीं उपस्थित केलेल्या भीषण नाटकाचें मूळचें रूप अगदीं साधें एका अभिनययुक्त गाण्यांत होतें. एक गाणें अनेकांनीं गाऊन तदनुरोधानें नर्तन करणें यांत च त्याचें सर्वस्व होतें. याची पूर्णता एस्चायलसचे काळीं झाली. त्यानंतर त्याचा प्रतिस्पर्धी सोफोक्लीज यानें त्यांत दोन पात्रांचा संवाद समाविष्ट केला आणि त्याचें रूप बिघडविलें. सारांश, उच्च संस्कृतीला संगीताची अत्यावश्यकता आहे, किंबहुना संगीतांत च उच्च संकृतीचें सर्व रहस्य आहे. परंतु हें संगीत गायन-वादननर्तनात्मक ग्रीक ' कोरस् ' च्या रूपाचें पाहिजे. असें संगीत शंकराच्या तांडव नृत्यांत आहे. कारण या नृत्याबरोबर पार्वतीचें लास्य, नंदीचें गायन, आणि शृंगीभृंग्यादि शिवगणांचें डमरू वादन मिळून तें सर्व एक च एक एस्चायलस्च्या धर्तीवर डायोनीसियन् कोरस्प्रमाणें जगताच्या संहाराचें अति भीषण दृश्य आहे.

खरें संगीत केवळ स्वात्मगत असतें. गायन आणि नर्तन यांना आंतून प्रेरणा मिळते. अशा गायनाला शब्दाची गरज नसते. तें केवळ स्वरांत चालतें. म्हणून उत्क्रांतीच्या ओघांत मूळ गायन उद्भवलें आणि नंतर शब्दाची स्फुटता झाली. स्वन् अगोदर आणि वाक् नंतर असें वेदांप्रमाणें ग्रीक तत्त्ववेत्यांचें हि मत आहे. गायन सुरू झाल्याबरोबर जीं शरीराचीं अंगें हालूं लागतात तें च नर्तन उलट शरीर हालूं लागल्याबरोबर जो कंठांतून ध्वनि बाहेर पडतो तें गायन

होय. असें गायन आणि नर्तन जोडीनें चालणारें आहे. त्यांत जो अभिनय घडतो तें नाट्य. अशा नाट्याला शब्द पाहिजे असें नाहीं. तें मूक हि होऊं शकेल. तथापि नाट्य हें संगीतांत स्वतंत्र मानलें नाहीं. तें गायन आणि नर्तन यांच्या अनुवर्तित्वानें चालतें. किंबहुना तें गायन आणि नर्तन यांना अंगभूत आहे. गायन हें शब्दांच्या मागें जाणारें नाहीं तर केवळ स्वरध्वनींवर चालणारें आहे असें म्हटलें म्हणजे शब्द हे पुष्कळ वेळां त्याला उपकारक होण्याऐवजीं अडथळा करतात असें दिसणार आहे. तें स्वरांत अव्याहत चालतें पण शब्दांत अडखळतें. ही गोष्ट तंतुवाद्यावर उत्तम निदर्शनास येते. मूळ भाषा अर्धवट काव्यात्मक आणि अर्धवट अभिनयात्मक होती. तींत जे शब्द उद्भवले ते शुद्ध स्वरध्वनि होते. या प्रकारें मनुष्य प्रथम गाऊं लागला आणि नंतर बोलूं लागला. त्याच्या भाषेंत प्रथम स्वर आले नंतर व्यंजनें शिरलीं. पुढें त्या दोहोंच्या मिलाफानें शब्द बनला. हा शब्द तो गाण्यांत बोलूं लागला तें काव्य झालें. म्हणून काव्य शब्दाचा मूळ अर्थ गाणें आहे. काव्यांत जें मूळचें गाणें मर्यादित झालें ते छंद बनले. प्राचीन काळचें काव्यगायन म्हणजे वेदांतील छंदोगायन होय. छंदोगानाच्या नंतर कालांतरानें सामगायन उद्भवलें. ह्या सामगायनांत आतां मूळारंभीचें केवळ शब्दरहित ध्वन्यात्मक गाणें उरलें नाहीं तर शब्दांना धरून स्वरांचा आणि श्रुतींचा विस्तार झाला व त्याचें शास्त्र बनलें. स्वरांतील मूलद्वंद्व म्हणजे 'उदात्त'

आणि 'अनुदात्त' किंवा उच्च आणि नीच स्वर होत. हे स्वर प्रत्येकीं एकविध आहेत. पण यांना जोडणारा जो मधला स्वर तो अनेकविध आहे. त्याला 'स्वरित' ही संज्ञा आहे. पहिलें अनेक दोनांचें असतें. म्हणून स्वरितांत 'स्वर' दोन च आहेत. तथापि त्यांत 'श्रुति' असंख्य आहेत. जो ध्वनि श्रवणेंद्रियाला पृथक्त्वानें प्रतीत होतो ती श्रुति होय. या प्रकारें उदात्त, अनुदात्त व स्वरित मिळून जे मूळचे तीन स्वर त्यांतून सा, रे, ग, म ह्या चार श्रुति निघाल्या. सा हा एकटा च एक अनुदात्त, रे-ग हे दोन मिळून स्वरित आणि म हा एकटा च एक उदात्त. उच्च विरुद्ध नीच, आणि एक विरुद्ध अनेक हीं दोन स्वरद्वंद्वें मिळून हें स्वरचतुष्टय बनलें हें निराळें सांगावयास नको च. जो नियम रंगशास्त्रांत त्रिगुणांवरून चातुर्वर्ण्याचा तो च ध्वनिशास्त्रांत त्रिस्वरांवरून चतुःश्रुतींचा होय. छंदांची निर्मिति त्रिस्वरांत झाली, तर पुढील सामगायनांत तीन स्वरांवरून चार श्रुति निघाल्या. या प्रमाणें मूळ 'सरगम' चतुःश्रुत्यात्मक आहे आणि तें च सर्व गायनांत मुख्य स्वरचतुष्टय होऊन बसलें आहे.

श्रुति आणि स्वर यांतील भेद सांकेतिक आहे. ज्या श्रुतीच्या कांहीं एका गुणांत तिची निराळी विशिष्ट जाति बनते तो च स्वर सिद्ध होतो. या प्रकारें 'सा' पासून 'रे' पर्यंत ज्या असंख्य श्रुति आहेत त्यांत 'सा' हा मूळ आरंभींचा स्वर कल्पून त्यापासून वर चढणाऱ्या सुरांच्या श्रेणींत 'रे' च्या ठिकाणीं जी निराळी जाति बनली तो दुसरा स्वर सिद्ध

झाला, आणि या च न्यायानें 'ग'च्या ठिकाणीं तिसरा व 'म' च्या ठिकाणीं चौथा स्वर बनून हें स्वरचतुष्टय (tetra-chord) पूर्णतेला गेलें. नैसर्गिक रीत्या संपूर्ण ध्वनिशास्त्रांत या चार स्वरांवांचून अधिक स्वर नाहींत, जे अधिक वाढविलेले दिसतात ते केवळ या चारांच्या पुनरावृत्तीनें होत. मूळ सामगायनांत हें एक च स्वरचतुष्टय होतें. त्याला प्रथम पांचवा स्वर जोडण्यांत आला, नंतर सहावा जोडला आणि शेवटीं सातवा जोडून अर्वाचीन भारतीय गायनांत प्रचलित असलेलें सा, रे, ग, म, प, ध, नी हें स्वरसप्तक तयार झालें. प्राचीन ग्रीक गायनपद्धतींत सुद्धां मूळ हें च एक स्वरचतुष्टय होतें. पुढें त्याची एकापुढें एक आवृत्ति करून हल्लींच्या युरोपीय गायनांत दिसणारें स्वराष्टक (octave) बनविण्यांत आलें. भारतीय स्वरसप्तक काय किंवा यूरोपीय स्वराष्टक काय, दोहोंची स्वरवर्धनाची रीत एक च आहे पण क्रिया मात्र किंचित् भिन्न आहे. हें भिन्नत्व एका चतुष्टयापुढें जें दुसरें चतुष्टय ठेवावयाचें तें किती श्रुतींच्या अंतरानें येवढ्यापुरतें आहे. निसर्गांतील ध्वनींच्या लाटांत ज्या नियमांनीं हे स्वर उमटतात त्या नियमांप्रमाणें सदर स्वराष्टकांतील पहिला स्वर आणि शेवटचा स्वर स्वरूपतः एक च आहेत म्हणून त्यांचें एकमेकांत पूर्ण मेलन घडतें. त्यांतील फरक स्थानपरत्वें उच्चनीचभावापुरता असतो. म्हणून एकाला मंद्र व दुसऱ्याला तार म्हटलें तरी दोहोंना षड्ज अशी एक च संज्ञा आहे. अर्थात् यावरून एक स्वरसप्तक संपून जें दुसरें सुरू होतें तें या वरच्या षड्जापासून असतें ही गोष्ट उघड ठरते.

आतां दोन स्वरचतुष्टयांचें मिळून जें एक स्वराष्टक होईल त्यांत भिन्न रूपांचे असे सात च स्वर असल्यामुळें भारतीय गायनांत स्वरसप्तकाची यथार्थ मांडणी झाली आहे आणि त्यांना षड्ज, ऋषभ, गंधार, मध्यम, पंचम, धैवत आणि निषाध अशीं सात निरानिराळीं नांवें देण्यांत आलीं आहेत. पुनः या सातांचें निरनिराळ्या प्राण्यांच्या ध्वनींशीं सारूप्य दाखवून त्यांचे निरनिराळे रंग हि कल्पिले आहेत. ह्या सात नांवांपैकीं कांहीं नांवें स्थानपरत्वें, कांहीं गुणपरत्वें आणि कांहीं देशपरत्वें आहेत व त्यांत भारतीय गायनविकासाचा बरा च इतिहास ध्वनित होत आहे. प्राचीन सामगायनांतील स्वरांचे नामपर्याय निराळे होते ते केवळ त्यांच्या गुणांशां- वरून होत. या सप्तस्वरांपैकीं शेवटचा जो निषाध त्याच्या पुढील आठवा स्वर पुनरपि षड्ज आहे आणि त्यापासून पुढल्या तारसप्तकाची सुरवात आहे म्हणून वर सांगितलें च आहे. या वरून पहिला आणि आठवा हे दोन समानरूपांचे षड्ज दोन मर्यादा आंखतात आणि त्यांच्या दरम्यान सहा भिन्न रूपांचे स्वर एकमेकांपासून विशिष्ट अंतरावर अधिष्ठित होतात असें दिसणार आहे. भारतीय गायनशास्त्रांत हीं स्वरांतरें श्रुतींनीं निदर्शित केलीं आहेत. अशा श्रुति एकंदर २२ गणल्या आहेत. सा पासून रे पर्यंत ४, रे पासून ग पर्यंत ३, आणि ग पासून म पर्यंत २ मिळून एका स्वर- चतुष्टयांत ९ श्रुति असतात, व अशीं ९।९ श्रुतींचीं दोन

स्वरचतुष्टयें एकापुढें एक ४ श्रुतींच्या अंतरानें ठेविलीं म्हणजे एका स्वराष्टकांत श्रुतींची संख्या २२ होते. हा स्वरश्रुतींचा मेळ पुढील प्रमाणपट्टीवरून चांगला विशद होईल:—




येथें सदर पट्टीवर सर्व श्रुतींतील अंतरें सारख्या प्रमाणांत दाखविलीं आहेत पण स्वभावतः तीं तशीं नाहींत तर निर-निराळ्या लांबींचीं आहेत. येथें मुख्य मुद्दा त्यांची संख्या दर्शविण्याचा आहे आणि यद्यपि ही संख्या केवळ सांकेतिक असली तरी ती तेवढी गायनशास्त्राला पुरेशी आहे. सा पासून रे पर्यंत मध्यंतरीं तीन श्रुति टाकून चौथ्या श्रुतींत रे हा स्वर उमटतो, म्हणून सा पासून रे पर्यंत श्रुति चार, रे पासून ग पर्यंत तीन, आणि ग पासून म पर्यंत दोन मिळून नऊ श्रुतींचें हें स्वरचतुष्टय पूर्ण होतें. असें एक चतुष्टय संपवून पुढें चार श्रुतींच्या अंतरावर पुनः तें जसेंच्या तसें ठेवलें तर त्याच्या द्वितीयावृत्तींत सा हा प, रे हा ध, ग हा नी, आणि म हा सा बनून एक संपूर्ण स्वराष्टक तयार होईल. अशा अष्टकांतील पहिला आणि आठवा हे दोन्ही स्वर सजातीय

असल्यामुळें जर त्या उभयतांचा एक स्वर धरला आणि त्याला बाकीचे सहा जोडले तर तेंच भिन्न स्वरांचें एक सप्तक बनेल. भारतीय गायनशास्त्रानें आपलें स्वरसप्तक असें च बनविलें आहे. ह्या दोन चतुष्टयांतील सात स्वरांत षड्ज, मध्यम आणि पंचम ह्यांचा पूर्ण मेळ आहे. कारण सदर स्वरांच्या आरोहावरोहांत प हा एक बाजूनें सा आहे तर म हा दुसऱ्या बाजूनें सा आहे. म्हणून भारतीय गायनशास्त्रांत षड्ज, मध्यम आणि पंचम ह्या तीन स्वरांना धरून तीन ग्राम सांगितले आहेत. तथापि त्यांत हि स आणि प हे प्रत्येक स्वरचतुष्टयाचे आद्य स्वर असल्यामुळें सारखे च अविकृत आहेत. म्हणजे ते आपल्या स्थायीभावांत कोमल आणि तीव्र असा भेद पावत नाहींत. याला च शास्त्रांत षड्जपंचमभाव म्हणतात. पण म हा कोमल आणि तीव्र असा भेद पावतो. या तीन स्वरांवांचून बाकीचे रे, ग, ध, नी हे चार स्वर मात्र केवळ कोमल आणि तीव्र येवढ्यांत च विकार पावत नाहींत तर कोमल, कोमलतर, कोमलतम, तीव्र, तीव्रतर, तीव्रतम या प्रकारें सहा सहा भावांत विकार पावतात. या चार स्वरांतील पहिल्या चतुष्टयांत जे रे–ग ते च दुसऱ्यांत ध–नी होत असल्यामुळें हें त्यांचें सादृश्य हि सहज लक्षांत येण्यासारखें आहे. शेवटीं सदर स्वरश्रुतींचा मेळ दर्शविणाऱ्या लंबरेषेचीं दोन्हीं टोंकें एकमेकांशीं जुळवून त्यांचें एक वर्तुळ केलें कीं त्यांत दोन्ही उच्चनीच षड्ज परस्परांत मिळून बावीस

श्रुति आणि सात स्वर यांचा संबंध पुढील भूमितीच्या समीकरणांत उत्तम प्रकारें दृग्गोचर होणार आहे:—

$$\frac{\text{श्रुतींचा परिघ}}{\text{स्वरांचा व्यास}} = \pi = \frac{२२}{७}$$

मूळ वैदिक काव्यांत प्रथम स्वरांतील उदात्त आणि अनुदात्त हें द्वंद्व उमटलें. पुढें त्या दोहोंना जोडणारा स्वरित हा तिसरा स्वर निघाला. ह्या तीन स्वरांपासून संपूर्ण छंदांची निर्मिति झाली. पुनः त्या स्वरिताचे दोन भाग झाले. ह्या सर्वांचें मिळून एक स्वरचतुष्टय बनलें आणि त्यांत सामगायन उदय पावलें. वेदांतील सर्व मंत्र छंदोबद्ध आहेत आणि त्यावरून वेदांना छंदस् अशी संज्ञा आहे. जसा वेद तसा च अवेस्त. तो हि झंदांत म्हणजे छंदांत च निबद्ध आहे. पुन्हा त्याला ‘ गाथा ’ = गायनात्मक काव्य, अशी संज्ञा आहे. वेदमंत्र गाणाऱ्या ऋत्विजाला उद्गाता म्हणतात. शिवाय वेदांत हि ‘ गाथा नाराशंसी ’ आहे. वेद आणि अवेस्त हे अनुक्रमें देव आणि असुर यांचे धर्मग्रंथ आहेत व देव आणि असुर हे दोघे आर्य आहेत. अर्थात् जे देवांचे छंद ते च असुरांचे छंद. मात्र त्यांत किंचित् फरक आहे. जसे दैवी गायत्री आणि आसुरी गायत्री, दैवी उष्णिक् आणि आसुरी उष्णिक् इ०. वैदिक यज्ञप्रक्रियेंत प्रथम छंदोगांना मान आहे आणि मंतर सामगांना आहे. कारण छंदोग हे उत्पत्तिक्रमानें ज्येष्ठ आहेत. पण सामग हे गुणानें श्रेष्ठ आहेत. असें साम

मूळ जें चार स्वरांत उद्भवलें त्याची वृद्धि पांचव्या स्वरांत झाली. तो पंचम बनला. त्याला सहावा स्वर मिळाला आणि त्यापासून स्वरषट्क तयार झालें. एका काळीं सर्व गायन सहा स्वरांत चालत होतें. म्हणून च षड्ज = सहावा जन्मलेला, हा शेवटचा स्वर मानला गेला या षट्कांत सातव्याची भर पडली तेव्हां मूळ चतुष्टयाचा शेवटचा स्वर मध्यम ठरला. या प्रकारें भारतीय गायनांत प्रचलित असलेलें हें अखेरचें स्वरसप्तक तयार झालें. तथापि त्याची पूर्णता जेव्हां आरंभींचा मंद्र स्वर शेवटीं पुनः जसाचा तसा तार स्वरांत उमटला तेव्हां घडून आली. येथें दोन चतुष्टयांच्या एकापुढील एक आवर्तनांत जें स्वराष्टक बनलें त्यांत पुढल्या स्वरविकारांना आणि श्रुतींना स्थान मिळालें.

भारतीय गायनाच्या विकसनांत अगोदर स्वर आणि नंतर श्रुति असा क्रम आहे. मूळ सामगायनांत केवळ चार स्वर होते आणि श्रुति मुळीं च नव्हत्या. कारण जेथें स्वरांची पूर्णता नव्हती तेथें श्रुतींची वार्ता कोठून असणार ? अर्थात् त्या काळीं जे स्वर त्या च श्रुति आणि ज्या श्रुति ते च स्वर होते. पुढें स्वरांच्या स्पष्ट जाति ठरल्या आणि गायन वृद्धि पावलें. असे सर्व सजातीय विजातीय मिळून स्वर आठ झाले. त्यांत षड्ज आणि पंचम हे अनुक्रमें पहिल्या आणि दुसऱ्या चतुष्टयाचे आरंभींचे स्वर म्हणून विकाररहित स्थायी राहिले आणि बाकीच्या पांचांचे प्रत्येकीं कोमल व तीव्र असे दोन दोन

विकार घडून आले या प्रकारें सप्तस्वरांतून त्यांच्या विकारां-सह द्वादश स्वर तयार झाले आणि त्यांत षड्ज, मध्यम व पंचम या तीन स्वरांना धरून तीन ग्राम उद्भव पावले. येथून पुढें बारा स्वरांची वृद्धि बावीस श्रुतींत झाली आणि मूळचें जुनें सामगायन मागें पडून त्याची जागा नवीन रागदारीनें व्यापिली. अशा रीतीनें भारतीय गायनाचें विकसन स्वरांतून श्रुतींत आणि सामांतून रागांत होत आलें आहे. स्वरास्वरांतील भेद जातिपरत्वें ( in kind ) आहे पण श्रुतिश्रुतींतील भेद गुणां-शपरत्वें ( in degree ) आहे. पुन्हा स्वर आणि श्रुति यांतील भेद दाखवावयाचा तर एकाचें पर्यवसान दुसऱ्यांत होत अस-ल्यामुळें सूक्ष्म स्वर ती श्रुति, आणि उलट, स्थूल श्रुति तो स्वर, असा दाखवितां येईल.

स्वर अगोदर, श्रुति नंतर. साम अगोदर, राग नंतर. प्रथमतः सामांत दोन चतुष्टयांची आवृत्ति झाली आणि नंतर रागांत तीन ग्रामांची रचना घडली. स्वरांत गायन खंडित असतें, श्रुतींत अखंडित होत जातें. म्हणून जितके स्वर कमी तितकें गायन स्थूल आणि ओबडधोबड, जितक्या श्रुति जास्त तितकें तें सूक्ष्म आणि सफाईदार. मूळ सामगायनांत जेव्हां चार च स्वर निघाले तेव्हां तें अगदीं बाल्यावस्थेंत होतें. त्याची उत्पत्ति छंदांतून आहे म्हणून मागें सांगितलें च आहे. प्राचीन वैदिक कवींनीं देवांचे गुणवर्णन करण्याकरितां जे ऋङ्मंत्र निर्माण केले ते सर्व छंदोमय आहेत. छंदोरहित शब्दरचना

तें गद्य. छंदोबद्ध शब्दरचना तें पद्य. तें च काव्य. तें च पहिलें गाणें. मूळ वैदिक ऋषि आपल्या देवांचें गुणप्रशंसात्मक स्तवन ह्या साध्या गाण्यांत करीत. कदाचित् त्यांचा मूळ धर्म येवढा च स्तवनापुरता असेल. पुढें त्या धर्माला यज्ञाचें स्वरूप आलें आणि त्याचा अर्थ देवपूजन असा बनला. हें देवपूजन शंसन, हवन व स्तवन या तीन कर्मांनीं मिळून सिद्ध होतें, आणि हीं तीन कर्में अनुक्रमें ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद यांच्या अनुवर्तित्वानें चालतात. अशा यज्ञाची व्याख्या प्राचीन मीमांसकांनीं "यज्ञो हि मंत्रैर्देवतामुद्दिश्य द्रव्यस्य दानम्" अशी केली आहे. पैकीं द्रव्याच्या दानांत एक च हवनकर्म घडतें, परंतु देवतांना उद्देशून म्हणावयाच्या ऋङ्मंत्रांत मात्र शंसन व स्तवन हीं दोन निरनिराळीं कर्में उपस्थित होतात. हवनकर्म करणारा ऋत्विज् अध्वर्यु या नांवानें, व शंसन आणि स्तवन करणारे होता आणि उद्गाता या नांवांनीं संबोधिले जातात. मूळ होता आणि उद्गाता मिळून एक च ऋत्विज् केवळ छंदोग होता. अर्थात् त्याचें जें शंसन तें च स्तवन आणि जें स्तवन तें च शंसन होतें. पुढें त्या छंदांतून एका बाजूनें स्वरिताचा ऱ्हास होऊन आणि दुसऱ्या बाजूनें त्याची वृद्धि घडून दोन पर्याय सिद्ध झाले. स्वरित जाऊन केवळ उदात्तानुदात्त अशा दोन स्वरांत जो गद्यप्रबंध बनला तें शंसन झालें, व स्वरितापासून दोन निरनिराळे स्वर निघून चार स्वरांत जो सामविस्तार झाला तें स्तवन ठरलें. शंसनात्मक गद्य म्हणण्याच्या क्रियेला 'शस्त्र' हें नांव मिळालें, तर स्तवना-

त्मक पद्य गाण्याच्या क्रियेला ' स्तोत्र ' हें नांव प्राप्त झालें. या प्रकारें वैदिक धर्मांत जसजशी यज्ञाची प्रगति होत गेली तसतशी पूर्वींची तीन स्वरांतील छंदांत मंत्र म्हणण्याची क्रिया लोप पावली आणि पूर्वींचा छंदोग दोन ठिकाणीं वांटला गेला, (१) जो नीचोच्च स्वरांत गद्य ओरडून शंसन करूं लागला तो होता बनला व (२) जो नाना स्वरांत आलाप घेऊन स्तवन करूं लागला तो उद्गाता झाला. आतां यद्यपि मूळ मंत्रांतील छंद यज्ञांत मोडून गेले असले तथापि ते ब्राह्मणांच्या पठनकर्मांत अद्यापि जसेच्या तसे कायम राहिले आहेत. त्यांतील तीन स्वर हे मंत्रपाठक ब्राह्मण मंत्र म्हणतांना आपल्या बोटांवर आंगठ्या-च्या खुणेनें दर्शवितात किंवा मानेनें वरखालीं हालवून दाखवितात.

गद्याला स्वर दोन, छंदाला तीन आणि सामाला चार असा हा स्वरविस्तार असून त्यांत च गायनाची उत्पत्ति, वृद्धि आणि विकास आहे. वेदांत साम हा शब्द सा + अम असा व्युत्पादला आहे. सा ही ऋचा आणि अम हा स्वर. पुनः सा ही स्त्री आणि अम हा पुरुष. या उभयतांच्या संयोगांत साम ही प्रजा. प्रजा ही वृद्धि आणि वृद्धि तें च ब्रह्म. अर्थात् यज्ञांत जें ब्रह्म सिद्ध होतें तें सामाच्या द्वारें होय हें उघड आहे. म्हणून च भगवंतानीं "वेदानां सामवेदोऽस्मि" असें यथार्थ म्हटलें आहे. कारण " सूर्य हा अस्तमानीं सामाच्या समवेत महीयत्वाला जातो, सर्व शश्वत् तेज सामरूप्य असतें, आणि ब्राह्मणवर्णाची प्रसूति सामापासून

होते" अशी त्याची वेदांत प्रशंसा आहे. असें साम गायनात्मक आहे म्हणजे अनेक स्वरांत चालणारें आहे. एकाचें अनेक झाल्यावांचून अनेकांचें एक होणार नाहीं आणि अनेकांचें एक झाल्यावांचून ब्रह्माची सिद्धि नाहीं असा नियम आहे. म्हणून अनेक स्वरांत आणि श्रुतींत चालणारें साम ब्रह्मसिद्धीला अत्यावश्यक आहे. जेव्हां साम नव्हतें तेव्हां छंदोग हे च एकटे त्रिस्वरांत मंत्र म्हणत. त्यांचें गाणें सामान्यतः हल्लींच्या अभंगांतील भजनासारखें अनेकांनीं मिळून एकत्र म्हणण्याचें असे. त्यांचा धर्म हि प्रार्थनेच्या पलीकडे यज्ञांत फारसा वृद्धिंगत झालेला नव्हता. पुढें प्रार्थना जाऊन यज्ञ आला, व छंदोगांना जोडिदार सामग मिळाले. त्या बरोबर गाण्यांत दोन पर्याय सिद्ध झाले,–( १ ) अनेकांनीं एका ठेक्यांत स्वरसंवाद करून गावयाचें, व ( २ ) एकेकानें नाना श्रुतींत स्वरालाप काढावयाचे. पाहिला वर्ग प्रस्तोत्यांचा, दुसरा उद्गात्यांचा. पाहिल्याचें काम गाण्याचें ध्रुवपद किंवा आकणकडवें अनेकांच्या समवेत म्हणणें. दुसऱ्याचें काम गाण्यांतील स्वरालापांत भिन्न भिन्न सामें बनविणें. पुनः गाणें म्हटलें कीं कालाला धरून ताल आला च. अशा तालांत गायनाची काय किंवा नर्तनाची काय लय धारण केली जाते. म्हणून गायन आणि नर्तन यांच्या बरोबर आपोआप वादन उत्पन्न होतें. अशा त्रयीला धरून 'संगीत' = सम्यक् गायलेलें, अशी संज्ञा निघाली आहे. मूळ मंत्र छंदांत म्हणजे गाण्यांत च आहेत. पण हें गाणें अगदीं साधें आहे. तथापि त्यांत

कालाची साम्यावस्था म्हणजे लय आहे. ही लय मंत्रविद् ब्राह्मण चांगली जाणतात. कोणत्या अक्षरावर किती वजन ठेवून मंत्र म्हणावा हें त्यांचें बसून गेलेलें आहे. त्या योगें त्यांच्या सस्वर पाठांत सहज ताल राहतो. हा मंत्र गद्यांत आणून जेव्हां होता शंसन करतो तेव्हां मात्र त्यांत तालाचें बंधन रहात नाहीं पण निराळा प्राणायाम उत्पन्न होतो. कारण हें गद्यप्रबंधांतील शस्त्र एकेका दमांत म्हणावयाचें असतें. परंतु उलट जेव्हां मंत्र सामांत विस्तारला जातो तेव्हां मात्र तेथें तालाचें बंधन अधिक दृढ होतें.

या प्रकारें सामगायनाची उत्पत्ति छंदोबद्ध मंत्रापासून आहे. मूळ मंत्रांतील स्वरित दोन ठिकाणीं विभागून छंदाचें साम बनविण्यांत आलें. म्हणून आरंभीं हें साम चार स्वरांत होतें. तें च मूळचें स्वर चतुष्टय होय. पुढें या चतुष्टयाच्या दुसऱ्या आवृतींत स्वरांचें वर्धन घडलें आणि सामांचे अनेक प्रकार सिद्ध झाले. हीं सामें निरनिराळ्या नांवांनीं प्रसिद्ध आहेत. पैकीं कांहीं नांवें छंदावरून पडलीं आहेत जसें गायत्र, कांहीं गुणांवरून आहेत जसें रथंतर, कांहीं यज्ञांतील विशिष्ट स्थानांवरून आहेत जसें यज्ञायाज्ञिय, तर कांहीं व्यक्तींवरून आहेत जसें वामदेव्य. अर्थात् हें साम वामदेव नामक ऋषीनें द्रष्ट आहे हें निराळें सांगावयास नको च. अशीं कांहीं सामें वसिष्ठांनीं केलीं, कांहीं गौतमांनीं केलीं, कांहीं अत्रींनीं केलीं, कांहीं कण्वांनीं केलीं म्हणून वेदांत प्रसिद्ध आहे. साम करणें म्हणजे मूळ ऋङ्मंत्रांवर चार पासून सात स्वरांत गाण्याच्या

निरनिराळ्या चाली बसविणें. सदर सप्त स्वरांच्या सा, रे, ग, म, प, ध, नी ह्या दर्शक संज्ञा सामांत नाहींत त्या पुढें भारतीय गायनांत उद्भव पावल्या. सामांत हे स्वर 'स्तोभ' आणि 'निधन' करून दर्शविले जातात. म्हणजे तेथें मंत्रांतील शब्दांच्या किंवा अक्षरांच्या दरम्यान आ, ई, ओ हे स्वरवर्ण एकेकटे, जोडीनें किंवा तीन तीन मिळून घेऊन आणि ते कमीअधिक लांबवून त्यांच्या पुनः पुनः आवृत्त्या करण्यांत येतात. त्या कारणानें सामांतील स्वरालाप हे अर्वाचीन रागदारींतील शुद्ध स्वरतानेप्रमाणें दिसत नाहींत किंवा बोलतानेप्रमाणें हि दिसत नाहींत तर दोहोंच्या मधली स्थिति दर्शवितात. अर्थात् यावरून पुढील भारतीय गायनांत या विशिष्ट पद्धतीला धरून च सदहू दोन्ही प्रकारच्या ताना उद्भव पावल्या हें उघड ठरतें.

सामवेद हा यज्ञांतील उद्गात्याचा प्रयोगपाठ आहे, जसा यजुर्वेद हा अध्वर्यूचा प्रयोगपाठ आहे. अशा सामवेदांत यज्ञांतील निरनिराळ्या प्रसंगीं गावयाचीं निरनिराळीं सामें सांगितलीं आहेत. हीं सामें पूर्वीं एकदां ऋषींनीं जशीं बनविलीं तशीं कायमचीं स्थिर होऊन बसलीं आहेत त्यांत पुढें कसला हि फेरफार करण्यास सवड ठेवलेली नाहीं. कारण ही श्रुति आहे. अर्थात् ती अढळ आहे. एक काळ असा होता कीं त्यांत निरनिराळे ऋषि निरनिराळ्या छंदांत निरनिराळे मंत्र रचीत आणि त्या मंत्रांवर निरनिराळीं सामें बनवीत, पण पुढें जेव्हां वेदांच्या संहिता झाल्या आणि यज्ञांतील सर्व वैदिक

कर्में स्थिरता पावलीं तेव्हां त्यांत कसले हि फेरफार होणें बंद पडलें, इतकें च नाहीं तर असे फेरफार करणें कोणाच्या अधिकारांत राहिलें नाहीं. श्रुतींचें श्रुतित्व न बदलण्यांत आहे. अर्थात् तींतील मंत्र जसे अक्षरशः ‘ अपौरुषेय ’ आहेत तसें च त्या मंत्रांतील तंत्रकर्म आणि त्या तंत्राच्या अंगभूत साम-गायन हें हि तितकें च अपौरुषेय अतएव जगाच्या अंतापर्यंत कधीं न बदलणारें अशा अचल थाटाचें आहे. येथें धर्माचें रक्षण होतें पण कलेची प्रगति खुंटते आणि तिला शास्त्राच्या कुंपणांत कायमचें अडकून पडावें लागतें. सामवेदावरील ब्राह्मण आणि सूत्रग्रंथांत अशा गायनाचें शास्त्र धर्मांतील विधानांना धरून पूर्णतेला गेलें पण त्या च कारणानें ती कला जेथल्या तेथें अश्मीभूत होऊन राहिली. म्हणून वैदिक यज्ञप्रक्रियेंत सामें गाण्याची पद्धत जी एकदां प्राचीन श्रुति-काळीं ठरून गेली ती आज हि जशीच्या तशी कायम आहे. आज जर तींत कोणाला कांहीं नवीन रागदारीवर सुधारणा करावी असें वाटलें तर चालावयाचें नाहीं. जसे पूर्वींचे मंत्र आज जसेच्या तसे त्या च छंदांत आणि स्वरांत म्हटले जातात तशी च पूर्वींचीं सामें त्या च स्वरालापांत गावयाचीं असा धर्माचा आणि शास्त्राचा कटाक्ष आहे.

सामगायनाच्या ह्या अचल पद्धतीमुळें भारतीय गायनांत साहजिक च दोन पक्ष उद्भवले,– ( १ ) धार्मिक गायन, व ( २ ) लौकिक गायन. सामगायन हें धार्मिक गायन पूज्य म्हणून बाजूला राहिलें आणि लौकिक गायनांत कलेची वाढ

झपाट्यानें सुरू झाली. वैदिक संस्कृतींत स्थिर विरुद्ध चर असा जो सर्वत्र द्वंद्वाचा नियम दिसून येतो तो येथें हि गायनकलेंत उमटला तर त्यांत कांहीं नवल नाहीं. सुमारें दहा हजार वर्षांपूर्वीं त्रेतायुगाचे आरंभीं मनु आणि सप्तर्षि यांच्या समवेत जे आर्यांचे ब्राह्मण आणि क्षत्रिय वर्ण या देशांत पंजाबामध्यें येऊन दाखल झाले त्यांनीं च मूळ येथें श्रुतिस्मृतींचे धर्म स्थापन केले. या धर्मांतील यज्ञकर्मांत मागें सांगितल्याप्रमाणें छंदोगांच्या मागून सामगांचा उदय झाला. हे सामग यच्चयावत् ब्राह्मणवर्णीय होते. कारण यजनाचा अधिकार जरी तिन्ही वर्णांना असला तरी याजनाचा फक्त एका ब्राह्मणवर्णाला च असल्यामुळें यज्ञांतील औद्गात्राचें ऋत्विक्कर्म एकटे ब्राह्मण करीत. अर्थात् वैदिक धर्मांतील गायन मूळ ब्राह्मणांत उत्पन्न झालें आणि ब्राह्मणांत च वृद्धि पावलें. ऋषींची विद्येची आणि कलेची परंपरा ब्राह्मणांनीं राखली. ‘ दोन ब्राह्मणांनीं मागें उभें राहून वीणावादन करावें आणि एका ब्राह्मणानें पुढें होऊन गावें ’ अशा प्रकारचीं ब्राह्मणग्रंथांत वचनें आहेत. अर्थात् हें गायन सामगायनाव्यतिरिक्त निराळें लौकिक गायन असणार हें उघड आहे. अशा गायनावर त्या काळीं इतरत्र प्रचलित असलेल्या गायनपद्धतींचा परिणाम होणें संभवनीय आहे, आणि तसा तो घडून हि आलेला आहे. त्या काळीं हिंदुस्थानच्या परिसीमेवर व बाहेर हिमवताच्या समंतात् आर्यांच्या पलीकडे गंधर्व, अप्सरस्, यक्ष, रक्षस्, विद्याधर, किन्नर इत्यादि निरनिराळे स्वतंत्र गण होते. त्यांना पुराणांतरीं

कर्में स्थिरता पावलीं तेव्हां त्यांत कसले हि फेरफार होणें बंद पडलें, इतकें च नाहीं तर असे फेरफार करणें कोणाच्या अधिकारांत राहिलें नाहीं. श्रुतीचें श्रुतित्व न बदलण्यांत आहे. अर्थात् तींतील मंत्र जसे अक्षरशः ' अपौरुषेय ' आहेत तसें च त्या मंत्रांतील तंत्रकर्म आणि त्या तंत्राच्या अंगभूत सामगायन हें हि तितकें च अपौरुषेय अतएव जगाच्या अंतापर्यंत कधीं न बदलणारें अशा अचल थाटाचें आहे. येथें धर्माचें रक्षण होतें पण कलेची प्रगति खुंटते आणि तिला शास्त्राच्या कुंपणांत कायमचें अडकून पडावें लागतें. सामवेदावरील ब्राह्मण आणि सूत्रग्रंथांत अशा गायनाचें शास्त्र धर्मांतील विधानांना धरून पूर्णतेला गेलें पण त्या च कारणानें ती कला जेथल्या तेथें अश्मीभूत होऊन राहिली. म्हणून वैदिक यज्ञप्रक्रियेंत सामें गाण्याची पद्धत जी एकदां प्राचीन श्रुतिकाळीं ठरून गेली ती आज हि जशीच्या तशी कायम आहे. आज जर तींत कोणाला कांहीं नवीन रागदारीवर सुधारणा करावी असें वाटलें तर चालावयाचें नाहीं. जसे पूर्वींचे मंत्र आज जसेच्या तसे त्या च छंदांत आणि स्वरांत म्हटले जातात तशी च पूर्वींचीं सामें त्या च स्वरालापांत गावयाचीं असा धर्माचा आणि शास्त्राचा कटाक्ष आहे.

सामगायनाच्या ह्या अचल पद्धतीमुळें भारतीय गायनांत साहजिक च दोन पक्ष उद्भवले,– ( १ ) धार्मिक गायन, व ( २ ) लौकिक गायन. सामगायन हें धार्मिक गायन पूज्य म्हणून बाजूला राहिलें आणि लौकिक गायनांत कलेची वाढ

झपाट्यानें सुरू झाली. वैदिक संस्कृतींत स्थिर विरुद्ध चर असा जो सर्वत्र द्वंद्वाचा नियम दिसून येतो तो येथें हि गायनकलेंत उमटला तर त्यांत कांहीं नवल नाहीं. सुमारें दहा हजार वर्षांपूर्वीं त्रेतायुगाचे आरंभीं मनु आणि सप्तर्षि यांच्या समवेत जे आर्यांचे ब्राह्मण आणि क्षात्रिय वर्ण या देशांत पंजाबामध्यें येऊन दाखल झाले त्यांनीं च मूळ येथें श्रुतिस्मृतींचे धर्म स्थापन केले. या धर्मांतील यज्ञकर्मांत मागें सांगितल्याप्रमाणें छंदोगांच्या मागून सामगांचा उदय झाला. हे सामग यच्चयावत् ब्राह्मणवर्णीय होते. कारण यजनाचा अधिकार जरी तिन्ही वर्णांना असला तरी याजनाचा फक्त एका ब्राह्मणवर्णाला च असल्यामुळें यज्ञांतील औद्गात्राचें ऋत्विक्कर्म एकटे ब्राह्मण करीत. अर्थात् वैदिक धर्मांतील गायन मूळ ब्राह्मणांत उत्पन्न झालें आणि ब्राह्मणांत च वृद्धि पावलें. ऋषींची विद्येची आणि कलेची परंपरा ब्राह्मणांनीं राखली. ‘ दोन ब्राह्मणांनीं मागें उभें राहून वीणावादन करावें आणि एका ब्राह्मणानें पुढें होऊन गावें ’ अशा प्रकारचीं ब्राह्मणग्रंथांत वचनें आहेत. अर्थात् हें गायन सामगायनाव्यतिरिक्त निराळें लौकिक गायन असणार हें उघड आहे. अशा गायनावर त्या काळीं इतरत्र प्रचलित असलेल्या गायनपद्धतींचा परिणाम होणें संभवनीय आहे, आणि तसा तो घडून हि आलेला आहे. त्या काळीं हिंदुस्थानच्या परिसीमेवर व बाहेर हिमवताच्या समंतात् आर्यांच्या पलीकडे गंधर्व, अप्सरस्, यक्ष, रक्षस्, विद्याधर, किन्नर इत्यादि निरनिराळे स्वतंत्र गण होते. त्यांना पुराणांतरीं

'देवयोनी' म्हटल्या आहेत. वैदिक आर्यांशीं त्यांचा निकटवर्तित्वानें दृढ परिचय होता. उदाहरणार्थ, आर्यांना आपल्या सोमयज्ञांत लागणारी सोमलता गंधर्वांपासून मिळे, व त्यांच्या यज्ञमंडपांत अप्सरा येऊन बसल्यानें त्याला शोभा येई. अशा गंधर्वादि गणांत गायनकलेचा स्वतंत्र परिपोष झालेला होता. नारद आणि तुंबर हे गंधर्वगणांतील प्रसिद्ध कलावंत आहेत. नारद हा बीनकार होता आणि तुंबरू गवई होता. त्यांचें गायन सामगायनाहून निराळें होतें. त्या गायनाला यज्ञांत स्थान नव्हतें. म्हणून च पुढें तें भक्तींत प्रधान होऊन बसलें. गंधर्वगणाप्रमाणें यक्ष किन्नर हे गण हि गायनवादनांत निपुण होते. आणि राक्षसांचा देव शिव हा वेदांतील ओरडणाऱ्या रुद्राशीं एकरूप होऊन भैरवगायनाचा आद्यजनक झाला. किंबहुना या महादेवाच्या डमरूंतून जो पहिला ध्वनि बाहेर पडला तो च जगताच्या मूळारंभींचा प्रणवकार सिद्ध झाला.

या प्रकारें आर्यांचें धार्मिक गायन जरी सामांत कायमचें जखडून राहिलें असलें तरी त्यांच्या लौकिक गायनांत मात्र सुधारणेला सर्व प्रकारची मोकळीक मिळाल्या कारणानें त्यांत वरील सर्व गणांतील गायनपद्धतींचा समावेश करण्यांत आला आणि त्याची उत्तरोत्तर भरभराट होत गेली. ज्या देशांतील किंवा लोकांतील जे स्वर त्यांना श्रुतिरंजक दिसले ते त्यांनीं तत्काळ ग्रहण केले आणि आपल्या गायनांत योजून त्याची रक्ति वाढविली; उदाहरणार्थ, गंधारांतील 'ग' आणि

निषाधांतील 'नी' हे अनुक्रमें तृतीय आणि सप्तम स्वर त्यांनीं त्या त्या देशांतील गायनांतून मिळविले आणि आत्मसात् केले. अशा 'ग' च्या तीव्र आणि कोमल स्वरांवर हल्लींच्या रागदारींतील बिलावल आणि काफी हे थाट बसविण्यांत आले आहेत. जो नियम मंत्रांतील छंदांना लागू आहे तो च सामांतील गायनाला आहे. हें च काय, पण संपूर्ण वैदिक भाषेला आणि वाङ्मयाला हि तो च नियम लागू आहे. पाणिनीच्या व्याकरणानें प्राचीन आर्ष भाषा आणि अर्वाचीन संस्कृत भाषा यांतील भेद प्रस्थापित झाला. त्या बरोबर प्राचीन ऋषींचे छंद मागें पडले आणि अर्वाचीन कवींचीं वृत्तें उदयास आलीं. छंद ओबडधोबड होते. कारण ते अक्षरांवर गणले जात होते. वृत्तें सफाईदार झालीं. कारण तीं मात्रांवर गणण्यांत येऊं लागलीं. हे छंद जसे पिंगलानें वर्णन केले आहेत तसे च आज ते वैदिकांच्या पठणांत आहेत. पण त्यांत कोणी नवीन काव्य मात्र केलें नाहीं. असा च प्रकार सामांचा. मूळ जे सामगायक होते ते च लौकिक गायक असत. पण पुढें जेव्हां सामगायन धर्माच्या सांकेतिक नियमांनीं बद्ध झालें तेव्हां लौकिक गायकांचा वर्ग निराळा झाला. सामगायक हे केवळ यज्ञांतील औद्गात्र करून राहिले. त्यांच्या गायनाची बाहेर छाप पडेनाशी झाली. इतकें च नाहीं तर त्यांची सर्वत्र थट्टा होऊं लागली. कारण त्या गायनानें जनमनरंजन होईना. तें फक्त यज्ञांतील देवांना प्रिय अतएव पवित्र राहिलें. येथें च सामगायन आणि

भारतीय गायन हे दोन भेद उत्पन्न झाले. सामगायन स्थिर होत गेलें, भारतीय गायन प्रगतीच्या मार्गाला लागलें. ऋषींच्या सामगायनाचें शास्त्र सामवेदावरील ब्राह्मण आणि सूत्र ग्रंथांत ग्रथित झालें म्हणून मागें सांगितलें च आहे. भारतीय गायनाचें शास्त्र भरतमुनीनें रचिलें. हें गायन सामांतून निघालें नाहीं तर त्याच्याशीं समांतर चालत आलें आहे. या गायनावर वेळोवेळीं जो बाह्यांच्या निरनिराळ्या गायनपद्धतींचा परिणाम झाला त्यायोगें त्यांत हि पुन्हा दोन भेद पडले,—(१) मार्गी गायन, व (२) देशी गायन. मार्गी गायन म्हणजे गंधर्वादि गणांचें लुप्त, सुप्त किंवा मृत गायन. देशी गायन म्हणजे देशांत प्रचलित असलेलें जिवंत गायन. सारांश, आर्यांच्या गायनमार्गांत प्रथम दोन भेद उद्भवले. —धार्मिक गायन आणि लौकिक गायन. आर्ष गायन जें सामगायन तें च धार्मिक गायन. हें देवप्रिय गायन. भरतप्रणीत जें गायन तें लौकिक गायन. हें मानवप्रिय गायन. या गायनांत पुन्हा दोन भेद झाले, मार्गी गायन आणि देशी गायन. जुन्या शास्त्राच्या मार्गावर असलेलें तें मार्गी गायन. नवीन शास्त्रांत येणारें तें देशी गायन.

सामगायनाची रचना अगोदर च तयार असलेल्या छंदोबद्ध मंत्रांवर झालेली होती. त्या कारणानें त्याची मजल सप्तस्वरांच्या पुढें फारशीं गेली नाहीं. भारतीय गायन स्वतंत्रपणें उदयास आलें. त्या कारणानें तें स्वरांच्या पलीकडे श्रुतींमध्यें अपरंपार विकास पावलें. अर्थात् येथें जुनीं सामें मागें पडलीं

आणि नवीन राग उत्पन्न झाले. या रागांची प्रगति खंडित गायनाकडून अखंडित गायनांत घडून आली. या प्रकारें जेव्हां स्वरांच्या पुढें श्रुति निघाल्या तेव्हां सामांच्या पुढें रागांचा विस्तार होऊन त्यांत च मानवी कर्णाला आहत ध्वनींतून अनाहत ध्वनीकडे म्हणजे सान्तांतून अनन्ताकडे नादब्रह्माची दिशा स्पष्टपणें गोचर झाली. अशा रागांचा आविष्कार होण्यास आतां पूर्वीच्या सामाप्रमाणें वर्णाक्षरांचें काम राहिलें नाहीं तर तो केवळ कंठांतील स्वरालापांत होऊं लागला. भारतीय गायनशास्त्रांत ध्वनीचीं स्थानें तीन सांगितलीं आहेत,–( १ ) हृदय, (२) कंठ, आणि ( ३ ) मूर्धन्. या स्थानांतून अनुक्रमें मंद्र, मध्यम आणि तार हे स्वरालाप उगम पावतात. भारतीय गायनाचें मुख्य रहस्य निरनिराळ्या रागांत असे स्वरालाप काढण्यामध्यें आहे. ही गोष्ट गवयांचें लोमथोम किंवा बिनांतील झिलंपत पाहिलें म्हणजे चांगली प्रत्ययास येते. अर्वाचीन बीन हें प्राचीन वैदिक वीणेचें रूपांतर आहे. ऐतरेय आरण्यकांत अशा वीणेला ' मानवी वीणा ' म्हटलें असून तिची दैवी वीणेशीं म्हणजे मानवदेहाशीं तुलना केली आहे आणि त्या दोहोंतून निघणाऱ्या स्वरालापांचें यथार्थ सादृश्य दाखविलें आहे. अशा स्वरालापांतील श्रुतींना धरून जीं गाणीं बनलीं तीं भारतीय गायनांतील ध्रुपदें, ख्याल वगैरे होत. येथें सामांतील गाणीं आणि रागांतील गाणीं यांतील फरक चांगला दिसून येतो. सामांतील गाणीं अगोदर च सिद्ध असलेल्या मंत्रांतील शब्दांवर बनलीं तर रागांतील गाणीं मूळ स्वराला-

पांतील श्रुतींवर मागाहून रचण्यांत आली. म्हणजे येथें रामदारीच्या गायनांत शब्दांतील अक्षरांवर स्वरांची निर्मिति झाली नाहीं तर स्वरांतील श्रुतींवर शब्दांची आणि त्यांतील अर्थाची निर्मिति झाली आहे.

शास्त्र ( Science ) आणि कला ( Art ) हीं दोन मावंडें आहेत. पुन्हा कलेंत उपपत्ति ( Theory ) आणि प्रयोग ( Practice ) हे दोन भेद आहेत. शास्त्र हें कलेला पोषक पाहिजे. निदान त्यांत कलेची हानि होतां कामा नये. शास्त्र हें कलेचें संरक्षण करतें पण पुष्कळ वेळां तिच्या वृद्धीला अडथळा आणतें. अशा स्थितींत कलेला शास्त्राची मर्यादा ओलांडून आपला स्वतंत्र मार्ग आंखावा लागतो. पण त्यांत कदाचित् ती कोठें तरी भडकून जाण्याचा संभव असतो. शास्त्र आणि कला यांतील संबंध अंधपंगुन्यायाप्रमाणें आहे. शास्त्र डोळस आहे, कला आंधळी आहे. पण कला पायानें मजबूत आहे, शास्त्र पंगू आहे. त्या कारणानें जर दोघांनीं एकमेकांचा सम्यगाश्रय केला तर ठीक आहे, नाहींपेक्षां स्वतंत्र राहिल्यानें दोघांचा नाश आहे. कलेनें शास्त्रांत चाललें पाहिजे, तर शास्त्रानें कलेला पुढील मार्ग निश्चित करून दिला पाहिजे. तर च दोहोंची भरभराट आहे. शास्त्रानें कलेचा मार्ग बंद करून चालावयाचें नाहीं. तसें केल्यानें कला शास्त्राला जुमानणार नाहीं हें निःसंशय होय. सामगायनांतील कलेला धर्माच्या अनुशासनाखालीं शास्त्रानें कायमचें बांधून टाकलें. त्या कारणानें भारतीय कलेला

सामाची वाट सोडून आपला निराळा स्वतंत्र मार्ग काढावा लागला. या प्रकारें सामकला आपल्या आकुंचित क्षेत्रांत विराम पावली, तर भारतीय कला आपल्या मार्गांत येणाऱ्या सर्व गुणांचा संग्रह करीत अपरंपार फुगून गेली. पुढें या नवीन कलेला हि शास्त्राची जोड मिळाली पण येथें शास्त्र आणि कला या दोहोंनीं एकमेकांच्या प्रांतांत आक्रमण न करतां आपआपली जागा योग्य रीतीनें संभाळली. शास्त्रानें गायनाबरोबर त्याचे दुसरे दोघे सहोदर वादन आणि नर्तन यांचा हि चांगला परामर्ष घेतला आणि या प्रकारें तिहींचें मिळून जें 'संगीत' बनतें त्याचा त्यांत सांग आणि सोपपत्तिक उत्तम विचार झाला.

असें संगीत या देशांत मुसलमानांचें साम्राज्य स्थापन होई पर्यंत ब्राह्मण कलावंतांच्या हातीं होतें. त्या योगें शास्त्र आणि कला यांची सांगड चांगली राखण्यांत आली. पुढें मुसलमानांचा अंमल झाल्याबरोबर त्यांची एकदम ताटातूट झाली. मुसलमानांचा धर्म जात्या संगीतकलेला पोषक नव्हता तर उलट हानिकारक होता. पुन्हा त्यांत शास्त्राला हि फारशी मातब्बरी नव्हती. उदाहरणार्थ, वेद कसा म्हणावा या बद्दल जशीं प्रातिशाख्यादि शास्त्रें आहेत तसें कुराण म्हणण्याची पद्धत दर्शविणारें एखादें शास्त्र झालेलें नाहीं. परंतु पुढें इराणी संस्कृतीच्या संपर्कानें मुसलमानांत विद्या आणि कला शिरल्या. इराणी संस्कृति ही जुनी आर्य संस्कृति च होय. असे इराणी बाटलेले मुसलमान जेव्हां या देशांत आले तेव्हां त्यांनीं

आपल्या बरोबर कांहीं कलावंत आणले. त्यांचा येथील ब्राह्मण कलावंतांशीं परिचय झाला आणि त्याचा परिणाम साहजिक च दोन कलांचें संमिश्रण बनलें मुसलमानी राजांच्या कारकीर्दींत या कलेला चांगला राजाश्रय मिळाला. परंतु त्या बरोबर हीं कला ब्राह्मणांच्या हातांतून मुसलमानांच्या हातांत गेली. इतकी कीं तानसेनासारखे मूळचे ब्राह्मण कलावंत केवळ राजांच्या मर्जींखातर कलेच्या पायीं मुसलमान झाले. अशा मुसलमानी अमदानींत कला सर्व बाजूंनीं झपाट्यानें वाढली पण शास्त्र जें त्या बरोबर समांतर चालावयाचें तें न चालतां तसें च मागें रेंगाळलें. तें अद्यापि तेथें च कायम आहे त्यांत कसली च महत्त्वाची भर पडली नाहीं अर्थात् शास्त्राच्या अभावीं ही कला आज आंधळेपणानें सैरावैरा धांवत आहे. तिला शास्त्राच्या कक्षेंत आणण्यास पुनरपि तिचें ब्राह्मणांनीं धारण केलें पाहिजे. तर च हें दुर्घट कार्य सिद्धीस जाईल, नाहीं तर नाहीं.

मुसलमानांचें युग संपून आतां जो ख्रिस्ती साम्राज्याचा काळ आला आहे त्यांत या कलेला राजाचे जवळ किंचित् हि मान नाहीं. याला कारणें दोन आहेत,—(१) राज्यकर्त्यांची स्वाभाविक वृत्ति येथील कोणत्या हि विद्येला आणि कलेला आश्रय आणि उत्तेजन देण्याची नाहीं, व (२) त्यांना आपल्या ख्रिस्ती विद्या आणि कला यां बद्दल अयथार्थ अभिमान आहे. या दोन्ही गोष्टी मुसलमानांच्या ठिकाणीं नव्हत्या. म्हणून त्यांना हिंदूंच्या ज्या ज्या विद्या आणि कला योग्य वाटल्या त्यांचा त्यांनीं सादर स्वीकार केला. हल्लींच्या

राज्यकर्त्यांना आपल्या स्वतःच्या प्रत्येक गोष्टीबद्दल इतका विलक्षण अभिमान आहे कीं त्यांना एतद्देशीयांचे जवळून घेण्यासारखें योग्य असें कांहीं वाटत च नाहीं आणि वाटलें तरी आपली पोकळ इभ्रत रक्षण करण्याकरितां तसें ते बाहेरून दर्शवीत नाहींत. त्या कारणानें त्यांच्या राज्याला आज जवळ जवळ दोन शतकें होत आलीं पण त्यांनीं येथील गायनकलेचा आपल्याशीं लवमात्र संपर्क होऊं दिला नाहीं. मात्र अलीकडे पांच पंचवीस वर्षांत त्यांतलि कांहीं लोकांनीं भारतीय संगीतशास्त्राचें थोडथोडें अध्ययन केलेलें दिसत आहे. परंतु अद्यापि एक हि युरोपीय मनुष्य ही कला स्वरूपतः जाणून घेण्याला आणि शिकण्याला प्रवृत्त झालेला नाहीं. अर्थात् त्याला जर या श्रेष्ठतम कलेचें रहस्य नीट समजलें नाहीं तर त्यांत कांहीं नवल नाहीं.

युरोपीय ख्रिस्ती गायन आणि भारतीय आर्य गायन यांत जमीनअस्मानांचें अंतर आहे; जसें, या दोन धर्मांत आणि संस्कृतींत आहे. ख्रिस्ती धर्म हा मूलतः कलेचा पोषक नाहीं. कारण तो जोग्यांनीं उपस्थित केलेला आहे. पण पुढें जेव्हां त्यांत 'चर्च' नामक संस्था स्थापन झाली तेव्हां त्यानें ग्रीक आणि रोमन लोकांच्या विद्या आणि कला उचलल्या. त्या बरोबर त्यांत गायन कलेचा हि प्रवेश झाला. तथापि ती केवळ धर्मांतील प्रार्थनेला चिकटून राहिली. ख्रिस्ती धर्म हा प्रार्थनाप्रधान आहे. पुनः गायनाचें जितकें अंधकाराशीं नातें आहे तितकें च धर्माशीं आहे. इतकें कीं, सर्व गायन धर्माला

धरून निघतें तर सर्व धर्म गायनाला धरून चालतो असें म्हटलें असतां फारसा बाध येणार नाहीं. ख्रिस्तीधर्मापूर्वीं त्याच्या समोंवर जगांत जे मोठमोठे धर्म होते ते सर्व यज्ञप्रधान होते; जसे यहुदी, पार्शीयन, ग्रीक, रोमन इत्यादि. अशा धर्मांत वैदिक पद्धतीचीं सामें गाइलीं जात. यहुदी ' Psalms ' प्साल्म्स हें त्याचें उत्तम उदाहरण आहे. ख्रिस्ती धर्मानें या यहुदी सामांच्या धर्तीवर आपलीं ' Hymns ' म्हणजे स्तोत्रें तयार केलीं. ' हिम्न ' किंवा ' हाइम्न ' हा शब्द हामन्=सामन् या शब्दाचा च अपभ्रंश आहे. या स्तोत्रांतील किंवा स्तवनात्मक पद्यांतील गायन मूळ ग्रीक 'टेट्रा–कॉर्ड' मध्यें म्हणजे चतुःस्वरांत होतें. पुढें या स्वरचतुष्टयाच्या दोन आवृत्तींत हल्लींचें ' ऑक्टेव्ह ' म्हणजे स्वराष्टक तयार झालें. या प्रकारें ख्रिस्ती गायन हें प्राचीन वैदिक सामगायना प्रमाणें कलेंत फार पुढें गेलें नाहीं. त्याची मजल सात स्वरांत च कुंठित झाली. भारतीय गायनाप्रमाणें तें पुढें बावीस श्रुतींत संचार करूं लागलें नाहीं. त्या कारणानें या गायनांत रागांचा जसा आविष्कार व्हावा तसा झाला नाहीं. तें केवळ खंडित स्थितींत अखंड कायम राहिलें.

स्वरांत गायन खंडित राहतें, श्रुतींत अखंडित चालतें. स्वरांत ' हार्मनी'चें पोषण घडतें, श्रुतींत ' मेलडी'चा परिपोष होतो. ' हार्मनी ' म्हणजे संवादी स्वरांचें पुनः पुनः एकत्र मेलन. ' मेलडी ' म्हणजे नाना रागांचें निरनिराळ्या आलापांत आविष्करण. त्यांना अनुक्रमें ' स्वरसंवाद ' आणि

' स्वरालाप ' हे शब्द योजतां येतील. स्वरसंवादांतील खंडित गायन मंडुकप्लुतीसारखें असतें. स्वरालापांतील अखंडित गायन सर्पगतीसारखें चालतें. म्हणजे एकांतील ताना बेडकाच्या उड्या मारण्याप्रमाणें दिसतात, तर दुसऱ्यांतील मींडा नागमोडीच्या वळणासारख्या भासतात. स्वरसंवादांतील ' मंडुकप्लुति ' गायन अनेकांना थोड्या श्रमांत एकत्र मिळून चालवितां येतें. स्वरालापांतील ' सर्पगति ' गायन केवळ एकेका कलावंताला अति परिश्रमानें पूर्णतेला नेतां येतें. यावरून स्वरसंवादांतील गायन हें स्वरूपतःच ' डेमॉक्रसी ' ला म्हणजे संघशाहीला पोषक असतें, तर स्वरालापांतील गायन हें ' आरिस्टॉक्रसी 'ला म्हणजे उद्घशाहीला उपकारक होतें ही गोष्ट उघड ठरते. ख्रिस्तीधर्म हा संघशाहीला उचलून धरणारा आहे तर वैदिक धर्म हा उद्घशाहीचा पुरस्कार करणारा आहे. ख्रिस्तांतक नीट्झश हा संघशाहीच्या विरुद्ध उद्घशाहीचा मोठा भोक्ता आहे. अर्थात् त्याला ख्रिस्ती गायनांतील मंडुकप्लुति स्वरसंवाद आवडले नाहींत यांत नवल नाहीं. त्याला त्या गायनांत सान्तांतून अनन्तांत नेणारे स्वरालाप ऐकूं आले नाहींत म्हणजे तेथें त्याला कांहीं राम दिसला नाहीं. त्याला मनुस्मृतीच्या परिशीलनानें जसा वर्णाश्रमधर्माचा बोध झाला तसा भारतीय गायनाचा झाला नाहीं. कारण भारतीय गायनशास्त्राशीं आणि कलेशीं त्याचा कधीं परिचय घडून आला नाहीं. तो जर आला असता तर त्याला ख्रिस्ती गायन आणि भारतीय गायन यांतील भेद तत्काळ दिसून या दैवी कलेचें

मर्म तेव्हां च कळलें असतें. तथापि त्याला आत्मस्फूर्तीनें ख्रिस्ती गायन हें हलक्या दर्ज्याचें आहे, त्यांत आर्यांच्या श्रेष्ठ भावनांना धरून सुधारणा झाली तर ठीक, नाहीं तर तें विनाशाचें लक्षण आहे या गोष्टी ज्या ज्ञात झाल्या त्यांत च त्याचा मोठेपणा निदर्शनास येत आहे. येथें त्याचा ख्रिस्ती गायनाशीं आणि वाग्नेरसारख्या त्यांतील कलावंतांशीं जो तीव्र विरोध आहे तो शुद्ध तात्त्विक स्वरूपाचा आहे. याची जाणीव अद्याप युरोपला आलीं नाहीं, ती यावयाची आहे. सारांश, शोपेनहौएर विरुद्ध नीट्झ्श म्हणजे जसें बौद्ध तत्त्वज्ञान विरुद्ध वैदिक तत्त्वज्ञान, तसें च वाग्नेर विरुद्ध नीट्झ्श म्हणजे ख्रिस्ती गायन विरुद्ध भारतीय गायन होय.

ख्रिस्ती गायन विरुद्ध भारतीय गायन म्हणजे सामांतील गायन विरुद्ध रागदारींतील गायन, अर्थात् पदबंधांतील गायन विरुद्ध गायनांतील पदबंध होय. शिलरनें म्हटलें आहे, अगोदर शब्दांची रचना करून मग त्यांवर गाणें बसविणें या पद्धतीपेक्षां आधीं गुणगुणणें आणि नंतर त्यावर शब्दरचना करणें ही पद्धत चांगली. त्यानें स्वतः आपल्या गाण्यांची रचना अशी केली आहे. नीट्झ्शेच्या मतें सर्व प्रकारचीं लोकगाणीं अशीं च गुणगुणण्यांत तयार होतात. येथें मुख्य भर ध्वनीं-तील स्वरालापांत असतो. काव्य केवळ तदंगभूत निर्माण होतें. अशा काव्यांतील शब्द त्या ध्वनीशीं पूर्णपणें मिळून जाण्या-करितां धडपड करीत असतात. साक्षात् ध्वनीला हा शब्द काय, त्याचा आकार काय, किंवा त्यांतील कल्पना काय

यांपैकीं कशाची च गरज नसते. तो त्यांना आपल्या जवळ उदारपणें आश्रय देतो इतकें च त्याच्या अंतरंगांत भाषेला कधीं च प्रवेश करतां येत नाहीं. नीट्झशेला प्रथम वाटलें कीं अशा प्रकारचें उदात्त गायन वाग्नेर निर्माण करील. पण त्याची ती आशा सफल झाली नाहीं. जसा शोपेनहौएर तसा च वाग्नेर. एकाचे ठायीं जसें त्याला तत्त्वज्ञानासंबंधीं नैराश्य वाटलें तसें दुसऱ्याचे ठायीं कलेसंबंधीं वाटलें आणि तो दोघांना सोडून तिसऱ्या च एका झरथुष्ट्राचे ठायीं रममाण झाला. तेथें मात्र त्यानें आपल्या अत्युच्च ध्येयाची अशी एक अनन्यसाधारण प्रतिमा कल्पिली कीं जी आपल्या स्थानापासून केव्हां च भ्रष्ट होणार नाहीं. वाग्नेरला सोडून झरथुष्ट्राला निर्माण करी पर्यंत मधला काळ त्याचा परम नैराश्याचा गेला. या नैराश्याच्या तिमिर अंधकारांतून झरथुष्ट्राचे ठायीं त्याच्या आशारवीचे किरण उदय पावले आणि ते पुढें एकसारखे वृद्धिंगत होऊन तेजाच्या परिसीमेला गेले. तथापि निराशेच्या भरांत वाग्नेरचा एका बाजूनें तिरस्कारपूर्वक परित्याग करण्यांत दुसऱ्या बाजूनें त्याला त्या बद्दल अपरिमित दुःख झालें. म्हटलें आहे, थोरांचीं हृदयें कशीं असतात, तर "वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि." येथें वाग्नेर विरुद्ध नीट्झशे हा जो प्रश्न आहे तो तत्त्वाचा आहे. म्हणून आंथनी लुडोव्हिकीनें म्हटल्याप्रमाणें आपण त्या दोघांतील भांडण सामान्य व्यवहारी माणसांच्या भांडणाप्रमाणें समजतां कामा नये. तें तत्त्वाचें भांडण आहे. त्याचा मानवी जीविताशीं

आणि पुरुषार्थांशीं निकट संबंध आहे. ज्या प्रमाणें त्यानें पूर्वी आधुनिक वाङ्मयांतील नरसूगिरीचें चित्र रंगाविण्याकरितां डेव्हिड स्ट्रौस्सचें नांव केवळ उदाहरणादाखल घेतलें त्या च प्रमाणें आतां आधुनिक कलेंतील अवनतीचें रूप दर्शविण्याकरितां वाग्नेरचें नांव योजिलें. बाकी त्या दोघांबद्दल त्याचे मनांत कोणत्या हि प्रकारची द्वेषबुद्धि नव्हती.

नीट्झ्शेच्या मनांत वाग्नेरबद्दल द्वेष उत्पन्न होण्याचें कांहीं कारण च नव्हतें. द्वेष हा मत्सरापासून जन्मतो तर मत्सर हा समानकार्यांत उगम पावतो. नीट्झ्शेचें संपूर्ण कार्य तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रांत होतें तर वाग्नेरचें कलेच्या क्षेत्रांत होतें. जावत्कालपर्यंत वाग्नेरच्या कलेंत नीट्झ्शेला आपल्या तत्त्वज्ञानाचें प्रतिबिंब भासत होतें तावत्कालपर्यंत त्याला त्याचे संबंधीं महान् आदर वाटत होता. परंतु जेव्हां प्रतिबिंब अदृश्य झालें तेव्हां साहजिक च आदर मावळला आणि त्याची जागा तिरस्कारानें व्यापिली. हा आदर किती अपरंपार होता याची कल्पना त्याच्या त्या काळच्या पत्रांतील उल्लेखांवरून चांगली करतां येते. तो स्विट्झर्लंडमध्यें बासेलच्या युनिव्हर्सिटींत कांहीं वर्षें प्रोफेसर असतांना त्याचें वाग्नेरच्या घरीं नित्य जाणें येणें असे. कारण वाग्नेर हा तेथें च पिलेटसच्या टेकडीच्या पायथ्याशीं लुसर्न तलावाचे कांठीं घर करून राहिला होता. त्याच्या त्या उद्यानगृहाचें नांव 'ट्रिब्शेन' असें होतें. येथें नीट्झ्शेला वाग्नेर आणि त्याची बायको कोसीमा या उभयतां पतिपत्नींकडून सदा उत्तम प्रेमाचा पाहु-

णचार मिळे. या वेळीं त्याच्या मनावर शोपेनहौएरच्या तत्त्वज्ञानाचा पगडा होता. हें तत्त्वज्ञान त्याला वाग्नेरच्या कलेंत मूर्त स्वरूपांत दिसून आलें आणि त्या बरोबर त्याची वाग्नेरवर विलक्षण भक्ति बसली. अर्थात् पुढें जेव्हां त्याला शोपेनहौएरचें च तत्त्वज्ञान फोल दिसूं लागलें तेव्हां वाग्नेरची कला हि कुचकामाची वाटली यांत नवल नाहीं. या अनन्य भक्तीच्या काळीं तो वाग्नेरसंबंधीं आपल्या एका पत्रांत लिहितो,—" कोणाला तो कसा आहे हें कळत नाहीं, कोणाला च त्याची परीक्षा करतां येत नाहीं; कारण सर्व जग निराळ्या पायावर उभें आहे, आणि निराळ्या वातावरणांत राहणारें आहे त्याचे ठायीं इतकी निरपेक्ष स्वरूपाची ध्येया-सक्ति आहे, इतकी खोल आणि जिव्हाळ्याची मानवता आहे, इतकी उदात्त गंभीरता आहे कीं त्याचे समोर मला असें वाटतें कीं आपण कोणा तरी देवापुढें उभे आहों." पुनः तो वाग्नेरच्या पत्रांत त्याच्या घरासंबंधीं म्हणतो,—" मला जशी माझी इटली तसा च तूं आहेस........त्याला ' ट्रिब्शेन ' म्हणतात: आणि त्या ठिकाणीं मला अगदीं घरच्या सारखें वाटतें. प्रियतम मित्रा, तेथें मी जें कांहीं शिकतों आणि पहातों, ऐकतों आणि जाणतों, तें केवळ अवर्णनीय असतें. मी खरें च सांगतों, शोपेनहौएर आणि गऽटे, एस्चायलस आणि पिंडार हे तेथें जिवंत आहेत." या काळीं वाग्नेरच्या सहवासांत जो त्याला अनुपमेय आनंद मिळत होता आणि विलक्षण सुख वाटत होतें तें तो कधीं विसरला नाहीं. अगदीं शेंवटीं

शेवटीं यद्यपि त्यानें वाग्नेरच्या विरुद्ध साक्षात् टीकेचें हत्यार उपसलें असलें तथापि जेव्हां जेव्हां त्याला या दिवसांचें स्मरण होई तेव्हां तेव्हां त्याचें अन्तःकरण मडमडून येई. एतत्संबंधीं त्यानें आपला स्नेही पीटर गास्ट याला १८८० सालीं पत्रांत लिहिलें आहे,—" कितीदां तरी मला त्याचें स्वप्न पडतें आणि सदा तें आमच्या पूर्वींच्या विश्वासाच्या स्नेहासंबंधीं असतें. आमच्यांत कधीं चुकून सुद्धां गैर शब्द बोलण्यांत येत नसे, कधीं माझ्या स्वप्नांत देखील नाहीं, परंतु उल्हासकारक आणि आनंददायक मात्र किती तरी येत, आणि मला वाटतें मी त्यावांचून दुसऱ्या कशांत केव्हां हि इतका पुष्कळ हंसलों नाहीं. ' ते हि नो दिवसा गताः '— आणि आतां त्याचें काय? तथापि पुष्कळ बाबतींत त्याच्या विरुद्ध माझी च बाजू खरी आहे! जणुं काय तें गत प्रेम माझ्या स्मरणांतून बाहेर काढून टाकलें जाईल. "

वाग्नेर हा नीट्झशेपेक्षां जसा वयानें मोठा होता तसा कीर्तीनें हि मोठा होता. अर्थात् त्या दोघांतील नातें गुरुशिष्यांसारखें होतें. तथापि वाग्नेर हा नीट्झशेची बुद्धिमत्ता ओळखून होता. नीट्झशेच्या सांगण्यावरून त्यानें आपल्या नाटकांत पुष्कळ नवीन कल्पना घेतल्या. विशेषतः अपॉलो विरुद्ध डायोनिसस ही मूळ नीट्झशेची कल्पना. ती वाग्नेरनें उचलली. तथापि किती केलें तरी उसनें अवसान फार काळ टिकत नाहीं. त्या प्रमाणें वाग्नेरला ही कल्पना शेवटपर्यंत झेपली नाहीं. म्हणून च त्याचे ठायीं नीट्झशेबद्दल जसें प्रेम

होतें तशी च भिती हि वास करीत होती. ही गोष्ट त्याच्या एका पत्रांतील उल्लेखावरून चांगली विशद होते. त्यानें नीट्झ्शेला लिहिलें आहे,—" माझ्या बायकोच्या खालोखाल जीवितानें मला जी एक च एक देणगी दिली आहे ती तूं होय. परमेश्वरासमोर मी सांगतों कीं, मी कोणत्या मार्गानें जावें हें जाणणारा तूं एकटा च आहेस असें मला विश्वासपूर्वक वाटतें. " याचें कारण उघड आहे. शोपेनहौएरच्या तत्त्वज्ञानावर वाग्नेरशीं पुष्कळ वादविवाद आणि खल करून नीट्झ्शेनें १८७२ सालीं प्रथम च जो आपला ' भीषण नाटकाचा जन्म ' हा ग्रंथ लिहिला आणि वाग्नेरला अर्पण केला त्यांतील अपॉलो विरुद्ध डायोनिसस ही कल्पना त्याला त्यावेळीं फार च पसंत पडली. इतकी कीं त्यानें त्याबद्दल त्याला लिहिलें,— " तुझ्या पुस्तकापेक्षां अधिक चांगलें आतांपर्यंत माझ्या वाचनांत कांहीं आलें नाहीं. तें केवळ अप्रातिम आहे. " त्याच्या बायकोनें तर त्याची कोण तारीफ केली,—" तुझें पुस्तक किती छान आहे, किती छान आणि किती खोल, किती खोल आणि किती मुद्देसूद. " अर्थात् नीट्झ्शेला वाग्नेर आपल्यासारखा च सर्वस्वी ' डायोनिसियन् ' वाटला यांत नवल नाहीं. परंतु नीट्झ्श हा तरुण अननुभवी होता. वाग्नेर हा जगाचा अनुभव घेतलेला व्यवहारज्ञ होता. त्याचें तत्त्वज्ञान केवळ शब्दांत रममाण होण्यापुरतें होतें. नीट्झ्शेचा तो जिव्हाळ्याचा विषय होता. थोडक्यांत सांगावयाचें तर वाग्नेरला नीट्झ्शेचें ' तत्त्व ' मान्य होतें पण ' तपशील ' अमान्य

होता. नीट्झ्शेची अपेक्षा त्यानें हें तत्त्व क्रियेंत आणावें अशी होती, आणि तें तर वाग्नेरच्या कधीं स्वप्नांत हि आलें नाहीं. त्याची सर्व आशा विफल झाली. पुनःएकवार " सगळे च नरसू ". वाग्नेर हा हि एक बडा नरसू ठरला.

' बिरॉइट येथें रिचर्ड वाग्नेर ' हा त्याचा वाग्नेरवरील पहिला आणि शेवटचा स्तुतिपर लेख होय. हा लेख त्यानें १८७६ मध्यें लिहून प्रसिद्ध केला म्हणून मागें सांगितलें च आहे. या वेळीं त्याचे मनांत वाग्नेरच्या सत्यपणाविषयीं संशयानें घर केलेलें होतें. तथापि तो अगदीं च आपल्या शब्दाच्या उलट जाऊन सर्वतोपरि नादान ठरेल अशी त्याला शंका आली नाहीं. किंबहुना त्याचें डळमळित मन पक्कें करण्याकरितां च जणुं त्यानें या लेखांत वाग्नेरच्या ठायीं आपल्या ध्येयाची परिसीमा कल्पिली आणि त्याला कलेच्या उच्च शिखरावर नेऊन बसविलें. म्हणून च पुढें त्याला आपल्या आत्मचरित्रांत वाग्नेरसंबंधीं स्पष्ट इशारत द्यावी लागली कीं या लेखांतील वाग्नेर हा वाग्नेर नाहीं तर त्याचा विरोधक नीट्झ्श किंवा झरथुष्ट्र आहे. मारून मुटकून घोड्यावर बसविलेला स्वार शेवटीं खालीं आला आणि त्यानें आपलें खरें रूप प्रकट केलें. या च वेळीं वाग्नेर हा आपलें ' पर्सिव्हल ' नामक नवीन संगीत नाटक तयार करीत होता. त्यांत त्यानें नीट्झ्शेबरोबर वादविवादांत ज्या गोष्टी तत्त्वशः मान्य केल्या होत्या त्या सर्व झुगारून देऊन त्यांचे जागीं जुन्या टाकाऊ खिस्ती कल्पनांचें जसेंच्या तसें अवलंबन केलें. उदाहरणार्थ,

प्रेमाचे ठिकाणीं वाइटाला चांगलें बनविण्याची अद्भुत शक्ति आहे, एका मनुष्याला दुसऱ्या मनुष्याचें तारण करण्याचें सामर्थ्य आहे, जमीनीला डोकें लावून लीनता दाखविणें किंवा आकाशाला डोळे लावून भक्तीचें स्तोम करणें हे सद्गुण आहेत, इत्यादि. या च नाटकाच्या रंगित तालमीला वाग्नेरनें नीट्झशेला बिरायट येथें पाचारण केलें. १८७४ सालापासून हा काळ पावेतों म्हणजे १८७६–७७ पर्यंत त्या दोघांची गांठ पडलेली नव्हती. नीट्झश बिरायट येथें गेला. तेथें त्यानें पर्सिव्हल नाटकाच्या प्रयोगाचा मोठ्या थाटमाटाचा समारंभ अवलोकन केला. हा सर्व देखावा पाहून त्याचें मन उद्विग्न झालें. त्याला वाग्नेरचें अन्तःस्वरूप दिसलें. त्याचा भ्रमनिरास झाला. त्याचें ध्येय लयास गेलें. तो वाग्नेरचा विरोधी बनला. अरेरे, तर मग वाग्नेर हा ' डायोनिसस ' नाहीं. तो एक सामान्य नाटक्या आहे, 'बालगंधर्व' आहे—प्रौढ गंधर्व नाहीं, वृत्तपत्रकारवजा आहे, नरसू आहे. नीट्झशेला हें असह्य झालें.

नीट्झशेच्या ठिकाणीं जें नैराश्य उत्पन्न झालें तें पुढील तीन प्रकारांनीं होय, (१) व्यक्तीला धरून, (२) कलेला धरून आणि (३) विचारांना धरून. वाग्नेर हा नीट्झशेपेक्षां वयानें पुष्कळ मोठा असल्यामुळें त्याला एक प्रकारचा वडीलपणाचा मान होता. नीट्झश त्याच्यापुढें सदा विनयानें आणि नम्रतेनें वागे. इतका कीं, लोक त्याला वाग्नेरचा एक वाङ्मयीन सेवक समजत व त्याला हि त्यांत कांहीं कमीपणा वाटत नसे. परंतु पुढें पुढें त्याच्या शिरजोर स्वभावाचा त्याला

कंटाळा येऊं लागला आणि त्यानें त्याच्याकडे आपलें जाणेंयेणें कमी केलें. दुसरें, त्याला वाग्नेरच्या कलेंत शुद्ध संगीतापेक्षां नाटकी डामडौलाचें माहात्म्य अधिकाधिक दिसूं लागलें. आणि तिसरें, तो आपल्या विचारसरणींत डायोनिसियन् मार्गांतून परावृत्त होऊन केवळ लोकांचें मनोरंजन करण्याच्या क्षुद्र हेतूनें ख्रिस्ती मार्गाचें च पुन्हा जसेच्या तसें अवलंबन करून बसला. त्याचें ' पर्सिव्हल ' हें नाटक अधिक ख्रिस्ती किंवा बौद्ध कल्पनांनीं रंगलेलें आहे. बिरायट येथें नीट्झ्शेनें ह्या नाटकाचा रंगप्रयोग पाहिल्या-नंतर वाग्नेरशीं आपला संबंध तोडून टाकला. त्याचे जवळ तत्त्वाचे प्रांतांत तडजोडीला जागा नव्हती. स्वजन कोण, तर जो आपल्या तत्त्वाशीं समरस होतो तो, अशी त्या शब्दाची त्याची व्याख्या होती. येथें वाग्नेर त्या पदापासून च्युत झाला आणि नीट्झ्शे आपल्या मार्गावर स्वतंत्रपणें एकटा पुढें चालला. त्यानें पुढील वर्षीं म्हणजे १८७८ सालीं " मानवी–सर्वथैव मानवी " ( Menschliches allzu Menschliches ) हा ग्रंथ लिहिला आणि त्याच्या पहिल्या भागाची एक प्रत वाग्नेरकडे पाठविली. त्या च वेळीं वाग्नेरनें हि आपल्या ' पार्सिव्हल ' नाटकाची एक प्रत नीट्झ्शेकडे पाठविली होती. या प्रति एकमेकांना एका च वेळीं मिळाल्या आणि त्या योगें त्यांच्यांतील दुरावाला कायमची दृढता आली. वाग्नेरला नीट्झ्शेचा ग्रंथ अगदीं वेड्यासारखा अशक्य कोटींतील क्रांतिकारक वाटला, नीट्झ्शेला वाग्नेरचा

खेळ त्यांतील नीतीच्या शब्दावडंबरांत व धर्माच्या तांत्रिक कर्ममार्गांत अत्यंत किळसवाणा दिसला. शिवाय वाग्नेरनें आपला प्रियमित्र फ्रीड्रिक नीट्झ्श यास शुभाशीर्वादपूर्वक जी ही भेट पाठविली तिच्या खालीं आपल्या नांवाच्या सहीपुढें 'महाधर्ममंडळाचा सभासद' ( Oberkerchenrath ) अशी पदवी नीट्झ्शेला चिडविण्याकरितां मुद्दाम जोडली या गोष्टीचा नीट्झ्शेला जितका राग आला तितका दुसऱ्या कशानें हि आला नाहीं हें निराळें सांगावयास नको च.

नीट्झ्शेची महत्वाकांक्षा एक च होती कीं आधुनिक युरोपांत सर्वत्र पसरलेली अवनतीची छाया नाहींशी करून संस्कृतीची स्थापना करावी. त्याला आपल्या तरुण वयांत कोणीतरी योग्य मार्गदर्शक पाहिजे होता तो वाग्नेर दिसला आणि त्यानें त्याला गुरुस्थानीं नेऊन बसविलें. परंतु पुढें तो त्याला हिणकस वाटला, इतकें च नाहीं, तर साक्षात् त्या अवनतीचा पुरस्कर्ता आढळून आला. अर्थात् येथें संस्कृतीच्या स्थापनेचें नांव लांब च राहिलें पण गुरूबरोबर शिष्याला हि पतन होण्याची वेळ आली. सारांश, प्रथम शिष्यभावानें अनन्य भक्ति, नंतर संशय, पुढें काळजी, शेवटीं भ्रमनिरास. संपलें. त्याच्या आशेची पूर्ण निराशा झाली. त्यानें आपला मार्ग स्वतंत्रपणें अवलंबिला. तो सर्व पाशांतून मुक्त झाला. त्या नंतर पुढें पुरीं दहा वर्षें तो वाग्नेरसंबंधीं चकार शब्द बोलला नाहीं. या काळांत त्याचे एकेक उत्तमोत्तम ग्रंथ बाहेर पडले. त्यावर वाग्नेरनें मात्र १८८३ सालांतील

आपल्या मृत्यूच्या घटके पर्यंत पुष्कळ कुत्सित टीका केली. शेवटीं १८८८ मध्यें म्हणजे ख्रिस्तांतकाच्या वर्षीं त्यानें वाग्नेरविरुद्ध दोन लेख लिहून प्रसिद्ध केले,—(१) वाग्नेरचा प्रश्न ( Der fall Wagner ), आणि (२) नीट्झ्श विरुद्ध वाग्नेर ( Nietzsche contra Wagner ) या दोन्हीं लेखांत त्यानें आपली बाजू सप्रमाण मांडून आणि त्याबरोबर वाग्नेरच्या कलेचा आणि तत्त्वज्ञानाचा मानसशास्त्रदृष्ट्या विचार करून या प्रश्नाचा निकाल लावला. पहिल्या लेखांतील मुख्य मुद्दा असा आहे कीं वाग्नेर हा आपल्या सारखा च मूळ शोपेनहौएरच्या तत्त्वज्ञानापासून निघाला पण त्याचें पर्यवसान पुरुषोत्तमांत न होतां क्रूसावरील पुरुषांत झालें. दुसऱ्या लेखांत त्यानें आपल्या प्रतिपक्षांना उत्तर देण्याकरितां आपल्या अगदीं जुन्या—वाग्नेरच्या स्नेहभावा-च्या काळच्या-लेखांतील अवतरणें घेऊन त्यावरून आपण वाग्नेरच्या विरुद्ध एकदम बाजू घेतली नाहीं तर पूर्वीं पासून च आपणास त्याच्या सत्यपणाबद्दल संशय वाटत होता हें सिद्ध केलें आहे, आणि त्या बरोबर आपण ऋतसत्याचा मार्ग न सोडतां ‘ भीषण नाटकाचा जन्म ’ या पहिल्या ग्रंथांत जें पुरुषोत्तमाचें ध्येय एकदां धारण केलें तें च शेवटच्या ‘ ख्रिस्तांतक ’ ग्रंथांत कायम ठेवलें हें दर्शविलें आहे. पहिल्या लेखाच्या आरंभीं प्रस्तावनेंत त्यानें वाग्नेरच्या विरुद्ध टीकेचें शस्त्र घेण्यास आपण कां प्रवृत्त झालों याचें कारण येणेंप्रमाणें निवेदन केलें आहे.—

"मी माझें मन हलकें करण्याकरितां हें लिहीत आहे........ अशी कोणती पहिली आणि शेवटची गोष्ट आहे कीं ती कोणी हि तत्त्ववेत्ता आपल्या स्वतः पासून मागून घेतो? आपल्या स्वतःचे ठिकाणीं कालाला जिंकणें, "दिक्कालाद्यनवच्छिन्न" होणें. तर मग तत्त्ववेत्त्याला कशाबरोबर घनघोर युद्ध करावें लागतें? जें जें कांहीं त्याचे ठायीं त्याला आपल्या काळाचें अपत्य बनवितें त्या सर्वांशीं. तर मग ठीक आहे! जितका वाग्नेर तितका च मी हि आपल्या काळाचें अपत्य आहे—म्हणजे, मी कळाहीन आहे. फरक इतका च कीं ही गोष्ट मी जाणली आहे, तिच्या विरुद्ध मी धडपड केली आहे. माझ्या ठिकाणच्या तत्त्ववेत्त्यानें तिच्या विरुद्ध धडपड केली आहे.

आतांपर्यंतचा माझा अत्यंत मोठा पूर्वव्यवसाय म्हणजे **अवनतीचा** प्रश्न, आणि ह्यासंबंधीं मला तशीं च कारणें आहेत. "सुष्ट आणि दुष्ट" हें द्वंद्व या प्रश्नाचें च एक खेळकर उपांग आहे. जर एखाद्यानें आपले डोळे अवनतीचीं कारणें शोधून काढण्याला तयार केले असतील तर त्याला नीतीचें हि रूप साक्षात्कारितां येईल,—त्याला तिच्या मोठमोठ्या पवित्र नांवांच्या आणि मूल्यसारण्यांच्या खालीं काय दडून बसलें आहे हें दिसेल: म्हणजे, सुकून गेलेलें जीवन, अवस्तूची इच्छा, भयंकर गलितावस्था. नीति जीवनाचा **निषेध** करिते...... ...हें कार्य शिरावर घेण्यापूर्वीं मला अगोदर स्वतःला शिस्त लावून घेणें भाग पडलें:—जें कांहीं माझ्या स्वतःच्या ठिकाणीं रोगट होतें त्या सर्वांच्या विरुद्ध मला बाजू घ्यावी लागली, मग त्यांत वाग्नेर आला, शोपेनहौएर आला, सर्व च आधुनिक मानवपणा आला. —नितांत दूरीभाव, जें जें कांहीं माझ्या काळाशीं जोडलेलें आहे, जें जें समकालीन आहे, त्या सर्वांशीं थंडगार आणि प्रस्तब्ध वृत्तिः आणि सर्वांत अत्युच्च आकांक्षा, झरथुष्ट्राची दृष्टि, जी दृष्टि सकल मानव-जातीच्या अत्यद्भुत प्रश्नाकडे फार लांब अंतरावरून पाहते,—जी त्याकडे

उंचावरून खालीं अवलोकन करिते.–ह्या अंतिम साध्याकरितां–कोणता आत्मयज्ञ महा मूल्याचा ठरणार नाहीं ? कोणता " आत्मविजय "! कोणता " आत्मनिषेध " !

माझ्या जीवितांतील सर्वांत मोठा प्रसंग म्हणजे **रोगमुक्त** होण्याच्या मार्गाला लागणें. वाग्नेर हा केवळ माझ्या रुग्णावस्थेशीं जोडलेला होता.

आपण ह्या रोगाशीं अकृतज्ञता दाखवावी अशी माझी मुळीं च इच्छा नाहीं. प्रस्तुत लेखांत यद्यपि मी वाग्नेर हा **अपायकारक** आहे या गोष्टीचें समर्थन करीत असलों तत्रापि त्याबरोबर च, इतकें सर्व असून हि, तो कोणाला अनिर्वाह्य आहे हें दर्शविण्याची बिलकुल हयगय करीत नाहीं–तत्त्ववेत्त्याला. त्याचे वांचून इतर कोणाचें कदाचित् वाग्नेर शिवाय कांहीं अडेल असें नाहीं : पण तत्त्ववेत्त्याला मात्र त्याच्याकडे कानाडोळा करून चालावयाचें नाहीं. तत्त्ववेत्ता हा आपल्या काळच्या असद्बुद्धीचें प्रतीक असला पाहिजे,—पण त्याकरितां त्याचे ठायीं त्या काळाचें उत्तमोत्तम ज्ञान हि बाणलेलें पाहिजे. आणि आधुनिक विचारप्रवृत्तीच्या गुंतागुंतीच्या जाळ्यांत वाग्नेरवांचून दुसरा कोण अधिक चांगला मार्ग दाखविणारा सांपडेल, किंवा आत्म्याचें अधिक पूर्णतेच्या नैपुण्यानें आविष्करण करणारा आढळेल ? वाग्नेरच्या द्वारें आधुनिकता ही आपल्या अगदीं अंतरंगांतील भाषा बोलत आहे : ती आपल्या ठिकाणचें कांहीं च चांगलें किंवा वाईट झांकून ठेवीत नाहीं : तिनें सर्व च लाजलज्जा झुगारून दिली आहे. आणि उलट पक्षीं, वाग्नेरच्या ठिकाणीं चांगलें काय आहे आणि वाईट काय आहे हें एकदां स्पष्ट झालें कीं ह्या आधुनिकतेची किंमत काय आहे याची पूर्ण कल्पना येणार आहे. जेव्हां एखादा हल्लींचा संगीतज्ञ म्हणतो कीं,— " मला वाग्नेरचा तिटकारा येतो पण त्यावांचून दुसरें कोणतें गायन सहन करवत नाहीं "–तेव्हां याचा अर्थ मला सर्व रीतीनें उत्तम

कळतो. पण आतां जेव्हां तत्त्ववेत्त्यानें म्हटलें कीं,—" वाग्नेर हें एका केंद्रांत सांठविलेलें आधुनिकतेचें रूप आहे "—तेव्हां तें हि मला तसें च कळलें पाहिजे. त्यावांचून गत्यंतर नाहीं, आपण प्रथम वाग्नेरप्रेमी असलों पाहिजे.............."

नीट्झ्शेचें तत्त्वज्ञान वैदिक धर्माप्रमाणें द्वंद–निर्द्वंद्वाचें आहे, खिस्ती किंवा हिंदूधर्माप्रमाणें द्वैत-अद्वैताचें नाहीं. अर्थात् तो येथें सदर्हू लेखांत ' रागद्वेष ' आणि ' सुखदुःख ' या द्वंद्वांना धरून वाग्नेरच्या प्रश्नाचा उलगडा करीत आहे. तो म्हणतो, मी अगोदर वाग्नेरप्रेमी होतो म्हणून मला आतां वाग्नेरचा उत्तम द्वेष करतां येत आहे. तसा च मी पूर्वीं वाग्नेररूपी रोगानें ग्रस्त होतो म्हणून मला आतां रोगमुक्त स्थितींतील सुखाचा आस्वाद घेतां येत आहे. या लेखांत त्यानें खरा कलावंत कसा असतो आणि वाग्नेर कसा आहे याची पृथक्करणपूर्वक विचक्षणा केली आहे. तींत वाग्नेरची कला, त्याचीं नाटकें, त्यांतील संविधानकें, त्यांतील पात्रें, त्यांतील गायन, त्यांतील तत्त्वज्ञान, त्याचा प्रेक्षकवर्ग या सर्व बाबींचा उच्च संस्कृतीच्या आणि मानसशास्त्राच्या दृष्टीनें विचार झाला आहे. रसशास्त्र किंवा रुचिशास्त्र ( aesthetics ) हें नीट्झ्श म्हणतो, इंद्रियविज्ञानशास्त्राचें प्रायोगिक अंग आहे. अर्थात् वाग्नेरच्या रोगट कलेला मुळांत च त्या शास्त्राचे नियम लागू करतां येणार नाहींत. खरी निरोगी कला कशी असते, तर त्यानें सांगितल्याप्रमाणें बिझेटच्या, किंवा इकडचें उदाहरण द्यावयाचें तर रहिमतखांच्या स्वर्गीय गायनासारखी. ती

इतक्या हलक्या पावलानें पुढें येते, इतक्या मार्दवानें, इतक्या डौलानें. ती अति मोहक असते. ती कधीं श्रम पावत नाहीं.

माझ्या रसशास्त्राचा आद्य सिद्धांत: “ जें जें कांहीं सत् असतें तें तें सहज असतें, जें जें कांहीं दैवी असतें तें तें अति हलका पदविन्यास करितें. ” ही कला असें धरून चालतें कीं गाणारा आणि ऐकणारा हे दोघे सारखे च बुद्धिमान् आहेत, सारखे च रसज्ञ आहेत. उलट वाग्नेरची कला किती जड, आणि किती क्लेशकारक आहे. हा ‘ बालगंधर्व ’ जणुं श्रोत्याला आपल्यासारखा च बाल समजतो.................. तो एक च एक ओळ आणि एक च एक आलाप पुन: पुन: इतका वेळ घोळतो कीं श्रोता हताशपणें कंटाळून जावा. आमच्या सारख्या उच्च कोटीच्या रसशास्त्रवेत्त्यांना आणि कलाभिज्ञांना वाग्नेरमध्यें जर कशाचा पूर्ण अभाव दिसत असेल तर पुढील गुणांचा: **आनंदी विज्ञान**, मृदु चरणक्षेप, रुचिर विनोद, दिव्य तेज, उदात्त आणि भव्य तर्कसारणी, तारकांचें नर्तन, अपार बुद्धिवैभव, दक्षिणचा कंपायमान् प्रकाश, प्रशांत उदधि—पूर्णता..................सारांश, वाग्नेरची कला ही केवळ सांप्रतच्या कळाहीन काळाला योग्य साजेशी आहे: रसज्ञांच्या युगांत तिचा सहज बोजवारा झाला असता. अद्यापि हि जे कांहीं थोडे गुणांचे पारखी आहेत ते तिचा अव्हेर करतांना दिसतात. ज्यांना कलेचें मर्म समजत नाहीं त्यांच्या मनावर तिचा परिणाम होतो,

आणि तो कसा घडवून आणावा इकडे तिचें सर्व लक्ष असतें, नव्हे ती त्याकरतां नाना साधनांचें अवलंबन करिते. तथापि हा परिणाम म्हणजे कलेंतील गुणांचा परिणाम समजूं नये तर **सामान्यतः मज्जातंतूंवरील** परिणाम होय. अर्थात् ही कला प्रत्येक **बाजारबुणग्याला** प्रिय होणारी आहे. कारण तींत गांवढळ आणि चटकदार या दोहोंचें संमिश्रण आहे. शिवाय ही कला ज्यांना तत्त्वज्ञानाचें वारें खपत नाहीं किंवा ज्यांना तें पेलत नाहीं अशा पंडितवर्यांना फार मानवते: ह्या लोकांची वृत्ति स्वतःशीं असंतुष्टपणाची असल्यामुळें सामान्यतः ते सदा जड धुंदीच्या स्थितींत असतात—आणि म्हणून त्यांना वेळोवेळीं उलट स्थितीच्या प्रवाहांत मज्जन करण्याची आवश्यकता असते.

वाग्नेर हा अवनतीचा दर्शक कलाज्ञ आहे, जसा शोपेन-हौएर हा अवनतीचा दर्शक तत्त्वज्ञ आहे. अवनतीचे मुख्य दोन गुण जे प्रेम आणि करुणा ते वाग्नेरच्या कलेंत ओतप्रोत भरलेले आहेत. खऱ्या प्रेमाची मीमांसा द्वेषावांचून होणार नाहीं. हा द्वंद्वाचा नियम च आहे. पण ख्रिस्ती प्रेम हें द्वेषाला व्यावृत्त करून चालणारें आहे आणि तें च वाग्नेरनें उचललें आहे. शिल्लरनें गटेसंबंधीं म्हटलें आहे—“ पूर्णतेच्या स्थितीला जाण्यास प्रेमाशिवाय दुसरें तारण नाहीं. ” हा सिद्धांत वाग्नेरला मोठा प्रिय होता पण त्याची सर्व कला द्वेषांतून निपजते ! जें जें कांहीं अति मोठें त्या सर्वांबद्दल खोल मात्सर्य. अशा मात्सर्यांतून च त्याला एक एक नवीन

कल्पना सुचतात. ज्या ज्या गोष्टींच्या जवळ जाण्यास त्याला धैर्य होत नाहीं त्या सर्वांबद्दल तीव्र द्वेष : रिनेसन्स ( ख्रिस्ती धर्माच्या मध्ययुगीन काळांतलि नवीन विद्यावतरण ), फ्रेंच आणि ग्रीक कला—तींतील डौलदार रचनेला धरून. यावरून त्याला जसा शिल्लरचा एकांगी प्रेमाचा सिद्धान्त कळला नाहीं तसा त्याच्या उलट हि कळला नाहीं हें उघड ठरतें. कोणती हि गोष्ट प्रेमानें साध्य करतां येईल यावर विश्वास ठेवणें हा स्त्रियांचा धर्म आहे. परंतु ज्याला मानवी अन्त : करणाचा ठाव घेतां येतो अशा मानसशास्त्रज्ञाला हें प्रेम—मग तें किती उच्च आणि सखोल असो—किती क्षुद्र, असहाय, ढोंगी आणि प्रमादशील असतें याचा चांगला प्रत्यय येतो. अर्थात् प्रेम हें खरोखर तारक होण्याऐवजीं किती तरी त्वरेनें आणि तत्परतेनें **मारक** होतें..................पुन : प्रेम हें निसर्गापासून फार सुटून राहतां कामा नये. तें निसर्गाच्या पायावर कलेनें मर्यादित झालें पाहिजे. केवळ भावनेच्या भोंवऱ्यांत भराऱ्या मारणारें प्रेम हें खरें प्रेम नाहीं, तो प्रेमाचा आभास होय. वाग्नेरच्या नाटकांत दृश्यमान होणारें प्रेम हें असें च भावनामय आहे.—तें आधुनिक " सुशिक्षित " तरुणींचें प्रेम होय ! परंतु प्रेम जणुं दैव, जणुं दैवायत्तता, निर्घृण, निर्व्याज, निष्पाप,—आणि म्हणून च **स्वभावसिद्ध** ! प्रेमाचें मुख्य साधन म्हणजे युद्ध, त्याचें परम रहस्य म्हणजे स्त्रीपुरुषांतील दारुण द्वेष. असें प्रेम प्रेमाचा मोबदला मागत नाहीं. उलट ख्रिस्ती देव प्रेमाचा मोबदला मागतो. अर्थात् हा देव

निसर्गाचा मित्र नाहीं तर शत्रु आहे, आणि म्हणून मानवाचा तारक नाहीं तर मारक आहे. स्त्रीजातींतील प्रेम जात्या च चांडगुळासारखें असतें. अशा प्रेमापुढें पुरुषजात अगदीं नमून जाते. ही गोष्ट स्त्रियांना उत्तम अवगत असते. त्या पुरुषाचे ठिकाणीं प्रेमाचें इतकें खोल घरटें करतात कीं त्यांत त्याचें शरीर आणि मन या दोहोंचें पूर्ण शोषण घडून तीं हतवीर्य होऊन जावींत!

नीट्झ्श म्हणतो, वाग्नेर हा गायनांतील अनभिज्ञ लोकांचा गायक आहे. तसा तो उपजत नाटक्या आहे. हें मत त्यानें १८७४ मध्यें, म्हणजे वाग्नेरवरील स्तुतिपर लेख लिहिण्याच्या पूर्वीं दोन वर्षें अगोदर आपल्या रोजनिशींत नमूद करून ठेवलें आहे. अर्थात् या वेळीं त्याला वाग्नेरच्या अंतरंगाबद्दल संशय येत चालला होता हें उघड दिसतें. येथें तो पुढें त्याचा आणखी येणेंप्रमाणें खुलासा करतो,—" जसा गटे हा अपरिपक्व चित्रकार आहे, शिल्लर अपरिपक्व वक्ता आहे, तसा च वाग्नेर हा अपरिपक्व कलावंत आहे. त्याचें गायन केवळ रंगभूमीवरील नटाचें आहे. त्याला भिन्न भिन्न जनांतील आणि भिन्न भिन्न मनांतील विचार गाऊन आणि बोलून कसे दाखवावे येवढें च चांगलें कळतें. "— जी जी गोष्ट लोकांचे मनांवर सत्य म्हणून ठसवावयाची असते ती ती वस्तुतः कधीं च सत्य असतां कामा नये—हा एक च नियम डोळ्यापुढें ठेवून जो मनुष्य इतर मानवजातीच्या पुढें जातो तो च चांगला नट बनतो.

हा नियम प्रसिद्ध फ्रेंच नट तात्मा यानें सूत्रित केला आहे: या मध्यें नटाची संपूर्ण मनोरचना समाविष्ट होते, तशी च या मध्यें त्याची संपूर्ण नीतिमत्ता हि निःसंशय समावेश पावते. वाग्नेरचें गानकाव्य कधीं च सत्य नसतें. **गायनकलेंत नटाचा उदय**: या गोष्टीनें माझे मनांत, नीट्झ्श म्हणतो, नुसतें विचाराचें च काहूर उठलें असें नाहीं तर भीतीनें ठाणें घेतलें. कारण येथें च तर गायकांतील 'ऋत' आणि 'सत्य' ( upright and genuine ) या गुणांची भयंकर कसोटी लागण्याची वेळ आली. ही अगदीं ढळढळित दिसणारी गोष्ट आहे: महान् विजय, जें जें कांहीं सत्य असतें त्याला **लोकांत**—जनताजनार्दनांत—कधीं च जय मिळत नाहीं, —असा जय मिळविण्याकरितां मनुष्याला नट झालें पाहिजे! विक्तर ह्यूगो आणि रिचर्ड वाग्नेर—दोघे हि ती च एक गोष्ट सिद्ध करतात: संस्कृतींच्या अवनत काळीं जेथें जेथें लोकमताला निर्णय करण्याचा अधिकार येतो तेथें तेथें सत्य हें निरर्थक, पूर्वग्रहदूषित, कुचकामाचें ठरतें. अशा स्थितींत नट हा च एकटा महान् उत्साह उत्पन्न करूं शकतो. --आणि म्हणून त्याचें च आतां या पुढें सुवर्णयुग उदयाचलावर येत आहे—त्याचें आणि त्याच्याशीं जें जें कांहीं नात्यानें बांधलेलें आहे त्या सर्वांचें.

वाग्नेरचें गानकाव्य सौंदर्यविहीन आहे. अशा प्रकारचें असत्स्वरूपाचें गायन निर्माण करण्यास, नीट्झ्श म्हणतो, फार श्रम लागत नाहींत. शिवाय तें अधिक मनोवेधक,

परिणामकारक आणि द्रव्योत्पादक होऊं शकतें. लॅटिन भाषेंत एक म्हण आहे: "सौंदर्य हें फार थोड्या लोकांकरितां राखून ठेवलें आहे." अर्थात् तें सदोष आहे. मग त्याची कास धरून काय करावयाचें! त्याचे जागीं नुसता आकार, भव्यपणा, अवडंबर माजविलें कीं काम भागलें. असें अवडंबर लोकांना सहज हालवूं शकतें. आणि पुन: एकवार: सौंदर्य निर्माण करण्यापेक्षां अवडंबर माजविणें फार सोपें आहे. ही गोष्ट आम्हांला पूर्ण ज्ञात आहे..........तसें च आम्हांला लोक कसे असतात हें माहीत आहे, आणि रंगभूमीचा प्रभाव हि माहीत आहे. तेथें जो प्रेक्षक वर्ग जमतो त्यापैकीं अगदीं उत्तमोत्तम म्हणविणारांना—मग तीं शिकणारीं युवकें असोत, शिकलेले नंदीबैल असोत, आणि इतर बालगंधर्वप्रेमी असोत—त्या सर्वांना मुख्यत: जें काय पाहिजे असतें तें कांहीं तरी भव्य, गंभीर, प्रचंड होय. आणि या शिवाय राहिला साहिला जो गाबाळगचाळ लोकसमुदाय,—सुशिक्षित हंसा, विलासांत कंटाळलेल्या वामनमूर्ति, शाश्वत बायकी चाळ्यांत रमलेले आंबट शोकी, केवळ उदरतृप्तीनें सुख मानणारे भाग्यवान— यांना हि तें च पाहिजे असतें: भव्य, गंभीर, प्रचंड. या सर्वांची एक च विचारसरणी असते: "जो आम्हांला खालीं पाडतो तो बलवान् असतो; जो आम्हांला वर चढवतो तो दैवी असतो; जो आम्हांला चमत्कृतिजनक होतो तो गंभीर असतो". अर्थात् या लोकांना गायन असें

पाहिजे कीं त्यांत ते खालीं पडले पाहिजेत, वर चढले पाहिजेत, आणि चमत्कारपूर्वक नजरेनें इकडे तिकडे अवलोकन करीत राहिले पाहिजेत. चमत्कार उत्पन्न करण्याचें कार्य गाण्यांतील 'शब्दरचना' करते, खालीं पाडण्याचें कार्य 'विकार' घडवून आणतात, आणि वर चढविण्याचें कार्य 'सद्गुण' संपादतात. मात्र येथें कोठें च सौंदर्य आणि लालित्य दिसून येणार नाहीं. वाग्नेरला जर कशाचा विलक्षण तिरस्कार असेल तर तो या दोन गुणांचा.

आतां ही चमत्कृतिजनक शब्दरचना कशी तर सर्वथा अर्थविहीन. तींत कोणत्या हि प्रकारें विचाराचें माहात्म्य असतां कामा नये. कारण विचारासारखें तडजोड करण्यास लावणारें दुसरें अधिक मोठें साधन नाहीं. मग येथें जें काय पाहिजे आहे तें विचारापूर्वीची मनःस्थिति, जन्म न पावलेल्या विचाराच्या प्रसूतिवेदना, भावीकाळांतील विचाराचें आश्वासन, परमेश्वराच्या सृष्टिनिर्मितीची प्रागवस्था— आदि तमिस्रा...... हें आद्य तम लोकांना चमत्कार करण्यास लावतें........ब्रह्मज्ञानी पुरुषाच्या शब्दांत सांगावयाचें तरः स्वरालापावांचून अनंताशीं तादात्म्य. परंतु ही गोष्ट निसर्गतः शक्य नाहीं. अनंताशीं तादात्म्य पावण्यास नादसृष्टींत स्वरालापावांचून अन्य साधन नाहीं. आणि वाग्नेरला तर स्वरालाप अत्यंत वावडा आहे. नीट्झ्श म्हणतो, 'मेलडी' किंवा स्वरालाप हा एक अनेक सुंदर आणि प्रमाणशीर अंगांनीं मिळून बनणारा अंगी आहे. तें जणु शुद्ध आणि

अविकृत आत्म्याचें ध्वनीच्या तरंगांवर उमटणारें प्रतिबिंब आहे. वाग्नेर जेव्हां त्याला कंवटाळण्याचा प्रयत्न करतो तेव्हां तो आपल्या बाहूंत त्याला अगदीं गांवढळपणें गुदमरून टाकतो. येथें अवनतीच्या काळच्या वाङ्मयरचनेचें नीट्झ्शेनें जें आविष्करण केलें आहे तें येणेंप्रमाणें:—

"........**वाङ्मयांतील अवनति** कोणत्या विशिष्ट लक्षणांनीं युक्त असते ? शब्द बलवान् होऊन वाक्याच्या बाहेर उसळी मारतात, वाक्यें स्वतःच्या मर्यादा ओलांडून पृष्ठाचा साकल्यतः अर्थ तिरोहित करतात, आणि पृष्ठें आपल्या परीं विषयाच्या पूर्तीला धक्का देऊन स्वतः पुरतें तेज प्राप्त करून घेतात. हा सर्व च अपकृष्टतेला गेलेल्या शब्दबंधाचा नियम आहेः येथें सदा परमाणूंच्या ठिकाणीं अराजकता माजलेली असते, इच्छेचें विश्लेषण,—नीतीच्या भाषेंतः " व्यक्तीचें स्वातंत्र्य, "—राजकीय विषयांत पुढें नेऊनः " सर्वांना **समान** हक्क. " प्राण, सर्वत्र सारखा वाटलेला पंचप्राण, प्राणाचें संपूर्ण स्पंदन आणि समृद्धि, हीं सर्व एका अणुमात्र अवयवाचे ठायीं एकत्र खेंचून बाकीचें शरीर सर्वथा निर्जीव करून टाकणें. सर्वत्र पक्षघात, वैक्लव्य आणि बधीरता, अथवा शत्रुत्व आणि अस्ताव्यस्तताः ह्या दोन्ही शक्ति जो कोणी उन्नतीच्या मार्गात ज्या विशिष्ट शरीरयंत्राचा आश्रय घेऊन वर चढतो त्या शरीराचे आकार ज्या मानानें उच्चोच्च असतात त्या मानानें त्याला हाणून पाडतात. या पुढें पूर्णत्व बिलकुल जिवंत रहात नाहींः ती एक बनावट, नियोजित, कृत्रिम आणि काल्पनिक वस्तु बनते. "

जसा पदांतील शब्दसौष्टवानें चमत्कार उत्पन्न करतां येतो तसें त्यांतील विकारानें पतन आणि सद्गुणानें उन्नयन घडवून आणतां येतें. ह्या दोन्ही क्रिया अंशत: इंद्रिय-

विज्ञानशास्त्राला धरून आहेत. विकार म्हटला कीं तेथें साक्षात् स्वरालापाचें किंवा श्रुत्यालापाचें काम नाहीं, तर त्याचा नुसता रंग असला म्हणजे पुरे आहे. येथें मज्जातंतूंना क्षुब्ध करण्याकरितां, त्यांना हाणून पाडण्याकरितां मेघांच्या गर्जना आणि विजेचे कडकडाट पाहिजेत. विकार फार स्वस्त असतात. ते उत्पन्न करण्याला प्रतिरोधी सद्गुण टाकून दिले म्हणजे झाले. येथें कांहीं शिकावयाचें नसतें. ते आपल्याला सहज साध्य करून घेतां येतात. किंबहुना ते आपल्या जवळ सदा सज्ज असतात. सौंदर्य निर्माण करणें फार अवघड आहे : अशा सौंदर्याबद्दल आपण सावधागिरी बाळगिली पाहिजे !.......... आणि तसा च श्रुत्यालाप ! त्याची वेळीं अवेळीं निंदा करीत राहिलें म्हणजे तो डोकें वर करणार नाहीं. कारण सुंदर श्रुत्यालाप—त्यासारखी दुसरी कांहीं अधिक घातुक वस्तु नाहीं ! त्या योगें लोकांची रुचि बिघडेल आणि ते जर त्यांत रममाण झाले तर आपलें स्थान डळमळेल !........ अर्थात् अशा श्रुत्यालापांना दडपून टाकून विकारांचें रक्षण झालें पाहिजे. विकार म्हणजे काय ? स्वरसंवादाच्या ताठ दोरीवर विद्रूपतेच्या गारुड्याच्या उड्या ! वाग्नेरनें सौंदर्याच्या जागीं विद्रूपतेचा पुरस्कार केला आणि सत्यसृष्टीच्या जागीं कल्पनेचें साम्राज्य स्थापिलें. कल्पनासृष्टि निर्माण करण्यास फारशी बुद्धिमत्ता लागत नाहीं पण ती निर्माण करण्यांत शहाणपण मात्र आहे. मनुष्यांना जर वर चढवावयाचें असेल तर आपण स्वत: उंच चढलों पाहिजे. म्हणजे आपण मेघांत

मराऱ्या मारल्या पाहिजेत, अनंतत्वाच्या वल्गना केल्या पाहिजेत, व सर्व अगडबंब चिन्हांकित वस्तु आपल्या मोंवतीं जमविल्या पाहिजेत. सर्‌सम् ! बम्‌बम् ! —" उचंबळणारें हृद्य " हें आमचें साधक प्रमाण, " सुंदर भावना " हा आमचा सहायक वकील. येवढ्या दोन गोष्टी असल्या म्हणजे काम झालें. सद्गुण हा सदैव आपला मुद्दा प्रतिपक्षाच्या मुद्द्यावर नेऊन भिडावितो. " जो कोणी आमची सुधारणा करतो तो आमच्या पेक्षां अधिक चांगला असल्या-वांचून कसें चालेल ? " मनुष्य नेहमीं असा विचार करतो. म्हणून आपण मानवजात सुधारण्यास लागलें पाहिजे !—या रीतीनें च आपण सद्गुणी होऊं नव्हे या रीतीनें च आपण " कलाकृतिराजीय " होऊं—शिल्लर असा च " कला-कृतिराजीय " झाला ).

याचें मोठें उदाहरण म्हणजे वाग्नेरचीं नाटकें होत. नाटकाला जें कठोर तर्कशास्त्र लागतें त्याची वाग्नेरनें कधीं च पर्वा केली नाहीं. त्यानें जुन्या पौराणिक कथानकांतून स्त्रीपुरुषांचीं पात्रें घेतलीं आणि त्यांवर नव्या रुचीला साजेल असा वेष चढविला, जणुं खाडिलकर च. त्याचा पार्सिव्हल पहा. त्याला त्यानें एखाद्या डी. डी. च्या परीक्षेस जाणाऱ्या उमेद्वाराचें रूप दिलें आहे. सामान्यतः असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं वाग्नेरनें आपल्या डोळ्यापुढें अर्वाचीन पारिसच्या नाटकगृहांत जमणारा अवनतीच्या सीमेस पोंचलेला क्षुद्र प्रेक्षकवर्ग ठेवून सदहू नाटकांतील नायक-

नायिकांचीं चित्रें रेखाटलीं आहेत. रुग्णालयापासून सदा पांच पावलें दूर!............सर्व अगदीं आधुनिक मतें, जीं मतें **मोठमोठ्या शहरांतून** वावरत आहेत तीं सर्व! ............तुम्हीं पाहिलें नाहीं कां (आणि हें सर्व त्या मतांशीं जुळून च आहे) कीं वाग्नेरच्या नायिकांना कधीं च मुलें झालेलीं नसतात?—त्यांना तीं होणें **शक्य** च नसतें............सारांश, पार्सिव्हल हा ग्रंथ दीर्घद्वेष, सूड आणि जीवनाच्या ज्या अगदीं पहिल्या परिस्थिति असतात त्यांचा अंत करण्याकरितां अति गुप्तपणें बनविलेलें विषाचें रसायन आहे; **तो दुष्ट ग्रंथ आहे**. त्यांतील शाश्वत ब्रह्मचर्याची शिकवण म्हणजे निसर्गाच्या विरुद्ध उघड बंड आहे: जो कोणी 'पार्सिव्हल' या ग्रंथाला नीतीवरील बलात्कार समजणार नाहीं त्याचा मला, नीट्झ्श म्हणतो, केव्हां हि तिरस्कार च वाटेल.

वाग्नेरची कला ही मुळीं कला च नाहीं तो कलेचा अभाव आहे. खऱ्या कलेच्या विरुद्ध तें एक महान् संकट आहे. तर मग ही चळवळ आज कोणाला प्रिय होत आहे आणि तींत कोण मोठेपणाला चढत आहे? तर प्रथमतः अनभिज्ञ मनुष्याचा वृथाभिमान, किंवा जो आपणास कला-प्रेमी समजतो त्याचा पोकळ डौल. हल्लीं हे लोक मोठमोठ्या संगीताच्या संस्था किंवा 'गांधर्व महाविद्यालयें' स्थापन करीत आहेत, त्यांना आपल्या रुचीचा प्रसार करण्याची मोठी तळमळ लागून राहिली आहे, नव्हे ते आपल्या अंगावर कला

आणि शास्त्र या दोहोंचे झगे चढवून संपूर्ण संगीताचा निर्णय करण्याचें अवसान आणीत आहेत. दुसरें : कलेच्या सेवेंत अति कडक, उदात्त, आणि सदभिरुचीला धरून लागणाऱ्या शिस्तीच्या शिक्षणाकडे वाढत असलेली अनादरबुद्धि; आणि तत्स्थानीं एकदम प्रकट होणाऱ्या प्रतिभेवर विश्वास. तिसरें:आणि हें तर सर्वांत अति वाईट आहे: **थीएटरशाही,** किंवा नाटकगृहाची सत्ता,—नाटकगृहाच्या उच्च अधिकाराची वेडी समजूत, सर्व कलेवर एका नाटकगृहाला च निर्णय देण्याचा हक्क आहे असें वाटणें..........परंतु येथें सर्व वाग्नेरभक्तांच्या तोंडावर पुन : पुन : शंभर वेळां ओरडून सांगितलें पाहिजे कीं, नाटकगृह हें कलेपेक्षां पुष्कळ च नीच दर्जाचें आहे, दुय्यम महत्त्वाचें आहे, गांवढळ स्वरूपाचें आहे, आणि सर्वांत अधिक म्हणजे तें लोकशाहीला उपकारक होईल अशा रीतीनें विकृत आणि विपर्यस्त करण्यांत आलेलें आहे. या कामांत वाग्नेरनें रतिभर हि सुधारणा केलेली नाहीं : बिरायट येथील त्याचा जलसा भव्य झाला—आणि म्हणून च कलाहीन झाला..........रंगभूमि हें रुचीच्या प्रांतांत केवळ लोकपूजनाचें रूप आहे, रंगभूमि हें लोकशाहीचें बंड आहे, तें सदभिरुचीच्या विरुद्ध शुद्ध गांवढळपणाचें प्रदर्शन आहे.... या थीएटरशाहीबद्दल नीट्झ्शेला केवढा विलक्षण तिरस्कार वाटत होता तो त्याच्या पुढील शब्दांत व्यक्त होत आहे.—

"........आतां तुम्हांला चांगलें कळून चुकलें असेल कीं मी सारभूतरीतीनें अन्त:करणापासून नाटकी वृत्तीचा विरोधी आहे.

रंगभूमीविषयीं, ह्या अत्युत्कृष्ट मानल्या गेलेल्या लोकरुचीविषयीं, आज जसा प्रत्येक अभिजात कलावंताच्या ठायीं तिरस्कार वसत आहे तसा च तो माझ्या मनांत हि अति खोल वास करीत आहे. ज्या मनुष्याला रंगभूमीवर यश मिळतें तो मनुष्य माझ्या मनांतून इतका खालीं उतरतो कीं मला त्याचें दर्शन दुःसह होतें; उलट, ह्या प्रांतांतील अपयश मात्र मला माझे कान उभारावयास लावितें आणि माझें लक्ष एकदम त्याकडे वेधतें .........कोणी हि मनुष्य कलेविषयींच्या अति नाजुक वृत्ति आपल्या बरोबर घेऊन नाटकगृहांत कधीं प्रवेश करीत नाहीं, आणि विशेषतः जो कलावंत नाटकगृहाकरितां म्हणून काम करतो तो तर नाहीं च नाहीं,—कारण येथें एकांताचा अभाव असतो; जें जें कांहीं पूर्णतेला गेलेलें असतें त्याला कोणी साक्षीभूत झालेलें खपत नाहीं...... नाटकगृहांत मनुष्य हा लोक होतो; कळप, स्त्री, फरिसी किंवा पाखंडी, मताधिकारी द्विपाद, आश्रयदाता, विवेकशून्य—वाग्नेराइट म्हणजे गंधर्वप्रेमी बनतो: येथें जो बडा जनसंमर्द जमतो त्याच्या रुळाखालीं व्यक्तीच्या अति मोठ्या सदसद्बुद्धीच्या वैयक्तिक भावना सर्वांबरोबर एकाकार होण्याच्या मोहिनीला सर्वस्वी बळी पडल्यावांचून रहात नाहींत, येथें शेजारी सत्ता चालवितो, येथें प्रत्येक जण शेजारी बनतो."

वाग्नेरच्या नाटकांना रंगभूमीवर यश मिळवितां आलें. नीट्झ्श म्हणतो यश ही कर्माची कसोटी नाहीं. सर्व महत्त्व कर्माचें आहे, फलाचें नाहीं. म्हणून च गीतेंत फलावर आसक्ति न ठेवतां कर्म करण्यास सांगितलें आहे. नीट्झ्शेच्या शब्दांत बोलावयाचें तर,—" यश हें सदा अति मोठें असत्य कथन करणारें आहे—आणि साक्षात् ' ग्रंथ, '

क्रिया, हें हि तितकें च यश आहे; एखादा मोठा मुत्सद्दी, जेता, शोधक, हे सर्व आपआपल्या निर्मितींत इतके झांकून जातात कीं त्यांनां पुढें कधीं च ओळखतां येत नाहीं; कलावंत काय किंवा तत्त्ववेत्ता काय, त्याचें जें ' कर्म ' असतें तें च केवळ आपल्या जनकाला किंवा जो कोणी त्याचा जनक म्हणून मानला गेला असेल त्याला शोधून काढतें; ' मोठे पुरुष ' म्हणून ज्यांना पूज्यता येते त्या मागाहून रचलेल्या क्षुद्र काल्पित कथा असतात; ऐतिहासिक मूल्याच्या सृष्टींत खोट्या नाण्याचें फार प्राबल्य असतें. "........आणि पुनः हें यश तरी कोणाला, तर संगीत नाटकाला. कलेमध्यें नाटकाचें स्थान कोठें आहे? " काव्येषु नाटकं रम्यं " या न्यायानें काव्यांत नाटक रम्य असेल परंतु उदात्त नाहीं हें खास. ऐतिह्य काव्य उदात्त असतें. नाटकाला त्याची कधीं च सर येणार नाहीं. किंबहुना नाटककार हे केवळ **नकलकार** असतात—त्यांच्या संपत्तीचा मुख्य झरा—कलात्मक विचार हे त्यांना ऐतिह्य काव्यांतून मिळतात. वाग्नेरनें तर या शिवाय रोमन आणि ग्रीक संगीतांतून हि कल्पना उचलल्या आहेत. नाटककारांचे ठिकाणीं फक्त रचनाचातुर्य असतें इतकें च. ते ऐतिह्य कवीप्रमाणें स्वयंभु निर्माते नसतात. अर्थात् नाटक हें अशा काव्याचे पुढें अगदीं हलक्या दर्जाचें आहे: त्याला आपल्या समोर जितका अधिक ओबडधोबड आणि संघप्रिय प्रेक्षकगण जमेल तितका इष्ट होतो. नीट्झश म्हणतो, वाग्नेरची

नाटकें पाहून मला प्रथम वाटलें कीं जर्मन लोकांना त्यांपासून नासक्या ख्रिस्ती धर्माचा चांगला वीट येईल. कारण त्यांत जुन्या पेगन पुराणांतून जीं कथानकें घेतलीं आहेत त्या योगें त्यांना एका देवाच्या जागीं अनेक देवांच्या अस्तित्वाचा साक्षात्कार येईल आणि त्यांचें महत्त्व कळेल. पण उलट असें झालें कीं या नाटकांपासून पेगन धर्माच्या ऐवजीं रोमन कॅथॉलिक धर्माचें च पुनरुज्जीवन घडून आलें. अर्थात् मला वाग्नेरच्या कलेचा वीट आला. माझी त्याच्यावर जी अंधश्रद्धा होती ती उडाली. माझे डोळे त्यानें च उघडले. पण " जो आपणाला जागें करतो तो सदा जखम करतो " या न्यायानें तेव्हांपासून तो माझा शत्रु बनला.

नीट्झ्श म्हणतो, जर्मन लोक हे वाग्नेरचे यथायोग्य प्रेक्षक आहेत. जर्मन शब्दाची व्याख्या : लांब पायाचा आज्ञाधारक मनुष्य....वाग्नेरचा उदय जर्मन साम्राज्याच्या उदयाबरोबर झाला यांत हि फार खोल अर्थ आहे : कारण दोन्ही चमत्कार एका च गोष्टीचे निदर्शक आहेत, आज्ञाधारकपणा आणि लांब पाय. पूर्वीं इतके आज्ञाधारक प्राणी कधीं च दिसले नाहींत आणि इतके व्यवस्थित उभे राहणारे. वाग्नेरचे बाजा वाजविणारे लोक कसे एका सुतांत उभे राहतात. भावी काळची प्रजा खास या काळाला युद्धाचें कलाकृतिराजीय युग समजेल यांत शंका नाहीं. शेवटीं नीट्झ्शेनें कलेच्या उद्धरणार्थ आपल्या तीन मागण्या नमूद करून ' वाग्नेरचा प्रश्न ' या टीकात्मक लेखाची समाप्ति केली आहे. या तीन मागण्या अशा:—

**रंगभूमि ही कलांची स्वामिनी होतां कामा नये.**
**नट हा सत्याला भ्रष्टकारक होतां कामा नये.**
**गायन ही असत्याची कला होतां कामा नये.**

वाग्नेरसंबंधीं दुसरा लेख म्हणजे ' नीट्झ्श विरुद्ध वाग्नेर ' हा होय. याला नीट्झ्शेनें ' मानसशास्त्रज्ञाची कैफियत ' असें नांव जोडलें आहे. या लेखाला त्यानें १८८८ च्या खिस्तमसमध्यें प्रस्तावना लिहिली आहे ती येणेंप्रमाणें:—

"पुढील विषय माझ्या पूर्व लेखांतून काळजीपूर्वक निवडून काढले आहेत. त्यांपैकीं कांहीं तर अगदीं १८७७ सालापर्यंत मागें जाणारे आहेत. इकडे तिकडे थोडी फार दुरुस्ती करून मी ते समजण्यास अधिक सोपे होतील पण विशेषतः अधिक संक्षिप्त होतील असे केले आहेत. एका पुढें एक वाचले असतां ते माझ्या संबंधीं वा वाग्नेरसंबंधीं कोणाला हि संशयांत राहूं देणार नाहींत: आम्हीं दोन विरुद्ध ध्रुव आहोंत. हीं पृष्ठें वाचून, कदाचित्, वाचक दुसरे हि कांहीं निर्णय काढील: उदाहरणार्थ, हा निबंध मानसशास्त्रज्ञांकरितां आहे आणि जर्मनांकरितां नाहीं............माझे वाचक सर्वत्र आहेत, व्हीन्ना, सेंटपीटर्सबुर्ग, कोपेनहागेन, स्टॉकहोम, पारि, आणि न्यूयॉर्क येथें—परंतु युरोपच्या उथळ जमीनीवर–जर्मनींत–मला एक हि वाचक नाहीं.........."

सदर लेखांत नीट्झ्शेनें पुढीलप्रमाणें दहा मथळे योजून त्यांचे खालीं वाग्नेरच्या कलेसंबंधीं निरनिराळ्या मुद्द्यांवर विवेचन केलें आहे:—

१. मी वाग्नेरचें कोठें कौतुक करतों.

२. मी वाग्नेरच्या विरुद्ध कोठें आक्षेप घेतों.

३. वाग्नेर, एक महत् संकट.
४. भविष्यरहित संगीत.
५. आम्हीं परस्पर विरुद्ध ध्रुव.
६. वाग्नेरची प्रतिष्ठा कोठें आहे.
७. वाग्नेर, ब्रह्मचर्याचा प्रेषित.
८. मी वाग्नेरपासून कसा मुक्त झालों.
९. मानसशास्त्रज्ञाचे उद्गार.
१०. उपसंहार.

वास्तविक रीत्या हें विवेचन संपूर्ण कलेच्या स्वरूपासंबंधीं आहे आणि तें सृष्टीच्या मूलभूत तत्त्वाला आणि मानवी जीवनाला धरून अति गंभीरपणानें करण्यांत आलें आहे. मानव हा जात्या कलावंत आहे. त्याचें जीवन कलात्मक आहे. अर्थात् त्यांतील धर्मार्थकाममोक्ष हें अर्थचतुष्टय कलेनें च सिद्ध होणारें आहे. अशा कलेला भगवंतांनीं गीतेंत 'योग' हें नांव दिलें आहे आणि मानवाला 'योगी भव' असा उपदेश केला आहे. नीट्झ्शेच्या कलाविवेचनांत या योगाचें च रूप उत्तम आविष्कृत झालें आहे. योगाला अभ्यास आणि वैराग्य लागतें. त्यांत च तप घडतें. आणि तप हें कर्मरूप असतें. तथापि हें कर्म फलत्यागपूर्वक व्हावें लागतें. तर च तें योगभावाला प्राप्त होतें, नाहीं तर नाहीं. या प्रकारें अभ्यासांत कर्म आणि वैराग्यांत फलत्याग, किंवा कर्मांत अभ्यास आणि फलत्यागांत वैराग्य सिद्ध झालें म्हणजे जें तप घडतें तो च योग बनतो आणि मनुष्य

योगी होतो. असा हा योग, तप, अभ्यास, वैराग्य आणि कर्म यांचा संबंध आहे. सारांश, मानवी जीवनाचें परमोच्च ध्येय म्हणजे योगी होणें, आणि योगी होणें म्हणजे कलासंपन्न होणें. ही कलासंपन्नता अभ्यासावांचून म्हणजे तपावांचून सिद्ध होणें शक्य नाहीं. किंबहुना हा कलेचा प्रधान नियम च आहे. तो सर्व लहानमोठ्या कलांना लागू आहे,– संगीताला, काव्याला, सद्गुणाला आणि धर्माचाराला. तथापि तपश्चर्या म्हटली कीं तेथें श्रेष्ठकनिष्ठभाव आला च. उच्चाचें उच्चत्व नीचापासून दूर आणि अस्पृष्ट राहण्यांत सफल होतें. अर्थात् येथें समतेला जागा नसते, आणि समतेची खोटी कल्पना टाकल्यावांचून 'नित्यशुद्धबुद्धमुक्तस्वभाव' ब्रह्माची सिद्धि होत नाहीं. कारण ब्रह्म हें योगाचें म्हणजे कलेचें पर्यवसान आहे. अशा ब्रह्मप्राप्तीला साधनीभूत तपाचें वर्णन नीटझ्शेनें 'मानसशास्त्रज्ञाचे उद्गार' या लेखांत येणेंप्रमाणें केलें आहे.—

"ज्यानें तपाचे खोल कष्ट सोसले आहेत अशा प्रत्येक मनुष्याची बौद्धिक तिरस्कारवृत्ति आणि श्रेष्ठतेचा अहंभाव—ज्या मर्यादे पर्यंत मनुष्याला तप आचरण्याचें सामर्थ्य असतें ती मर्यादा च हा श्रेष्ठाश्रेष्ठतेचा नियम निश्चित करते—ज्या योगें तो अंतर्बाह्य भिजून आणि रंगून गेलेला असतो असा गारठून टाकणारा संशयितपणा, कीं तो केवळ आपल्या तपाच्या बळावर जें कधीं कोणी धूर्तांतील धूर्त आणि शहाण्यांतील शहाणा जाणूं शकेल त्या पेक्षां अधिक जाणतो, ज्या बद्दल "तुम्हांला कांहीं एक माहीत नसतें" अशा दूरदूरच्या भयप्रद जगतांविषयीं तो पूर्ण परिचयाच्या

आणि " घरोब्याच्या " वृत्तीनें वागतो !—हा ज्ञानाच्या वीराचा, " संस्कारयुक्त " यज्ञपुरुषाचा प्रशांत बौद्धिक अहंभाव, या अहंभावाला उसळी मारून पुढें येणाऱ्या व सहानुभूति दर्शविणाऱ्या हाताच्या स्पर्शापासून आणि सामान्यतः जें कांहीं तपश्चर्येच्या मार्गांत आपल्या बरोबरीचें नाहीं त्या सर्वांपासून स्वतःचें रक्षण करण्याकरितां सर्व प्रकारच्या गुप्तवेषाचें विधिनिषेधरूप कर्माचार अत्यावश्यक वाटतात. दारुण तपश्चर्या उच्च पदाला नेते; ती दूरीभाव निर्माण करिते........."

व्यष्टि, समष्टि, परमेष्ठी—किंवा पशुभाव, समाजभाव व देवभाव. हे तीन मानवोन्नतीचे एका पुढें एक पर्याय आहेत. पशुभावांत स्वातंत्र्य असतें पण समता नसते, समाजभावांत समता येते तर स्वातंत्र्य जातें, देवभावांत पुनरपि स्वातंत्र्य उमटतें म्हणून समता लय पावते. यावरून स्वातंत्र्य आणि समता एकत्र वास करींत नाहींत हें उघड ठरतें. किंबहुना जसजसें स्वातंत्र्य वाढतें तसतशी समता कमी होते, आणि उलट जसजशी समता वाढते तसतसें स्वातंत्र्य कमी होतें असें त्यांत व्यस्त प्रमाण आहे. पशु आपलें जीवन केवळ स्वतःच्या शरीरबळावर चालवितो. म्हणून तो पूर्णपणें स्वतंत्र असतो. त्याचे ठिकाणीं ज्ञान आणि कला यांची कांहीं च मातब्बरी नसते. मनुष्य हा ज्ञानबलावर जिवंत राहतो म्हणून त्याला आपलें कर्म कलेच्या रूपाला नेल्यावांचून गत्यंतर नसतें. ही कला समाजांत सिद्ध होते, कारण ज्ञानाला आश्रय समाजांत असतो. अशा मानवी कलेचें पहिलें महत्त्वाचें दृश्य म्हणजे समाज होय. या समाजांत जी समता स्थापन

होते ती मानवानें आपल्या पशुभावांतील स्वातंत्र्याचा यज्ञ केल्या-वांचून नाहीं. यज्ञ हा सद्गुण म्हटला म्हणजे ती कला आहे. या प्रकारें समाजभावाला उपकारक जी समानता ती जशी कलेनें घडून येते तशी च देवभावाला उपकारक स्वतंत्रता ती हि पुन: कलेनें च सिद्ध होते. तथापि आतां येथें यज्ञ समतेचा असतो. सारांश, कला ही मनुष्याच्या कर्मीत सर्वत्र व्यापून आहे आणि तसा च यज्ञ. म्हणून च पशुभावांतील स्वातंत्र्याचा यज्ञ केल्यावांचून जशी समाज-भावांतील समता सिद्ध होणार नाहीं तसा च समाजभावांतील समतेचा यज्ञ झाल्यावांचून देवभावांतील स्वातंत्र्य हि उदय पावणार नाहीं. दोन्ही कलेचे च पर्याय आहेत. पहिल्यांत समता येते म्हणून स्वातंत्र्य जातें; दुसऱ्यांत स्वातंत्र्य स्फुरतें म्हणून समता नष्ट होते. अशी कला तपानें सिद्ध होते, आणि त्यांत च श्रेष्ठकनिष्ठभाव निपजतो. अर्थात् समतेच्या पर्यायांत व्यक्तीला पशुभावांतून मानवभावांत श्रेष्ठत्व मिळवितां येतें तर स्वातंत्र्याच्या पुढील पर्यायांत मानवभावांतून देव-भावांत अधिक वर चढतां येतें असा हा कलेचा निरपवाद नियम आहे. या नियमाला धरून च वैदिक चातुर्वर्ण्यांत ब्राह्मण, क्षात्रिय, वैश्य, शूद्र हे एका खालीं एक श्रेष्ठकनिष्ठ वर्ण आहेत; वैदिक धर्ममार्गांत श्रुति, स्मृति, पुराण हे एका खालीं एक आचारपर्याय आहेत; वैदिक सद्गुणश्रेणींत दया आणि प्रेम या गुणांपेक्षां न्याय आणि पराक्रम हे गुण श्रेष्ठ आहेत—वेदांत " यासां राजा याति मध्ये सत्यानृते अवप-

श्यन् जनानां " असा वरुण हा न्यायाचा अति कडक देव आहे व " ओजिष्ठ, बलिष्ठ, सहिष्ठ, सत्तम, पारयिष्णुतम " असा इंद्र हा पराक्रमाचा अति उग्र देव आहे; वैदिक काव्यांत ऐतिह्यापेक्षां नाटकाचा दर्जा फार कमी आहे; आणि वैदिक संगीतांत स्वरसंवादापेक्षां श्रुत्यालापाचें महत्त्व अधिक आहे.

कला आणि शास्त्र. एक कर्मप्रधान आहे, दुसरें ज्ञानप्रधान आहे. शास्त्र खोल पाहतें, कला वरवर अवलोकन करते. कलेला सर्व कर्माचार जसेच्या तसे पाहिजे असतात. शास्त्राला त्यांची कांहीं जरूर नसते. किंबहुना शास्त्र हें त्या आचारांना फोडून आणि तोडून त्यांतील बरेवाईटपणा ठरवीत बसतें, तर कला ही त्यांचें साकल्यानें संरक्षण करते. कलेच्या द्वारें कर्म करण्याची जी एक सहज प्रवृत्ति बनते ती च प्रकृति होय. ही प्रकृति कर्माच्या सतत अभ्यासानें सिद्ध होते आणि तींत तें कर्म करण्याचा गुण निपजतो. अशी प्रकृति स्वभावत: च आंधळी असते. वेदांतांत ' प्रकृति ' आणि ' पुरुष ' हें जें द्वंद्व आहे त्यांत प्रकृति ही आंधळी आणि पुरुष डोळस म्हटला आहे. जो डोळस आहे तो क्रियाशून्य प्रस्तब्ध आहे, त्याचे ठायीं किंचिन्मात्र अज्ञान नाहीं. जी आंधळी आहे ती अत्यंत हालचाल करणारी क्रियावती आहे, तिचे ठायीं किंचिन्मात्र ज्ञान नाहीं. प्रकृति = प्रकर्षानें कृति. म्हणून प्रकृति आणि पुरुष दोन्ही एकमेकांना सहोपचारी आहेत. तथापि तीं केवळ आपआपला गुण धारण करून आहेत. अर्थात् ' प्रकृति ' डोळस होतां कामा नये आणि

'पुरुष' आंधळा असतां कामा नये. प्रकृति आंधळेपणांत जशी क्रिया उत्तमोत्तम करील तशी डोळसभावांत करणार नाहीं. उलट पुरुष डोळस आहे म्हणून च स्तब्धक्रिय आहे. नीट्झ्शेनें मनुष्याच्या कर्माच्या उपजतबुद्धीबद्दल हा च नियम सांगितला आहे. तो म्हणतो, मनुष्याची उपजत क्रियाशक्ति किंवा प्रकृति ( Instinct ) डोळस ( Conscious ) झाली कीं लागली च बलहीन झाली म्हणून समजावें. पुनः प्रकृति ही कर्माभ्यासानें सिद्ध होते असें म्हटलें म्हणजे साहजिक च ती कलात्मक ठरते. परंतु कला सिद्ध होण्यास ' संस्कार ' लागतो, आणि संस्कारांत ' द्विजत्व ' म्हणजे दुसरा जन्म येतो. ह्या द्वितीय जन्मांतील कलात्मक अवस्था निश्चयानें श्रेष्ठ दर्जाची असते. तींत नीट्झ्शेच्या मताप्रमाणें दुसरी उच्च स्वरूपाची कलाग्रहणाची रुचि तयार होते. अशा रुचीला कलेचें कोणतें रूप मानवतें आणि कोणतें मानवत नाहीं याचा उलगडा त्यानें येणेंप्रमाणें केला आहे आणि त्यांत तिची आधुनिक असंस्कृत रुचीशीं यथार्थ तुलना करून दाखविली आहे:—

" सर्वांत अति दुराराध्य गोष्ट ही आहे: शेवटीं एकदां निराळी रुचि प्राप्त होणें, द्वितीय रुचि. अनेक खांचखळग्यांतून, अति मोठ्या संशयाच्या गर्तेतून बाहेर धडपड करीत मनुष्य जणुं पुनः जन्म घेऊन परत येतो, त्याला नवीन त्वचा येते, तो अधिक संवेदनशील होतो, अधिक पूर्णतेनें खोडसाळ बनतो; आतां त्याची आनंदमयतेची रुचि अधिक सरस असते; सर्व सद्वस्तूंबद्दल त्याची रसना अधिक सुग्राही होते; त्याचीं ज्ञानेंद्रियें अधिक उत्साही बनतात; आतां त्यानें आनंदभावांत दुसरें, अधिक भयप्रद, सात्विकपण मिळविलेलें

असतें; शिवाय आतां तो अधिक बालवृत्तीचा दिसतो आणि पूर्वीं कधीं होता त्यापेक्षां शतपटीनें अधिक चतुर बनतो.

ओहो, आतां त्याला इंद्रियसुख हें किती तरी अधिक किळसवाणें वाटूं लागतें; हें सुख कसें तर गांवढळ, जड, फिक्कट रंगाचें, आमच्या सुखेच्छूंना ज्ञात असलेलें आणि तसें च आमच्या " सुसंस्कृत " लोकांना, आमच्या धनिक वर्गाला व आमच्या राजपुरुषांना! आतां आम्हीं, ज्या गलबलींत हा " सुसंस्कृत " मनुष्य आणि शहर-वासी जन कला, वाङ्मय, संगीत यांच्या द्वारें आणि मादक पेयाच्या मदतीनें आपणाला " बौद्धिक सुखोपभोगा " कडे सर्वस्वी वाहवून घेतो त्या गलबलीकडे जणुं एखाद्या खेडवळ जत्रेंतील गोंधळाप्रमाणें किती तरी अधिक औपरोधिक वृत्तीनें कान देतों. आतां आमच्या कानांना ही रंगभूमीवरील विकारप्रदर्शनाची आरडाओरड कशा नांग्या मारते. आमच्या रुचिला, हा जो सर्व अद्भूतरसप्रचुर धुमाकुळ आणि विषयेंद्रियरम्य घप्पाघोळ आपल्या भव्य, उन्नत आणि विकृत यांसंबंधींच्या मनोरथासह ह्या सुशिक्षित जनसंमर्दाला इतका प्रिय होऊन बसला आहे, तो किती विपरीत भासत आहे. नाहीं: आमच्यासारख्या रोग-निर्मुक्त होणाऱ्या पुरुषांना जर खरोखर कलेची आवश्यकता च असेल, तर ती **निराळी कला** आहे—उपहासप्रिय, चपल, अस्थिर, दैविक-पणानें अभंग, दैविकपणानें कृत्रिम कला, जी निरभ्र आकाशांत शुद्ध ज्योतीप्रमाणें ऊर्ध्व प्रकाशते! परंतु सर्वांत मोठें म्हणजे कलावंताकरितां कला, **केवळ कलावंताकरितां च!** माझ्या मित्रानों, शेवटीं सांगावयाचें तर आम्हीं जें कांहीं अति उच्च अंशानें आवश्यक असतें त्याशीं अधिक परिचित आहोंत—उल्हासवृत्ति, **सर्व प्रकारची** उल्हासवृत्ति!......आम्हीं ज्ञानाचे नर, आतां एक गोष्ट फार उत्तम जाणतों: वा, आम्हीं कलावंत या दृष्टीनें हा काळपावेतों, विसरून जाण्यास, न जाणण्यास, किती उत्तम शिकलों आहों!......आमच्या

भवितव्यतेविषयीं: आम्हीं त्या प्राचीन ईजिप्टांतलि तरुण पोरांच्या मार्गानें जातांना केव्हां हि आढळणार नाहीं,—जीं पोरें रात्रीच्या समयीं देवळांत घुसतात, जीं तेथील मूर्तींना कंवटाळतात आणि त्यांना विवस्त्र, नागव्या करून, ज्या कांहीं गोष्टी गुप्त राखण्यांत शहाणपण आहे त्या सर्व दिवसाढवळ्या चव्हाट्यावर मांडण्यांत आनंद मानतात. नाहीं, आम्हांला ह्या असल्या असद्रुचीचा, ह्या सत्याभिलाषाचा, ह्या 'येन केन प्रकारेण' सत्यान्वेषणाचा परम तिरस्कार वाटतो: हा तारुण्याचा वेडेपणा, "सत्याचें प्रेम"; आम्हीं आतां असल्या अचरटपणाबद्दल फार अनुभवी, फार गंभीर, फार आनंदी, फार पोळलेले, **फार खोल** झालों आहों.........सत्याला विवस्त्र केलें असतां तें सत्य राहतें यावर आतां आमचा मुळीं च विश्वास नाहीं,—आम्हीं हें समजून चुकण्यास बरें च आयुष्य कंठिलें आहे ......आम्हीं आज जें कांहीं सदभिरुचीचें लक्षण मानीत आहों तें कोणत्या हि वस्तूचें वस्त्र फेडून तिला नग्न करण्यांत नाहीं, सर्व कृत्यांचे ठिकाणीं साक्षीभूत असण्यांत नाहीं, सर्व "जाणण्याची" आकांक्षा बाळगण्यांत नाहीं. फ्रेंच भाषेंत म्हण आहे—"तूत् काँप्रेंद्र से तूत् मेप्रिझेर" = अतिपरिचयादवज्ञा...........एकदां एका लहान मुलीनें आपल्या आईला विचारलें, "हें खरें का, कीं आकाशांतील प्रिय बाप सर्वत्र संचार करतो?—मला वाटतें हें अगदीं अयोग्य आहे",—तत्त्वज्ञांना इशारत.........ज्या विनयानें निसर्गानें आपल्याला गूढ कूटें आणि बिकट प्रश्न यांच्या आवरणाखालीं झांकून घेतलें आहे तो विनय अति उच्च आदरभावानें मानण्यांत आला पाहिजे. सत्य ही स्त्री असून कदाचित् तिच्या जवळ **आपले हेतु उघड करून न दाखविण्याबद्दल** तशीं च बळकट कारणें असतील.........कदाचित् तिचें नांव, प्राचीन ग्रीकांनीं योजिलेला शब्द घ्यावयाचा तर, 'बॉबो' हें असेल!—वहावा काय हे

ग्रीक, त्यांना **जीवनाची** कला चांगली ज्ञात होती ! ह्या करितां केवळ वरवरच्या पृष्ठभागावर, घडीच्या बाहेर, बाह्यत्वचेवर धैर्यानें थबकून राहणें, बाह्यदृश्यभावाला पूज्य लेखणें आणि आचार, ध्वनि, शब्द व संपूर्ण **बाह्य मुद्रांचा पवित्र डोंगर** यांवर विश्वास ठेवणें अति अगत्याचें आहे ! हे ग्रीक लोक **अति खोलपणाच्या** योगें अति उथळ होते........आणि आम्हीं बुद्धीचे धाडसी वीर जे हल्लींच्या विचाराच्या अति उंच आणि अवघड मुळक्यावर चढून गेलों आहों कीं आम्हांस त्या उंचीवरून सभोंवतालचें निरीक्षण करतां यावें, त्या उंचीवरून **खालीं अवलोकन** करतां यावें, ते आम्हीं सुद्धां जसेच्या तसे त्या च पदाला येत चाललों नाहीं कां ? या बाबतींत आम्हीं सुद्धां जसेच्या तसे **ग्रीक** बनून गेलों नाहीं कां ? बाह्य आकाराचे, ध्वनींचे, शब्दांचे आराधक ! आणि त्या च कारणानें **—कलावंत !**"

हल्लींच्या काळीं आधुनिक रंगभूमीवर कला सर्वत्र च नागवी होत चालली आहे. हल्लींची महाराष्ट्रांतील कला पहा. प्राचीन स्वराज्याच्या काळांतील कला पार मागें पडली. तींत शृंगार आणि वीर या दोन उच्च रसांना पोषक अशा ज्या संस्था होत्या त्या हल्लींच्या काळीं केवळ नाममात्र राहिल्या आहेत. तमासगिरांच्या लावण्या आणि गोंधळ्यांचे पोवाडे—त्यांतील संपूर्ण अभिनयासह. साक्षात् वीरकर्म करणाऱ्या वीरांच्या वीरवृत्तीला उत्तेजन देणारे पोवाडे गेले व त्यांच्या शृंगाराला चलन देणाऱ्या लावण्या हि निमाल्या. त्यांची जागा आतां नाटकगृहांतील संगीतानें व्यापिली आहे. आणि हें संगीत तरी कसें तर पूर्णपणें सरमेसळीचें. त्यांत कोणती च

बाब शुद्ध राहिली नाहीं; काव्य नाहीं, गायन नाहीं आणि अभिनय नाहीं. त्यांतील इतर सामाजिक, धार्मिक व नैतिक प्रश्नांचा तर विचार च करावयास नको. त्यांत कसला च धरबंध उरलेला नाहीं. कलेचें पूर्वींचें मारदस्त रूप जाऊन ती अति विद्रूप रीतीनें रंगभूमीवर नागवी उघडी नाचूं लागली आहे. याचें मोठें उदाहरण बालगंधर्व होय. या गंधर्वांचा प्रेक्षकवर्ग तरी कसा तर सर्वतोपरि 'अहो रूपमहो ध्वनि :' या दर्जाचा. तो कलेचा मोठा मोक्का म्हणावा तर नीट्झशेनें म्हटल्याप्रमाणें नाटकगृहांत खरा दर्दी येणें शक्य च नाहीं. कारण त्याच्या रुचीला तो सर्व देखावा कधीं च मानवणार नाहीं. अर्थात् हा प्रेक्षकवर्ग कलेपेक्षां कृत्रिमतेकडे जास्त लक्ष देतो आणि त्यांत च सौंदर्य पाहतो यांत संशय नाहीं. पण येथें च खरी सौंदर्याची हानि असते. बालगंधर्वाची रंगभूमीवरील सर्व च छबी कृत्रिमतेच्या सीमेला गेलेली आहे, ती कलाहीन आहे —नीच कलेची मूस आहे. तिच्या योगें इंद्रियविषयक नीच विकारांकडे अधिकाधिक प्रवृत्ति होते आणि तींत कला विनाश पावते. विकार बलवान् करणें हें च एक या नाटकी कलावंतांचें ध्येय असतें. परंतु विकार बलवान् झाले कीं सौंदर्य संपलें म्हणून समजावें. प्राचीन गोंधळ्यांच्या आणि तमासगिरांच्या फडांत जी कला होती ती एका दृष्टीनें शुद्ध स्वरूपाची होती. तशी च हरिदासांच्या कीर्तनांतील कला हि अति शुद्ध आणि सोज्वळ होती. तमासगीर आणि गोंधळी लावण्यांत आणि पोवाड्यांत

मुख्यतः शृंगार आणि वीर या रसांचा आविष्कार करीत, तर हरिदास आपल्या कीर्तनांतून भक्ति आणि करुणा यांचा परिपोष करीत. प्राचीन गवई, बजवय्ये आणि अभिनयपटु नर्तक यांच्या घरंदाजी कलेंत तर सर्व च रसांचा अति उत्तम रीतीनें—केवळ दैवी रीतीनें—परिपोष होई. अर्वाचीन रंगभूमीवरील नाटकांत हें सर्व एका ठिकाणीं मिळून आलें आणि त्या योगें सर्व च कला विकृत होऊन गेली. हल्लींच्या काळीं फडावरून रंगभूमीवर आणि डफतुणतुण्यांतून हार्मो-नियममध्यें जें काव्यात्मक वा गायनात्मक कलेचें अवतरण झालें आहे तें केवळ अवनतीचें दर्शक आहे. काव्याचे प्रांतांत होनाजीबाळ, किर्लोस्कर, खाडिलकर, आणि गायनाचे प्रांतांत रामा गोंधळी, भाऊ कोल्हटकर, बालगंधर्व हे एका खालीं एक अवनतीचे पर्याय आहेत. पुनः कला ही आतां प्राचीन गुरुपरंपरेंतून सुटून सार्वजनिक शाळांत पण्यांगनेप्रमाणें येऊन दाखल झाली आहे. नीट्झ्शेनें सार्वजनिक शाळांतील शिक्षणाबद्दल म्हटलें आहे, “ हें शिक्षण सार्वजनिक मूर्खपणाला अति आवश्यक असतें. ” अशा शिक्षणांत कला संस्कृतिविहीन अतएव कळाहीन बनली तर त्यांत कांहीं नवल नाहीं. या कलेचा शास्त्रीय भाग भातखंडे आणि प्रायोगिक भाग पळूसकर या प्रोफेसरद्वयानें उचलून धरला आहे आणि तदनुसार देशांत जिकडे तिकडे लहानमोठीं गांधर्वविद्यालयें उदय पावत आहेत. कलेच्या दृष्टीनें हें तिच्या उन्नतीचें खास चिन्ह नाहीं तर

लोकशाहीला प्रिय असें तिच्या शुद्ध बाजारबसवेपणाचें अति हिडिस रूप आहे. अर्थात् या नवीन कलेला अनुरूप अशीं हार्मोनियम सारखीं नवीन क्षुद्र वाद्यें पुढें येऊन त्यांनीं प्राचीन बीनासारख्या कलाराजीय वाद्यांना मागें टाकलें यांत नवल नाहीं. बाजारांत खोट्या नाण्यांचा सुळसुळाट झाला कीं खरीं नाणीं लोप पावतात हा जो अर्थशास्त्रांत ग्रेशामचा सिद्धांत आहे तो सर्व च विद्या आणि कला यांच्या क्षेत्रांत तंतोतंत लागू पडणारा आहे.

येथवर नीट्झ्शेच्या शिक्षणमार्गांत त्याच्या मनावर जो शोपेनहौएरच्या तत्त्वज्ञानाचा आणि वाग्नेरच्या कलेचा अपरंपार पगडा बसला होता त्याचें स्वरूप काय होतें आणि त्याचें पर्यवसान कशांत झालें याचा विचार झाला. आतां त्यानें आपल्या आत्मवृत्तांत जे स्वतःच्या ग्रंथकर्तृत्वा-संबंधीं विचार प्रकट केले आहेत ते सादर करण्यापूर्वीं अगोदर त्याचें जीवनवृत्त थोडक्यांत निवेदन करणें जरूर आहे. हें जीवनवृत्त अति साधें, साधुवृत्तीचें आणि ज्ञानरूपाचें आहे. अगदीं लहानपणापासून त्याची वृत्ति साधुभावाला शोभेल अशी अति गंभीरपणाची होती. त्याला कधीं उगीच कोणी हंसतांना पाहिलें नाहीं. तो आचारांत, विचारांत आणि शब्दांत फार शुचिता बाळगी. त्याकडे पाहून शाळेंतील मुलें त्याला " छोटा धर्माचार्य " असें म्हणत. १८६४ सालीं एक वर्ष बॉन्नच्या पाठशाळेंत असतांना अल्लड वयांत इतरांच्या नादानें त्यानें थोडा गंभीरपणा सोडून मादक

पेयांचा वगैरे स्वीकार केला पण लवकर च तो त्यापासून जो परावृत्त झाला तो कायमचा. त्याचा मनोनिग्रह फार दांडगा होता. शाळेंत असतांना एकदां मुलामुलांत म्यूटियस् स्केव्होला याच्या मनोनिग्रहाबद्दल वाद चालला होता तेव्हां त्यानें हातांत जळत्या आगकाड्या घेऊन तसा च हात ताठ ठेवला आणि आपला मनोनिग्रह सर्वांच्या प्रत्ययास आणला. त्याच्या संपूर्ण आयुष्यांत घराच्या बाहेर फक्त वाग्नेरची बायको फ्राउ कोसिंमा आणि बहीण मालविडा फॉन् मेसेनबुग या दोन अति बुद्धिमान बायांशीं त्याचा निकट परिचय होता. त्याची आई जुन्या वळणांतील फार धर्मशील बाई असल्यामुळें आणि त्याला तिचे बद्दल पराकाष्ठेचा आदर असल्यामुळें तिला आपल्या नवीन विचारांपासून दुःख होईल म्हणून त्यानें आपले पुढील लेख कधीं तिच्या नजरेस येऊं दिले नाहींत. तो अन्तःकरणाचा फार कोमल होता आणि विनय तर त्याचे ठिकाणीं इतका होता कीं त्याची मजल स्त्रीत्वाच्या मार्दवापर्यंत गेली होती. म्हणून प्रो० साल्टर यानें आपल्या "तत्त्वज्ञ नीट्झ्श" या ग्रंथांत म्हटलें आहे कीं त्याचे दयेविरुद्ध विचार हे कांहीं त्याच्या स्वतःच्या अंगच्या वृत्तीला धरून नव्हते तर केवळ तत्त्वज्ञानाला धरून होते इतकें च. तत्त्वज्ञानाकडे त्याची प्रवृत्ति अगदीं लहानपणापासून होती. याबद्दल त्यानें आपल्या रोजनिशींत येणें प्रमाणें लिहिलें आहेः—

"वयाच्या १२ व्या वर्षीं मी स्वतःशीं विचार करूं

लागलों आणि मला एका अद्भुत त्रिमूर्तीचें दर्शन झालें; ही त्रिमूर्ति म्हणजे पितृदेव, पुत्रदेव आणि शत्रुदेव. मी त्यावर अशी कल्पना बसविली कीं, मूळ देवानें विचार करून आपल्या मस्तकापासून दुसरा देव उत्पन्न केला; पण त्याला आपल्या विरुद्ध दुसरी प्रतियोगी कोटी असल्यावांचून आपल्या एकट्याच्या स्वरूपाचा नीट बोध होणार नाहीं असें वाटल्यावरून शत्रुदेव म्हणजे सैतान निर्माण करणें भाग पडलें,—आणि या रीतीनें मी तत्त्वज्ञानाच्या प्रदेशांत प्रवेश करता झालों. ”

१८६५ सालीं बॉन्न सोडल्यानंतर नीट्झ्शे हा वयाचे २१ वे वर्षीं लाइप्झिकच्या विश्वविद्यालयांत येऊन दाखल झाला. तेथें दोन वर्षें राहिल्यानंतर १८६७ मध्यें त्याला सक्तीचें लष्करी शिक्षण घेण्याकरितां सैन्यांत शिरावें लागलें. तेथें त्याची प्रुशियन तोफखान्याच्या चौथ्या तुकडींत नेमणूक झाली. येथें कांहीं दिवस नोकरींत गेल्यानंतर तो घोड्यावरून खालीं पडला, त्याच्या छातीला दुखापत झाली, आणि त्यायोगें त्याला लष्करी नोकरींतून लवकर च मुक्त करण्यांत आलें. मधल्या बरें होण्याच्या काळांत त्यानें लहान लहान लेख लिहिणें, प्रोफेसरांचीं सटरफटर कामें करणें वगैरे गोष्टी केल्या व १८६८ च्या आक्टोबर महिन्यांत तो पुन:परत लाइप्झिक् येथें पूर्वीच्या पाठशाळेंत येऊन दाखल झाला. पुढील वर्षीं म्हणजे १८६९ मध्यें तो २५ वर्षांचा असतांना त्याला रिट्श्लेच्या शिफारसीवरून स्विट्झर्लंड येथील बासेलच्या विश्वविद्यालयांत ग्रीक-

तत्त्वज्ञानाच्या अध्यापकाचें आसन मिळालें. हें विश्वविद्यालय लूथरच्या मताचें होतें. या वेळीं नीट्झ्शेला कसली च विद्यालयीन पदवी नव्हती. परंतु लाइप्झिक्च्या युनिव्हर्सिटीनें त्याला पी एच्. डी. ची स्वतंत्र पदवी देऊन तेथें पाठविलें. त्याकरितां तिनें त्याची परीक्षा घेतली नाहीं किंवा निबंध हि मागितला नाहीं. या वर्षाच्या एप्रिलमध्यें १३ व्या तारखेस त्यानें आपलें घर सोडलें आणि नवीन ठिकाणीं येऊन दाखल झाला. यावेळीं त्याचे घरांत त्याची म्हातारी आजी व एक कुमारी आत मेल्या होत्या. त्याची आई जिवंत होती. ती १८९७ मध्यें म्हणजे त्याच्या मरणापूर्वीं तीन वर्षें मृत्यु पावली व त्याच्या मागें त्याची बहीण आणि एक कुमारी आत येवढीं दोन माणसें जिवंत होतीं.

येथें नीट्झ्शे हा मुख्यत: ग्रीक भाषाशास्त्राचा आणि तत्त्वज्ञानाचा अध्यापक होता. त्यानें तेथें आपलें पहिलें मुहूर्ताचें व्याख्यान ता. २८ मे १८६९ रोजीं "होमर आणि ग्रीक भाषाशास्त्र" या विषयावर दिलें. नीट्झ्शेची बहीण म्हणते या व्याख्यानाचा तेथील सर्व विद्यार्थी, अध्यापक आणि अधिकारी वर्गावर फार परिणाम घडून आला. ही बातमी जेव्हां लाइप्झिक् येथें प्रो• रिट्श्ल आणि जेकब बुर्खार्ट यांच्या कानावर गेली तेव्हां त्यांना फार समाधान वाटलें. वास्तविक रीत्या नीट्झ्शेचें लेखनकार्य तो १८६५ सालीं बॉनच्या पाठशाळेंत गेल्या पासून च सुरू झालें होतें. विद्यार्थी दशेंत असतांना त्यानें बरेच लहानलहान लेख लिहिले. प्रोफेसर झाल्यानंतर

त्याचा पहिला महत्त्वाचा हा च व्याख्यानाचा लेख होय. या लेखांत त्याचें ग्रीक भाषेवरील चांगलें प्रभुत्व दिसून येतें आणि त्याची पुढील विचाराची दिशा हि दृग्गोचर होते. या व्याख्यानाच्या योगें त्याचें प्रथमपासून च विद्यार्थीवर चांगलें वजन बसलें. त्यानें येथें विद्यार्थ्यांना शिकविण्यांत फार परिश्रम घेतले. त्याच्या वर्गांत विद्यार्थ्यांची संख्या फार नसे. कारण हा भाषाशास्त्राचा विषय फारसा लोकप्रिय नव्हता. तथापि त्याच्या वर्गांत जे विद्यार्थी असत त्यांना त्याविषयीं अति मान आणि आदर वाटत असे. इतर समव्यवसायी अध्यापकवर्गाशीं त्याचा प्रथमप्रथम स्नेह होता पण पुढें तो त्यापासून फटकून बाजूला राहूं लागला. प्रो. रुडोल्फ युकेन म्हणतो त्याची विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याची पद्धत फार ममतेची आणि आनंदाची असे. पण त्यांत तो त्यांची विषयांतील तयारी बारीक रीतीनें पाही. जेकब बुर्खार्टच्या मतें त्याच्या सारखा शिक्षक तेथें पूर्वी कधीं च झाला नाहीं. बुर्खार्ट हा नीट्झ्शेपेक्षां वयानें आणि अधिकारानें मोठा होता, आणि त्याचे ठिकाणीं नीट्झ्शे विषयीं अखेरपर्यंत प्रेम आणि सहानुभूति वागत होती.

इ. स. १८७० सालीं जर्मनीचें फ्रान्सशीं युद्ध सुरू झाल्याबरोबर नीट्झ्शेनें स्वदेशप्रेमानें आपणास एकदम युद्धाला वाहून घेतलें. पण या वेळीं तो स्विस् नागरिक असल्यामुळें आणि स्विट्झर्लंड हें या युद्धांत तटस्थ राहिलें असल्यामुळें त्याला प्रत्यक्ष लढाईत भाग घेतां येईना. म्हणून

त्याची इस्पितळावरील कामगारवर्गांत नेमणूक झाली. नीट्झ्श हा १८६२ पासून च थोडथोडा मस्तकशूळानें आजारी असे. पुढें लष्करी शिक्षणांत घोड्यावरून पडल्यापासून त्याचें दुखणें जास्त झालें. बासेल येथें अध्यायनाध्यापनाच्या अति श्रमानें तें आणखी वाढलें. लढाईच्या वेळीं तें विकोपाला गेलें. त्याला तेथें प्रथम आमांशाची भावना झाली. त्यांत त्याचे पोटांत गुल्म धरलें आणि त्याच्या मज्जातंतूंना क्षीणता आली. त्यायोगें अपचन आणि निद्राभंग हे दोन विकार त्याला कायमचे जडले. त्या दोहोंवर त्याचे सतत औषधोपचार सुरू झाले. इतके कीं, त्याची बहीण म्हणते, लवकर बरें होण्याकरितां तो दुप्पट प्रमाणांत औषधें घेई! लढाईंत आजारीपणामुळें त्याला नालायकांच्या सदरांत काढण्यांत आलें आणि पुनः तो परत आपल्या प्रोफेसरीच्या कामावर येऊन रुजू झाला. पण त्याला येथें हि लागली च रजा घेऊन हवा पालटण्याकरितां इटलींत जावें लागलें. या सुमारास त्यानें आपल्या वर्गांत ग्रीक साहित्यावर जीं दोन व्याख्यानें दिलीं होतीं तीं लिहून छापण्यास तयार करून ठेवलीं.

नीट्झ्शेचा पहिला ग्रंथ म्हणजे "भीषण नाटकाचा जन्म" हा होय. हा ग्रंथ त्याचा पहिला हातोडा म्हटला आहे. या ग्रंथानें जुन्या भाषाशास्त्रज्ञांना चांगला धक्का बसला. हे लोक केवळ वरवर पाहणारे होते. नीट्झ्श हा ग्रीक विद्येच्या अगदीं अंतरंगांत शिरलेला होता. त्या कारणानें त्याला त्यांत अपॉलो विरुद्ध डायोनिसस हें द्वंद्व दिसलें. नीट्झ्शेची बहीण

म्हणते या ग्रंथाचें लेखन १८६९ च्या आक्टोबर पासून १८७१ च्या नोव्हेंबर पर्यंत सतत दोन वर्षें चाललें होतें. कारण या काळांत त्याच्या डोक्यांत शास्त्र, कला आणि तत्त्वज्ञान या त्रयीवर नानाप्रकारचे प्रश्न घोळत होते. हा ग्रंथ प्रथम १८७२ च्या जानेवारींत छापून प्रसिद्ध झाला. त्याला त्यानें आरंभीं वाग्नेरला अनुलक्षून जी अर्पणपत्रिका जोडली आहे ती १८७१ च्या नाताळांत बासेल येथें लिहिली आहे. लाइप्झिक् येथील एंगलमान्न नामक प्रसिद्ध पुस्तकाविक्या हा ग्रंथ हातांत घेईना. तेव्हां तो दुसऱ्या फ्रिट्श नामक एकानें घेतला आणि प्रसिद्ध केला. हा ग्रंथ नीट्झ्शेच्या थोड्या स्नेहीमंडळाला आवडला पण इतरत्र तो रानटी आणि बेताल वाटला. तथापि तो नीट्झ्शेच्या मनाप्रमाणें अगदीं बरहुकुम झालेला नव्हता हें निराळें च ! कारण त्याची मूळ योजना "ग्रीकांचें आनंदी विज्ञान" या नांवाखालीं ग्रीक शास्त्र, कला आणि तत्त्वज्ञान या त्रयीचा एका प्रचंड ग्रंथांत साकल्यानें उलगडा करावा अशी होती. त्याची त्यानें अगोदर सर्व रूपरेषा हि आंखून ठेवली होती. पण १८७१ च्या एप्रिल महिन्यांत वाग्नेरनें बोलाविल्यावरून तो त्याचेकडे त्याच्या 'ट्रिब्शेन' घरीं गेला आणि तेथें त्याचा पूर्वींचा बेत बदलला. त्यानें वाग्नेरला आपल्या स्वतःच्या कार्याबद्दल अत्यंत निराश झालेला पाहिला, आणि त्याला उत्तेजन देण्याकरितां त्यानें आपली पहिली योजना बाजूला ठेवून त्या ग्रंथांतील भीषण कलेचें एक लहान अंग घेतलें व त्याशीं

वाग्नेरच्या कलेचा संबंध जोडून तेवढा च माग " संगीतकलें-तून भीषण नाटकाचा उदय " या मथळ्याखालीं प्रसिद्ध केला. त्याकारणानें त्याला त्यांत वाग्नेरला रुचेल असा थोडा-बहुत फेरफार वाग्नेरच्या सांगण्यावरून करावा लागला. पुढें वाग्नेरचा संबंध तुटल्यानंतर आठ वर्षांनीं जेव्हां पुन्हा या ग्रंथाची द्वितीयावृत्ति निघण्याची वेळ आली तेव्हां त्यानें त्याचा पहिला मथळा बदलला व दुसरा " भीषण नाटकाचा जन्म, अथवा ग्रीकधर्म आणि नैराश्यवाद " असा मथळा योजून त्याला " आत्मपरीक्षणाचा प्रयत्न " या नांवाखालीं एक निराळी स्वतंत्र प्रस्तावना जोडली. ही प्रस्तावना त्यानें एंगडाईन नदीच्या उत्तर तीरावरील सिल्स मारिया येथून १८८६ च्या आगष्ट महिन्यांत लिहिली आणि तींत ग्रीक तत्त्वज्ञान आणि ग्रीक कला यांचें वैशिष्ट्य कथन करून तीं दोन्ही शोपेनहौएर आणि वाग्नेर यांच्या कृतीपासून किती भिन्न होतीं हें दर्शविलें. असा हा ग्रंथ प्रथम च प्रसिद्ध झाल्याबरोबर जिकडे तिकडे जी गडबड उडाली आणि कोलाहल माजला त्यांत जवळजवळ नीट्झ्शेला आपल्या प्रोफेसरीच्या जागेला मुकण्याची वेळ आली. विद्यार्थ्यांना अशी तंबी देण्यांत आली कीं हा ग्रंथ कोणी वाचूं नये व नीट्झ्शेच्या तासांना हि कोणी जाऊं नये. याचा परिणाम असा झाला कीं १८७२–७३ च्या अध्यापन-काळांत त्याच्या वर्गांत एक हि विद्यार्थी नव्हता !

बासेल येथें नीट्झ्श हा आपल्या स्वतःच्या वाचनांत, लेखनांत आणि मननांत एकांतामध्यें रहात असे. मधून मधून

तो जवळ च वाग्नेरच्या गांवीं जाई व तेथें त्याच्या घरीं कांहीं दिवस आनंदांत घालवी. त्याचा आपल्या समन्व्यवसायी प्रोफेसरबंधूंशीं प्रथम जो थोडाबहुत स्नेहसंबंध होता तो त्याचा ग्रंथ प्रसिद्ध झाल्यानंतर पार नाहींसा झाला. शिवाय त्याच्या राहण्यांत आणि त्यांच्या वागण्यांत जमीनअस्मानाचें अंतर असे. त्यांच्या ज्ञानाची खोली त्याला तेव्हां च दिसून आली आणि तो त्यांना तुच्छ लेखूं लागला. उलट ते त्याला अहंमन्य आणि गर्विष्ठ समजत. तो त्यांच्या कोणत्या हि कार्यांत भाग घेत नसे. त्याची सदा कपाळदुखी, त्याचे अधार्मिक विचार, त्याची बेपर्वाईची दृष्टि आणि त्याची सर्व-सामान्य रानवट वृत्ति पाहून ते त्यापासून सदा चार पावलें लांब रहात. त्याला प्रतिरोध करणें वा त्याच्याशीं मिळून जाणें ह्या दोन्ही गोष्टि त्यांना सारख्या च धोक्याच्या वाटत. त्याचा पोषाख आणि त्याची एकंदर चर्या ही त्याच्या विचाराला साजेल अशी च होती. त्याचें रुंद आणि उंच कपाळ,—त्यावरील केंस मागें विंचरून टाकल्या कारणानें अधिक भव्य दिसणारें,—त्याच्या जाड लोंबत्या मिंवया, आणि त्याच्या कधीं न कातरलेल्या विशाळ मिशा या सर्वांच्या योगें त्याचा चेहरा अति उग्र परंतु मोठा उमदा दिसे. अर्थात् तो आपल्या भोंवतालच्या अध्यापकवर्गांत—त्यांच्या त्या कातरून विंचरून ठाकठीक केलेल्या सुबक प्रोफेसोरियल दाढ्या, त्यांचीं डोक्याचीं टकलें, त्यांचे डोळ्यावर चढलेले पांडित्यदर्शक चष्मे, आणि त्यांचा व्यवस्थित जामानिमा

पाहिला म्हणजे त्यांच्यामध्यें हा कोणी खरोखर च अपरिचित रानवट मनुष्य दिसला तर त्यांत कांहीं नवल नाहीं. परंतु तो स्वत: मात्र आपल्या या साध्या रहाणींत अत्यंत आनंद मानी. त्याला खरोखर च वाटे कीं आपण कोणा तरी जुन्या पोलिश सरदार घराण्यांतील असून दुर्दैवानें या शूद्र वृत्तीच्या हलक्या जर्मनांमध्यें येऊन पडलों आहों. त्याचे शत्रु त्याला वेडा म्हणत हें योग्य च आहे. पण खरी गोष्ट अशी कीं त्याची निरीक्षण करण्याची दृष्टि फार खोल आणि सूक्ष्म असल्यामुळें त्याला इतरांचे गुणदोष तेव्हां च समजत आणि तो त्यांच्या-पासून फटकून बाजूला राही. जसजसे त्याला आपल्या भोंव-तालचे लोक अधिकाधिक तुच्छ दिसूं लागले तसतसा त्याचा आत्मप्रत्यय वृद्धिंगत होत चालला आणि त्याच्या लेखांत ' मी ' पणा हि जास्तजास्त उमटूं लागला,—मी असा आहे, मी असें म्हणतों.—

पहिला ग्रंथ प्रसिद्ध केल्यानंतर पुढील चार वर्षांत म्हणजे १८७३-१८७७ पर्यंत त्यानें " वेळीं अवेळीं सुचलेले विचार " या नांवाखालीं जी लेखमाला सुरू केली तींतील चार लेख लिहिले. पैकीं दोन " डेव्हिड स्ट्रौस्स " व " इतिहासाचे सुष्ट व दुष्ट परिणाम " हे टीकात्मक होते व दुसरे दोन शोपेनहौएर व वाग्नेर यांवरील स्तुतिपर होते. त्याची मूळ पासून च मनःप्रवृत्ति लोकशाहीच्या विरुद्ध " धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे " अशा-प्रकारच्या अवतारी पुरुषाकडे होती. ही गोष्ट जशी

त्याच्या पहिल्या लेखांत तशी च शेवटच्या लेखांत प्रत्ययास येते. या सर्व काळीं नीट्झ्श बासेल येथें होता. त्याला आतां तेथील नोकरीचा कंटाळा आला. पण द्रव्याच्या दृष्टीनें त्याला तें स्थान एकाएकीं सोडवेना. एकदां त्याला व्हीना येथें अधिक अभ्यास करण्यास जावेसें वाटलें पण तें हि जमलें नाहीं. मग तो हिंवाळ्यांत बासेल येथें च आणि उन्हाळयांत ठिकठिकाणीं राहूं लागला. १८७४ सालीं सोरेंटो येथें रहात असतांना त्याची डॉ. पाउल री याशीं गांठ पडली आणि तेव्हांपासून उभयतांचा चांगला स्नेह जमला. री हा तत्त्वज्ञानाचा भोक्ता होता. त्यानें त्या विषयांवर एकदोन ग्रंथ हि लिहिले आहेत. त्याच्या पासून नीट्झ्शेला आपल्या विचारांत पुष्कळ उपयोग झाला. प्रो. झीग्लर म्हणतो, एकदां या सुमारास नीट्झ्शेला आपली प्रोफेसरी सोडून देऊन दुसरें कांहीं तरी उच्च कार्य हातांत घ्यावें असें वाटलें. डॉ. ड्रूज म्हणतो, त्याचे मनांत एक नवीन शिक्षण-विषयक संस्था काढावी आणि तींत भावी पिढींत उत्तमोत्तम नमुने तयार होतील अशा प्रकारचें शिक्षण द्यावें असें होतें.

नीट्झ्शेनें १८७६ सालीं वाग्नेरवरील स्तुतिपर लेख लिहिल्यानंतर त्याच सालीं तो वाग्नेरच्या आमंत्रणावरून बिरायट येथें नाटकाच्या हंगामांत त्याचीं नाटकें पाहण्यास गेला. तेथें त्याला पहिल्या च भेटींत वाग्नेरबद्दल जो तिरस्कार आला त्या भरांत त्यानें तें स्थान सोडून कांहीं काळ

इकडे तिकडे पायीं प्रवास केला व १८७७ मध्यें पुनः वाग्नेरच्या आग्रहावरून परत येऊन तेथें तो हंगामाच्या अखेरपर्यंत राहिला. या काळांत त्याला समक्ष पाहून एड्डअर्ड शुरे यानें त्याच्या चेहेरेपट्टीचें वगैरे जें वर्णन केलें आहे तें हॅव्हेलॉक एलीसनें येणेंप्रमाणें निवेदन केलें आहे:—
" त्याच्याशीं बोलतांना मला त्याच्या बुद्धीच्या मोठेपणाचा साक्षात्कार आला आणि त्याच्या अलौलिक मुखचर्येचें परीक्षण झालें. रुंद कपाळपट्टी, आंखूड मागें सारलेले केश, स्लाव्ह जातीच्या मनुष्याप्रमाणें गालाचीं उंच हाडें, खालीं लोंबणाऱ्या जड मिशा, आणि उमदा रेखीव चेहरा,—या वरून तो एखादा शिलेदार शोभावा असा दिसला. पण अडचण फक्त त्यांत थोडा भित्रेपणा व हट्टीपणा होता. त्याचें भाषण मंद आणि स्वर मधुर होता. त्याचें बोलणें ऐकून त्याच्या मनाची कलात्मक रचना दिसली, आणि त्याचें हळू विचारपूर्वक पाऊल टाकणें पाहून त्याच्या ठिकाणच्या तत्त्वज्ञाचा प्रत्यय आला. त्याच्या चेहेऱ्यावरील शांतता केवळ वरवर, आभासात्मक होती. कारण त्याची स्थिर दृष्टि त्याच्या अन्तःकरणांत विचारांची जी खळबळ चाललेली होती त्याची निदर्शक होती. ही दृष्टि कशी तर अत्यंत सूक्ष्म पाहणारी व एखाद्या मनोराज्यांत गर्क असलेल्या धर्मवेड्याच्या दृष्टीसारखी. ती एका च एक वस्तूवर सारखी खिळून रहात असल्याकारणानें त्याचा चेहरा स्वतः अस्वस्थ असलेला आणि दुसऱ्याचे

ठिकाणीं अस्वस्थता उत्पन्न करणारा होता. उत्साहाच्या भरांत ही दृष्टि इतकी सौम्य होई कीं जणुं स्वप्नांतील मधुरतेला हि मागें टाकील, पण लागली च पुन: ती शत्रुत्वाच्या निष्ठुरतेला धारण करी. जे विचारांचे महापुरुष असतात त्यांची जशी दृष्टि आणि ऐट असते तशी च सर्वतोपरि त्याची दृष्टि आणि ऐट प्रत्ययास आली. कशी तर जींत दूरता आणि झांकलेला तिरस्कारभाव वसत आहे. "

नीट्झ्शेच्या बौद्धिक इतिहासाचे ठोकळ मानानें चार कालखंड पडतात. ते येणेंप्रमाणेः—

(१) शिष्यभाव १८६९–१८७६. या काळांत तो शोपेनहौएर आणि वाग्नेर यांचा भक्त होता. वाग्नेरची तर त्यावर अगदीं विलक्षण मोहिनी होती.

(२) शोपेनहोएर आणि वाग्नेर यांपासून सुटून स्वातंत्र्य मिळविण्याचा काळ १८७७–१८८२. या काळांत त्यानें वस्तु आणि व्यक्तिं यांचें प्रथक्करणपूर्वक निरीक्षण व परीक्षण केलें. या परीक्षणांतून त्यानें आपणां स्वतःस हि वगळलें नाहीं.

(३) स्वतंत्र तत्त्वज्ञान निर्माण करण्याचा व नवीन नीति-तत्त्वांच्या विधायक मांडणीचा काळ १८८३–१८८८. या काळांत मूळच्या अंधुक कल्पना स्पष्ट होत चालल्या. टीकेच्या प्रखर ज्वालेंत एकेक सिद्धांत दिव्य होऊन बाहेर पडले. डायोनिससचा ' संहारक ' सिद्धांत जो पहिल्या " भीषण नाटकाचा जन्म " या ग्रंथांत उदय पावला तो शेवटच्या " ख्रिस्तांतक " ग्रंथांत सुप्रतिष्ठित झाला.

(४) विदेही अवस्थेतील बौद्धिक स्तब्धतेचा काळ १८८९–१९०० मध्यें त्याच्या मृत्यूपर्यंत.

पहिल्या काळांत " भीषण नाटकाचा जन्म " (१८७२) आणि " वेळीं अवेळीं सुचलेले विचार " या लेखमालेंतील " डेव्हिड स्ट्रौस्स, व्यापक आणि लेखक " ( १८७३ ), " इतिहासाचे मानवजीवनावर सुष्ट व दुष्ट परिणाम " ( १८७४ जानेवारी ), " शोपेनहौएर, नमुनेदार शिक्षक " ( १८७४ आगष्ट ), आणि " बिरॉइट येथें रिचर्ड वाग्नेर " (१८७६) असे चार लेख बाहेर पडले. दुसरा काळ वाग्नेरला सोडून निघाल्यापासून सुरू झाला. या काळांत त्रोटक लिखाण पुष्कळ झालें. कॉलेजांत अध्यापनाचें काम करून बाहेर हिंडतां-फिरतांना जे विचार सुचले ते लिहिले गेले. या काळांतील पहिला मुख्य ग्रंथ म्हणजे " मानवी—सर्वथैव मानवी " ( १८७७–७८ ) हा होय. या शिवाय दुसरे किरकोळ लेख म्हणजे " मिश्र मतें आणि वाक्यें " (Vermischte Meinungen und spruche, १८७९ ), " भटक्या आणि त्याची पडछाया " ( Der Wanderer und sein schatten, १८८० ). पुढील मोठे ग्रंथ " उषा " ( १८८१ ) आणि "आनंदी विज्ञान" (१८८२) हे होत. हे ग्रंथ दुसऱ्या आणि तिसऱ्या काळाच्या दरम्यान् सीमेवरील म्हटले तरी चालतील. या काळांत तो अधिकाधिक वस्तुस्थितीकडे सूक्ष्म दृष्टीनें पाहूं लागला. आतां तो कला, काव्य आणि साहित्य यांवर टीका करूं लागला, शास्त्राचे प्रणेते हे अधिक उच्च दर्जाचे आहेत.

कलेचे पुरस्कर्ते हे अधिक स्त्रैण आहेत. तत्त्ववेत्यानें कवींचीं अवतरणें घेऊं नयेत आणि त्याचे संदर्भ देऊं नयेत. कवि हा तत्त्ववेत्याच्या कल्पनांवर पडदा घालतो आणि मनुष्यप्राणी हा जात्या बाहेर पडद्याकडे पाहतो. संगीताबद्दल तो स्वरसंवादी बायकी गायनाचा तिरस्कार करूं लागला. या काळांत त्याची पूर्वींची नैराश्यवृत्ति पार मावळली आणि तद्विरुद्ध डायोनिससच्या मार्गावरील आशावृत्ति वाढूं लागली. तो हातांत हातोडा घेऊन अधिकाधिक संहारक होत गेला पण त्यांत च पुढील अंकुराचें बीज पेरीत चालला.

" मानवी—सर्वथैव मानवी " ( Menschliches allzu Menschliches ) या ग्रंथाचें लिखाण १८७६—७७ मध्यें झालें आणि तो १८७८ मध्यें प्रसिद्ध करण्यांत आला. या ग्रंथांत जेथें जेथें ' कलावंत ' हा शब्द येतो तेथें तेथें मूळ ' वाग्नेर ' हा शब्द होता असें प्रो० रीह्लचें म्हणणें आहे. या वरून नीट्झ्शेनें सदर ग्रंथांत प्रथमतः वाग्नेरचा पुरस्कार केला पण मागाहून त्याला तेथून काढून टाकला ही गोष्ट उघड सिद्ध होते. हा ग्रंथ प्रसिद्ध फ्रेंच तत्त्वज्ञ व्होलतेअर याच्या शतसांवत्सरिक श्राद्धतिथीच्या दिवशीं नीट्झ्शेनें त्याला अर्पण केला आणि त्यांत त्याला उद्देशून म्हटलें " मनाची मुक्तता करणारा महात्मा ". जेकब बुर्खार्टच्या मतें हा ग्रंथ केवळ " ग्रंथराज " आहे. या ग्रंथांत नीट्झ्शेनें नीतीचा ऊहापोह मानवस्वभावाला धरून सर्वांगपूर्ण केला आहे. नीति कांहीं दैवी नाहीं; मानवी, सर्वथैव मानवी आहे.

(४) विदेही अवस्थेतील बौद्धिक स्तब्धतेचा काळ १८८९–१९०० मध्यें त्याच्या मृत्यूपर्यंत.

पहिल्या काळांत " भीषण नाटकाचा जन्म " (१८७२) आणि " वेळीं अवेळीं सुचलेले विचार " या लेखमालेंतील " डेव्हिड स्ट्रौस्स, व्यापक आणि लेखक " ( १८७३ ), " इतिहासाचे मानवजीवनावर सुष्ट व दुष्ट परिणाम "( १८७४ जानेवारी ), " शोपेनहौएर, नमुनेदार शिक्षक " ( १८७४ आगष्ट ), आणि " बिरॉइट येथें रिचर्ड वाग्नेर "(१८७६) असे चार लेख बाहेर पडले. दुसरा काळ वाग्नेरला सोडून निघाल्यापासून सुरू झाला. या काळांत त्रोटक लिखाण पुष्कळ झालें. कॉलेजांत अध्यापनाचें काम करून बाहेर हिंडतां-फिरतांना जे विचार सुचले ते लिहिले गेले. या काळांतील पहिला मुख्य ग्रंथ म्हणजे " मानवी—सर्वथैव मानवी " ( १८७७–७८ ) हा होय. या शिवाय दुसरे किरकोळ लेख म्हणजे " मिश्र मतें आणि वाक्यें " (Vermischte Meinungen und spruche, १८७९ ), " भटक्या आणि त्याची पडछाया " ( Der Wanderer und sein schatten, १८८० ). पुढील मोठे ग्रंथ " उषा " ( १८८१ ) आणि "आनंदी विज्ञान" (१८८२) हे होत. हे ग्रंथ दुसऱ्या आणि तिसऱ्या काळाच्या दरम्यान् सीमेवरील म्हटले तरी चालतील. या काळांत तो अधिकाधिक वस्तुस्थितीकडे सूक्ष्म दृष्टीनें पाहूं लागला. आतां तो कला, काव्य आणि साहित्य यांवर टीका करूं लागला, शास्त्राचे प्रणेते हे अधिक उच्च दर्जाचे आहेत.

कलेचे पुरस्कर्ते हे अधिक क्षीण आहेत. तत्त्ववेत्त्यानें कवींचीं अवतरणें घेऊं नयेत आणि त्याचे संदर्भ देऊं नयेत. कवि हा तत्त्ववेत्त्याच्या कल्पनांवर पडदा घालतो आणि मनुष्यप्राणी हा जात्या बाहेर पडद्याकडे पाहतो. संगीताबद्दल तो स्वरसंवादी बायकी गायनाचा तिरस्कार करूं लागला. या काळांत त्याची पूर्वींची नैराश्यवृत्ति पार मावळली आणि तद्विरुद्ध डायोनिससच्या मार्गावरील आशावृत्ति वाढूं लागली. तो हातांत हातोडा घेऊन अधिकाधिक संहारक होत गेला पण त्यांत च पुढील अंकुराचें बीज पेरीत चालला.

" मानवी—सर्वथैव मानवी " ( Menschliches allzu Menschliches ) या ग्रंथाचें लिखाण १८७६—७७ मध्यें झालें आणि तो १८७८ मध्यें प्रसिद्ध करण्यांत आला. या ग्रंथांत जेथें जेथें ' कलावंत ' हा शब्द येतो तेथें तेथें मूळ ' वाग्नेर ' हा शब्द होता असें प्रो० रीह्लचें म्हणणें आहे. या वरून नीट्झ्शेनें सदर ग्रंथांत प्रथमतः वाग्नेरचा पुरस्कार केला पण मागाहून त्याला तेथून काढून टाकला ही गोष्ट उघड सिद्ध होते. हा ग्रंथ प्रसिद्ध फ्रेंच तत्त्वज्ञ व्होल्तेअर याच्या शतसांवत्सरिक श्राद्धतिथीच्या दिवशीं नीट्झ्शेनें त्याला अर्पण केला आणि त्यांत त्याला उद्देशून म्हटलें " मनाची मुक्तता करणारा महात्मा ". जेकब बुर्खार्टच्या मतें हा ग्रंथ केवळ " ग्रंथराज " आहे. या ग्रंथांत नीट्झ्शेनें नीतीचा ऊहापोह मानवस्वभावाला धरून सर्वांगपूर्ण केला आहे. नीति कांहीं दैवी नाहीं; मानवी, सर्वथैव मानवी आहे.

म्हणून ती बदलणारी आहे. या विचारसरणीनें ख्रिस्तीधर्मावर मोठा आघात बसला. कारण ख्रिस्ती नीति मानवी नाहीं, तर दैवी आहे. अर्थात् ती कधीं च बदलणारी नाहीं. मानवानें तिचें श्रद्धेनें डोळे मिटून अवलंबन करावयाचें इतकें च. सदर ग्रंथांत नीतीचा विचार द्वंद्वाच्या नियमानुसार झाला आहे. सत् आणि असत् ह्या दोन्ही कोटी सापेक्ष आहेत, आणि तशा च उत्पत्ति आणि लय, प्रेम आणि द्वेष इत्यादि. प्रेम म्हटलें कीं तेथें मृत्यु आला च. म्हणून जो प्रेमांत मृत्यु आणि मृत्यूंत प्रेम पाहतो तो च खरें पाहतो. मानवजात जर विकारांत नष्ट झाली नाहीं तर दौर्बल्यांत नष्ट होईल. या गोष्टीचा तिनें विचार करून कोणतें योग्य तें ठरवावें. ख्रिस्तीधर्मानें विकारांना असत् ठरवून शुद्ध प्रेमाचा एक देव म्हणून बागुलबोवा निर्माण केला आहे आणि त्याच्या भजनीं लागून मानव दुर्बल होत चालला आहे. अर्थात् अशा देवाचा त्याग घडला पाहिजे तर च मानवाला कांहीं तरणोपाय आहे, नाहीं तर नाहीं. ही विचारसरणी जुन्या धार्मिक लोकांना भयंकर वाटली यांत नवल नाहीं. नीट्झ्शेनें जो व्यष्टिभाव प्रतिपादिला तो उच्च परमेष्ठी स्वरूपाचा होता हें त्यांना नीट कळलें नाहीं आणि कोणा हि ख्रिस्ती मनाला तें कळणें शक्य नाहीं. हा ग्रंथ पाहून वाग्नेर स्तंभित झाला. नीट्झ्शेच्या बहिणीला हि प्रथम त्याचा नीट बोध झाला नाहीं. इतर लोकांना तर तें एक वेड्याचें बरळणें च वाटलें. हें पाहून नीट्झ्शेला मोठा हर्ष झाला. त्याला आपल्या लिहिण्याचें सार्थक वाटलें. कारण

त्यानें ग्रंथाच्या आरंभीं च हा ग्रंथ " केवळ मुक्तात्म्यांकरितां " ( Ein Buch fur Freie Geister ) आहे असें म्हटलें आहे. या ग्रंथाचा उत्तरार्ध १८७९ मध्यें प्रसिद्ध झाला आणि त्या च वर्षीं नीट्झशेनें आपला बासेलच्या विश्वविद्यालयाशीं संबंध तोडला.

नीट्झशेनें १८७९ च्या उन्हाळ्यांत बासेल येथील आपल्या प्रोफेसराच्या जागेचा राजीनामा दिला. तो एकदां पूर्वीं १८७० सालीं आणि एकदां १८७४ सालीं ही जागा सोडण्यास तयार झाला होता पण कोणत्याना कोणत्या कारणानें तो तेथें इतके दिवस म्हणजे दहा वर्षें चिकटून राहिला. त्याला प्रथम सुरवातीला सालिना ३००० फ्रँकचें म्हणजे महिना सरासरी १९० रुपयांचें वेतन होतें. पुढें दोन वर्षांनीं तें सालिना ४००० फ्रँक म्हणजे महिना २०० रुपये पर्यंत वाढलें. शेवटीं त्याची प्रकृति बिघडल्यानंतर जेव्हां त्यानें नोकरी सोडली तेव्हां त्या संस्थेनें त्याला महिना १९० रुपये पेन्शन दिलें. या शिवाय त्याच्या एका मृत कुमारी आतेकडून वारस हक्कानें त्याला ३०००० मार्कांची मिळकत मिळाली होती. या सर्व उत्पन्नांतून त्याचा खर्च चांगला चाले. तो अविवाहित असल्याकारणानें त्याच्या मागें कुटुंबाचा वगैरे कांहीं च लकडा नव्हता. त्याची वृद्ध आई, बहीण आणि एक कुमारी आत होती त्यांचीं उत्पन्नें स्वतंत्र निराळीं होतीं. त्यांच्या कारितां ह्याला कांहीं एक खर्च करण्याचें कारण नव्हतें. त्या योगें ह्याला चांगलें स्वास्थ्य होतें. त्यानें स्वतःचें

घर कधीं केलें नाहीं व एका जागीं तो चिकटून कधीं राहिला नाहीं. "जो स्वतःला घर करतो त्याचे ठिकाणीं भुतें घर करून राहतात" असें त्याचें म्हणणें असे. त्याला स्वतःचें काम स्वतः करण्यास आवडे. त्याला एकांतवास प्रिय वाटे. त्याच्या निरुपद्रवी स्वभावामुळें सामान्य लोकांत त्याचे बद्दल फार आदर असे. त्याचें जें काय उत्पन्न होतें तें सर्व तो पुस्तकें, औषधें आणि प्रवास यांत खर्च करून टाकी. या शिवाय खर्चाच्या दुसऱ्या बाबी त्याच्या मागें कांहीं च नव्हत्या.

बासेल सोडल्यानंतर १८७९–८० मध्यें नीट्झ्शे हा नाउमबर्ग येथें आपल्या घरीं जाऊन राहिला. १८८१ मध्यें त्याचें दुखणें वाढलें. त्याला रोगाचा अचका बसला आणि तो सर्व प्रकारच्या उपचारांच्या मागें लागला. सदा आपली स्थिति कशी आहे आणि आपण कसें बरे होऊं यावांचून त्याला दुसरा विषय राहिला नाहीं. तो घर सोडून बाहेर पडला. या नंतर तो फार दिवस एका ठिकाणीं कधीं स्थिर च झाला नाहीं. सदा फिरस्ता. समुद्रकिनाऱ्यावरून डोंगरावर व डोंगरावरून समुद्रावर अशीं स्थानें बदली. हिंवाळा इटलींत निरनिराळ्या शहरीं व उन्हाळा एंगडाईन नदीच्या उत्तर तीरावर डोंगरांत. अर्थात् त्याचें सर्व लिखाण जातां येतां असे. सदा कपाळदुखी, औषधोपचार, हिंडणें यांत वेळ होईल तेव्हां लिहिणें. अपचनावर औषधें आणि झोंपेवर औषधें. शिवाय औषधीं झऱ्यांचें पाणी निराळें च. बहुधा डोंगरावरून वगैरे

हिंडतांना त्याला ज्या कल्पना सुचत त्यांचीं तो तेथें च टांचणें करी आणि सायंकाळीं घरीं आल्यावर तीं नीट लिहून काढी. त्यानें सूत्ररूपीं जें वाङ्मय निर्माण केलें त्याची मूळ कल्पना त्याला फ्रेंच तत्त्वज्ञांपासून आली पण पुढें त्याला ह्या आपल्या दिनचर्येमुळें ती फार मानवली. ज्या अति महत्त्वाच्या कल्पना आपल्याला स्फुरतात त्या मागें राहिल्या पाहिजेत ही त्याची अनावर इच्छा असे. म्हणून आपणाजवळ सदा कोणी तरी लिहून घेणारा पाहिजे असें त्यास वाटे. पण ही गोष्ट नित्य जुळणें शक्य नव्हतें. जेव्हां त्याची बहीण त्याचे जवळ असे तेव्हां ती हें काम मोठ्या हौसेनें आणि आस्थेनें करी. पण असे प्रसंग थोडे. एकदां त्याचा स्नेही डॉ. पाउल री यानें फ्राऊ आंड्रियास सालोमी नांवाची एक बाई हें लेखकाचें काम करण्याकरितां त्याचेकडे पाठवून दिली पण चार महिन्यांपेक्षां तिचें त्याच्याशीं अधिक जुळलें नाहीं. ती अल्लड पोरगी आणि हा गंभीर तत्त्वज्ञ. दोघांच्या स्वभावांत मुळापासून च जमीनअस्मानाचें अंतर होतें. हेन्री मेन्केन नामक एका अमेरिकन ग्रंथकारानें आपल्या " फ्रीड्रिक् नीट्झ्शेचें तत्त्वज्ञान " या ग्रंथांत ही गोष्ट नमूद करून शिवाय दुसरें असें विधान केलें आहे कीं नीट्झ्शेच्या मनांत या बाईशीं लग्न करण्याचें होतें आणि म्हणून तो तिच्या मागें इतका काळ फिरत राहिला. परंतु ही गोष्ट साफ खोटी आहे असें विल्यम साल्टर यानें आपल्या " तत्त्वज्ञ

नीट्झ्श " या ग्रंथांत म्हटलें आहे आणि त्याला प्रो. मेयरच्या अधिकारयुक्त मताची पुष्टि दिली आहे. मेयर म्हणतो नीट्झ्शेचा या बाईशीं जो थोडा काळ स्नेह होता तो केवळ ती आपला स्नेही डॉ. री याला योग्य बायको आहे असें वाटून त्या नात्यानें होता. नीट्झ्शेनें आपल्या सर्व आयुष्यांत एकदां च १८७६ च्या वसंतांत एका तरुण डच बाईला विवाहाबद्दल मागणी केली पण तिचें दुसरीकडे ठरलेलें ऐकून त्यानें माघार घेतली व तो पुढें जन्मभर अविवाहित राहिला. नीट्झ्शेची बहीण म्हणते त्यानें आपल्या तरुण वयांत शोपेनहौएरचा "स्त्री" हा निबंध वाचल्यापासून त्याच्या मनाचा स्त्रीविषयीं जो एक विरुद्ध ग्रह झाला तो शेवटपर्यंत कायम होता. त्याला स्त्रीबद्दल द्वेष नव्हता, किंवा तो विवाहाचा हि द्वेष्टा नव्हता. उलट त्यानें आपल्या ग्रंथांत जागोजाग विवाहाची तरफदारी केली आहे. पण स्वतःसंबंधीं मात्र त्यानें कधीं विवाहाचा अन्तःकरणपूर्वक विचार केला नाहीं. उलट एकदां त्यानें १८८७ मध्यें विनोदानें आपल्यासंबंधीं म्हटलें आहे,—"मी लग्न करणें म्हणजे एक मोठा गाढवपणा च करणें आहे." अशा थोरपुरुषांबद्दल पुष्कळांना कांहींतरी कुत्सितपणानें लिहिण्याची संवय असते. नीट्झ्शेच्या वृत्तीचा महाराष्ट्रांतील एक च एक बाणेदार पुरुष कै० विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांच्या मृत्यूनंतर बंगाल्यांतील एका सुप्रसिद्ध इतिहासकारानें एका सुप्रसिद्ध इंग्रजी मासिकांत

जो मृत्युलेख लिहिला आहे त्यांत राजवाडे हे वृद्धापकाळीं लग्न करण्याच्या विचारांत होते असें विधान केलेलें कोणा महाराष्ट्रीयाच्या नजरेला आलें नाहीं काय? ह्या कुत्सित— नव्हे द्वेषपूर्ण—विधानाबद्दल सदर लेखकाचा जितका धि:कार करावा आणि त्याबद्दल जितका तिरस्कार दाखवावा तितका थोडा च आहे. फ्रायहर्र फॉन सेड्लिट्झ याचा नीट्झ्शेशीं निकट परिचय होता. तो त्याबद्दल मोठ्या अभिमानानें लिहितो,—" कोणी माणूस मोठा म्हटला कीं त्याचे ठिकाणीं एक गोष्ट निश्चयानें दिसावयाची, त्याची काळी बाजू. याला अपवाद गटे नाहीं आणि शोपेनहौएर तर नाहीं च नाहीं. पण नीट्झ्शेचे ठिकाणीं मात्र अशी काळी बाजू नव्हती. त्याचे ठिकाणीं वासनात्मक ग्राम्यपणाचा किंचित् हि अंश नव्हता."

द्वितीय कालपर्यायांतील शेवटचे दोन मोठे ग्रंथ म्हणजे " उषा " आणि " आनंदमय विज्ञान " हे होत. " उषा " ( Morgenrote ) हा ग्रंथ १८८१ मध्यें तयार झाला. हा ग्रंथ " मानवी—सर्वथैव मानवी " या ग्रंथाला धरून च परिशिष्टरूपानें निघाला. हे दोन्ही ग्रंथ टिपणवजा आहेत. यांत पुढील तत्त्वज्ञानाची सर्व साधनसामग्री तयार करण्यांत आली आहे. म्हणून यांत जुन्या कल्पनांच्या विरुद्ध नानाप्रकारच्या शंका, प्रश्न आणि आक्षेप उपस्थित केलेले दृष्टोत्पत्तीस येतात. " आनंदमय विज्ञान " ( Die frohliche Wissenchaft ) हा ग्रंथ १८८१ मध्यें च शेवटीं शेवटीं लिहिला गेला आणि १८८२ मध्यें प्रसिद्ध झाला. येथपर्यंत सर्व काम संहारक

स्वरूपाचें म्हणजे मोडतोडीचें झालें. यांत जमीन नांगरून व माजून तयार झाली. जुन्या नीतितत्त्वांचे बुरखुंडे वाटेंतून निघाले. देवाच्या दहा आज्ञांचें वैयर्थ्य कळून चुकलें. उषेची प्रस्तावना पहा. आतां यापुढें नूतन पेरणीचा समय प्राप्त झाला आणि तेथून तृतीय कालपर्यायाला आरंभ झाला. या काळीं त्यानें आपलें कायमचें ठाणें इटलींत केलें. त्याचे पूर्वीचे सर्व स्नेही एकामागून एक गळत चालले. त्याची बहीण म्हणते, १८८०-८१ मध्यें तो जिनोवांत रहात असतां सामान्य लोकांत मिळून मिसळून वागत असे आणि ते हि त्यावर आदरयुक्त प्रेम करीत. त्याची रोगानें जर्जर झालेली स्थिति पाहून त्यांना त्याचा कळवळा येई. तें त्याला साधु पुरुष ( il santo किंवा il piccolo santo ) समजत आणि त्याची संतांच्या कोटींत गणना करीत. या काळाच्या एका पत्रांत त्यानें आपल्या जीवनाचा मार्ग कसा असावा याबद्दल येणें प्रमाणें आपलें ध्येय नमूद केलें आहें:—

"माझें ध्येय काय आहे तर : कोणाच्या डोळ्याला दुखविणार नाहीं असें स्वातंत्र्य, कोणाच्या बरोबर मानसन्मान आणि सुखोपभोग या बाबतींत स्पर्धा न करतां आणि कोणी हंसतील कीं काय याची पर्वा न बाळगतां सर्वत्रांशीं समत्व धारण करण्यास लावणारी मृदु आणि गूढ अहंभावना. माझ्या जीवनमार्गांतील संवयी कशानें उच्चोच्च होत जातील तरः कधीं हि सर्वसामान्य न होण्यांत आणि सदोदित शिष्टाचारानें वागण्यांत; अति लोभ न धरण्यांत पण त्या च बरोबर उच्च वातावरणांत राहण्याबद्दल शांततेनें खटपट करण्यांत; स्वतः बद्दल केवळ मितव्ययी च नाहीं तर अगदीं कंजूष वृत्तीनें वागणें, परंतु

दुसऱ्यांशीं निरपेक्षपणें अति सौम्य रीतीनें चालणें. हलकी झोंप, स्वतंत्र स्थिर पाऊल, मद्य नाहीं, राजपुरुष किंवा इतर अधिकारी व्यक्ति नाहींत, कनक नाहीं आणि कांता हि नाहीं, वर्तमानपत्रें नाहींत, मानसन्मान नाहीं, उच्च विभूतींच्या दर्शनावांचून कोणाशीं भेटीचे प्रसंग नाहींत, आणि मधून मधून सामान्य लोकांत मिळून मिसळून वागण्याची वृत्ति आहे—ही गोष्ट इतकी आवश्यक आहे कीं जसें जोमदार आणि आरोग्यकारक वनस्पतींच्या प्ररोहांचें दर्शन आवश्यक असतें—अन्न कसें तर जें अगदीं अल्पायासानें प्राप्त होईल, जें मिळविण्याकरितां सतत मारामारी करणाऱ्या अति लोभी आणि तामसी जनसंमर्दांत जाण्याचा प्रसंग येणार नाहीं, शक्य तोंवर स्वतः तयार केलेलें किंवा जें तयार करण्यास फारशी गरज न लागणारें..."

१८७९ मध्यें पहिला पर्याय संपून दुसरा लागला. १८८२ मध्यें दुसरा संपला. "उषा" आणि "आनंदी विज्ञान" हे दोन्ही ग्रंथ संध्यासमयाचे होत. तिसरा काल-पर्याय १८८३ पासून सुरू झाला. या पर्यायांतील आरंभींचा अति महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे "एवमब्रवीज्झरथुष्ट्रः" (Also Sprach Zarathustra). हा ग्रंथ कसा तर जो "सर्वां-करितां आहे आणि कोणा हि करितां नाहीं" (Ein Buch fur Alle und Keinen) अशी त्याच्या मथळ्याखालीं द्वंद्वाच्या मार्षेत प्रतिज्ञा आहे. यांत जी मुख्य कल्पना आहे ती "पुरुषोत्तम" रूपाला धरून आहे. याचे पहिले दोन भाग १८८३ मध्यें, तिसरा भाग १८८४ मध्यें, आणि शेवटचा चौथा भाग केवळ खाजगी जोलक्या मित्रमंडळीकरितां १८८५ मध्यें निघाला आणि सर्व ग्रंथ एकदम एका ठिकाणीं

१८९२ मध्यें प्रसिद्ध झाला. ह्या ग्रंथांतील कल्पना एंगडाइन नदीवर हिंडण्याफिरण्याच्या काळीं उद्भवल्या आणि त्याचें सर्व लिखाण वेळोवेळीं जिनोवा, सिल्समारिआ, नाइस, आणि मेंटोन येथें झालें. या पुढील ग्रंथ " सदसतांच्या पलीकडे " (Jenseits von Gut und Bose) हा १८८५–८६ मध्यें तयार झाला. यांत मुख्य विषय म्हणजे दोन प्रकारची नीति–प्रभुनीति व दासनीति–दर्शवून, ख्रिस्तीनीति ही दासनीति कशी आहे हें सिद्ध केलें आहे. अर्थात् हल्लींची सर्व सुधारणा आणि संस्कृति ह्या नीतींवर प्रस्थापित झाली असल्याकारणानें ती किती हीन आहे हें या ग्रंथांत चांगलें विशद झालें आहे. ह्या ग्रंथाच्या प्रसिद्धीनंतर एक वर्षानें म्हणजे १८८७ मध्यें " नीतीची पूर्वपीठिका " (Zur Genealogie der Moral) हा ग्रंथ निघाला आणि पुढें एक वर्षानें १८८८ मध्यें " मूर्तींचा संधिप्रकाश " (Gotzendammerung) हा ग्रंथ बाहेर पडला. या ग्रंथाची प्रस्तावना ख्रिस्तांतकाच्या समाप्तीच्या दिवशीं लिहिण्यांत आली. या दोन्ही ग्रंथांत नीतीचें अधिक विवरण करण्यांत आलें आहे. " मूर्तींचा संधिप्रकाश " हा ग्रंथ वाग्नेरच्या " देवांचा संधिप्रकाश " (Gotterdammerung) या ग्रंथाविरुद्ध प्रहेलकरूपानें आहे. मध्यंतरीं " वाग्नेरचा प्रश्न " आणि " नीट्झ्शे विरुद्ध वाग्नेर " हे ग्रंथ लिहून शेवटीं " ख्रिस्तांतक " आणि " पश्य पुरुषं " हे ग्रंथ त्याच सालीं म्हणजे १८८८ मध्यें तयार झाले आणि हा तिसरा कालपर्याय समाप्त झाला. " बलेच्छा " (Der

Wille Zur Macht ) हा ग्रंथ नीट्झशेच्या पश्चात् त्याचीं सर्व टांचणें टिपणें एकत्र करून त्याच्या मरणोत्तर प्रसिद्ध करण्यांत आला.

" ख्रिस्तांतक " या ग्रंथाला नीट्झशेनें जर्मन भाषेंत " Der Antichrist " हें नांव योजिलें आहे. विल्यम साल्टरच्या मतें या शब्दाचा अर्थ ख्रिस्तविरोधक असा होत नाहीं तर ख्रिस्तीविरोधक असा होतो. कारण जर्मन भाषेंत ख्रिस्त याला Christus असा शब्द आहे, आणि म्हणून जर्मन Christ शब्दाचा अर्थ Christian = खिस्ती असा आहे असें त्याचें म्हणणें आहे. या मतानुसार त्यानें Der Antichrist याचें इंग्रजींत Antichristian असें भाषांतर केलें आहे व त्याला फ्रेंच ग्रंथकार हेन्री लिश्टेनबर्गर याची पुष्टि दिली आहे. सदर ग्रंथकारानें Der Antichrist याचें फ्रेंच भाषांतर L'Antichretien = ख्रिस्तीविरोधक असें केलें आहे. तथापि प्रो० मेयर म्हणतो नीट्झशेला या शब्दांतून वरील दोन्ही अर्थ पाहिजे होते. तो जसा आपणास कट्टा ख्रिस्तांतक मानी तसा च ख्रिस्त्यंतक हि मानी हें त्याच्या ग्रंथांवरून जागोजाग दृष्टीस पडतें.

या सर्व ग्रंथांत " एवमब्रवीझरथुष्ट्रः " हा त्याचा सर्वांत आवडता ग्रंथ होय. या ग्रंथांत त्यानें आपलें सर्व तत्त्वज्ञान काव्यात्मक रीतीनें ग्रथित केलें आहे. हा ग्रंथ पूर्ण तयार होण्यास तीन वर्षें (१८८३–१८८५) लागलीं. या काळांत नीट्झ्श हा एका ठिकाणीं कोठें च स्थिर

नव्हता. व्हीना येथील डॉ. पानेथ हा १८८३-८४ च्या हिंवाळ्यांत नाइस येथें कांहीं दिवस त्याच्या अगदीं निकटवर्तित्वानें होता. या काळीं त्यानें त्याच्या रहाणीचें आणि स्वभावाचें जें सूक्ष्म अवलोकन केलें तें येणेंप्रमाणें वर्णिलें आहे :—" त्याची लहानशी खोली अगदीं मोकळी आणि अनातिथेय होती; बहुधा ती त्यानें सुखसोईच्या दृष्टीनें नव्हे तर केवळ मितव्ययाच्या दृष्टीनें पसंत केलेली दिसत होती. तेथें शेगडी नव्हती, सतरंजी नव्हती, किंवा दुसरें कसले मिजासीचे जिन्नस नव्हते. जेव्हां जेव्हां मी तेथें जात असें तेव्हां तेव्हां मला थंडीनें हुडहुडी भरे. नीट्झ्श हा माझ्याशीं अति स्नेहपूर्ण रीतीनें वागे. त्याचा शेवटचा ग्रंथ वाचून मी जें कांहीं त्याबद्दल अनुमान केलें होतें तें सर्व खोटें ठरलें. त्याचे ठिकाणीं वृथा अभिमान किंवा अहंकार यांचा लवलेश हि नव्हता. उलट तो माझ्याशीं अगदीं सहज वृत्तीनें आणि निर्मल अन्तःकरणानें वागे. आम्हीं भेटलों कीं सदा सर्वसामान्य हवापाण्याच्या व जागापागांच्या गप्पा मारीत असूं. एकदां त्यानें मला बोलण्याच्या भरांत सहजासहजीं सांगितलें—आणि यांत त्याचे ठायीं किंचिन्मात्र ढोंगाची किंवा अभिमानाची छटा दिसली नाहीं—कीं, आपल्या शिरावर एक मोठें जोखमीचें ओझें येऊन पडलें असून आपणाला त्याची सतत जाणीव आहे आणि त्याकारणीं आपण आपल्या सर्व शक्तीचा उपयोग करून तें पूर्णतेस नेण्याचा संकल्प केला

आहे, मात्र या कामांत मुख्य अडचण आपणास आपल्या अधु डोळ्यांची वाटत आहे. नुसती कल्पना करा, हा पुरुष एकटा च एकटा अर्धवट अंधस्थितींत दिवस कंठतो. सायंकाळ झाली कीं त्याला कांहीं काम करणें शक्य नसतें. नीट्झ्शेच्या ठिकाणीं पुष्कळ विरोधी गोष्टी आहेत पण कांहीं असलें तरी तो अति सरळ प्रामाणिक मनुष्य आहे. त्याचा मनोनिग्रह फार दांडगा आहे आणि कार्यतत्परता विलक्षण आहे. मी त्याला एकदां आपण त्याच्या झरथुष्ट्राचा तिसरा भाग बाहेर पडल्याबरोबर त्याची लोकांत प्रसिद्धि करण्याकरितां जर कांहीं खटपट केली तर ती त्याला मानवेल का म्हणून विचारलें. यावर तो नाहीं म्हणाला नाहीं पण त्याला ही कल्पना फारशी रुचलेली दिसली नाहीं. आपण स्वतः आपली जाहीरात करण्यापासून सर्वथा अलिप्त राहावयाचें आणि दुसरा कोणी उगी च अव्यापारेषु व्यापार करूं लागला तर त्याबद्दल तिरस्कार दर्शवावयाचा ही वृत्ति खरोखर असामान्य आहे यांत शंका नाहीं. त्याला आपल्या स्वतःच्या नियत कार्याबद्दल आणि त्याच्या भावी परिणामाबद्दल पूर्ण विश्वास होता: आणि हा विश्वास च केवळ एक त्याला आपल्या सर्व संकटांशीं, शरीरव्याधीशीं आणि दारिद्र्याशीं टक्कर देण्यास बलदाता झाला. नीट्झ्श हा मुख्यतः भावनेचा पुरुष आहे."

नीट्झ्शेनें आपल्या डोळ्यापुढें जी एका महान् ग्रंथाची योजना करून ठेवली होती त्या ग्रंथाचा मथळा "बलेच्छाः

सर्व नैतिक मूल्यांच्या मूल्यांतरीकरणाचा प्रयत्न" (Der Wille zur Macht: Versuch einer Umwerthung aller Werthe) असा होता. या ग्रंथाचे त्यानें चार भाग कल्पिले होते. त्यांपैकीं प्रस्तुत 'खिस्तांतक' हा पहिला भाग होय. यानंतर पुढील भाग लिहिण्याचे अगोदर च त्याचें ग्रंथकर्तृत्व स्तब्धता पावलें. तथापि या भागांचीं टिपणें वगैरे त्यानें करून ठेवलीं होतीं तीं च पुढें त्याच्या मरणोत्तर "बलेच्छा" या नांवाखालीं दोन भागांत मिळून छापून प्रासिद्ध करण्यांत आलीं. ह्या चारी भागांचे मथळे येणें प्रमाणें त्यानें योजले होते:—

(१) खिस्तांतक: खिस्तीधर्मावरील टीकेचा प्रयत्न (Der Antichrist: Versuch einer Kritik des Christenphie thums).

(२) मुक्तात्मा: सर्व संहारक चळवळीच्या दृष्टीनें तत्त्वज्ञानावर टीका (Der freie Geist: Kritikd er Philoso-als einer nihilistichen Bewegung).

(३) नीतिध्वंसक: अत्यंत विनाशक स्वरूपाच्या अज्ञानाच्या म्हणजे नीतीच्या विरुद्ध टीका (Der Immoralist: Kritik der verhanguissvollsten Art von Unwissenheit, der Moral).

(४) शंभुभैरव: शाश्वत उत्पत्तिलयाचें तत्त्वज्ञान (Dionysus: Philosophie der ewigen Wiederkunft).

नीट्झ्शेला अगदीं लहानपणापासून जितकें सत्याचें प्रेम होतें तितकें दुसरें कशाचें नव्हतें. त्यानें १८६९ च्या जुलै

मध्यें बॉन्नच्या पाठशाळेंतून आपल्या बहिणीला जें पत्र लिहिलें आहे त्यांत म्हटलें आहे—" आपण आपल्या अभ्यासांत सुख, शांति आणि स्वास्थ्य पाहतों काय ? नाहीं, तर केवळ सत्य, मग तें किती हि भयप्रद आणि विद्रूप दिसलें तरी हरकत नाहीं. " त्याची सर्व नैतिक वागणूक या च विचाराला धरून अति टणटणीत होती. त्याला कुत्सितपणा, अनृतवादित्व आणि मेकडवृत्ति यांचा अति तिरस्कार वाटे. त्याला व्यवहारांत आचार आणि विचार यांत सरळपणा आवडे. शोपेनहौएर-प्रमाणें मनांत एक आणि जनांत एक असें त्याला करतां येत नसे. म्हणून च पुढें त्यानें शोपेनहौएरचा त्याग केला. त्याचे विचार म्हणजे केवळ त्याच्या आचारमार्गांतील दीपस्तंभ होते. त्याच्या विचारांत ओतप्रोत वीरत्व भरलेलें दिसतें. वीरत्वाची कामना ही च बलाची इच्छा. प्रो. रील्ह आपल्या ग्रंथांत म्हणतो (Friedrich Nietzsche: der Kunstler und der Denker)—" आमच्या तत्त्वज्ञानांत जर कोठें अत्यंत उच्च दर्जाची वीरवृत्ति पहावयाची असेल तर ती येथें आहे. हा च एक खरा पौरुष स्वभावाचा तत्त्वज्ञ आहे. " त्याचे ठायीं अभिजात थोरपणा भरलेला होता. त्यानें एकदां नीतीच्या विवरणांत म्हटलें " तपस्व्याला नैराश्याचा हक्क नाहीं. " मग तो कोणाचा हक्क आहे ? तर ख्रिस्तांतकांत सांगितलें " नैराश्य हा चांडालाचा हक्क आहे. " तो उद्धट नव्हता किंवा लब्धप्रातिष्ठित हि नव्हता. तो प्रसंगविशेषीं

आपला आपण विरोध करण्यास मागें घेत नसे. त्याला आपल्या मित्रांनीं आपली स्तुति वा तरफदारी केलेली खपत नसे. अनुग्रहाच्या वा संरक्षणाच्या इच्छेनें त्यांनीं आपल्या मार्गांत ढवळाढवळ करणें त्याला पसंत नव्हतें. त्यानें झरथुष्ट्राच्या मुखानें सांगितलें आहे—" ज्ञात्याला नुसतें शत्रूंचें प्रेम च नाहीं तर मित्रांचा द्वेष हि अनिर्वाह्य असतो." त्याचे ठायीं ऐहिकापेक्षां पारमार्थिक बळाचें माहात्म्य होतें. त्यांत दर्पाचा लेश नव्हता पण आत्मप्रतीति भरपूर होती. तो मनाचा मोठा उदार होता. आपल्या संपूर्ण आयुष्यांत आपण कोणाबद्दल केव्हां हि लेखनमात्सर्य दर्शविलें असल्याचें उदाहरण नाहीं असें त्यानें आत्मचारित्रांत अभिमानानें सांगितलें आहे.

नीट्झ्शेचें सर्व लिखाण आत्मप्रत्ययाचें होतें, दुसऱ्याचे विचार घेऊन उष्टें नव्हतें. तो म्हणतो, " मी गाडींत बसतों पण ती गाडी मी च असतों." तो जरी अति गंभीर तत्त्वज्ञ असला तरी त्याच्या ग्रंथांत विनोदाच्या —अति उच्च विनोदाच्या छटा आहेत. ही त्याची विनोदी आनंदाची वृत्ति वरवर नाहीं तर फार खोल आहे. तो नित्य म्हणें,—" मी जें लिहितों तें माझ्या स्वतः करितां, दुसऱ्या कोणा हि करितां नांहीं " ( Mihi ipsi scripsi ). ही गोष्ट अक्षरशः खरी आहे. प्रत्येक प्रतिभावान् पुरुष—मग तो तत्त्वज्ञ असो वा कलावान् असो—असें च म्हणतो आणि या च वृत्तीनें चालतो. याला महाराष्ट्रांतील उदाहरण द्यावयाचें तर कै० विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांचें

देतां येईल. आपल्या तत्त्वज्ञानाचें बिरुद्वाक्य त्यानें येणेंप्रमाणें लॅटिन भाषेंत योजलें होतें:—

" Satis sunt mihi pauci
( माझे करितां फार थोडे पुरे आहेत ),
Satis est unus
( एक हि पुरेसा आहे ),
Satis est nullus
( कोणी नसला तरी पुरे आहे ). "

युरोपांत एक अर्धवट शास्त्रीय किंवा असच्छास्त्रीय लेखक आहे. त्याचें नांव डॉ॰ मॅक्स नोर्डाउ. त्यानें " जातिऱ्हास " नांवाचा एक ग्रंथ लिहिला आहे. हा ग्रंथ युरोपांतील सर्व-सामान्य जनतेंत फार वाचला जातो. जसा लेखक उथळ तसा च ग्रंथ हि अति उथळ आहे. त्यांत त्यानें नीट्झ्शेवर एक स्वतंत्र प्रकरण लिहिलें आहे. त्यांत तो म्हणतो, नीट्झ्शेचे सर्व लेख वेड्याच्या सदनांत वेळोवेळीं त्याच्या निवासकाळीं लिहिले गेले. यावर विल्यम साल्टरनें असें उत्तर दिलें आहे कीं, येथें नीट्झ्श हा वेडा नाहीं तर नोर्डाउ वेडा आहे. वास्तविक रीत्या युरोपला अद्याप नीट्झ्शेच्या तत्त्वज्ञा-नाचें खरें स्वरूप समजलें नाहीं आणि त्याची किंमत कळली नाहीं. नीट्झ्शेनें तर ख्रिस्तांतकाच्या आरंभीं प्रस्तावनेंत म्हटलें च आहे कीं माझा वाचक अजून कोणी जन्मला नाहीं तो पुढें जन्मावयाचा आहे. यावरून ह्या सर्व पंडितंमन्य टीकाकारांचें महत्त्व लक्षांत येतें आणि त्यांच्या आक्षेपांचें अयथार्थत्व पटतें. बहुधा हे लोक सामान्य प्रोफेसराच्या

जातींचे असतात आणि त्यांचें सर्व लिखाण पै किंवा पैसा-ओळवाल्या वर्तमानपत्री लेखकाच्या बाण्याचें असतें. म्हणून च जेव्हां एखादा प्रो॰ झीग्लर किंवा डॉ॰ मोबिअस म्हणतो कीं नीट्झ्श हा " आध्यात्मिकतः असंतुष्ट " ( metaphysically dissatisfied ) होता तेव्हां त्याला नीट्झ्श कळला नाहीं आणि अध्यात्म हि कळलें नाहीं असें म्हणावें लागतें. तसें च जेव्हां हाइन्रिख वाइनेल हा त्याच्या शास्त्रीयत्वाबद्दल व ओस्वल्ड कुल्प हा तत्त्वज्ञानाबद्दल आक्षेप घेतो कीं त्याला त्यांचे कांहीं " निश्चित् परिणाम " ( definite results ) दाखवितां आले नाहींत तेव्हां या पंडितवर्यांना

" स्थितप्रज्ञस्य का भाषा समाधिस्थस्य केशव ।
स्थितधीः किं प्रभाषेत किमासीत व्रजेत किम् ।। "

या अर्जुनाच्या प्रश्नाप्रमाणें तत्त्ववेत्ता म्हणजे काय, तो कसा दिसतो, कसा बोलतो, कसा वागतो, नीट्झ्शेनें तो कसा पाहिला आहे या बद्दल कांहीं च ज्ञान नसल्याचें सिद्ध होत आहे. त्यांची ती " निश्चित परिणाम " विचारण्याची भाषा ही त्यांच्यांतील आधुनिक पंडितत्वाच्या परिणामाचें निश्चित रूप दर्शवीत आहे हें खास.

नीट्झ्शेला आपल्या स्वतःच्या व्यक्तित्वापेक्षां ज्ञानाचें महत्त्व अधिक वाटत होतें. त्याला त्याबद्दल विलक्षण अभिमान होता. तो १८८१ मध्यें आपल्या बहिणीच्या पत्रांत म्हणतो —" युरोपांतील नैतिक विचाराच्या आणि आचाराच्या अत्युच्च शिखरावर मी आरोहण केलें आहे, नव्हे मी च

स्वतः तें शिखर झालों आहे." या काळीं त्यानें नुकतें च "मानवी-सर्वथैव मानवी" हा ग्रंथ पुरा करून "उषा" हा ग्रंथ लिहिण्यास हातांत घेतला होता. १८८८ मध्यें तो ब्रांडेसच्या पत्रांत लिहितो—"मी जुन्या नैतिक मूल्यांचा प्रळयकर्ता आहे, मी युगायुगांच्या ठायीं जन्म घेणारा धर्मावतार आहे." तसें च तो स्ट्रिंड्बर्गला सांगतो—"मी मानवेतिहासाचे दोन भागांत तुकडे करून टाकण्यास पूर्ण समर्थ आहे." १८८८ च्या ३० सप्टेंबर रोजीं त्यानें "ख्रिस्तांतक" हा ग्रंथ संपविला आणि "मूर्तींचा संधिप्रकाश" या ग्रंथाला प्रस्तावना लिहिली. या विशिष्ट दिवसाला अनुलक्षून तो आत्मचरित्रांत नवीन 'आनंदाचें वर्तमान' जाहीर करतोः "महान् विजय; सप्तम दिन; पो नदीच्या तीरावर देवाचें स्वस्थ चित्तानें सहल करणें." पुन्हा तो तेथें च बजावून सांगतोः "मी च खरा संस्कृतीच्या शुभवर्तमानाचा प्रेषित आहे." हे सर्व प्रकार पाहून प्रो० प्रिंगल् पाटिसन् आपल्या ग्रंथांत ( Man's Place in the Cosmos) अगदीं चिडून जाऊन म्हणतो–"काय हा भयंकर अहंकार–हें कोणा वेड्याचें तर बरळणें नाहीं?" बिचारा पाटिसन्! त्याला जर नीट्झ्शेच्या अहंकाराचें स्वरूप नीट आकलन झालें नाहीं तर तो त्याचा दोष नाहीं, त्याच्या प्रोफेसरपणाचा आहे.

नीट्झ्शेचे हे अहंकाराचे उद्गार उगी च आत्मप्रौढीचे नाहींत तर आत्मविश्वासाचे आहेत. त्यांत बळ ज्ञानाचें आहे.

सर्व ज्ञानाचे नर असे च उद्गार काढतात. व्यवहारांत तो अति सौम्य आणि नम्र होता. एकदां त्यानें आपला स्नेही पीटर गास्ट याला पत्रांत लिहिलें—“ माझ्यापेक्षां बुद्धीनें तूं किती तरी मोठा आहेस. ” ब्रांडेसच्या पत्रांत आपल्याला धर्मावतार म्हणवून घेऊन लागली च तो पुढें लिहितो— “ परंतु कदाचित् असें म्हणण्यांत मी चुकत असेन—त्याहून अधिक म्हणजे तो मूर्खपणा हि असूं शकेल—माझी अशी इच्छा आहे कीं मला माझे संबंधीं कशाबद्दल हि अभिमान बाळगण्याचा प्रसंग न यावा. ” त्याला आपल्या झरथुष्ट्राबद्दल जसा विलक्षण विश्वास होता तसा च विलक्षण संशय होता. हा ग्रंथ खरोखर च चांगला आहे का हा सर्व भ्रम आहे? जेव्हां सदर ग्रंथाबद्दल पहिली मान्यता त्याच्या प्रत्ययास आली तेव्हां त्याचा जीव हलका झाला आणि त्यानें पीटर गास्टच्या पत्रांत लिहिलें—“ तर मग माझें जीवित अगदीं च कांहीं विफल झालें नाहीं—आणि—निदान या वेळीं तरी जेव्हां माझा त्यावर अत्यंत विश्वास बसला आहे. ” पुन्हा एकदां तो गास्टला म्हणाला—“ माझ्या अन्तःकरणांत संपूर्ण झरथुष्ट्राच्या निर्मितिबद्दल च विरोधाची भावना आहिवत् संचार करीत आहे. ” यावरून त्याला आपल्या पांडित्याची बिलकूल घमेंड नव्हती हें उघड ठरतें. १८७७ सालीं त्यानें सेड्लिट्झला पत्रांत लिहिलें—“ मी परमेश्वराला स्मरून खरें सांगतों कीं माझे ठिकाणीं तुला असा साधा मनुष्य दिसेल कीं त्याला आपल्या स्वतः विषयीं फारसें मोठें मत नाहीं. ”

झरथुष्ट्राच्या मागून नीट्झ्शेचे जे एकापुढें एक ग्रंथ झपाट्यानें निघत गेले ते हल्लींच्या युनिव्हर्सिटीशिक्षित जगांत अत्यंत तऱ्हेवाईक, शरीरव्याधिदर्शक किंवा मानसरोगनिदर्शक म्हणून सर्वत्र अवमानण्यांत आले तर त्यांत कांहीं नवल नाहीं. मॉसूर तेन आणि जेकब बुर्खार्ट यांना देखील ते फारसे पसंत पडले नाहींत. तेन्नें तर " मूर्तींचा संधिप्रकाश " हा ग्रंथ वाचून त्यावर " केवढें हें नामी धाष्टर्य " असे उद्गार काढले. हें सर्व पाहून नीट्झ्श म्हणतो,—" या लोकांना माझ्या सारखी तितकी च कळकळीची आंतून आंच नाहीं, तितकी च बलवती इच्छा नाहीं. " त्याचे सर्व जुने स्नेही एकामागून एक गळत चालले. यावर तो आपल्या बहिणीला लिहितो—" जो मनुष्य अति कळकळीचा असतो त्याला दोस्तांची गरज असते, निदान त्याला कोणी एखादा देव तरी असावा लागतो; पण मला देव नाहीं आणि दोस्त हि नाहींत. ताई, काय सांगावें, तुला जे कोणी दोस्त म्हणून वाटत आहेत ते पूर्वीं एकदां तसे होते—पण आतां ? " तिला एकदां त्यानें खाजगी रीतीनें सांगितलें—" माझ्यावर प्रेम करणारा असा जगांत कोणी नाहीं; असें असून मी जीवनावर प्रेम करतों हें च आश्चर्य !" झरथुष्ट्र प्रसिद्ध झाल्यानंतर त्याकडे कोणी लक्ष देईना हें पाहून त्यानें उद्वेगानें जे उद्गार काढले ते " बलेच्छा " नामक ग्रंथांत येणेंप्रमाणें नमुद झाले आहेत : " दहा वर्षें झालीं —अजून पर्यंत कोठें मेघाचा ध्वनि माझ्या कानावर येईना—ही भूमि कशी पर्जन्यरहित आहे. " स्वतः विल-

क्षण एकांतवासांत राहून सतत चिंतन कशाचें तर मानव-जातीची उन्नति कशी होईल याचें. हा च एक त्याच्या आयुष्यांतील जिव्हाळ्याचा प्रश्न होता. या प्रश्नाचें उत्तर देण्याकरितां जेव्हां तो प्रयत्न करतो तेव्हां तो जणुं आपल्या डोक्यावरील ओझें उतरतो. हीं गोष्ट त्यानें आपल्या आत्म-वृत्तांत विशद करून दाखविली आहे. या ग्रंथासंबंधीं त्यानें आपल्या बाहिणीला येणेंप्रमाणें लिहिलें आहे:—

" मी ह्या ( १८८८ च्या ) सुवर्णमय हिंवाळ्यांत मला जें काय अति सुंदर शात आहे—माझ्या आयुष्याचें पूर्व वृत्त—तें केवळ माझ्याकरितां, माझ्या एकट्या स्वतः कारितां लिहून ठेवीत आहे. एका विश्वासाच्या सुकन्येवांचून दुसऱ्या कोणी तें वाचतां कामा नये. पण जेव्हां ती सातासमुद्रांपलीकडून आपल्या भावाला भेटण्यास येईल तेव्हां च तें तिला वाचण्यास मिळेल हें उघड आहे ( या वेळीं त्याची बहीण आपल्या नवऱ्याबरोबर दक्षिण अमेरिकेंत होती ). त्यामध्यें जर्मन लोकांना वाचण्यासारखें कांहीं नाहीं...............एक वेळ मला वाटतें हें हस्तलिखित पुरून टाकून नजरेआड करावें; त्याची माती होऊन जावो, आणि जेव्हां आपणां सर्वांची माती होईल तेव्हां तें आपलें पुनरुत्थान करून घेईल. कदाचित् त्या वेळीं ज्या जर्मन लोकांना वर चढविण्याची माझी इच्छा आहे ते आपोआप ह्या वडया काळाला अधिक योग्य असल्याचे दिसूं लागतील ".

सदर्हू आत्मचरित्राबद्दल नीट्झशेनें १८८८ च्या नोव्हेंबर च्या २६ तारखेस ब्रांडेसच्या पत्रांत लिहिलें आहे कीं आपण हें चरित्र अगदीं उदासीन वृत्तीनें आणि लोक काय म्हणतील या विषयीं पूर्ण बेफिकीरपणानें लिहीत

आहोंत. पुनः त्या च महिन्याच्या २९ तारखेस तो पीटर गास्टच्या पत्रांत म्हणतो हें चरित्र थट्टा आणि कुचेष्टा यांनीं ओतप्रोत भरलें आहे. आतां नीट्झ्शेला जरी आपला स्वतःचा बोजा लोकांवर घालणें बरें वाटत नसलें तरी त्यांना आपलें कार्य कोणत्या स्वरूपाचें आहे याची जाणीव करून देणें महत्त्वाचें वाटलें आणि म्हणून च त्यानें हें आत्मचरित्र लिहिण्यास हातांत घेतलें. यांत त्याला आपल्या स्वतःच्या व्यक्तित्वाचा गाजावाजा करावयाचा नव्हता तर आपल्या ग्रंथांचें महत्त्व कशांत आहे हें सांगावयाचें होतें. त्याला आपल्या उच्च आत्म्याचा साक्षात्कार झालेला असल्यामुळें त्याचा संपूर्ण अहंभाव या विशिष्ट आत्म्याला अनुलक्षून होता. ही गोष्ट कोणा हि सामान्य प्रोफेसरवजा पंडिताच्या ज्ञानाच्या आटोक्यांत येणें कठीण आहे. त्यानें आपल्या झरथुष्ट्राबद्दल यथार्थ म्हटलें आहे:

"माझा सुपुत्र जो झरथुष्ट्र त्याचे विषयीं लोकांनीं आदर दर्शवावा अशी माझी इच्छा आहे. त्याचें वाक्य कानीं पडावें अशा अधिकाराचे जे फार थोडे भाग्यवान पुरुष आहेत त्यांना च केवळ तो प्राप्त व्हावा, इतरांना होऊं नये ( भगवंतांनीं गीतेंत या च आशयाचे उद्गार काढले आहेत—"इदं ते नातपस्काय ना भक्ताय कदाचन। न चाशुश्रूषवे वाच्यं न च मां योऽभ्यसूयति ॥" ). मी जो 'त्याचा जनक' त्या माझ्याकडे पाहून पाहिजे तर तुम्हीं हंसा—कारण मी हि स्वतः तसें करतों. अथवा एका शब्दांत सांगावयाचें तर माझ्या घराच्या दरवाज्यावर जीं काव्यात्मक वाक्यें आहेत तीं जशींच्या तशीं घेऊन चाला—

मी माझ्या स्वतःच्या घरांत राहतों.
मी कोणा दुसऱ्याचें कशांत हि अनुकरण केलेलें नाहीं.
जो कोणी ' ज्ञानगुरु ' आपल्या स्वतःकडे पाहून हंसला नाहीं,
त्या प्रत्येकाकडे पाहून मी हंसलों आहे. "

नीट्झ्शेला राजकीय एषणा कसली च राहिलेली नव्हती. त्याला आपल्या काळचें जर्मन साम्राज्य हें खऱ्या संस्कृतीला मोठेसें उपकारक असलेलें दिसत नव्हतें. त्याचें ध्येय उच्च चातुर्वर्ण्यांतील रामराजाचें होतें. हा राजा कसा तर विद्वान् ब्राह्मणवर्णानें उपदिष्ट. यजुर्वेदांत खरा ' राजन्य ' हा ' ब्राह्मण-वान् ' असतो आणि खरा 'ब्राह्मण' हा 'राजन्यवान्' असतो अशी श्रुति आहे. ही विचारसरणी त्याला सर्वस्वी मान्य होती. त्यानें " आनंदमय विज्ञान " नामक ग्रंथांत हल्लींच्या राजांची अनुकंपनीय स्थिति पाहून असे उद्गार काढले आहेत: "गरीब बिचारे राजे ! त्यांचे सर्व **न्याय्य अधिकार** आतां अन-पेक्षित रीतीनें केवळ **हक्कांच्या** सदरांत पडूं लागले आहेत, आणि त्यांचे सर्व हक्क अन्याय्य वाटूं लागले आहेत!" अर्थात् हल्लींचे सर्व राजेमहाराजे केवळ इतकीं थोरलीं लक्षणा-त्मक किंवा अलंकरणात्मक सुंदर बाहुलीं बनलीं आहेत इतकें च. हल्लींच्या समाजांतून प्राचीन उद्घशाही केव्हां च नाहींशी होऊन नवीन यंत्रशाही झपाट्यानें पसरत आहे. संस्कृतीच्या दृष्टीनें ही समाजाची उन्नति नसून अधोगति आहे. या अव-नतीच्या काळीं प्राचीन क्षात्रतेज लुप्त होऊन त्याची जागा अधाशी वणिक् वृत्तीनें व्यापिली असल्यास नवल नाहीं. ही

वृत्ति जितकी गांवढळ दिसते तितकी च अति ओंगळ असते. एखाद्या सरदाराचा आपल्या शिपाईप्याद्याशीं जो संबंध असतो तो फार उच्च दर्जाचा दिसतो. असा संबंध मांडवल-वाला आणि मजूर यांत दिसणार नाहीं. हल्लींची ' औद्योगिक संस्कृति ' ही अति हीन स्वरूपाची आहे. ती खरी संस्कृति च नाहीं तर संस्कृतीचा आभास आहे. अशा आभासाला च स्पेन्सर सत्य मानून कंवटाळण्यास जातो. या पुढें आतां लवकर च जो ' सर्वसमते ' चा काळ येणार आहे तो जसा समाजाला तसा च व्यक्तीला अत्यंत भयप्रद होणार आहे. अशा स्थितींत नीट्झ्श म्हणतो आमच्या सारख्या ब्राह्मण-वृत्तीच्या विप्रतमांनीं राजकारणापासून अलिप्त राहून बाहेरून सर्व बाजूंनीं निरीक्षण करावें हें बरें. याला च ' निवृत्ति ' म्हणतात. समर्थांनीं प्रवृत्ति आणि निवृत्ति हें द्वंद्व घेऊन "प्रवृत्तीस पाहिजे राजकारण। निवृत्तीस पाहिजे विवरण। जेथ अखंड श्रवण मनन। धन्य तो काळ ॥ " या प्रकारें क्षत्रिय आणि ब्राह्मण या दोहोंना अनुलक्षून अनुक्रमें राज-कारण आणि विवरण सांगितलें आहे. नीट्झ्शेची निवृत्ति अशा च विवरणकारक स्वरूपाची होती. ही गोष्ट त्याच्या पुढील उद्गारांवरून सहज प्रत्ययास येणार आहे: तो म्हणतो,—

" आम्हीं निवृत्तिपर आहों, आम्हीं कालाचे द्रष्टे आहों— ज्या प्रमाणें गरूडपक्षी नभांत उंच उड्डाण करतो त्या प्रमाणें आम्हीं कालापासून स्वतंत्रपणें लांब राहून त्याकडे विहंगमदृष्टीनें अवलो-कन करावे अशी आमची इच्छा आहे; आम्हांला नागरिक होण्याची, किंवा राजकारण करण्याची, अथवा मालमत्ता कमावण्याची कसली

च एषणा नाहीं, आम्हांला केवळ शक्य तितकें अत्युच्च स्वातंत्र्य मिळविण्याची इच्छा आहे, आणि म्हणून जे कोणी आमचे समकालीन खोट्या पांघरुणाखालीं क्रियेला प्रतिक्रिया ( प्रतियोगी सहकारिता! ) करण्याच्या मागें लागतात त्या सर्वांच्या विरुद्ध आमचें हाडवैर आहे; आमची सर्व दृष्टि आणि आमचा सर्व स्वार्थ व्यक्तींची निवड करून त्यांना शिक्षण देण्याकडे आहे--कदाचित् मानवजातीला, जेव्हां ही सर्वसामान्य अराजकतेची धुंदी उतरेल तेव्हां अशा पुरुषश्रेष्ठांची एके दिवशीं खास गरज भासेल. ''

नीट्झशेच्या ग्रंथकर्तृत्वाचा तृतीय कालपर्याय १८८८ च्या अखेरीस समाप्त झाला. या एका वर्षांत त्याचें पुष्कळ लेखन झालें. त्याचा शेवटचा ग्रंथ म्हणजे त्याचें आत्मचरित्र होय. ख्रिस्तांतक संपविल्यानंतर त्यानें हें लागली च तयार केलें आणि जी लेखणी खालीं ठेवली ती शेवटची. या वर्षाच्या उन्हाळ्यांत सिल्स मारिया येथें त्याचे शेजारीं ज्यूलिअस काफ्टेन हा तीन आठवडे होता. त्याच्या म्हणण्या-प्रमाणें नीट्झशेची प्रकृति या वेळीं चांगली दिसत होती. तथापि या काळांत नीट्झशेनें आपल्या एका पत्रांत म्हटलें आहे—“ माझ्या डोक्याला या वेळीं इतक्या तीव्र वेदना होत आहेत कीं मला वाटतें सर्वसंगपरित्याग करण्यांत मी कोणा हि हंसपरमहंसाशीं सहज बरोबरी करूं शकेन.'' या वर्षाअखेरपर्यंत त्याच्या शरीरानें कसा तरी निभाव काढला. जणुं काय तें हातीं घेतलेल्या ग्रंथांच्या समाप्तीची च वाट पहात होतें. हें वर्ष संपल्याबरोबर १८८९

च्या जानेवारींत त्याला वातपित्ताचा झटका आला आणि रक्तजमूर्च्छेनें त्याचें इंद्रियज्ञान एकदम बंद पडलें. या वेळीं तो इटलींत ट्यूरिन येथें होता. तेथें त्याला कांहीं काळ एका खाजगी दवाखान्यांत नेऊन ठेविलें. पुढें १८९० च्या उन्हाळ्यांत जेव्हां त्याला किंचित् बरें वाटलें आणि उठण्या बसण्याची शक्ति आली तेव्हां त्याला त्याच्या आईनें नाउमबर्ग येथें आपल्या जुन्या घरीं आणलें. तेथें तो १८९७ पर्यंत आई जवळ तिच्या शुश्रूषेखालीं होता. १८९७ मध्यें आईच्या मरणोत्तर त्याच्या बहिणीनें वायमर येथें त्याचे करितां एक स्वतंत्र उद्यानगृह घेतलें आणि त्यांत त्याची स्थापना केली. या गृहाचें नांव " Silberblick " ( रुपेरी देखावा ) असें होतें. हें घर इल्म नदीचे काठीं एका लहान टेकडीवर होतें. त्याच्या भोंवतालचें उद्यान रम्य असून त्याला ह्या महर्षीच्या निवासानें पवित्रपणा आलेला होता. त्या घराला एक चांगली लांबरुंद ओसरी होती. त्या ओसरीवर त्याचा बिछाना होता. त्याच्या मेंदूची शक्ति एकदां जी पतन पावली ती कायमची. कांहीं कालानें त्याला शब्दोच्चार करतां येऊं लागला पण मोठ्या कष्टानें. त्याला उठण्याबसण्याचें बिलकुल त्राण राहिलें नाहीं. अशा अपंग स्थितींत त्याच्या प्रेमळ बहिणीनें त्याचें अनन्यभक्तीनें संगोपन केलें. आतां त्याचा तो पूर्वीचा उग्रपणा जाऊन त्या ठिकाणीं पूर्ण सौम्यता आणि परम शांति प्रस्थापित झाली होती. तो वेळोवेळीं आपला कृश हात पांघरुणाच्या बाहेर काढून त्या

हातानें आपल्या प्रिय लिस्बेथचा मृदु हात कंवटाळी आणि म्हणे—“ तूं आणि मी, माझे ताई, आपण किती सुखी आहोंत. ” एकदां तिनें त्याचे पुढें वाग्नेरचें नांव उच्चारलें तेव्हां तो म्हणाला, “ Den habe ich sehr geliebt !” (मला त्याचे विषयीं केवढें प्रेम वाटतें ). त्याचा तो जुना राग केव्हां च मावळला होता आणि त्याला आतां फक्त आपल्या पूर्वींच्या आनंदाच्या काळाचें स्मरण राहिलें होतें. त्याच्या मृत्यूच्या पश्चात् हें घर आतां त्याचें स्मारक मंदिर म्हणून रक्षण करण्यांत आलें आहे. त्यांत एक पुस्तकसंग्रहालय आणि एक वस्तुसंग्रहालय अशा दोन संस्था आहेत. नीट्झ्शेचे जर्मनींत आणि इतरत्र जे जे कोणी भक्त आणि चहाते आहेत—आणि त्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे—त्या सर्वांना हें स्थान तीर्थयात्रे प्रमाणें पवित्र वाटत असून ते त्याचें दर्शन घेण्यास येतात. हें स्थान त्याची बहीण फ्राऊ फोर्स्टर-नीट्झ्शे हिच्या देखरेखीखालीं तिच्या च ताब्यांत आहे.

नीट्झ्शेचें देहावसान १९०० मध्यें आगष्टच्या २५ व्या तारखेस प्रात:काळीं सूर्योदयाच्या सुमारास झालें.

" जें तुम्हांला हिसकून घेतां येत नाहीं
तें तुम्हांला कोणी देतां कामा नये. "

— एवमब्रवीज्झरथुष्ट्रः —

# शुद्धिपत्र.

[ काना मात्रा अनुस्वार वगैरेंच्या खिळे उडून झालेल्या किरकोळ चुका सोडून महत्त्वाच्या शुद्धि आणि दुरुस्त्या पुढें दिल्या आहेत त्या पहाव्या. ]

| पृष्ठ | ओंळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ४४ | शेवटची | मानालि | मानली |
| ६३ | १४ | अत्कंत | अत्यंत |
| ११२ | २० | उच्य | उच्च |
| १२८ | ७ | अत्युच्य | अत्युच्च |
| १८९ | ८ | अविष्कृत | आविष्कृत |
| १९२ } २१६ } | मथळा | नीट्झेचा ख्रिस्तांतक | ख्रिस्तांतक नीट्झे |
| २३१ | ९।१० | मोऽस्मान्द्वेष्टि | योऽस्मान्द्वेष्टि |
| २५६ | ९ | त्याकडे न राहणें | त्याकडे न पाहणें |
| २५९ | १७ | मा सरव्युर्दक्षं | मा सख्युर्दक्षं |
| ,, | २१ | कृरूं | करूं |
| २६३ | शेवटचा शब्द | स्यांय | त्यांत |
| २६४ | ७ | निसर्गाय | विसर्गाय |
| २७० | २।३ | कथन केली सांगितली आहे | कथन केली आहे |

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २७२ | ८ | निरुक्तीची | निरुक्ताची |
| ,, | १० | वर्वांगांनीं | सर्वांगांनीं |
| २८३ | ७।८ | लुसर्न नामक गांवाजवळ ट्रिब्शेन खेडयांत वाग्नेरचें घर होतें | स्विट्झर्लंडांत लुसर्न नामक तलावावर वाग्नेरचें ट्रिब्शेन नामक घर होतें |
| ३४६ | १०।११ | शुद्रवृत्तीनें | शूद्रवृत्तीनें |
| ३८९ | ९ | अउच्च | अत्युच्च |
| ४७२ | ४ | अध्यायनाध्यापनाच्या | अध्ययनाध्यापनाच्या |

REFBK-0004342